# प्राचीन मराठीतील स्फुट आख्यान काव्यांचा अभ्यास

अनुराधा कुलकर्णी

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3865



REFBK-0026623

संदर्भ निबंध
काव्य समीक्षा
३७७५
२६६२३

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 SEP 1992
28/9/95

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८८.

# प्राचीन मराठीतील
# स्फुट आख्यान काव्यांचा अभ्यास

'कथा त्रिवेणीसंगम
देव भक्त आणि नाम ॥'

-तुकाराम महाराज.

REFBK-0026623

◆ प्रा. डॉ. सौ. अनुराधा दामोदर कुलकर्णी ◆

◆ प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनार्थ युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशन, न्यू दिल्ली आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी अंशतः अनुदान दिले आहे. धन्यवाद.

" The Author acknowledges his indebtedness to the University Grants commission, New Delhi and to the Shivaji University, Kolhapur forgrant - in aid received by him towards the cost of publication of his book. "

© प्रा. डॉ. दामोदर विष्णुपंत कुलकर्णी
७७२ गावभाग, सिंध हायस्कूलजवळ,
सांगली.

प्रथमावृत्ती
जानेवारी १९९२

किंमत
१०० रुपये

मुखपृष्ठ
अभय पुरंदरे

ISBN 81-7161-162-1

प्रकाशक
अनिल मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६, सदाशिव पेठ
पुणे

मुद्रक
संगम प्रेस प्रा. लि.
कोथरूड
पुणे

टाइपसेटर
सौ. आशा मानसी पानस्कर
पॅनप्रिंट
सागर अपार्टमेंटस्, ९ वी गल्ली
राजारामपुरी
कोल्हापूर

◆ भक्तिपूर्वक समर्पण ◆

।। ज्यांच्या 'अभिनव वाग्विलासिनी' वाणीने 'अमृतातेही पैजा जिंकून' अखिल जीवनाची पायाभरणी केली त्या श्रीज्ञानेश्वरांच्या 'श्रीज्ञानेश्वरी' या ग्रंथास सातशेहे वर्षे पूर्ण झाल्याने श्रीज्ञानेश्वरी जन्म सप्त-शताब्दी निमित्त श्रीज्ञानेश्वर माऊलींच्या चरणी भक्तिभावपूर्वक अर्पण ।।

# प्रास्ताविक मनोगत

## प्रबंध भूमिका

प्रस्तुत प्रबंध ग्रंथात प्राचीन मराठीतील काही स्फुट आख्यान काव्यांचा विवेचक अभ्यास आस्वादपूर्ण रीतीने मांडण्यांचा विनम्र प्रयत्न केला आहे. भारतीय संस्कृतीच्या जीवनमूल्यांची संपन्न सत्त्वधारा घेऊन, लोकमंगलाच्या कामनेने, रंजनाच्या परिवेषातून प्रकटलेल्या, प्रबोधक अशा स्फुट आख्यान काव्यांचे भांडार मध्ययुगीन मराठीचे वाङ्मयधन ठरले आहे. लघु आकारातील या स्फुट आख्यान काव्यांचे स्वरूप आकृतीबंधाच्या दृष्टीने छोटेखानी दिसत असले तरी समाजसंस्कार, प्रबोधनाच्या दृष्टीने त्यांची प्रभावोत्पादकता विलक्षण प्रत्ययकारी ठरलेली दिसते. 'गागर में सागर' या उक्तीप्रमाणे थोडक्यात पण प्रभावी संस्कार करण्याच्या दृष्टीने या स्फुट आख्यानांत विशिष्ट जीवनमूल्यांचे तत्त्वसूत्र मंत्रसामर्थ्यांप्रमाणे ठासून भरलेले दिसते. शर्करावगुंठित मधुर मधुगुटिके प्रमाणे रंजनाचे वेधक रूपलावण्य प्रकट करीत त्यातील सत्त्वधारा लोक जीवनाचे भरणपोषण करीत आलेली आहे.

काल सापेक्षतेने कथारूपाविष्काराची विविधता प्रकट करीत संत-पंत-तंत काळातून या स्फुट-आख्यानकाव्यांचे वेधक उन्मेष प्रकट झाले आहेत. हे त्यांचे बदलते रूपदर्शन प्रादेशिकतेचे परिमाण घेऊन प्रकटले आहे. अशा रीतीने कालसापेक्षता, प्रादेशिकता अंगी मुरवून कवींच्या व्यक्तिमत्त्वातील गहिरे रंग प्रकट करणाऱ्या या स्फुट आख्यान-काव्यांचे आस्वादक विवेचन मांडणे हा प्रस्तुत प्रबंध ग्रंथाचा विषय बनला आहे.

## रूपबंधाच्या प्रेरणा-प्रवृत्ती

प्राचीन मराठीतील समग्र आख्यान काव्यांचे विहंगमावलोकन करता महाकाव्यसदृश प्रदीर्घ आख्यान-काव्ये, खंडकाव्ये, स्फुट आख्यान-काव्ये इ. विविध आकृतीबंध दिसून येतात. त्यातील खंडकाव्यसदृश पद्यनिबद्ध रचनेस आख्यान-काव्ये असे संबोधून महदंबा ते मोरोपंतांपर्यंत अनेक कवींच्या दीर्घ आख्यानांचे विवेचन मांडण्याचा प्रयत्न थोडाफार झाला आहे. पण त्यातील लघुकाय अशा 'कथात्मक स्फुट आख्यान काव्यांचा' वाङमयीन रूपबंधासह आणि प्रेरणा प्रवृत्तीसह आस्वादक शोधबोध विस्तारशः असा अभावानेच मांडला आहे. वास्तविक थेट ऋग्वेद कालापासून या स्फुट आख्यान काव्यांची वाटचाल औपनिषदिक, पौराणिक काळातून संत पंताच्या काळापर्यंत अव्याहतपणे होत आली आहे. ही परंपरा मौखिक - लिखित स्वरूपात चिरंजीवी अशीच आहे.

## आध्यात्मिक सत्त्वधारा

मानवी जीवनातील सनातन आध्यात्मिक सत्त्वधरा फुलविणारी ही आख्यान काव्ये अनन्य भक्ती, अढळ निष्ठा, सत्य प्रीती, वचन निष्ठा, प्रखर बैराग्य; प्रगाढ मित्रप्रेम इ. सारख्या विविध नीतिमूल्यांचा आदर्श दाखवीत परंपरेने चालत आली आहेत. लोकजीवनातील

त्यांचे स्थान अढळ असेच आहे. धार्मिक सणवार, व्रतवैकल्ये, उपासना, विविध देवदेवतांचे जयंत्युत्सव इ. नित्य नैमित्तिक प्रसंगांतून भजन, कीर्तन, गोंधळ, ललित यक्षगानादी माध्यमातून बदलत्या लोकाभिरुचीतून ही स्फुट आख्याने कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर श्रद्धेने प्रकट होत आली आहेत. अशा आख्यानांची सत्त्वधारा एवढी प्रभावी लोकप्रिय ठरली आहे, की एकाच कथाविषयावर अनेक कवींनी आख्याने रचली आहेत. मोरोपंतांसारख्या पंडितकवीने तर एकच सुदामकथा चार वेळा लिहिली आहे. यावरून सुदामकथा, ध्रुवकथा, प्रल्हादकथा, शिबिराजकथा, हरिश्चंद्रकथा, गजेंद्रमोक्ष कथा इ. कथांची मोहिनी आपणास समजून येते. या दृष्टीने अशा स्फुट आख्यानांच्या यथामूक प्रेरणा, प्रवृत्ती आणि प्रयोजना यांचा विचार प्रस्तुत प्रबंधात विवेचून मांडला आहे.

### कथासंच तौलनिक आस्वादन

बदलत्या काळात, युगधर्माचे अवधान ठेवून कालसापेक्षतेने प्रकटलेल्या एकाच विषयावरील विविध कवींची स्फुट-आख्याने एकत्र करून असा 'कथासंच', आशय आणि अभिव्यक्ती अशा अंतर्बाह्य दृष्टीने तौलनिक स्वरूपात अभ्यासणे उद्बोधक ठरणारे आहे. त्यातून बदलती प्रयोजन-केंद्रे, कथा-बांधणीतील विविधता, रंजकतेचे बदलते रुप, व्यक्तिचित्रणातील बदलते रंग, लोकाभिरुचीचे स्वरूप इ. अनेक गोष्टींचा वेध घेणे लाभकारी ठरणारे आहे. यादृष्टीने प्रस्तुत प्रबंध ग्रंथात -

(१) प्रल्हादकथा संच (२) गजेंद्रमोक्षकथा संच (३) सुदामकथा संच (४) ध्रुवकथा संच (५) शुकरंभाकथा संच असे पाच कथा संच निवडून त्यांचे आस्वादपूर्ण विवेचन मांडले आहे. असा अभ्यास प्रथमच नव्याने मांडला जात आहे. वरील कथा संचाखेरीज हरिश्चंद्र कथा, थालीपाक आख्यान, व्याधाख्यान, शिबिराज आख्यान, चंद्रहासाख्यान, गंगागौरी कलह; उमारमा संवाद कथा इ. कथा संचदेखील होण्यासारखे आहेत. प्रस्तुत शोधप्रबंधाच्या साधनसामुग्रींचा शोध घेत असताना अशा अनेक कथा अवलोकनात आल्याने मुद्दाम त्यांची एक अभ्यासदिशाही येथे सूचित केली आहे. इथे मात्र विस्तार मर्यादेत उपरोक्त पाच कथासंचापुरतेच विवेचन मांडले आहे.

### साधनसामुग्रीचा विचार - अप्रकाशित नवोपलब्धी

मध्ययुगीन (प्राचीन) मराठीतील स्फुट कथात्मक आख्यान काव्यांच्या साधनसामग्रीचा विचार करता गोडबोले संपादित - नवनीत, महाराष्ट्र कविमाला, वामन दाजी ओकांचे ग्रंथ, सकलसंतगाथा खंड १, २ इ. ग्रंथातून या स्फुट आख्यानांच्या संहिता उपलब्ध होऊ शकल्या; पण त्याखेरीज अप्रकाशित असे हस्तलिखितांच्या स्वरूपात कथाभांडार भरपूर असलेले आढळून आले. पंढरपूरमठ, पुणे, तंजावर, मुंबई, वाई, कोल्हापूर इ. ठिकाणी अनेक आख्याने उपलब्ध झाली असून, श्रीधर, आनंदतनय, गुरुदास, रामनाथ, प्रतापराम, उटकेगोविंद इ. अनेक कवींची अप्रकाशित स्फुट आख्याने तेथील हस्तलिखितावरून नकलून घेतली असून, प्रस्तुत ग्रंथात यथास्थान त्यांचा संदर्भ परिचय ग्रथित केला आहे. या ग्रंथात जवळजवळ १५/१६ अप्रकाशित स्फुट आख्याने नव्याने प्रथमच समोर

येत आहेत. महाराष्ट्र सारस्वतात ही नवी भर घालण्याची अल्प सेवा घडत आहे. तसेच पंढरपूर मठात श्रीधराची जी स्फुट आख्याने मिळाली त्यांचे - 'श्रीधराची स्फुट-आख्यानकाव्ये।' या नावाने एक पुस्तकही प्रकाशित करण्याचा योग आला. त्यामुळे मूळ प्रबंधात श्रीधराच्या स्फुट आख्यानाच एक स्वतंत्र प्रकरण होते. ते इथे वगळले आहे.

## आजपर्यंतच्या अभ्यासाची दिशा

प्राचीन मराठीतील 'स्फुट कथांचे संच' निवडून त्यांचे रामायण, महाभारत, भागवत इ. मूळ ग्रंथासह यथामूल आस्वादक विवेचन प्रथमच मांडण्यात येत आहे. तथापि आजवर अनेक मान्यवरांनी वेगवेगळया दृष्टिकोनातून मांडलेला अभ्यासही महत्त्वाचा असून, त्यांनी प्रायः प्रदीर्घ, दीर्घ खंडकाव्येच विचारात घेतलेली दिसतात. कथासंच विवेचून मांडले नाहीत.

त्या अभ्यासकांत गोडबोले, वि. ल. भावे; पांगारकर; आजगांवकर चिं. नी. जोशी वामनदाजी ओक, गं. ब. ग्रामोपाध्ये, डॉ. ह. कि. तोडमल; म. वा. धोंड. डॉ. रा. चिं. ढेरे, धनपलवार, अ. का. प्रियोळकर, प्र. वा. बापट, श्रीगजमल माळी, डॉ. के. ना. वाटवे, डॉ. वा. के. लेले, डॉ. वसंत जोशी, डॉ. र. बा. मंचरकर, इ. जुन्या नव्या अभ्यासकांनी या संदर्भात मांडलेले अभ्यासपूर्ण विवेचनही लक्षणीय असेच आहे.

रा. श्री. जोग संपादित म. वा. इतिहास खंड ३ मध्ये 'स्फुट काव्ये' या प्रकरणात पदे, गौळणी, भारुडे इ. स्फुट काव्यांचा विचार मांडला आहे. पण 'स्फुट कथात्मक आख्याने' विचारात घेऊन 'कथासंच' या पातळीवर इथे विवेचन प्रथमच मांडले जात आहे. तथापि, उपरोक्त अभ्यासकांच्या लेखांचा, ग्रंथांचा खूपच उपयोग झाला आहे हे कृतज्ञतापूर्वक सांगावेसे वाटते. त्यांना अंतःकरणपूर्वक धन्यवाद.

प्रस्तुत ग्रंथातील कथा संच अभ्यासात त्यातील आध्यात्मिक बैठक स्पष्ट केली असून त्या सत्त्वधारेच्या अधिष्ठानावरील प्रकटलेल्या आख्यानावरून आकृतिबंधाचे आस्वादन विवेचून मांडले आहे. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी संदर्भ टीपा, कथासाधन संदर्भ, दिले आहेत. ग्रंथाच्या शेवटी साधनग्रंथ सूची दिलेली आहे.

## ऋणनिर्देश

प्रस्तुत ग्रंथापूर्वी शिवाजी विद्यापीठास सादर केलेल्या शोध-प्रबंधासाठी अभ्यासकायात अनेकांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. या स्फुट आख्यानांच्या मुळाशी असणारी आध्यात्मिक सत्त्वधारा अंगीकृत होण्यासाठी अधिकारी अशा सत्वसंपन्न संतांचे कृपाशीर्वाद पाठीशी असणे हे महद्भाग्याचेच होय. या दृष्टीने संत सद्गुरु श्री रामराय केळकर व मातोश्री कै. ती. सौ. सीतावहिनी केळकर यांचे आशीर्वाद लाभले.

प्रस्तुत संत-पंत साहित्यातील भक्ति, ज्ञान, वैराग्याचे यथामूल सूत्र शोधताना आमच्या मातृपितृ घराण्यात परंपरेने आलेल्या वेदशास्त्राध्ययनाचे व अध्यात्मसाधनेचे धन सहजीच प्राप्त झाले. त्यांचे अनेक आशीर्वाद पाठीशी राहिले. या दृष्टीने माझे आजोबा कै. ती. नागेशराव सांगलीकर व पितामहतुल्य वै. ती. पं. खुपेरकरशास्त्री कोल्हापूर (राष्ट्रीय पंडीत) यांचा इथे निर्देश करीत आहे. कोल्हापूरचे वेदशास्त्रसंपन्न पं. श्रीपादशास्त्री जेरे यांचे

आशीर्वादही येथे आवर्जून उल्लेखित आहे. त्यांच्या व पं. खुपेरकर यांच्या प्रेरणेनेच संस्कृत अध्ययनाची गोडी लागून, एम. ए. ला संपूर्ण संस्कृत विषय घेऊन शिवाजी विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचे भाग्य लाभले. आठवले वेदान्त पारितोषिकाचा मानही प्राप्त होऊ शकला. या अभ्यासाचा मराठीच्या प्रबंध-अभ्यासातही विशेष उपयोग झाला.

माझे आई वडील ती. वि. ना. सांगलीकर तथा दादा आणि आई ती. सौ. कालिंदीबाई तथा ताई यांच्या ऋणातून उतराई होणे केवळ अशक्यच आहे. त्यांचे कृपाछत्र हेच प्रेरक सामर्थ्य !

साधन सामग्रीच्या दृष्टीने सर्व ज्ञात-अज्ञात ग्रंथकारांना कृतज्ञतापूर्वक धन्यवाद !

शिवाजी विद्यापीठाने प्रवास अनुदान मंजूर केल्यामुळे तंजावर येथे वास्तव्य करून तेथील सरस्वती महाल ग्रंथालयातील हस्तलिखितांचा अभ्यास करता आला. या आर्थिक अनुदानाबद्दल विद्यापीठाचे आभार मानत आहे.

तंजावर येथील समर्थ रामदासस्वामींच्या मठातील विद्यमान पीठाधीश समर्थ श्री भीमराव गोस्वामी यांनी अनेक हस्तलिखिते उपलब्ध करून दिली. ते स्वतः तेथील ग्रंथालयात 'मराठी पंडीत' म्हणून सेवेत आहेत. त्यांच्या पत्नी यांचेही प्रेमळ सहकार्य लाभले. त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार.

आमचे प्रबंध मार्गदर्शक प्रा. डॉ. वसंत स. जोशी, वाई, यांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन विशेष उल्लेखनीय आहे. ते साक्षेपी समीक्षक असून, त्यांचा प्राचीन मराठी वाङमयाचा गाढा व्यासंग आहे. त्यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली प्रस्तुत शोध-प्रबंधाचा अभ्यास पूर्ण झाला. त्यांच्या सुविद्य व सुस्वभावी सुविद्ध पत्नींचेही प्रेमळ सहकार्य लाभले उभयतांना अंतःकरणपूर्वक अभिवादन.

प्रस्तुत ग्रंथाच्या मुद्रणप्रतीचे कार्य चि. कु. अलकनंदा व चि. कु. दीपशिखा या कन्यांनी मोठ्या उत्साहाने केले असून, मराठी शारदेच्या चरणी त्यांची ही सेवा रुजू आहे.

या ग्रंथाचे प्रकाशक मेहता बुकस्टॉलचे मालक सर्वश्री अनिल मेहता, कोल्हापूर यांनी विद्यापीठाच्या नियोजित वेळेत, अत्यंत सुबक छपाई करून ग्रंथसिद्ध केल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. शिवाजी विद्यापीठाने, यू. जी. सी. न्यू दिल्ली च्या ग्रंथ-प्रकाशन अनुदानातून अनुदान मंजूर केले याबद्दल त्यांचेही आभार.

शेवटी ज्ञानेश्वरी जन्म सप्तशताब्दी वर्षात या ग्रंथाचा योग आला असून माऊलींच्या शब्दात विनंती एवढीच की -

**'न्यून ते पुरते । अधिक ते सरते ।**
**करूनि घेयावे हे तुमते । विनविले मिया ।।'**

**- ज्ञानेश्वरी.**

**सौ. अनुराधा दामोदर कुलकर्णी.**

# ुक्रमणिका


**प्रबंध भूमिका - प्रास्ताविक**

विषय वक्तव्य, आजपर्यंतच्या अभ्यासाची दिशा, अभ्यास-पद्धती, साधन-सामग्रीचा विचार, कथासंच तौलनिक आस्वादन, शोधप्रबंधाची दिशा.

**प्रकरण - पहिले** (१)

**कथात्मक काव्य : प्रेरणा प्रवृत्ती व प्रयोजन-विचार**

प्रास्ताविक, भारतीय कथेची विश्वसंचारी परिक्रमा, गद्यपद्याची सीमारेषा, मुद्रण पूर्व काळातील कथानुभवाचे घाट, वैदिक, औपनिषदिक, पौराणिक, रामायण, महाभारत इत्यादी काळातून कथेची वाटचाल.

गुणाढ्याची बृहत्कथा, पंचतंत्राची परिक्रमा, पारिभाषिक संज्ञाचा मागोवा, आख्यायिका, कथा, आख्यान, अन्वाख्यान, अनुव्याख्यान इ.

**मराठी कथेची सत्त्वधारा** - कथा म्हणजे जीवनमूल्यांची सत्त्वधारा, प्राचीन मराठी कथेची वाटचाल.

मराठी कथेच्या वाटचालीतील त्रिविध स्फुरण - पौराणिककथा, पौराणिकभक्त कथा, ऐतिहासिक संतकथा; साधन संदर्भग्रंथ.

**प्रकरण - दुसरे** (१७)

**प्राचीन मराठीतील कथात्मक स्फुट काव्यांचे 'स्व-रूप'**

प्रास्ताविक, सौंदर्यवादी स्वरूप, अभिजातवादीस्वरूप, नवरसमंदाकिनी, कथाविष्कारांचा विचार, निबद्ध आणि अनिबद्ध काव्यांचा प्रकार - महाकाव्य, खंडकाव्य, आख्यान-काव्य, स्फुट आख्यान-काव्ये, लघुकायरूप, नीतिमूल्य संस्कार, पाठांतर सुलभता, रंजकता, स्फुट आख्यानांचे संरक्षण व संवर्धन. प्रादेशिक परिमाण, कथाबांधणीवरील कालसापेक्ष प्रभाव, स्फुट आख्यान-बांधणीतील पदरचना, संगीत पद्धतीचा वेध, कथाबांधणीत कीर्तन-माध्यमाचा प्रभाव, कडाका छंदातील रूपबांधणी, चूर्णिका, तरल गद्याचे रूप, चंपू गद्यपद्य मिश्ररूप, संस्कृत श्लोकांची पेरणी, स्वकालदर्शन,

नाट्यात्मक घडणीवर तेलगू-तामिळी प्रभाव, तामिळ कोरवंझीचा प्रभाव, लोकाभिरुचीचा रचनाबांधणीवरील प्रभाव, कथारचनेतील व्यक्तिदर्शन, कथाबांधणीतील भाषाशैली, कथाबांधणीतील सामाजिकतेचा प्रभाव.

**कथासंच : तौलनिक आस्वादन-दिशा**

कथाप्रिय लोकाभिरुची, रसरहस्याचा शोध, बदलत्या आविष्कार शैलीचे रूपदर्शन, संख्यात्मक दर्शन, कथासंच-तौलनिक अभ्यास, मूळ कथेचा पुनरावतार दृकश्राव्यमूल्य, नवे आकृतिबंध, कलावंताचे व्यक्तिमत्त्व, साधनसंदर्भ ग्रंथ.

प्रकरण - तिसरे (३९)

प्रल्हाद कथा

प्रास्ताविक, प्रल्हादकथेची सत्त्वधारा, भक्तराज प्रल्हाद आणि संतपरंपरा. प्रल्हाद कथा एक राष्ट्रीय प्रेरणास्त्रोत. प्रल्हाद कथेची मोहिनी. निर्वाचित प्रल्हाद कथासंच-मूळ भागवत, नामदेव, एकनाथ, वामन पंडीत, आनंदतनय, गुरुदास, रामनाथ, मूळ भागवतीकथा-प्रयोजनविचार, कथाबांधणी, आस्वादक 'स्वरूप' विचार, व्यक्तिचित्रण-प्रल्हाद व हिरण्यकश्यपू. समारोप. कथासाधन संदर्भ.

प्रकरण चौथे (८९)

गजेन्द्र-मोक्ष-कथा

प्रास्ताविक, गजेंद्र मोक्ष कथेतील आध्यात्मिक सत्त्वधारा, निर्वाचित कथासंच,-मूळ भागवत, नामदेव, एकनाथ, एकनाथ-तुकाराम, मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथ-पण्डित, रंगनाथ निगडीकर, रघुनाथ, अज्ञात कवी, अज्ञातकवी-गिरिदास, गोविन्द, पं. सुरेन्द्र, माधव, अनाम कवी, विष्णुदास, शेष, अनाम साधक. मूळ भागवतीकथानक, प्रयोजन विचार, कथाबांधणी आस्वादक विवेचन, मूळ कथेपेक्षा बदलते रूपाविष्कार, कथाबांधणी 'स्व'-रूप विवेचन. व्यक्तिचित्रण, समारोप, कथा-साधन-संदर्भ.

प्रकरण पाचवे (१२१)

सुदाम-चरित्र-कथा

प्रास्ताविक, सुदामकथेतील सत्त्वधारा, निर्वाचित कथा संच, मूळ भागवती कथा, नामदेव, एकनाथ, रंगनाथ निगडीकर, अनामकवी, आनंदतनय, श्रीधर, अमृतराय, अमृतराय (१) मोरापन्त (२) मोरोपंत, प्रभाकर मूळ भागवती कथानक, प्रयोजन, कथाबांधणी 'स्व'रूप विचार. व्यक्तिदर्शन, समारो . कथा-साधन-संदर्भ -

प्रकरण सहावे (१४४)

ध्रुव-कथा

प्रास्ताविक, ध्रुव कथेची आध्यात्मिक सत्त्वधारा, निर्वाचित ध्रुवकथा संच-(१) मूळ भागवती कथा, (२) नामदेव (३) एकनाथ (४) वामनपण्डित शिष्य (५) श्रीधर (६) अमृतराय (७) उद्धवचिद्घन (८) नरहरितनय. मूळकथा. प्रयोजन विचार कथाबांधणी : स्वरूप विचार. व्यक्तिचित्रण, समारोप. कथासाधन संदर्भ.

प्रकरण सातवे (१५९)

शुकरंभा-चरित्रकथा

प्रास्ताविक, शुकरंभा कथेची सत्त्वधारा. निर्वाचित कथा संच, विष्णुदासनामा. मुक्तेश्वर, वामनपण्डित, रंगनाथस्वामी निगडीकर, श्रीधर, अमृतराय, विठ्ठल केरीकर, उद्धव चिद्घन, प्रयोजन विचार, कथाबांधणी, स्व-रूप विचार, व्यक्तिदर्शन, समारोप. कथासाधन संदर्भ.

**प्रकरण आठवे (१८५)**

**आनंदतनयाची काही संकीर्ण स्फुट आख्याने**

प्रास्ताविक कविवृत्त -(१) **'मार्कंडेय चेरित्र'** - कथाभाग,कथाबांधणी.-स्व-रूप विचार, रसविचार. स्वभावोक्तिपूर्ण वर्णन शैली. नवोपलब्ध हस्तलिखित कथा साधन संदर्भ.

(२) **शिबीचेक्रवर्तीची कथा** - कथास्वरूप आस्वादक विवेचन. उदात्त प्रयोजन. रेखीव बांधणी. कथा संघर्ष नाट्य. व्यक्तिचित्रण. नवोपलब्ध हस्तलिखित साधन ग्रंथ.

(३) **त्रीणावर्त दमन कथा** - कथा स्व-रूप विवेचन, रसचित्रे, काव्यात्मक प्रतिमा, नाद चित्रे, स्वभावोक्तिपूर्ण क्षणचित्रे, नवोपलब्ध हस्तलिखित कथा,साधन संदर्भ.

(४) **कृष्णाची कहाणी** - कुशल तंत्र लाघव, प्रसन्नवात्सल्य रसदर्शन, पाळणा, कथेतील कथा, फलश्रुती, अंगठीतील हिरा. नवोपलब्ध हस्तलिखित साधन-संदर्भ समारोप.

**प्रकरण नववे (१९९)**

**तंजावरकडील काही अन्य स्फुट आख्याने**

**आस्वादक विवेचन**

प्रास्ताविक कविवृत्त - नवोपलब्ध हस्तलिखितकथा - चेतुर्भुज सावजकथा, चेंद्रहास - निरोपण, श्री उमा रमा - संवाद.

१. **गुरुदासकृत - चेतुर्भुज सावजकथा** - कथाभाग प्रयोजन, कथाबांधणी, स्वरूप विचार, व्यक्तिचित्रण - कथानायक भिल्ल हस्तलिखित कथा साधन संदर्भ.

२. **प्रतापरामकृत - चेंद्रहास निरोपण कथा** - कथामूळ,प्रयोजन, कथाभाग, कथाबांधणी, व्यक्तिचित्रंण - चेंद्रहास, नवोपलब्ध कथा साधन संदर्भ.

३. **उटके गोविंदकृत - श्री उमा रमा संवाद** - कथा स्वरूप,रंजनप्रधानता, रचना तंत्र. कथाभाग,खटकेबाज संवाद, नवोपलब्ध कथा साधन संदर्भ, समारोप.

**परिशिष्ट एक**

**तंजावर येथील नवोपलब्ध सात स्फुट आख्यान-काव्ये**

**परिशिष्ट दुसरे**

**साधन-ग्रंथ-सूची**

# प्रकरण पहिले

## कथात्मक काव्यांची प्रेरणा, प्रवृत्ती व प्रयोजन विचार

### प्रास्ताविक

**'ते कथा़जगदंबा जग निववी' – एकनाथ**

**भारतीय कथेची विश्वसंचारी परिक्रमा**

'कथा' हा भारतीय वाङ्मय प्रकार विश्वसंचारी असून गोष्टी, कहाण्या, स्फुट कथा या मानवी जीवन-प्रवाहाबरोबरच चालत आलेल्या आहेत. लोककथा, दंतकथा, अद्‌भुतरम्य कथा, आध्यात्म - तत्त्वज्ञानपर दृष्टान्त-कथा, विविध प्राणि कथा, धार्मिक गोष्टी, दैवत कथा, नीतिकथा आणि बोधकथा इ. सर्व प्रकारच्या कथा आबालवृद्धापर्यंत मानवी जीवनात वावरत आलेल्या दिसून येतात. मानवी श्रद्धा, आध्यात्मिक चिंतन, धार्मिक रुढी, सामाजिक चालीरीती; विविध परंपरा; राजकीय व्यवस्था; आणि मानवी सनातन भाववृत्ती इ. अंगोपांगातून कथेचा प्रवाह मौखिक स्वरूपात व पुढे लिखित गद्य-पद्याच्या पातळीवर अव्याहतपणे चालत आलेला दिसतो. कथानिवेदन आणि कथाश्रवण ही मानवी गरजच असल्याचे दिसते. किंबहुना, 'मानवी जीवन म्हणजेच एक कथा आहे; असंख्य दीर्घ कथांची ती एक मालिका आहे - अशी मालिका की, ती केव्हां कुठे सुरू झाली याचा पत्ता नाही व केव्हां, कशी संपणार याचा अदमास नाही.'[१] या संदर्भात बोआस म्हणतो की, 'प्रत्येक लोकसमूहाच्या कथा म्हणजे त्या त्या लोकसमूहाची किंवा राष्ट्राची आत्मकथाच म्हटली पाहिजे.'[२]

मानवी जीवनात रंजनाबरोबरच जीवनसत्याचा शोध घेत असताना कल्पना, भावना आणि प्रतिभा यांतून 'कथा' हा वाङ्मय प्रकार फुलत आला आहे. कथाकथनाच्या किंवा निवेदनाच्या सहज प्रवृत्तीला भाषेचे माध्यम गवसताच स्फुट कथेसारखा छोटेखानी, सुटसुटीत, लवचिक पण प्रभावाच्या दृष्टीने परिणामकारक असा वाङ्मय प्रकार सहजच स्वीकारला गेला. म्हणूनच विश्वसाहित्यात कथासाहित्य हे साहित्याचे अक्षय भांडार ठरलें आहे. मात्र 'कथा' या वाङ्मय-प्रकाराच्या ज्येष्ठतेचा मान भारतीय कथेलाच द्यावा लागतो. पंचतंत्राच्या प्रस्तावनेत बनफेने असे विधान केले आहे की, 'सर्व लौकिक कथा किंवा पारंपरिक कथा भारतातून युरोपात आल्या. या कथांचे प्रसरण साहित्य-प्रणालीतून झाले. याचे मुख्य अंग अनुवाद हे होय. बिडपाईच्या अरबी भाषांतरात हितोपदेशाचे पर्यटण दिसून येते. इसापाच्या अनेक कथांवर पंचतंत्राची छाया पडलेली आहे. अशा प्रकारे युरोपीय कथांचा उगम पंचतंत्रात आढळून येतो. कथांची ही आणणावळ अखंड भटक्या ज्यू लोकांनी; स्पेनमधल्या मूरनी; पौर्वात्य राष्ट्राशी संबंध आलेल्या ग्रीकांनी व नंतर क्रूसेडर्सनी केली'.... बेनफेच्या पौर्वात्य गौरवाच्या या सिद्धान्ताला डॉ. गास्टरने दुजोरा देऊन म्हटले की, या कथा-वाङ्मयाचे उगमस्थान पौर्वात्यच आहे.'[३]



निबंध
३८६५
२६६३
२८/६/९२

समग्र भारतीय साहित्यात 'कथा' हा वाङ्मयप्रकार असा आहे की, त्याचा प्रसार भरतखंडातच नव्हे, तर सर्व जगभर झाला आहे. युरोप, आफ्रिका इ. जगतातील कल्पित आणि अद्‌भुत कथांवर भारतीय कथेचा ठसा खोलवर उमटलेला असून,या अर्थाने 'भारतीय कथा जगदंबा' ही जगावर स्वामित्व गाजविणारी प्राचीनतम वाङ्मय शाखा म्हणून अभिमानाने गौरविता येईल.

'भारतीय कथासंग्रहाच्या कार्याला जसे वाल्मीकि, व्यास, गुणाढ्य, बुद्ध, महावीर असे जनक लाभले तसे अन्य कोणत्याही देशाला प्राचीनकाळी लाभले नाहीत.'[४]

भारतीय कथेचा विश्वसंचारही लक्षणीय असून, भारतीय 'कथा' ही विश्वसाहित्याला लाभलेली एक मोठी देणगीच आहे इमॅन्युएल कॉसकिन या फ्रेंच लोकसाहित्य विशारदानेदेखील पौर्वात्य कथेचा गौरव करून 'लोककथांची वाहतूक भारतातून पश्चिमेकडे करण्याचे श्रेय त्याने जिप्सी लोकांना दिले आहे. त्याचे हे विधान मात्र लोकसाहित्यशास्त्रात अद्यापही टिकून आहे.'[५]

अशा रीतीने 'अवघे जग निवविणारी' ही भारतीय कथा जगदंबा अति प्राचीन असून, 'जगातल्या कुठल्याही सुसंस्कृत राष्ट्रांच्यापूर्वी, प्राचीनकाळापासून भारतीयांनी अदभुतकथा, कल्पितकथा, प्राणिकथा आणि कहाण्या यांना अभिजात वाङ्मयाचे स्वरूप देऊन ग्रंथबद्ध करून ठेवले आहे. एवढेच नव्हे, तर भारतीय अभिजात व ललित वाङ्मयाच्या मूळ प्रेरणा याच (कथा) साहित्यातून निघालेल्या आहेत..... अभिजात ग्रांथिक भाषेत हे विस्तृत पारंपरिक कथासाहित्य आणण्याचा भारतीयांचा प्रयत्न केवळ जगातील प्रथम प्रयत्न म्हणूनच उल्लेखनीय आहे असे नाही, तर भारतात कित्येक शतके हा प्रयोग अबाधितपणे चालू राहिला हेच या प्रयोगाचे मोठे यश. सर्व धर्मग्रंथ अखेर या कथा-साहित्याच्या आधारे संस्कृत भाषेलाच येऊन मिळाले.'[६] अशी ही भारतीय कथा लोकश्रद्धेचा विषय बनली आहे. किंबहुना, वेदवाङ्मयात वाणीलाच देवता म्हणून प्रतिष्ठित केले आहे. 'तर वेदऋचांना स्त्रियांची रूपे व सामाना पुरूषांची नावे कल्पून एक सामाला तीन ऋचा (बायका) असतात असे सांगण्यात आले.'[७]

कथा-कहाणी कथनाने पुण्यप्राप्ती होते अशा श्रद्धेने पुण्यकथा, व्रतकथा, दैवतकथा, वीरकथा इ. कथांचे श्रवण-निवेदन धर्माचाराच्या चौकटीत परंपरेने जिवंत राहिले. कथेची ही परंपरा वेदसंहिता-ब्राह्मणे-उपनिषदे, रामायण, महाभारत, पुराणे आणि-धर्मशास्त्रे यातून जोपासली गेलेली दिसते.

## गद्य-पद्याच्या सीमारेषा-कथानुभवाचा घाट

प्राचीन कथेच्या संदर्भात 'नरप्रधान कथांना 'गाथा' असा शब्दप्रयोग असून, ऐत्तरेय ब्राह्मण गाथा म्हणजे 'मानुषी' असा उल्लेख आढळतो. 'गाथा नरप्रधाना ।' किंवा 'नराणां शंसनार्था ।' इ. या गाथा गाणाऱ्यांना 'गातुविदः.' म्हणत. 'गातुविदः' या शब्दप्रयोगावरून गाथा जाणणारी अनेक घराणी असावीत. ही ऋषी मंडळी पारंपरिक किंवा स्वतः रचलेल्या गाथा, वीणेच्या साथीने म्हणत असत. गाथाचे कथाप्रसंग असलेले सर्वात सुंदर उदाहरण

ऐतरेय ब्राह्मणात 'शुनःशेपाख्यानात' मिळते. पाली वाङ्मयात या गाथांना 'वस्तुगाथा' असे नाव आहे. वस्तु म्हणजे कथा किंवा कथावस्तु.'[८] सूत, मागध, चारण, बंदी या घराण्यांनी कथांचा सांभाळ केला. या मौखिक कथांचे पुढे लिखित रूपांतर झाले. कथांचे निवेदन करणे ही आंख्यानविदांची वृत्ती होती. पौराणिक काळात या कथाकथकांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. सूतांची परंपरा अतिप्राचीन दिसते. यज्ञादि प्रसंगातून कथांचा ओघ समाजातील सर्व घटकांपर्यंत जाऊन पोहोचलेला दिसतो. प्रारंभी धर्मप्रेरणेतून, लोकसमूहापुढे, रंजकतेच्या परिवेषात, मौखिक स्वरूपातच ही कथा प्रकटली.

वेदवाङ्मयात कथा, आख्यायिका, आख्यान, व्याख्यान, अन्वाख्यान, अनुआख्यान, इतिहास, पुराण इ. शब्द वापरलेले आढळून येतात. त्यानुसार काही कथाही आलेल्या आहेत. वेदात ज्या देवादिकांच्या, वीरांच्या किंवा राजांच्या कथा येतात त्या पद्यबद्ध सूत्रात आलेल्या आहेत. त्या गद्यकथा नाहीत. तथापि, त्या त्या सूत्रातून कथा दिसून येते. 'ऋग्वेदात जी संवादसूक्ते आहेत, ती एकप्रकारे आख्यानकाव्येच आहेत. ती गद्यपद्यमिश्रित आहेत. आख्यान हे जिचे मर्मस्थान आहे आणि धार्मिकता व आध्यात्मिकता ही जिची प्रेरणा आहे अशा आख्यान कवितेचे त्यात पूर्वरूप दिसते.'[९]

वेदातील या सूक्तकथेत भारतीय परंपरेचे सारे कथाविशेष दिसून येतात. मंत्रस्पष्टीकरणार्थ प्रकटलेल्या या दृष्टान्तकथा किंवा ही स्फुट आख्याने म्हणजे प्राचीन स्फुट कथांचे उत्तम नमुनेच होते. ऋग्वेदातील इंद्र, अश्विनौ आणि मरुत् यांच्या वर्णनपर सूक्तात कितीतरी कथाबीजे दडलेली आहेत. या कथांचा उलगडा आणि संग्रह करण्याचे कार्य प्रथम शौनकांनी केले. त्यांनी सुमारे ४८ कथा आपल्या 'बृहद्देवता' या ग्रंथात नोंदविल्या आहेत. मात्र या कथाप्रसंगाना 'कथा' न म्हणता, त्यानी 'इतिहास' म्हटले आहे. याचे कारण कथा ही मंत्रात अंतर्भूत असून, कर्मकांडात मंत्राला प्राधान्य असल्याने कथेला 'कथा' म्हणून वेगळे संबोधण्याची आवश्यकता नाही असा त्यांचा आशय दिसतो.

## मुद्रणपूर्वकाळातील कथानुभवाचे कथन

### वैदिक स्फुरण

सूत परंपरेत इतिहास, पुराणे व कथा यांचा मोठा भरणा आहे. त्या काळी स्थूलतः त्यांचा अर्थ 'प्राचीन कथा' असाच होता. मौखिक स्वरूपात ही कथा जोपासली गेली. महाभारतापासून 'कथा' या अर्थी 'आख्यान' हा शब्द रूढावलेला दिसतो. किंबहुना, महाभारतात प्राणिकथांनाही इतिहासच म्हटले आहे. आख्यान म्हणजे कथा-कहाणी होय. आख्यानाचा विशेष अर्थ 'पुरावृत्त कथनम्' असा आहे. आख्यानं पूर्ववृत्तोक्तिः । असे साहित्यदर्पणकार विश्वनाथ म्हणतो. ऋग्वेदात अशी अनेक आख्याने दिसून येतात. त्यात शुनःशेप, अगस्त्यलोपामुद्रा, वसिष्ठ विश्वमित्र, नहुष, देवापिशंतनू , नचिकेता, सुपर्ण, पुरूरवा इ. आख्याने विशेष प्रसिद्ध आहेत. याशिवाय 'पुरूरवा उर्वशी' 'यम-यमी' सरमा पणि इ. संवादनाट्यातून कथेचे रूपबंध दिसून येतात. 'पुरूरवा उर्वशी

संवादसूक्तातील कथा म्हणजे एक गंधर्वकन्या व एक मर्त्य मानव यांच्या प्रेमाची नाट्यपूर्ण शोककथा आहे... यम-यमी संवाद कथेचाही एक विदारक नाट्यकथा म्हणून उल्लेख करता येईल. शुनःशेप कथेत करूणरम्य कथाभाग आढळतो.'[१०]

### औपनिषदिक कथादर्शन

उपनिषदातून नचिकेता कथा, सत्यकाम जाबालकथा, गार्गी-याज्ञवल्क्य कथा, श्वेतकेतू आणि उद्दालक कथा इ. विशेष मान्यता पावल्या आहेत. 'सत्यकाम-जाबाल कथेत सत्यनिष्ठेचे महत्त्व आणि ब्रह्मबीजाचे श्रेष्ठत्व उत्तम तऱ्हेने सूचित केले आहे. या आख्यानात कथाकथनाचे व विशेषतः संवादाचे सहजरम्य, औपनिषदिक सौंदर्यही आढळते.'[११]

पुढे पुराणकथांतून वेदातील स्फुट आख्याने अधिक विस्तार पावली. काहींचा संकोचही घडला. रामायण-महाभारतातून तर कथासृष्टीचा विकास-विस्तार-काव्यरूपात दिसून येतो. ही आर्ष महाकाव्ये विश्वविख्यात आहेत.

### गुणाढ्याची बृहत्कथा

रामायण महाभारतादी कथापर्वानंतर लौकिक संस्कृत कथासाहित्य आपणांसमोर येते. त्यात गुणाढ्याच्या 'बृहत्कथा'; बुद्धस्वामींचा 'बृहत्कथा श्लोकसंग्रह'; सोनदेवकृत 'कथासरित्सागर', 'वेताळपंचविंशतिका', 'सिंहासनद्वात्रिंशतिका' इ. कथाग्रंथ कथारूपात आढळून येतात. कथेच्या या वाटचालीत गुणाढ्याच्या बृहत्कथेने एक वेगळे स्फुरण प्रकट केले आहे. वैदिक आणि जैन, बौद्ध यांच्या पारंपरिक कथेपेक्षाही निराळे वळण बृहत्कथेत आहे. सांप्रदायिक तंत्राची चौकट झुगारून, गुणाढ्याने बृहत्कथेत कथेचे लौकिक रूप कायम ठेवले आहे. किंबहुना, 'कथेकडे केवळ कथा म्हणून पाहाणे हेच तिचे वैशिष्ट्य. कथांच्या संग्रहणाचे हे धोरण क्रांतिकारी होते. कोणत्याही संप्रदायाच्या वाढीसाठी नव्हे, तर लोकानुरंजनासाठी कथा समाजाच्या सर्व थराकरता गोळा करणे हा एक कथासंग्रहाचा नवाच अवतार गुणाढ्याच्या कृतीच्या रूपाने आपल्याला आढळतो. धर्म नव्हे; नीती नव्हे तर अद्‌भुततेचे मानवी आकर्षण हा या कथा-वाङ्मयाचा प्राण आहे. प्राचीनाचा 'इतिहास' हा शब्द 'कथासरित्सागरात' तरी आढळत नाही. बृहत्कथेला इतिहास न म्हणता, 'अदभुतार्था महाकथा' असे म्हटलेले आढळते. 'अद्‌भुत कथा', 'महाकथा' व 'बृहत्कथा' असे तीन नवे शब्द या वाङ्मयात आढळतात.'[१२]

### पंचतंत्राची विश्वपरिक्रमा

विष्णुशर्माकृत पंचतंत्राच्या रूपाने पशुपक्ष्यांविषयी कथारूप धारण केलेली नीतिकथा इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकाच्या सुमारास पुढे आली. पश्चिमी जगांतही तिचा प्रसार झाला. पहलवी, ग्रीक, हिब्रू, स्पॅनिश, लॅटीन, जर्मन, इंग्रजी, इटालियन, स्लाव्ह, डॅनिश, आइसलँडिक, तुर्की, डच, फ्रेंच इ. भाषातून पंचतंत्राची भाषांतरे झाली. 'साधारणतः

पन्नास भाषांतून या ग्रंथाची जवळ जवळ २५० संस्करणे झाली आहेत. इ. स. ६६८ मध्ये चिनी कोशातही त्याचा अनुवाद अंतर्भूत झालेला आढळतो.'[१३] यावरून भारतीय कथेंची महती, लोकप्रीती आणि विशालव्याप्ती लक्षणीय ठरते.

या पंचतंत्राचा 'हितोपदेश' बंगालीत अवतरला असून, 'नारायण' नामक पंडिताने हा कथासंग्रह रचला.

अशा रीतीने प्राचीन कथेची ऐतिहासिक वाटचाल पाहाता – बाणभट्टाचे 'हर्षचरित', वाजपतिराजाचे 'गौडवहो', पद्मगुप्ताचे 'नवसाहसांकचरित्र', बिल्हणाचे 'विक्रमांकदेवचरित्र', कल्हणाची 'राजतरंगिणी' इत्यादींचा उल्लेख करावा लागतो. त्याबरोबरच रोमांचकारी, प्रदीर्घ कथा - आख्यायिकांच्या संदर्भात दंडीचे 'दशकुमारचरित्र' सुबंधूची 'वासवदत्ता'; बाणभट्टाची 'कादंबरी' यांचा निर्देश लक्षणीय असून, बाणाच्या मते कादंबरी ही कथाच आहे.

सारांश, कथा ही 'जन्मली वेदासवे जी ।' अशा आदिम वेदकाळापासून चालत आली असून, संस्कृत कथेतील हे कथाभांडार पुढे एतद्देशीय प्राकृत भाषांच्या प्रवाहातून खळाळून वाहू लागले.

## कथेची शुभंकर प्रेरणा-प्रयोजन

प्राचीन काळापासून कथेकडे पाहाण्याची लोकांची दृष्टी सश्रद्ध भाविकाची असून, यज्ञादि धार्मिक प्रसंगी दिव्यत्वाचा, आदर्श जीवनमूल्यांचा संस्कार घडविण्यासाठी कथा-कथकाकडून किंवा कथाविद ऋषींकडून मुद्दाम इतिहास कथा सांगण्याची प्रथा असलेली दिसून येते. ईश्वरी सामर्थ्याची जाणीव निर्माण करून, सदाचार, वैराग्य, नीतिबोध; सामर्थ्यसंपादन इ. गोष्टींची प्रेरणा देण्याचे प्रयोजन त्यामागे दिसून येते. कथा श्रवणनिवेदनाने पुण्यप्राप्तीचे प्रयोजनही गृहीत धरले आहे. कथेच्या फलश्रुतीत हे प्रयोजन स्पष्ट केले आहे. मानवी जीवनातील कथेची ही शुभंकर प्रेरणा मनुस्मृतीत स्पष्ट उल्लेखिलेली दिसते.

**'स्वाध्यायं श्रावयेत्पित्र्ये धर्मशास्त्राणि चैव हि ।**
**आख्यातानीतिहासांश्च पुराणानिखिलानि च ।।'** मनुस्मृती ३-२३२ ॥

मनूने ही आख्याने श्राद्धप्रसंगी ऐकावी असे म्हटले आहे.।। **रूपबंध लक्षण विचार ।।**

प्राचीन साहित्यात आलेल्या कथा, आख्यायिका इ. शब्दांचे पारिभाषिक निश्चितार्थ तसे स्पष्ट नाहीत. प्राचीन मराठीतही कथा, आख्यान इ. शब्द येतात. या आख्यान कवितेचे नेमके स्वरूप काय ? अंतरंग बहिरंगाच्या दृष्टीने आख्यान कवितेची नेमकी वैशिष्ट्ये कोणती ? मुद्रणपूर्वकाळी पद्यबंधातूनच तिचे अवतार का होत राहिले ? केवळ पद्यनिबंधन म्हणजे आख्यान-कथा म्हणता येईल का ? आख्यान कथेच्या रूपसिद्धीत गद्य-पद्य मिश्रबांधणीचा भाग किती; कथेच्या रूपात फरक पडत गेले काय; एक विशिष्ट वाङ्मयप्रकार म्हणून अशा कथांची पृथगात्म वैशिष्ट्ये कोणती सांगितली गेली आहेत ? मराठी भाषेपुरते पाहांता एकाच कथावस्तूच्या विविध अवतारांचे एक कथासंच म्हणून

विवेचन मांडले असता कोणकोणत्या गोष्टी दिसून येतील इत्यादी अनेक अंगाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

इथे आणखी एक गोष्ट विचारात घेणे आवश्यक आहे. 'आख्यान' आणि 'आख्यानक' असे शब्दप्रयोग करून 'खंडकाव्य' आणि 'स्फुट कथा काव्य' असा भेदही दर्शविला गेला आहे. तेव्हां या स्फुट कथात्मक काव्याची नेमकी लक्ष्मणरेषा कोणती ? विषयोपन्यासार्थ किंवा दृष्टान्तादाखल आलेली छोटीशी कथा ही आख्यानक किंवा स्फुट कथा म्हणता येईल का ? प्राचीन साहित्यात आख्यायिका व कथा यातही भेद सांगितला गेला आहे. तेव्हां या रूपदर्शी शब्दांचाही आपणास मागोवा घ्यावा लागतो.

## पारिभाषिक शब्दांचा मागोवा

'आख्यायिका' – हा शब्द वैदिक वाङमयात सापडत नाही. महाभारतापासून मात्र हा शब्द 'कथा' या अर्थी रूढ झालेला दिसतो. राजवंशाची गद्यरूप प्रशंसा, तसेच कन्याहरण, रणसंग्राम इ. प्रसंग उच्छ्वास-परिच्छेद यांनी विभागून सांगणे म्हणजे 'आख्यायिका' होय असे अग्निपुराणात सांगितले आहे.

'आख्यान' हा शब्द ब्राह्मण वाङ्मयात 'धार्मिक, कथात्मक गीत' या अर्थी आला आहे. 'ऐतरेय ब्राह्मणात शुनःशेपाख्यान आढळते; तसेच तेथे 'आख्यानविद' असा शब्द असून तो 'सौपर्णकथा' सांगत होता असा उल्लेख आढळतो.'[१४]

'महाभारतात आख्यान, उपाख्यान, कथा, पुराण, इतिहास हे समानार्थी शब्द आले आहेत. पतंजलीने 'आख्यान' व 'आख्यायिका' असे दोन शब्द कथासाहित्यासाठी वापरले असून, पुराण व पूज्य कथांना तो आख्यान म्हणतो.'[१५]

'पतंजलीने आपल्या महाभाष्यात वासवदत्ता, सुमनोत्तरा, भैमरथी या तीन प्रसिद्ध आख्यायिकांची नावे सांगितली आहेत. त्यावरून आख्यायिकेचे स्वरूप गद्यपद्य-मिश्रित असते हे त्यास मान्य दिसते. त्याच्या मते, आख्याने म्हणजे अतिपुरातन व पूज्य कथा, आख्यायिका म्हणजे लौकिक कथा. विशेषतः ऐतिहासिक दंतकथा; त्या काल्पनिक असतात.'[१६]

'कात्यायन' हा आख्यायिकेवर लिहिणारा सर्वात प्राचीन लेखक मानला जातो. 'वार्तिक' हा त्याचा ग्रंथ असून, त्यात तो म्हणतो –

'आख्यानाख्यायिकेतिहास पुराणेभ्यश्च ।'

त्याच्या या म्हणण्यानुसार आख्यायिका या महाभारतासारख्या महाकाव्यातून येतात. पण त्या स्वतंत्र असून, प्रसंगोपात्त त्यांचे आगमन होते. भरताने 'बव्हनृत्ता स्तोकसत्त्वा' म्हणजे पुष्कळशी खोटी अल्प सत्य असलेली कथा, म्हणजे आख्यायिका असे म्हटले आहे. कोलाहलाचार्यांनी कथेची अशी व्याख्या सांगितली आहे की, 'प्रबंधकल्पना स्तोकसत्यां प्राज्ञाः कथां विदुः !' अर्थात कल्पनेने रचलेली व अल्पांशाने सत्य असलेली ती कथा होय.'[१७]

'अग्निपुराणात कथेचे पाच प्रकार सांगितले आहेत; त्यापैकी 'आख्यायिका' हाही प्रकार आहे.

**'आख्यायिका कथाखंड कथा परिकथा तथा ।**

**कथा निकेति मन्यन्ते गद्यकाव्येन पंचधा ।।१-१२।।'**

राज्यकर्त्यांच्या वंशाची विस्तारपूर्वक प्रशंसा व ती गद्यपद्यमिश्रित असते असे तिच्या स्वरूपाविषयी स्पष्टीकरण अग्निपुराणात आले आहे.'[१८] 'दण्डीने कथा आणि आख्यायिका यातील भेद स्पष्ट करून, दोन्ही गद्य, पद्य रूपाविषयी वेगवेगळी नावे असल्याचे काव्यादर्शात म्हटले आहे. भामह कथेला **आख्यायिकेहून** भिन्न मानतो. रुद्रट; आनंदवर्धन आणि अभिनवगुप्त यांनीदेखील त्यात फरक मानलेला आहे. विश्वनाथ आपल्या साहित्यदर्पणात कथा व आख्यायिकेविषयी म्हणतो की,

**'कथायां सरसवस्तु गद्यैरेव विनिर्मितम ।**

**क्वचिदत्र भवेदार्या क्वचित वक्त्रापवक्त्रके ।।**

**आदौ पद्य नमस्कार:खलादेर्वृत्त कीर्तनम् ।' इ.**

म्हणजे कथेत एक सुरेख गोष्ट असून ती गद्यात असते. क्वचित ती आर्यावृत्तातही असते. कथेची सुरुवात पद्यातून केलेल्या नमनातून होते. त्यात खलादिकांचाही निर्देश असतो. पुढे तो आणखी लिहितो की,

**'आख्यायिका कथावत्स्यात कवेर्वंशानुकीर्तनम् ।**

**अस्यामन्यकवीनां च वृत्तं पद्यं क्वचित् क्वचित् ।।**

**कथांशानां व्यक्च्छेद आश्वास इति बध्यते ।**

**आर्या वक्त्रापवक्त्राणां छंदसा येनकेनचित् ।।** — साहित्यदर्पण

अमरसिंहाने अमरकोशात या दोन्हीतील फरक सांगतांना कथा या काल्पनिक व आख्यायिका ऐतिहासिक घटनांचे वहन करीत असतात असे म्हटले आहे.'[१९]

कथा आख्यायिकेप्रमाणे आख्यान, अन्वाख्यान इ. शब्दांचा स्पष्टार्थ फारसा आढळत नाही; तरी पण 'आख्यान' हे गद्य-पद्य यांचे मिश्रण असते. गद्य कथनात कथेचा ओघ सांभाळला जावा हे धोरण असते, तर पद्यात भावनांच्या उद्रेकाला अवसर दिला जातो असे ओल्डनबर्ग झीग याचे म्हणणे आहे ..... 'अन्वाख्यान' म्हणजे आख्यानाला अनुसरणारे किंवा पूरक निवेदन किंवा उपकथा, इतिहास म्हणजे शुद्धकथा आणि अन्वाख्यान म्हणजे दुय्यम किंवा पूरक कथन.... झीगने अनुव्याख्यान व अन्वाख्यान हे शब्द समानवाची मानले आहेत.... महाभारतात इतर कथा व प्राणिकथा यांतही सत्य व कल्पित असा भेद न करता, प्राणिकथानाही इतिहास म्हणूनच संबोधले आहे. महाभारतोत्तरकालीन वाङ्मयात कथा हा शब्दप्रयोग लोकप्रिय होऊन, टिकून राहिला आणि इतिहास हा शब्द संकोच पावला. आख्यायिका व आख्यान हे शब्द कथेबरोबर खेळते राहिले..... कथा हा शब्द उपनिषदोत्तर असून महाभारताच्या अगोदरचा आहे.'[२०]

जैन बौद्धांच्या साहित्यातूनही आख्यानाचे उल्लेख येतात. 'जैनांच्या साहित्यातून कथा या अर्थी - कथा, उपकथा, अंतर्कथा, आख्यान, आख्यायिका, वार्ता, उदाहरण, दृष्टान्त इ. शब्द आढळतात. जैनांनी उदात्त व पवित्र धार्मिक कथांकरिताच 'आख्यान' शब्द वापरलेला आहे. विशिष्ट मूल्याच्या प्रतिपादनाकरता ही आख्याने निर्माण झाली असून, ती अधिक जीवनस्पर्शी व वास्तवस्पर्शी उतरली आहेत. इथे इतिहास-चरित्र व कथा असे आख्यानाचे संमिश्र स्वरूप असल्याचे दिसते. परंपरेचा आधार असलेले – कथात्मक निरूपण म्हणजे 'आख्यान' असे त्याचे स्वरूप दिसते.'[२१]

बौद्धांच्या जातककथा पाहाता वैदिक कथांचे एक वेगळे वळण आपणास दिसून येते. बुद्ध, महावीर यांच्यासारख्या प्रवर्तकांचे सांप्रदायिक पर्व सुरू होऊन या नव्या युगात - अद्‌भुतरम्य अशा दैवत कथांपेक्षाही आध्यात्मिक तत्त्वचिंतनास महत्त्व आले. कर्मकांड तुच्छ मानून नवधर्माची शिकवण नव्याने मांडली जाऊ लागली. तरीपण वैदिक कथांचे प्रतिध्वनी त्यात निनादत राहिले. 'याचे कारण वैदिक धर्मांतर्गत या संप्रदायनिविष्ट बौद्ध, जैन धर्मपंथाचे एकीकरण कथावाङ्‌मयात श्रमणसंस्कृतीमुळे झालेले दिसते.'[२२]

अशा रीतीने प्राचीन साहित्याचा मागोवा घेता कालसापेक्ष शब्दभिन्नता दिसून येत असली तरी परंपरेच्या आधारे केलेले कथात्मक निरुपण म्हणजे आख्यान असे म्हणता येईल.

## मराठी कथेची सत्त्वधारा

प्राचीन मराठी कवितेतही आख्यान, कथा, चरित्र इ. शब्द वापरलेले दिसून येतात. ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वर म्हणतात –

**'नाना पुरतिये प्रतिष्ठेलागी । सानीव धरूनि आंगी ।**
**पुराणे आख्याने जगी । भारता आली ।।** ज्ञाने० १.४६ ।।'

इथे पुराणकथाच आख्यानांचा विषय झाल्याचे म्हटले आहे. महानुभावीय महाकवी नरेंद्राच्या 'रूक्मिणीसैंवरात किन्नरकथा आली आहे. नरेंद्र म्हणतो, 'ययाचे सांघता आख्यान । विचित्र असे ।। १५४ ।।' इथे आख्यान शब्द कथा पूर्ववृत्त, इतिहास या अर्थाने आला आहे. महानुभावीय अन्य वाङ्‌मयातही परंपरागत आलेल्या कथेसाठी आख्यान, कथा, चरित्रकथा इ. शब्द आलेले दिसतात. ज्ञानेश्वरांनी आपल्या ग्रंथाला 'कथा' असे म्हटले आहे. भक्ति, ज्ञान, वैराग्य आणि सात्त्विक रंजन हे मध्ययुगीन मराठी काव्याचे प्रायः प्रतिपाद्य विषय आहेत. समर्थ रामदास म्हणतात –

**'नवविधा भक्ति आणि ज्ञान । बोलिले वैराग्य लक्षण ।**
**बहुधा अध्यात्म निरोपण । निरोपिले ।।** दासबोध १.१.३ ।।'

अशा कथेच्या श्रवण-निवेवदनात जन्म घालविणाऱ्याचे जिणे धन्य होय असे ते सांगतात.

**'रामदास म्हणे । धन्य त्याचे जिणे ।।**

**कथा निरूपणे । जन्म गेला ।।'**

अर्थात 'बुडती जन हे न देखवे डोळा' या सामाजिक जाणिवेच्या बेचैनीतून आणि 'उरलो उपकारापुरता ।' या कर्तव्यनिष्ठ भूमिकेने 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या निश्चयाने सर्वसामान्य लोकांनादेखील पचतील, रुचतील अशा संस्कार कथा त्यांनी लोकांसमोर ठेवल्या. कोरड्या शब्दज्ञानाची कटकट टाळून त्यांनी भाववृत्तीच्या तलस्पर्शी उर्मीतून प्रकटलेली रसाळ 'कथा जगदंबा' उभी केली. त्यामागे विश्वोद्धाराची आध्यात्मिक भक्कम बैठक दिसते. श्रीएकनाथ सांगतात –

**'जे कवित्वी शब्दचातुर्य शोभा । ते शाब्दिकासी अतिवल्लभा ।**

**जे कथा ज्ञानगाभा । ते 'कथा जगदंबा' जग निववी ।।'**

– भावार्थ रामायण, बालकांड १४.१-२

**'श्रीरामकथेची शोभा । अतिवल्लभा मजलागी ।।'**

– भावार्थ रा. बालकांड १.२७

'रुक्मिणी स्वयंवर' काव्यात नाथांनी 'चरित्र' असा शब्दप्रयोग केला आहे.

**'विशेष हे कृष्णचरित्र । तुझेनि शुद्धमुखे पवित्र ।'** रू. स्व. १.६

मुक्तेश्वरांनी आपल्या महाभारतास 'कथा' असे म्हटले आहे.

उदा. – **'कथा विस्तारी भारत । महाराष्ट्र पदबंध ।।'** आदिपर्व १.४.४

रघुनाथपंडिताने आपल्या नलदमयंती स्वयंवराख्यानाला 'कथा' असेच म्हटले आहे.

उदा. – **'कथा बोलू हे मधुरसुधाधारा ।**

**होय शृंगारा करुणरसा थारा ।।'**

श्रीधर नाझरेकरांनी कथा आणि चरित्र असे दोन्ही शब्द वापरलेले दिसतात.

उदा. – **'आम्ही इच्छितो श्रीरामकथा श्रवण ।'** – रामविजय – १.६५

**'असंभाव्य श्रीरामचरित्र ।'– १.७३.**

सामराजाने – **'कथा हे कृष्णाची सकल जगदानंद जननी ।।'** रु हरण १.८५ असे म्हटले आहे. मोरोपंतानी आर्याभारतात महाभारताला पांडवांचे चरित्र म्हटले आहे.

**'हरि ज्याचा कैवारी त्या पांडुसुतासि वंदितो भावे ।**

**वाटे चरित्र त्यांचे आपण कांही तरावया गावे ।।'** महा. १.७३

अशा रीतीने मध्ययुगीन मराठी वाङमयात कथा, चरित्र, आख्यान इ. शब्दातून प्रकटलेले कथा जगदंबचे मूर्तरूप म्हणजेच संतांच्या साक्षात्कारी प्रतिभेतील 'अंतरीचे धावे'च होत. हीच ज्ञानगर्भ कथाजगदंबा उभी करून ते कथेचा गोंधळ मांडतात. या कथाजागरणात त्यांनी वैदिक, पौराणिक भागवत धर्माचे तत्त्वज्ञान छोट्या-मोठ्या आकारातील कथाशिल्पातून उभे केले आहे. ही कथालीला धर्मप्रेरणा जागवीत, नीत्युपदेशाचे संस्कार घडवीत, आत्मदर्शन घडवू पाहाते. ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

'जयाचिये लीलेमाजीं नीती जियाली दिसे ।' ज्ञाने. ९.१९२. अर्थात लोकांना मार्गाधारे वर्तण्यास मार्गदर्शक ठरणाऱ्या या लीलाकथा रामकृष्णांच्या अवतारी लीलाकथा आहेत. श्रीएकनाथ सांगतात :

**'नाना अवतार गहन । त्यात श्रीराम कीं भगवान कृष्ण ।**

**त्यांचे चरित्र अतिपावन । त्यांचे चरण वंदन सांगत ।।'** – ए. भागवत. ५-३-६५

अर्थात अशा 'चरित्र' कथांचे प्रयोजन, श्रोत्यांची पात्रता इ. सांगून ते म्हणतात :

**'अगा हे साचार मोक्षकथा । ज्यासी मोक्षाची अवस्था ।**

**तिही पाव देऊनि मनाचे माथा । रिघावे सर्वथा श्रवणादरी ।।** – ए. भा. १.८८

किंवा – **'जे हरिकथेसी सादर । त्यांच्या पुण्या नाहीं पार ।।**

– ए. भा. १.३०८

इथे 'मोक्षकथा' 'हरिकथा' इ. आलेले शब्दप्रयोग संताच्या दृष्टीने विशेष लक्षणीय असून, त्यांच्या दृष्टीने 'मोक्ष' किंवा 'हरी' हीच एक कथा आहे. ही कथा म्हणजेच 'कथावस्तू' असून तेच आत्मसाक्षात्काराचे स्वरूप आहे. 'कथा' ही एक विशेष अवस्था आहे. नाथांनी 'मोक्षाची अवस्था' असा शब्दप्रयोग केला असून, तीच 'मोक्षकथा' होय. आपल्या एका भारूडात नाथ सांगतात की, 'अव्वलमें थी एक कथा । जिसे नाम न था ।' अर्थात आदिरूपातील ही अनाम कथा हीच हरिकथा असून 'देव-भक्त- आणि नाम' यांच्या त्रिवेणी संगमावर ही कथा उभी आहे. तुकाराम महाराज स्पष्टपणे सांगतात की, :

**'कथा त्रिवेणी संगम । देव भक्त आणि नाम ।**

**तेथीचे उत्तम । चरणरज वंदिता ।।'**

अर्थात भक्तिमार्गातील अनुभवसिद्धीची एक अवस्था म्हणून चैतन्यरूप नाम त्या चिद्रूप नामातील देव आणि नाम नामीशी एकाकार झालेला भक्त यांचा त्रिवेणी संगम ही कथा होय. या कथासाक्षात्कारासाठी म्हणजे अन्य इतर कथासंपादणी असली तरी त्या सर्वात – 'मुख्य ते हरिकथा निरूपण' असेच समर्थांनी ठासून सांगितले आहे. ही हरिकथा म्हणजे आत्मवस्तू असून, या चैतन्याच्या कथावस्तूवर देहाची कथा उभी आहे. त्यामुळे देहापेक्षा ती मूळ मुख्य हरिकथा अनुभविणे हीच गोष्ट संताना अभिप्रेत आहे. त्यासाठी संतानी जनमानसात रुजलेल्या असंख्य कथांचा आधार घेऊन मूळ-भगवंती जाणीव-नेणीवरहित अशी चिद्रूप कथावस्तू ठसविण्याचा प्रयत्न केला आहे. ही आत्मोन्नत्तीची मूळ प्रेरणा संताच्या सर्व कथालेखनामागे उभी आहे. त्यामुळे त्या त्या कथा विशिष्ट मूल्यांचे संस्कारदर्शन घडवीत चिरंजीवी बनल्या आहेत. त्यांमुळेच पंढरीच्या पुंडलिकाची कथा, ध्रुव, प्रल्हाद,हरिश्चंद्र, सुदामा इत्यादींच्या कथा या केवळ त्या त्या पात्रापुरत्याच संबद्ध न राहाता, स्थल-कालाच्या मर्यादा ओलांडून सनातन, शाश्वत सत्याचे दर्शन घडविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या संस्कारकथा ठरतात. त्यातील जीवनसत्य इतके प्रभावी, भव्योदात्त आणि चिरंतन आहे की, शेकडो वर्षांच्या परंपरेत त्या 'कथा' सातत्याने टिकून राहिल्या आहेत. अशा कथांचे स्थान जनमानसात जीवनसंबद्धच झाले आहे. त्यांची

'सत्त्वधारा' जीवनाच्या आध्यात्मिक सूत्राशी घट्ट वीण घेऊन राहिली आहे.

**कथा म्हणजे जीवनमूल्यांची सत्त्वधारा**

महाराष्ट्रात भक्तिसंप्रदायाची पायाभरणी ज्ञानदेवांनी केल्याचे सर्वविदित असून 'ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया' या अभंग-चरणातून त्यावर सर्वमान्यतेचे शिक्कामार्तब झाले आहे. वेदोपनिषदे, गीता, भागवतादी पुराणातील कथार्थांचे सूत्र धरून त्यातील आध्यात्मिक सत्त्वधारा लोकभाषेत प्रवाहित करून, परंपरेने वाहती ठेवण्याचे कार्य संतानी केले आहे. पुढे आपापल्या प्रतिभेप्रमाणे पंडित कवींनी व काही अंशी शाहीर कवींनीदेखील हे कार्य केलेले दिसून येते. अर्थात दिव्य,आध्यात्मिक स्फुरण अखंडत्वाने प्रस्फुटित होण्यासाठी केवळ शब्दफुलोऱ्यांची रंजक कथा मांडून कार्यभाग साधत नाही. तर- 'एखादी सामर्थ्यशाली व मानवी जीवनातील शाश्वत सत्याचा प्रकाश देणारी धार्मिक घटना अथवा 'कथा' निर्माण व्हावी लागते.'[२३] अशा या कथांच्या मूलगामी शोधातून कथेचे सामर्थ्य प्रत्ययास येत राहील.

मराठी कथा ही भक्तिसामर्थ्याचा आणि विश्वधर्माचा गाभा आहे. ही कथासत्त्वधारा संतवाणीतून अनेकदा 'स्फुट कथांच्या' रूपाने प्रकटलेली दिसते. दया, क्षमा, शांती, करुणा, मित्रप्रेम, दृढभक्ती, सत्यनिष्ठा, ज्ञान,वैराग्य,संपन्नता इ. शाश्वत जीवनमूल्यांच्या प्रकट दर्शनासाठी संतानी अशा कथांचे मूर्तरूप साकार केले आहे. उदा. 'प्रल्हादकथे तून' भक्तीची पराकाष्ठेची अनन्य निजनिष्ठा आणि भक्तीचे कृतिशील प्रकट आविष्कार, प्रात्यक्षिकाच्या रूपात आदर्श म्हणून उभे केले आहेत. असे आदर्श महाराष्ट्रातच काय,पण भारतीय पातळीवर प्रायः सर्वच प्राकृत भाषातून प्रतिष्ठित झालेले दिसतात. भारतीय भक्तिसाधनेच्या इतिहासात 'प्रल्हादकथा' तर अनन्यभक्तीची प्रमाण गाथा ठरली आहे. भक्तीचे 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।।' हे नवविध प्रकारदेखील प्रत्यक्ष प्रल्हाद मुखातूनच मूळ भागवती कथेत प्रकट झाले आहेत. पुढे त्याचेच हुंकार देशी भाषातून निनादत आले आहेत. नवविधाभक्तीच्या या पायाभूत कथासंहितेवरच मराठी संतांची भक्तिकथा उभारली गेली आहे. भागवतभक्तीच्या या उजियेडात ज्ञानेशांनी पायाभरणी केली आणि नामदेवांनी तिचा सर्वदूरवर प्रसार केला. नाथांनी भागवताचा खांब दिला आणि तुकोबांनी तर त्यावर कळसच चढविला. अशा या भक्तिसंपन्न 'मराठीचिये नगरी' प्रल्हाद कथेचे स्थान अनन्यसाधारण ठरावे हे स्वाभाविकच होय. याच भक्तीच्या मार्गाधारे वर्तून,सकल संतानी भक्तीचा डांगोरा पिटून एकमुखाने भक्तिकथेचा उद्घोष केला आहे.

पुढे पंडित कवींत मोरोपंतांच्यापर्यंत अनेक कवींनी आपले बुद्धिपांडित्य या भक्तिकथेत ओतले असून,तंजावर प्रांतीच्या पंडित कवींनीदेखील प्रल्हादकथा मराठीत शब्दबद्ध करून, लोकाराधन करण्यात आपले भक्तिभाग्य मानलेले दिसते. यावरून प्रल्हाद कथेची प्रेरक सत्त्वधारा स्पष्ट होते.

'गजेंद्रमोक्ष' कथेच्या रूपात अखिल जीवमात्रास संसार सरोवराचे दर्शन घडवून

माया 'मगरीच्या' (नक्राच्या) मुखात सापडलेला जीवरूपी गजेंद्र खोल खोल बुडत असल्याची जाणीव प्राप्त करून दिली आहे. ऐन प्राणसंकटात, अखेरच्या क्षणी एका चक्रपाणी श्रीहरीवाचून अन्य कोणीही त्राता नाही हे सर्वसत्ताधीश, महाबलाढ्य, गजेंद्राच्या कथेतून दाखवून दिले आहे.

'ध्रुव' कथेतून भक्तीची अढळ निष्ठा साकार केली गेली आहे. तर 'सुदाम कथा' 'शिबिराज कथा', 'कपोत कथा' किंवा 'चतुर्भुज सावज कथा' इ. अनेक स्फुट कथांतून साहित्याची आणि संस्कृतीची आध्यात्मिक सत्त्वधारा सहज प्रकटली आहे. हरिश्चंद्र कथेतून अनन्य सत्त्वनिष्ठा प्रकट झाली आहे. अशा रीतीने वेदोपनिषदांची, गीता-पुराणांची सत्यसंपन्न वाणीच स्फुट कथांच्या रूपाने मराठीत साकार झालेली दिसते. तुकाराम-महाराज सांगतात की, 'वाचा बोलू वेदनीती । करूं संतीं केले तें ।।' म्हणजेच सर्वसामान्यांनादेखील आध्यात्मिक धारेत खेचून घेण्यासाठी वेद-पुराणांचे प्राकृत हुंकारच संतानी आपल्या स्फुट कथांतून प्रकट केले आहेत. 'वेदनीतीच्या' छंदोमयी वाणीतून प्रकटलेल्या या स्फुट कथांना औपनिषदिक गद्याची लय असून, मराठीतील स्फुट कथांची ही घाटदार लेणी साहित्याची शोभा ठरली आहेत.

## स्फुट कथांचा पद्य-परिवेश

प्राचीन काळी गद्यलेखनाची प्रथा अभावानेच होती. पंचतंत्रातील गद्य प्रायः लुप्तप्राय झाल्याने कथालेखनाची गद्य परंपरा पद्यातच सामावली गेली. पाठांतरसुलभता, गेयता, स्मृतिसुलभता इ. दृष्टीने पाहाता, दृष्टान्त रूपाने प्रकटलेल्या लघुकाय स्फुट कथा या लोकमानसात रुजून राहिल्या. धर्मपरंपरा, नाना व्रतवैकल्ये, पुराण कीर्तन यासारख्या माध्यमांची अनुकूलता लाभून, स्फुट कथांच्या रूपाने लोकसमूहात आध्यात्म तत्त्वज्ञानाची सत्त्वपरंपरा अंकुरत राहिली.

पुढे लोकाभिरुचीप्रमाणे जनरंजनाची, मनोविनोदनाची, संगीताची व वाद्यतालांची-देखील साथ मिळून या कथानिवेदनास अभिनयाचीदेखील जोड मिळाली. त्यातून या स्फुट कथांची लोकप्रियता राजाश्रयाने मठमंदिराच्या प्रांगणात व राजेराजवाडे सरदार मंडळी यांच्या घोळक्यातही दिमाखाने मिरवू लागली. या संदर्भात हरिदास, कीर्तनकार, पुराणिक किंवा कथाकथक (कथ्ये) यांनी ही कथा दृश्यरूप बनविली. पंडित कवींनी या कथेला प्रौढ भाषालंकारांनी नटवून श्रवणसुभगतेच्या व पाठांतराच्या कक्षेत आणून बसविले. त्यामुळे प्रारंभी ओवी, अभंगादी प्राकृत छंदातून प्रकटलेली स्फुट कथा आपल्या अंगभूत देखणेपणातून आता संस्कृतमधील विविध वृत्तालंकाराचे परिवेश लेवून प्रकट होऊ लागली. त्यातही काही स्फुट कथा तर इतक्या सर्वमान्य बनल्या की, एकाच विषयावरील स्फुट कथेचे छंदवृत्तानुसार विविध अवतारही प्रकट झाले. अशा रीतीने एकाच विषयावरील अनेक कवींनी लिहिलेल्या स्फुट कथांचे संच एकत्रपणे तौलनिक स्वरूपात अभ्यासणे उद्बोधक ठरणारे आहे.

'भारतीय मन व त्याच जोडीला महाराष्ट्रीयन मन - या सर्व कथात्मक वाङ्मयाने

संस्कारित झाले आहे.... धर्माच्या तत्त्वज्ञानाचे प्रतिपादन कथेच्या माध्यमाने अधिक परिणामकारक होते. कथात्मक वाङ्मयाचे स्वरूप व रूपांतर त्यामागच्या या प्रयोजनानेच घडविले आहे. प्रयोजनानेच तिचा घाट, तिचे रंगरूप ही सारी ठरविली जातात. कवीची वृत्ती, दृष्टी इ. वर प्रयोजनाचा प्रभाव पडून आशयाची निवड, तिची मांडणी व साऱ्यातून साधला जाणारा परिणाम-ही सारी त्या प्रयोजनानेच सिद्ध होतात.'[२४]

### प्राचीन मराठी कथेची वाटचाल

ऋग्वेद, काळातील संवाद सूक्तातून उगम पावलेली आध्यात्मिक कथांची सत्त्वधारा अंगी मुरवून कथेची वाटचाल सुरू झाली. ही कथामंदाकिनी प्राकृत भाषांच्या पाटातून प्रवाहित होत राहिली. महाराष्ट्रात 'मऱ्हाठी' भाषेतून प्रकट झालेल्या कथेच्या वाटचालीचा विचार करता महदंबा ते मोरोपंतांपर्यंत विविध आकार, प्रकारातून या कथेचे विविध रूपबंध साकार झालेले दिसतात. संत, पंत कवींनी कथा, चरित्र, आख्यान, चरित्रकथा इ. शब्दप्रयोग केले असले तरी आजच्या काळातील वाङ्मयीन निकषाप्रमाणे त्यांच्या सीमारेषा काटेकोर भिन्नतेने दाखविणे कठीण आहे.

कथेतील आशयाचा विचार करता, प्राचीन मराठी कवितेची निर्मिती दोन दिशांनी झालेली दिसते. 'एक भक्ति, ज्ञान आणि वैराग्याचे प्रतिपादन करणारे काव्य-संतकाव्य आणि दुसरे रामकृष्णांदींची चरित्रे वर्णन करणारे कथाकाव्य. या कथाकाव्यालाच आख्यानकाव्यही म्हणतात.. डॉ. केतकर 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' या ग्रंथात म्हणतात त्या प्रमाणे मराठी संतवाङ्मय संस्कृत आध्यात्मिक ग्रंथाच्या परंपरेतील आहे. संतकाव्य ही वाङ्मयशाखा रूढ अर्थाने कविता स्वरूपाची नसून, आध्यात्मिक स्वरूपाची आहे.'[२५] अर्थात या संस्कृत परंपरेबरोबरच काही संप्रदायांचे तत्त्वज्ञान व आचारही त्यामागे उभा आहे. उदा. नाथ पंथ, महानुभाव पंथ, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय, रामदासी पंथ, सिद्धेश्वर संप्रदाय इ. या संप्रदायाच्या संस्कार-प्रेरणेतून मराठी आख्यान कविता उभी आहे. त्यातही दोन विभाग दिसून येतात. एकीकडे वेदांतशास्त्रपर टीका भाष्य, प्रवचनपर रचना असून दुसरीकडे बहुजन समाजातून आलेल्या अनेक संतांचे काव्य. हे स्वयंस्फूर्त, पांडित्याखाली न दडपलेले वेधक असे आहे. ते ओवी, अभंग, पदे भारूडे, गौळणी इ. छंदातून प्रकटले असून, संस्कृत परंपरेपेक्षा ते खास मऱ्हाठमोळे आहे.' समर्थ रामदासांचा अपवाद वगळता, प्रायः कोणा संतानी संस्कृत वृत्ते वापरलेली दिसत नाहीत. संत हे समाजमनस्क असल्याने जातिकुळ वर्णाश्रमांच्या चौकटी ओलांडून त्यांनी नामभक्तीत सामाजिक समता सामावून घेतली. त्यासाठी त्यांनी निर्गुण परब्रह्माचे स्वरूप वर्णन सगुण रूपात कथामाध्यमातून समाजापुढे मांडले. पुढे पंडित कवींनी देखील - 'सगुण चरित्रे परम पवित्रे, सादर वंदावी ।।' अशीच दृष्टी प्रकट केली. या संतपंत कवींच्या मधला एक दुवा म्हणून आख्यान-कवींचा निर्देश केला जातो. साध्याभोळया मऱ्हाठी श्रोत्यांना सोप्या भाषेतून रामायण, महाभारत किंवा भागवती कथा समजावून सांगून, त्यांना धर्मनीतिप्रवण करण्याच्या उद्देश्याने व जाता जाता लौकिक व्यवहारज्ञानाचे शिक्षण देऊन त्यांचे

सात्त्विक मनोरंजन साधावे अशा हेतूने त्यांनी अत्यंत प्रासादिक रचना केली. या कवींना शब्दपांडित्य किंवा भाषाप्रभुत्व मिरवायचे नव्हते की, वृत्तवैचित्र्यपूर्ण शब्दालंकारांनी लोकांना दिपवायचेदेखील नव्हते. नाथांनी म्हटल्या प्रमाणे -

**'जे कथा परमार्थगाभा । ते कथा जगदंबा जग निववी ।।'**

**'ज्ञानी निवती परमार्थबोधे । पंडित निवती पदबंधे ।**
**लोक निवती कथा विनोदे । ग्रंथ संबधी जग निवे ।।'**

अशी ही सोपी, वेधक, रंजक कथा लोक जीवनातून प्रवाहित होत राहिली.

मराठी स्फुट कथेची वाटचाल ही साधारणतः बाराव्या शतकापासून सुरू झाली असून, तेराव्या शतकात महानुभाव - वारकरी संप्रदायातून ती अमाप स्वरूपात उपलब्ध होते. पुढे १५-१६-१७ व्या शतकापर्यंत काव्यातील स्फुट कथारचनेला बहर येत गेलेला दिसतो. १८ व्या शतकाच्या अखेरीस शाहिरांच्या पोवाडे, लावण्यातूनही पौराणिक, ऐतिहासिक स्वरूपाच्या स्फुट कथांची खास मराठमोळ्या रूपाविष्कारासह भर पडली. पंडिती आख्यान कवींनी भक्तीचे सूत्र धरून, कथारचनेची करामत प्रकट केली. त्यातही शीर्षस्थानी रागतालांचाही स्पष्ट निर्देश करून कथेत संगीताची रंगभरणीदेखील केलेली दिसते.

सतराव्या शतकात भजनी कीर्तनाबरोबरच हरिदासी कीर्तनास बहर येऊन या नारदीय पूर्वरंगातील वेदान्त तत्त्वविवेचनाच्या पुष्ट्यर्थ उत्तररंगात पौराणिक उपाख्यान उभे केले जाई. ही 'लावलेली' उपाख्याने सुघड अशा स्फुट कथांच्या स्वरूपात आपणास दिसून येतात. लोकरंजन, लोकशिक्षण, लोकप्रबोधन घडवून भक्तीचा संदेश देणाऱ्या या स्फुट आख्यानातून लोकसमूहापुढे पारलौकिक संदेशाबरोबर ऐहिक जीवनातील लौकिक रंगही उधळले जात. म्हणेजच संतयुगाशी सजीव सेंद्रीय सूत्र जोडून लौकिक जीवनाचा कथापटही या आख्यानातून विणला गेला आहे. दक्षिणेत तंजावरकडील आंनदतनय, रघुनाथपंडित, रामनाथ, गुरूदास, उटके गोंविद इ. मराठी कवींच्या स्फुट आख्यान काव्यातही तमिळप्रांतीय प्रादेशिक रंगभरणी दिसून येते.

### कथेचे त्रिविध स्फुरण

प्राचीन मराठीतील स्फुट आख्यान काव्याची वाटचाल पाहाता तीन गट समोर येतात. (१) पौराणिक कथा. (२) पौराणिक भक्तकथा. (३) ऐतिहासिक संतकथा. कथेच्या प्रेरणा, प्रवृत्ती आणि प्रयोजनाचा विचार करता प्रायः वरील तीन्ही कथाप्रकार संत-पंत-तंत काळातील कवींनी हाताळलेले दिसतात. या कथा- त्रिवेणीचे विहगंमावलोकन करता पुढीलप्रमाणे आपणास दर्शन घडते: -

### १) पौराणिक कथा

| | |
|---|---|
| **नामदेव -** | हरिश्चद्रांख्यान; श्रीयाळचरित्र.भीष्मप्रतिज्ञा, शुकाख्यान, उपमन्यूचरित्र, नक्रोद्धार इ. |
| **जनाबाई -** | हरिश्चंद्राख्यान; थालीपाक आख्यान. |

| | |
|---|---|
| एकनाथ - | कृष्णदानकथा, उपमन्युकथा, रामरावण एकरूपता, गंगागौरी कलह, गजेंद्रमोक्ष इ. |
| तुकाराम - | कपोतकथा (अभंग दृष्टान्त कथा) |
| मुक्तेश्वर - | शुकरंभा कथा, गजेंद्रमोक्ष, हरिश्चंद्र कथा इ. |
| वामनपंडित - | शुकरंभाख्यान, गजेंद्रमोक्ष, थालीपाक आख्यान इ. |
| रंगनाथ निगडीकर - | शुकरंभाकथा इ. |
| वीरेश्वर कृत - | उपमन्यु चरित्र; पारावत कथा. |
| उद्धव चिदघन - | शुकरंभासंवाद. |
| आनंदतनय - | शिविचेक्रवर्त्तीची कथा, कृष्णाची कहाणी, त्रीणावर्त दमन इ. |
| उटके गोविंद - | पार्वती परिणय निरुपण, उमा रमा संवाद इ. |
| गुरुदास - | चेतुर्भुत सावज कथा इ. |
| श्रीधर (नाझरेकर) - | पारधी कथा, कपोत कथा. |
| विठ्ठल केरीकर - | शुकरंभा संवाद कथा. |
| अमृतराय - | शुकरंभा संवाद कथा. |
| होनाजी बाळा - | श्रीकृष्णतुला, लावणी अहल्येची, उखेची, व्याधाची, नळराजाची, सुलोचनेची इ. |
| प्रभाकर - | शंकरपार्वती संवाद, लक्ष्मीपार्वती विनोद, कालियामर्दन, हरिश्चंद्रकथा, सावित्रीगीत इ. |

## २) पौराणिक भक्तकथा

| | |
|---|---|
| नामदेव - | प्रल्हाद चरित्र, ध्रुव चरित्र, सुदाम चरित्र इ. |
| एकनाथ - | रुक्मांगद कथा, प्रल्हाद कथा, ध्रुव कथा, सुदाम कथा इ. |
| आनंदतनय - | सुधाम चेरित्र कथा, प्रल्हाद कथा, मार्कण्डेय कथा इ. |
| गुरूदास - | प्रल्हाद चरित्र. |
| प्रतापरामकृत - | चेंद्रहास निरोपण कथा. |
| अमृतराय - | सुदाम चरित्र, ध्रुवकथा. |
| अनाम कवी (तंजावर) - | सुधाम चेरित्र. |
| मोरोपंत - | सुदाम चरित्र, पृथु कोपाख्यान (सुदामकथा) |
| चिंतामणिसुत रामनाथकृत - | प्रल्हाद चरित्र. |
| त्र्यंबक कविकृत - | प्रल्हाद चरित्र. |
| वीरेश्वर कविकृत - | भक्त पुंडलीक कथा. |
| शाहीर प्रभाकर - | सुदाम चरित्र कथा. |

## ३) ऐतिहासिक संतकथा

| | |
|---|---|
| नामदेव - | कबीर कथा, कमाल कथा, मीराबाई कथा, भानुदास कथा, जगमित्र नागा, संताजी पवार, बोधलेबुवा, जनाबाई, गोरा कुंभार, राका कुंभार, नरसी मेहता चोखा मेळा इत्यादींच्या चरित्र कथा. |
| गोंदा - | श्रीनामदेव नैवेद्यभक्षण कथा, दुष्काळ कथा. |
| जनाबाई - | सेना न्हावी चरित्र, नामदेव चरित्र इ. |
| एकनाथ - | नामदेव चरित्र कथा, गोरा कुंभार, सावता माळी, चोखा मेळा इत्यादींच्या चरित्र कथा. |
| अनाम कवी - | दामाजीपंताचे चरित्र इ. |

अशा रीतीने प्राचीन मराठीतील स्फुट आख्यान कविता संत-पंत-तंत अशा त्रिविध कालखंडातून बदलत्या लोकाभिरूचीचा कानोसा घेत, जीवनमूल्यांचे भरणपोषण करीत आलेली दिसून येते. संतानी ज्याप्रमाणे पौराणिक व ऐतिहासिक भक्तकथा लिहिल्या तद्वत पंडितांनी व शाहीरकवींनीदेखील कालोचित अशा बदलत्या स्वरूपाकृतीतून वरील तीन्ही प्रकारच्या कथा हाताळलेल्या आहेत. एवंच, प्रस्तुत प्रकरणातील विवेचनावरून स्फुट आख्यान काव्याची प्रेरणा, प्रवृत्ती आणि प्रयोजन विचार आपल्या लक्षात येऊ शकेल.

## साधन संदर्भ ग्रंथ


१. **कुलकर्णी दा. वि.** – 'मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद' – पृ. २.
२. **भागवत दुर्गा** – 'लोकसाहित्याची रूपरेषा' – पृ. ३९.
३. **– तत्रैव** – पृ. २०, २१.
४. **कुलकर्णी दा. वि.** – 'मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद' – पृ. २४.
५. **भागवत दुर्गा** - 'लोकसाहित्याची रूपरेषा' - पृ. २३
६. **– तत्रैव** – पृ. ६७.
७. **– तत्रैव** – पृ. ६४.
८. **– तत्रैव** – पृ. ७१, ७२.
९. **ग्रामोपाध्ये गं. ब.** - 'मराठी आख्यान कविता, एक अभ्यास.' – पृ. ३, ४.
१०. **– तत्रैव** – पृ. ५, ६.
११. **– तत्रैव** – पृ. ६.
१२. **भागवत दुर्गा** - 'लोकसाहित्याची रूपरेषा' – पृ. ९९.
१३. **कुलकर्णी दा. वि.** - 'मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद' – पृ. ३८.
१४. **भागवत दुर्गा** - 'लोकसाहित्याची रूपरेषा' – पृ. ७६.
१५. **माळी गजमल** - 'प्राचीन आख्यान कविता'' – पृ. ९
१६. **भागवत दुर्गा** - 'लोकसाहित्याची रूपरेषा' – पृ. ९२.
१७. **कुलकर्णी दा. वि.** - 'मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद' – पृ. ४७, ४८.
१८. **माळी गजमल** - 'प्राचीन आख्यान कविता'' – पृ. ९
१९. **कुलकर्णी दा. वि.** - 'मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद' – पृ. ४८, ४९, ५०, ५१.
२०. **भागवत दुर्गा** - 'लोकसाहित्याची रूपरेषा' – पृ. ७६, ७७, ७८, ७९.
२१. **माळी ग. ना.** - 'प्राचीन आख्यान कविता' – पृ. ११, १२.
२२. **भागवत दुर्गा** - 'लोकसाहित्याची रूपरेषा' – पृ. ९७.
२३. **कुलकर्णी गो. म. (संपा.)** 'महाराष्ट्राची सत्त्वधारा' – पृ. १८.
२४. **ग्रामोपाध्ये गं. ब.** - 'मराठी आख्यान कविता' – पृ. ७.
२५. **वाटवे के. ना.** 'प्राचीन मराठी पंडिती काव्य'– पृ. ३.


✿ ✿ ✿

# प्रकरण दुसरे

## कथात्मक स्फुटकाव्यांचे 'स्व'रूप

### प्रास्ताविक

प्राचीन मराठीतील स्फुट आख्यान काव्याचे स्वरूप हे कालसापेक्षतेने लोकाभिरुचीनुसार युगधर्माचे अवधान राखून प्रकटले आहे. ओवी, अभंग, पदबद्ध बांधणी आणि संमिश्र घडण अशी विविध प्रकारची बदलती रूपे त्यांत दिसून येतात. त्या त्या कालात स्फुट आख्यानांनी विशिष्ट आकृतीबंधातून, प्रयोग सापेक्षतेने लोकमानसाची पकड घेतली असून, पंडित- काळात आणि पुढे कटिबंधात्मक शाहिरी वळणाच्या स्वरूपातून मराठी कथेचे घडीव, कातीव असे रचनासौंदर्यही प्रकट झाले आहे. मराठी कथेच्या आविष्कारातील हे बदलते रूपदर्शन विविध पातळीवर वाङ्मय अभ्यासकांचे लक्ष वेधून घेत असलेले दिसते. कथेचे अभिजातवादी वळण कधी कधी सौंदर्यवादी बनून पुनश्च अभिजातवादाकडे वळताना दिसते. त्यात व्यक्तिसापेक्ष समाजसापेक्षतेचाही वाटा असून या बदलत्या स्वरूपात स्फुट आख्यानांचा विचार प्रस्तुत प्रकरणात आपण पाहाणार आहोत.

मराठी कथेच्या रूप घडणीत रसनिर्मितीचे अंगही विचारात घेणे आवश्यक आहे. रसानुकूल वृत्तांची योजना, पदरचना घडल्याने कथेच्या स्वरूपावरही फरक पडल्याने दिसून येते. कथेच्या आकाराचा विचार करता महाकाव्य - खंडकाव्य, आख्याने इ. गोष्टी विचारात घेऊन, स्फुटकथेच्या स्वरूपाचा वेध घेणे अगत्याचे ठरते. त्यातही प्रस्तुत प्रबंधात स्फुट आख्यान काव्यांचा विचार पाहाता या स्फुट काव्याचे लघुकायरूप, त्यातील पाठांतर सुलभता, रंजकता, कथांची जोपासना व संवर्धन, प्रादेशिक परिमाण, कालसापेक्ष प्रभाव, कीर्तनाचे प्रभावी माध्यम , लोकाभिरुची इ. विविध गोष्टी विचारात घ्याव्या लागतात.

### सौंदर्यवादी स्वरूप

प्राचीन मराठीतील कथात्मक स्फुटकाव्यांच्या वाङ्मयीन स्वरूपाविष्काराचा विचार करता संत-पंत-तंत असा अनुप्रासात्मक निर्देश करून आशयाविष्काराचे तीन कालखंड मानले जातात. त्यातूनच त्याचे पृथगात्म स्वरूपही आपणास दिसून येते. 'आख्यान काव्य' आणि 'आख्यानक' काव्य असे शब्दप्रयोग वापरून या कथा-काव्याच्या आकारभेदाची जाणीव करून दिली जाते. संतानी, पंडितानी, कलाकवींनी किंवा विदग्धकवींनी आख्यानकाव्ये लिहिली असून,ही कथात्मक काव्ये सामान्यतः आख्यानात्मक आणि संक्षिप्त असतात,म्हणून त्याना आख्यानकाव्ये म्हणतात. प्रदीर्घ रचनेपेक्षा याचे स्वरूप लघुकाव्यात सामावते. भक्ति-ज्ञान-वैराग्याचे सूत्र धरून रामकृष्णादिकांच्या चरित कथा वर्णन करणारे ते कथाकाव्य होय. निवडक प्रसंग आख्यानरूपाने गुंफून संप्रदायानुरोधाने आध्यात्माची नीतिबोधाची जोपासना करणे, या प्रयोजनामुळे अशा कथाकाव्याचे स्वरूपही

निश्चित झाल्याप्रमाणे दिसते. संत हे साक्षात्कारसंपन्न असल्यामुळे परमार्थ ज्ञानगाभा असणारी कथा जगदंबाच त्यानी उभी केली. 'जेणे भगवंत प्रगटे त्या नाव कवित्व' – अशी त्यांची प्रबोधक दृष्टी असल्यामुळे या कथांच्या अंतरंगात भक्ति, शांत हे प्रमुख रस अवतरले आणि विषयनिवृत्ती व वैराग्य पोषणासाठी क्वचित बीभत्सरसाचा पाठपुरावाही त्यानी केला.

संतकाव्याचे स्वरूप पाहाता स्वच्छंदतावादी किंवा सौंदर्यवादी कवितेशी तिचे साधर्म्य असल्याचे सांगितले जाते. अर्थात गूढ अतींद्रिय तत्त्वाची ओढ, रूढ बंधनापलीकडे जाण्याची धडपड, बुद्धिपांडित्यापेक्षा भावनात्मक तळमळ, साधीसोपी सहज रचना आणि आत्मनिष्ठा इ. सौंदर्यवादातील विशेष त्यात आढळून येतात. आध्यात्मिक जीवनसूत्रे समूर्त करताना, भक्कम आधारासाठी छोट्या मोठ्या कथांचे आकृतिबंध ओवी, अभंग, पदे इ. छंदोमयी रूपांतून सहजी प्रकट झाले आहेत. सर्वसामान्यांसाठी, रंजकतेतून धर्मप्रवणतेचा संस्कार घडविण्यासाठी कीर्तन, पुराण, प्रवचनासारख्या व्यासपीठावरूनच मराठी कथेचे स्वरूप प्रकट झाले आहे. एकनाथ, नामदेव, जनाबाई, तुकाराम, श्रीधर, मुक्तेश्वर, इत्यादीनी काटेकोरतंत्रापेक्षाही धावत्या गतिमानतेने कथापर रचना साधली. इथे श्रोत्यांची अभिरूची व कुवत लक्षात घेऊन कथात्मक काव्याचे स्वरूप सहज घाटातून घाटदार बनलेले दिसते.

## अभिजातवादी स्वरूप

पुढे बदलत्या काळात वरच्या वर्गातील जाणकार रसिकांची अभिरूची विचारात घेऊन पंडितकवीनी आपले कथन कौशल्याने व कुसरीने मांडले. इथे पंडिती कथेचे स्वरूप संतकथेपेक्षा आविष्काराच्या दृष्टीने वेगळे वळण घेताना दिसते. तिचा आकृतिबंध अभिजात संस्कृत साहित्याला सामोरा जाणारा ठरला. 'त्यामुळे या पंडित कवींच्या काव्यात अभिजात संस्कृत साहित्यरचनेचे पुनरुज्जीवन झाले असे म्हणता येते.' हे रा. श्री. जोगांचे मत तथ्यपूर्ण वाटते. (म. वा. इतिहास खंड इ. पृ. १९६)

पंडिती कथेच्या घाटदार रूपात काव्यकलेची कुसर आणि पांडित्यपूर्ण विदग्धपद्धतीची जाणीवपूर्वक रचना दिसून येते. त्यामुळे व्यक्तिचित्रण, घटना, प्रसंग निर्मिती, वातावरणनिर्मिती, रसपरिपोष इ. गोष्टी कथेच्या स्वरूपावर परिणाम करणाऱ्या ठरल्या. त्यासाठी विदग्ध, प्रौढ भाषाशैली घडीव स्वरूपात प्रकटल्याचे दिसून येते. परिणामतः संस्कृतमधील विविधवृत्तांचा वापर; शब्दालंकार; अर्थालंकार यांची घडण व भाषाविलास इ. अंगोपांगांचे पोषण संस्कृत साहित्य शास्त्राच्या अनुरोधाने होत राहिले. त्यामुळे परिश्रमपूर्वक संस्कृतचा डौल मराठी कथेच्या 'स्व'रूपात आणला गेला.

पंडित कवीपैकी रघुनाथ पंडित, आनंदतनय, रामनाथ, नागेश, मोरोपंत इ. अनेक कवींना राजाश्रय होता असे दिसते. शहाजी, शिवाजी, व्यंकोजी, सर्फोजी इत्यादींचा संस्कृत विद्येला आश्रय होता. त्यामुळे साहजिकच पंडित कवींच्या काव्यावर दरबारी

वातावरणाचा प्रभाव पडून, त्यात श्रीमंती थाट प्रकट झाला. 'निराश्रया न शोभन्ते पंडिता वनिता लता ॥' या न्यायाने पंडिती कथाकाव्य राजाश्रयाने वाढले असे म्हणता येईल.

एवंच, या कथाकवींची वेगळी काव्यप्रवृत्ती; व्युत्पन्नवाचकवर्ग; संस्कृतसाहित्य शास्त्राचा व संस्कृत साहित्याचा आदर्श व कवीचे स्वतःचे बुद्धिपांडित्य इ. गोष्टींमुळे पंडिती वाङ्मय हे अभिजात संस्कृत साहित्याचे पुनरूज्जीवन होय असे म्हटले जाते.

**रसमंदाकिनी**

रसाविष्कारासाठी काव्यनिर्मिती, या प्रेरणेकडे पंडितकवी वळले असून आपल्या रसपूर्ण काव्यनिर्मितीची जाणीव त्यांनी स्पष्टपणे नमूद केलेली आहे.

उदा. १. वामनपंडिताने 'शृंगार वीर करूणादि नवारसाची ॥' मातब्बरी मानली आहे.

२. मुक्तेश्वराची वाग्वल्लरी ... 'लवोनि आली रसरूपे ॥' असे तिचे रसरूप आहे.

३. रघुनाथपंडिताने नलदमयंती स्वयंवराख्यानात

**'कथा बोलूं हे मधुर सुधाधारा ।**

**होय शृंगारा करूण रसा थारा ॥'** असे म्हटले आहे.

४. निरंजनमाधवानी आपल्या 'सुभद्राचंपू' काव्यात

**'शृंगार मुख्य नवही रस मूर्तिमंत ॥'** असे म्हटले आहे.

५. पंडिती परंपरेत मोडणारा महानुभावीय कवी रूक्मिणी स्वयंवरात म्हणतो –

**'जे कथा साहित्याचे खिरार । नवा रसांचे कऱ्हेर ॥५०॥'**

किंबहुना, त्याचा कथाभाव कविताकामिनीचा हात धरून साहित्यसरोवरात रसांचाच खेळ करण्यासाठी निघाला आहे. तो लिहितो –

**'कविता कामिनियेचा धरूनि हातु । भावो दोन्ही आंगी मलपतु ।**

**चाले साहित्यसाबरेयातु । रसु खेळ कुडिये ॥**

अर्थात पंडिती कवितेचे 'सरस स्वरूप' ही जाणीवपूर्वक केलेली घडणी आहे. हे विसरता येत नाही. भक्तीचा धागा पकडून, कलाविलासाच्या हव्यासाने हे आख्यानकाव्य निर्माण होत राहिले. त्यामुळे संस्कृत पंचमहाकाव्याच्या सजावटीची आरास मांडून लालित्य, सौंदर्य, कलात्मकता, रसपूर्णता, या सर्वांचा प्रभाव कथा स्वरूपावर पडला. परिणामतः या आख्यानकवींची रचना व्याकरणनिबद्ध बांधीव, घोटीव, संस्कृतनिष्ठ वृत्तानुप्रासबद्ध आणि प्रौढस्वरूपात प्रकटली. दीर्घसामासिकता, सुभाषित प्रवणता, श्लेष, अर्थालंकारादिकांची पेरणी, तसेच त्यातील सवाई, दिण्डी, आर्या इ. छंद वृत्तांचा वापर पाहाता कीर्तनोपयोगासाठी असे स्वरूप प्रकट झाल्याचे दिसते.

पंडित कवींनी जुन्याच कथांचे विषय नव्याने सांगत असताना त्यात स्वकालीन परिस्थितीचे अनेक ठसे उमटवून ठेवलेले दिसतात. रामायण, महाभारत, भागवतादि ग्रंथांच्या आधार प्रेरणेतून स्वकालींनाना मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

अर्थात संताच्या अध्यात्मपर काव्यप्रेरणेचा प्रभाव असूनही, पंडित कवींनी संतकाव्याचे केवळ अनुकरण केलेले नाही. तर मानवी भावभावनांचे कलात्मक दर्शन घडविण्याचाही यशस्वी प्रयत्न केलेला दिसतो.

**'आविष्कार रूपाचा विचार' - कथाकाव्य प्रकार**

प्राचीन मराठीतील पंडितीकाव्य अभिजात संस्कृत वाङ्मयाचे पुनरुज्जीवन असल्याने संस्कृतमधील – महाकाव्य, खंडकाव्य, लघुकाव्य, स्फुटकाव्य, चित्रकाव्य, गद्यकाव्य, स्तोत्रे, चंपूकाव्य इ. रूपप्रकार मराठीतही प्रकटलेले दिसतात. 'मराठी पंडिती काव्यावर संस्कृत महाकाव्यांची छाप पडली असून, मराठी पंडित कवींनी महाकाव्याचा केवळ अर्थानुवादच केलेला आहे असे नसून, महाकाव्याची सर्व पद्धतच अनुसरली आहे. त्यात कथा, पात्रे, सजावट, वर्ण्यविषय, रचना, आदर्शवाद, कल्पनासृष्टी, भाषाशैली, हेतू इत्यादी बाबी येतात.'[१] अर्थात महाकाव्याखेरीज 'खंडकाव्य', 'लघुकाव्य' इत्यादींचे रूपाविष्कार हे वेगळे असल्याने त्या रूपप्रकारांचे विहंगमावलोकन करणे प्रस्तुत उपयुक्त ठरणारे आहे.

## निबद्ध आणि अनिबद्ध काव्यप्रकार

### महाकाव्य - सर्गबंधो महाकाव्यम्

'काव्याच्या वर्गीकरणात 'निबद्ध' आणि 'अनिबद्ध' असे काव्याचे दोन प्रकार उल्लेखिले गेले आहेत. संस्कृतमधील प्रसिद्ध असणारी महाकाव्ये ही 'निबद्ध' काव्ये होत. अनिबद्ध काव्य हे अर्थदृष्ट्या स्वयंपूर्ण अशा सुट्या श्लोकांच्या **स्वरूपाचे असते**. निबद्ध काव्यात अनेक श्लोकातून एक दीर्घ व सलग असा काव्यार्थ ग्रंथित केलेला असतो. त्याला साधारणपणे काही कथाभाग लागतो.... महाकाव्याचे कथानक इतिहासातून घेतलेले असे. ते अनेक खंडातून सांगितलेले असे. त्या खंडाना सर्ग असे सामान्य नाव होते. म्हणून 'सर्गबन्धो महाकाव्यम् ।' असा दण्डी त्याचा उल्लेख करतो.'[२]

विदग्ध महाकाव्याची लक्षणे, अग्निपुराणकारांनी सांगितली असून भामह, दंडी, भोज, विश्वनाथ इ. साहित्याचार्यांनीदेखील सांगितली आहेत. 'साहित्य दर्पण' या ग्रंथात विश्वनाथाने सांगितलेली लक्षणे प्रायः सर्वसमावेशक आहेत. त्यानुसार विचार करता -

१. महाकाव्याची कथा ही रामायण, महाभारत, इतिहासातून निवडलेली असावी.

२. त्यातील नायक हा देव, थोर क्षत्रिय कुलोत्पन्न, धीरोदात्त, पराक्रमी चतुर महापुरुष असावा.

३. नायिकादेखील थोर असावी.

४. खलनायकाचाही त्यात समावेश असावा.

५. मुख्य कथानकास उठाव आणण्यासाठी सृष्टिसौंदर्याचे वर्णन असावे. त्यात सूर्योदय, सूर्यास्त, चंद्रोदय, चंद्रिका, रात्र, सहा ऋतू, नद्या, सागर जंगले इत्यादींचे वर्णन

असावे.

६. महाकाव्यात राजकारण चर्चा, दूतप्रेषण, रणप्रयाण, युद्धे इ. वर्णन असावे.

७. शृंगार, वीर, करुण यांपैकी कोणातातरी एक रस मुख्य असावा. आणि अन्य रसही त्या रसाला पूरक, पोषक रूपाने प्रकट व्हावेत.

८. प्रारंभी मांगलिक नमन असावे.

९. महाकाव्यात सर्गबद्ध रचना असावी. हे सर्ग श्रुतिसुभग, वृत्तांत-बद्ध असावेत. सर्गांची संख्या आठापेक्षा कमी नसावी आणि तीस सर्गापेक्षा अधिक नसावी.

१०. महाकाव्याचा मुख्य आशय किंवा नायक यांना धरून महाकाव्यास नाव द्यावे.

११. वैदर्भी, गौडी, पांचाली, लाटी इ. प्रमुख रीती यथाप्रसंग योजाव्यात.

१२. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थाचे साधन हा महाकाव्याचा हेतू असावा

१३. सज्जन-स्तुती, खलनिंदा सत्पक्षाचा विजय इ. इ.

संस्कृत साहित्यात कालिदासाची, 'रघुवंश', 'कुमारसंभव' ही दोन महाकाव्ये. माघाचे 'शिशुपालवध'; भारवीचे 'किरातार्जुनीय' आणि हर्षाचे 'नैषधीय चरित्' ही पंचमहाकाव्ये रसिकमान्य ठरली आहेत. मराठीत महाकाव्याच्या उपरोक्त तंत्राप्रमाणे तंतोतंत अशी रचना जवळजवळ अत्यल्प अशीच आहे. मात्र महाकाव्याचे अनुकरण करीत तंत्राचा मागोवा घेण्याचे प्रयत्न झालेले दिसून येतात. या संदर्भात नरेंद्राचे 'रुक्मिणी स्वयंवर,' भास्करभट्टाचे 'शिशुपालवध', मुक्तेश्वराचे 'संक्षेपरामायण', एकनाथांचे 'भावार्थरामायण,' 'रुक्मिणीस्वयंवर'; सामराजाचे 'रक्मिणीहरण' इत्यादींचा निर्देश करता येईल. तथापि रा. श्री. जोगांनी म्हटल्याप्रमाणे 'अशा प्रकारच्या महाकाव्यांचे दिवस आता संपले आहेत असे म्हणणे योग्य होईल.'[३]

### खंडकाव्य

महाकाव्याप्रमाणे निबद्ध काव्यात खंडकाव्य असाही एक प्रकार आहे. खंडकाव्याची व्याख्या स्पष्टपणे कोठेही आढळत नसली, तरी महाकाव्यापैकी एखादा विषय घेऊन त्यावर सलगपणे एका खंडाचे पण फार मोठे नसलेले असे काव्य म्हणजे खंडकाव्य असे म्हणता येईल. साधारणतः महाकाव्यातील एखाद्या सर्गाइतका त्याचा आकार-विस्तार असावा. कालिदासाचे 'मेघदूत' हे खंडकाव्याचे उत्तम उदाहरण आहे. कालिदासाचे 'ऋतुसंहार;' बिल्हणाची 'चौरपंचाशिका'; जयदेवाचे 'गीतगोविंद' इ. खंडकाव्ये प्रसिद्ध आहेत.

'खंडकाव्य म्हणजे दीर्घकथा-काव्य होय. हा सनातन ललित-वाङ्मय प्रकार आहे. प्राचीन मराठीतील कथावाङ्मय प्राधान्याने पद्यात आहे. ....... खंडकाव्यात भावनोत्कटतेवर अधिक भर असतो. खंडकाव्यातील कथेला पद्यात्मकता हे एक महत्वाचे बंधन आहे...... मात्र खंडकाव्य म्हणजे पद्यमय कादंबरी नव्हे.'[४] किंवा केवळ पद्यबद्ध

कथाही नव्हे तर पद्याच्या तरलगतीची लय पकडून भावनेच्या आंदोलनाला नियमित रूप देऊन लिहिलेले - दीर्घ कथाकाव्य म्हणजे खंडकाव्य म्हणता येईल. या दृष्टीने साहित्यदर्पणकार विश्वनाथाने दिलेली व्याख्या लक्षणीय ठरते. तो म्हणतो -

**'महाकाव्यस्यैकदेशानुसारि च ।**

अर्थात महाकाव्याचा केवळ एक तुकडा म्हणजे खंडकाव्य नसून, प्रेरणा आणि प्रवृत्तीच्या दृष्टीने खंडकाव्य हा स्वयंपूर्ण आणि स्वतंत्र असा रचना-प्रकार आहे. 'मानवी जीवनाच्या कोणत्याही एका विशिष्ट मर्यादित अंगाचे वस्तुनिष्ठ, रसोत्कट दर्शन घडविणारे' पद्यरूप कथाकाव्य म्हणजे खंडकाव्य होय.'[५]

## आख्यान काव्य

महाकाव्य, खंडकाव्य, आणि आख्यानकाव्य ही कथाकाव्याचीच वेगवेगळी रूपे आहेत. रामायण, महाभारत आणि भागवतातील अनेक कथा आख्यानकाव्यांना प्रेरक ठरल्या आहेत. किंबहुना, कथांचे जंगल असलेल्या संपूर्ण महाभारतालाच आख्यानकाव्य म्हटले गेले आहे. प्राचीत मराठीतील प्रदीर्घ कथाकाव्यांना महाकाव्य म्हणावे की, आख्यानकाव्य म्हणावे याविषयी मतभेद दिसतात. वास्तविक या सर्व संमिश्र रचना असून तंत्र मांडणीपेक्षाही रसाळ कथानिवेदन भक्तिभावयुक्त या रचनाना आख्यानकाव्य म्हणणेच योग्य ठरेल. समाजाला भक्ति, ज्ञान, वैराग्याची शिकवण देऊन सर्वजन सुलभ अशा भक्तीचे महत्त्व सांगणे हे आख्यान काव्याचे प्रयोजन असून, त्यातून आख्यान काव्याचा घाट आकार घेत गेल्याचे दिसून येते. आनंदतनयासारख्या तंजावरस्थ कलाकवींनी पद्यरचनेबरोबरच गद्यांशाच्या चूर्णिकांची व पदांचीदेखील पेरणी केलेली दिसून येते. आख्यान-काव्यांच्या या रूपसिद्धीवर कीर्तनासारख्या लोकरंजन प्रधान समूह माध्यमाचाही प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो 'याप्रमाणे कीर्तनपरंपरेशी निगडित असलेल्या मराठी आख्यान-काव्यात अध्यात्म, भक्ती, कथात्मकता व काव्यत्मकता यांच्या उभ्या आडव्या धाग्यांनी बनलेले कांही साचेबंद पोत तयार झाले.'[६]

## स्फुट आख्यान-काव्ये

'संस्कृत साहित्यात 'अनिबद्ध' असा काव्यप्रकार मानलेला आहे. या अनिबद्ध काव्यालाच 'मुक्तक' असे म्हटले आहे. मुक्तक म्हणजेच 'स्फुटकाव्य' होय. स्फुटकाव्य हे अन्यनिरपेक्ष, स्वायत्त, स्वयंपूर्ण असे असते. आनंदवर्धनाने ज्या काव्याला पूर्वापार प्रसंगाची अपेक्षा नसते व तरीही जे रसध्वनियुक्त असते, अशा स्फुट काव्याला मुक्तक म्हटले आहे. म्हणजेच जे 'निबद्ध' नाही; सर्गबद्ध नाही आणि खंडकाव्याइतकेदेखील दीर्घकाय नाही अशा लघुकाय स्फुट काव्याला मुक्तक असा अर्थ प्राप्त झाला आहे. 'मुळात मुक्तक हे एका श्लोकाच्या रचना-प्रकाराचे नाव होते. पण एकाहून अधिक श्लोकातही हा 'अनिबद्ध' भाव जाणवत असल्यामुळे सर्व स्फुटकाव्य प्रकारांचा समावेश मुक्तकामध्ये होऊ लागला. ग्रीक साहित्यशास्त्रातही 'प्रबंध' व 'मुक्तक' या

सारखे 'एपिक' व 'लिरिक' असे काव्याचे दोन प्रकार मानलेले आहेतच. स्फुट श्लोकांच्या संग्रहाला 'कोश' असे म्हटले आहे. एकाच कवीचा कोश असेल, तर त्यास 'प्रघट्टक' म्हणतात. एकाच कवींच्या एकाच विषयावरील संग्रहाला 'संघात' किंवा 'पर्यायबंध' म्हणतात. जयदेवाच्या अष्टपदीचा पुढचा विकास म्हणजे 'दशपदी' असे अनिलांना वाटते. श्लोकसंख्येवर आधारित शतक; सप्तशती इ. रचनाबंधही आहेत. आजची प्रायः सर्व भावकविता ही स्फुट प्रकारातच मोडणारी आहे. म्हणून सर्वच गेय व अगेय स्फुट व प्रासंगिक काव्याला 'मुक्तक' हा अधिक अर्थपूर्ण शब्द मराठी काव्यशास्त्राच्या पारिभाषिक संज्ञेत प्रचलित होणे आवश्यक आहे.'[७]

### लघुकाय रूप

स्फुटकाव्ये ही मुक्तकाच्या पातळीवर जेव्हा एखाद्या लघुकाय कथेचा आविष्कार करतात तेव्हां स्फुट कथाकाव्याचे आपणास दर्शन घडते. अर्थात ही स्फुट कथाकाव्ये आजवर 'आख्यान काव्ये' या पारिभाषिक शब्दाखालीच विचारात घेतली गेलेली दिसतात. स्फुट कथाकाव्यांचे स्वतंत्र स्वयंभू अस्तित्व फारसे विचारात घेतलेले दिसत नाही. प्राचीन मराठीतील आख्यान-काव्यांचा विचार मांडताना पद्यबंध, भक्तियुक्त, कथात्मक रसनिरूपण अशा शब्दांत महदंबा ते मोरोपंतापर्यंत सर्वच आख्यान कविता असल्याचा सूर आळविला आहे. महाकाव्य-खंडकाव्याहून वेगळे असे 'आख्यान काव्य' म्हणून सरसकट सर्वच कथाकाव्यांचा विचार एकत्र केला गेलेला दिसतो. क्वचित आख्यानाऐवजी 'आख्यानक' असा लघुदर्शक शब्दप्रयोग करून स्फुट कथात्मक काव्यांचा विचार मांडण्याचा प्रयत्न केला गेला असूनही, उदाहरणे म्हणून प्रदीर्घ कथांतर्गत आलेल्या कथांचेच निर्देश केले गेलेले दिसतात. उदा. एकनाथी भागवतात आलेले 'कपोताख्यान' किंवा दत्तगुरूंच्या २४ गुरूंच्या कथा, पिंगलाख्यान इ. मुक्तेश्वराच्या महाभारतात आलेली 'शकुंतलेचा राजसभा प्रवेश' इ. अनेक स्फुटकथा. मोरोपंतांच्या आर्याभारतातील 'सावित्री आख्यान' इ. कथा 'आख्यानक' म्हणून निर्देशिल्या गेल्या आहेत. अर्थात 'आख्यानक' शब्दप्रयोगातून सूचितार्थ स्फुट कथाकाव्यांचाच अपेक्षित दिसतो. तथापि, सलग प्रदीर्घ कथांतर्गत आलेल्या किंवा दृष्टान्त म्हणून मांडल्या गेलेल्या पूर्वापार संदर्भसंबंधाशिवाय स्वतंत्रपणे लिहिल्या गेलेल्या स्फुट कथांची संख्या प्राचीन मराठीत विपुल प्रमाणात आढळते. प्रदीर्घ आख्यान–कथेपेक्षा आणि खंडकाव्यापेक्षाही आकाराने छोटेखानी असलेल्या या स्फुट कथात्मक आख्यानकांची प्रेरणा व प्रवृत्ती स्वतंत्र व स्वयंभू असलेली दिसते. मुक्तकातील स्तोत्र - दृष्टान्तकथा, उपदेश कथा याप्रमाणेच रामायण, महाभारत, भागवत इ. उपजीव्य ग्रंथातील कथाबीज घेऊन धर्म-भक्ति-सदाचार नीत्युपेदशादी प्रेरक प्रयोजन समोर ठेवून रंजक अशी स्फुटकथा आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवून देते. कालसापेक्ष लोकरंजनाच्या व लोकशिक्षणाच्या गरजेतून अशी स्फुटकथा निर्माण झाली. आजच्या लघुकथेप्रमाणे किंवा लघुत्तम कथेप्रमाणे या स्फुट कथाकाव्यांचे अस्तित्व दिसून येते.

### नीतिमूल्य संस्कार

परंपरागत आलेल्या नीतिमूल्यांच्या प्रभावी संस्कारासाठी या स्फुट, कथात्मक काव्यांचा अवतार झालेला दिसतो. उदा. भक्तीची अनन्य निष्ठा 'प्रल्हाद कथेतून'; भक्तीची अनन्य निष्ठा 'ध्रुवकथेतून'; प्राणसंकटात शेवटी चक्रपाणी हरीवाचून दुजा कोणी त्राता नाही हे 'गजेंद्रमोक्ष' कथेतून; सत्यवचन निष्ठा 'हरिश्चंद्राख्यानातून' किंवा मित्रप्रेमाचे उदात्तदर्शन 'सुदाम कथेतून' प्रभावीपणे ठसविलेले दिसते. प्रखर वैराग्याचे दर्शन घडविण्यासाठी 'शुकरंभाख्यानाची' कथा समोर येते. 'शिबिराज कथा' समाजापुढे सत्त्वनिष्ठा दाखवून देते तर 'पारधी कथेतून' शुद्ध भोळया भक्तीची श्रेष्ठता दिसून येते.

### पाठांतर सुलभता

लघुकाय स्फुट कथा पाठांतर सुलभ बनून नित्य पठणात राहिली तर संस्कारांचे ताजेपण व सातत्य टिकून राहू शकते. त्यामुळे मुद्रणपूर्व, मध्ययुगीन काळात अशा स्फुट कथांची गरज विशेष उपयुक्त ठरली. त्यासाठी प्रासबद्ध शब्दातून नादमय गतिमानता स्फुटकथेत आली.

### रंजकता

रंजकतेतून प्रभावीपणे नीतिसंस्कार करू पाहाणाऱ्या या स्फुट कथा कीर्तनोपयोगी ठरल्या. कीर्तनमाध्यमाचा स्वीकार केला गेल्याने एकाच कथाविषयावर अनेक कवींनी स्वतंत्रपणे स्फुट कथाकाव्ये लिहिलेली आढळतात. ध्रुव, प्रल्हाद, सुदामा, हरिश्चंद्र, गजेंद्र, शिबीराजा, शुकरंभाकथा, इत्यादींच्या समान विषयावरील स्वतंत्र स्फुट कथांचे एकत्र संच करून त्यांची आस्वादक तुलना मांडणे हा एक अभ्यास विषय होऊ शकतो. प्राचीन मराठीतील स्फुट कथाकाव्यातील समान विषयांचे कथासंच एकत्र मांडून त्याचे विविध अंगानी विवेचक आस्वादन मांडल्याने समीक्षेची एक दिशाही लक्षित होऊ शकेल.

### स्फुट आख्यानांचे संवर्धन व संरक्षण

मध्ययुगीन मराठी स्फुट कथा काव्य समृद्ध असून, हा काव्यप्रकार काळाच्या गरजेतून चांगलाच जोपासला गेलेला दिसतो. स्फुट कथेसारखा हा विषयनिष्ठ कलाप्रकार मानवी, नैसर्गिक प्रेरणेइतकाच जुना असून-त्याचा ताजेपणा अद्यापही टिकून असलेला दिसून येतो. वाङ्मयाच्या आदिम काळात छंदोमयी वाणीतून त्याचा प्रथम हुंकार प्रस्फुटित झाला असला, तरी अंतरीचे हृद्गत सांगण्याऐकण्यासाठी निवेदनाच्या पातळीवर तरल पद्याचे रूप स्फुट कथांच्या रूपात आकारास येत गेले. आख्यान, पुराण, गाथा, इतिहास, दिव्यकथा, दैवत कथा, प्राणिकथा इ. विविधा रूपांतील व आकारप्रकारातील हे कथास्फुरण संमिश्र समाजजीवनात खेळते फिरते राहिले.

समाजातील ब्राह्मणवर्ग, पुरोहितवर्ग, सूत, चारण, भाट, हरिदास, पुराणिक, कीर्तनकार, कथाकथक इ. विविध पेशा-वेशातील कथाकथकांनी कथेची विविध अंगे जोपासून या स्फुट कथाकाव्यांचे संवर्धन, संरक्षण केलेले दिसते. गोंधळी, बहुरूपी, जोशी, वासुदेव, जागले, बाळसंतोषी, ललितकार, कडकलक्ष्मी, वाघ्या, मुरळी, डवरी, देवतासंचारी, भाकणूकवाले भक्त इ. लोकसंस्कृतीच्या अनेक पाइकांनी आपापल्या-परीने कथा सजवून परंपरेने कथा संवर्धन-संरक्षणास हातभार लावला आहे.

## कौटुंबिक सहयोग

समाजातील विशिष्ट वर्ण, वर्ग, वृत्ति पेशातील मंडळीनी कथेच्या भरणपोषणात जसा सहयोग दिला आहे, त्याप्रमाणे कुटुंबातील नित्य नैमित्तिक धार्मिक सणवार, व्रतवैकल्ये, उत्सव इ. प्रसंगातून कौटुंबिक पातळीवर प्रौढमंडळी, वृद्धमंडळी इत्यादींच्याकडून स्फुट कथांचे लालनपालन झाले आहे. बालगोपाळाइतकेच या स्फुट कथांचे अस्तित्व घराघरातून रुजलेले आहे. हे संस्कारी आकर्षण अक्षुण्ण आहे.

गौरीच्या गोष्टी, धार्मिक कहाण्या, सावित्री आख्यान, दैवतकथा, व्रतकथा, वीरकथा इ. असंख्य प्रकारच्या कथा पिढ्यापिढ्यातून जनमानसात रूजत आल्या आहेत. आबालवृद्धापर्यंत सर्वांनाच आकर्षून घेणाऱ्या या स्फुट कथांनी व्यक्तिसापेक्षतेने निवेदन-आविष्करणाची विविध आकर्षक रूपे धारण केलेली आहेत. त्यामुळे एकच प्रल्हादकथा, ध्रुव, शुक, सुदाम कथा किंवा बकासुराची गोष्ट वेगवेगळया रंगढंगानी प्रकट होऊन, लोकांचे समाराधन करीत आलेली दिसते.

## समाज-समूह संस्करण

कुटुंबाच्या सीमेत वावरणारी कौटुंबिक पातळीवरील स्फुट कथा जेव्हां प्रचंड लोकसमूहापुढे गावाच्या उत्सवादी प्रसंगी मठ-मंदिरांच्या प्रांगणात प्रकट होते-तेव्हा तिचे रूपाविष्करण वेगळया संस्करणातून होते. तिला अभिनयाचे वेगळेच परिमाण गवसते. समूहमनाचे एक भव्य परिमाण तिला प्राप्त होते. तिचा प्रभावदेखील अनेक पटींने वाढलेला असतो. लहानथोर, गरीबश्रीमंत अशा सर्वच संमिश्र लोकसमूहाचे रंजन करीत संस्कारांचा प्रभाव टंकित करताना तिचे कलात्मक आविष्करण अनेकांगानी फुलून येते. नाना वाद्यतालाच्या व साथीदारांच्या साथीने अभिनयातून दृष्यरूप बनलेली स्फुट कथा अधिक सजीव बनते; देखणी होते.

## प्रादेशिक परिमाण

कुटुंब आणि गावाची सीमा ओलांडून विशिष्ट भाषिक, सीमावर्ती प्रदेशात किंवा सुदूर परप्रांतात तीच कथा जेव्हा शिरलेली असते, तेव्हां तेथील भाषिक परिणामाबरोबरच बदलत्या लोकाचार लोकसंस्कृतीचे परिमाणही तिला प्राप्त होताना दिसते. उदा. एक 'सुदाम कथा' किंवा 'ध्रुव कथा' ही संत नामदेव, एकनाथ इ. महाराष्ट्रीय संतवाणीतून, पूर्ण भक्तीच्या परिवेषातून प्रकटते तर पुढे वामनपंडितादी

पंडितीरचनेत तीच कथा एक वेगळे वळण घेते. त्याहीपुढे सुदूर तंजावर प्रांतात तीच मराठी भाषेतील कथा तेथील प्रादेशिक तामिळीचे संस्कार घेऊन, दक्षिणी संगीताची लय घेऊन नादमय 'पदांकित' साज लेवून प्रकटलेली दिसते. अशा प्रादेशिक परिमाणातून मराठी स्फुट आख्यान-कवितेची आगळी घडण झालेली आपणास दिसून येते.

### रचना बांधणीवरील कालसापेक्ष प्रभाव

स्फुट आख्यानकविता ही मौखिक स्वरूपात करमणुकीचा एक प्रकार म्हणून आणि लोकसमूहाची एक गरज म्हणून जोपासली गेली. त्यामुळे ही स्फुट कथा बहुउद्देशीय बनली. धर्मप्रवक्त्या मंडळींनी, हरिदास कीर्तनकारांनी, प्रवचनकारांनी पुराणिकांनी किंवा समाजधुरिणांनी समाजधारणेचे व समाजसंस्काराचे एक प्रभावी माध्यम म्हणून स्फुट कथा सांभाळली, जोपासली. तर समाजातील विविधस्तरीय लोक कलावंतानी व पंडितांनी कथेचे रूप अधिक डौलदार, स्वतंत्र अलंकारमंडित बनवून कथेला अधिक घाटदार बनविली. त्यामुळे कथित कथानकापेक्षा कथन कौशल्याला अधिक महत्त्व आले. रंजकतेची बाजू अधिक प्रभावी ठरली. त्यामुळे आकर्षक परिणामकारकतेच्या दृष्टीने, अधिक प्रयत्न होऊ लागले. त्यासाठी ओवी, अभंग इ. प्राकृत छंद मागे पडून त्याऐवजी विंदग्ध संस्कृत साहित्यातील, वसंततिलका, आर्या, दिंडी, श्लोक, भुजंगप्रयात इ. अक्षर मात्रावृत्तांच्या बंदिस्त बांधणीतून कथा घडविली जाऊ लागली. अर्थात या कालसापेक्ष बदलात काटेकोर विभागणीची सीमारेषा दाखविता येत नसली, तरी सर्वसामान्यपणे पंडित कवींच्या कथाबांधणीचा ओघ लक्षात येऊ शकतो. कारण याच काळात मुक्तेश्वर, श्रीधरासारखे कवी 'ओवी' वृत्तातून सफाईदारपणे व प्रभावी अशी आख्यानबांधणी करताना दिसतात. पण असे असले तरीदेखील मुक्तेश्वर श्रीधरांनाही या पंडिती कालखंडाचा प्रभाव टाळता आलेला नाही. मुक्तेश्वरांनी वृत्तबद्ध अशा 'संक्षेपरामायणाची' रचना केलेली आहे तर श्रीधराने स्वतःची पंडिती प्रकृती नसतानादेखील ध्रुवकथा, शिबिराजकथा, जांबूळकथा, व्याधाख्यान, मृगकथा इ. अनेक स्फुट आख्यान-कविता वृत्तबद्ध रीतीने साकार केलेल्या आहेत. याचाच अर्थ संतमालिकेतील हा कथाकवी पंडिती रचनातंत्राचा प्रभाव टाळू शकलेला नाही, हे स्पष्ट होते. समर्थ रामदासांनी देखील वृत्तबद्ध रचना केली आहे.

या पंडिती तंत्र प्रभावाप्रमाणे दाक्षिणात्य संगीतप्रियतेचा प्रभाव तंजावरकडील पंडीत कवींवर पडलेला दिसून येतो. रघुनाथ पंडित, आनंदतनय, रामनाथ, गुरूदास इ. पंडितांनी आपल्या वृत्तबद्ध स्फुटकथा बांधणीत संगीतमयी, नादमधुर अशा गेयपदांची पेरणी केलेली दिसून येते. याचा अर्थ संगीताचा प्रादेशिक प्रभाव आणि प्रादेशिक संगीताचा प्रभाव स्फुट कथारचनेच्या बांधणीवर पडला आहे. यातील 'पद' मांडणीतून या कथांचा भावदर्शी घाट अधिकच वेधक आणि भावसंपन्न बनला आहे.

## स्फुट आख्यान बांधणीतील पदरचना

मराठीतील स्फुट आख्यान काव्यांचा विचार करता कथाबांधणीत प्रसंगोपात्त योजलेल्या 'पद' रचनेचाही स्वतंत्र विचार करावा लागतो. कथेच्या ओघात मांडलेल्या अशा नादमधुर गेय पदांची गोडी कथा-संदर्भात रसनिर्मितीच्या व परिणामाच्या दृष्टीने अधिकच वाढलेली दिसते. अशा संगीतमय पदांच्या आगेमागे त्या त्या कथानकाचा दाखला प्रत्यक्ष प्रमाण म्हणून उभा असल्याने कथांतर्गत अवतरलेल्या अशा पदांना भावदर्शनाची उत्कटता लाभून कथेतील रमणीय रसपरिपोष अधिक गहिरा व उठावदार झालेला जाणवतो. कथापरिणामाच्या दृष्टीने अशा वेधक पदांचे स्थान मोलाचे ठरले आहे. स्वतंत्रपणे स्फुट पदांचे संवर्धन अन्यत्र भारूड, भजन, कीर्तन इ. संस्थांनी परंपरने केले असून स्फुट आख्यानात कीर्तनकारांनी अशा पदांची योजना करून हरिदास मंडळींनी स्फुट कथेतील भावनिक आवाहन अधिक टोकदार बनविले आहे. अशा 'पदांकित' भावनोत्कर्षामुळे कथेत रसरशीतपणे जिवंत वातावरण उत्पन्न झालेले दिसते.

'पद' म्हणजे नेमकी कोणती काव्यकृती असा विवाद्य प्रश्न असला तरी स्फुट, गेय, रसपरिपोषक, स्तवनपर रचनेस 'पद' असे म्हटले जाते. अशा पदातून ईश्वरी लीला, भक्तिमहिमा, आध्यात्मिक तत्त्वसूत्र सांगून पारलौकिक विषयाची कलापूर्ण रीतीने घडण केलेली असते. शिवाय पदांच्या साथीला वाद्यतालांची संगीत साथ असल्याने श्रवणसुभग गेयता आलेली असते. या पदांच्या ध्रुपदातून मुख्य भावसूत्र आळविलेले असते. अर्थात ओवी, अभंग हे वृत्त-छंद जरी गेय असले, तरी या पदातून प्रकटणारे छंदसौंदर्य अधिक कलापूर्ण, फिरकीदार व बहुरंगी असते. पदातील गेयतेचे संगीत अधिक स्पष्ट व ठसठशीत असते. किंबहुना, गाऊन दाखविण्यासाठीच पदांची निर्मिती व पेरणी झालेली असते. म्हणजे आख्यानकाव्यात पदरचनाही मूलतःच गायनानुकूल, संगीतमय, तालसुरांनी बद्ध अशीच प्रकटलेली असते. एवंच – 'पारलौकिकता, कलापूर्णता व गेयता ही पदांची त्रिविध अंगे होत.'[८] मराठी स्फुट आख्यान काव्याचे हे एक परिमाण होय.

पदांची परंपरा थेट मुकुंदराजापासून राम जोशी मोरोपंतांपर्यंत दिसून येते. एकनाथ दासोपंत हे तर पदरचनाकारांचे मुकुटमणी म्हणता येतील. पदातून कवीचा भावनिक आत्माविष्कार होत असून, ईश्वरविषयक आंतरिक तळमळ उत्कटत्वाने प्रतीत होताना दिसते. पौराणिक स्फुट कथांतून आलेल्या अशा पदांमुळे त्या त्या प्रसंगांना रसपूर्ण उत्कटता प्राप्त झालेली दिसते.

## संगीत पद्धतीचा वेध

कीर्तनाख्यानातून आलेल्या अशा पदांतून भावभक्तीचा संस्कार अधिक भावगम्य बनविला जातो. अशा वेळी प्रसंगोपात्त व प्रसंगोचित अशी विशिष्ट सोंगे आणून

कथापोषक अशी पदे म्हटली जातात. वासुदेव, जंगम, जोगी, जोशी, आंधळा, पांगळा, मुका, वाघ्या इ. पदे बोधप्रद व उपदेशपर असून, ही पदे म्हणण्याचा धाटणीवरून महाराष्ट्रातील तत्कालीन संगीत-पद्धतीचाही अजमास बांधता येण्यासारखा आहे. विविध मठ, संप्रदायांतून ही परंपरा आजही दिसून येते.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या अभ्यासासाठी दक्षिणेत तमिळनाडू प्रातांतील तंजावर येथे गेल्यावेळी तेथील समर्थ रामदास स्वामींच्या मठातील विद्यमान मठाधिपती श्री. भीमराज गोस्वामी यांनी कीर्तनाख्यानातील अशी सांप्रदायिक पदे रागदारीत म्हणून दाखविली. त्यावरून दक्षिणी रागदारी संगीतपद्धतीदेखील या पदात कशी मुरलेली आहे हे दिसून येते. आपल्याकडे पंढरपूरच्या श्रीधर नाझरेकर यांच्या स्फुट कथाकाव्यात अशा पदांची रचना दिसून येते. कदाचित श्रीधराच्या दक्षिणयात्रेच्या वेळी त्यास हा परिचय झालेला असावा. तंजावर येथील हस्तलिखित बाडातच आम्हास श्रीधराची 'पारधी कथा' उपलब्ध झाली आहे.

### कथाबांधणीत कीर्तन माध्यमाचा प्रभाव

स्फुट कथांच्या बांधणीत गेयपदांच्या समावेशांचे कारण भावोत्कटता; रसनिर्मिती हे जसे आंतरिक कारण आहे, त्या बरोबरच कीर्तन श्रवणार्थी म्हणून बसलेल्या विविध वयोगटातील संमिश्र श्रोत्यांचे एकाच वेळी समाराधन करून भक्तिबोधाचे संस्कार करणाऱ्या 'कीर्तन' माध्यमाचाही या स्फुट कथा बांधणीवर परिणाम झालेला दिसतो.

संत कालखंडातील स्वयंस्फूर्त अभंग संकीर्तन किंवा निरूपणाची परंपरा मागे पडून, पुढे बदलत्या सामाजिक परिस्थितीत वेगळया जाणिवा घेऊन पंडिती काळात स्फुट आख्यान कविता अवतरली. या कथेत संतांच्याइतकी जीवोद्धाराची तळमळ नसली, तरी संतप्रणीत भक्तीची आंतरिक प्रेरणा मात्र जागी होती. या सूत्रांतून देवदेवतांच्या जन्मोत्सवादी विशेष प्रसंगी रंजकतापूर्ण कीर्तनातून कथागान घडू लागले त्यातही तंजावरसारख्या सुदूर प्रांतात निवडक मराठी मंडळींपुढे धार्मिक सण, रामजन्मोत्सवादी प्रसंगी भक्तिभावाने कीर्तनकथा मांडताना, केवळ ओवीबद्ध किंवा केवळ श्लोकबद्ध रचना श्रोत्यांपुढे ठेवली गेली नाही. तेथील प्रतिभावंत पंडितानी ओवी, अभंग या पारंपरिक सुबोध छंदाबरोबरच वृत्तबद्ध श्लोक -पदें - मधूनमधून संस्कृत श्लोकांची पेरणी अशी सरमिसळ करून संकीर्ण रचनेतून प्रभाव अधिक वाढविलेला दिसतो. अज्ञ आणि सूज्ञ सकळांना अधिकार असलेल्या कीर्तन माध्यमातून कथा 'सजविलेली' दिसते. या संदर्भात आनंदतनयाची सुदाम कथा, शिबिराज कथा, गुरुदासाची चेतूर्भुज सावज कथा, चंद्रहास निरुपण, रामनाथाचे प्रल्हाद चरित्र इ. स्फुट कथाकाव्ये लक्षणीय ठरतात.

## कडाका छंदातील रूपबांधणी

कीर्तनसंबद्ध अशा या स्फुट आख्यान-काव्यांच्या बांधणीत धावत्या गतिमान निवेदनासाठी ओवी छंदाबरोबरच अधूनमधून द्रुत गद्याची लय पकडून 'कडाका' छंदही वापरलेला दिसतो. या काळात पुढील शाहिरी काव्याशी सोयरीक जोडणारी 'कटिबंध' किंवा 'कटाव' नामक छंदातील प्रवाही, खटकेबाज शब्दबांधणीतील रचना-देखील होत असलेली दिसून येते. या कटिबंधास 'कडाका' असेही म्हटलेले दिसते. कटाव, कडाका, कटिबंध हे तीन्ही शब्द पंडितांनी आणि शाहीर कवींनी वापरलेले दिसतात. व्रज भाषेतील 'करखा छंद' किंवा गुजराती भाषेतील 'कडखा' गीते यात हे शब्दसाम्य आपणास जाणवते.

मराठीत कवी अमृतरायांनी कटिबंधात्मक रचना केली असून, त्यांचा हिंदुस्थानी साहित्याशी संबंध आलेला आहे. त्यांच्या 'सुदामकथा', 'ध्रुवकथा' या कडाका छंदातच आहेत. अमृतरायांचे कटाव अव्वल दर्जाचे असून, स्वतः अमृतराय या छंदासंबंधी अभिमानाने म्हणतात की,

**'अमृतेश्वर कटिबंध जनाच्या रसनेने वदवी ।'**

अर्थात लोकांच्या तोंडी घोळणाऱ्या कटावांची बांधणी द्रुत लयीत ओघवती, प्रासादिक सुबक आणि प्रासबद्ध असून मराठीतील स्फुट आख्यान कवितेला आविष्कार घडणीचे एक वेधक रूप इथे प्राप्त झालेले दिसते. गतिमान, ढंगदार, ठसकेबाज आणि डौलदार, खटकेबाज कटावाचे रूप शब्दबांधणीच्या विशेषांनी नटलेले असून दृश्यमूल्य घेऊन उभे आहे. इथे मराठी स्फुट आख्यान-कवितेला श्रवणीयते बरोबरच प्रेक्षणीय रूपसिद्धी लाभलेली दिसून येते.

## चूर्णिका-तरल गद्याचे परिमाण

मराठी स्फुट आख्यानांच्या रूपाविष्काराचा विचार करता कटिबंधात्मक रचनेप्रमाणे 'चूर्णिका' नामक तरल गद्याची शैलीदेखील वैशिष्ट्यपूर्ण असून कथारचनेचा एक डौलदार घाट चूर्णिकेत दिसून येतो. मराठीत चूर्णिकेचा रचनाबंध १८ व्या शतकापासून रूढ झालेला दिसतो. आनंदतनयकृत 'ताटकावध', रघुनाथपंडित कृत 'दमयंती स्वयंवर', अमृतरायकृत 'ध्रुव चरित्र' इत्यादींत चूर्णिकेची घडण दिसून येते. चूर्णिकेतील प्रासबद्ध गतिमान गद्यनिवेदन हे शाहिरी रूप बांधणीला जवळचे ठरणारे आहे. कटाव, कडाका छंदाप्रमाणे चूर्णिकेतील तरल गद्याचा प्रासबद्ध ठेका श्रोत्यांना खिळवून ठेवणारा ठरला आहे. पोवाड्यांतील श्रवणसुभग धावत्या निवेदनाची अभिनययुक्त लयकारी चूर्णिकेत दिसून येते.

## चंपू-गद्य पद्य मिश्ररूप

प्राचीन मराठीतील स्फुट आख्यान काव्यात गद्य-पद्य मिश्र अशा चंपूकाव्याप्रमाणे-देखील रचना घडलेली दिसून येते. अशा प्रकारच्या कथाबांधणीत विविध वृत्तांची पेरणी

असून प्रदीर्घ कथेचा संदर्भ गद्यवाक्यातून श्रोत्यांच्या आवाक्यात आणून दिला जातो. श्रोत्यांच्या श्रवणसुभगतेत रूचिपालट घडवीत कथाबांधणीत आकर्षकता उत्पन्न करण्याच्या दृष्टीने हे 'चंपू' स्वरूप स्फुट कथेला आगळे परिमाण प्राप्त करून देते.

## संस्कृत श्लोकांची पेरणी

या प्राकृत स्फुट आख्यानांच्या बांधणीत मधूनच संस्कृत श्लोकांचीदेखील पेरणी केलेली दिसून येत असून, पंडित कवींच्या कथारचनेत त्यामुळे प्रौढ, भारदस्तपणाचा बाजही सांभाळला गेला आहे श्रीधर, आनंदतनय यांच्या स्फुट कथेत असे रूप आपणास पाहावयास मिळते. यासंबंधीचे आस्वादक विवेचन त्या 'त्या कथासंचात सोदाहरण, स्पष्ट केले असून प्रस्तुत कथा बांधणीचा आकृतिबंध स्पष्ट व्हावा म्हणून या गोष्टीचा इथे निर्देश केला आहे.

## स्व-कालदर्शन

कीर्तनरंगातून सुदाम चरित्रासारखे स्फुट आख्यान उभे करताना श्रोत्यांपुढे अमृतरायांनी पेशवाईतील मंगल स्नानाचा थाट, रूचिर पंचपक्वान्नांचा घमघमाट, आणि विविध वस्त्रालंकाराचा लखलखाट उभा केला आहे. पेशवाईतील जीवनलालसाच जणू स्वकालीन ठसा घेऊन इथे प्रकटलेली दिसते.

'प्रल्हाद कथेत' प्रकटलेली गुरूकुल शिक्षण पद्धती तसेच तत्कालीन शिक्षेचे अघोरी प्रकार किंवा सुदाम कथेत आलेले दुःख, दैन्य, दारिद्र्य, दुष्काळाचे चित्रण यावरही कवीच्या 'स्वकालीन' वर्तमानाची छाप दिसून येते. कळत न कळत हे काळाचे मूल्यही कथेच्या रूपाविष्कारावर परिणाम करीत असते.

## नाट्यात्मक घडण - तेलगु तामिळी प्रभाव

प्राचीन मराठी स्फुट कथच्या स्वरूप बांधणीवर 'यक्षगान' – 'कोरवंझीचा' प्रभाव असून, तंजावरकडील पंडित कवीच्या कथाबांधणीत याचे प्रत्यंतर येते. 'मराठी काव्यांच्या तंजावरी आख्यान काव्याचा एक विशिष्ट संप्रदाय मानावा एवढी त्यांची योग्यता निश्चित आहे. तंजावरी काव्याला ही जी पृथगात्मता आली, त्यात तेलगू काव्याचा प्रभाव हे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणून दाखविता येईल.... मराठीतील 'यक्षगानाची' निर्मिती ही तेलगूने मराठीला दिलेली फार मोठी देणगी होय...... रघुनाथपंडिताला हा निराळा मार्ग चोखाळण्याची जी प्रेरणा मिळाली ती तेलगू कवींकडूनच होय.'[९]

'तेलगू प्रबंध – काव्याचा एक महत्त्वाचा परिणाम मराठी काव्याला मिळालेल्या नाट्यात्मक घाटात आहे. नाट्यात्मकता हा तेलगू प्रबंध काव्याचा महत्त्वाचा विशेष आहे. मराठीने तेलगू काव्यातील काही शैलीविषयक लकबांचे अनुकरण केले आहे. विशेषतः अनुनासिकांच्या पुनरुक्तीने नादमयता साधण्याची पद्धती तेलगू कवींना विशेष प्रिय आहे. उदा. 'रंग तुंग तदंग' 'मग म्हणे रमणी रमणीय हा' इ. या तेलगू

प्रबंधकाव्याने मराठी आख्यान काव्याच्या रूपसिद्धीला मोठा हातभार लावला आहे.'[१०]

'दक्षिणेकडे निर्माण झालेल्या अनेक देवदेवताविषयक पुराणांचा तिकडील मराठी लोकजीवनावर फार मोठा प्रभाव पडला होता.... दक्षिणेकडील शैव व वैष्णवपंथाने प्रभावित झालेल्या धार्मिक व सांस्कृतिक प्रवाहाशी मराठी माणूस एकरूप झालेला होता. **प्रसिद्ध शिवक्षेत्र 'तिरुवारूर' येथील त्यागराजास तंजावरच्या मराठी राजांनी आपले** कुलदैवत केले. स्वतः सरफोजी भोसले (दुसरे) यांनी दक्षिणेकडील विविध क्षेत्रांचे दर्शन घेऊन, मंदिरास मौल्यवान देणग्या दिल्या. 'शरभेंद्र तीर्थावली' या ग्रंथात त्याचे वर्णन आले आहे.... दक्षिणेकडील देवदेवतांची भक्ती व त्यांच्याविषयींची पुराणे यांच्या प्रभावामुळे तंजावरकडील आख्यान काव्याचीं पार्श्वभूमीच बदलून गेली आहे व काव्यातील वातावरणही त्याचमुळे भिन्न झाले आहे.....

..... दक्षिणेकडील मान्यता पावलेल्या संगीत व नृत्य या कलाप्रकारांचा मराठी आख्यान काव्यावरही प्रभाव पडलेला आहे..... गान-कलेचा महत्त्वाचा परिणाम आख्यान-काव्यातून आलेल्या गेय अशा रागदारीतील पदांतून व्यक्त होतो. संगीत व काव्य हे एकत्र नांदणे एकंदरीत कठीणच. त्यामुळे अशा पदांनी युक्त असलेली कृती काव्ये या दृष्टीने फारशी सरस उतरली नाहीत. याशिवाय फारशी रागदारीत नसलेली पण चालीवर गाता येण्यासारखी पदरचना कीर्तनाकरिता लिहिलेल्या आख्यानातून आढळून येते. आनंदतनयाने अशी रचना केली असून, त्यानेच मराठीत पहिल्यांदा हा उपक्रम केला.'[११]

## तामीळ कोरवंझीचा प्रभाव

तंजावर प्रांतीय मराठी स्फुट आख्यान-कथेच्या रूपबांधणीवर तामिळी कोरवंझीचा प्रभाव आहे. 'कोरवंझी हा खास तामिळी यक्षगान नाटकाचा प्रकार आहे. या धर्तीवर अनेक तेलगू व मराठी नाटके निर्माण झाली.... मराठी कोरवंझी नाटकात कुरव ह्या जमातीशी संलग्न अशा कैकाडीण किंवा बुरूड या पात्रांची योजना असते. या नाट्यप्रकाराचा मराठीतील आख्यानकाव्यात प्रभ व पडला आहे.'[१२] त्यातूनच प्रसंगाची सुरेख गुंफण; धावत्या निवेदनातील चित्रमयता; दृष्यात्मक रेखाटण; ध्वन्यानुसारी शब्दयोजना इ. सर्वातून भावप्रवण अशी कथा प्रकटलेली दिसते.

अशा या स्फुट आख्यान काव्यात नाट्यात्मकता येण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्रत्यक्ष कथाकथनापेक्षा पात्रगत संवादवाक्यांचीच पेरणी करून उभे केलेले नाट्यपूर्ण संवाद. कथागत पात्रांच्या अशा संवाद उक्तीतून पात्रांचे व्यक्तिमत्त्वही उठावदारपणे नजरेत भरते. उदा. प्रल्हादकथेतील प्रल्हाद हिरण्यकश्यपू यांच्यातील संवाद. ध्रुवकथेतील - ध्रुवनारद, ध्रुव श्रीविष्णू, यांच्यातील संवाद; गजेंद्र कथेतील नक्र श्रीहरी संवाद किंवा शुकरंभा कथेतील संवाद हे सर्व नाट्यपूर्ण संघर्षाने वेधक ठरलेले आहेत. तंजावरस्थ पंडित कवींच्या स्फुट आख्यानातील अशा संवाद नाट्यांचे दृश्यरूप विलक्षण वेधक ठरलले दिसते.

## लोकाभिरूचीचा रचना बांधणीवरील प्रभाव

कालसापेक्ष बदलत्या लोकाभिरूचीप्रमाणे संतकाळातील कथा पंडिती काळात कलात्मक दरबारी अभिरूचीकडे झुकली तर पंडिती काळातील स्फुट कथा उत्तर पेशवाईत शाहिरी वळण हाताळताना दिसते. संतकाळातील अभिरूचीपेक्षा पंडिती काळात श्रीमंत राजेरजवाडे, सरदारमंडळी इत्यादींच्या द्वारे उच्चभ्रू समाजाची उच्चाभिरूची प्रकटलेली दिसते.

पुढे उत्तर पेशवाईत लोकाभिरूचीने शाहिरी वळण स्वीकारताच पौराणिक स्फुट कथादेखील चूर्णिका, कडाका छंदाच्या परिवेशाने प्रकट झालेली दिसते. एवंच, स्फुट आख्यान्याच्या जडणघडणीत या लोकाभिरूचीचाही वाटा असल्याचे दिसून येते.

## स्फुट आख्यान रचनेतील व्यक्तिदर्शन

स्फुट आख्यानांच्या रूपबंधात कथावस्तू व रसनिर्मितीबरोबरच व्यक्तिदर्शन-देखील महत्त्वाचे ठरले आहे. स्फुट आख्यान-काव्य हा वाङ्मयप्रकार खंडकाव्य; दीर्घ आख्यान कविता किंवा आजची लघु कादंबरी, कथा यापेक्षाही स्वतंत्र आहे. इथे लघु आकाराबरोबरच लघु अवकाशात कथेबरोबरच प्रभावी व्यक्तिदर्शन घडविणे तितकेसे सोपे नाही. त्यामुळे परिचित कथामांडणीतील कौशल्याबरोबरच पूर्वपरिचित अशा व्यक्तिचित्रात रंगभरणी करून जिवंतपणा आणणे यातही व्यक्तिदर्शनकौशल्य साठवलेलें असते. पौराणिक व्यक्तींचे नव्याने दर्शन घडते. त्यामुळे अशा स्फुट आख्यान कथांतून नवीन व्यक्तिरेखा निर्माण करण्यापेक्षा ज्ञात असलेल्या पात्रांच्या स्वभावातील बारकावे दाखवून, सूक्ष्म रंगछटांची पेरणी करण्यातच त्यांचे कौशल्य आपणांस दिसून येते. अमृतरायांनी सुदामाची व्यक्तिरेखा पेशवाईतील मंगलस्नानाचे क्षणचित्र पाहूनच जणू वास्तवपूर्णरीत्या उभी केलेली जाणवते.

## कथाबांधणीतील भाषाशैली

स्फुट आख्यानांची बांधणी ज्या भाषेच्या द्वारा समूर्त झाली ती भाषाशैली व्यक्ति-काल सापेक्षतेने प्रासादिक, सोपी, प्रौढ, भारदस्त, अलंकारमंडित, ओघवती अशा विविध रूपात प्रकटली आहे. पंडित कवींनी तर धावत्या रचनेत अनुकूल अशा वृत्तांची योजना केलेली असून, त्यात वर्णनसामर्थ्य व चित्रमयता आहे. त्या त्या प्रसंगांची क्षणचित्रे अंतःचक्षूपुढे उभे करण्याचे सामर्थ्य या भाषाशैलीत आहे.

चित्रदर्शी नाट्यात्मकता हे या भाषाशैलीचे आणखी एक अंग असून, आपल्या स्फुट आख्यान-बांधणीत पद्यबंधातूनच या कवींनी नाट्यपूर्ण संवाद योजलेले दिसतात. उदा. प्रल्हाद-हिरण्यकश्यपू, शुक-रंभा, कपोत-शिबिराजा, ध्रुव-सुनीती, ध्रुव-नारद, नक्र-विष्णू, तापसी-व्याध (पारधी कथा) इत्यादींचे खटकेबाज संवाद वेधक ठरले आहेत. अशा संवादांतून मानवी स्वभावाचे बारकावे गहिरेपणाने प्रकटले असून, सूत्ररूप वाक्यातून जीवनभाष्य व्यक्त होते.

**सामाजिकतेचा प्रभाव**

मध्ययुगीन स्फुट आख्यांनाचा विचार करता तत्कालीन सामाजिक राजकीय वातावरणाचा विशिष्ट प्रभाव कवीच्या अंतर्मनातून प्रकट झालेला दिसतो. उदा. प्रल्हाद कथेतून जातिभेदातीत भक्तीच्या संदेशाबरोबरच प्रजेला त्राहीभगवान करणाऱ्या दुष्ट राजवटीचे चित्रण हिरण्यकश्यपूच्या रूपात प्रकट होऊन, त्यात युगधर्माची प्रेरकता दिसून येते. (१) नामदेवांच्या कथेत 'तयासि छळिता पावेल शासन ।' आणि 'भक्त निर्भय सर्वासि ।' असे आश्वासन प्रकट होते. (२) धर्मग्लानीच्या काळात एकनाथांच्या कथेतून – 'एकाजनार्दनी रक्षी नारायण ।' असा तितीक्षेचा सूर प्रकट होतो, तर 'दुर्जन तो लाथ मारी खांबावरी ।' अशा शब्दात उन्मत्त सुलतानी राजवटीचे चित्रच ते उभे करतात. (३) आनंदतनय 'गोळा जसा यंत्रिचा ।' अशी प्रतिमा सहजी वापरतो पण त्यातून तत्कालीन तोफा बंदुकानी युक्त असे युद्धग्रस्त जीवन सहजी समोर येते. (४) गुरूदासाने –'मस्त शत्रू हत होय ।' अशा शब्दात सुलतानी शत्रूच्या निराकरणाचा संकेत केलेला दिसतो. (५) रामनाथाच्या कथाचित्रणात तत्कालीन संपन्न राजेशाहीचे क्षणचित्र प्रल्हादासारख्या राजकुमाराच्या पाठशाळेच्या संपन्नतेतून सहजी प्रतीत होते. उदा. चांदीच्या पाटीवर मोत्याचा चुरा पसरून सोन्याच्या रत्नजडित लेखणीने त्या श्रीमंती धूळपाटीवर अक्षरे गिरवणारा प्रल्हाद पाहाता, दक्षिणेतील राजशाही घराण्यातील भाग्यवान विद्यार्थ्याचे दर्शन घडते.

(६) 'गजेंद्रमोक्ष' कथेत रानवेली, छोटी छोटी झुडपे, झोडपीत चाललेल्या उन्मत्त गजेंद्राच्या रूपाने तत्कालीन उद्दाम सुलतानी राजवटीचे संसूचन सहजी मिळू शकते.

(७) वामन शिष्याच्या ध्रुव कथेत बाईलवेड्या उत्तानपाद राजास दूषण देणारे प्रजाजनही दिसून येतात.

(८) नामदेवांच्या ध्रुव कथेत – काम-क्रोधानी विकारवश बनलेल्या उत्तानपाद राजाच्या निमित्ताने कुत्रा, गारूड्याचे वानर, शेंबडातील माशी इ. क्षुद्र प्रतिमा योजिल्या गेल्या असून, विषयपंकात लिडबिडणाऱ्या सामान्य सामाजिकांचे इथे आपणास दर्शन घडू शकते.

(९) प्रल्हाद कथेतून – विषप्रयोग, कडेलोट करणे, हत्तीच्या पायी देणे किंवा उकळत्या तेलात टाकणे इ. शिक्षेचे प्रकार मध्ययुगीन राजवटीतील शिक्षाप्रकार लक्षित करतात.

(१०) अमृतरायाच्या सुदाम चरित्रातून तत्कालीन पेशवाईतील श्रीमंती थाट, संस्थानी वैभव, मिष्टान्न भोजनावळी, ब्राह्मणी राज्यातील ब्राह्मणांचे महत्त्व, राजदरबारातील वातावरण इ. बहुअंगाने समाजदर्शन घडते. सुदाम्याच्या मंगल चौक-न्हाणात पेशवाईतील रंगस्नानाचे प्रतिबिंब उमटलेले स्पष्ट दिसते.

### कथासंच-तौलनिक आस्वादन दिशा

भारतीय भक्तिसाधनेत प्रमाणभूत असलेल्या रामायण, महाभारत, भागवतादी पुराणग्रंथातील विविध कथावस्तूंचे छोट्यामोठ्या आकारात पद्यनिबंधन करणे ही संतपंत कवींची प्रवृत्ती प्रायः दिसून येते. त्यामुळे मुळातील एकच कथावस्तु कवी सापेक्षतेने आणि कालसापेक्षेतेने विविध आकृतिबंधात रुपबद्ध झालेली दिसते. तिच्या लहान मोठ्या आकारप्रकारांची, वृत्त वैविध्यासह आस्वादक तुलना करणे ही तौलानिक अभ्यासाची एक दिशा आहे. मूळ कथाबीजाभोवती बारीकसारीक तपशील अंगोपांगांतून कसा फुलविला गेला आहे हे अभ्यासताना मूळ कथेच्या विकासातील सांप्रदायिक पारंपरिकता आणि नवसृजनात्मकता यांचेही एकात्म दर्शन घडू शकते. मूळ एकाच संस्कृत कथेचे प्राकृतमधील विविध स्फुट अवतार एकसंधपणे एका गटसंचात मांडून अभ्यासताना त्यातील आशयाविष्काराचे सूक्ष्म बदल; कालसापेक्ष परिवर्तन, युगधर्माचे भान; संक्षेपविस्ताराचे धोरण; समकालीन उपलब्ध माध्यमांच्या घटकांचा परिणाम इ. अनेक गोष्टी त्यातून अजमावता येतात. एकाच कथेकडे पाहाण्याचा बदलता दृष्टिकोणही पाहाता येतो. तदनुषंगाने कथेची बदलती प्रयोजन केंद्रे आणि दर्शनबिंदूदेखील निश्चित करता येणे शक्य होते.

### कथाप्रिय लोकाभिरूची

स्फुट कथासंच अभ्यासताना कालमानानुसार बदलता वाचकवर्ग आणि श्रोतृगण हीदेखील आख्यानरचनेची प्रेरक कारणे असू शकतात. या दृष्टीने हरिदास, पुराणिक, कथाकार, भाट, गोंधळी, दरबारी कवी, कीर्तनकार, लोककथाकार, लोकसंगीतकार, लोककलाकार इत्यादींच्या कल्पक प्रतिभेतून नवनिर्मित आकृतिबंधातील स्फुट कथांचा मूळ कथेच्या संदर्भात शोध घेणे उद्‌बोधक ठरणारे आहे. लोकमानसात रूजलेल्या व लोकादरास पात्र ठरलेल्या अशा कथांचे विविध स्फुट रूपाविष्कार लोकांच्या अभिरूचीचे दर्शन घडवितात.

### रस रहस्याचा शोध

वास्तविक प्रत्येक स्फुट आख्यान ही एक स्वयंभू, स्वतंत्र कलाकृती असून कवीच्या अनन्यसाधारण प्रतिभेतून प्रकटलेली ती एक कलावस्तू असते. त्यामुळे तिची तुलना दुसऱ्या कथेशी करणे बरोबर नाही असे म्हटले जात असले, तरी साहित्य आस्वादनात तौलनिक समीक्षा ही गोष्ट सहजी घडत असते. साहित्यकृतीच्या आस्वादक आकलनासाठी आणि तिचे रसरहस्य समजून घेण्यासाठी तौलनिक अभ्यास पूरकच ठरणार आहे या दृष्टीने विचार करता प्रल्हाद चरित्र, गजेंद्रमोक्ष, ध्रुवकथा, सुदाम कथा, हरिश्चंदाख्यान, शुकरंभाख्यान, शिबिराजकथा, चंद्रहासकथा इ. समान कथांचे गट एकत्र अभ्यासणे विशेष लक्षणीय ठरले आहे. बदलत्या आकृतिबंधातून, बदलती प्रयोजनकेंद्रे पाहून रसनिर्मितीची प्रक्रियादेखील बदलत्या रूपात कशी प्रकट होते, हे या अभ्यासातून

दृगोचर होऊ शकते. त्यातून बदलत्या आविष्कार शैलीचेही रूपदर्शन घडू शकते.

### संख्यात्मक रूपदर्शन

वाद्यतालांच्या साथीवर, रंजनाचे परिमाण घेऊन, गेय-श्राव्यपद्धतीने प्रकटलेल्या या स्फुट आख्यान–कथा मूळ संस्कृत संहितेच्या तुलनेत पाहिल्या म्हणजे त्यातील सांख्यिकी बदलही लक्षात येतो. ध्रुव, प्रल्हाद, गजेंद्र, सुदाम, हरिश्चंद्र किंवा शिबिराज कथा या मुळापेक्षा खूपच संक्षेपाकारात प्रकटल्या आहेत. सरासरीने मुळापेक्षा १/३ इतक्या त्या लघुकाय बनल्या आहेत असे दिसते. त्यामुळे छोट्या मोठ्या स्तोत्राप्रमाणे नित्यपठणात किंवा नैमित्तिक कार्यक्रमप्रसंगी पाठ म्हणता येण्याजोगा त्यांचा बाह्य आकार लघु बनला आहे. मूळ संस्कृत कथेशी नाळ जोडूनही, त्यांच्या या लघुरूपाचे स्वयंभूपण आपणास नाकारता येत नाही. साहित्यकृतीचे 'स्व' आणि 'रूप' किंवा मंत्र आणि तंत्र यातील स्थित्यंतरात्मक बदलाची नोंद इथे घेता येते.

### कथासंच-तौलनिक अभ्यास

तौलनिक अभ्यासात तुलनेचे क्षेत्र विशिष्ट 'स्फुट आख्यान संचापुरते' मर्यादित केल्यामुळे त्यातील आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत समर्पक आणि सुसंबद्ध अशी तुलना ही आस्वादनाच्या दृष्टीने फलदायी होऊ शकेल. तसेच मूळ संस्कृत भाषेतील भागवतासारख्या लोकोत्तर भक्तिग्रंथाचे महाराष्ट्रातील स्फुट आख्यानातून आणि खास मऱ्हाठी व्यक्तिमत्वातून प्रकटलेले रूपाविष्कार हे आस्वादक तुलनेच्या अभ्यासाचे एक स्वतंत्र क्षेत्र होऊ शकते. त्यातही कालसापेक्षतेने व विविध सांप्रदायिक अंगाने उमटलेले रंगरूप, साधर्म्य वैधर्म्य, पाहाणे वैशिष्ट्यपूर्ण ठरणारे आहे. बदलत्या मराठी जीवनसंस्कृतीच्या संदर्भात हा अभ्यास लक्षणीय ठरावा. भारतीय संस्कृतीची बीजे 'इथे महाराष्ट्र भूमंडळी' कशी कशी रूजली आहेत. तिचे हुंकार कसकसे अंकुरत आहेत याचे भान इथे स्पष्ट होण्यासारखे आहे. महाराष्ट्र मनोधर्माचा आलोक त्यातून प्रकट होऊ शकतो. नवसौंदर्याची कुसर लघुकाय रूपात बदलत्या काळाच्या पातळीवर कशी प्रकटली आहे हे या कथेच्या लघुलेण्यातून पाहाणे उद्‌बोधक ठरणारे आहे.

मराठी कवींच्या रचनेत प्रायः आशयाच्या नवनिर्मितीपेक्षा अनुकृती किंवा भावानुवाद यातूनच मूळ कृतीचे प्रतिध्वनी ऐकणे शक्य होते. मूळ ग्रंथाच्या अनुषंगाने क्वचित पूर्वसूरींचे अनुकरण करून आशयाचे पुनर्घटन करणे, शैलीची नवी वळणे गिरविणे, तंत्रविशेषातून व प्रौढ भाषेतून विदग्ध पांडित्य दाखविण्याचा प्रयत्न करणे इ. गोष्टी इथे दिसून येतात. मूळ कथेचा केंद्रबिंदू धरून, स्वकालीन संदर्भाच्या परिघात अनुवादकाची, आख्यान कथकाची भूमिका घेऊन आपल्या कथेचा आशय यथामूळ असल्याचा दावा करीत मूळ संदर्भ स्वकाळात परिणामकारक करण्याचा कवींचा प्रयत्न दिसून येतो. त्यामुळे मूळग्रंथातील आर्षसामर्थ्य जागविणाऱ्या या आख्यानांचा विचार, मूळ संदर्भ निरपेक्षतेने करता येत नाही.

## नवे आकृतीबंध

प्राचीन मराठीतील स्फुट आख्यानांचे निर्मितीपूर्व मूळ संस्कृतरूप परंपरेने प्रायः कवीप्रमाणे रसिकांनाही ज्ञात असते. त्यामुळे ज्ञातसंदर्भाची बंधने कवीवर आपोआपच येतात. ही बंधने काही मर्यादेपर्यंत स्वीकारूनच कवींना नवनिर्मितीचे नवे आकृतिबंध साधावे लागतात. नवीन आकारसंगती शोधून कवींना पूर्वसिद्ध आशयालाच नव्या युगात सादर करावे लागते. अशा प्रक्रियेत काही संस्करण घडून येणे अपरिहार्य असते. अशा वेळी मूळ कथा, तीवर घडलेल्या नवसंस्करणाचे स्वरूप, तिची सरसनीरसता, युक्तायुक्तता इ. गोष्टी तपासताना कथासंच समोर ठेवून तौलनिक विचार आवश्यक ठरतो. संत-पंत-तंत अशा भिन्न काळातील, भिन्न व्यक्तिमत्वाच्या कवींनी शोधलेले अनुभवसंगतीचे नवे आकृतिबंध आणि त्यातील अर्थपूर्णता ही तौलनिक अभ्यासाने कळणे शक्य ठरते.

प्राचीन मराठीतील हे स्फुट आख्यान कथांचे लेखन साधारणतः यावनी आक्रमणाच्या आणि पारतंत्र्याच्या भीषण छायेत घडले गेले आहे. त्यामुळे अशा आख्यानातून आत्मरक्षणाची प्रेरणा, सहिष्णुता आणि समावेशक औदार्यही प्रकटलेले दिसते. कधी कधी मधूनच पारतंत्र्याच्या जुलमी जाचाने, छळाने प्रतिकाराची उर्मी त्यात डोकावत असून, परतंत्र जीवन बदलण्याची गर्भित सूचना त्यात हुंकारत असलेली दिसते. कधी शिवशाहीच्या स्वातंत्र्य-काळात आत्मक्रीडामग्न स्थितीतून रंजकतेचा विलासही प्रकटलेला दिसतो. अर्थात स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य यांना भिन्न भिन्न काळात सामोरे जाताना एकाच कथेचे आकृतिबंध कसे परिवर्तित आणि परिवर्धित झाले यांचाही तौलनिक विचार लक्षणीय ठरतो.

ही स्फुट आख्याने ग्रामीण आणि नागर लोकांना, अभिजनाबरोबर बहुजनाना सारखीच वेधक ठरली आहेत. कारण त्यात समान आध्यात्मिक शांतीचे भक्तीचे सूत्र असून, रंजक कलानुसरणाचे स्वातंत्र्य घेत कवींनी मौखिक कथापरंपरेशी सांधा जुळविलेला दिसतो. 'धर्ममान्य ग्रंथ आणि समकालीन वास्तव, मूलग्रंथाचे रूप आणि लोकमानसावरील त्याचा ठसा, संस्कृतच्या श्रेष्ठतेची जाणीव आणि लोकभाषेतील रचनेची निवड व जिद्द, वस्तुनिष्ठ काव्यादर्श आणि आत्मलक्षी काव्यनिर्मिती ज्ञानपरंपरा प्रामाण्य आणि आत्मप्रत्यय मूलानुसरणाची स्वीकृतनिष्ठा आणि रचनास्वातंत्र्याची सळसळती उर्मी, रचनेचा आटोप साधणारी संक्षेप प्रवृत्ती .... भक्तीसारख्या केंद्रीय जीवननिष्ठा आणि काव्यविषयक जाणिवांचे सृजनशील कवीला असलेले भान'[१३] अशी विविध प्रेरणा-प्रवृतीतून कवींनी आपले आकृतिबंध सादर केले. त्यांचा आस्वादक शोध घेणे ही तौलनिक अभ्यासाची एक दिशा आहे. प्रस्तुत प्रबंधातील कथासंचातून मांडलेले विवेचन या दृष्टीने लक्षणीय ठरणारे आहे.

सर्वमान्य ग्रंथाधारे केलेल्या पुनर्निर्मित स्फुट आख्यानांचा घाट हा मूळ आधारभूत कृतीने काही अंशी रेखून दिलेलाच असतो. त्यामुळे अशा कथासंचातील संकलित

कथांचे आकलन, आस्वादन, मूल्यांकन इ. करताना तौलनिक अभ्यास अनिवार्य ठरतो. कथाप्रयोजन, नवनिर्मितीची कल्पकता, संक्षेपविस्ताराचे धोरण, नवीन बदल, क्रमांतर, युगसापेक्षता, कालोचित संदेश, आत्मभान इ. गोष्टीबरोबरच या तौलनिक अभ्यासात मूळकृतीपेक्षा वेगळा प्रकटलेला घाट, साधलेला वेगळा परिणाम, त्यामुळे आख्यान बांधणीला लाभलेले वेगळे परिमाण यांचाही वेध घेणे लक्षणीय ठरते. या दृष्टीने नामदेव तुकारामादि संतांची 'अभंगातील' दृष्टांत कथा, नाथांची 'ओवी' वृत्तातील स्फुट आख्यान-बांधणी आणि पंडित कवींची वृत्तबद्ध विदग्ध रचना इ. तपासून पाहाणे उद्बोधक ठरणारे आहे. त्यातून त्यांचे पृथगात्म सौंदर्य प्रतीत होण्यासारखे आहे. प्रस्तुत शोधप्रबंधात असे कथासंच प्रकरणशः आस्वादपूर्ण तुलनेतून प्रथमच नव्याने मांडले जात आहेत.

## कलावंताचे व्यक्तिमत्त्व

एकाच स्फुट आख्यानांचे संच अभ्यासताना रचनाकाराचा जीवनानुभव आणि त्या कथाबीजावर निर्मात्याच्या व्यक्तिमत्त्वाचे झालेले संस्करण ही निर्मिती प्रक्रिया कलावंताच्या प्रकृतिधर्माची प्रतीती आणून देत असते. पूर्वसिद्ध मूळ कृती आणि ही नवनिर्मिती यांच्या स्वरूपाची तुलना केली की, नवसंस्कारित आख्यानाच्या अंगोपांगातून निर्मात्याचे व्यक्तिमत्त्व आणि बदलत्या जीवनाशयाबरोबर बदलत गेलेली आविष्कार तंत्र-प्रणाली यांचे अंतरंग दर्शन घडू शकते.

उदा. चंद्रभागेच्या वाळवंटी कीर्तनमंचावर उत्स्फूर्त नामघोष मांडणाऱ्या नामदेवादी संतांच्या अभंगातील स्फुट दृष्टांत कथा आणि पुराणातून भारूडांचेही गारूड उभे करणाऱ्या नाथांच्या 'दृक-श्राव्य' आख्यानकथा यांच्या बाह्य घाटाबरोबरच विदग्ध पंडिताच्या दृष्यरूप कीर्तनमाध्यमातील श्राव्य कथांचा घाट पाहाता संत-पंत हृदयाच्या प्रकृतिधर्माची सहजी ओळख होण्यासारखी आहे. आत्मसाक्षात्कारसंपन्न संतांच्या आणि संस्कारोपदेशी पंडितांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन त्यातून पृथकपणे घडू शकेल. एवंच, केवळ तुलनेसाठी तुलना हा या प्रबंध अभ्यासाचा हेतू नसून कथासंचातील साहित्यकृतींचे आस्वादक आकलन घडावे व त्या आकलनातून उपरोक्त विविध प्रकारे मूल्यमापनही घडावे असा दुहेरी हेतू त्यात आहे. आस्वादनास पूरक असा हा अभ्यास असून, स्फुट आख्यानांच्या रूपविशेषांचा व कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेऊन, या स्फुट आख्यानांची संस्फुरणे, स्थित्यंतरे, कथासंक्रमण प्रक्रिया, युगसापेक्षता इ. गोष्टी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या दृष्टीने प्रल्हाद, गजेंद्र, ध्रुव, सुदामा आणि शुकरंभासंवाद कथा असे पाच कथासंच प्रस्तुत प्रकरणशः मांडले आहेत. त्यांचे यथाक्रम विवेचून पाहू.

## साधन संदर्भ ग्रंथ

१. वाटवे के. ना – 'प्राचीन मराठी पंडिती काव्य' – पृ. ११६

## नवे आकृतीबंध

प्राचीन मराठीतील स्फुट आख्यानांचे निर्मितीपूर्व मूळ संस्कृतरूप परंपरेने प्रायः कवीप्रमाणे रसिकांनाही ज्ञात असते. त्यामुळे ज्ञातसंदर्भाची बंधने कवीवर आपोआपच येतात. ही बंधने काही मर्यादेपर्यंत स्वीकारूनच कवींना नवनिर्मितीचे नवे आकृतिबंध साधावे लागतात. नवीन आकारसंगती शोधून कवींना पूर्वसिद्ध आशयालाच नव्या युगात सादर करावे लागते. अशा प्रक्रियेत काही संस्करण घडून येणे अपरिहार्य असते. अशा वेळी मूळ कथा, तीवर घडलेल्या नवसंस्करणाचे स्वरूप, तिची सरसनीरसता, युक्तायुक्तता इ. गोष्टी तपासताना कथासंच समोर ठेवून तौलनिक विचार आवश्यक ठरतो. संत-पंत-तंत अशा भिन्न काळातील, भिन्न व्यक्तिमत्वाच्या कवींनी शोधलेले अनुभवसंगतीचे नवे आकृतिबंध आणि त्यातील अर्थपूर्णता ही तौलनिक अभ्यासाने कळणे शक्य ठरते.

प्राचीन मराठीतील हे स्फुट आख्यान कथांचे लेखन साधारणतः यावनी आक्रमणाच्या आणि पारतंत्र्याच्या भीषण छायेत घडले गेले आहे. त्यामुळे अशा आख्यानातून आत्मरक्षणाची प्रेरणा, सहिष्णुता आणि समावेशक औदार्यही प्रकटलेले दिसते. कधी कधी मधूनच पारतंत्र्याच्या जुलमी जाचाने, छळाने प्रतिकाराची उर्मी त्यात डोकावत असून, परतंत्र जीवन बदलण्याची गर्भित सूचना त्यात हुंकारत असलेली दिसते. कधी शिवशाहीच्या स्वातंत्र्य-काळात आत्मक्रीडामग्न स्थितीतून रंजकतेचा विलासही प्रकटलेला दिसतो. अर्थात स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य यांना भिन्न भिन्न काळात सामोरे जाताना एकाच कथेचे आकृतिबंध कसे परिवर्तित आणि परिवर्धित झाले यांचाही तौलनिक विचार लक्षणीय ठरतो.

ही स्फुट आख्याने ग्रामीण आणि नागर लोकांना, अभिजनाबरोबर बहुजनाना सारखीच वेधक ठरली आहेत. कारण त्यात समान आध्यात्मिक शांतीचे भक्तीचे सूत्र असून, रंजक कलानुसरणाचे स्वातंत्र्य घेत कवींनी मौखिक कथापरंपरेशी सांधा जुळविलेला दिसतो. 'धर्ममान्य ग्रंथ आणि समकालीन वास्तव, मूलग्रंथाचे रूप आणि लोकमानसावरील त्याचा ठसा, संस्कृतच्या श्रेष्ठतेची जाणीव आणि लोकभाषेतील रचनेची निवड व जिद्द, वस्तुनिष्ठ काव्यादर्श आणि आत्मलक्षी काव्यनिर्मिती ज्ञानपरंपरा प्रामाण्य आणि आत्मप्रत्यय मूलानुसरणाची स्वीकृतनिष्ठा आणि रचनास्वातंत्र्याची सळसळती उर्मी, रचनेचा आटोप साधणारी संक्षेप प्रवृत्ती .... भक्तीसारख्या केंद्रीय जीवननिष्ठा आणि काव्यविषयक जाणिवांचे सृजनशील कवीला असलेले भान'[१३] अशी विविध प्रेरणा-प्रवृतीतून कवींनी आपले आकृतिबंध सादर केले. त्यांचा आस्वादक शोध घेणे ही तौलनिक अभ्यासाची एक दिशा आहे. प्रस्तुत प्रबंधातील कथासंचातून मांडलेले विवेचन या दृष्टीने लक्षणीय ठरणारे आहे.

सर्वमान्य ग्रंथाधारे केलेल्या पुनर्निर्मित स्फुट आख्यानांचा घाट हा मूळ आधारभूत कृतीने काही अंशी रेखून दिलेलाच असतो. त्यामुळे अशा कथासंचातील संकलित

कथांचे आकलन, आस्वादन, मूल्यांकन इ. करताना तौलनिक अभ्यास अनिवार्य ठरतो. कथाप्रयोजन, नवनिर्मितीची कल्पकता, संक्षेपविस्ताराचे धोरण, नवीन बदल, क्रमांतर, युगसापेक्षता, कालोचित संदेश, आत्मभान इ. गोष्टीबरोबरच या तौलनिक अभ्यासात मूळकृतीपेक्षा वेगळा प्रकटलेला घाट, साधलेला वेगळा परिणाम, त्यामुळे आख्यान बांधणीला लाभलेले वेगळे परिमाण यांचाही वेध घेणे लक्षणीय ठरते. या दृष्टीने नामदेव तुकारामादि संतांची 'अभंगातील' दृष्टांत कथा, नाथांची 'ओवी' वृत्तातील स्फुट आख्यान - बांधणी आणि पंडित कवींची वृत्तबद्ध विदग्ध रचना इ. तपासून पाहाणे उद्‌बोधक ठरणारे आहे. त्यातून त्यांचे पृथगात्म सौंदर्य प्रतीत होण्यासारखे आहे. प्रस्तुत शोधप्रबंधात असे कथासंच प्रकरणशः आस्वादपूर्ण तुलनेतून प्रथमच नव्याने मांडले जात आहेत.

### कलावंताचे व्यक्तिमत्त्व

एकाच स्फुट आख्यानांचे संच अभ्यासताना रचनाकाराचा जीवनानुभव आणि त्या कथाबीजावर निर्मात्याच्या व्यक्तिमत्त्वाचे झालेले संस्करण ही निर्मिती प्रक्रिया कलावंताच्या प्रकृतिधर्माची प्रतीती आणून देत असते. पूर्वसिद्ध मूळ कृती आणि ही नवनिर्मिती यांच्या स्वरूपाची तुलना केली की, नवसंस्कारित आख्यानाच्या अंगोपांगातून निर्मात्याचे व्यक्तिमत्त्व आणि बदलत्या जीवनाशयाबरोबर बदलत गेलेली आविष्कार तंत्र-प्रणाली यांचे अंतरंग दर्शन घडू शकते.

उदा. चंद्रभागेच्या वाळवंटी कीर्तनमंचावर उत्स्फूर्त नामघोष मांडणाऱ्या नामदेवादी संतांच्या अभंगातील स्फुट दृष्टांत कथा आणि पुराणातून भारूडांचेही गारूड उभे करणाऱ्या नाथांच्या 'दृक-श्राव्य' आख्यानकथा यांच्या बाह्य घाटाबरोबरच विदग्ध पंडिताच्या दृष्यरूप कीर्तनमाध्यमातील श्राव्य कथांचा घाट पाहाता संत-पंत हृदयाच्या प्रकृतिधर्माची सहजी ओळख होण्यासारखी आहे. आत्मसाक्षात्कारसंपन्न संतांच्या आणि संस्कारोपदेशी पंडितांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन त्यातून पृथकपणे घडू शकेल. एवंच, केवळ तुलनेसाठी तुलना हा या प्रबंध अभ्यासाचा हेतू नसून कथासंचातील साहित्यकृतींचे आस्वादक आकलन घडावे व त्या आकलनातून उपरोक्त विविध प्रकारे मूल्यमापनही घडावे असा दुहेरी हेतू त्यात आहे. आस्वादनास पूरक असा हा अभ्यास असून, स्फुट आख्यानांच्या रूपविशेषांचा व कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेऊन, या स्फुट आख्यानांची संस्फुरणे, स्थित्यंतरे, कथासंक्रमण प्रक्रिया, युगसापेक्षता इ. गोष्टी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या दृष्टीने प्रल्हाद, गजेंद्र, ध्रुव, सुदामा आणि शुकरंभासंवाद कथा असे पाच कथासंच प्रस्तुत प्रकरणशः मांडले आहेत. त्यांचे यथाक्रम विवेचून पाहू.

### साधन संदर्भ ग्रंथ

१. वाटवे के. ना – 'प्राचीन मराठी पंडिती काव्य' – पृ. ११६

२. जोग रा. श्री. – 'अभिनव काव्य प्रकाश' – पृ. २६१
३. – तत्रैव – पृ. २६२
४. तोडमल ह. कि. – 'अर्वाचीन मराठीतील खंडकाव्ये' – पृ. ५, ६, ७
५. – तत्रैव – पृ. ३८
६. ठकार नि. शं. – 'मराठी कविता' पृ. १३०
७. – तत्रैव – पृ. १३३
८. देशपांडे वा. ना. – विमर्शिनी पृ. ८७
९. धनपलवार माणिक – कवी श्यामराजकृत - राजगोपालविलास' प्रस्तावना – पृ. ८-९
१०. – तत्रैव – पृ. १२, १३
११. – तत्रैव – पृ. १४, १५
१२. – तत्रैव – पृ. १५
१३. मंचरकर र. बा. – प्राचीन साहित्याचा तुलनात्मक अभ्यास-चक्रमुद्रित लेख – पृ. ११

✿ ✿ ✿

# प्रकरण तिसरे

## भक्त प्रल्हाद कथा

### प्रास्ताविक

'भक्तराज प्रल्हादकथा' ही माहात्म्यसंपन्न असून, गुणात्मकरीत्या विलक्षण प्रभावी ठरली आहे. तिची सत्त्वधारा उदात्त पातळीवरून प्रकट झाली आहे. संस्कृतीच्या उच्च स्तरावर गेलेल्या इतिहासाची ही सत्त्वधारा 'उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, तार्किक षड्दर्शने, भगवद्गीता आणि श्रीमद् भागवत यांच्या बौद्धिक व आध्यात्मिक संस्कृतीला आत्मसात करणारी ही (भक्तीची) सत्त्वधारा आहे.'[१] भक्ती आणि भक्तीचे नवविध प्रकार हे प्रत्यक्ष भक्तराज प्रल्हादाच्या मुखातूनच मूळ भागवत ग्रंथात प्रकट झाले आहेत. भागवतकार प्रल्हादमुखाने सांगतात की,–

**'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।**
**अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।। ७-५-२३ ।।**
**इति पुंसार्पिता विष्णो भक्तिश्चेन्नवलक्षणा ।**
**क्रियते भगवत्यद्धा तन्मन्येऽधीतमुत्तमम् ।। ७-५-२४ ।।'**

### प्रल्हाद कथेची सत्त्वधारा

भक्त प्रल्हाद, हिरण्यकश्यपूस आपणास नवविधाभक्ती प्राप्त झाल्याचे सांगतो. अशा ल्हादैकमयी भक्तीच्या भक्कम पायाभूत सत्त्वसंपन्नतेवरच महाराष्ट्रीय संतांची सकल भक्तिग्रंथरचना उभारली गेली आहे. भक्ती हाच भागवत भक्तिमंदिराचा पाया आहे. ही भक्तीची पायाभरणी श्रीज्ञानदेवांनी संपन्न केली. नामदेवांनी त्याच भक्तीचा सर्व दूरवर प्रसार केला. श्रीएकनाथ महाराजांनी या भक्तिमंदिरास भागवताचा खांब दिला आणि तुकोबांनी त्यावर कळस चढविला. अशा या विशाल भक्तीच्या कक्षेत प्रल्हाद कथेचे स्थान अनन्यसाधारण आहे. याच भक्तीच्या मार्गाधारे वतून ज्ञानेशांपासून सकल संतानी भक्तीचा डांगोरा पिटून, 'विश्वमोहरे' लावण्याचा प्रयत्न केला. पुढे मोरोपंताच्यापर्यंत अनेक पंडितकवींनी आपले प्रतिभापांडित्य आणि रचनाचातुर्य या भक्त कथेत ओतले आहे. सुदूर तंजावर प्रांतीच्या पंडितकवींनीदेखील प्रल्हादकथा शब्दबद्ध करण्यात आपले भक्तिभाग्य मानले आहे. यावरून सत्त्वसंपन्न प्रल्हादकथेचे जनसंवेद्य प्रेरकत्व स्पष्ट होते.

### भक्तराज प्रल्हादकथा आणि संत-परंपरा

भागवत भक्तिपरंपरेतून चालत आलेल्या प्रल्हाद कथेचा गौरवाने निर्देश करून ज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीत भक्तीचा महान आदर्श पुरुष म्हणून त्याच्या भक्तीचे श्रेष्ठत्व दाखवून दिले आहे. ज्ञानेश्वर लिहितात :

'पाहें पां भक्तीचेनि आथिलेपणें । दैत्यीं देवां आणिले उणें ।
माझे नृसिंहत्व लेणे । जयाचिये महिमे ।। ज्ञाने. ९.४५० ।।
तो प्रल्हादू गा मजसाठी । घेतां बहुतें संकटे सदा किरीटी ।
कां जें मियां द्यावे ते गोष्टी । तयाचि जोडे ।। ज्ञाने. ९.४५१ ।।
एऱ्हवी दैत्यकुळ साचोकारें । परि इंद्रही सरी न लाहे उपरे ।
म्हणौनि भक्ती गा एथ सरे । जाति अप्रमाण ।। ज्ञाने. ९.४५२ ।।

अर्थात प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण भक्तीचा महिमा सांगतात की, 'हे अर्जुना ! भक्तीच्या संपन्नतेने पापयोनीतील भक्तही माझ्या योग्यतेचे होतात. या भक्तीमुळेच प्रत्यक्ष दैत्यकुळात जन्मलेल्या प्रल्हादाने देवानाही उणेपणा आणून मागे टाकले आहे. त्या प्रल्हादाच्या भक्तीच्या मोठेपणामुळेच मला नृसिंह अवतारासारखा विचित्र अवतारदेखील अलंकाराप्रमाणे धारण करावा लागला. म्हणूनच भक्तीसाठी ज्याने अनंत संकटे सोशिली, त्या भक्त प्रल्हादाचे चरित्र जर कोणी वर्णन केले तर त्याला माझ्यापासून होणारी सर्व फलप्राप्ती होते. दैत्यकुळात जन्मूनदेखील त्याचा मोठेपणा इंद्रालाही प्राप्त झालेला नाही. म्हणजेच भक्तीपुढे इंद्रपदही तुच्छ आहे. म्हणून एक भक्तीच श्रेष्ठ असून, जातीपातीला काही किंमत नाही.' अर्थात सकल जातिभेदातीत भक्तीचे औदार्य ज्ञानेश्वरांनी विश्वकणवेने इथे मांडले आहे. भक्तीची ही विराट सत्त्वसंपन्नता प्रल्हादकथेत असून बालभक्त नामदेव हे प्रत्यक्ष प्रल्हादाचेच अवतार आहेत. प्रल्हाद अवताराची परंपरा स्वानुभूतीने मांडताना जनाबाई सांगतात की,

'ऐका हो नामयाचा जन्म मूळ संचित ।। धृ. ।।
हिरण्यकश्यपकुळी नामा प्रल्हाद । पद्मिणी नाम माझे श्रेष्ठ दासीचे पद ।।१।।
दुसरा जन्म याचा अंगद रामभक्त । मंथरा नाम माझे भरते मारिली लाथ ।।२।।
द्वापारी कृष्णसेवा उद्धव जन्मला । कुब्जा नाम माझे देवे उद्धार केला ।।३।।
कलींत नामदेव विठ्ठल चिंतनी । त्याच्या सेवेलागी जन्मली दासी जनी ।।४।।'[२]

अर्थात महाराष्ट्रातील भक्तिपरंपरेचे मूळ थेट - नारायण - ब्रह्मा - नारद - प्रल्हाद या गुरूपरंपरेने पुढे अंगद - उद्धव - नामदेव आणि त्याहीपुढे तुकाराममहाराज इ. अवतार परंपरेने प्रकटले आहे. आडरानी भरलेल्या लोकांना नवविधा भक्तीच्या नव्या वाटा उजळून दाखविण्यासाठीच, ही वैकुंठपीठातील भागवतोत्तम मंडळी अवतरली आहेत. त्यामुळे भागवत भक्तिसंप्रदायात 'प्रल्हादकथेची' जवळीक ही विशेष जिव्हाळयाची व मर्मबंधातील ठरली आहे. त्याहीपुढे विशेष म्हणजे या प्रल्हादमुखाने प्रकटलेला नवविधा भक्तीचा मंत्रश्लोक हा समस्त भारतवर्षात भक्तीच्या संदर्भात परवलीचा महामंत्र बनला आहे. म्हणजेच भक्तमहिमा, भक्तिमहिमा, भक्तीचे प्रकार, भक्तीचे आचार, भक्तीचे स्वरूप, भक्तीतील अनन्यता, एकनिष्ठता, भक्तीची परिणती, भक्तीची फलश्रुती, भक्तीचे आविष्कार इ. अनेक दृष्टीने 'भक्त प्रल्हाद कथा' ही अनन्यसाधारण महत्त्वाची ठरते. त्यामुळे केवळ हिरण्यकश्यपूच्या एका राजपुत्राची कथा, एवढेच या कथेचे महत्त्व न

राहाता समस्त अध्यात्म साधनेच्या विश्वात 'भक्ती सत्त्वसंपन्न घटना' या दृष्टीने ही कथा वेदमंत्राइतकी प्रमाणभूत, वंद्य, आदर्श व अनुकरणीय ठरली आहे.

भक्त प्रल्हादाचे अवतार उद्धव देव असून त्या उद्धवांचे अवतार नामदेव आहेत. दुसरीकडे ही प्रल्हाद – उद्धवांची भागवत कथा सांगणारे विदेही, ज्ञानी भक्त शुक महामुनी असून त्या शुकमुनींचे अवतार म्हणजे समर्थ रामदास स्वामी होत. यासंबंधी संतचरित्रकार महिपती आपल्या 'भक्तविजयात' सांगतात की,

**'आता ऐका श्रोते सज्जन । क्षीरसागरी नारायण ।**

**उद्धव शुकासी पाचारून । म्हणे अवतार घेणे मृत्युलोकी ।। ७ ।।**

**.... रामभजन करी तो शुक । उद्धव पांडुरंग उपासक ।। ... १२ ।।'**[३]

एवंच सकल संताच्या अवतारकार्याचे प्रल्हादकथेच्या अंतरंगाशी भिडलेले भावनातें भक्तिपरंपरेच्या आद्यंती रोमरोमातच भिनलेले आहे.

**प्रल्हादकथा : एक राष्ट्रीय प्रेरणास्रोत**

प्रल्हादकथा ही भक्तिसंदेशाप्रमाणे राष्ट्रीय प्रेरणेचा स्रोतही बनलेली आहे. या संदर्भात 'महाराष्ट्र' सारस्वता'त वि. ल. भावे लिहितात ते लक्षणीय आहे. ते लिहितात 'प्रल्हादाची कथा महाराष्ट्राच्या मनाला नेहमीचीच फार आवडती आहे. या कथेचे गोड अमृत महाराष्ट्र पूर्ण भक्तिप्रेमाने आपल्या कर्णद्वारातून ओतून त्याचा अभिषेक आपल्या हृदयलिंगावर आज अनेक शतके करीत आला आहे. माता वसुंधरेला 'त्राहि त्राहि' करून टाकणाऱ्या राक्षसाला मारण्यासाठी व तिच्या मुलाचे रक्षण करण्यासाठी त्या दीनवत्सल प्रभूने अचेतन स्तंभामध्येच अवतार धारण करावा, त्या अचेतनालाही चेतना आणावी व दुष्टांचा संहार करावा हा चमत्कार कोणालाही संतोष देईल. मग दुःखाने वारंवार गांजलेल्या महाराष्ट्राला त्यापासून आनंद होईल यात नवल काय ! हे गोड आख्यान एकनाथ तुकारामापासून तो आजपर्यंत दहाबारा निरनिराळया कवींनी गाइले आहे. पंतांचा यावर 'प्रल्हाद विजय' नावाचा स्वतंत्र ग्रंथ आहे हे महशूर आहे.'[४] अर्थात अन्यायाचा प्रतिकार करून भक्तीचा अंतिम विजय दाखविणाऱ्या प्रल्हाद कथेत एक आगळेच सामर्थ्य दडलेले आहे. 'मुळातच ते रसाळ आणि आल्हाददायक आहे. त्यात महाराष्ट्राच्या भक्तीला बोलका करण्याचे सामर्थ्य असावे हे स्वाभाविकच वाटते. महाराष्ट्राला प्रल्हादाशी समरस होता आले याचे दुसरे एक कारण आहे. प्रल्हादाप्रमाणेच महाराष्ट्राची छळणूक व गांजणूक झाली. महाराष्ट्राची आध्यात्मिक ठेवण व भौतिक परिस्थिती यामुळे प्रल्हाद चरित्राकडे मराठी कवी अधिकदा वळले असावेत.'[५]

अशा रीतीने आध्यात्मिक, राजकीय, सामाजिक अशा विविध पातळीवर बदलत्या विविध काळात, विविध रूपबंधातून प्रकटलेल्या प्रेरक प्रल्हाद कथांचा मागोवा घेऊन मूळ संस्कृत कथेच्या संदर्भात विवेचन मांडून, त्याचे 'स्व-रूप' सौंदर्य उलगडण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात नव्यानेच होत आहे. प्रल्हाद कथेचा शोध तमिळ प्रांतीय तंजावर

येथील सरस्वती महाल ग्रंथालयातूनदेखील घेतला असून, तेथील अप्रकाशित अशा हस्तलिखित स्वरूपातील प्रल्हादकथाही नव्यानेच उजेडात येत आहेत.

**प्रल्हादकथेची मोहिनी**

बालभक्त प्रल्हादाच्या कथेतील संघर्षमय जीवननाट्य इतके रोमहर्षक आणि रम्याद्‌भुत आहे की, आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना त्याची सदैव मोहिनी पडलेली आहे. वैकुंठलोकातील जय-विजय यांना भृगुऋषींच्या शापाने हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू नावाने दैत्यकुळात जन्मास जावे लागते. दोन जन्मातील प्रकटलेले शापग्रस्त भीषण-नाट्य एका राजवाड्यात कौटुंबिक पातळीवर पितापुत्र संघर्षाच्या लौकिक पातळीवर प्रकट होऊन पुढे देव-दैत्यांच्या पातळीवर परिवर्तित होते. त्यातील अद्‌भुत नाट्य विलक्षण वेधक असून, हिरण्यकश्यपूच्या बाजूने बुडत्याचा पाय खोलात जावा त्याप्रमाणे त्याचे उन्मत्त जीवन अधोगतीच्या धारेला लागलेले दिसते. (१) वैकुंठातील 'विजय' द्वारपाळ ऋषिशापाने दैत्ययोनीत हिरण्यकश्यपू होतो. (२) त्याचे हे अधःपतन इथेच थांबत नाही तर स्वतःच्या तपश्चर्येने सामर्थ्यवान होताच, तो उन्मत्त होऊन देवांचा द्वेष्टा बनतो. इथे त्याच्या अधःपतनाची क्रिया तीव्रतेने सुरू होते. (३) त्याही पुढे नारायणाची भक्ती करणाऱ्या आपल्या पोटच्या पुत्राच्या वधासाठीदेखील तो उद्युक्त होतो आणि नाना आघात करीत राहातो. (४) जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही. त्याप्रमाणे या आततायी दैत्यास शेवटी मृत्यूनंतरच गती प्राप्त होते.

सत्ता संघर्ष, अहंकार, अद्‌भुतरम्यता, आध्यात्मिक प्रेरकता, भक्तीची अनन्य निष्ठा, भक्तोद्धारक भगवंताचा अवतार, ब्रीदरक्षण अशा अनेक संघर्ष ताणातून प्रकटलेली प्रल्हादकथा सर्वांच्याच आवडीचा विषय बनली आहे. अद्‌भुतरम्यतेचे आकर्षण सर्वच मानवाना असते. त्या दृष्टीने विचार करता –

१. जन्ममृत्यूचे गूढ कारण दाखविणारी ही तीन जन्माची कथा ठरते.

अ – पूर्वजन्मी – वैकुंठलोकातील द्वारपाळ जय-विजय शापामुळे

ब – मृत्युलोकी हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू – पुढे

क – शिशुपाळ आणि वक्रदंत म्हणून जन्म पावतात.

मर्त्य मानवांना पुनर्जन्माचे हे गूढ रम्याद्‌भुत दर्शन आकर्षक वाटणारे असेच आहे.

२. पापपुण्य, नीती–अनीती, सारासार विवेक यासंबंधीची भीतियुक्त भावना शापनिर्देशातील दाहक प्रभावाने व उःशापाच्या समर्थ आश्वासनाने वाचकांचे लक्ष वेधून घेते.

३. प्रत्यक्ष वैकुंठलोकातील विष्णुभक्त 'विजय' दैत्यराज होतो आणि त्याच दैत्याचा पुत्र हा भक्तराज भागवतोत्तम होतो हे विरोधदर्शनाचे निसर्गगूढ विस्मित करणारे ठरते.

४. हिरण्यकश्यपूने ब्रह्मदेवापासून मिळविलेल्या वरदानातही अद्‌भुतरम्यता आहे. उदा. मृत्यू – आत नाही, बाहेर नाही, वर नाही, खाली नाही, रात्री नाही, दिवसा नाही,

शस्त्राने नाही, अस्त्राने नाही, मानवाकडून नाही, पशूकडून नाही इ. इ. हे नकारदर्शी वरदान कोड्यात टाकणारेच वाटते. ही अतर्क्य गूढ कूटात्मक वाणी, वाचक श्रोत्यांना चक्रावून टाकते. त्याहीपुढे या कूट चक्रव्यूहात्मक वाणीचा भेद करून निर्जीव स्तंभातून प्रकट होणारे उग्रभीषण असे नृसिंह दर्शन विस्मयजनक असून, दिङ्मूढ करणारे ठरते. बुद्धितर्कातीत ठरते.

५. भगवंतांच्या दशावतारापैकी सर्वात भयंकर, रम्याद्भुत अक्राळविक्राळ, विचित्र आणि भयंकर असे हे अवतारदर्शन आहे. जडस्तंभातून तेजोनिधी चैतन्य प्रत्यक्ष नारसिंहरूपाने गुरगुरत प्रकट होते ही घटनाच मुळी स्तंभित करणारी आहे.

६. या दैवी अघटित घटिताप्रमाणेच हिरण्यकश्यपूने दिलेल्या घोरातिघोर अशा महामृत्यूदंडाच्या शिक्षेतूनही प्रल्हादाचे सहीसलामत जिवंत राहाणे ही घटनादेखील त्याच दैवीपातळीवर अद्‌भुततेने जाणवत राहाते. मर्त्य मानवाला हे आवडणारे असेच असून, त्या रक्षणकर्त्या दैवीशक्तीसंबंधी नितांत भक्तिभाव दाटून यावा, हेदेखील स्वाभाविक ठरते. त्या भगवंताची परमकृपा आपणासही प्राप्त व्हावी अशी सर्वांचीच मनोमन इच्छा असते. या कृपाप्राप्तीचा उपाय म्हणून सर्वच कथाकवींनी, खुद्द प्रल्हादाप्रमाणेच 'नामस्मरणभक्ती' हे उत्तर दिले आहे.

बदलत्या काळातील युगधर्माची प्रेरकता प्रल्हादकथेतून भक्तिप्रेरणेसह प्रतिध्वनित होताना दिसते. 'आध्यात्मिक प्रेरणा व भक्तिमुक्तीचे प्रयोजन ही जणू मराठी आख्यान-कवितेची आंतरिक जीवनधारा आहे.'[६] अढळ धर्मश्रद्धेच्या जीवनप्रेरणेतून विविध काळात संतपंतादी कवींच्या अंतःकरणातून प्रकटलेली ही स्फुटकथा अभंग, ओवी, आणि वृत्तबद्ध रचना अशा विविध रूपबंधातून आपले लक्षणीय रूपसौष्ठवदेखील प्रकट करीत आली आहे. या आशयाविष्काराचे आस्वादक विवेचन प्रस्तुत प्रकरणात आपण पाहाणार आहोत.

### निर्वाचित प्रल्हादकथा संच

१ : **मूळभागवत – संस्कृत मधील कथा**
२ : **नामदेवकृत – प्रल्हाद चरित्र कथा**
३ : **एकनाथकृत – प्रल्हाद चरित्र कथा.**
४ : **वामनपंडितकृत – नृसिंहावतार**
५ : **आनंदतनयकृत – प्रल्हाद चरित्र - तंजावर प्रत हस्तलिखित, अप्रकाशित.**
६ : **गुरूदासकृत – प्रल्हादचेरित्र – तंजावर प्रत, हस्तलिखित, अप्रकाशित.**
७ : **रामनाथकृत – प्रल्हाद चरित्र – तंजावर प्रत, हस्तलिखित, अप्रकाशित.**

### मूळ भागवती कथा

मूळ प्रल्हाद कथा ही व्यासोक्त भागवत पुराणात सप्तमस्कंधात अध्याय १ ते १० मध्ये समाविष्ट झालेली आहे. त्यात भगवान श्रीनारसिंह अवताराचे वर्णन आले

असून भगवंताच्या कृपानुग्रहास पात्र होण्यासाठी वर्णाश्रमधर्माचे परिपालन कसे करावे हे सांगितले आहे. परमात्मा विषमभावनेने कधीही वागत नाही. हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू यांचा वधही सनत्कुमारऋषींच्या शापामुळे, ही दैत्ययोनी प्राप्त झालेल्या पूर्वजन्मीच्या द्वारपाळावर अनुग्रह करण्याकरताच केला आहे, हे सांगण्यासाठी पूर्ववृत्तांत सांगितला गेला आहे. पुढे त्या दोघा दैत्यांचे प्रजापीडन, प्रल्हादाचा जन्म, त्याचे बालपण, शिक्षण इ. कथाभाग पाचव्या अध्यायापर्यंत येऊन 'प्रल्हादवधार्थं हिरण्यकशिपोः प्रयत्नः ।' म्हणजे प्रल्हादवधाचे विविध उपाय पाचव्या अध्यायात मांडले आहेत. पण या देहदंडाने विचलित न होता, प्रल्हाद आपली अनन्यभक्ती अधिक **दृढतेने प्रकट करतो. उलट इतर दैत्यबालकांनादेखील तो उपदेश करू लागतो.** 'दैत्यबालेभ्य : प्रल्हादस्य उपदेशः ।' इ. कथा सहाव्या अध्यायात मांडून सातव्यात **देवर्षी नारदमुनींचा कृपानुग्रह प्रल्हादास गर्भात** असतानाच लाभल्याचे सांगितले आहे. प्रल्हादाची वाढती भक्ती पाहून त्याचा वध करण्यासाठी हिरण्यकश्यपू धावून येतो **तेव्हा स्तंभातून उग्र नरसिंहअवतार प्रकट होतो आणि हिरण्यकश्यपूचा वध केला** जातो.

आठव्या अध्यायात ब्रह्मादिसकळ देव नृसिंहप्रभूंचे स्तवन करतात.

**'प्रल्हादवधोद्यमः स्तम्भानृसिंहावतारः हिरण्यकशिपोर्वधः**
**ब्रह्मादिदेवकर्तृकं भगवत्सत्वनं च ।। अ. ८ ।।'**

पुढे ९ व्या अध्यायात 'प्रल्हादकृत भगवत स्तुति : ।' आली आहे.

१० व्या अध्यायात प्रल्हादास राज्याभिषेक होतो.

**'प्रल्हादस्य वरप्रदानं तस्य राज्ये अभिषेक : ।। अ. १० ।।'**

### १) प्रयोजन विचार

मध्ययुगीन मराठी कविता ही भागवत धर्माच्या अनुषंगाने नामसंकीर्तन भक्तीची प्रेरणा घेऊन लिहिली गेली आहे. धर्म, नीती, सदाचार, भक्ती यांच्या पुरस्काराबरोबरच सात्विक लोकरंजन या प्रयोजनाशी संबद्ध अशी स्फुटकथात्मक कविता निर्माण झाली. 'आतुरतेने हरिकथा ऐकणाऱ्या आणि तिच्या श्रवणचिंतनात, नामरंगात दंग होणाऱ्या भागवतासाठीच तिची निर्मिती झाली. प्रभुलीलानुवादाची आणि गुण, कर्म, नाम संकीर्तनाची प्रबळ प्रेरणा तिच्यामागे आहे. आत्मोद्धाराची वाट चालताचालता लोकोद्धार साधावा असा धिंवसा तिने मनी बाळगला होता. प्रापंचिकाना नैतिक सदाचाराचा उपदेश करावा आणि मुमुक्षूंना परमार्थी अधिक समर्थ करावे हेच तिचे प्रयोजन होते.'[७]

**(अ) मूळ भागवत-प्रयोजन – 'सत्यंविधातुंनिजभृत्यभाषितम् ।।' –**

भागवताच्या सप्तमस्कंधात आलेल्या प्रल्हाद कथेचे प्रयोजन विश्वतोभद्र लोकमंगलकारी असेच आहे. भागवत माहात्म्यात पुढील उल्लेख स्पष्ट आला आहे.

१. श्रोतृणां मोक्षसूचका : । भा. म. अ. ६-३ ।।

२. मुक्त्यर्थं भवसागरे । — ,, — ६.३० ।।

३. अत्युत्तमा कथा दिव्या कोटियज्ञ फलप्रदा ।। ६.५३ ।।

४. सर्व पाप निवारणे ।। ६-६७ ।।

५. सर्व पापहरा पुण्यां भुक्तिमुक्ति प्रदायिनीम् ।। ६.७० ।।

६. वरील प्रयोजनाबरोबरच पुरूषार्थसिद्धी हे मुख्य प्रयोजनही भागवतकार आवर्जून सांगतात.

'फलदं स्यात् पुराणं तु श्रीमद्‌भागवतं शुभम् ।
धर्म कामार्थ मोक्षाणां साधनं स्यान्नसंशयः ।। ६.६८ ।।'

भागवताचे हे प्रयोजन प्रल्हाद कथेत तात्पर्यार्थी प्रात्यक्षिकासह समूर्त होते. प्रत्यक्ष नारदमुनी सांगतात की, –

'कामाद् द्वेषाद् भयात् स्नेहाद् यथा भक्तेश्वरे मनः ।
आवश्य तदघं हित्वा बहवस्तगतिं गताः ।। ७-१-२९ ।।'

अर्थात द्वेषमूलक विरोधभक्ती घडलेल्या हिरण्यकश्यपूसदेखील गती प्राप्त झालेली इथे दिसून येते. म्हणून कोणत्याही कारणाने 'श्रीकृष्णरती' जडणे महत्त्वाचे आहे. 'तस्मात्कानाप्युपायेन मनः कृष्णं विवेशयेत ।' ७-१-३१ ।।' असे या कथेचे सांगणे आहे.

७. 'भक्तवचन सत्य करणे' – हे भगवंताचे ब्रीद आहे याची सत्यता या कथेतून स्पष्ट होते.

'सत्यं विधातुं निजभृत्य भाषितम् ।। ७-८-१८ ।।

अर्थात भक्तवचन सत्य करताना – 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।' या भगवद्‌वतार प्रयोजनाप्रमाणेच भगवंत वागतात. हिरण्यकश्यपूसारख्या महादैत्याने त्राहिभगवान केल्यानेच भागवतकार लिहितात –

'यदा देवेषु वेदेषु गोषु विप्रेषु साधुषु ।
धर्मे मयि च विद्वेषः स वा आशु विनश्यति ।। ७-४-२७ ।।
निर्वैराय प्रशान्ताय स्वसुताय महात्मने ।
प्रल्हादाय यदा द्रुह्येद्धनिष्येऽपि वरोर्जितम् ।। ७-४-२८ ।।'

एवंच, प्रल्हादकथेचे प्रयोजन शाश्वत जीवनमूल्यच प्रतिष्ठित करीत असलेले दिसते.

२) नामदेव-प्रयोजन -'।। नामा म्हणे भक्त निर्भय सर्वांसी ।।'

मूळ भागवती कथेचे मराठी अवतार प्रकट होत असताना युगधर्माच्या प्रभावाने प्रयोजनविचार मुळास धक्का न लावता, कालसापेक्षतेने थोडेफार फिरवून घेतलेले दिसतात नामदेव हे परंपरेने भक्त प्रल्हादाचेच अवतार मानले गेले आहेत. त्यांनी

मुळाप्रमाणेच ठोस प्रयोजन मांडले आहे ते म्हणतात –

**'तयासी छळिता पावेल शासन । हाचि भरवसेन नेम आहे ।। २२५८.१२ ।।'**

**'नामा म्हणे भक्त निर्भय सर्वासी । काय हो तयासी उपेक्षी हरी ।।**

**२२६०.२९ ।।'**

**नामयाचा स्वामी वरदहस्ता । अभयदाता भक्तासी ।। २२६३.७ ।।'**

अर्थात नामदेवांनी उत्तर भारत यात्रेच्या वेळी पाहिलेल्या, अनुभवलेल्या परचक्रभयांकित यावनी, सुलतानी आक्रमणाच्या व धर्मग्लानीच्या काळात भक्तीचे सामर्थ्य दाखवून पूर्ण निभर्यतेचे आश्वासन देण्यासाठी वरदहस्त, अभयदाता, भक्तत्राता अशा भगवतांचा दिलासा देऊन 'भक्त निर्भय सर्वासी' असे अकुतोभय वृत्तीचे दर्शन घडविले आहे. अल्लाउद्दिनासारखे क्रूर सुलतान हिरण्यकश्यपूप्रमाणेच 'देवेषु वेदेषु गोषु विप्रेषु साधुषु' विद्वेष करीत असताना राष्ट्रविप्लवाच्या काळात प्रल्हादकथेची प्रेरणा जागवीत 'भक्त निर्भय सर्वासी' असे प्रबळ प्रयोजन नामदेव मांडताना दिसतात. प्रत्यक्ष प्रल्हादावतारी नामदेवांनी हे प्रयोजन मांडावे यातच या कथेचे समर्थ वर्म प्रकट होते. मुळातील 'सत्यं विधातुं ।' या प्रयोजनाचा आशयदेखील 'भक्ताच्या वचना कोरडिया काष्ठी । सत्य करी गोष्टी नारायण ।।' २२६१.८ ।। अशा शब्दात त्यांनी मांडला आहे.

३) **एकनाथ - प्रयोजन** – 'एका जनार्दनी रक्षी नारायण

नामदेवांच्या काळापेक्षाही एकनाथांचा काळ हा अधिक भीषण आणि महाभयंकर असा आहे. अशा यवनसत्तांकित, पराभूत मनोवृत्तीच्या भयग्रस्त काळात व्यामोहित झालेल्या समाजापुढे नाभिकाराचे आश्वासन देत नाथांची प्रल्हाद कथा पुढे येते. मूळकथेचे सूत्र पकडून नाथ सांगतात–

**'एका जनार्दनी रक्षी नारायण । कोण करी विघ्न तयालागी ।। ३४२५-३ ।।**

**एका जनार्दनी भक्ताचे रक्षण । स्वये नारायण करीतसे ।। ३४२८-३ ।।'**

अर्थात नाथांचा काळ हा 'तितीक्षेचा' म्हणजे केवळ सहनशीलतेचा काळ आहे. नाथांनी प्रतिकारापेक्षा विराट तितीक्षेने वरील प्रयोजन प्रत्यक्षच दाखवून दिले आहे. त्यामुळे 'नारायण रक्षी' या त्यांच्या प्रयोजन वचनास अनुभवसिद्ध ठोसपणा आला आहे. नाथांच्या या देवशरण मनोवृत्तीत अगतिक भित्रेपणा नसून, नाथांच्या कर्त्या निजनिष्ठेची धार आहे. अंतर्बाह्य अशा सत्त्वपरीक्षेच्या काळात नाथ वावरत असल्याने समोर प्रत्यःही नष्टभ्रष्ट होणाऱ्या व उद्ध्वस्त होणाऱ्या मठमंदिरातील श्रद्धामूर्तींच्या ठिकाणी अढळ भक्ती आणि प्रगाढ निष्ठा जागवून ठेवणे त्यांना नितांत जरुरीचे वाटते.

भक्तांच्या अनन्य निष्ठेबरोबरच भगवंताचे भक्तवचन पूर्ण करण्याचे 'सत्यं विधातुं ।' ब्रीद असल्याचेही ते ठामपणे सांगतात. नाथ लिहितात–

**'भक्त वचनाचे मान । एका जनार्दनी सत्य जाण ।। ३४२९.३ ।।'**

अशा रीतीने मूळ प्रयोजन वचनास कृतीची जोड देऊन स्वकालोचित 'नामस्मरण भक्तीचे' प्रयोजन नाथांनी ठासून मांडले आहे. त्यांच्या मते एका नामस्मरणाखेरीज अवांतर बडबड ही केवळ कटकट असून, एका नामानेच वैकुंठपीठ प्राप्त होते. नाथ लिहितात –

**'शब्द कटकट । साधनी कष्ट फुकट ।**

**एका जनार्दनी । नामे वैकुंठपीठ रे ।। ३४३०.५ ।।'**

४. **वामनपंडित-प्रयोजन** – 'हे चरित लोक तराया ।।'

नाथांच्या काळातील हताश पारतंत्र्यानंतर स्वराज्याच्या वीरयुगाचे पडसाद घेऊन पंडिती कथा अवतरल्या आहेत. या काळात वामन पंडितांनी 'भक्तही तराया' या प्रयोजनासाठी हे भक्तचरित मांडले आहे. ते लिहितात –

**'तरे त्याचे पायी जन भवनदी पार उतरे ।। १४६ ।।'**

**'हे चरित लोक तराया ठेविले भवनदी उतराया ।। १५१ ।।'**

अर्थात भवपार होण्यासाठी भक्तीचा आदर्श ठेवून, ही भवभंजनाची कथा प्रकटते. केवळ भाषाप्रभुत्व आणि वृत्तरचनेची करामत दाखविणे हे वामन पंडिताचे कथाप्रयोजन नसून, त्यांच्या पांडित्याचा तो सहजाविष्कारच आहे. ते स्वतः साक्षात्कारी संत कोटीतील एक पंडित कवी असल्याने 'हे चरित लोक तराया ।' हे त्यांचे प्रयोजन लोकोद्धारी तळमळीतूनच प्रकटले आहे. वामन पंडित हे 'अनुग्रहित (साक्षात्कारी) पंडित कवी आहेत. त्यामुळे ते पांडित्याचे पुरस्कर्ते आहेत. त्यांना पांडित्याचा अहंकार नसला, तरी पांडित्याची जाणीव आहे.'[८] परंतु त्या प्रकांड पांडित्याच्या प्रस्तराखाली प्रवाहित झालेली अंतःसलिला ज्ञानप्रवाहिनी वाणी 'लोक तराया,' 'भवनदी उतराया' असे प्रयोजनच प्रकट करीत असलेली दिसते.

स्वतः वामनपंडित स्पष्टपणे सांगतात, कीं 'भुक्ति मुक्ति अशि दाखवीं भक्ता ।। १५२ ।।' अर्थात भवनदी तरून जाण्यासाठी भक्तिज्ञानाचा पुण्यादर्श दाखवून देण्यासाठी 'यात ये रितिच पुण्य वदावे । १५६ ।।' असे प्रयोजन ते सांगतात. त्यांच्या मते – हरीवीण कविता ही 'अलवण' असून व्यर्थ आहे. ते सांगतात की –

**'विता व्यर्थ काव्यें अलवण हरिवीण कविता ।। ३७ ।।'**

वामन पंडिताचा हा काव्यविषयक दृष्टिकोणही प्रयोजनसापेक्ष असाच आहे.

५) **आनंदतनय** – 'त्यांच्या होतिल आंखिल्या निशिदिनी गौरी रमा शारदा ।।'

पंडिती काळातील तंजावर येथील आनंदतनयाने भक्तीचे सूत्र धरूनही लौकिक जीवनाच्या जाणिवेने आपल्या कथेचे प्रयोजन मांडलेले दिसते. तो लिहितो –

**'हे जे यैकति आदरे नृपवरा गाथा दया वारिदा ।**

**त्याच्या होतिल आंखील्या निशिदिनी गौरी रमा शारदा ।।१।।'**

अर्थात प्रल्हाद कथेच्या सादर श्रवणाने लक्ष्मी, पार्वती आणि सरस्वती या

अंकित (अंकिल्या) होऊन राहतात. पर्यायाने हरिहर ब्रह्मादिक देवही अंकिले होतात असे संसूचन करून शक्ती - धनसंपत्ती - आणि विद्या प्राप्त करून देणारी ही कथा पापहारी आहे असे प्रयोजन आनंदतनय मांडतो. त्याचे हे प्रयोजन संतकाळापेक्षा वेगळेपण प्रकट करते. भक्त - भक्ती यापेक्षाही इथे ऐहिक ऐश्वर्याच्या संपन्नतेवर अधिक भर दिलेला जाणवतो. स्वराज्याच्या सुखस्वास्थ्याच्या दरबारी काळात लौकिक जीवनासक्ती या बदलत्या प्रयोजनातून डोकावताना दिसते. 'आनंदतनय हा शहाजीचा गुरू होता असे ज. बा. मोडक व वा. दा. ओक यांनी म्हटले आहे.'[९] भारतीय संस्कृतिकोशातदेखील वि. का. राजवाडे, काव्यसंग्रहकर्ते जोग यांचा निर्वाळा देऊन आनंदतनय हा 'मुरारपरब्रह्म या साधूचा शिष्य व शहाजीचा गुरू होय.'[१०] असे लिहिले आहे. यावरून या राजगुरूने शहाजी राजांच्या दरबारात, समस्त शूर सरदारापुढे प्रल्हादकथा श्रवणाचे प्रयोजन शक्ति, बुद्धी, धनसमृद्धीच्या रूपात मांडावे हे सुसंगत आणि कालसापेक्ष असेच दिसते.

६) **गुरूदास** - परिहरते पापा - आस हे तव दास्य दे ॥

गुरूदास या तंजावरकडील कवीने कडाका छंदातून रचलेल्या प्रल्हाद कथेत या कथा श्रवणाने कलियुगात पापाचा परिहार होतो असे प्रयोजन प्रारंभीच स्पष्ट केले आहे.

**'परियसा परम पवित्रा प्रल्हादजींची लिला ।**
**परिहरते पापा कालिला ।। धृ. ।।** कडवे १॥

अर्थात भक्तलीला ही देखील भगवंताइतकीच श्रेष्ठ व पवित्र आहे. अशा भक्तकथेच्या श्रवणानेदेखील इहपर कल्याण होऊन भगवंताचे 'दास्य' ही सातवी भक्ती करण्याची इच्छा उत्पन्न होते. या प्रयोजनानुसार कथेच्या शेवटी प्रल्हादाचे मागणेदेखील 'आस हे तव दास्य दे' अशा शब्दात प्रकटले आहे. या दास्यभक्तीला 'तथास्तु' म्हणून भगवंताचे वरदानही लाभलेले दिसते. एवढेच नव्हे तर, परम भागवतोत्तम प्रल्हादास भक्ताग्रणी म्हणून प्रथम स्थान देतात. गुरुदास लिहितो -

**'वासुदेव म्हणे वर दिधला ।**
**वर तूं भक्तराज मज पाह्लिा ।।'**

७) **रामनाथ** - निजरसना हे पवित्र हो म्हणुनी ॥

तंजावर येथील रामनाथ या पंडित कवीने प्रयोजन सांगताना प्रारंभीच म्हटले आहे की

**'निजरसना हे पवित्र हो म्हणुनी ।**
**प्राकृत भाषा जाते रचितो प्रल्हाद सच्चरित्राते ।।१।।'**

कथेच्या शेवटीदेखील प्रयोजन सांगतो की –

**'प्रल्हाद सच्चारित पै रचिले शुभार्थे ।।४९।।'**

अर्थात वाणी शुभसंकल्पयुक्त होऊन, निजरसना पवित्र व्हावी या प्रयोजनाबरोबरच पुण्यप्राप्ती, शुभार्थे इ. शब्दप्रयोगही त्याने केले आहेत. या कथागुणसंकीर्तनातून परमानंद लाभल्याचे तो सांगतो. संतवाणीचे पडसाद त्याच्या या सच्चरित्रात दिसून येतात.

अशा रीतीने भगवद् भक्तिवर्धनाचे 'सत्त्वसामर्थ्य' घेऊन प्रकटलेली मूळ भागवती कथा 'सत्यंविधातुं' अशा दैवी प्रयोजनातून वाटचाल करीत नामदेव, एकनाथांच्या भक्तिकाळात 'अभयदाता भक्तासी' अशा शब्दात प्रेरक प्रयोजन जागवीत दिलासा देत आली आहे. पुढे पंडिती काळात लौकिक समृद्धीचा निर्देश लक्षणीय ठरतो. म्हणजे मूळ अलौकिक भक्ति साक्षात्कारसंपन्नतेकडून लौकिक साधनसंपत्तीकडे प्रयोजन विचार कालसापेक्षतेने झुकलेला दिसतो. तरीदेखील मूळ सूत्राचे भान जागृत असलेले दिसते.

## २) कथाबांधणी 'स्व'-रूप दर्शन

मध्ययुगीन मराठी कवींनी भगवंताविषयी भक्तिप्रेमभाव प्रकट करताना मूलस्त्रोत ग्रंथातून पौराणिक भक्तकथा निवडून कीर्तनशैलीने समरसून मांडल्या आहेत. भक्ति प्रेरणेने भक्तिसंस्कारासाठी या कथा कवींनी, प्रेरकसूत्र समोर ठेवून, निर्वाचित आख्यानवस्तूची नवनिर्मिती साधताना काही फेरबदल करून, आपल्या देशी स्फुट कथांना डौलदार रूप दिले आहे. त्यामुळे युगसापेक्ष कथामांडणीत प्रयोजन लक्ष्यकेंद्रेही फिरवून घेतलेली दिसतात. मुळात प्रल्हादकथा ही 'सत्यं विधातुं निजभृत्यभाषितम्' या प्रयोजनाशी संबद्ध असताना नामदेवांच्या कथेत भक्तिनिवेदन, नाथांच्या कथेत समाजशिक्षण, वामनपंडिताच्या कथेत विदग्धतेतून लोकाध्दाराचा विचार, गुरुदासाच्या कथेत पापहरण, रामनाथाच्या कथेत 'निजरसना हे पावन हो ।' अशी लक्षकेंद्री प्रयोजने स्वतंत्रपणे बदललेली दिसतात. त्यामुळे या प्रयोजनानुषंगाने ते रचनेतही स्वातंत्र्य घेतात. मूळ कृतीची कृतज्ञता, मौखिक परंपरेचा धागा, लोकघटितांचा संदर्भ आणि नवनिर्मितीची उर्मी या सर्वातून ते स्वतंत्र कलावस्तू उभी करू पाहातात. किंबहुना, 'आपल्या भक्तिहेतूने सारी आख्यानवस्तू भारून टाकण्यासाठी मुळाचा नाममात्र आधार घेऊन ते रचनास्वातंत्र्याची कास धरताना दिसतात.'[११] त्यामुळे मूलस्त्रोत ग्रंथापेक्षाही या सर्जनशील कवींच्या कथानिर्मितीचे स्वरूप स्वतंत्र कलाकृती म्हणून नजरेत भरते. 'हे कवी मुळातील ओझरत्या किंवा संक्षिप्त निर्देशाचा आपल्या कल्पनेनुसार विस्तार करतात. त्यामुळे रसिकाला कधी चित्रमय वर्णने वाचावयास मिळतात, कधी एखादा नवीनच प्रसंग पाहावयास मिळतो. तर कधी खटकेबाज संवादाचा आनंद लुटावयास मिळतो. अशा प्रकारे ही परिवर्तने हृदयंगम ठरतात.'[१२]

या आख्यान काव्यात युगधर्मानुसार रंगभरणी झाली आहे कारण 'या कवींची भूमिका परपुष्ट भाषांतरकाराची नसून, पारंपरिक कथावस्तूला काल आणि कला यांनी संस्कारित करणाऱ्या पुनर्निर्माणक कलावंताची आहे.'[१३] मात्र कथा-

बांधणीतील हे बदलते रूपबंध कविप्रकृतीनुसार विविध पातळीवर प्रकट झालेले दिसतात.

**कथाबांधणीतील रचना-स्वातंत्र्य**

मध्ययुगीन मराठी कवींची ही आख्यान कविता म्हणजे भाषांतर स्वैर अनुवाद, किंवा सारांशकथन नाही. कवीच्या व्यक्तिमत्त्वातून प्रकटलेले ते एक स्वयंपूर्ण असे कलारसायन आहे. किंबहुना, मूळ भक्तिसंजीवनीच्या या सुवर्णगुटिका आहेत. महाराष्ट्र सारस्वताची ही सुंदर लघुलेणी आहेत. मुळातील कथा ते यथामूळ सांगत न बसता, आपल्या कथेच्या लघुअवकाशात मूळ दीर्घ कथेचा आशय सामावून घेऊन छोटेमोठे फेरबदलही करून घेताना दिसतात. ही त्या कथेच्या प्रवाही जिवंतपणाची साक्षच म्हणता येईल. केवळ अभंग, ओवी इ. वृत्तबदलाने कथा स्वतंत्र किंवा सजीव बनत नसते. तर कवीच्या प्रातिभ जाणिवेतून ती आकार घेत असते. त्यांच्या या रचनास्वातंत्र्यातून प्रकटलेले बदल लक्षणीय असून, त्यामुळे मूळ कथेची रंगतदेखील प्रभावी ठरलेली आपणास दिसून येते. हे बदल निर्वाचित कथासंचातून यथाक्रम आपण पाहू -

**१) नामदेव**

नामदेवांच्या कथाबांधणीत मुळातील संघर्षक्षणाबरोबरच स्वतंत्रपणे प्रकटलेली काही क्षणचित्रे लक्षणीय आणि वेधक अशीच ठरली आहेत. उदा.

(अ) प्रल्हादास हत्तीच्या पायी देताना 'पाहे तो समोर विक्राळ सिंह ॥ २२६०.६ ॥' असे स्वतंत्रपणे नामदेव सांगतात तेव्हा या सिंहदर्शनात पुढील नृसिंह अवताराचे संसूचन सहजी घडते. तसेच हत्तीचा पराभव आणि सिंहाचा विजय ही आशाही अंकुरते.

(ब) हिरण्यकश्यपूने प्रल्हादास तुझा देव 'कोठे राहातो, कैसा कोण सांग ॥ २२६१.२.॥' असे विचारताच प्रल्हाद सांगतो -

**'जळी काष्ठी आहे माझे अंतरंग । सखा पांडुरंग मायबाप ॥ २२६१.४ ॥'**

इथे प्रल्हादाचे हे उत्तर खास महाराष्ट्रीय वारकऱ्याचेच असून, त्यातही ते पंढरीच्या भक्त प्रल्हादाचेच (नामदेवांचे) आहे. नामदेव हे परंपरेने प्रल्हादावतार असून, तेही बालभक्त आहेत. पांडुरंगाचे प्रेमभांडारी असलेले भक्तराज नामदेव हे भक्तराज प्रल्हादाशी इतके एकरूप आहेत की, हा पंढरीचा प्रल्हाद हिरण्यकश्यपूला 'सखा पांडुरंग मायबाप ।' सर्वत्र भरला आहे असे बेधडकपणे सांगताना दिसतो. हे समान पातळीवरील आत्मसाक्षात्काराचे, चैतन्याचे हुंकार नामदेवांच्या मुखातून सहजी प्रकटलेले पाहाता ते प्रल्हादाचे अवतार आहेत याची साक्ष अन्यत्र धांडोळीत बसण्याचे कारणच उरत नाही. मुळापेक्षाही स्वतंत्रपणे प्रकटलेले हे **स्वसंवेद्य** हुंकार मराठी कथेचे स्वतंत्र आणि स्वयंभू तेज प्रकट करताना दिसतात. म्हणजेच-

**'प्रल्हादाची कथा स्वये आपण । सांगे दुजा कोण नामदेव ॥'**

असेच अभेद स्वरूप इथे जाणवते. प्रल्हादकथेस इथे हा खास महाराष्ट्रीय पंढरीस्पर्श झाला आहे. त्याही पुढे-

(क) नामदेव आपल्या प्रल्हादकथेत प्रल्हादमुखाने नृसिंहरूपाचे वर्णन करतात. हे प्रभुवर्णन म्हणजे या पंढरीच्या प्रल्हादाने केलेले पांडुरंगाचेच 'सुंदर ते ध्यान' होय. मुळापेक्षा हे रूपवर्णन वेगळे आणि स्वतंत्र आहे. नामदेव लिहितात -

**'केशरचंदन लावियेले अंगा । अखंड श्रीरंगा देवाजीचे ।। २२६२.४ ।।**

**नवनीत तुळशीची सुंगधित फुले । माळा गुंफियेले चंपकाने ।। २२६२.५ ।।**

**कासे पीतांबर जडित सुंदर । कडदोरा अपार शोभिवंत ।। २२६३.६ ।।'**

यातील सर्वच वर्णन पंढरीच्या पांडुरंगाचे दिसते. 'नवनीत'; तुळशीची फुले, माळा, कडदोरा इ. शब्द फारच बोलके आणि सूचक आहेत.

(ड) नामदेवांच्या प्रल्हादकथेत मुळापेक्षाही आणखी एक स्वतंत्र निर्देश आलेला दिसतो. तो म्हणजे नृसिंह अवताराच्या कालोल्लेखाचा. हा काळवेळेचा उल्लेख प्रस्तुत कथेच्या संचात कोणाच्याही कथेत आलेला नाही. नामदेव लिहितात -

**'अवतारा वेळा वैशाखमासी । चतुर्दशी संधीशी अर्धबिंबी ।**

**दिवारात्री जाणा स्वाती नक्षत्रासी । प्रकटला ज्योतिसी दैत्यहर्ता ।।**

**२२६१.१८ ।।'**

अर्थात इतका हा सूक्ष्म निर्देश नामदेवांनी केला असून,वैशाख चतुर्दशीस - नृसिंहजयंतीची परंपरा प्राचीनच आहे. पण तिथी - नक्षत्र, मास इ. उल्लेख - अन्य कोणाच्याही कथेत न येता,प्रल्हादावतारी नामदेवांच्याच कथेत यावा यातील साक्षीभूत औचित्य काही आगळे आणि हृद्य असेच आहे. एकंदरीत नामदेवांच्या प्रल्हाद,कथेतील हे स्वयंभू स्वतंत्रपण खास लक्षणीय असेच आहे.

२) एकनाथ

नामदेवांच्या कथेपेक्षा आकाराने छोटेखानी असलेल्या नाथांच्या प्रल्हादकथेत 'कठिणकाळ युगधर्म' असलेल्या सुलतानी अत्याचाराचे गडद प्रतिबिंब पडलेले दिसते. या काळात सुलतानी सत्ता पक्की रूजली गेली होती. हिंदू धर्म, संस्कृती, संस्कृत भाषा, वाङ्मय साऱ्याचे महत्त्व कमी झाले होते. चातुर्वर्ण्याची चौकट खिळखिळी झाली होती. नाथ वर्णन करतात की—

**'गायी ब्राह्मणासी जाण । पीडा करिती दारूण ।**

**क्षेत्रवित्त दारापहरण । स्वार्थे प्राण घेताती ।** नाथ भागवत १०.५८८ ।।'

अर्थात अल्लाउद्दिनाच्या क्रूर स्वारीनंतर शंभर वर्षांच्या कालखंडात निरपराध हिंदूची कत्तल, सक्तीचे धर्मांतर, स्त्रियांवरील अत्याचार, मठमंदिरे आणि शेकडो मूर्तींचा विध्वंस, छळाबळाने चाललेल्या आसुरी अत्याचारानं हिंदू प्रजेला संत्रस्त करणाऱ्या सुलतानांच्या रूपात शेकडो हिरण्यकश्यपूंची झुंडच्या झुंड दंडकारण्यातील दैत्याप्रमाणे स्वैरसंचार करीत होती. नाथांच्यादेखत त्यांच्या कुलस्वामिनीचे - रेणुकेचे भव्य मंदीर- भुईसपाट झाले

विभाग
बा. क्र. ३८६५
२६६२३
८।६।८२
शाखा (स्थळ प्रत)

होते. ज्ञानेश्वर ते तुकाराम यांच्या मध्यावर- पारतंत्र्याच्या ऐन मध्यावर काळरात्रीत प्रकाश दाखवीत नाथांची प्रल्हाद कथा 'एकाजनार्दनी रक्षी नारायण ।' असे नाभिकाराचे आश्वासन देत प्रकट झाली आहे. त्या युगधर्माची स्पंदने नाथांच्या छोटेखानी 'अभंग' कथेत नव्याने स्वतंत्रपणे प्रकट झालेली दिसतात. हे नवे संदर्भ विलक्षण भेदक आणि विदारक आहेत. त्यात प्रकर्षाने जाणवणारी व नजरेत भरणारी पहिली गोष्ट म्हणजे दुर्जन दैत्याने खांबावर लाथ मारण्याची.

**(अ) शांतिब्रह्माचा सात्विक संताप**

क्रोधसंतप्त झालेल्या हिरण्यकश्यपूची सारासार विवेकशक्ती नष्ट होऊन तो समोरील खांबावर लाथ मारतो. नाथ लिहितात—

**'दुर्जन तो लाथ मारी खांबावरी ।।' ३४२८.१ ।।**

इथे मूळ भागवतात नसलेला किंवा नामदेवांच्या कथेतही न आलेला, दुष्ट दुर्जनाच्या या कृतीचा उल्लेख नाथांच्या कथेत अगदी स्वतंत्रपणे आला आहे. या वास्तवपूर्ण निर्देशाला फार मोठा अर्थ आहे. सर्वांचे सर्व काही सहन करणाऱ्या शांतिब्रह्म नाथांनी प्रत्यक्ष भागवताच्या दैवतास दैत्याने लाथ मारण्याचा प्रकार नव्याने मांडावा यातच तत्कालीन गांजलेल्या दुर्दिनाचे, लांचार सामाजिक दर्शन घडते, तर दुसरीकडे उन्मत्त राजसत्तेचे मस्तवाल वागणेही दिसून येते. सामाजिक अधःपतनाचे विदारक दुःख जाणून, अस्वस्थ झालेल्या शांतिब्रह्माचा सात्त्विक संताप आणि प्रतिकाराची प्रखर उर्मीच 'दुर्जन तो लाथ मारी ।' या शब्दातून बाहेर पडली आहे.

**(ब) हिरण्यकश्यपूचे वेगळे दर्शन**

नाथांच्या प्रल्हादकथेत हिरण्यकश्यपूचे चित्र मुळापेक्षा स्वतंत्रपणे अधिक मानवी पातळीवर बदलून प्रकटलेले दिसते. मूळ भागवतात हिरण्यकश्यपू पुत्र प्रल्हादास विद्याध्ययनासाठी गुरूगृही पाठवितो. पण इथे हिरण्यकश्यू त्यास एकांतात बोलावून स्वतःच विद्याभ्यास शिकविताना दिसतो. नाथ लिहितात—

**'बोलावुनी एकांतासी । सांगे विद्याभ्यासासी ।। ३४१७.१ ।।'**

इथे नाथांनी कथाबंध फिरवून घेतलेला दिसतो. कथेतील हा स्वतंत्र बदल हिरण्यकश्यपूच्या दक्षतेवर मुळापेक्षाही अधिक प्रकाश पाडणारा आहे. गुरूच्या अध्यापनाविषयी संशयी बनून, स्वतःच पढवू जाणारा हा संशयात्मा अधिक जागरूक असलेला दिसतो.

**(क) पितृसुलभत्व**

मुळातील उन्मत्त अहंकारी दैत्य हिरण्यकश्यपू, नाथांच्या कथेत सर्वसामान्य पित्याप्रमाणे मुलगा आपले ऐकत नाही असे पाहून आपल्या पत्नीजवळ -

'यासी आता काय करावे ।। ३४२१.३ ।।' अशी तक्रार करताना दिसतो. त्यामुळे इंद्रादि देवादिकांनाही धाक घालणारा देवद्वेष्टा हिरण्यकश्यपू पुत्राच्या संदर्भात खूपच

सौम्य आणि मानवी पातळीवरून प्रकटलेला दिसतो. हे परिवर्तन देशकालमान प्रकृति ही असू शकेल.

(ड) **वत्सलमाता कयाधू**

प्रल्हाद वडिलांचे ऐकत नाही असे पाहून, माता कयाधू त्याची समजूत काढते. हा कथाभागही नाथांनी स्वतंत्रपणे नव्याने रूपबद्ध केला आहे. कयाधू म्हणते –

**'माता म्हणे प्रल्हादासी । वडिले शिकविले नायकशी ।। ३४२२ ।।'**

इथेही 'वडिलांचे ऐकावे बरं का बाळा !' असे म्हणणाऱ्या सर्वनसामान्य वत्सल मातेचे आपणास दर्शन घडते. नाथांच्या सौम्य, शांत प्रकृतीतून प्रकटलेले हे नवे भावबंध.

३) **वामनपंडित**

(अ) **द्वैत अद्वैत विचार**

वेदांतशास्त्रनिपुण ज्ञानी वामन पंडितानी मुळातील कथेचा भावाशय सरसतेने अनुवादिला आहे. काही ठिकाणी त्यांनी स्वतंत्र, मार्मिक आणि लक्षणीय नवरचना साधली आहे. उदा. 'विनाज्ञानी' म्हणजे आत्मज्ञान नसलेल्या 'जय-विजय' या द्वारपाळ 'द्वयांना' अद्वयाचे ज्ञान व्हावे म्हणून ईशसंकल्पानेच सनकादिकांच्या शापाचे निमित्त होऊन, ते दोघे दैत्ययोनीत जन्मास गेल्याचा स्वतंत्र प्रस्ताव मांडला आहे. (श्लोक ८)

(ब) देवपक्षीय किंवा विष्णुपक्षीय देव 'भृंगपक्षी' होऊन आश्रम शाळेत येऊन प्रल्हादाबरोबर इतर मुले बिघडवितात, म्हणून शंडामर्कादी गुरूंनी सावध असावे अशी दक्षतेची सूचना हिरण्यकश्यपू धाडतो. हा कथाभाग देवांच्या मायावी भेदनीतीवर प्रकाश टाकणारा असून, त्यातून दैत्यराज हिरण्यकश्यपूच्या जागरुकतेवरही प्रकाश पडतो. वामनपंडीत लिहितात

**'झणीं देव होवोनिया भृंग पक्षी ।**
**गृहामाजि येवोनिया विष्णुपक्षी ।।**
**अशी नाशिती लेकरे हो निधाने ।**
**द्विजे राहिजे ते स्थळीं सावधाने ।। ६१ ।।'**

(क) नृसिंहप्रभूनी हिरण्यकश्यपूस ठार मारल्यानंतर लगेच दैत्यरूपी हत्तीचा कळप नृसिंहावर धावून येतो. हा 'असुर वारणयूथ' युद्धाचा कथाभाग वामनानी मुळापेक्षाही अधिक स्पष्टतेने मांडला आहे. हिरण्यकश्यपूचे प्रेत मांडीवरून खाली फेकून देऊन उग्र नृसिंह त्या क्रूर दैत्यांना लाथाबुक्यानी तुडवून, बुकलून ठार मारतो; हिरण्यकश्यपूच्या प्रेतावर बसतो. संतापाने कित्येकांना हाताने चिरडून फोडून टाकतो, तरीदेखील त्याचा कोप शांत होत नाही. हा भीषण क्रोध लक्षणीय असून भक्तांचा द्रोह करणाऱ्या असुराविरुद्ध प्रकटलेले हे रौद्र रूप सिंहावताराशी साजेसेच आहे. वामन पंडिताची ही नव्य बांधणी वेधक आहे.

(ड) वामन पंडितांनी प्रल्हादाचे व्यक्तिदर्शन घडविताना, त्यास 'समाधी'

लागल्याचा प्रकार स्वतंत्रपणे नव्याने वर्णिला आहे. उदा. पित्याच्या मांडीवर बसून तो वेदांतातील स्वरूपानुसंधान सांगू लागतो तेव्हा बोलता बोलताच त्यास समाधी लागते आणि तशा स्थितीतच हिरण्यकश्यपू त्यास मांडीवरून खाली ढकलून देतो. वामन पंडित लिहितात–

**'असे वर्णिता वर्णिता त्या अजाला ।**

**पित्याचेच अंकी समाधिस्त जाला ।। ५९ ।।'**

अर्थात भक्तद्रोही दैत्याच्याच मांडीवर भक्ती परिणती समाधीच्या रूपात फुलविण्याची खुबी खासच म्हणावी लागेल.

**४) आनंदतनय**

आनंदतनयाच्या रचना बांधणीत काही नवा भाग स्वतंत्रपणे अवतरला असून, या कथासंचात त्याचे नवे वेगळेपणही प्रकर्षाने उठून दिसणारे आहे.

(अ) आनंदतनयाने प्रल्हादमाता महासती कयाधूचे चित्रण स्वतंत्रपणे, नव्यान मांडलेले दिसते.

(ब) प्रल्हादाचा जन्म आणि बाराव्या दिवशी बारशाच्या नामकरण समारंभाचे चित्रण आनंदतनय स्वतंत्रपणे रंगविताना दिसतो. तो लिहितो–

**'जाहले दिन दहाद्वय बारे । बारसे मग करी प्रभु बा रे ।।१२।।'** इ.

(क) गुरूगृही प्रल्हाद ॐकारावाचून अन्य काहीच अध्ययन करीत नाही असे पाहून गुरूजी त्यास फोकाने बडवतात. तरीही तो ऐकत नाही. असे पाहून–

**'कोणे हे तुजला मुला सीकाविले सांगे मला लौकरी ।।२६।।'**

असे गुरूजी त्यास विचारतात, तेव्हा आईच्या उदरात असतानाच नारदमुनींनी आपणास अनुग्रह केला आहे असे तो सांगतो. तेव्हा प्रत्यक्ष देवर्षी नारदच त्याचे गुरू आहेत, हे जाणून देवांच्या भेदनीतीने धाबऱ्याघुबऱ्या तो राजदरबारात येऊन प्रत्यक्ष हिरण्यकश्यपूस तक्रारवजा सांगू लागतो की–

**'राया त्वत्सुत सर्वथा न म्हणता ॐकार वर्णा विना ।**

**याचा यत्न असेल तो तुम्ही पहा माझ्याकरे होइना ।।२८।।'**

अर्थात हे चित्रण म्हणजे आपणावर सोपविलेल्या युवराजाच्या शिक्षणाची जबाबदारी, शिक्षेच्या भीतीने झटकून टाकणाऱ्या एखाद्या पंतोजीच्या तक्रारीप्रमाणे लक्षणीय असून आनंदतनयाची ही कालसापेक्ष नवनिर्मिती म्हणता येईल.

(ड) गुरूजींची कागाळी ऐकताच आनंदतनयाचा हिरण्यकश्यपू ताडकन उठून प्रल्हादाच्या मस्तकावर लाथ मारतो. पोरगा ऐकत नाही, म्हणून चिडलेल्या बापाने मुलाच्या मस्तकी लत्ताप्रहार करण्याची ही तात्काळ प्रतिक्रिया आनंदतनयाने मोठ्या वास्तवपूर्ण रीतीने मांडली आहे. इथे गरूड आणि सर्प यांची प्रतिमा उभी करून तो लिहितो -

**'तैसा सत्वर धाऊनी सुतशिरी हाणीतली लात जी ।। ३६ ।।'**

अर्थात पुढे खांबावर लाथ मारण्याच्या प्रसंगातील अविवेकी मूढ कृत्यच इथे जणू पूर्व प्रात्यक्षिकाप्रमाणे घडून येते. भक्त आणि भगवंत या दोघांनाही ही लाथ मारणाऱ्या हिरण्यकश्यपूच्या अनर्थाचीच ही नांदी होय.

(इ) मूळ भागवती कथेत लत्ताप्रहाराचा उल्लेख नसतानादेखील आनंदतनयाने एकनाथाप्रमाणे खांबावर लाथ मारण्याचा प्रसंग स्वतंत्रपणे मांडला आहे. तो लिहितो -

**'हाणी लात बळी बळेचि कडुनि धावोनि खांबावरी ।। ५२ ।।'**

अर्थात या खांबावरील लत्ताप्रहाराची पूर्वक्रिया प्रल्हादमस्तकी लाथ मारण्यातून पूर्वीच प्रकटली असून, भक्त आणि भगवंत यांत अभेदच असल्याने भक्त कैवारी अशा भगवंतासच तो लत्ताप्रहार होतो. इथे तर त्याने प्रत्यक्ष खांबावरही लाथ मारली आहे. प्रस्तुत कथासंचात फक्त एकनाथ आणि आनंदतनय या दोघांच्या कथेतच वरील उल्लेख आला असून, या दोघाखेरीज नामदेव, गुरूदास, वामन पंडित, रामनाथ प्रभृतींनी खड्गमुष्टी प्रहाराचाच निर्देश केला आहे.

५) गुरूदास

गुरूदासाने मूळ कथेतून फारशी नवनिर्मिती प्रकट केलेली नसली, तरी त्याने आपल्या रूपबांधणीत वापरलेल्या काही प्रतीक-प्रतिमातून त्याचे स्वतंत्र उन्मेष प्रकट होतात.

(अ) प्रल्हाद हा परम भागवतात पहिला असल्याचा निर्देश प्रातःस्मरणीय श्लोकात येतो.

**'प्रल्हाद नारद पराशर पुण्डरीक; व्यासांबरीष शुक शौनक भीष्मदाल्भ्याम् ।**
**रूक्मांगदार्जुन वसिष्ठ बिभिषणादीन् पुण्यनिमान् परम भागवतान् स्मरामि ।।'**

या क्रमाप्रमाणे जणू गुरूदासाने प्रल्हाद हा पहिला भक्तराज असल्याचे सांगतो.

**'तू भक्तराज मज पहिला ।।** कडवे १४ ।।'

इथे 'पहिला भक्तराज' असे सांगून, प्रल्हादाचा परमधिकार त्याने अधिक प्रभावीपणे स्पष्ट केला आहे.

(ब) प्रल्हादास हत्तीच्या पायी देण्याची शिक्षा होते तेव्हां प्रल्हादाची प्रार्थना ऐकून स्वतः भगवान सिंहरूपाने प्रकट होतात, आणि हत्तींचे कळप चीं ची करीत पळत सुटतात - असे वर्णिले आहे. इथे हत्ती आणि सिंहदर्शन हे आनंदतनयाप्रमाणे असले तरी त्यातून पुढील नृसिंह अवताराचे पूर्वदर्शन सूचकतेने आपणास घडू शकते.

(क) कडेलोट शिक्षेच्या प्रसंगी गुरूदासाचा प्रल्हाद -

'हे धराधर धरी म्हणे मला ।। ६ ।।' अशी प्रार्थना करतो तेव्हा भगवंत त्यास कडेवर घेतल्याप्रमाणे अलगद उतरवितात. 'घे कडेवरी तसा अरामला ।। ६ ।।' 'कडेलोट' आणि 'कडेवरी' यातील दोन टोकाचा विरोधही खास लक्षणीय ठरतो.

याचप्रसंगी भगवंताचे रूपदर्शन घडविताना गुरूदास लिहितो की- 'वेंकटाद्रि विभु गमला ।। ६ ।।' अर्थात पर्वतावरील कडेलोटाच्या प्रसंगी वेंकटाद्री विभु प्रकटावा

हे विलक्षण औचित्यपूर्ण असेच असून, दक्षिणेतील वेंकटाद्री व्यंकटगिरीच्या व्यंकटेशाचे स्वतंत्र स्वरूप नव्यानेच समोर उभे राहाते. तंजावरस्थ गुरूदासाने सुप्रसिद्ध अशा तिरुपती क्षेत्रातील वेंकटाद्रिविभूचे दर्शन घडवावे यात त्याची संवेदकक्षेत्रीय जाणीव नव्याने प्रकटलेली दिसते.

(ड) गुरूदासाचा प्रल्हाद प्रत्येक शिक्षेच्या वेळी पर्वत, जल, अग्नी इ. त्या त्या रूपात परमेश्वराचे स्मरण करतो. (दिव्य कंठ हर निमला ।। ७ ।। इ.) यातून सर्वभूती भगवद्भाव पाहाणाऱ्या प्रल्हादाचे समदर्शी चित्र अधिक ठोसपणे पुढे येते. नामदेवाखेरीज अन्य कथेत असे समदर्शीत्व अभावानेच दिसते.

(इ) गुरूदासाने मुळाप्रमाणे किंवा नामदेव; आनंदतनय यांच्या प्रमाणे नृसिंह आणि हिरण्यकश्यपू यांच्यातील युद्धप्रसंग वर्णिलेला नाही, तर गुरूदासाच्या कथेत स्तंभातून उग्र नृसिंह प्रकट होताक्षणीच एकदम हिरण्यकश्यपूवर झडप घालतो आणि त्यास पिळून पिरगाळून ठार मारतो. गुरूदास लिहितो–

**'धरि हरि बगले । पिळी रगत गळे । मांडिवरी चिरोनि घेतला ।। १३ ।।'**

यात भगवंताच्या दैत्य निर्दाळणाची तीव्रता अधिक उत्कटतेने प्रकट होतांना जाणवते. सिंहाप्रमाणे एकदम झडप घालणारे हे नृसिंहाचे दर्शन वास्तवाचे नवे रूप प्रकट करते.

**६) रामनाथ**

(अ) रामनाथाने मूळ भागवती कथेतील जय-विजयांना दिल्या गेलेल्या सनकादिकांच्या शापाचा संदर्भ– भृगुऋषींच्या शापाने मांडला आहे. तसेच रामनाथाने हिरण्यकश्यपूंच्या चार पुत्रांचा नावासहित उल्लेख केला असून, प्रस्तुत कथासंचातील कोणाही कवीच्या कथेत तो आलेला नाही. रामनाथ लिहितो की–

**'प्रल्हाद ल्हाद सल्हादानुल्हाद म्हणूनी तदा ।**
**दनूजेंद्रे सुतालागि नाम ठेविले मुदा ।। १४ ।।'**

(ब) प्रल्हादाच्या पाठशाळेतील अध्ययनाचा श्रीगणेशा श्रीमंत राजेशाही दरबारी थाटाचा असून, प्रस्तुत संचातील इतर कोणत्याही कथेत या राजैश्वर्यपूर्ण पाठशाळेचा उल्लेख आलेला नाही. रामनाथ लिहितो–

**'रजतपीठावरी मणिवालुका ।**
**पसरुनी गुरूपुत्र सकौतुका ।**
**करि करोनि हिरण्मयी लेखणी ।**
**लिहवित्ती शिशुते विकसन्मणि ।। १७ ।।'**

अर्थात चांदीच्या धुळपाटीवर मोत्याच्या - रत्नांचा चुरा (धूळ !) पसरून सोन्याच्या रत्नजडित लेखणीने अक्षरे गिरवणारी भाग्यवान मुले आणि हे श्रीमंती धूळपाटीचे वर्णन रामनाथच्या श्रीमंत प्रतिभेचे दर्शन घडविते. तसेच तत्कालीन राजेरजवाड्यांच्या एखाद्या संपन्न पाठशाळेचे ही क्षणचित्र त्यातून उभे राहू शकते. रामनाथाने उभे केलेले

वैभवसंपन्न रूपचित्र स्वतंत्र आणि एकदम नवीन असेच आहे.

(क) हिरण्यकश्यपूने प्रल्हादास दिलेल्या विविध शिक्षांचा परिहार दाखविताना रामनाथाने नव्यानेच रम्यादूभुत दैवी चमत्कार मांडले आहेत. उदा.

१. प्रल्हादास ठार मारण्यासाठी दूतांनी तलवार उगारताच त्यांचे हात वरच्या वरच तटस्थ होतात.

२. उकळत्या तेलाच्या कढईत टाकू जाताच अग्नीच थंड - शीत होतो.

**'शिखी शरच्चंद्रापरी जाहला ।। २९ ।।'**

३. कडेलोटाच्या प्रसंगी भगवंत पराची गादी होतो.

**'अतिमृदु पर्यंक झाला हरी ।। ३१ ।।'**

(ड) वरील प्रमाणे मांडलेल्या रम्यादूभुत दैवी घटितांचे व्यावहारिक पातळीवरून बुद्धिवादी स्पष्टीकरणही काही वेळा तो देतो. उदा. प्रल्हादास समुद्रात टाकताच नौका होऊन हरी प्रकटतो व त्यास कडेला आणले जाते इ.

अशा रीतीने प्रस्तुत कथासंचातील कवींनी आपापल्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे, कालमान परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मूळ सूत्र धरूनही त्या कथाबांधणीत फेरफार करून प्रल्हादकथा जिवंतपणे उभी केली आहे. या स्वतंत्र रचनेत त्यास महाराष्ट्रीय स्पर्श असून व्यष्टी - समष्टीची लोकछंदानुवर्ती मानसचित्रे त्यात प्रतिबिंबित होत गेलेली दिसतात. त्यांच्या या स्वतंत्र कथारूप बांधणीतून प्रकटलेली नवनिर्मिती ही मराठी प्रतिभेच्या सर्जनशीलतेची द्योतक ठरते.

### ३) कथाबांधणी - आस्वादक स्व-रूप विवेचन

कथाबांधणीच्या दृष्टीने विचार करता, स्फुटकथा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून प्रल्हादकथेची जडणघडण लक्षवेधी अशीच दिसते. गद्यलेखनाच्या प्रथेअभावी केवळ पद्यबद्ध अशी वाङ्मयीन करमणूक किंवा लोकरंजन एवढ्याच हेतूने ही कथाबांधणी घडलेली नाही. भक्तिभावना आणि आध्यात्मिक प्रेरणा हे तिचे अंतर्वेधी जीवनसत्व आहे. नामदेव एकनाथादी संत लोकशिक्षकाच्या भूमिकेतून तळमळीने बहुजन समाजासाठी ही कथामांडणी करीत असलेले दिसतात. या कथाबांधणच्या 'मागे उभे असलेले मन हे भाविक, सहिष्णु, श्रद्धाशील व समाजनिष्ठेने भारलेले आहे. एकनाथ हे कवी होते, संत होते व समाजशिक्षक होते. या त्रिविध भूमिकांचा मनोज्ञ आविष्कार त्यांच्या रचनेतून जाणवतो.'[१४]

पुढे संतांच्या कार्याची प्रेरणा घेऊन धर्मधुरीण प्रवक्त्यांनी व समाजधारणा करू इच्छिणाऱ्यांनी पांडित्यपूर्ण कीर्तनशैलीतून या स्फुट कथांचा घाट स्वतंत्र, डौलदार बनवून वृत्तबद्ध रचनेतून प्रकट केला. कथानकाबरोबर त्यानी कथनकौशल्याकडेही लक्ष दिले. त्यामुळे कथनाविष्कारात कौशल्यपूर्ण, आकर्षकता आली. केवळ मूळ कथांशाचे रसाळ पद्यनिबंधन केल्याने किंवा श्लोकबद्ध मांडणी करून, स्वतंत्र कथारूप उभे राहू शकत नाही. त्यासाठी कथेचे मूलभूत प्रेरकसूत्र जिवंतपणे उलगडत जावे

लागते. अंतरीच्या प्रबलभावना चिंतनशील विचार आणि प्रातिभकल्पना, उत्कटतेने निवेदनाच्या शब्दबंधातून प्रतीतिक्षम व्हाव्या लागतात. अशा आध्यात्मिक प्रबळ जीवन धारेतूनच प्रल्हादकथा महाराष्ट्रीय संतपंताच्या कथारचनेचा विषय बनली आहे. त्या कथाबांधणीला कविप्रकृतिनुसार विविध छंद, पद, वृत्तांचे परिमाण गवसले आहे.

प्रल्हादकथेच्या बांधणीत, रंगभरणीत, व्यक्तिदर्शनात, भाषेच्या भारदस्तपणात शब्दनिष्ठ चमत्कृतीत, चित्रदर्शी वर्णनसामर्थ्यात, नाट्यात्मक आविष्कारात, विविध प्रसंगनिर्मितीत, वातावरण रसनिर्मितीत, संसृती टीकेत आणि जनरूची संवादात कवीच्या प्रकृतिगत व्यक्तिमत्त्वानुसार युगधर्माच्या संचिताप्रमाणे विविधता प्रकटली आहे. म्हणूनच नामदेव एकनाथांच्या प्रल्हादकथेपेक्षा वामन पंडित, आनंदतनय, गुरूदास किंवा रामनाथादि पंडित कवींच्या प्रल्हादकथेचा घाट आणि थाट; रचनाबंधाचे विदग्ध स्वरूप वेगळया पातळीवर प्रकटले आहे. 'मराठी कवितेच्या रूपसिद्धीत व तिच्या विकासक्रमात आध्यात्मिकता व कथात्मकता या दोन अंगभूत धाग्यांच्या प्रमाणबद्ध विणीला महत्त्व आहे .... मराठी आख्यान कवितेच्या रचनेचा व स्वरूपाचा विकास म्हणजे या घटकांच्या कमीजास्त योजनेचा इतिहास .... त्यांच्या या विणीत संस्कृत, विदग्ध काव्यादर्शाचे पेड मिसळले गेले आणि मराठी आख्यान कवितेला विदग्ध काव्याचे रूप आले.'[१५]

भक्तीच्या मार्गाधारे वाटचाल करीत करीत पंडित कवींनी प्रल्हादकथेत वैदग्ध्याचे गडद रंग चढविले, आणि तिचे रूपसौष्ठव नटवून उभे केले. त्यामुळे प्रल्हादकथेला बांधणीचा एक आखीव, रेखीव असा सुरेख डौलदारपणा आला. आध्यात्मिकता व कथात्मक बांधणी यांच्या समतोलात या स्फुटकथेला विदग्ध काव्याचा घाट प्राप्त झाला. गुरूदासाने तर 'कडाका' छंद वापरून द्रुतगद्याचा लयबद्ध शाहिरी थाटच कथाबांधणीत प्रकट केला आहे. या सर्वांच्या कथाबांधणीतील रूपाचे आस्वादक विवेचन यथाक्रम आपण पाहू.

## १ : नामदेव-भक्तराजकथित भक्तराज कथा

इथे मराठीचिये नगरी, महाराष्ट्र भूमंडळी ज्ञानदेवांनी भक्तीचे आवार उभे करून मेळविलेल्या ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीत नामदेवांचे स्थान अग्रस्थानी असून, त्या भक्तियुगातील त्यांच्या भक्तिप्रसाराच्या कार्याला तोडच नाही. भागवत परंपरेने नामदेव हे प्रल्हादाचेच अवतार आहेत अशी प्रत्यक्ष जनाबाईची साक्ष आहे. त्यामुळे महताकालेन प्रल्हादावतारी प्रल्हादानेच पुनश्च प्रल्हादकथा सांगावी-यातील आल्हादकता आगळीच आहे. एका भक्तराजाच्या भक्तिस्वानंदमग्न अवस्थेतील आत्मकल्लोळच या भक्तिकथेतून प्रकटलेले दिसतात. नामदेवकथित प्रल्हादकथा सहा अभंगातून साकार झाली आहे. यातील प्रत्येक अभंगाच्या शेवटी आलेले समाधान, आनंद, भक्तनिर्भयता, निजभक्तख्याती तोडर ब्रीदाचा, आनंदलहरी, अभयदाता इ. शब्दप्रयोग पाहिले म्हणजे या कथेच्या अंतरंगातील भक्तितरंग स्पष्टपणे जाणवतात. अवघ्या सहा अभंगात एक

प्रभावी, नेटकी अशी लघुकथा इथे साकार झालेली दिसते. किंबहुना, नामदेवांची ही कथा म्हणजे औपनिषदिक-पौराणिक भक्तिज्ञानाचे सूत्रच कथारूपाने समूर्त झाले आहे. केवळ घटकाभर करमणूक करणे हा रंजनाचा हेतू इथे मुद्दलीच नाही. भक्तितत्त्वज्ञानाचा हा कथारूप सगुणाविष्कार आहे. त्याहीपुढे जाऊन, अमूर्त अध्यात्मभक्तीचे प्रत्यक्ष पराकाष्ठेचे प्रात्यक्षिकच आहे.

नामदेवाच्या अंतःकरणातील भक्तीच्या भावकोवळिकतेची चित्कळा परिधान करून प्रकटलेली त्यांची अभंगवाणी अत्यंत लघुअवकाशात प्रल्हादाची समग्रकथा संक्षेपाने उभी करते. या कथेमागे भक्तिजागरणाची अपार तळमळ, नामनिष्ठेची उत्कटता आणि भक्तवत्सल भगवंताच्या अपार करूणतेची कृतज्ञता ओसंडून राहिली आहे. अभंगसंकीर्तनाच्या थाटात 'नामा वाळवंटी कीर्तनास' उभे असले तरी त्यांच्या भावभोळ्या भक्तीचे रूपच कथेतून प्रकटत राहाते. नामदेवांच्या प्रेमळ वाणीतील 'मितालीळा' प्रल्हादकथेचा चित्रपट उलगडत जाते.

## पंढरीतील अबीर गुलालाने रंगलेली कथा

केवळ सहा अभंगाच्या लघुअवकाशात मूळ भागावती कथेचे विस्तारसूत्र नेमकेपणाने पकडून ते समग्र आशयलक्षी अशी स्फुट कथा उभी करतात. स्फुट कथेच्या लघुअवकाशामुळे कथासंक्षेपातून आलेली द्रुत लय नेमक्या भाषेत प्रवाहित होऊन त्या शब्दबंधातून संस्कारोत्सुक भाविक श्रोत्यांना कथाश्रवणाची राणीव प्राप्त होते. त्यातच पंढरीच्या कृष्ण-विठ्ठल भक्तीची रंगभरणी होत राहाते. उदा. देव दैत्यांच्या युद्ध प्रसंगात सूचक निर्देश करून ते लिहितात –

**'ऐंसे हो असता देव खेळे मेळा । सहित गोपाळा चाल केली ।। २२५९-१ ।।'**

किंवा

देव सर्वत्र आहे हे पित्यास सांगताना नामदेवांचा प्रल्हाद सांगतो की —

**'जळी काष्ठी आहे माझे अंतरंग । सखा पांडुरंग मायबाप ।। २२६१-४ ।।'**

यातील देवांचा गोपाळासहित खेळणारा मेळा, अंतरंगातील मायबाप, सखा पांडुरंग, तसेच कथेत वर्णन केलेली कासेपीतांबर जडित शोभिवंत, नवनीत प्रिय, सुगंधी तुळशीमाळा घातलेली नामदेवांची नृसिंहमूर्ती म्हणजे साक्षात् पंढरीच्या पांडुरंगाच्या भक्तीने भारलेल्या नामदेवांचेच स्वानुभूत विठ्ठलदर्शन होय. त्यामुळे या कथेतील रंगभरणी चंद्रभागेकाठच्या अबीर गुलालाची तुळशीमाळा बुक्क्याची आहे, हे सहजी समजून येते. मूळ प्रल्हादासमोर 'नारायण' आहे, तर नामदेवांसमोर पांडुरंग रूपात नारायण आहे.

## पुराणकथेची वर्तमानाशी सांधेजोड

नामदेवांनी आपल्या प्रल्हादकथेत समोरील भक्त, भाविक श्रोत्यांना दिलासा देणारी वेधक आवाहन करणारी अशी वचनवाक्ये पेरून पौराणिक कथेचे पुरारणत्व किंवा

कालिक अंतर नाहीसे करून तिची वर्तमानाशी सांधेजोड सुप्रतिष्ठित केलेली दिसते. उदा. नामदेव लिहितात.

**'म्हणे सर्व होईल काळयोगे ।। २२५८-१० ।।'**

**'नाही काही भय चिंतनी ।। २२५९-९ ।।'**

**'नामा म्हणे भक्त निर्भय सर्वासी । काय हो त्यासी उपेक्षी हरी ।। २२९० ।।'**

**'नामयास्वामी वरदहस्ता । अभयदाता भक्तासी ।। २२६३ ।।' इ.**

वरील अभंगवचने खचितच दिलासा देणारी आहेत. धावत्या, गतिमान निवेदनातून घटनाप्रसंगाचे रूपदर्शन घडवीत जाणारी नामदेवांची अनलंकृत अमृतवाणी त्यांच्या 'सुईदोऱ्या'प्रमाणेच संसारश्रांतांची अध्यात्माशी सांधेजोड करून देते. अभंग-वाणीतील ही कथा टाळमृदुंग वीणेच्या झंकारातून निनादत असलेली जाणवते. भावतल्लीन करते. (१) हिरण्यकश्यपूचे पूर्वजन्मवृत्त, (२) पितापुत्रसंवाद, (३) उग्र नृसिंहमूर्ती आणि (४) सायंकालीन संधिकाळी हिरण्यकश्यपूच्या वधाचे क्षणचित्र अशा क्रमाने नामदेवांची प्रल्हादकथा जिवंत आणि उठावदार बनत जाते.

## भक्तीचे सगुण निर्गुण रूपदर्शन

भक्तराज नामदेवांना भक्तीखेरीज अन्य गोष्ट ठाऊक नाही. सगुण-निर्गुण-दर्शनानंदात ते तल्लीन असतात. प्रस्तुत कथेतदेखील त्यानी या दोन्ही रूपांचे दर्शन सहजी घडविले आहे. उदा. हिरण्यकश्यपू प्रल्हादास तुझा देव कोठे राहातो ? म्हणून विचारतो.

**'कोठे राहातो कैंसा कोण सांग ।। २२६१.२ ।।'**

**त्यावर प्रल्हाद (नामदेवांचा) सांगतो की, –**

**'येरू म्हणे रंग नाही कोठे ? ।। २२६१.२ ।।'**

**'सर्वाठायी आहे व्यापुनि सगळा । नाही तो निराळा कोठे पाहाता ।।'**

**'जळी काष्ठी आहे माझे अंतरंग । सखा पांडुरंग मायबाप ।। २२६१.४ ।।'**

अर्थात जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, निराळी, अंतराळी सर्वाठायी भरून राहिलेले विराट निराकार रूप भक्तासाठी मात्र स्तंभातून सगुणसाकार रूपात प्रकट होते. 'भक्ताच्या वचना कोरडिया काष्ठी ।।२२६१.८।।' असे नामदेव सांगतात. पण 'भक्तभाव संचिताचे' हे सगुणरूप उग्रभीषण असून – 'मानवशरीर सिंहवदन । गुरगुर करी देवराव ।। २२६१.१६ ।।' अशा भयंकर स्वरूपातील आहे.

पुढे नृसिंहप्रभूचा क्रोध शांत झाल्यावर प्रसन्न अशा नृसिंहमूर्तीचे पूजारूपही नामदेवांनी प्रसन्न असेच उभे केले आहे. विशेष म्हणजे या रूपात पंढरीच्या पांडुरंगाचेच सहजी दर्शन घडते.

## कथाभाग

मूळ भागवती आशयाचे सूत्र धरून जय-विजयापासून सर्व घटना प्रसंग नामदेवांनी

स्फुट आख्यान कथेच्या लघु अवकाशात सामावले आहेत. हिरण्यकश्यपू घोर तपश्चर्या करून, ब्रह्मदेवास प्रसन्न करून घेतो. त्यास वरप्राप्ती होते. नामदेव लिहितात

**'वरदान मागे न यावा तो मृत्यु । कवणाचे हाती देव सुरा ।। २२५८.३ ।।**
**गंधर्व मानव सकळांचे भय । नसावे तिळमात्र कवणे काळी ।। २२५८.४ ।।**
**दिवसा ना रात्री ना तिथी हो नक्षत्री । अंतरिक्ष क्षिती मरण नसो**
**।। २२५८.५ ।।'**

अशा रीतीने देव, दैत्य, मानव, गंधर्व इ. कोणाकडूनही दिवसा वा रात्री, क्षितीवर किंवा अंतरिक्षातदेखील मृत्यू येऊ नये असा वर प्राप्त झाल्यामुळे या दुष्ट दैत्याचा मृत्यूतरी कसा घडणार या संबंधीचे तीव्र कुतूहल जागृत होते. प्रस्तुत कथासंचात वामन पंडिताखेरीज अन्य कोणत्याही कथेत या वरदानाचा इतका स्पष्ट निर्देश आलेला नाही. नामदेवांच्या कथेत हा पूर्ण निर्देश आला असून, त्यामुळे पुढे 'नृसिंह' रूप पाहाताच त्या सर्व अटी पूर्ण करून भक्तरक्षण करणाऱ्या भगवंताच्या 'सत्यं विधातुं' – या वचनाची सत्यता पटते. दुसरी गोष्ट दिवसा, ना रात्री असा स्पष्ट निर्देश नामदेवांनी केलेला असल्यामुळे दिवस आणि रात्र दोन्हीही टाळून करकरीत तिन्हीसांजेला हिरण्यकश्यपूचा वध केल्याच्या घटनेतील आशय अधिक स्पष्ट होतो.

वरील दोन्ही गोष्टी पाळून, तसेच ब्रह्मदेवाच्या वराची प्रतिष्ठा राखून त्या दैत्याच्या वधासाठी श्रीविष्णूंनी पाळलेल्या सर्व अटी विचारात घेता इतरांच्या प्रल्हादकथेपेक्षा नामदेवांच्या कथेला इथे अधिक भरीवपणा आलेला दिसतो. मूळ भागवती कथा जरी परंपरेने आपणांस ज्ञात असली, तरी ज्यांना मूळ कथा माहीत नाही अशा रसिक श्रोत्यांनादेखील नामदेवांच्या या कथेतून 'नर+सिंह' असे विचित्ररूप आणि 'संधिकाल' यांचे मर्मरहस्य समजून येते. या दृष्टीने नामदेवांच्या कथाभागात रचनेच्या दृष्टीने कच्चे दुवे राहिलेले नाहीत हे स्पष्टपणे दिसून येते.

## कथा-कीर्तनाचे रंगी

पान दीड पानाच्या लघुअवकाशात कीर्तनानुषंगाने प्रकटलेल्या या उत्स्फूर्त, अभंग, कथेला सामूहिक किंवा सांघिक पठणाचेही वेधकमूल्य लाभले आहे. इथे त्यांच्या अंतरीचे भावकोमल अभंग नादमधुर गेय शब्दातून प्रवाहित झाले आहेत. या कथाघडणीत अवांतर विस्ताराचा घोळ न घालता, त्यांनी एकदम मुख्य कथेलाच हात घातला आहे. हिरण्यकश्यपूचे तप, वरप्राप्ती, प्रल्हादाचे शिक्षण आणि राजसभेत प्रल्हादमुखातून 'हरी हरी' असे शब्दोचार होताच कथा संघर्षाची ठिणगी पडते.

**'माझा जो वैरी तया आठवीतो । कुलघात होतो ऐशियाने ।। २२६०.४ ।।'**

अशा शब्दात हे संघर्ष-बीज देव-दैत्य संघर्षाच्या पातळीवर जाऊन भिडते. कुलघातकी पुत्राच्या वधाचीदेखील तो आज्ञा फर्मावतो. समुद्रात बुडवा, अग्नीत लोटा, शस्त्रघाव करा, विषपान करवा, कडेलोट करा इ. पण प्रत्येक वेळी नारायणकृपे त्याचे प्राण वाचतात. मात्र दैत्यांना मूलबुद्धीमुळे ही भगवंतकृपा कळून येत नाहीं. ते

लौकिक पातळीवरूनच विचार करतात. नामदेवांनी हा बारकावा अचूक हेरला असून ते लिहितात –

१) समुद्रात ढकलून देताच – 'आपो नारायण' म्हणून प्रल्हाद पाण्यात वरच्यावर तरंगू लागतो, तेव्हा दैत्यदूत म्हणतात की, **'म्हणती हा पाहे पोहतेसे ।। २२६०.१३ ।।'**

२) अग्नीत टाकतात तेव्हा 'अग्निनारायण' म्हणताच, अग्नी शीतल होतो; पण मूढ दैत्य म्हणतात की, **'म्हणे जादू केली या दुर्जनाने ।। २२६०.७ ।।'**

म्हणजे अचिंत्य अशा दैवी सत्तेचे सामर्थ्य जडमूढांच्या लक्षातच येत नाही आणि ही सामान्य माणसे बुद्धितर्काने त्याचा लौकिक अर्थ कसा लावतात याचे इथे दर्शन घडते. त्यातून दैत्यराज हिरण्यकश्यपू दुःखीकष्टी होतो. किंबहुना, त्याचे मरण ओढवते आणि भक्तराज मात्र अढळ भक्तीने ब्रह्मसाम्राज्य सुखाचा अधिकारी बनतो. हाच कथेचा मध्यवर्ती आशय नामदेवांनी प्रभावीपणे स्पष्ट केला आहे.

प्रल्हादकथेचा हा जणु इत्यर्थच तुकाराममहाराजांच्या पुढील अभंगात नेमकेपणाने प्रकट झालेला दिसतो. ते सांगतात –

**'चित्तशुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ।।१।।**
**विष ते अमृत आघात ते हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ।।२।।**
**दुःख ते देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ।।३।।**
**आवडेल जीवा जीवाचिये परी । सकळा अंतरी एक भाव ।।४।।**
**तुका म्हणे कृपा केली नारायणे । जाणिजे ते येणे अनुभवे ।।५।।** अभंग १७६९

## २ : एकनाथ

### भागवतोत्तम कथित भागवतोत्तम कथा

नामदेवांच्या प्रल्हादकथेपेक्षाही नाथांची प्रल्हादकथा ही अधिक लघुकाय असून, निम्म्या आकाराचीच आहे. एवढ्याशा लघुत्तम आकारात मूळ भागवती बृहत्तर कथा सामावण्यात नाथांचे मिताक्षरी संक्षेपचातुर्य दिसून येते. त्यांनीदेखील कीर्तनाच्या अनुषंगाने अभंग छंदातूनच ही आटोपशीर कथा मांडली आहे. नाथांच्या कथेचा हा चिमुकला आकार लक्षात घेता अवांतर पूर्वोत्तर कथामांडणीस किंवा प्रसंगवर्णनास इथे फारसा अवसरच नाही, हे स्पष्टपणे दिसून येते. तरीदेखील भक्तीच्या संदर्भात कालसापेक्ष अशी प्रभावी स्फुट कथा नाथांनी उभी केली आहे. प्रल्हादकथा ही तशी सर्वज्ञात असल्याने नाथांनी एकदम कथाबीजालाच हात घातला आहे. ते लिहितात -

**'हिरण्यकश्यपूचे पोटी । भक्त जगजेठी प्रल्हाद ।। ३४१४.१ ।।**
**'सदा वाचे नारायण । छंद आन नाही दुजा ।। ३४१४.२ ।।'**
**'एका जनार्दनी नामे वैकुंठपीठ रे ।। ३४२९.५ ।।'**

अशा शब्दात नामभक्तीच्या निष्कर्षबिंदूवर त्यांनी कथेचा कळस चढविला आहे. छोट्या छोट्या अभंगचरणातून, अत्यंत धावत्या द्रुत गतीने 'गागर में सागर' –

भरल्याप्रमाणे त्यांच्या कथेचा घाट साकार होतो. प्राचीन मराठीत नामदेवानंतर अभंगछंदातूनच अवतरलेली ही कथा कालसापेक्षतेने वेगळा ठसा उमटविते. एकनाथ हे देखील नामदेवाप्रमाणे पट्टीचे कीर्तनकार असून, नाट्याभिनयकुशल असे भारूडकारही आहेत. तसेच नाथ पुराणिकही आहेत. त्यामुळे या सर्व विशेषांचा प्रभाव त्यांच्या कथाबांधणीवर जाणवतो.

### स्तोत्रासारखी नेटकी आटोपशीर कथा

समोरील श्रोते-वाचक यांची नेमकी नाडी ओळखून प्रभावी कथा जिवंतपणे उभी करण्याचे कौशल्य नाथांच्या कथेत दिसून येते. पाठांतरसुलभ, नादमधुर, गेय आणि श्रुतिरम्यतेने नटलेली त्यांची 'अभंग'कथा सूत्रबद्ध स्वरूपात प्रकटली आहे. कीर्तनप्रसंगी, उत्स्फूर्तपणे प्रकटलेला हा भक्तिकथाविष्कार वेधक आणि विलोभनीय असाच आहे.

एकनाथ हे थोर समाजशिक्षक आहेत. त्यामुळे थोडक्यात कथा मांडून भक्तीचे नेमके सूत्र गळी उतरविण्याचे कसब त्यांच्या ठिकाणी चांगलेच असलेले दिसते. नाथांनी गद्यलेखनाच्या अभावाच्या काळात, पाठांतराच्या आवाक्यात येणारी स्तोत्रवजा कथाबांधणी केली असल्यामुळे इथे मुख्य कथेलाच एकदम सुरूवात होते.

'नारायण' नारायण असा जप करणाऱ्या प्रल्हादास पाहून –

**'वाया जन्मले हे पोर ।। ३४१५.१ ।।'**

**'काय जन्मला पामर ।।'**

असे म्हणत सचिंत झालेला पिता हिरण्यकश्यपू स्वतःच प्रल्हादास विद्या शिकवू जातो. पण –

**'सकल विद्यांचे जीवन । मनी धरी नारायण ।। ३४१७ ।।'**

अशी प्रल्हादाची स्थिती पाहून संतप्त हिरण्यकश्यपू मग प्राणघातक शिक्षा सुरू करतो. हे सर्व शिक्षाप्रकार नाथांनी एका झटक्यात एकार्ध अभंगचरणातून सांगून टाकले आहेत. ते लिहितात –

**'शस्त्रांचे दुस्तर धाय हाणिती ।....**
**अग्नीत घालिती पाणिये बुडविती । ढकलोनि देती पर्वतशिखरी ।।**
**३४२५.२ ।।'**

अर्थात छळाबळाचे हे सर्व शिक्षाप्रकार अद्‌भुतरम्यतेने रंगवीत न बसता, कथाबांधणीचा सारा झोक 'नामजप रक्षी नारायण' या मुख्य सूत्रावरच ठेवून, त्यांची कथा गतिमान होते. शेवटी

**'नारायण जळी स्थळी काष्ठी ।।'**

**'व्यापुनि राहिला दिशाद्रुम ।।'**

असे प्रल्हादाचे निर्णायक उत्तर ऐकताच हिरण्यकश्यपू खांबावर लाथ मारतो.

'दुर्जन तो लाथ मारी खांबावरी ।' आणि त्या क्षणी 'स्तंभी नरहरी प्रकटला ।।' असे सांगून – 'हृदयी विदारिला हस्तनखी ।।' असा शेवटही करतात. इथे कथा विरामते.

सुलतानी आक्रमणाच्या परतंत्र काळात समाजप्रबोधनासाठी कीर्तनशैलीतून प्रकटलेली नाथांची ही कथाबांधणी पाहाता रम्यादभुत अशा कल्पनाविलासात गुंतून न पडता, अत्यंत धावत्या पद्धतीने ही स्फुट कथा टोकदार बनलेली दिसते. एऱ्हवी गृहस्थी - नाथ अन्यत्र संथ, प्रशस्त लेखन करीत असूनही, इथे मात्र त्यांच्या मिताक्षरी स्फुट रचनेचे लाघव पूर्णतेने प्रकटलेले दिसते.

## ३ : वामन पंडित-ज्ञानी पंडिताची ज्ञानभक्ति कथा

**चिमणा रूपबंध —**

वामन पंडितांनी कथेच्या प्रारंभी मांगलिक वंदन, कथा-प्रयोजन सांगून ही दिव्य कथा असल्याचे सांगितले आहे. 'कथित दिव्य चरित्र कथा ।।३।।' आपल्या कथेस तो 'नृहरिदर्पण' – असे म्हणतो. तसेच 'बहुत सुचविणारी चित्रणा' असेही म्हटले आहे. या छोट्या कथेत पंडितांनी मूळ, समग्र विस्तृतकथा आशयलक्षी केल्याचे सांगितले आहे. 'वचन अल्प कथा अधिका दिसे ।।' ।।४।। अर्थात दर्पणबिंब भावाने आपल्या कथेत मूळ कथेचे लघुरूप प्रकटले असल्याचे त्यांनी सुचविले आहे. पंडित म्हणतात –

**'बहुत सुचवुनी चिमणा असे । 'नृहरिदर्पण' यास म्हणा असे ।।४।।'**

अर्थात वामन पंडितांचा हा 'चिमणा' कथाबंध बटु वामनाप्रमाणे मूळ विशाल कथेला व्यापणाराच आहे. स्वतः वामन पंडितदेखील हेच सागंतात की,

**'वामनी त्रिभुवनी प्रकटावे । यात ये रितिच पुण्य लुटावे ।।५।।'**

ज्ञानी पंडितांनी 'ज्ञानान्मोक्षः ।' अशी दृष्टी ठेवून, ज्ञानभक्तीसाठीच जणू कथेची जडणघडण केलेली दिसते.. त्यामुळे 'विनाज्ञान' असलेल्या वैकुंठीच्या द्वारपाळ द्वयांना अद्वयाचे, अद्वैताचे ज्ञान करून देण्यासाठी शापनिमित्ताने दैत्ययोनीत जन्मास जावे लागल्याचे पंडित सांगतात.

नामदेवाप्रमाणे वामनपंडिताच्या कथेतही हिरण्यकश्यूपच्या विचित्र वरातील बारकावे स्पष्टपणे आलेले दिसतात. हरिभक्तीविना काव्य हे 'अलवण' होय अशी वामनाची काव्यदृष्टी आहे. पंडित सांगतात की,

**'विना व्यर्थे काव्ये अलवण हरिवीण कविता ।।३७।।**

अर्थात भक्तिभावाबरोबरच या पंडित कवीने कल्पकतेने नवनिर्मितीदेखील साधली आहे. उदा. 'दितिज तो गज' आणि 'केशव केसरी' म्हणजे हिरण्यकश्यपूस हत्ती व विष्णूस सिंह अशी रूपप्रतिमा उभी करून, 'गज-केसरी' युद्धाचे क्षणचित्र ते उभे करतात. तसेच कथेच्या अखेरीस नृसिंहप्रभूंनी हिरण्यकश्यपूरूपी हत्तीस ठार मारल्यावर तेथील 'असुरवारणयूथ' म्हणजे दैत्यरूपी हत्तींचा कळप चालून आल्याचे वामनपंडित रंगवितात. उग्र नृसिंहमूर्ती त्या सर्वांचा खरनखरानी लाथाबुक्क्यांनी फडशा

पाडते (११८) इ. शेवटी प्रल्हादास राज्यसिंहासनी बसवून उपक्रमोपसंहाराची गाठ पक्की केली जाते.

**श्लेषगर्भ उपक्रमोपसंहार**

कथेच्या प्रारंभी पाचव्या श्लोकातील मांगलिकात आलेला चरण कथेच्या शेवटी १५४ व्या श्लोकातही जसाच्या तसा आला असून तो असा –

**'वामनी त्रिभुवनी प्रकटावे । यात ये रितीच पुण्य लुटावे ।। ५ + १५४ ।।'**

अर्थात बटू वामनाने त्रिभुवन व्यापून टाकावे, तद्वत या वामनाच्या 'वामन' कथेत (स्फुट लघुकथेत) आद्यंती पुण्यभावच व्यापून राहिल्याचा भाव वामन पंडित 'वामन' असा श्लेषगर्भ शब्द वापरून प्रकट करतात.

**वेदांत-दर्शन**

**१) दर्पण बिंब :** वामन पंडितानी आपल्या कथेत वेदांतशास्त्रातील पारिभाषिक दृष्टांत व संकेत शब्द सहजी वापरलेले दिसतात. उदा. आपल्या कथेचे नावच त्यानी 'नृहरिपर्दण' असे दिले आहे. म्हणजे कथाशीर्षकातच वेदांतातील बिंबप्रतिबिंबवाद ते सांगून जातात. हे विश्व म्हणजे प्रत्यक्ष 'नृहरिदर्पण' च आहे. विश्वाच्या आरशात त्या नृहरीचेच प्रतिबिंब पडले असून, ज्ञानेशांचा चिद्‌विलासवाद इथे सहजी जाणवतो.

**२) द्वैतभाव :** प्रल्हादमुखाने त्यांनी भ्रांती म्हणजे कल्पना आणि कल्पनेचा प्रभावही ते सांगतात. 'स्व-पर' हा द्वैतभाव असून, हीच भ्रांतीची उकळी आहे. 'स्वपर म्हणजे भ्रांति उकळी ।' या द्वैताच्या 'कली' मुळेच देव असुरादिकात 'कळी' म्हणजे भांडण उत्पन्न झाले आहे.

**'कळी ईच्या मूळी असुर अमरी आणि सकळी ।।' ३४ ।।**

मोहरजनी, स्वैरमाया, स्ववशकरी इ.-शब्द वेदांती परिभाषा दाखवितात.

**३: तंतूपट दृष्टांत**

वामन पंडित वेदांतशास्त्रातील तंतूपट दृष्टांत मांडून लिहितात की, -

**'हरी तंत आड त्रिभुवन पटाचा पदर जी ।।५।।'**

**'सर्व वासुदेव विश्वपटी स्वयमेव तंतुतोचि वसतो ।।** इ. या शिवाय

**'सरे द्वैतभ्रांती स्व पर अनुसंधान विसरे ।।५८।।'**

**'स्तंभी दारूरूप दारूमध्ये चित्स्वरूप ।**

**थिजले तथापि तूप रस तो न नासतो ।।'** इ. वेदांती निर्देश वामनपंडितांच्या कथाबांधणीत सहजी येतात.

**लोकसंकेत-श्रद्धा**

वामन पंडितानी आपल्या कथेत लोकश्रद्धासंकेतांचा निर्देशही यथास्थान केलेला दिसतो. उदा.

१. जुळया भावंडात प्रथम जन्मलेले मूल हे लहान भावंड आणि नंतर जन्मलेले मूल हे मोठे (वडील) मानले जाते. शास्त्राधार देऊन पंडित लिहितात की,

**'प्रथम उपजला तो धाकुटा बंधु होतो ।।१४।।'**

**'रेतबिंदु पहिला स्थिर होतो । जन्मतो तनुज मागुती हो तो ।।**
**अग्रजन्म उदरात जयाला । अग्रजत्व ऋषि वदेति तयाला ।।१७।।'**

२. एखाद्या कार्यासाठी सिद्ध होणे याअर्थी 'शड्डू ठोकून उभे राहाणे' असा वाक्प्रचार संकेताने सर्वमान्य आहे. हिरण्यकश्यपूच्या संदर्भात वामन पंडित लिहितात -

**'दाखवी त्वरित ठोकुनि मांडी । द्वेष विष्णुचरणाप्रति मांडी ।।१८।।'**

३. दैवी आकाशवाणीचा संकेत मुळाप्रमाणे वामनानेही निर्देशिला आहे.

**'तो बोलिली ते अशरीर वाणी ।।२१।।'**

अर्थात संत्रस्त देवसमूहाना अशरीरिणी वाणी नाभिकाराचे आश्वासन देते.

४. कुळात सत्पुत्र जन्मास आला तर २१ पिढ्यांचा उद्धार होतो आणि मुलगी जन्मास आली तर ४२ पिढ्या उद्धरतात हा लोकसंकेत प्रल्हादाच्या संदर्भात पंडित सांगतात –

**'एकवीस निज पूर्वज सारे । उद्धरी सुत वितां तुजसा रे ।।१५०।।'**

५. मृताची उत्तराक्रिया यथासांग केल्याने त्यास सद्‌गती प्राप्त होते हा शास्त्रसंकेत हिरण्यकश्यपूच्या संदर्भात नृसिंहप्रभु प्रल्हादास सांगतात –

**'सत्क्रिया करि तथापि तयाची ।।१५०।।'**

## सुंदर,सुरस भावानुवाद

वामन पंडिताच्या कथेत मूळ भागवतीश्लोकांचे सरस सुंदर असे भावानुवाद प्रकटले असून हे देखणे श्लोकबंध त्यांच्या भाषाप्रभुत्वाच्या दृष्टीने लक्षणीय ठरतात.

उदा. १) **'तेषामाविरभूद्वाणी अरूपा मेघनिस्वनः ।।७.४.२४।।'**
**'तो बोलिली ते अशीरर वाणी ।।२१।।**

२) **'प्रल्हादाय यदा द्रुह्येद्धनिष्येऽपि वरोर्जितम् ।।७.४.२८।।'**
**तथापि मारीनचि दुर्धरा या । गांजील माझ्या जयि भक्तराया ।।२२।।'**

३) **'दैतेय चंदनवने जातोऽयं कण्टकद्रुमः ।**
**यन्मूलोन्मूलपरशोर्विष्णोर्नालायितोऽर्भकः ।।७.५.१७।।'**
**'बाभूळ हे चंदन काननाशी । नाशील भेटोनि निरंजनासी ।।३९।।'**
**प्रल्हाद हा विष्णु कुठार दंड । दंड प्रसंगे असुरा उदंड ।।४०।।'**

४) **'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।**
**अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।।७.५.२३।।'**
**'श्रवण हरिकथेचे कीर्तनी गात जावे । स्मरण चरणसेवा अर्चनीही भजावे ।।**

करूनि मननदास्ये सख्य आत्मार्पणाते । करूनि तरति वाटे सार हे आपणाते
।। ४५ ।।'

**नाट्यपूर्ण संवाद-पेरणी**

भाषाप्रभू वामन पंडितांनी श्लोकबद्ध रचनेतूनच संवादमांडणी केली असून, त्यातील वाक्यांशावरून आपणास हिरण्यकश्यपू व प्रल्हाद या व्यक्तींचा बोध होतो. उदा.

**'अरे ! कोठे तुझा देव ? म्हणे सर्व वासुदेव ।'**

**'मजसमोर हा खांब यांत कैसा असतो ? ।।'**

**'म्हणे स्तंभी दारूरूप दारूमध्ये चित्स्वरूप ।।'**

**'तरी दिसेना का मज ? म्हणे भजोनिया समज ।।५७।।'**

**'असे कोठे तो रे तुज बहुत ज्याचे भरवंसे ?**

**'वसे सर्वाठायी स्थिरचरपटी तंतु गवसे ।**

**दिसेना का स्तंभी ? मज दिसतसे तो नरहरी ।।९९।।'**

**४ : आनंदतनय - विदग्ध पंडिती-कथा**

आनंदतनयाने ५९ कडव्यांची प्रल्हाद चरित्रकथा लिहिली असून, त्याने शार्दूलविक्रीडित, भुजंगप्रयात, वसंततिलका इ. वृत्तातून ही कथाबांधणी केली आहे. कथेच्या प्रारंभी पहिल्याच श्लोकात कथासंदर्भ, कथाप्रयोजन आणि फलश्रुती इत्यादींचा निर्देश करून त्याने लगेच मुख्य कथानिवेदनालाच हात घातला आहे. कसलाही प्रास्ताविक पाल्हाळ न लावता, दुसऱ्याच श्लोकापासून प्रल्हादकथा सुरू होते. प्रल्हादाच्या जन्मापासून सर्व कथा आटोपशीरपणे मांडून शेवटच्या अटीतटीच्या संघर्षबिंदूवर कथा येते तेव्हां पितापुत्रांचा निर्णायक संवाद सुरू होतो. वामन पंडिताप्रमाणे आनंदतनयाने देखील हा नाट्यपूर्ण संवाद वृत्तबद्ध रचनेतूनच साक्षेपाने मांडला आहे. संतप्त हिरण्यकश्यपू विचारतो की,

**'आहे आता सांग कोठे हरी रे ।।५१।।'**

**'आहे स्तंभी सत्य जाणा गिरा हे ।।५१।।'**

प्रल्हादाचे उत्तर येताच तो खांबावर ताडकन लाथ मारतो आणि त्या क्षणी तडिताघाताप्रमाणे कडाड कडकड असा भयंकर नाद होऊन, त्या स्तंभातून 'नरकेसरी' प्रकट होतो. हिरण्यकश्यपूला धरून मांडीवर घेऊन ठार मारले जाते. आनंदतनय लिहितो की,

**'देवे दानव मारिला धरूनिया मांडीवरी चीरिला ।।५६।।'**

अर्थात त्यामुळे एकाच वेळी दैत्यनिर्दळण आणि भक्तसंरक्षण अशा दोन्ही गोष्टी घडून येतात. कथेत सुखांत घडून येतो आणि कथा विरामते.

## उपक्रमोपसंहार

आनंदतनयाने अवांतर वर्णनाचा कसलाही पाल्हाळ न लावता, एक नेटकी, पद्यबद्ध स्फुट कथा सफाईदारपणे उभी केली आहे. उपक्रमोपसंहाराच्या दृष्टीने तर कथाबांधणीचे स्वरूप रेखीव असून 'जे वंद्य पुण्यार्चिली ।। ११ ।।' अशी ही कथा 'पापहरणा' अशा समारोपाकडे येते. आरंभ आणि शेवटाची गाठ पक्की होऊन भक्तीचा एकच एक प्रभावी ठसा वाचक श्रोत्यांच्या मनावर कोरला जातो.

## पात्रविचार व संघर्ष

या कथाबांधणीतील पात्रांचा विचार करता, हिरण्यकश्यपू आणि प्रल्हाद अशा दोनच प्रमुख पात्रातून कथा चढत जाते आणि या दोन्ही पात्रांची गाठ शेवटी 'नृसिंह' या दैवी अवताराशी पडते आणि कथा विरामते. म्हणजे कमीत कमी पात्राद्वारे, मोजक्या प्रसंगांतून एका निग्रही बालकाची अनन्यभक्ती इथे प्रभावीपणे मांडली जाते.

यातील संघर्ष क्रमाक्रमाने वाढत जाऊन, हिरण्यकश्यपूने खांबावर लाथ मारण्यापर्यंत वाढत जातो. एकाच वेळी, या चरमबिंदूपाशी 'परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।' अशा दोन्ही क्रिया घडून येतात. भक्त आणि भगवंत यांच्या अंतर्बाह्य प्रेमाची साक्ष या रोकड्या प्रचितीने समूर्त होते. भक्तीच्या परिणतीचा वेध घेणारी ही कथा भक्तोद्धाराच्या पूर्णविरामाशी थांबते.

आटोपशीर कथेच्या दृष्टीने ही रचना विलक्षण चिरेबंदी, घडीव आणि रसाळ अशीच आहे. पंडिती पगडी बांधलेल्या या वृत्तबद्ध कथेचा डौल मोठा झोकदार असाच आहे. यत्र तत्र वृत्तदोष किंवा अक्षरमात्रांचे दोष दिसत असले तरी तंजावरसारख्या अमराठी प्रांतातील उच्चार प्रथेमुळेदेखील असे प्रमाद उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. कानडी भाषेतील 'तुंब' म्हणजे भरणे हा शब्दही त्याने वापरला आहे. उदा. 'श्रवण युगुळ माझे 'तुंब' रे नाववीतो ।।३३।। अर्थात कथानिवेदनातही कानडी वळण जाणवत राहाते.

## काव्यरम्य प्रतिमांकन

आनंदतनयाच्या वृत्तबद्ध कथेत प्रकटलेले काव्यरम्य प्रतिमांकन देखणे असून, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती आणि रसनिर्मिती याचे पूर्ण अवधान ठेवून आशयाचा प्रभावी ठसा उमटविणाऱ्या सार्थ सुंदर प्रतिमा त्याने सहजी प्रकट केलेल्या दिसतात. त्यात त्याची सूक्ष्म निरीक्षणक्षमता, वेधकता, सूचकता आणि यथार्थता दिसून येते. उदा. हिरण्यकश्यपूसंबंधी त्याने १) **'जैसा पावक पर्वती'**

२) **'पतग '= खगपती.**

३) **'कोपोनि हस्तीपरी ।'**

अशा प्रतिमा मांडल्या आहेत. त्यातून त्या दैत्याची उग्रभीषण दाहकता, क्रुद्धतेचा आवेग आणि मदोन्मत्त अविचारीपणा सहजी जाणवून जातो. या उलट –

हिरण्यकश्यपूच्या तुलनेने बालभक्त प्रल्हाद हा अगदीच नाजूक कोमल असून त्याच्यासाठी 'जैंसे पुष्प पडे अवनी ।' अशी सार्थ भावकोवळी प्रतिमा तो वापरतो. दोहोतील हा प्रचंड विरोधाभास काव्यसौंदर्यात भर टाकतो.

दुसरीकडे हिरण्यकश्यपूसारख्या अजस्त्र पर्वतप्राय क्रूर दैत्यासमोर त्याहून समर्थ उग्रभीषण प्रतिस्पर्धी अशी प्रतिमा उभी असणे आवश्यक असल्याने आनंदतनयाने –

१) **'वैकुंठीचा केसरी'**

२) **'गोळा जसा यंत्रिचा'**

अशा विराट आणि समर्थ प्रतिमा उभ्या करून, प्रतिशक्तीचे प्रभावी अवतरण साधले आहे. अशा ठिकाणी कवीचे प्रतिभासामर्थ्य आपणास विशेष जाणवते. अशा चित्रदर्शी प्रतिमातून फार मोठा आशय तो बोलका करतो. आनंदतनयाच्या प्रतिमांकनात अवतीभवतीच्या जीवनाचे पडसाद उमटले असून – तोफांचे गोळे, युद्ध, हत्ती, कडेलोटाची शिक्षा इ. गोष्टी वास्तवातील दिसतात. त्याच्या सजीव सुंदर अशा काही प्रतिमांचे आस्वादन पुढीलप्रमाणे

**(अ) 'जैंसा पावकपर्वती तृणलता जाळी ।।२९।।'**

हिरण्यकश्यपूचे क्रोधसंतप्त रूपदर्शन घडविताना आनंदतनयाने ही प्रतिमा उभी केली आहे. आपला पुत्र ॐकाराविना दुसरे कांहीच म्हणत नाही, अशी तक्रार प्रल्हादाचे गुरू करतात. याला शिकविणे – 'माझ्याकरे होइना ।' असे त्यांनी हात टेकल्याचे समजताच, वरील प्रतिमेतून हिरण्यकश्यपूचा संताप तो सहजी दाखवून जातो. प्रल्हादासारख्या कोवळया मुलावर, प्रत्यक्ष पोटच्या गोळयावर संतापलेला राक्षसी बाप आणि त्याची जीवघेणी क्रूर दुष्कत्ये पाहाता 'तृण-लता' आणि 'पावक पर्वती' या प्रचंड विरोधी प्रतिमातील अर्थगर्भता विलक्षण प्रत्ययकारी आणि वास्तवपूर्ण वाटतात. ज्या वर्णनासाठी गद्यलेखनात परिच्छेदच्या परिच्छेद खर्ची घालूनही जो प्रभाव उत्पन्न करता आला नसता, तिथे आनंदतनयाने आपल्या पद्यबांधणीत दोन सूचक प्रतिमातून फार मोठा आशय संपृक्त केला आहे.

**(ब) पन्नग देखुनी पतग ।।३६।।**

प्रल्हादास गुरूने कोणती विद्या शिकविली हे हिरण्यकश्यपू विचारतो तेव्हा ॐकाराशिवाय दुसरी विद्याच नाही, आणि ॐकारस्वरूपी विष्णूचे मी रात्रंदिवस ध्यान करतो (श्लो. ३४) असे सांगतो तेव्हा तो संतापाने उसळतो. प्रचंड कडकडाट करून वीज कोसळावी तशी गर्जना करीत हिरण्यकश्यपू त्याच्या अंगावर धावून जातो (३६) आणि रागाच्या भरात प्रल्हादाच्या मस्तकावर लाथ मारतो. हा भयकंपित प्रसंग चित्रित करताना आनंदतनय एक प्रतिमा उभी करून लिहितो की, –

**'किंवा पन्नग देखुनि पतग ती मारी जसा झेप जी ।**
**तैंसा सत्वर धाउनी सुतशीरी हाणीतली लात जी ।।३६।।**

इथे हिरण्यकश्यपूस प्रल्हाद हा शत्रूची भक्ती करणारा असल्याने ठेचून काढण्यायोग्य वाटतो. त्यामुळे तो सापासारखा असून, त्याच्यावर झडप घेणारा हिरण्यकश्यपू गरुडासारखा कल्पिला आहे. अर्थात विष्णूवाहन गरुडाची प्रतिमा या दुष्ट दैत्यास समर्पक नसली, तरी क्रुद्ध गरुडाचा आवेग, नेमकी सर्पमस्तकाचा वेध घेऊन बळकट पंजानी प्रहार करण्याची कृती प्रस्तुत लाथ मारण्याच्या क्रियेशी समांतर कल्पून, त्याने ही प्रतिमा उभी केली आहे.

इथे या प्रतिमेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे 'सुतशिरी लाथ' मारण्याची क्रिया कथेच्या शेवटी खांबातील भगवंतावर लाथ मारण्याची पूर्वक्रियाच ठरते. पण या पूर्वक्रियेत प्रथम भक्ताला (भक्त प्रल्हादास) लाथ मारली जाते. त्यामुळे भक्तरक्षक भक्ताभिमानी भगवंत ते कदापि सहन करीत नाही. त्यास स्तंभातून प्रकट व्हावेच लागते. ही अर्थघनता वरील प्रतिमेतून अधिक प्रभावी बनते.

**(क) 'जैंसे पुष्प पडे झडोनि अवनी ।।४२।।'**

बालभक्त प्रल्हादाच्या 'कडेलोट' प्रसंगी आलेली ही सार्थ प्रतिमा असून उंच झाडावरून एखादे इवलेसे फूल अलगदपणे खाली यावे, तद्वत प्रल्हाद उंच कड्यावरून खाली आला असे सांगण्यात दोघातील नाजुक कोमलता त्याने नेमकी हेरली आहे. प्रल्हादाचे बाल वय, त्याचा सुकुमार कोवळेपणा, त्याचे गुणसुगंधी व्यक्तिमत्त्व इ. गोष्टी बरोबरच अशा निष्पाप निरागस लहान मुलास उंच पर्वत-कड्यावरून खाली खोल दरीत जबरदस्तीने ढकलून देण्याची कठोर शिक्षा, असा विरोध, चित्रदर्शी करताना आनंदतनय लिहितो

**'जैंसे पुष्प पडे झडोनि अवनि राया तरूपासुनी ।**
**तैंसा त्वत्सुत पर्वती ढकलिता आला अजि मेदिनी ।।४२।।**

इथे प्रल्हादास कोणतीही इजा न होता, तो सुखरूप राहिलेला पाहून दैत्य सेवकांचा झालेला चडफडाट त्यांची अगतिक अस्वस्थता, आश्चर्यचकित भय कंपितताही जाणवून जाते.

**(ड) कोपोनि हस्तीपरी**

संतापाने चिडलेला हिरण्यकश्यपू खांबावर लाथ मारण्यास उद्युक्त होतो, त्यावेळचा त्याचा नेमका आविर्भाव टिपताना धडक देणाऱ्या हत्तीची प्रतिमा ('कोपोनि हस्तीपरी') वापरून दैत्याचे अवाढव्य राक्षसी स्वरूप त्याच्या मत्तपणासह उभे केले आहे. त्यातून अविवेकी अनाचाराचे चित्र अधिक गडद होते. हत्तीचा काळाकभिन्न अजस्त्रपणा, त्याची मस्तावलेली धुंदी आणि मोकाट स्वैराचार हिरण्यकश्यपूच्या बाबतीत समांतरपणे जाणवतो. आनंदतनय लिहितो,

**'ऐंसे ऐकुनि दानवेश उठिला कोपोनि हस्तीपरी ।।५२।।**

अर्थात 'आंगचा आणि बळाचा' दानवेश कोपोनि उठला असून, पिसाट हत्तीला

ज्याप्रमाणे ताळ्यावर आणण्याचे सर्व उपाय थकल्यानंतर शेवटी त्यास ठार मारण्यावाचून गत्यंतर उरत नाही, अगदी तसेच हिरण्यकश्यपूच्या बाबतीत घडते. या दृष्टीने ही प्रतिमा अत्यंत सारगर्भ आणि अर्थपूर्ण असल्याचे दिसून येते.

## (इ) वैकुंठिचा केसरी

आनंदतनयाने दैत्याच्या बाबतीत 'मस्त हस्तीची' प्रतिमा उभी केली आहे तर त्या हत्तीच्या विरोधात 'वैंकुठिचा केसरी' म्हणजे सिंहाची सार्थ समर्थ प्रतिमा उभी केली आहे. मदोन्मत्त हत्तीला ठार मारणारा वनकेसरी सिंह त्याने नृसिंह अवतारात अभेदाने दृश्यरूप केला आहे.

सिंहाचा उग्रभीषण आविर्भाव त्याची तीक्ष्ण खरनखर नखे, अणुकुचीदार सुळे भयंकर भेसूर जबडा, विस्फारलेली आयाळ, हत्तीच्या गंडस्थळावर झडप घेण्याचा पवित्रा, हृदयविदारक सिंहगर्जना, स्वयमेवमृगेंद्रत्व आणि अंतिम विजयाची खात्री इ. विविध गुणसमुच्चयाचे दर्शन आपणास 'वैकुंठिचा केसरी' या प्रतिमेतून घडते. हा केसरी 'वैकुंठीचा' असल्याने रौद्रभीषण असूनही सात्त्विक, पवित्रआणि आश्वासक वरदान देणारा असाच वाटतो.

हा वैकुंठिचा दिव्यकेसरी प्रकट होताच कोटी सूर्यांची प्रभा तळपून उठते. कोट्यवधी विद्युल्लतांचा लखलखाट व्हावा तसा लखलखाट होतो. ही प्रतिमा पूर्ण साकार करताना आनंदतनय लिहितो -

**'स्तंभापासुनि बाहेरी उसळला वैकुंठिचा केसरी ।**
**जैसें कोटी रवी नभी उगवले पूर्वेस एकेसरी ।।**
**किंवा कोटी तडिल्लता चमकल्या त्या मेघमाळांतरी ।**
**तैंसा तो नरकेसरी प्रकटला वेगेची भूमीवरी ।।५४।।**

## गोळा जसा यंत्रिचा

दुभंगलेल्या खांबातून भयंकर गर्जना करीत नरकेसरी प्रकटला तेव्हा आनंदतनय लिहितो की,

**'जंभा देत उकावला नरहरी गोळा जसा यंत्रिचा ।।५५।।'**

अर्थात विशाल जबडा पसरलेला, लालेलाल रक्तासाठी लळलळणारी लाल जीभ आणि क्रोधांगाराने क्रुद्ध झालेली लाल डोळयांतील आग इ. सारे लाल 'रंगाचे रूपचित्र उभे करताना 'गोळा जसा यंत्रिचा' अशी सार्थ प्रतिमा तो उभी करतो. अर्थात बत्ती दिलेल्या तोफेच्या तोंडातून स्फोट गतीने उसळणारा लालबुंद लोहगोळ आग ओकीत शत्रूवर कोसळावा तसे वास्तवपूर्ण दर्शन इथे तो घडवितो.

## ६ : गुरूदास -'कडाका' छंदातील शाहिरी थाटाची कथा

प्रस्तुत प्राचीन मराठी कथासंचात आलेली गुरूदासाची प्रल्हाद कथा ही 'कडाका'

छंद रचनेमुळे एकदम वेगळेपणाने उठून दिसते. कडाका छंदाचा हा थाट आणि घाट शाहिरी कवितेचे स्फुरण जागवितो. 'कडाका' हा शब्ददेखील पोवाडा या अर्थाने वापरलेला दिसतो. अग्नीदासाच्या अफझुलखान वधाच्या सर्वात जुन्या पोवाड्यात 'एका तडाक्याने 'कडाका' गाईला' असा शब्द येतो. रामदासांनीदेखील दासबोधात 'कडक' शब्द योजला आहे.

**'नाना पदे नाना श्लोक । नाना वीर नाना कडक ।।** दास. द. १२ स. ५।।'

'कडाका हा शब्द 'कडका - करका' असा मूळ हिंदी असून, त्याचा अर्थ पराक्रम असा होता. पुढे पराक्रमगीत या अर्थाने तो हिंदीत रूढ झाला. 'कडका' गीते ही षण्मातृक आवर्तनी आहेत.'[१६]

गुरूदासाच्या कथेचा 'कडाका' वृत्तरचनेचा विशेष पाहून वि. ल. भावे म्हणतात— 'या वृत्तात असा गुण आहे कीं, त्यात एक तऱ्हेचा ठेका वाचताना सहज येतो. त्यात अर्थाबरोबर शब्दचमत्कारही आपोआप साधला जातो. त्यामुळे वाचकांच्या व श्रोत्यांच्या मनाप्रमाणेच त्यांच्या शरीरालाही आनंद होतो. यात एक तऱ्हेचे कर्णद्वारा अनुभवता येणारे असे शारीरिक सुख आहे......

कडाका छंदातल्या पद्यात तर हा विशेष प्रकर्षाने दिसून येतो. किंबहुना, हा ठेका हेच या कडाका छंदाचे वैशिष्ट्य आहे.'[१७]

## चौदा चौकड्यांची कथा

गुरूदासाने कडाका छंदातून चौदा चौकड्यांच्या चौदा चौकातून चित्रपटांप्रमाणे सरकती चौदा क्षणचित्रे उभी केली आहेत. त्यातून एक वाचकांना खेचून घेणारा ओघ आहे. वि. ल. भावे यांनी अमृतरायासंबंधी म्हटलेले शब्द गुरूदासच्या संदर्भात लक्षणीय ठरतात. ते म्हणतात - 'प्रासानुप्रासांची जुळणी अशी मोहक रीतीने केली आहे. की, एखादे वेळी अर्थही न कळला तरीदेखील त्या शब्दाच्या नुसत्या नादावरच चित्त डोलू लागते. श्रवणमात्रेकरून आनंद उत्पन्न व्हावा व शब्दालंकाराने मनुष्याचे मन तन्मय होऊन जावे अशी त्यांची रचना गोड, खुबीदार व प्रलोभक आहे. शब्दांची ठसकेदार ठेवण, वाक्यांची डौलदार धाटणी आणि वस्तुस्थितीचे हुबेहूब वर्णन यामुळे व अक्षरांच्या ठेक्याने मन तल्लीन होते.'[१८]

## भक्तिरस मंदाकिनी

गुरुदासाने आपल्या चित्रदर्शी कथेतून रसाविर्भावाचे तेजस्वी दर्शन घडविले आहे. त्यात मुख्यतः आद्यंती भक्तिरसमंदाकिनी सळसळत असून, त्यात अन्य रसांचाही अंतर्भाव झालेला आहे. भक्त प्रल्हादाचे व्यक्तित्व हे मूर्तिमंत भक्तिरसाचे सगुणसाकार रूप असून, 'कृष्ण विष्णु गोविंद' यांवाचून त्यास काहीही सुचत नाही. जीवघेण्या भयंकर दिव्यातही त्याची भक्ती ढळत नाही. भक्तिरसाच्या आविर्भावासाठी आवश्यक ठरणाऱ्या नामस्मरण, संतसंग, परमार्थसाधन, नरदेहाची नश्वरता, क्षणभंगुरता, ऋषिमुनी

साधुसंताचे आदेश इ. गोष्टींचा निर्देश त्याने साक्षेपाने केला आहे. तो लिहितो-

**'हरि आळवोनी गज तरला ।**

**पहा पहा आळवोनी गज तरला ।।३।।'**

**'ज्यासि भाव जैंसा । तयासी तैसाच साच । संतानरूप हरि कळला ।।४।।'**

**'भूतटस्य भव संकटासि हरि सत्कटाक्ष करि ।**

**वेंकटाद्रि विभु गमला । उतरे वेंकटाद्रि विभु गमला ।।६।।'**

भक्त वत्सल भगवंत हा 'उत्तर तो उपमेसि निराळा ।' असाच असून, तो अजरामर आहे. तसेच न फुटे न तटे, न घटे, न विटे असे त्याचे स्वरूप असून, तो नामरूपातीत आहे (११). अशा त्या भगवंताच्या मांडीवर बाल प्रल्हाद बसतो तेव्हां त्या धन्य रमणीय क्षणी भक्तीचा कारंजाच नाचू लागतो. गुरुदास लिहितो-

**'कमलापति अंकि तदा बसली । सुरमंडलि निर्भय उल्लसली ।।१४।।'**

आणि शेवटी - 'तू भक्तराज मज पहिला ।' असे भगवंतानी धन्योद्‌गार काढताच त्या भक्तिरसाची परिपूर्ण परिणती झालेली दिसून येते.

**रौद्र भयाक रसदर्शन**

भक्त प्रल्हादाच्या विरोधात दैत्येंद्र हिरण्यकश्यपूच्या रूपात खळ रौद्रत्वच वावरत असून, तो 'प्रमधांधु' (११) आहे, तो 'महाबह खळ,' द्वेषी आहे. त्यास 'बलदर्प' असून, हुंकारासरशी सर्व देवांना जिंकून टाकण्याचा त्यास अहंकार आहे. आपला धाक दाखवताना तो म्हणतो.

**'मम हुंकृतिने करि देव धाकले ।।१०।।'**

पुढे उग्र नृसिंह अवतार प्रकट होतो. ते क्षणचित्र म्हणजे मूर्तिमंत रौद्ररसाचे दर्शनच होय. गुरूदास लिहितो -

**'खांब कडाडि गडाडित तो रव भैरव ।**

**ये हरि वक्र नरोत्तम गात्र तटि जई वस्त्रसुती ।**

**क्षण नखांकुश राजित । शंख चक्र कर धगधगले ।।**

**तव खग शशि भगणहि लगबगले । मग खगमृग डगडिग तगबगले ।**

**नग पन्नग दिशापति उगमगले । बहुत उबगले खळ दगदगले ।।१२।।**

**धरि हरि बगले । पिळि रगत गळे ।**

**मांडियेवरी चिरोनि घेतला । शोधत ज्जठर मेद धुतला ।।१३।।'**

त्या प्रचंड उग्रदर्शनाने देवही घाबरून जातात 'व्यग्र चित्त सुर जाहले गोळा ।।१४।।' असे लिहून सत्वसंपन्न, शांत विष्णुमूर्तीदेखील किती प्रचंड रौद्र भीषण बनते याचे विस्मयचित्र इथे दिसून येते.

गुरूदासाने आपल्या कडाका छंदात अनेक ठिकाणी सुंदर प्रतिमाशिल्पे कोरली असून, त्यातून त्याच्या प्रतिभेची चमक दिसून येते. काही प्रतिमाचित्रे पुढीलप्रमाणे -

**१) वेंकटाद्रिविभु ।।६।।**

'कडेलाट' शिक्षेच्या प्रसंगी प्रल्हाद प्रार्थना करतो की, 'हे धराधर धरी म्हणे मला ।।६।।' अर्थात धराधर म्हणजे धरेला धारण करणारा भगवंत. दुसरा अर्थ पर्वत. चराचरातही भगवंत असल्याने धराधर, पर्वतरूपी नारायणास तो प्रार्थना करतो. म्हणजे पर्वतावर पर्वताची प्रार्थना करतो, आणि पर्वतावर राहाणार परमेश्वर ('वेंकटाद्रिविभु') त्याक्षणी त्याचे संरक्षण करतो. तंजावरकडील गुरूदासाने तिरूपतीच्या 'वेंकटाद्रिविभु' चा निर्देश करावा यातील औचित्यपूर्ण काव्यरम्यता खरोखरीच वेधक आणि हृद्य आहे.

**२) दिव्यकंठ हर निमला ।।७।।**

'विषप्रयोग' शिक्षेच्या प्रसंगी प्रत्यक्ष माता कयाधूकडून प्रल्हादास विष देवविण्यात क्रौर्याचा आणि देवद्वेषाचा कडेलोट होतो. अर्थात निर्भय प्रल्हाद शांतपणे विषपान करतो. त्याप्रसंगी 'दिव्य कंठ हर निमला ।' अशी प्रतिमा गुरूदासाने उभी केली आहे. अर्थात काळकूटासारखे विष रामनामप्रतापाने प्राशन करणारे शिवशंकर आणि नामस्मरणातच दंग असणारा प्रल्हाद यांच्यातील नामभक्तीचे साम्य हेरून नामाचा अद्‌भुत महिमा तो प्रभावीपणे उभा करतो.

**३) पद्मपत्र न भिजे जळांतरी ।।७।।**

सागरात बुडवून मारण्याच्या कठोर शिक्षेच्या प्रसंगी 'पद्मपत्रमिवाम्भसा' सारखी सार्थसुंदर प्रतिमा विलक्षण वेधक ठरते. जीवनात राहून जीवनाने वेगळी दिसणारी विरक्तवृत्ती इथे भक्त प्रल्हादाचे अंतर्बाह्य प्रसन्न दर्शन घडविते.

**४) प्रेमरसे जसि गाय शिशुवरी वोरसली ।।१४।।**

हिरण्यकश्यपूच्या भीषण वधानंतर उग्र नृसिंहमूर्ती एवढी भयंकर भासते की त्यांच्यासमोर जाण्याची हिंमत देव - मानव कोणातही राहात नाही. तेव्हा व्यग्रचित्त देव प्रल्हादालाच पुढे करतात. भक्त प्रल्हाद निर्भयकपणे पुढे जातो आणि थेट नृसिंहप्रभूंच्या मांडीवर जाऊन बसतो. बस ! त्याक्षणी उग्रमूर्ती शांत सौम्य होते. या क्षणी हे आश्चर्य कसे दिसले ? गुरूदासाने 'गोवत्स' प्रतिमेतून नेमके सर्वभाव तंतोतंत उभे केले आहेत. भक्त-भक्ती-भगवंत यांच्यावर महाभाष्ये लिहूनही अपुरे वाटणारे असे पुष्कळसे काही इथे गुरूदास नेमकेपणाने दाखवून देतो.

सर्वविनाशाच्या मुळाशी असणा क्रोध व त्याचे स्वरूप स्पष्ट करताना 'राग रूपी कुतरा ।।२।।' अशी सार्थ प्रतिमा वापरली आहे, तर प्रचंड अग्निदिव्यातून बाहेर आलेल्या शांत, प्रसन्न प्रल्हादाच्या मुखचंद्राकडे पाहून-

'दिवसा पूर्णचंद्र घवघविला ।।९।।' असे तो म्हणतो.

अशा रीतीने गुरूदासाच्या प्रतिमांकित शब्दकळेत अर्थसघन अशी मंत्रशक्ती भरली असून चित्रदर्शी देखणेपणही दिसून येते.

**७) रामनाथ - राजदरबारी कथा**

रामनाथाची प्रल्हाद - कथा ही नाट्यपूर्ण संघर्षात्मक क्षणचित्रे टिपणारी असून, मुळात ही कथा 'देव - दानव' अशा सनातन संघर्षावर उभी आहे. पण त्याखेरीज –

१. हिरण्यकश्यपू प्रल्हादाच्या गुरूलाच धारेवर धरून, तुला शिक्षा करीन असा दम भरतो. तेव्हा षंडामर्क गुरूची गाळण उडते. अविवेकी, उन्मत शासन केव्हा कोणास दोषी ठरवेल याचा नेम नाही. मग भीतभीतच श्लेषगर्भतेने प्रल्हादास 'कृष्णमाया' - भोवली असल्याचे सांगतो. अर्थात कृष्णाची कुटिल माया आणि कृष्णप्रेम अशा दोन अर्थाची वलये इथे प्रकटतात.

२. अविवेकी सत्ताधाऱ्यास चेतनाचेतनाचाही विवेक कसा राहात नाही याचे क्षणचित्र मांडताना हिरण्यकश्यपू निर्जीव खांबावरच वज्रमुष्टीचा प्रहार करतो असे रामनाथ लिहितो. 'स्तंभातरी कां न दिसे म्हणोनि। खड्गमुष्टी दनुजेंद्र हाणी ॥३५॥' **इथे खांबावर लाथ मारण्याऐवजी खड्गमुष्टीचा निर्देश असून, त्यातून प्रत्यक्ष युद्धसंघर्षाचे आव्हानच उभे ठाकते.**

३. हिरण्यकश्यपू तलवार घेऊन नृसिंह प्रभूंशी घनघोर युद्ध करतो.

**'दोघांसि तै बहुत काळ सुयुद्ध झाले ।।४२।।'**

या प्रत्यक्ष युद्धामुळे कथागत संघर्ष नाट्य अधिकच उग्र भेदक बनते.

**सार्थसधन प्रतिमांकन**

रामनाथ हा तंजावर येथील अव्वल दर्जाचा पंडित कवी असून, त्याच्या प्रतिमांकनातून त्याच्या दीर्घव्यासंगाचेही आपणास दर्शन घडते. त्याच्यापुढील प्रतिमा खास लक्षणीय ठरतात.

१. '**।। कांतार दावरिपु** ॥२१॥'

पापरूपी अरण्याचा भडकलेला अग्नी गिळून टाकणारा 'श्रीकृष्ण' अशी स्तुती तो मांडतो. त्यातून 'दुरिताचे तिमिर जावो' ही ज्ञानेशोक्त प्रार्थना सहजी स्मरणात येते.

२. **'।। शिखि शरच्चंद्रापरी जाहला ।।२९।।'**

प्रल्हादास जाळून मारण्यासाठी पेटवलेला धडाड अग्नी शारदीय चंद्राप्रमाणे शीतल झाल्याचे रामनाथ सांगतो. प्रचंड अग्नी आणि आल्हादक शीतलता हा विरोधाभास रसिकांच्या अग्निपरीक्षेलाही शांत करणारा वाटतो.

श्रीहरीच्या मुखाची 'चंद्रायुक्त कांती ॥ पद १॥' किंवा 'ताराधिराजप्रमुख ॥२१॥' अशा चंद्रसंबध्द प्रतिमा तो वापरतो तर उग्र नृसिंहमूर्तीसाठी 'प्रलयविशिख' तैसा अशी प्रळयाग्नीच्या ज्वाळेची प्रतिमा वापरतो.

अशा रीतीने व्यक्ती, घटना व प्रसंगातील नेमका आशय समूर्त करण्याचे सामर्थ्य त्याच्या समर्थ प्रतिमातून दिसून येते.

**संस्कृतप्रचुर समासांकित शब्दकळा**

रामनाथाच्या कथेत पंडिती वळणाची प्रौढ, समासांकित संस्कृतमंडित शब्दकळा सहजी दिसून येते. विदग्ध भाषाशैलीचे हे दर्शनही विलोभनीय आहे.

उदा. **शेषोद्यत्फणमणिद्भासि, सिंहासुरारि, वार्राशिदर्पहर तदीय,**

**हिरण्यपूर्ण कशिपू तत्पूर्व नेत्राभिधा, मद्वाक्य, ताराधिराजमुखचंद्र,**

**दिव्यासुमंगलमयाक्षरपंक्ति, पंचास्यापरि, दिक्कंभी; विध्यंड; महत्खड्ग**

इ. शब्दप्रयोग पाहाता हे संस्कृत काव्य तर नाही, असा संशय यावा.

**अरूढ शब्दप्रयोग**

रामनाथांच्या या कथेत अनेक अरूढ शब्द आलेले दिसतात. त्यामुळे अर्थबोधास अडचण येते. असे कांही शब्द पुढीलप्रमाणे सांगता येतील–

उदा. १. '**हिरण्यपूर्णनेत्राभिधा** = हिरण्याक्ष. इथे 'अक्ष' बद्दल 'नेत्र' शब्द आला आहे.

२. **वार्राशिदर्पहर** = वारिराशि - वरुण. पर्यायाने इंद्र. कारण इंद्राने वरुणाला वृष्टी करण्यास सांगितले. पण श्रीकृष्णाने गोवर्धन उचलून वरुणाचा पर्यायाने इंद्राचा दर्प हरण केला असा अर्थ. याखेरीज अगस्ती, श्रीराम हेदेखील अर्थ आहेतच.

३. **तार्क्ष्यगमन** = गरूडगमन.

४. **पंचास्यापरी** = आस्य = तोंड. पंचानन, सिंहाप्रमाणे.

५. **विध्यंड** = ब्रह्माण्ड इ.

**क्लिष्ट समास**

रामनाथाने काही क्लिष्ट सामासिक शब्द वापरलेले दिसतात.

उदा. दिक्कंभी = दिक् +अंभी = दिशारूपी सागरात (पाण्यात)

विध्यंड = विधी = ब्रह्मा + अंड = ब्रह्माड इ.

**शब्ददुरूहता**

रामनाथाच्या भाषेत दूरान्वायित शब्दप्रयोग आले असून, त्यामुळे दुरुहता वाढली आहे. त्यातून बौद्धिक जटिलता अकारण वाढली. अशा शब्दार्थ काठिण्याने रसहानीही संभवते.

उदा. १. हिरण्यकश्यपूचा मोठा भाऊ हिरण्याक्ष असे सरळ न म्हणता, तो लिहितो की,

**'हिरण्यपूर्णकशिपू तत्पूर्व नेत्राभिदा'** ।।७।।

२. **'ताराधिराजमुख ।।११।।'** चंद्रमुख शब्दासाठी हा दूरान्वायित शब्द तो वापरतो.

३. कांतारदावरिपू = श्रीकृष्ण

४. **अब्जयोनिपिता** = अप् + ज = कमळ. कमलोद्भ ब्रह्मदेव. त्याचा पिता श्रीविष्णू. असा दूरान्वयाने अर्थ समजून घ्यावा लागतो.

## ४) व्यक्तिचित्रण

आख्यान-कथेच्या बांधणीचा विचार करता, त्यात व्यक्तिचित्रणाला अतिशय महत्त्व असते. व्यक्तिजीवनाभोवतीच घटना प्रसंग निर्माण होत असतात व त्यातून व्यक्तिजीवनाचे विविध पैलू प्रकट होत असतात. म्हणून स्वभावदर्शन हा कथेचा गाभा ठरतो. कथा उठावदार बनते.

प्रस्तुत प्रल्हादकथेचा विचार करता (१) हिरण्यकश्यपू (२) प्रल्हाद ही दोन प्रमुख पात्रे असून, या कथेत दैवी पातळीवर (३) नृसिंह प्रभूंचा अवतारही विचारात घ्यावा लागतो. **या दृष्टीने आपण यथाक्रम या व्यक्तिचित्रांचा विचार पाहू.**

## १) प्रल्हाद - मूळ भागवत - कवींचा काव्यविषय बनलेला भक्त

मूळ भागवतात प्रल्हादाचे व्यक्तिदर्शन विलक्षण उदात्त पातळीवर मांडले असून, हिरण्यकश्यपूच्या चार पुत्रांपैकी प्रल्हाद हा ज्येष्ठ पुत्र होय. तो अत्यंत शीलसंपन्न, ब्रह्मकर्मशील, सत्यवादी, जितेंद्रिय, समदर्शी, इ. गुणांनी युक्त असून मित्रावर भावाप्रमाणे प्रेम करणारा, गुरूभक्त होता. (७/४/३१, ३२). महासंकटातही तो उद्विग्न न होणारा शांतचित्त होता. भागवतकारांनी त्यास उत्तमश्लोक, महाभागवत, महात्मा, महाभाग इ. शब्दांनी **गौरविले** आहे. (७/४/४३). प्रत्यक्ष नारदमुनी युधिष्ठिरास सांगतात की, 'हे राजा, प्रल्हादाचे हे सद्गुण कवींचे काव्यविषय झाले असून, ते अद्यापही भगवंताप्रमाणेच या भक्ताचेही गुणगान करतात.

**'यास्मिन् महद्गुणा राजन् गृह्यन्ते कविभिर्मुहुः ।**

**न तेऽधुना विधीयन्ते यथा भगवदीश्वरे ।।७.४.३४।।'**

### भक्तीचा छंद

प्रल्हादास उपजतच भक्तीचा छंद-भक्ती हाच त्याचा **स्थायीभाव होता.**

**'वासुदेवे भगवति यस्य नैसर्गिकी रतिः ।।७.४.३६।।'**

**गुरूगृही त्याने कोणती विद्या प्राप्त केली ? असे पित्याने विचारताच अखिल** विश्वप्रेरक चक्रपाणीच माझे सर्वस्व आहे' असे तो निर्भयपणे सांगतो.

**'तदा मे भिद्यते चेतः चक्रपाणेर्यदृच्छया ।।७.५.१४।।'**

### नवविधा भक्तीचा उद्गाता

मूळ भागवतात प्रल्हादमुखानेच **नवविधा** भक्तीचा उद्घोष आला आहे.

**'श्रवणं कीर्तनं विष्णोःस्मरणं पादसेवनम् ।**

**अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम ।।७.५.२३।।'**

अर्थात समस्त भारतवर्षीय अध्यात्मभक्तीची ही मूळपीठ बैसकाच बनली आहे. हिरण्यकश्यपूने त्याच्या वधासाठी अनेक शिक्षा दिल्या तरीदेखील तो त्यास सदाचाराचाच विचार सांगतो. देवर्षी नारदाकडून आपणास हे सर्व ज्ञानविज्ञान पूर्वीच लाभल्याचे तो सांगतो.

**'श्रुतमेतन्मया पूर्वं ज्ञानविज्ञानसंयुतम् ।**
**धर्मं भागवतं शुद्धं नारदाद्देवदर्शनात् ।।७.७.२८।।**

**शांतिब्रह्म स्थितप्रज्ञ**

चिडलेला हिरण्यकश्यपू त्यास कुलाधम, मंदबुद्धी, उद्धट इ. शब्दांनी धिक्कारतो. छळाबळाचा वापर करतो तेव्हां तो अत्यंत धीर, प्रशांतचित्त राहातो. त्याची शांतिब्रह्म अवस्था एवढी थोर आहे की, - पुढे उग्र नृसिंहाचा कालकोपही शांत करणारी ठरते. इंद्रादी देवहीं जिथे समोर जाण्यास धजत नाहीत - तिथे हा बालभक्त क्रुद्ध प्रभूपुढे निःशंकपणे जातो आणि विशेष म्हणजे त्या क्षणी प्रभूचा कालकोपही शांत होतो. इथे त्याच्या भक्तीचे अपार सामर्थ्य दिसून येते, एवंच, मूळ भागवतात बालभक्त प्रल्हादाचे धीर प्रशांत, स्थितप्रज्ञ, ब्रह्मज्ञानी, भागवतोत्तम अशा स्वरूपात दर्शन घडते.

**२) नामदेव - प्रल्हाद**

नामदेवांनी प्रल्हादाचे व्यक्तिदर्शन घडविताना मुळापेक्षाही स्वतःच्या आंतरिक भक्तीचे रूपच समूर्त केलेले जाणवते. नामदेव हे प्रल्हादावतारच असल्याने पूर्वावतारातील भक्तीचा निग्रह आणि निग्रही भक्तीचे स्वरूपच प्रकट करतांना दिसतात. नामदेवकालीन भक्तियुगाच्या पार्श्वभूमीवर इथे प्रल्हादाचे व्यक्तिमत्त्व मूळ भागवतापेक्षाही 'हरिनाम' भक्तीने भारलेले दिसते. सुगम सोपा रे 'हरिनाम' हा नामदेवांच्या काळात परवलीचा शब्द होता. त्यामुळे नामदेवांची प्रल्हादकथाही 'नामभक्तिकथा' बनून पुढे येते. गर्भातच प्रल्हादास हरिमंत्राचे श्रवण घडले असून, ते नाम हृदयगुंफेत आठवीतच त्याचा जन्म झाल्याचे नामदेव लिहितात. साक्षात नामभक्तीचाच हा अवतार झाल्याने सर्वत्र आश्वासक, नवचैतन्य आल्याचे ते सांगतात. 'आनंदे भरित मेदिनी भरली ॥२२५९.६॥' हा कालसापेक्ष प्रभाव होय.

**हरिनाम छंद**

गुरुगृही 'भक्तराज बळिस्मरे वनमाळी हृदयात ॥' हेच त्याचे अध्ययन ठरते. हरिनाम हाच त्याचा छंद असतो. नामदेव लिहितात -

**'त्याची छंदे गात हरिनाम अंतरी । वाचेमाजी हरी आठवीत ।।१६।।**
**समस्त बालकासांगे हरिनाम । प्रेमे तो आपण वाखाणीत ।।१७।।'**

पुढे प्राणघातक अशा शिक्षेच्या प्रसंगीदेखील त्याचे हरिनाम स्मरण सुरूच असते.

**'मुखी हरी हरी उच्चार नामाचा । गर्जे भक्त साचा सर्वाठायी ।।१६।।**

नामदेवकालीन नामस्मरण युगाचा प्रभाव प्रकर्षाने पडल्याने, नामदेवांचा प्रल्हाद हा मुळापेक्षा अधिक नामभक्तिपरायण असलेला दिसून येतो. ज्ञानेशप्रणीत नामभक्तीच्या **एकनिष्ठ प्रचारकाने नामाची अनन्य निष्ठा प्रत्यक्ष दाखवून देण्यासाठी भक्त प्रल्हादाचा** आदर्श उभा करावा यातील युगसापेक्ष औचित्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

### भक्ताचे निर्भयत्व

सुलतानी आक्रमणाच्या काळात हिरण्यकश्यपूसारखे सुलतानी दैत्य हैदोस घालीत असताना '**नामा म्हणे भक्त निर्भय सर्वासी । काय हो तयासी उपेक्षी हरी ।।**' असे आश्वासन देणारे हे व्यक्तिदर्शन आहे. भक्तीच्या अपार सामर्थ्याचे तेजोवलय या व्यक्तिचित्राभोवती प्रकाशमान झाले असून, 'भक्त निर्भय सर्वासी' ।। हे नामदेवांचे प्रतिज्ञा-सूत्र इथे ठामपणे लक्षित होते.

### प्रसन्न भावकोवळीकता

प्रल्हादाचे व्यक्तिचित्र आदर्श म्हणून उभे करताना भावकोवळया बालभक्त **नामदेवांच्या ऋजु वाणीतून प्रसन्न भक्तीचे आणि निर्मळ भक्ताचे निजस्वरूपच प्रकट** झाले आहे. त्यामुळे इथे प्रल्हादमुखाने तत्त्वज्ञानही प्रकटलेले नाही. आंतरिक भक्तीचा **उमाळा मृदु वाणीतून उत्स्फूर्तपणे प्रकटलेला दिसतो. नामदेवांच्या परिपूर्ण भक्तीचे,** संतत्त्वाचे आणि अनन्य निजनिष्ठेचे मूर्तरूपच प्रल्हाद-चित्रणात दिसून येते. एका निर्भय वैष्णववीराचे हे दर्शन म्हणजे नामदेवांचेच **प्रसन्न दर्शन होय हे पदोपदी जाणवते.**

भक्तीची पायाभरणी करणाऱ्या ज्ञानदेवांच्या संतमेळाव्यात समरसलेले; प्रत्यक्ष पंढरीच्या पांडुरंगाचे प्रेमभांडारी, प्रल्हादावतारी नामदेवच भक्तराज प्रल्हादाचे व्यक्तिदर्शन घडवीत आहेत, ही सुखद जाणीवच पदोपदी जाणवते. **या दृष्टीने या** कथासंचात 'भक्तमूर्ती' म्हणूनच हे प्रल्हादचित्रण प्रभावी आणि प्रत्ययकारी ठरले आहे.

## ३) एकनाथ - प्रल्हाद

**एकनाथांनीदेखील** ज्ञानेश नामदेवांचा पंथराज अधिक प्रशस्त आणि भक्कम करताना प्रल्हादाचाच आदर्श पुनश्च उभा केला आहे नाथांच्या प्रल्हाददर्शनात युगधर्मानुसार समाजसापेक्षतेचे अवधान अधिक तीव्रतेने प्रकटलेले दिसते. त्यातही नामभक्तीचीच अधिक प्रखर जोड दिल्याचे दिसते. या व्यक्तिचित्रणात समाजोद्धाराची कालोचित प्रबुद्ध जाण प्रकटली असून, प्रेरकतेची तळमळही दिसून येते. दिगभ्रांत, **आपदग्रस्त, भयकंपित समाजापुढे नाथांनी प्रल्हादाच्या रूपाने, दृढ निर्धारांचा, नामनिष्ठेचा** निर्भयाचा आदर्श ठेवला आहे. नाथांचे लक्ष कथानिरूपणापेक्षाही प्रल्हादाच्या नामभक्तीच्या निर्धारावरच अधिक लक्ष केंद्रित केलेले दिसते. त्यामुळे नामदेवांच्या प्रल्हाददर्शनापेक्षाही नाथांच्या चित्रणात धार अधिक प्रखर बनलेली जाणवते. प्रल्हादरूपाने जीवघेण्या संकटातही सहनशीलतेचा आदर्श ते उभा करतात. नामभक्तीरत नाथांचा प्रल्हाद सोशिक आहे. 'सदा वाचे नारायण । छंद आन नाही दुजा ।।' हे या

व्यक्तिचित्राचे मुख्यसूत्र असून प्रथमचरणापासून अखेरपर्यंत नामस्मरण भक्ती-आग्रहाने मांडली आहे.

**'एका जनार्दनी रक्षी नारायण । कोण करी विघ्न तया भक्ता ।।'**

**'एका जनार्दनी भक्ताचे रक्षण । स्वये नारायण करीतसे ।।'**

असे आश्वासन प्रल्हाद दर्शनापासून नाथांनी जागविले आहे.

### ४) आनंदतनय - प्रल्हाद

आनंदतनयाने 'प्रल्हाद चेरित्र कथा' लिहिलेली असल्यामुळे, या चरित्र-नायकाचे समग्र व्यक्तिदर्शन त्यांनी उदात्तपणे घडविले आहे. प्रल्हादाची आई 'कयाधू' ही 'साधुलक्षणा' असून, 'पतिव्रता तर शची जनी ते अपर्णा ॥'६॥' अशी असून, प्रत्यक्ष देवर्षी नारदांनी तिला सूर्यासारखा तेजस्वी पुत्र होईल असा वर दिला होता. तो लिहितो —

**'ज्ञानी सुंदर शाहणा सुत भला तेजे रवीसारखा ।**
**यैंसा होइल तुजला चिरंजीवी मोठा हरीचा सखा ।।७।।'**

गुरूगृही आल्यावर, उपजत ज्ञानी असलेला प्रल्हाद तेथील पुरोहितानाच स्पष्टपणे सांगतो की, ॐकारापेक्षा श्रेष्ठज्ञान जगातच नाही.

**'ॐकारावरी वर्ण आणिक दुजा नाही जगीं पाहता ।**
**शास्त्रे वेद पुराण जाणुनि पुन्हा का बा असे बोलता ।।२१।।'**

पुढे भर दरबारात 'सीकविली तुज विद्या काय ते गा गुरूनी । ' असे दैत्येंद्र विचारतो तेव्हा

**'ॐकारा प्रणवावरी जगी नसे विद्या नृपा शोधीता ।**
**शास्त्रे धुंडुनी पाहता हरीविना नाही भयत्रासिता।।३४।।'**

असे निर्भयतेने सांगताच संतप्त हिरण्यकश्यपू फर्मावतो की,

**'न्या रे सत्वर वारधीत बुडवा पायी गजी तुडवा ।**
**घाला कर्वति पर्वतावरूनिया वेगे तुम्ही लोटवा ।।३७।।**
**'घोरे न्या वडवानळमुखी झणी व्याळा करे डंखवा ।'**

या कठोर शिक्षा ऐकूनही प्रल्हाद अविचल राहातो. त्याच्या अनन्य निष्ठेमुळे व सत्त्वसंपन्नतेमुळे ही कथा 'पापहरणा' ठरली आहे.

### ५) गुरुदास - प्रल्हाद

गुरूदासाने कडाका छंदातून मांडलेल्या कथेत प्रल्हादाचे व्यक्तिचित्रण वैशिष्ट्यपूर्ण रीतीने केले आहे. प्रेमदांध, महाबळ, खळ दनुजेंद्राचा पुत्र प्रल्हाद असे आसुरी पार्श्वभूमीवर त्याचे चित्र उभे करून, 'तत्सुत' निर्मळ भागवतोत्तम कसा होता हे मांडले आहे.

'भागवतोत्तम पंक न लिंपत पंकज निर्मळ ।
निर्मम चिन्मय सिद्धहि साधक माधव पादयुगी रमला ।
प्रल्हाद भवीं न कहिं भ्रमला ।।१।।'

प्रल्हादाचे हे चित्रण भवसागरी घोटाळणाऱ्यांना प्रेरक ठरणारे आहे. मात्र प्रल्हादाच्या परमसिद्धावस्थेची ओळख खुद्द त्याच्या पित्यासदेखील नाही. गुरूदास लिहितो--

'दिविजेश्वर नेणुनि संभ्रमला । सुत त्या अपुलेचिपरी गमला ।।१।।'

गुरूगृही प्रल्हादाचे अध्ययन केवळ हरिनामस्मरण हेच असते. तेच त्याचे शिक्षण.

'भक्तराज लिहि विश्वगोपिता । कृष्ण विष्णु गोविंद इंदिराधीश केशवा ।
हेचि वाचिता झाला । हरि हरि हेचि वाचिता झाला ।।१।।'

हिरण्यकश्यूपच्या अघोरी शिक्षेतून, नारायण कृपेने पार पडलेल्या प्रल्हादास 'कयाधू'कडून विष दिले जाते. एकीकडे राजाज्ञा - पतिप्रेम - आणि दुसरीकडे पुत्रवात्सल्य अशा तिहेरी कोंडीत ती सापडते तेव्हां प्रत्यक्ष प्रल्हदच 'भय काय असे ?' अशी पृच्छा करतो. ही त्याची निःशंक, निर्भय वृत्ती उग्र नृसिंहमूर्तीच्या मांडीवर जाऊन बसतानाही दिसून येते. मात्र प्रसन्न नृसिंह प्रभू त्यास 'वर माग' म्हणतात तेव्हां 'आस हेच तव दास्य दे ॥' असे भक्तीचेच वरदान मागतो. त्याच्या या श्रेष्ठ भक्तीमुळेच 'वर तू भजराज मज पहिला ॥' असे त्यास प्रथम स्थान प्राप्त होते.

### ६) रामनाथ - प्रल्हाद

रामनाथाने भक्तोत्तमाच्या पातळीवर प्रल्हादाचे अनोखे दर्शन घडविले आहे.

'झालाचि आद्य हरिभक्त तथा न तीघे ।।१२।।'

### आश्रमातील श्रीमंती थाट

अर्थात चार भावंडात मोठा प्रल्हादच फक्त हरिभक्त झाला. तो ज्येष्ठ पुत्र असल्याने राज्याचा भावी वारस आहे. त्यामुळे हिरण्यकश्यपूचे त्याच्या शिक्षणावर विशेष लक्ष आहे. आश्रमातील श्रीमंती थाट केवळ रामनाथानेच वर्णिला आहे. तो लिहितो -

'रजतपीठावरी मणिवालुका । पसरुनि गुरूपुत्र सकौतुका ।
करि करोनि हरिन्मणि लेखणी । लिहविती शिशुते विकसन्मणी ।।१७।।'

अर्थात चांदीच्या पाटीवर माणिक-मोत्यांचा चुरा पसरून केलेल्या धूळपाटीवर सोन्याच्या रत्नखचित लेखणीने अक्षरे गिरविणाऱ्या प्रल्हादाचे श्रीमंतसंपन्न दर्शन केवळ रामनाथानेच घडविले आहे. पण अशा वैभव-विलासातही सकळ लौकिक तुच्छ समजणारा प्रल्हाद विरक्तीचे मूर्तरूपच वाटतो.

### धृतिक्षम धीट

रामनाथाचा प्रल्हाद हा धीट असल्याचे इथे प्रकर्षाने दिसून येते. सर्वसमर्थ देवास मी चित्ती धारण केल्याचे तो दरबारात सांगतो. त्याहीपुढे 'सहसा पाप्यासी जो

नाडळे ॥२०॥' असेही सांगतो आणि तोच माझा त्राता आहे असे म्हणतो.

**'त्राता आम्हांसी मधुजेता असे दुरितकांतार दाव रिपु हा ॥२१॥'**

'मधु' राक्षसाला जिंकणारा असा निर्देश तो **दैत्यसभेत करीत असून कथेच्या शेवटी**-देखील तो भगवंत 'तवांतरी पूर्ण मदंतरी तो ॥' असे सांगतो. हे धाडस सामान्य नव्हे.

**हिरण्यकश्यपू**

## १) मूळ भागवत - हिरण्यकश्यपू

**मूळ भागवती कथेत हिरण्यकश्यपूचे चित्रण सविस्तर आले असून, श्रीविष्णूंचे** पार्षद असलेल्या 'जय-विजय' यांना शापामुळे दैत्य योनीत जावे लागते. हे दोघे बंधू आहेत. त्यातील ज्येष्ठ हिरण्याक्षाला ठार मारल्याने हिरण्याकश्यपू चिडला आहे. द्रोणागिरी पर्वतावर, पायाच्या अंगठयावर उभे राहून, दोन्ही हात उंच उभारून, दृष्टी अंतराळी लावून तो तपश्चर्या करतो तेव्हा देवानाही भय उत्पन्न होते. हंसवाहन ब्रह्मदेव **त्यास प्रसन्न होऊन 'वरं ब्रूही' म्हणतो. आत नाही, बाहेर नाही; वर नाही, खाली नाही** इ. इ. असा खूप विचारपूर्वक अमरत्वाचा वर मागतो. त्यास चार पुत्र होतात. प्रल्हाद हा ज्येष्ठ पुत्र असून, दैत्यगुरू शुक्राचार्यांचे दोन पुत्र 'षंड' व 'अमर्क' यांच्याकडे सर्वांना **अध्ययनास पाठवितो. आपल्याप्रमाणेच पुत्रानेदेखील पृथ्वीपती व्हावे अशी त्याची** इच्छा असते. त्यामुळे त्याच्यातील पिता हा सत्ता-संपत्तीने धुंद होऊन, देव द्वेष्टा असुर बनतो. त्यामुळे सत्त्वसंपन्न प्रल्हाद त्यास चंदनवनातील कंटकद्रुमाप्रमाणे वाटू लागतो.

**'दैतेय चंदनवने जातोऽयं कंटकद्रुमः ॥ ७.५.१७ ॥'**

छळाबळाने तो प्रल्हादाचे मन वळवू पाहातो. पण सारे व्यर्थ ठरते. तेव्हां सर्वत्र असलेला तुझा देव खांबात कां दिसत नाही ? 'क्वासौ यदि स सर्वत्र कस्मात् स्तम्भेन दृश्यते ?॥' असे म्हणून तो अविवेकीपणाने खांबावर खड्गमुष्टीप्रहार करतो. नृसिंहप्रभूशी युद्ध करतो आणि शेवटी त्याला मिळालेल्या वरदानाच्या सर्व अटी पाळून त्यास वीरगती लाभते. इथेही भक्ताचे वरदान सत्य होते. 'सत्यंविधातुं' हे भगवद्‌वचन सत्य ठरते.

## २) नामदेव - हिरण्यकश्यपू

नामदेवाच्या कथेतील दैत्यराज हिरण्यकश्यपू भक्तीयुगाच्या पार्श्वभूमीवर काहीसा सौम्य प्रकृतीने प्रकटलेला दिसतो. त्याचे चित्रण नामदेवांनी उदारमनस्कतेने केलेले दिसते.

**'दैत्यराज थोर महाबळिवंत । जगी तो विख्यात हिरण्यकश्यपू ॥१०॥'**

इंद्रपद प्राप्त झालेला हा दैत्य पुत्रजन्माच्या वार्तेने आनंदी होतो. सर्वांना दानधर्म करतो. 'संतोषला मनी दैत्यभूप ॥७॥' जन्मोत्सवानंतर मुलांच्या शिक्षणाची सोय करणारा पिता मोठा वत्सल वाटतो. पण प्रल्हाद हा देवांचा जप करतो असे समजताच—

**'माझा जो वैरी तया आठवीतो । कुळघात होतो ऐंशियाने ॥४॥'**

असे ठाम जाणून, स्वतःचे तपःसामर्थ्य, अमरत्वाचे वरदान, कुळाभिमान, त्रैलोक्य

जिंकल्याची सत्ताधुंदी आणि स्वपुत्राचे घरभेदी वर्तन त्यामुळे तीव्र संघर्ष उत्पन्न होऊन पुत्रवधाची शिक्षा तो फर्मावतो. शेवटी नृसिंह प्रभूशीदेखील तो युद्ध करतो. त्यात त्याच्या वराचे ब्रीद राखून त्यास गती दिली जाते. नामदेव लिहितात -

'वर राखोनिया केला वर्ध पाही । दासाची नवाई वाढविली ।।

'मुक्ती झाली दैत्यनाथा ।।७।।'

इथे सुलतानी असुरानाही मुक्ती देण्याची नवाई ज्ञानेश प्रणीत - 'खळांची व्यंकटी सांडो ।' या ज्ञानभक्ती वचनात दिसू शकते.

## ३) एकनाथ - हिरण्यकश्यपू

एकनाथांच्या हिरण्यकश्यपूत मूळ भागवत किंवा नामदेवापेक्षाही खूपच मानवी पातळीवरून सौम्यता प्रकटली असून, कौटुंबिक भाववृत्ती अधिक जाणवते.

'वाया जन्मले हे पोर ।' नकळे आपुली याती । येणे धरिली हरिभक्ती ।।' असे म्हणून सचिंत झालेला पिता 'राज्यधन' त्यास नावडीचे वाटत असल्याने काळजी करू लागतो. एखाद्या सर्वसामान्य पित्याप्रमाणे तो स्वतःच त्यास विद्याभ्यास शिकवू लागतो. यात त्याच्या दक्षतेवर अधिक प्रकाश पडतो.

'सदा पुत्री गुंतले मन ।' अशी त्यांची पितृसुलभ वृत्ती असून पोर आपले ऐकत नाही असे पाहून निदान आईचे तरी ऐकेल अशा कल्पनेने तो एकांतात पत्नी कयाधूला त्यास समजावण्यास सांगतो. नाथ लिहितात -

**'सांगे स्त्रियेसी एकांती । पुत्रे मांडिली भगवद्भक्ती ।**

**यासी आता काय करावे । शिकविले ऐको न जाये ।।'**

घरोघरी दिसणारी ही सर्वसामान्यता नाथांनी सहजतेने उभी केली असून, हिरण्यकश्यपूच्या सांगण्याप्रमाणे एखाद्या व्रात्य मुलाची समजूत काढावी तसे ती म्हणते -

**'माता म्हणे प्रल्हादासी । वडिले शिकविले नायकशी ।**

**काही नायकशी शिकविले । विद्या अभ्यास वहिले ।।'**

तरीपण तो कोणाचे ऐकत नाही तेव्हां 'मुख्य आमुचा वैरी । त्यासी चिंती ही निर्धारी ।।' असे समजून हिरण्यकश्यपू त्या घरभेदेपणाने खवळतो. त्याच्यातील पिता लोपून 'दैत्य' जागा होतो आणि त्याची राक्षसी कृत्ये सुरु होतात. नाथांनी त्याची ही दोन्ही रूपे दाखविली आहेत.

## ४) वामन पंडित - हिरण्यकश्यपू

वामन पंडितांनी हिरण्यकश्यपूचे चित्रण 'विनाज्ञानी' जय-विजयांना 'अद्वयाचे' म्हणंणे - अद्वैताचे ज्ञान होण्यासाठी दैत्ययोनीत जावे लागल्याचे म्हटले आहे. इथे 'विनाज्ञानी' हा उल्लेख नव्याने पुढे येतो. तमोगुणी दैत्ययोनीत आल्यावर तर हिरण्यकश्यपू क्रूरकर्मा बनतो. षंडामर्क - गुरूवरही त्याचा विश्वास नाही. तुम्हीच मुलाला

फूस लावलीत असे म्हणून त्याची हजेरी घेतो.

**'म्हणे गुरुसुता । तुझी कपट मित्रता हे खरी ।।४६।।'**

पूर्वपुण्याईने लाभलेल्या सदगुणी पुत्रास मांडीवर घेऊन बसला असता, तेथेच प्रल्हादास समाधी लागते; पण हा हरिभक्ती करतो म्हणून तशा त्या समाधी अवस्थेतच त्यास - मांडीवरून ढकलून देतो. त्याचे हे वर्तन इथे नव्याने पुढे येते. तसेच आपण इतके सांगूनदेखील यास बापाची मायाच नाही अशी तक्रारही तो मांडतो. पंडित लिहितात -

**'मी बाप माझी न लगेच माया ।।'**

मग मात्र गुरूंना तंबी देऊन तो सांगतो की,

**'यास न्या स्वसदनी शिकवा हिताते । ...**
**ऐसे करा त्वरित की धरि लोकरीती ।।७२।।**

वामन पंडिताचा हिरण्यकश्यपू खांबावर खड्गमुष्टीचा प्रहार करतो आणि प्रत्यक्षात– गदायुद्ध करताना दिसतो. पंडित लिहितात–

**'सिंहावरी त्या मग दैत्यहस्ती । धावे गदा घेउनि थोर हस्ती ।**
**पतंग अग्नीवरि जेवि जातो । हाणी गदा थोर अधोक्षजा तो ।।१०८।।'**

### ५) आनंदतनय - हिरण्यकश्यपू

आनंदतनयाने दानवांचा इंद्र 'दनुजेंद्र' हिरण्यकश्यपूचे चित्रण प्रभावी असेच केले आहे. त्याचा दरारा त्रैलोक्यात असून त्याची दुंदुभी ऐकून शेष पाताळी दडून बसतो.

**'ज्याची यैकुनी दुंदुभी फणीपती गेला चकोनी तळी ।**
**ज्याला देखुनी कांपते थरथरा धाके धरामंडळी ।।३।।'**

असा प्रचंड पराक्रमी हिरण्यकश्यपू प्रेमळ, वत्सल पिता आहे. पुत्रजन्माच्या वार्तेने तो हर्षित होतो. पितृकर्तव्याप्रमाणे पुत्रांच्या 'सुविद्येची' तो व्यवस्था करतो.

**'घातले पढुं तया गुरूपाशी । शीकवा म्हणतसे आजपाशी ।।१८।।'**

पुढे मात्र त्याची नारायण भक्ती पाहून त्याच्यातील दनुजेंद्र जागा होतो आणि त्याला ठार मारल्याशिवाय आपणास झोपही लागणार नाही असे म्हणून कयाधूस त्याला विष देण्यास सांगतो.

**'देई त्वरे तवसुता विष हेचि सांगे ।**
**तो वाचुनी शयनी नीज न ये मला गे ।।४५।।'**

इथे झोप उडालेला, चिडलेला दानव 'तुझ्या मुलाला' विष दे म्हणतो. हे लक्षणीय ठरते.

शेवटी तर बुद्धिभ्रष्ट झाल्याप्रमाणे भान न राहून, एखाद्या मदोन्मत्त हत्तीप्रमाणे हिरण्यकश्यपू खांबावर लाथ मारतो. आनंदतनय लिहितो–

**'ऐंसे ऐकुनि दानवेश उठिला कोपोनि हस्तीपरी ।**
**हाणी लात बळी बळेचि कडुनी धावोनि खांबावरी ।।५२।।'**

परिणामतः त्याचे पोट फाडून त्यास ठार मारले जाते. त्याचा हा **शेवट** वर्णिताना आनंदतनय लिहितो -

**'काढी पोट चिरोनिया चरचरा बाहेरी तो आतडी ।।५५।।'**

**'देवे दानव मारिला धरूनीया मांडीवरी चीरिला ।।५६।।'**

साधुसंतांना उपद्रव देणाऱ्या देवद्रोही दैत्याचा हा भीषण अंत समाजकंटकाच्या खलत्वाचा परिणाम दाखविणारा असाच आहे.

**६) गुरूदास - हिरण्यकश्यपू**

गुरुदासाचा हिरण्यकश्यपू हा 'विक्रमसिंधू' असून, 'तो दनुजेंद्र महाबळ जी खळ ।' असाच आहे. प्रल्हादास सर्व प्रकारच्या शिक्षा करूनही तो मरत नाही असे पाहून, बेभान होऊन वैतागाने तो विचारतो की, माझ्या भीतीने लपूनछपून तुला मदत करणारा तुझा पाठिराखा कोण आहे ? तो कोठे आहे ? 'न साहे अतां ।' यात सूड घेऊ पाहाणाऱ्या दैत्याचे दर्शन घडते. त्याचा शेवटही भीषणरीत्याच होताना दिसतो.

**७) रामनाथ - हिरण्यकश्यपू**

रामनाथाचा हिरण्यकश्यपू जणू साक्षात कलीनेच निर्माण केल्याचे दिसून येते.

'देव ब्राह्मण धर्म यज्ञ विधिते छेदावया निर्मिले ।।'

ब्रह्मदेवाकडून त्यास 'अमित' वरप्रदान लाभते. पुत्र प्रल्हादास 'कृष्णमाया' भोवली असल्याचे गुरुकडून समजताच 'तू मला पुत्र वेषे रिपु झालास ।।' असे म्हणतो.

**'जन्मोनी दानवकुळी हरिभक्त होसी ।**
**झाली कायी तुज अधोगतीची असोसी ।।२६।।'**

ही त्याची व्यथा आहे. सर्व प्रकारच्या शिक्षा देऊनही पुत्र वाचलेला पाहून चिडून तो विचारतो.

**'कोठे हरी कवण तो वद रे विपक्षा ।**
**त्याला तुला उभयतास करीन शिक्षा ।।३३।।**

मग तो स्तंभावर खड्गमुष्टी प्रहार करतो. नृसिंह प्रभूशी युद्ध आरंभतो.

**'दोघासि तैं बहुतकाळ सुयुद्ध झाले ।'**

या युद्धांत दैत्यान्त घडून येतो.

सारांश, प्रयोजन विचार, कथाबांधणी किंवा व्यक्तिचित्रण या सर्वच बाबतीत 'प्रल्हादकथा' या गटसंचात नवनवे उन्मेष प्रकटलेले दिसून येतात. मूळ सूत्रातून व्यक्तिसापेक्ष, कालसापेक्ष असे नवे परिमाण घेऊन महाराष्ट्रात प्रल्हादकथेने जीवनाची सत्त्वधारा अखंडपणे जिवंत राखली आहे, असेच आपणास दिसून येते.

**समारोप**

१) अशा रीतीने एकच प्रल्हादकथा नामदेवापासून रामनाथ मोरोपंतापर्यंत म्हणजे

तेराव्या शतकापासून १९ व्या शतकापर्यंत जवळ जवळ सहाशे वर्षे आविष्कृत होत आली असून, त्यातील नामभक्तीचा धागा अतूट दिसतो.

२) प्रल्हादकथेचा पौराणिक ओघ भक्ति-तत्त्वज्ञानासह आत्मसाक्षात्काराचे तेज घेऊन राष्ट्रीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे भरणपोषण करीत आलेला दिसतो.

३) मूळ भागवती कथेची आध्यात्मिक व तात्त्विक बैठकच एवढी भक्कम आणि प्रभावी आहे की, तिचे प्राकृत अवतारही मूळ आशयाच्या तेजानेच धवळून गेले आहेत.

४) प्रल्हादकथेचा प्रयोजनविचारही व्यक्तिसापेक्षतेने चतुर्विध पुरुषार्थांचे उद्घाटन करताना दिसतो. त्या सर्वांत भक्तिप्रयोजन समानच आहे.

५) युगसापेक्षतेने प्रकटलेली विविध विधाने पाहाता प्रस्तुत कथा–संचात व्यक्तिनिहाय काळाचे आत्मभान प्रकटलेले दिसते.

६) संत - पंत - तंत अशा त्रिविध प्रभावाने ही कथा प्रभावित झाली असून, दैवी संतत्त्वाकडून लौकिक विदग्धतेकडे या कथेची वाटचाल होत आलेली दिसते.

७) व्यक्तिचित्रणातही कविगत प्रकृतीप्रमाणे समाजसपेक्षतेचे ठसे दिसून येतात.

८) कथेच्या परिणामकारकतेचा, रंजकतेचा, प्रासादिकतेचाही प्रयत्न झालेला दिसतो.

९) कीर्तनोपयोगी कथाबांधणीत विशिष्ट कालावधीची मर्यादा पाहून संक्षेपाकार प्रकटला असून कथेतून कीर्तनरंग ही प्रकटला आहे.

१०) नाट्यमय संघर्ष, वातावरणनिर्मिती साधून, ही भक्ति रसाळ कथा लघुकथा स्वरूपात प्रकट झाली आहे.

११) मूळ संस्कृत कथेवरील हे देशीकार लेणे देखणे असून घाटदार असेच आहे असे म्हणता येईल.

## साधन-संदर्भ


१) **कुलकर्णी गो. म.** – 'महाराष्ट्राची सत्त्वधारा' पृ. १८.
२) **श्रीसंत जनबाई शिक्षणसंस्था** – 'संत जनबाई चरित्र व काव्य पृ. १८३.
३) **महाराष्ट्र शासन प्रका.** – 'श्री नामदेव गाथा' पृ. १४ प्रस्तावना.
४) **भावे वि. ल.** – 'महाराष्ट्र सारस्वत' पृ. ४६७.
५) **आवळीकर पंडित** – 'जुने वाङ्मय, नवे संशोधन' पृ. २८६.
६) **कुलकर्णी गो. म.** – 'महाराष्ट्राची सत्त्वधारा' पृ. १८५.
७) **कुलकर्णी गो. म.** – पृ. १८७.
८) **वाटवे के. ना** – 'प्राचीन मराठी पंडिती काव्य' पृ. ३०, ३१.
९) **वाटवे के. ना.** – पृ. ३२.
१०) **जोशी महादेव शास्त्री** – 'भारतीय संस्कृति कोश' खंड १. पृ. ४४२.
११) **कुलकर्णी गो. म.** – 'महाराष्ट्राची सत्त्वधारा' पृ. १९४.
१२) **वाटवे के. ना.** – 'प्राचीन मराठी पंडिती काव्य'. पृ. २०६.
१३) **कुलकर्णी गो. म.** – 'महाराष्ट्राची सत्त्वधारा' पृ. १९३.
**१४) गजमल माळी – 'प्राचीन मराठी आख्यान कविता' पृ. १८.**

१५) ग्रामोपाध्ये गं. ब. – 'मराठी आख्यान कविता. पृ. १५ - १६.

१६) जोशी ना. ग. – 'मराठी छंदो रचना' पृ. ४०८.

१७) भावे वि. ल. – 'महाराष्ट्र सारस्वत' पृ. ४१२.

१८) भावे वि. ल. – पृ. ४६८ - ६९

## कथा साधन-संदर्भ

१) मूळ भागवत पुराण (संस्कृत)

स्कंध ७. अध्याय १ ते १० मध्ये. प्रल्हाद कथा आली आहे. गीता प्रेस गोरखपूर. अष्टम संस्करण, संवत २०२२. मूल्य ४ रु.

२) **नामदेवकृत 'प्रल्हाद चरित्र'** (प्रकाशित)

सकल संत गाथा खंड १. प्रकाशक आवटे, रमेश शंकर. आवृ. २. १९६७. संपा. जोशी का. अ. संतवाङ्मय प्रकाशन मंदिर, १००६ सदाशिव पेठ पुणे २. अभंग क्र. २२५८ ते २२६३. एकूण ६ अभंग एकूण १११ कडवी. खंड १ मध्ये पृ. ३८८ ने ३९१ पर्यंत ही कथा आहे.

३) **एकनाथकृत 'प्रल्हाद चरित्र'** – (प्रकाशित)

सकलसंत गाथा. खंड २ पृ. ३७६ ते ३७७ अभंग क्र. ३४१४ ते ३४३०. एकूण १७ अभंग. प्रत्येक अभंगात ३ कडवी असून शेवटच्या १७ व्या अभंगात ५ कडवी आहेत.

४) **वामन पंडित – नृहरिदर्पण** – (प्रकाशित). १५४ श्लोक.

(अ) नवनीत अथवा मराठी कवितांचे वेचे. कै. परशुराम बल्लाळ गोडबोले. (१८५४) आवृ. १८ बी. शतसांवत्सरिक आवृ. १९५७. अ. का. प्रियोळकर, मुंबई. किं. ३ रु. पृ. १६१ ते १७१ पर्यंत 'नृसिंहावतार' कथा आली असून, त्यात वामनाचे नाव नाही.

(ब) काव्यसंग्रहकार वामन दाजी ओक संपा. वामन पंडितकृत कवितासंग्रह भाग १ (सांगली जिल्हा नगर वाचनालय, सांगली) कविता क्र. १३२ या ग्रंथात पृ. २४५ ते २६२ वर हीच कथा 'नृहरिदर्पण' या नावाने दिली आहे. यात १५४ श्लोक असून, मंगलाचरणाचे १५ श्लोक आहेत. त्यात 'वामनीं त्रिभुवनी प्रकटावे'' (श्लो. ५ व १५४) असा नामोल्लेख आढळतो.

५) **आनंदतनयकृत 'प्रल्हाद चरित्र'** (अप्रकाशित)

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयात मराठी विभाग अनुक्रमांक ७९. दत्तसंप्रदाय मठ देणगी वही. हस्तलिखित नोंदणी वही (रजिस्टर). मूळ हस्तलिखित वहीत काळया शाईत लेखन. रेखीव गोल अक्षर असून, वहीचा आकार अंदाजे १०'' × ८'' असा आहे. या वहीत पृ. १८६ ते १९० पर्यंत ही कथा असून संपूर्ण कथा ५९ कडव्यात (श्लोकांत) उपलब्ध आहे. ५९ व्या श्लोकात आनंदनंदन अशी नाममुद्रा आहे. श्लो. १० त तीनच ओळी असून, चौथी ओळ मूळ वहीत नाही. दि. २८ डिसेंबर १९७९ रोजी सदर कथा मुळाबरहुकूम नकलून घेतली आहे.

६) **गुरुदासकृत – प्रल्हाद चरित्र** – (अप्रकाशित)

तंजावर सरस्वती महाल ग्रंथालय : अप्रकाशित ग्रंथसूची : श्रीराजाराम राजासाहेब देणगी ग्रंथ सेकंड अनुक्रमांक १३.

हस्तलिखित आडवी पोथी आकार अंदाजे ८'' × ४''. पोथीतील अक्षर काळ्या शाईत असून रेखीव, वळणदार आहे. प्रत्येक अक्षर सुटे कोनेदार आहे. प्रत्येक पानावर आडव्या सात ओळी आहेत. मुखपृष्ठावर एक इंच रुंदीच्या चौकटीत हिरव्या लाल रंगातील सुंदर नक्षी आहे. मधील चौकटी जागेत मधोमध -

॥ गुरुदास ॥ प्रल्हादचरित्र ॥ कडाका ॥ असे लिहिले आहे. एकूण १२ पाने आहेत. कडाका छंदात १४ कडवी (चौक) आहेत. दि. १ जाने. १९८० रोजी ही कथा मुळाबरहुकूम नकलून घेतली आहे.

**७) रामनाथ कृत - प्रल्हाद चरित्र - (अप्रकाशित)**

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालय दि. १.१.१९८० रोजी सूचिक्रमांकदेखील तयार झालेला नव्हता. मराठी पंडीत श्री. टी. आर. भीमस्वामी (रामदासी मठाधीश) यांनी स्वतः नकलून, तयार केलेली मुद्रणप्रत आम्हांस दिली. त्यात 'चिंतामणिसुत' रामनाथ असे नाव वर दिले आहे. रामनाथ हा तंजावर येथील तुळजेंद्र राजाचा दरबारी कवी असावा. प्रस्तुत काव्यांच्या ४९ व्या कडव्यात तो अशी माहिती देतो. (१) तंजावर येथील तुळजेंद्र राजाच्या खास विनंतीवरून त्याने प्रल्हाद कथा लिहिली. (२) रचनावर्ष शार्वरी संवत्सर. (३) पित्याचे नाव चिंतामणी असून, त्याचा प्रथमनंदन म्हणजे ज्येष्ठ पुत्र आहे. (४) स्वतः कवीचे नाव 'रामनाथ' असून, चिंतामणीसुत अशी कविनाम मुद्रा त्याने वापरली आहे.

या कथेत एकूण ४९ कडवी व ४ पदे अशी एकूण ५३ संख्या आहे. यात विविध वृत्ते वापरलेली आहेत. यातील गेयपदे त्याने स्वतःच रचली असून, त्यात 'चिंतामणिसुत' असा उल्लेख आहे.

ही स्फुट आख्यानकथा १.१.१९८० रोजी तंजावर येथील समर्थ भीमराज गोस्वामी, ८ वे पीठाधीश यांच्या मठातील हस्तलिखितावरून नकलून घेतली आहे.

**टीप** - प्रस्तुत प्रकरणातील संपूर्ण विवेचनात आलेली अभंग, श्लोक इ. अवतरणे वरील साधन-ग्रंथातील क्रमांकाप्रमाणे यथास्थान नोंदविली आहेत. मूळ भागवती कथेच्या संदर्भात स्कंध, अध्याय, श्लोक अशा क्रमाने आकडे आहेत.

✿ ✿ ✿

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
दा. क्र. 3864

# प्रकरण चौथे

## गजेंद्र कथा

### प्रास्ताविक

'गजेंद्रमोक्ष' ही भारतीयांच्या जीवनात एक अलौकिक स्थान प्राप्त करून राहिलेली कथा आहे. जड इंद्रियातीत असणारी अध्यात्म प्रचिती सर्वसामान्यांपर्यंत नेऊन आकलनाक्षमतेच्या कक्षेत आणण्यासाठी आपल्या प्राचीन ऋषीमुनींनी, साधुसंतानी कथात्मक रूपाशय उभा करून, जनसामान्यांच्या जीवनात प्रयत्नवादाचे प्राण फुंकले आहेत. वैदिक औपनिषदिक तत्त्वचिंतन कथारूपाने पुराणांच्या माध्यमातून व्यासादिकांनी मांडले असून, त्यातून प्रत्येक जीवमात्रास आत्मोद्धाराची उत्कट जाणीव प्रकटपणे दिली आहे. अशा कथांमध्ये 'गजेंद्रमोक्ष' ही कथा अग्रक्रमाने असून, तिला स्वतःचे एक आध्यात्मिक अधिष्ठान आहे. रम्याद्भुत, रंजक कथा हे तिचे वरवरचे स्वरूप आहे.

या रंजक आवरणाखाली गजेंद्र, मगर, सरोवर इ. ची अर्थवलये आध्यात्मिक दृष्टीने पाहाता - आर्त भक्ताची पूर्ण शरणागती व तिची फलश्रुती यांचे प्रात्यक्षिकच वाचकांसमोर उभे राहाते. किंबहुना अंतर्मुख होऊन विचार करता प्रत्येक जीवमात्राशीच यातील रूपचित्रे संबंद्ध होतात. संसाररूप सरोवरात मायामगरीची जबरदस्त मिठी पडून अंहकारयुक्त असणारा मदमस्त जीवरूपी हत्ती 'मी', 'माझे', 'माझे' म्हणत म्हणत मायासरोवरात बुडत राहातो. जीवघेण्या यातना सोशीत, एकाकी कष्ट सहन करतो. सर्वांसाठी सर्वकाळ, सर्वकाही करणारा हा जीव शेवटी अंतकाळी आपले कोणीही नाही म्हणून कासावीस होतो. या गजेंद्राला मायामगरीतून सुटताच येत नाही. कारण माया ही दुस्तरच आहे. माया भगवंताकडूनच दूर होऊ शकते. भगवंतच गजेंद्र जीवाची सुटका करू शकतात. हत्ती-गजेंद्र हे शक्तिसंपन्नता आणि अधिकारसंपन्नता यांचे प्रतीक आहे. व्यामोहग्रस्त माया सरोवरात, मायामगरीची मिटी पडून चाललेला हा संघर्ष चालूच आहे. मूळ भागवतात हा संघर्ष हजारो वर्षे चालू असल्याचा उल्लेख आहे. खरेच, हा संघर्ष हजारो वर्षे चालू आहे. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या तुकारामांच्या वचनातही जीवोद्धाराची तळमळ आहे. त्यामुळे गजेंद्रमोक्ष कथा - श्रवणाची फलश्रुती सांगताना स्वतः भगवान आश्वासन देतात, 'जे पुरूष हे गजेंद्र तुझे, माझे, हे सरोवर, त्रिकूट शिखरे ब्रह्माविष्णु महेशांची स्थाने, क्षीरसागर, देदीप्यमान श्वेतशिखर यांचे व (गजेंद्रकृत) तू केलेल्या स्तोत्राचे स्मरण करतील. त्याना मी अंती उत्तम गती देतो.' ही गजेंद्रमोक्षाची मोक्षलाभाची फलश्रुती संसार श्रांताना दिलासा देणारी आहे.

'जे गोष्टि मिया देयावी । ते तियाची जोडे ।' ज्ञानेश्वरीतील भगवंताचे हे आश्वासन इथे प्रकटले आहे. प्रत्येक प्राणीमात्र हा स्वतंत्र असून, त्याची आत्मानुभूती ही स्वसंवेद्य आहे. मृत्यूचा क्षण हा तरी ज्याचा त्यालाच अनुभवावा लागतो. म्हणून या

संपूर्ण एकाकी अवस्थेत भगवंतच प्राणीमात्रांचा जवळचा असतो. त्याचे स्मरण सदैव राखावे हीच तळमळ या कथेच्या मुळाशी आहे.

## २) गजेंद्रमोक्ष कथेतील आध्यात्मिक सत्त्वधारा

'गजेंद्रमोक्ष' कथेच्या रूपात आध्यात्मिक साधनेची स्वरूप साक्षात्काराच्या अंतिम अवस्थेपर्वंत घडलेली एक अवस्थात्मक अनुभूती साकार होताना दिसते. अहंकारयुक्त जीव हा बलदंड गजेंद्रासारखा असून,तो देहाहंकाराने देहसंबद्ध नात्यागोत्याच्या गुंत्यात पूर्णतः गुरफटून जातो. त्यामुळे त्याला स्वरूपाचा पूर्ण विसर पडलेला असतो. एखाद्या कठीण प्रसंगी त्या जीवाला एकाकीपणाची तीव्र जाणीव होते; त्याचा विवेक जागा होतो; तो अंतर्मुख होऊन स्वरूपाचा विचार करू लागतो. भगवंताशी पूर्ण शरणागती पत्करून आर्त आळवणी करू लागतो. अशा वेळी भगवंतही 'कृपाळुपणे अल्प धारिष्ट पाहे' - अशी परीक्षा पाहातात आणि शेवटी जीवावर कृपावर्षाव करून त्याचा उद्धार करतात.

वास्तविक, प्रत्येक जीव हा ईश्वराचाच अंश असून त्याचे जीवन हे साक्षात्कारसंपन्न असले पाहिजे. पण अहंकाराच्या उपाधीने त्याला मूळ स्वरूपाचे विस्मरण घडलेले असते. 'त्रिकूट शिखर' हे त्याचे स्थान. येथे परमात्मा सद्‌गुरूंचे वास्तव्य असते. प्रस्तुत कथेत 'त्रिकूट शिखर' हा शब्द याच अर्थाने आला आहे.

अर्थात हे त्रिकूट शिखर ब्रह्मा विष्णु महेशांचे निवासस्थान आहे. इडा-पिंगला-सुषुम्ना या नाड्या एकाकार होणारे हेच ठिकाण असून हाच त्रिवेणी संगम होय. या नाड्या अनुक्रमे चंद्र-सूर्य-अग्नीच्या वाचक आहेत. त्या त्रिवेणी संगमावरील मूळ स्वरूपाचा अनुभव हा अलौकिक परमानंदाचा असून अशावेळी नाद, सुगंध व तेजोरूपात निर्गुणाचा दैवी साक्षात्कार घडून येतो.

गजेंद्रमोक्ष कथेतील गजेंद्र-नक्राचा आध्यात्मिक आशय पाहाता सर्वच वर्णन मोठे लक्षणीय आहे. आर्त भक्ताच्या पातळींवर धावा करणारा गजेंद्र हा पूर्ण विदेही भक्ताचे स्वरूप दर्शन घडवितो. तो म्हणतो,'हे परमात्मन् या नक्रापासून माझी मुक्तता होऊन मी जिवंत राहाण्याची इच्छा करीत नाही. कारण अज्ञानी अशा या हत्तीच्या देहाचे मला काय प्रयोजन ? ज्याचा काळाने नाश होत नाही अशा परमात्म ज्ञानाला बंधनभूत लिंग-शरीरापासून मोक्षप्राप्ती व्हावी अशी इच्छा आहे. असा हा गजेंद्र अज्ञानी पशु नसून ज्ञानी भक्त वाटतो. अर्थात देहभाव संपवून हरिरूप होऊन भक्ती करताच श्रीहरी प्रकट होतो.'

मूळ भागवती कथेत हरिमेधा आणि हरिणी या ऋषीदांपत्याच्या पोटी हरीच्या रूपात भगवंताचा अवतार होतो. 'हरि' ही आध्यात्मातील परमोच्च ज्ञानावस्था आहे आणि गजेंद्रही अखेरीस हरिरूपच होतो. ही कथासंगती अध्यात्मातील साक्षात्काराचे रूपचित्र प्रकट करताना दिसते. 'अनाम'कवीने तर गजेंद्रमोक्ष कथेत आध्यात्मिक दर्शनचित्र सपष्टपणे मांडलेले दिसते. आरंभीच तो लिहितो—

'नयन-युगुल-द्वारी रम्य कासार पाही ।

विमल उदक बाहे फुल्ल-पद्म-प्रवाही ।।१६।।'

अर्थात त्रिकूट शिखरावरील भ्रूमध्यावर त्रिवेणी संगमयुक्त, रम्य कासार असून श्रुति गर्भवाणी ज्यातून निनादते आहे असा धवलांगी श्रीहरी प्रगट होतो–

निखिल विपिन भागी फाकली पूर्ण ज्योती ।

रविशशि तयिं वाटे लोपले दीप्तिमाजी ।।

अशी दिव्यप्रकाशाची साक्षात्कारानुभूती प्रकट होते.

गजेंद्राने संसारसरोवरात देहासक्त क्रीडामग्नतेने प्रवेश करताच चैतन्यघन श्रीहरीचे विस्मरण होणे स्वाभाविक असून, त्याच्या नामस्मरण साधनेचा पायाच डळमळीत होतो. या कथेतही नक्र गजेंद्राचा पाय धरूनच त्याला अधोगामी खेचतो हे विलक्षण सूचक आहे. हा नक्र म्हणजे नामसाधना करू न देणारा असून तो जीवाला जेरीस आणतो. गजेंद्र हा साधक जीवाच्या रूपात आत्मसाधनेत हृतसरोवरात हृत्कमल अर्पून, हृदयस्थ श्रीहरीचे स्मरण करतो. नक्र गजेंद्राच्या रूपचित्रातून विवेक-वैराग्य-नामस्मरण साधनेतून मुक्तीपर्यंतचे अध्यात्मदर्शन स्पष्टपणे उलगडत जाते. अन्यथा साध्या नक्र गजेंद्राची ही स्फुट कथा शतकाशतकातून प्रातःस्मरणीय मोक्षोद्धारक म्हणून चिरंजीवी ठरलीच नसती. आज भारतीय संस्कृतीत या कथेचे विलक्षण महत्त्वाचे असे स्थान आहे.

## ३) निर्वाचित कथासंच

| | | |
|---|---|---|
| १. मूळ भागवत | - संस्कृत कथा | - ९२ श्लोक. |
| २. नामदेव | - नक्रोद्धार कथा | - अभंगात्मक एक अभंग. |
| ३. एकनाथ | - गजेंद्रमोक्ष कथा | - ओवीबद्ध ५३ (पहिली कथा) |
| ४. एकनाथ | - गजेंद्रमोक्ष कथा | - ओवीबद्ध ४० (दुसरी कथा) |
| ५. तुकाराम | - गजेंद्रमोक्ष (दृष्टांतकथा) | - अभंगात्मक - १/१ अभंग. |
| ६. मुक्तेश्वर | - गजेंद्रमोक्ष | - ओवीबद्ध. ३६ ओव्या. |
| ७. वामन पंडित | - गजेंद्रमोक्ष | - वृत्तबद्ध. १२ श्लोक. |
| ८. रघुनाथ पंडित | - गजेंद्रमोक्ष | - वृत्तबद्ध. १८ श्लोक. |
| ९. रंगनाथ निगडीकर | - गजेंद्रमोक्ष | - वृत्तबद्ध. २४ सवाया. |
| १०. रघुनाथ | - गजेंद्रमोक्ष | - समश्लोकी २२ श्लोक. |
| ११. अनाम कवी | - गजेंद्रमोक्ष (पूर्ण) | - विविधवृत्ते ३४. |
| १२. अज्ञात कवी | - गजेंद्रमोक्ष | - ओवीबद्ध ११ ओव्या. |
| १३. गिरिदास | - गजेंद्रमोक्ष | - ओवीबद्ध ४० ओव्या. |
| १४. गोविंद | - गजेंद्राचा धावा | - विविध वृत्तात्मक २२ श्लोक. |
| १५. पंडित सुरेंद्र | - गजेंद्रमोक्ष | - विविध वृत्तात्मक ६२ श्लोक. |
| १६. माधव | - गजेंद्रमोक्ष | - विविध वृत्तात्मक ४३ श्लोक. |

| | | |
|---|---|---|
| १७. अनामकवी (दास) ? | - गजेंद्रमोक्ष (संमिश्र काव्य) | - पदे, ओव्या इ. ३९. |
| १८. विष्णुदास | - गजेंद्रोद्धारण | - ओवीबद्ध ७३ ओव्या. |
| १९. शेष | - गजेंद्रमोक्ष | - पदे ३. |
| २०. अनाम साधक | - गजेंद्रमोक्षानुभव | - श्लोक (१०). |

## ४) मूळ भागवती कथा

भागवत पुराणाच्या पार्श्वभूमीवर अष्टम स्कंधातील दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या अध्यायात अनुक्रमे ३३ : ३३ : २६ - अशा एकूण ९२ श्लोकांतून ही गजेंद्रमोक्षाची कथा मांडली आहे.

क्षीरसागरात त्रिकूट नामक एक पर्वत होता. तेथील वरुणाच्या उद्यानात असणाऱ्या रमणीय सरोवरात तृषार्त असा गजेंद्र पाणी पिण्यासाठी आला. सरोवरात शिरून यथेच्छ पाणी पिऊन बाहेर येऊ लागला, तोच एका नक्राने त्याचा पाय धरला. सर्व प्रयत्न करूनही ती त्याची मगरमिठी सुटेना. त्यांची ही झुंज हजार वर्षे चालली. अखेरीस सर्व उपाय हरले आणि प्राणांतिक संकटाच्या वेळी निरूपाय होऊन गजेंद्राने ईश्वराचा धावा केला. 'मी मगरीपासून मृत्यु टाळण्याची इच्छा करीत नसून, अज्ञानमोक्षाची इच्छा करतो.' (८/३/२५) हे स्तोत्र ऐकून भगवान प्रकट होतात. त्यांचे दर्शन घडताच त्याने सोंडेन एक कमल उपटून भक्तिभावाने त्यास आकाशात वाहिले. तेव्हा प्रसन्न होऊन दयाळू भगवंतानी चक्राने नक्राचे मुख छेदून गजेंद्रास मुक्त केले व त्यास सरोवरातून बाहेर काढले.

प्रस्तुत 'गजेंद्रमोक्ष' कथेतील नक्र म्हणजे देवल ऋषींच्या शापाने 'मगर' झालेला 'हुहू' नामक गंधर्व असून 'गजेंद्र' हा पूर्वजन्मीचा द्रवीड देशाचा राजा 'इंद्रद्युम्न' राजा होय. तो विष्णु भक्त असून मलयाचलावर तपश्चर्या करीत असताना एकदा तेथे अगस्तीऋषी आले. पण राजा ध्यानमग्न असल्याने त्याने ऋषींचा प्रत्युत्थानादि आदर-सत्कार केला नाही. तेव्हा 'हा दुरात्मा आहे, हा हत्ती होवो' असा त्यानी शाप दिला. राजाने मुनींची प्रार्थना केली आणि ऋषीनी त्याना 'विष्णु तुझा उद्धार करील. ' असा उःशाप देऊन त्याचे समाधान केले. पुढे तो कुंजर योनीत प्रविष्टला व पुढे त्याची देवांनी सुटका केली; मुक्ती दिली आणि गजेंद्राला आदेश दिला की, जे लोक प्रातःकाळी उठून, इंद्रियनिग्रह करून एकचित्ताने या कथेचे स्मरण करतील, ते पापमुक्त होतील. त्यांना सद्गती व उन्नती प्राप्त होईल. या स्तोत्राने जे आळवतील त्याना मृत्युसमयी विमल बुद्धी प्राप्त होईल.

## ५) प्रयोजन विचार

### १) मूळ भागवत - मोक्षदर्शन

मूळ भागवती कथेत शुक्राचार्य राजा परीक्षितीला चौथ्या तापस मन्वंतरातील 'हरि' नामक अवताराची कथा सांगत आहेत. तेथे गजेंद्राने 'हे हरे' अशी आर्त हाक

मारताच भगवंतानी प्रकट होऊन नक्रापासून गजेंद्राची मुक्तता केली. भगवान श्रीकृष्णाचा गजेंद्रमोक्षरूप पराक्रम सांगणे हे या कथेचे प्रयोजन आहे. शिवाय या कथाश्रवणाने चतुर्विध पुरुषार्थ प्राप्त होतात. ही कथा यशबुद्धिदायिनी, कलिमलापहारिणी, दुःस्वप्ननाशिनी - पुण्यकारिणी आहे. ही चतुर्विध पुरुषार्थ प्राप्त करून देणारी म्हणूनच प्रातःस्मरणीय आहे.

**'स्वर्ग्यं यशस्य कलिकल्मषापहं दुःस्वप्ननाशं कुरुवर्य श्रृण्वताम् ।'** ८.४.१४

तसेच या कथेतील त्रिकूट गुहा, वृक्ष इत्यादींसह गजेंद्राने केलेल्या स्तोत्राने जे माझे स्मरण करतात त्याना मी अंतकाळी उत्तम गती देतो.

**'तेषां प्राणात्यये चाहं ददामि विमलां गतिम् ।'** ८.४.२५ ।।

म्हणजे भगवंताची दृष्टी ज्यावर पडते ते अवघे मोक्षप्रद - पुण्यकारक ठरते हे दाखवून देणारे भगवंताचे अभिवचन इथे स्पष्ट होते.

## २) नामदेव

नामदेवांच्या 'नक्रोद्धार' या दृष्टांतकथेचे प्रयोजन नाममाहात्म्याबरोबरच 'रूपदर्शना' चाही महिमा प्रत्यक्ष दाखवून देणे हे आहे. देवाचे नाम आणि नामाचा देव भक्ताना कसे लीला कौतुक दाखवितो हे रोकड्या दृष्टांताने त्यांनी दाखवून दिले आहे. त्यामुळेच 'नाममात्रे तारिले गजेंद्रासी' - असा गजेंद्रोद्धार करून नक्रोद्धाराचा विचारही 'तुझे रूप देखिले म्या अजि डोळा' - या दर्शन-सोहळयात मांडून 'दीनानाथे तात्काळ उद्धरिले' ही उभय - गजेंद्र-नक्रोद्धाराची प्रयोजनसिद्धी केली आहे.

## ३) एकनाथ

**कथा १**

एकनाथांच्या पहिल्या कथेतील प्रयोजन–विचार पाहाता तीन बिंदूतून त्रिविध प्रयोजन-केंद्रे समोर येतात.

१. .... **।। अति अवघड प्राणांत ।।१.३७।।**
**.... कलत्रपुत्र सुहृदज्ञाती । न येती अंती उपेगा ।।१.३८।।**

२. **ऐंशी मज जे आठवण । हेचि परमकृपा पूर्ण ।**
**हरि अनुग्रहेवीण । नामस्मरण नाठवे ।।१.३९।।**

३. **लागता भगवंताचा हात । दोघेजण अति उद्धत ।**
**तेही झाले शापोन्मुक्त । भाग्यवंत सभाग्ये ।।१४.४।।**
**माझिये दर्शनाचिये प्राप्ती । तुज जाहली ज्ञानस्फूर्ती ।।१.५२।।**

अर्थात प्राणांत संकटकाळी एका भगवंतावाचून कोणीही धावून येत नाही असा नित्यानित्यविवेक मांडला आहे.

'भगवंताची परमकृपा असल्यावाचून संकटकाळीदेखील भगवन्नामाचा आठव येत नाही. म्हणून नामस्मरण साधावे असे प्रेरक प्रयोजन सांगितले आहे.

भगवंत परमकृपाळू असल्यानेच गजेंद्रासह नक्राचाही उद्धार होतो. जडमूढही त्याच्या दर्शनाने उद्धरतात हे दर्शवून दिले आहे. अशी त्रिविध प्रयोजने येथे आढळतात.

४) कथा २

या दुसऱ्या कथेत 'अंती तूची तारक होसी' असे भावात्मक (Positive) प्रयोजन 'मागील कथेतील' न येती अंती उपेगा' या नकारात्मक प्रयोजनाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसते.

**'देव म्हणे मी पतितपावन । मिरवे ब्रीद हे पै जाण ।।२.३४।।**

असे भगवंत नक्रास म्हणतात तेव्हां त्याचाच पुनरुच्चार करून नक्र म्हणतो.

**'मजसारिखा पतित उद्धरसी । तरीच होसी पतितपावन ।२.३५।।**

म्हणून आपले ब्रीद राखण्यासाठी त्यानी नक्राचाही उद्धार केला आहे. श्रोत्यानाही ही कथा श्रवण-पठणाचे प्रयोजन नाथांनी भागवती कथेप्रमाणेच मांडले

**ऐसे गजेंद्र आख्यान । श्रोते व्हावे सावधान ।**

**चुकोनिया जन्ममरण । ..... ।।**

**'दोष त्यांचे महादारुण । नासतील सत्य ।' २.४४ ।।**

## ५) तुकाराम-प्रयोजन

कृपेचा सागर भक्तवत्सल देव हा भक्तसंकटी रक्षण करण्याच्या ब्रीदास बांधला गेलेला असतो हे प्रत्यक्ष प्रमाणाने दाखवून देण्याचे प्रयोजन मूळ भागवती कथेप्रमाणे प्रस्तुत अभंग-कथेत स्पष्टपणे दिसते.

**'तुका म्हणे ब्रीद बांधला यासाठी । भक्तासी संकटी रक्षावया ।।२३५०।।**

## ६) मुक्तेश्वर-प्रयोजन

मुक्तेश्वराने प्रयोजन-विचार मांडताना दैवगती अटळ असून, तो ब्रह्मदिकांनादेखील चुकत नाही असे म्हटले आहे. तसेच या नश्वर जगात मृत्यू अपरिहार्य आहे. पण एखादा गेला तर पुढीलानी त्याचा कुळधर्म, कुळाचार चालू ठेवावा अशा स्वरूपाचे प्रयोजन गजेंद्राच्या ज्ञातिबांधवांच्या तोंडून वदविले आहे. त्याचबरोबर संसाराचे वैय्यर्थही प्रतिपादले आहे. याशिवाय 'विपद : सन्तु मे शश्वत्' अशा शब्दात भगवंताकडे संकटाची परंपरा मागणाऱ्या कुंतीचा प्राकृत हुंकार मुक्तेश्वराच्या प्रयोजनात उमटतो. तो म्हणतो,

**'शरीर संपत्तीचे काळी तुझा । आठव न ये हृदयकमळी ।**

**विपरीता होता वनमाळी । आठव ते काळी होतसे ।।   ६७**

**पूर्व आपदा झालियाविण । नातुडती तुझे चरण ।। ६८ ।।'**

पण शेवटी भगवंतही भक्ताला साह्य होतो आणि 'तारी आपुले निज भक्त ' असे घडते.

### ७. वामन पंडित : प्रयोजन

**'तरे तो दुःखाब्धी न परमपदी हुनि उतरे ।।'**

वामनाने आपल्या स्तोत्रकथेत गजेंद्रमोक्षाचे प्रयोजन स्पष्टपणे उल्लेखिले असून, नवविधा भक्तीचे सार म्हणजे श्रीहरीचे नाव आहे. श्रीहरीशिवाय या जगाचा दुसरा कोणीही धनी नाही. हे गजेंद्रासमक्ष, सर्व देवांसमोर प्रत्यक्ष भगवन्मुखातून पंडितांनी वदविले आहे. पंडित लिहितात—

**'नवा भक्तीची हे गति दिधली ज्याला अभिनवा ।**
**न वाटे त्या सर्वा हरिविण धनी आणिक जगा ।**
**जगा गा हे भक्ती प्रभुतव म्हणती ईश मज गा ।। ९'**

- फलश्रुतीच्या स्वरूपात प्रयोजन मांडताना ते म्हणतात—

**'वदे तेव्हां सर्वा द्विरदवरदा श्रीपती असा ।**
**असारी संसारी गजगती असी गातचि असा ।**
**पहाटे हे गाय प्रतिदिनीहि माझे चरित रे ।**
**तरे दुःखाब्धी तो न परमपदी हुनी उतरे ।।'**

गजेंद्रसारखी मुक्ती मिळविण्याची शक्ती इतरात नसल्यामुळे स्तोत्र-पठणातूनच त्याचा उद्धार होतो. अशी स्तोत्र-पठणासाठी प्रयोजनाची प्रेरकता पंडितानी मांडली आहे - 'जनी गाती त्याला फळ परम या विष्णुभजनी ' ।।१२।।.

म्हणूनच शेवटी - 'जनी भक्त स्वामी करि भजक हो गातचि असा ' - अशी भक्तांना विनंतीही केली आहे. त्यामुळेच हे स्तोत्र सर्वतोमुखी झालेले दिसते.

### ८) रघुनाथ पंडित : प्रयोजन

स्फुट कथेच्या प्रारंभीच त्यानी आपले प्रयोजन स्पष्ट केले आहे. भक्तीने 'करुणासिंधू बंधू पवनसा लागवेगे' धावून येतो. आणि भक्तरक्षण करतो.

**'तो स्वामी स्मर्तृगामी, निरवधी करुणासिंधू बंधू प्रणामी ।।१।।**

भक्तीच्या प्रयोजनाचा ठोसपणा कथेच्या शेवटी स्पष्ट करतो तो वक्ता आणि श्रोता या उभयतांच्या दृष्टीने -

**'जो गाता अवधारिता सुखकरी ते मुक्ती नांदे करी' ।।५।।**

असे आश्वासन देतो. 'मुखी नाम हाती मोक्ष' हे प्रयोजन इथे स्पष्ट होते.

### ९) रंगनाथ निगडीकर : प्रयोजन

रंगनाथांनी कथेच्या प्रस्तावनेत आणि शेवटी आपला प्रयोजन विचार मांडला आहे.

**'हे भवतारक पापनिवारक लावि गिरा तव रूप वदाया ।**
**मानस मीपण टाकुनि निश्चल हो स्वरूपीरत छेदुनि माया ।।१।।'**

- स्वरूपी तल्लीन करणारे नामस्मरण परिपूर्ण असलेली गजेंद्र कथा सांगत असल्याचे प्रारंभी म्हटले आहे.

**भक्ति सुखाहुनि थोर नसे सुखकारक वेद वदे**
**मायिक ते लटकी**

अर्थात भक्तीचे अनुसंधान ठेवून नित्यवस्तूचा सतत प्रत्यय घेत राहाण्यासाठी अशा कथा-श्रवणाचे प्रयोजन ते सांगतात. शेवटी ते म्हणतात–

**भक्त सुपावन नित्य सुखी मन उन्मन होऊनि भेदविना ते ।**
**भोगिती भोग अतींद्रिय देखति एकपणे चि जना विजनाते ।।**

अर्थात मनाचे उन्मन होऊन सर्वाभूती भगवद्भाव पाहण्यात खरे अद्वैताचे सुख आहे. असे सुख प्रल्हाद-नारद-सनकादिक -ध्रुव-व्यास-धर्म, हनुमंत इत्यादिकांना लाभल्याचे सांगून त्यानी कथाप्रयोजनास ठोसपणा आणला आहे.

**१०) रघुनाथ : प्रयोजन**

'मोक्षोद्धार' हे मूळ प्रयोजन त्यानी आपल्या समश्लोकीत सांगितले.

**११) अज्ञात कवी : प्रयोजन**

नामस्मरण भक्ती

**१२) गिरीदास : प्रयोजन**

हरिचिंतनाने वैकुंठप्राप्ती.

**१३) गोविंद : प्रयोजन**

भगवंताचे भक्तवात्सल्य आणि भक्तीचा महिमा वर्णन

**१४) पं. सुरेन्द्र : प्रयोजन**

भगवंत श्रीहरी भोळया भावाचा भुकेला आहे. तसेच आपणास अपेक्षित इह वस्तूचा लाभ होतोच; पण पारलौकिक सुखही प्राप्त होते.

तसेच ही कथा जे मनोभावे श्रवण करतात त्यांची फलश्रुती–

**'दुष्कर्मे पळती, अरिष्ट टळती, भाग्ये महा भोगती ।**
**धर्मार्थी फळती, सुखी उफळती, त्या लाभ दे पंडिती ।।'**

अशी सांगितली आहे. त्यामुळे इच्छा धरून जे ही कथा ऐकतील त्यांना हा श्रीहरी अपेक्षेपेक्षा जास्त फळ देईल.

**१५) माधव : प्रयोजन**

माधव कवीने आपल्या कथेत -

**'शेवट कोणही कोणाचे नाही ' ।। 'करावा बरा संग साधुजनाचा' ।।**
**'मजे आवडी नित्य कैवल्यदानी'**

'होई साधव माधवी परिहरी संसारीची आपदा ।

- जेणे उद्धरिला गजेंद्र भज तू त्या श्रीहरीच्या पदा ।।'

– असा प्रयोजनविचार मांडला आहे.

अनाम - विष्णुदास - शेष इ. कवींनीही भक्तीप्रयोजन–सूत्र समोर ठेवूनच कीर्तनोपयोगार्थ ही गजेंद्र कथा मांडली आहे.

## कथाबांधणी

### मूळ भागवती कथा

भागवती कथेचा विचार करता ही कथा तीन अध्यायात, तीन टप्प्यात बांधली आहे. श्लोकसंख्या जवळजवळ सारखीच असून ( ३३/३३/२६ ) त्रिकूट पर्वतावरील कथेची ही तीन शिखरे आहेत. प्रत्येक टप्पा स्वतंत्र असला तरी अंतर्गत शृंखलेने सुसंबद्ध आहे. कथेतील चित्रकूट पर्वताचे चित्रदर्शी वर्णन, त्या पर्वतावरील रम्य उद्यान,, त्या उद्यानातील सरोवर आणि त्या सरोवरात ग्राह गजेंद्राचा समर प्रसंग असे कथेचे स्वरूप आहे. भागवत भक्तीच्या दृष्टीने दुसरा टप्पा महत्त्वाचा असून, यातच गजेंद्राच्या भक्तीस्तवनाने भगवंत प्रकट होऊन गजेंद्रमोक्ष घडून येतो. तिसऱ्या टप्प्यात ग्राह गजेंद्रच्या पूर्वजन्मीचे वृत्तान्त–कथन येते. देहाहंकार - पश्चातापदग्ध अनन्य शरणागती नामस्मरणभक्ती आणि विदेही मुक्ती अशी शृंखला असून, हरिदर्शनासाठी जन्मोजन्मी भक्ती करावी लागते. 'हरिभक्ती' हा केंद्रबिंदू ठेवून, भागवतकारांनी वर्तमान घटिताशी - ग्राहगजेंद्र संघर्षाशी - भूतकालीन पूर्वजन्म वृत्ताचा आणि उत्तरकालीन मुक्तीचा सांधा जोडला आहे. कथामांडणीत प्रारंभी पूर्व वृत्तांत न सांगता, शेवटच्या टप्प्यात सांगून कथेतील वास्तवपूर्णता लक्षवेधी केली आहे. गजेंद्राचे स्वच्छंदी चित्रण त्यामुळे अधिकच उठावदार बनले आहे. प्रारंभी पशुयोनीतील प्राण्यांची कथा सांगून, त्यातील अद्भुतरम्यता पूर्वजन्मीचे कुतूहल मांडून औत्सुक्य जागते ठेवले आहे. त्यामुळे कथेचा प्रभावदेखील परिणामकारी ठरला आहे. अध्यात्मातील भक्तीचे सूत्र - अज्ञानी पशूच्या गोष्टीतून मांडून समग्र मानवी जीवाना प्रेरणा देण्याच्या दृष्टीने कथा विलक्षण प्रभावी व जिवंत ठरली आहे.

कथेची सुरुवात निसर्गवर्णनाने झाली असून, त्यातील त्रिकूट पर्वत पार्श्वभूमीप्रमाणे येऊन पुढील कथेची दिशा लक्षित करतो. ही दिशा मोक्ष–उद्धाराची दिशा ठरून, वाचकांना मुक्तीचे आश्वासन मिळते. सुंदर निसर्गचित्रण आणि जिवंत व्यक्तिचित्रणांतून अखेरीस सहस्त्र वर्षेपर्यंत चाललेला हा संघर्ष कथेत अहंकाररहित मुक्तीचे वरदान ठरतो. ग्राहगजेंद्र उभयतानाही मुक्ती मिळते. कथा संपते आणि उपक्रमोपसंहाराची मेळणी होऊन, एका धारदार कथेने वाचक अंतर्मुख होतो.

### वेधक निसर्गचित्रण

गजेंद्रमोक्ष कथा ज्या परिसरात घडते तेथील निसर्गवर्णन वेधक असून, त्यातील

उदात्त पावित्र्य आणि भव्यता रम्यादूभुत अशी आहे. भागवतकार सांगतात-

'आसीद् गिरिवरो राजंस्त्रिकूट इति विस्तृतः ।

क्षीरोदेवावृत : श्रीमान, योजनायुत मुद्रित :।।८ : २ : ६।।'

अर्थात क्षीरसमुद्राने वेष्टित अशा दहा हजार योजने उंच आणि तितकाच रूंद असा त्रिकूट नावाचा पर्वत असून त्याच्या रौप्यमय, लोहमय आणि सुवर्णमय अशा तीन शिखरांच्या तेजाने आकाश व दशदिशा प्रकाशित होत होत्या. नाना रत्ने, नाना धातूंनी तो चित्रविचित्र दिसत होता. नाना लतावृक्षांनी निर्झर-प्रवाहानी सुशोभित दिसत होता. तो पर्वत सिद्धचारण गंधर्वांची क्रीडाभूमी असून पाचूचा होता. 'नाना द्रुम लता गुल्मैः निर्घोषं निर्झराम्भसाम् १८ : २ : ३ ।। त्या पर्वतावर वरूणाचे' 'ऋतुमत्' नावाचे उद्यान होते. त्यात सुवर्णकमळे असून पांढरी - निळी संध्याविकासी कमळे होती. हंस कारण्ड चक्रवाक-सारस या सारख्या पक्षांनी ते गजबजले होते . तिथे सर्व प्रकारची फुले होती. जंगली वाघ, शहामृग वनगाय इत्यादींचा संचारही होता.

मूळ भागवती कथेत आलेले हे विस्तृत निसर्गवर्णन हा एक वेधक आणि नयनरम्य भाग आहे. त्यामुळे कथानकास उठावदारपणा आला आहे. पण मराठीतील स्फुट आख्यानात स्वतंत्र निसर्गवर्णनासाठी फारसा अवधी दिलेला दिसत नाही. कथेतील संदर्भानुसार त्रिकूट शिखर, तेथील उद्यान व सरोवरचा निर्देशच केवळ आलेला दिसतो. रघुनाथ पंडित, आनंदतनय, पंडित सुरेंद्र यांच्या कथेत मात्र निसर्गाचे कल्पनारम्य प्रसन्न चित्रण घडविले आहे. अर्थात स्फुट आख्यानांच्या लहान आकारामुळे कथेच्या संदर्भात थोडक्यात मांडलेले चित्रणही वेधक असेच आहे.

### मूळ कथेपेक्षा बदलते रूपाविष्कार

मराठी कवीनी पुराणप्रसिद्ध व मर्यादित विस्ताराचे असे हे आख्यान रंगतदार बनविले आहे. त्यामुळे मुळापेक्षाही वेगवेगळे रूपाविष्कार आपणास दिसून येतात. हे बदल व्यक्तिसापेक्ष,कालसापेक्ष असून वेधक आहेत.

मूळ भागवती कथा ही कथेपेक्षा तत्त्वज्ञान सांगताना दिसते. म्हणजे तत्त्वज्ञानाच्या परिपोषासाठी इथे ती अवतरते.पण मराठी कवींच्या कथारचनेत कथावगुंठित तत्त्वज्ञान प्रकटल्याने कथात्मकतेचा रंजक भाग अधिक उठून दिसतो.

### वृत्तवैविध्य

मूळ संस्कृत कथा मध्ययुगीन मराठी कवीनी मराठीत मांडताना भाषाभेद स्वीकारला असला, तरी मुळापेक्षा वेगवेगळवा वृत्तांतून कथारचना करून आपले निराळेपण दाखविले आहे. मराठी कवीनी विविध वृत्ते वापरली आहेत. तुकाराम, नामदेव अभंग वृत्त. - एकनाथ, मुक्तेश्वर, गिरिदास, विष्णुदास यांनी ओवी हे प्राकृत धावते वृत्त कथेसाठी वापरले आहे. वामन पंडित, रघुनाथ पंडित, रंगनाथ निगडीकर, गोविंद, पं. सुरेंद्र, माधव यांनी वेगवेगळी वृत्ते वापरून कथेची रंजकता वाढवली आहे.

शेष कवीनी तीन पदांतून कथा मांडली, तर पद अभंग ओवी यांची संमिश्र रचना अनाम कवीने केलेली दिसते. रघुनाथ कवीने 'समश्लोकी' चा वापर केला आहे. म्हणजे संतपंत कवीत मूळ कथानकातील बदलाबरोबरच वृत्त बदलण्याची मर्मज्ञताही दिसून येते.

विविध वृत्तयोजनेप्रमाणे मुळापेक्षाही अनुप्रास, यमके, ध्वन्यनुसारी शब्दयोजना इ. ची भरपूर रेलचेल करून संत-पंत कवीनी भाषाप्रभुत्वाची चुणूक दाखवून दिली आहे. एकनाथ, मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, गोविंद, पं. सुरेंद्र, माधव, शेष इ. कवींच्या काव्यात हे प्रकर्षाने जाणवते.

मराठी कवींनी मूळ भागवती कथा यथामूळ निवेदिली असून, तिच्यात अनेक बदल केले आहेत. हे बदल व्यक्तिमत्त्वातील अंतरंग वैशिष्ट्यामुळे, कालसापेक्षतेने युगधर्माचे परिमाण घेऊन प्रकटताना दिसतात. प्रत्यक्ष कथेच्या अंतरंगात केलेले बदल लक्षणीय ठरणारे आहेत. उदा. मूळ भागवती कथेप्रमाणे - पांडय देशचा राजा इंद्रद्युम्न मलय पर्वतावर ध्यानस्थ बसला असता, त्याच्याकडून अगस्ती मुनींची अवज्ञा झाली. त्यामुळे मुनीनी त्याला तू गजयोनीत जाशील असा शाप दिला. आणि 'हू हूं' नामक गंधर्वाला देवल ऋषीनी शाप दिल्याचा उल्लेख आहे. पण एकनाथानी अगस्त्य व देवल हे ऋषी एकाच सरोवरापाशी असून, त्या दोघानी त्याना शाप दिल्याचा व उःशापही दिल्याचा उल्लेख करतात. नाथानी मूळ द्रविड देशातील पाण्डय नगराऐवजी पांचाळ देशचा राजा असा निर्देश केला असून, या सरोवराकाठी तो ध्यानस्थ बसला असता तेथे अगस्ती मुनी येतात व शापवाणी उच्चारतात असे म्हटले आहे. तर पं. सुरेंद्राने एकट्या अगस्ती मुनीनीच दोघांनाही एकाच ठिकाणी शाप दिला असे सांगितले आहे.

एकनाथांनी मूळ भागवती कथेपेक्षा देवल ऋषी त्या सरोवरात सूर्यसूक्त जपत उभे असल्याचा कथाभाग नव्याने स्वतंत्रपणे मांडला आहे. तर पं. सुरेंद्राने अगस्ति ऋषी त्या सरोवरात संध्यावंदन करताना अर्ध्य सोडून गायत्रीचा जप करीत होते तेव्हा गंधर्वाने त्यांचा पाय ओढला असा निर्देश केला आहे. मग 'कोपूनि शाप दिधला उभयासि होडी' – असे म्हटले आहे एकनाथांनी गजेंद्राच्या सोंडेची अणि नक्राने खुडल्याने तो अधिकच कासावीस झाल्याचे नव्याने व स्वतंत्रपणे सांगितले आहे.

मूळ भागवती कथेतील आध्यात्मिक आशय पं. सुरेंद्राने मुळापेक्षाही अधिक स्पष्ट आणि नेमक्या शब्दातून मांडला आहे. अशा वेळी रंजककथेचे आवरण दूर सारून कथेतील अध्यात्म संकेत उलगडून स्पष्ट मांडताना त्याचे वेगळेपण उठून दिसते.

मूळ भागवतात गजेंद्राच्या धाव्याच्या वेळी विष्णूंच्या विशिष्ट स्थाननिर्देशाचा उल्लेख नाही. पण गिरिदास व गोविंद यांनी तो नव्याने केला आहे गिरिदास लिहितो–

**'निद्रिस्त होता शेषावरी । रमा त्याचे पाय चुरी ।**

**नारद तुंबर गायन करी । उभय भागी ।।'**

गोविंद लिहितो–

**'क्षीरसागरी फणिवरावरी । चरण सुंदरी मर्दिते करी ।।१८।।'**

मुळातील गजेंद्राच्या तृषार्त रूपदर्शनापेक्षाही पं. सुरेंद्राने रम्य विस्तार मांडला आहे. ग्रीष्माच्या उन्हाने पाण्यासाठी हवालदिल होऊन, सैरभैर भटकणाऱ्या कळपातील हत्तींच्या हालचालींचा चलत-चित्रपट आहे. हे वास्तव चित्रण नव्यानेच घडविले आहे.

गिरिदासाने गजेंद्र धावा रंगविताना एक वेगळेच रंजक कल्पचित्र उभे केले आहे. त्याच्या वर्णनात 'विष्णूने तोंडावर पीतांबर ओढून घेतला होता. तो किंचित बाजूला केला तेव्हां त्याला नक्राने गजेंद्राच्या पायाला विळखा घातल्याचे दिसले. मुक्तेश्वराने मुळापेक्षा नव्यानेच सरोवराएवजी गंडकी नदीचा उल्लेख केला आहे. ' सर्व नदीप्रति जाय। परि गंडिकेसी न जाय' असा शाप असून विपरित दैवगतीमुळे तो गंडकी नदीवर आला.

मुक्तेश्वराचा दुसरा एक निर्देश अन्य कोणाही मराठी कवीत किंवा मूळ भागवतातही नसलेला गजेंद्राची सोंड मगरीने पकडल्याचा निर्देश त्यात आला आहे. पायापेक्षाही सोंड पकडल्याने तो अधिकच जर्जर झाला आहे. पण त्यामुळे सोंडेने कमळ वाहिण्याचा इतर कथांतील उल्लेख यात नाही. मुक्तेश्वराचा गजेंद्र केवळ धावा करतो; कारण त्याची सोंडच नक्राने पकडली आहे.

मुक्तेश्वराचा मुळापेक्षाही नवीन पण एकनाथ, नामदेवादि संतकवींनी केलेला उल्लेख पहा. गजेंद्राची स्तुती ऐकून श्रीहरि धावून येतो तेव्हा उडी मारून, प्रथम दोघानाही बाहेर काढतो आणि मग गजेंद्राला सुदर्शन चक्राने सोडवतो, त्यावेळी नक्र लगेच मरत नाही. गजेंद्रास विमानी बसवताच तो धीटपणाने देवाशी युक्तिवाद करून मुक्ती मिळवितो. 'देवांनी आपली स्वरूपता द्वारपाळ केले उभयता।' देवानी दोघानाही "सरूपता' ही मुक्ती देऊन, वैकुंठीचे द्वारपाळ केले, हा उल्लेख मात्र मुक्तेश्वर नव्यानेच करतो.

वरीलप्रमाणे मराठी कवीनी मूळ कथानकात बदल करून, मूळ तात्त्विक कथेतील रंगभरणी वेधक आणि भेदक बनविलेली दिसते. ही कथाबांधणी संत-पंत कवींच्या व्यक्तिमत्त्वानुसार विविधता प्रकट करीत असून, अभंग - ओवी - वृत्तबद्ध संमिश्र रचना अशी त्याची बाह्य मांडणी दिसून येते. कथाबांधणीतील हे बदलते रूपबंध वेधक असून, त्यांच्या पृथगात्म वैशिष्ट्यांचा विचार यथाक्रम करू.

## कथाबांधणी स्व-रूप विवेचन

### १) नामदेव

मूळ भागवती कथा एकूण ९२ श्लोकात मांडली असून, नामदेवांनी केवळ एकाच अभंगातून ही दृष्टान्त कथा उभी केली आहे. कथाबांधणीचा विचार करता नामदेवांनी गजेंद्राऐवजी नक्रोद्धाराचीच बाजू मांडली आहे.

'नाममात्रे तारिले गजेंद्रासी' असा केवळ प्रारंभ करून 'आता कैसा बा मोकलुनि जाशी' अशी नक्राची कैफियत मांडली आहे. जलचर मूळ योनीतील मगरीची उद्धारीची उत्कट तळमळ पाहून त्याच्या विरोधभक्तीने भगवंत प्रसन्न होतात आणि 'दीनानाथे

तात्काळ उद्धरीले' नक्रोद्धार होतो. भगवंताचा दयाळूपणा वाचकांच्या मनावर ठसविताना पूरक दाखले म्हणून 'रजमात्रे तारिली अहिल्या शिला' आणि 'नामे उद्धरिले अजामेळ' नक्रमुखातून वदविले आहेत.

'पापी कैसा मी घननीळा । तुझे रूप देखिले म्यां आजि डोळा' – अशी नक्राची सडेतोड विचारणा मानी भक्ताचे दर्शन घडविते. या लघुत्तम कथेतून नामपठणाचे अगाध कौतुक नामदेवांनी मांडले आहे. एका छोट्याशा प्रसंगातून भगवत्कृपेची आश्वासकता आणि भगवंताचे दर्शन-सामर्थ्य या कथेद्वारे प्रकट होते. प्रस्तुत कथेत नक्र हे एकच प्रमुख पात्र असून,त्याच्याच उद्धाराचा प्रसंग मांडला असल्याने 'नक्रोद्धार' हे शीर्षकही प्रस्तुत कथासंचात वेगळेपणाने उठून दिसते.

२) **एकनाथ**

एकनाथांनी गजेंद्रमोक्षाची पहिली कथा ५३ ओव्यातून मांडली असून,सर्व ओव्या ४।। चरणी आहेत. त्यांच्या दुसऱ्या कथेत मात्र एकूण ४० ओव्यांपैकी ११ ओव्या ४।। चरणी असून,उरलेल्या २९ ओव्या ३।। चरणी आहेत. एकनाथांच्या बाबतीत अपवादभूत ठरलेली ही संमिश्र ओवीबांधणी लक्षणीय ठरते. मूळ कथेपेक्षाही अल्पाक्षर रमणीय शब्दचित्रे नाथानी रेखाटले आहे. एक दोन ओव्यातूनच शुक आणि परिक्षितीचे वर्णन त्यानी सजीव केले आहे.

**'जो योगियांचा योगग्रहणी । जो ब्रह्मचर्या शिरोमणी ।**
**जो ज्ञानियांचा मुकुटमणी । तो शुकमुनी सांगत ।। १.१ ।।** किंवा
**पांडवकुळी कुळदीपक । कौरवकुळी कुलनायक ।**
**श्रोता परीक्षिती त्यक्तोदक । श्रवण बालक कथार्थी ।।१.३।।**

'त्यक्तोदक' 'श्रवण बालक' बनलेला परीक्षिती आणि विवेक वैराग्यसंपन्न होऊन,हरिनाम स्मरण करणारा गजेंद्र यांतील साम्य पाहाता - 'मोक्षो मे भूयात् इतीच्छा' या दृष्टीने या कथेत उपक्रमोपसंहाराची एकवाक्यता साधते. त्यामुळे कथेच्या शेवटी–

'जाले गजेंद्राचे उद्धरण । श्रोती व्हावे सावधान' ।।६.५३।। अशी समारोपाची ओवी वाचताच आरंभीचा श्रवणार्थी चातक राजा परीक्षितीदेखील नक्कीच उद्धरून गेला याची खात्री पटते. या दृष्टीने नाथांच्या या कथेचा प्रस्ताव विलक्षण प्रेरक व मार्मिक बनला आहे. संसार मायामोहग्रस्त साधकाची विवेक,वैराग्यसंपन्न अवस्था आणि देहाहंकाररहित विदेही अवस्थेत भगवत् कृपेने झालेला उद्धार असा साधनक्रम मांडला आहे. गृहस्थी नाथांनी सपरिवार गृहस्थी गजेंद्राची कथाबांधणी सादर करावी यातील एक प्रेरक औचित्य विचारणीय आहे.

कथाप्रस्तावानंतर त्रिकूट गिरीवरचे थोडक्यात वर्णन असून,ग्राहगजेंद्राचे पूर्वजन्म वृत्त कथन मुख्य समर-प्रसंगाआधीच केले आहे. मूळ भागवती कथेत नाथांनी हा बदल केलेला आहे. यामुळे नक्र-गजेंद्र संघर्षातील अटळता शापामुळे खूपच कमी जाणवते

वा. क्र. निबंध 3764 २६६३३ ८।६।८२

आणि 'युद्ध करिता जलकल्लोळी । तुम्हा वनमाळी तारील ।' हे भगवंताचे आश्वासन ज्ञात असल्यामुळे नक्र-गजेंद्राचा उद्धार होणार यात नवल राहात नाही. तथापी, कथेचा अंतिम परिणाम प्रभावीपणे साधला जातो. या कथाबांधणीत नाथांचे लक्ष 'अति अवघड प्राणांत' (१.३७) या मुख्य घटनेवर केंद्रित झाले असून, तेथे गजेंद्राची एकाकी अवस्था दर्शवण्याचा प्रयत्न असून 'कलत्रपुत्र सुहृदज्ञाती । - न येती अंती उपेगा' । १.२८ ॥ याचे ते एक प्रात्यक्षिक आहे.

**कथा दुसरी**

एकनाथांच्या दुसऱ्या कथाबांधणीत पहिल्या कथेप्रमाणे एक क्रम न येता मध्यावरूनच ती आरंभ पावते. 'गज नक्रे गिळिला वैकुंठ परियंता' या पहिल्याच आरंभातूनच वाचकांची उत्सुकता ताणली जाते. 'कुतूहल जागे होते. वरील गर्जना कोण करतो ? तेथून ते 'अंती तारक तूचि होसी' या प्रयोजनापर्यंत कथेचा परिवेष ध्यानी येतो. कथाबांधणीच्या दृष्टीने कथेचे दोन भाग पडतात (१) गजेंद्रमोक्ष आणि उत्तरार्धात (२) नक्रोद्धार. या दोन्ही भागातून 'नामस्मरणा'ची महती मांडली आहे. यातून वैशिष्ट्यपूर्ण असे भक्तीचे दोन नमुने सादर केले आहेत. (१) गजेंद्र हा संसारातील मोहात फसल्याने अंती पश्चातापदग्ध होऊन भगवंताला सर्वभावे शरण जाऊन नामस्मरणात तन्मय होतो तर (२) नक्राच्या रूपाने वेदांती दाखले देऊन भगवंताचे दर्शन घडल्यामुळे नक्रोद्धाराचा उद्धारक युक्तिवाद पंडिती वळणातून पाहावयास सापडतो. शेवटी भक्तिमार्ग आणि ज्ञानमार्ग यांचे अंतिम गंतव्य एकच आहे. हे स्पष्ट होते. कारण एकाच विमानात दोघानाही (नक्र-गजेंद्र) बसवून वैकुंठी नेतात. 'एका जनार्दनी शरण । पतितपावन श्रीकृष्ण ।' या वाचनाशी कथासूत्र एक होते. एकनाथांच्या एका कथेत फलश्रुती सांगितली असून, दैवी आकर्षण प्रस्थापित केले आहे. कथारचनेत नाथांनी गजेंद्र आणि नक्र या दोन्ही पात्रावर सारखेच लक्ष केंद्रित केले असून, दोघांच्या रूपचित्रांतून भक्तीच्या भिन्न भिन्न छटा दृगोचर होतात. पहिल्या कथेत गजेंद्रावर लक्ष केंद्रित केले आहे. नामस्मरण भक्तीची ही रंगभरणी मूळ भागवती-कथेपेक्षाही स्पष्ट आणि वेधकतेने प्रकटली आहे. रसनिर्मितीच्या दृष्टीने नाथांच्या दोन्ही कथा सरस उतरल्या आहेत. प्रसंगोपान करूण, निर्वेद, शांत इ. रसांचे प्रदर्शन होते. अखेरीस रसरूप परमात्मा भेटतो. दुसऱ्या कथेत युक्तिवाद करणाऱ्या नक्राचे दर्शन घडते.

**३) मुक्तेश्वर**

मूळ भागवतापेक्षा निम्म्या म्हणजे अवघ्या ३६ ओव्यात ही कथा मुक्तेश्वराने सादर केली आहे. प्रस्तुत कथा संक्षेपाने सांगणे एवढेच मुक्तेश्वराच्या कथाबांधणीचे स्वरूप आहे.

मुक्तेश्वराचा नक्र इथे गजेंद्राची सोंडच धरतो. पण हे अशक्य वाटते. कारण हा संघर्ष हजारो वर्षे चालू आहे. शेवटी गजेंद्राने, विष्णु प्रगट होताच सोंडेने कमळ

खुडून ते विष्णूस वाहिले, इ. गोष्टींची संगती लागत नाही. कथेतील व्यक्तिचित्रणे तितकी रंगली नाहीत. मुक्तेश्वरी प्रतिभेचा रम्यविलास व त्याचे कल्पनावैभव या कथाबांधणीत दिसत नाही. मात्र, कथेतील गजेंद्राच्या पत्नी व इतर नातेवाईकांचा विलाप - त्यांचे तेथून निघून जाणे हे सहानुभूतीने चित्रित केले आहे. कुणाच्याही मृत्यूमुळे पुढील कामे थांबत नाही. मृत्यू अटळ आहे; त्यामुळे गजेंद्राचा स्त्रीपुत्रादिकांनी प्रारंभी शोक केला आणि आपल्या कामासाठी निघून गेले. आपल्या या कृतीचे त्यानी समर्थन केले. आपल्या वर्तनाचे गोंडस तत्वज्ञान उभे करताना ते म्हणतात,'वडिलांचिया कुळधर्मा । तया नेमा न चुकावें' ही वास्तव लोकांची मनोधारणा मुक्तेश्वराने मांडली असून, त्यातून त्याचे वेगळेपण ध्यानात येते. मुक्तेश्वराची कथाबांधणी निवेदनाच्या पातळीवर असल्याने त्यात नाट्यपूर्ण संवाद आढळत नाहीत. मात्र जागोजागी जीवनातील सूत्र वचनांची पेरणी केलेली दिसते. उदा. **'होणार गतीसारिखे'** ।।२।।

**'उभी राहाता होणार गती । ज्ञाते तेचि भ्रांति पावती ।।३।।'**

**'संसार संपत्तीचे काळी । तुझा आठव न ये हृदयकमळी ।।**

**विपरीत होता वनमाळी । आठव ते काळी होतसे ।।१६।।.**

**'झालिया भाग्याचा उदयो । म्हणे मी कर्ता होय ।।१७।।**

**'ऐकता भक्ताचे दीनवचन । सर्व दात्याते नुपेक्षी ।।२३।।** इत्यादी.

## ४) वामन पंडित – कथा ते संक्षेपे कथिन

वामन पडितांची 'गजेंद्रमोक्षाची' कथाबांधणी शुद्ध स्तोत्राप्रमाणे झाली असून कै. ल. रा. पांगारकरांनी 'भक्तिमार्ग प्रदीपात' स्तोत्र म्हणूनच प्रस्तुत कथेचा समावेश केला आहे. 'संपूर्ण चातुर्मास' (पृ. ११२, का. अ. जोशी संपादन) या ग्रंथातही याचा समावेश आहेच. मुळातील ९२ श्लोकांची ही कथा पंडितांनी केवळ १२ श्लोकांत सामावून,आपले संक्षेप-चातुर्य प्रकट केले आहे. मूळ कथेतील अवांतर भाग वगळून 'गजेंद्राच्या धाव्याने कथारंभ होतो. हरिभक्तीमाहात्म्य आणि भगवंताची दीनोद्धारकता साक्षेपाने मांडून,संपूर्ण कथेत गजेंद्रावरच लक्ष केंद्रित केले आहे. नक्राचा निर्देश नाममात्र आला आहे. पंडितांच्या कथाबांधणीचे वैशिष्ट्य म्हणजे कथेचा सारांश सूचक संक्षेपाने काव्यारंभीच सांगण्यात आला आहे.

**'नक्रायुध स्वमरणार्तिस जो हरी तो । धावे चढोनि खगराजमुखी अहो तो ।**

**चक्रेचि नक्रमुख फोडुनि पाय हाती । ओढी धरूनि हरि हा विधि हे पहाति ।।१।।**

पंडितांच्या कथेतील गजेंद्र-धाव्यातील एक श्लोक तर सुभाषिताप्रमाणे असून भक्ताना तो जणू तारकमंत्र ठरला आहे. वामनपंडित लिहितात–

**'नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी ।**

**हरी जो तापाते उचलुनि कृपा-सिंधु लहरी ।**

**हरी वाटे काळा करिस विपति मृत्यु भुजगा ।**

जयाचा तू ऐसा धनि कवण तू पाव मज गा ।।५।।

मात्र पंडिती रचनेचे वैशिष्ट्य - संस्कृतनिष्ठता, समासांकित शब्दकळा, प्रासबद्धता, इ. असून, अनेक ठिकाणी क्लिष्टता आढळते. उदा. द्विरदवरदा, द्विरदपदमांसास्थि उकरी इ. ही शब्दबांधणी भावनिकतेपेक्षा बौद्धिक पातळीवर भक्तीचा महिमा मांडताना दिसते. स्तोत्ररचनेची वैशिष्ट्ये वामनाच्या कथारचनेत दिसतात. अन्य कोणती ही वैशिष्ट्ये आढळत नाहीत. उदा. स्तुत्य देवतेचे स्तवन, सामर्थ्य, महिमा, भक्तवात्सल्य, औदार्य, दीनबंधुत्व इ. गुणांचे वर्णन करून गजेंद्राच्या कथेचा दाखला त्यानी दिला आहे. तसेच दु:ख, दैन्य, दारिद्र्याचा परिहार होऊन शेवटी उत्तम गती लाभावी असे मागणे मागितले असून, 'पाहि मां' अशी प्रार्थना केली आहे. ही स्तोत्राची वैशिष्ट्ये फक्त वामन पंडितांत आढळतात.

अशा रीतीने एक नेटकी, सुघड, स्फुट कथा, स्तोत्र म्हणून जुन्या काळी घरोघर नित्य पठणात होती. कीर्तनमाध्यमातून घरोघर लोकप्रिय ठरलेली ही श्लोकबद्ध कथा अनेकांच्या पाठांतराचा विषय बनली. किंबहुना, वामन पंडितांच्या या स्तोत्राने गजेंद्रमोक्ष कथा महाराष्ट्रात घरोघर पोचली असून, ती अजरामर झाली आहे. प्रस्तुत संचातील कोणाही कवीपेक्षा वामन पंडिताची ही गजेंद्रमोक्ष कथा सर्वाधिक सर्वज्ञात आहे यातच या कथेचे माहात्म्य ध्यानी येते.

## ५) रघुनाथ पंडित

वामन पंडिताप्रमाणेच रघुनाथ पंडितानेदेखील कथारंभी संपूर्ण गजेंद्रमोक्ष कथेचा सारांश मोठया कौशल्याने मांडला आहे. गजपती आणि नक्र यांची झोंबी चाललेली असताना, स्मर्तृगामी करूणाबंधू श्रीहरी गजेंद्रप्रणामासरशी वैकुंठ सोडून तात्काळ धाव घेतो. लक्ष्मी वत्सलांछनधृत विष्णूचे स्मरण करून, 'नामी' कथा गायीन असा प्रस्ताव पंडितांनी मांडला आहे. शेवटी कथेने भक्ती - मुक्ती प्राप्त होईल, असे प्रयोजन मांडून उपक्रम उपसंहाराची गाठ पक्की केली आहे.

मुळातील कथाभाग रघुनाथ पंडितांनी एकूण ५८ श्लोकात मांडला आहे. शुक परीक्षिती संवादाने कथा-निरूपण आरंभ होते आणि मग त्रिकूट पर्वत, ऋतुपाख्य उद्यान, वृक्षवेली इ. चे काव्यरम्य निवेदन केले आहे. अखेरीस श्रीहरी दर्शन-नक्रगजेंदोद्धार होतो. रघुनाथ पंडितांनी या कथाबांधणीत मूळ 'नलदमयंती स्वयंवराख्यानातील ४ श्लोक (९, १०, १४, १८) जसेच्या तसे घेतले आहेत. प्रस्तुत कथेतील वर्णने नलोपाख्यान समोर ठेवूनच मांडलेली दिसतात. कीर्तनकारांच्या ऐटबाज ठेक्यात, खणखणीत आवाजात मोक्षप्रद असे प्रस्तुत कथानक रंगविताना नेमकी वास्तवपूर्ण वर्णनशैली वापरली आहे.

गजेंद्रनक्र संघर्ष रंगविताना गजेंद्र प्रथम पाण्यात पुढले दोन पाय हळूच सोडतो, मग संपूर्ण पाण्यात उतरतो. सोंडेने पाणी भरून पिऊ लागतो. पुढे नक्राने पाय धरताच गडबडून जातो इ. वर्णन अतिशय चित्रदर्शी झाले आहे. नक्र-गजेंद्राचा अटीतटीचा

संघर्ष रंगविताना पंडित लिहितात,

'काहीसा उफळे जळी गजबळे काही तळा लागतो
हा बाहेर निघोन येईल असा लागेचना लाग तो'

अशा प्रकारे कथेला दृश्यमूल्य प्रभावीपणे देणारी रचना पंडिती थाट दर्शविते. त्यात गजेंद्रधाव्याच्या प्रसंगी मात्र श्रीकृष्ण धावा करून श्रीकृष्ण लीला वर्णन केली आहे. वणवा-भक्षण, कालियामर्दन, गोवर्धनोद्धारण, द्रौपदी-पट शतावृत करणे, अर्जुनाचे सारथ्य, कालयवनाचा भस्म करून, मुचकुंद राजास दर्शनमुक्ती देणे इ. तून श्रीहरीशिवाय 'भक्तैकबांधव' दुसरा नाही, हेच सुचविले आहे. अर्थांतरन्यास या आवडत्या अलंकारातून त्याने वर्णन परिणामकारी साधले आहे. समर्पक दृष्टांतातून अचूक आणि तरलस्पर्शी निष्कर्ष मांडण्याची त्याची शैली वेधक असून, कथाबांधणी सुबक झाली आहे. प्रसंगोपात्त अशा श्लोक (४३ ते ४७) व पदरचनेतून भक्तिरसाची आर्त आळवणी कथेला उठाव देणारी असून, प्रेक्षकाना भक्तीचा प्रत्यक्ष पाठ देणारी आहे.

गजेंद्रोद्धारासाठी प्रकटलेल्या श्रीहरीचे प्रत्यक्ष दर्शन असेच वेधक व श्रोत्याना दर्शनसुखाचा आनंद देणारे ठरले आहे. नक्रगजेंद्र संघर्षानंतर दुसऱ्या टप्प्यात नक्रगजेंद्राचे पूर्वजन्मवृत्त सांगितले आहे. 'सुलभ लभ तयाला श्रीहरी होत नाही' या अखेरच्या चरणातून श्रोत्यांना या कथाश्रवणातून श्रीहरीप्राप्ती व्हावी अशी इच्छा प्रकट केली आहे.

थोडक्यात, ही पंडिती-कथा भक्तिपूर्ण, कीर्तनानुकूल असून, वृत्तबदलातून, पदयोजनेतून ती रसोत्कट करण्याचा प्रयत्न केला आहे. रघुनाथ पंडिताच्या शब्दचित्र मांडणीचे कौशल्य, लाघव-गजेंद्र-नक्राच्या रेखाचित्रातून दिसून येते. त्याच्या नलदमयंती स्वयंवरासारख्या खंडकाव्याच्या मानाने ही लघुकाय असलेली स्फुट कथा जीवनाच्या कोंदणातील कौस्तुभाप्रमाणे झळकणारी ठरावी अशीच आहे.

## ६) रंगनाथ निगडीकर

नामस्मरणभक्तीचे प्रयोजन त्याने समोर ठेवले असून, मानवाने विकाररहित व्हावे या दृष्टीने ही कथाबांधणी केलेली दिसते. त्यामुळे गजेंद्रास जडमूढ जीवाचे प्रतीक बनवून तो त्याचे चित्र रेखाटतो. गजेंद्राच्या धाव्यातून त्याने नामस्मरण-भक्तीचा आदर्श उभा केला आहे.

त्याच्या कथाबांधणीत पंडिती वळणापेक्षा पीठस्थ प्रेषिताची भूमिका जाणवते. सवाई वृत्तातून त्याने कथेची घडण केली असून, भावकाव्य स्वरूपापेक्षा त्यात गद्य, तरल कथाबांधणी आढळते. शाहिरी वाणीला जवळची अशी ही रचना आहे. एकूण २४ सवायातील निम्याहून अधिक भाग नामभक्ती, संसाराची असारता, वैष्णवभक्तांचा उल्लेख इ. विषयाना दिला असून, १०-१२ सवायात गजेंद्राचा धावा आला आहे. त्यामुळे भक्ति-महिमा कथन करणे एवढेच उद्दिष्ट त्यात जाणवते.

७) रघुनाथ

रघुनाथ कवीने समश्लोकीत मूळ वृत्त कायम ठेवून हे आख्यान मांडले आहे. मुळातील आशय समश्लोकीत तंतोतंत उतरला आहे. क्वचित मूळ अर्थाला मुरड घालून मराठीत भावार्थही प्रकट केला आहे.

८) अज्ञात कवी (१)

अज्ञात कवीची कथाबांधणी पद, उपजाती, भुजंगप्रयात इ. वृत्तांतून घडवलेली असून,हे त्रुटित काव्य कवीच्या प्रतिभेची ओळख करून देणारे आहे.

९) अज्ञात कवी (२)

धावत्या ओवी–छंदात या काव्याची रचना असून, भगवंताच्या आगमनापासून पुढील कथाभाग यात आला आहे. यांतील नक्राचा युक्तिवाद लक्षणीय असून तो म्हणतो –

**'जव जव मी पाय उकरी । तंव तंव स्मरणे करी करी ।**
**वाट पाहे नर केसरी । ये केसरी उद्धरसी ।।९।।'**

या कारणे आपण गजेंद्राचा पाय धरला. यायोगे उभयतांचा उद्धार झाला. तथापि कथाबांधणीच्या दृष्टीने ही अपुरी कथा सर्वसामान्य ठरते.

१०) गिरिदास

ओवी छंदातून संक्षेपाने व तन्मयतेने प्रस्तुत कथा कवीने रंगविली आहे. त्याच्या या लघुकाव्यात त्याच्या स्वतंत्र वृत्तीची चुणुक दिसून येते. गजेंद्राच्या धाव्यासरशी भगवंत त्वरित धावून येतो. हा प्रसंग मुळापेक्षा वेगळेपणाने रंगविला आहे. तो लिहितो,

**'कोण्हासी न सांगता, गरुडावरी आरुढ न होता ।**
**भक्ताकारण बहु त्वरिता । चरण चालिला लिला ।।२२।।'**

भक्ताकारणे चरण चालीने धाव घेण्याचा प्रकार अनोखा असाच आहे. त्यातून भक्तप्रेमाची उत्कटता दिसून येते.

गिरिदासाच्या वर्णनात नेमकेपणा, वास्तवपूर्णता असून, हत्तीच्या बारीकसारीक हालचाली त्याने टिपल्या आहेत. नक्राने हत्तीचा पाय धरताच 'दंत हाणितले कठोरे' 'सुळे आपटुनि पाठीवरी । बळे काढी पाये करी' अशा त्याच्या स्वाभाविक क्रिया तो प्रकट करतो.

अशा प्रकारे २-३ च प्रसंगातून नेमका कथाभाग मांडून
'ऐसे परी वनमाळी सदा भक्ताते सांभाळी ' असा महिमा वर्णिला आहे.

११) गोविंद

तंजावरकडील गोविंद कवीची 'गजेंद्रोद्धार' कथा म्हणजे गजेंद्राचा धावा आणि

गजेंद्रोद्धार प्रसंग, एवढ्या दोनच प्रसंगावर आधारलेले स्तोत्रवजा निवेदन आहे. यातील गजेंद्राने रामकृष्ण या उभय दैवतांचा धावा केला व स्तुति गायिली आहे.

## १२) सुरेंद्र

६२ श्लोकांतील ही कथा संस्कृतातील विविध वृत्तातून मांडली असून, प्रस्तुत कथासंचातील पंडिती कथेत उठून दिसणारी आहे. 'नलदमयंती स्वयंवराची' छाप त्यावर दिसून येते. संस्कृत कथेचा कायापालट करून स्वयंभूपणे ही कथाबांधणी सुरेंद्राने केली आहे. आनंदरामायणातील कथाविशेषांची भर त्यात घालून त्याने एक वेधक कथा उभी केली आहे. पं. सुरेंद्र गुरूमार्गी असावा. कारण त्याने अनेक आध्यात्मिक अनुभूतीच्या पारिभाषिक संज्ञाचा वापर करून, कथेतील आध्यात्मिक अंतरंग सहजी उकलून दाखविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. एकाच वेळी गजेंद्राची कथा आणि आध्यात्मिक अनुभव प्रकट करण्याचे वैशिष्ट्य प्रस्तुत संचात स्पष्टपणे आढळते ते पंडिता सुरेंद्रामध्येच.

पंडितांनी 'इंद्रद्युम्न' राजाच्या हकीगतीने कथारंभ केला असून, 'हू हू' नामक गंधर्व त्रिकूट-पर्वती क्रीडेसाठी येतो. तेथे आलेल्या अगस्तींचा अपमान दोघाकडून होतो. त्यामुळे दोघानाही एकाच वेळी शाप मिळतो. तेव्हां,

**'प्रारब्धासी प्रयत्न काही न चळे सर्वासी हे तो कळे' ।।१४।।**

अशी अटळ दैवगती सूत्रबद्ध रीतीने ते मांडतात. या कथेत नक्र-गजेंद्राचा शाप आधीच सांगितल्यामुळे कथेतील उत्कटता कमी झाली आहे. तसेच गजेंद्र सरोवराशी येताच त्याला शापाचे स्मरण होते. त्यामुळे पुढील उत्कंठाही उणावली आहे. तथापि, शापाची जाणीव होऊनही कामविकाराचा प्रभाव ते मांडतात.

**'म्हणोनि मोह पातला विवेक तो निपातला ।**
**मनात काम घातला विचारही विघातला' ।।३०।। इ.**
**'मोहांधी पडला, तनुसी दडला अहंकृती रुढला' ।।३१।।**

इ. तून विवेकभ्रष्ट हत्तीची मोहावस्था दर्शविली आहे. नक्रपाशात अडकलेला हा गजेंद्र धावा करतो. तो एखाद्या गुरूमार्गी साधकासारखा. प्रथम गुरूकृपादृष्टी, तारक नाममंत्र - मग नामस्मरण अशा क्रमाने आळवणी करतो. गजेंद्राबरोबर नक्राचा युक्तिवादही नामदेवाप्रमाणेच पंडितांनी मांडला आहे. शार्दूलविक्रीडित व भुजंगप्रयात या धावत्या गतिमान वृत्तांतून ही रचना असून यमक व अनुप्रासांचाही भरपूर वापर केला आहे. उदा.

**तेव्हां नक्रजळी गजेंद्र कवळी घेऊ म्हणोनि बळी ।**
**ओढी त्या कवळी पदासि अवळी चावूनी दंतावळी ।**
**हस्तिही स्वबळी जळाखळबळी जंतुसि त्या पाबळी ।**
**आणायासी चळोबळी चू चू हालेचना तो बळी ।।३४।।**

## १३) माधव

माधव कवीचे प्रस्तुत काव्य चटकदार असून, कथाबांधणी ठसकेबाज आहे. पद व अभंगातून त्याने ही कथा रचली आहे. नक्राचा सडेतोड युक्तिवाद प्रेक्षणीय आहे. त्याची कथाबांधणी कीर्तनानुकूल असून, त्यासाठी इतरांची अभंग व पदे त्याने त्यात समाविष्ट केली आहेत. बदलत्या भावानुसार वृत्तातील बदलही समर्पक रीतीने साधला आहे. एक स्वतंत्र कथाभागही त्यात त्याने वापरला आहे उदा. 'गरुड सोडुनिया धावलासि पायी'- अर्थात भक्तोद्धारासाठी भगवंत गरुडाला न घेताच येतो व कार्यभाग संपल्यावर गरुड येतो असे तो नव्याने लिहितो. हा कवी पंडिती वळणाचा पण गुरूमार्गी वाटतो. त्यात भावनिकता अधिक जाणवते.

**'माधवदासा रक्ष पक्षिणी जेवि अंडजाते ।। पद ।।**
**अवो कृष्णे मायबहिणी । मानस वृंदावन विहारिणी ।**
**वैकुंठपुरवासिनी । पावें निदानीं स्नेहाळे ।। पद ।।'** यातून वात्सल्यभाव दिसून येतो.

अनाम (दास) कवीने स्वतःची अशी तीन पदे व तीन ओव्या एवढीच रचना केली असून, इतरांच्या पदे - ओव्या - अभंग इ. चा उपयोग करून सर्वांच्या संमिश्रणातून एक भावकथा उभी केली आहे. कीर्तना-भजनासाठीच ही रचनी असावी हे उघड आहे.

शेष कवीनेही केवळ तीन पदातून लघुकाय कथानक घडविले आहे. त्यातील सताल गेयता, भाषेतील अनुप्रासचातुर्य -भक्तिभाव पहाता ही रचनादेखील कीर्तनात गाण्यासाठीच केलेली आढळते. विष्णुदासाची ओवीबद्ध कथा नाममहिमा सांगणारी असून समर्थ रामदासांच्या 'नामाच्या समासाची' छाप त्याच्या कथा-घडणीवर स्पष्ट दिसते.

# व्यक्तिचित्रण

## १) मूळ भागवत

सहस्त्र योजने उंच आणि लांबरूंद असलेल्या त्रिकूट पर्वतावरील घनदाट अरण्यात घडलेल्या कथानकात गजेंद्र आणि नक्र अशी दोनच महत्त्वाची पात्रे असून, त्यांचे शब्दचित्रही उठावदार व ठसठशीत उतरले आहे.

### गजेंद्र

हत्तींच्या कळपाचा स्वामी असलेला हा गजेंद्र विलक्षण बलवान असून, अष्टम स्कंधाच्या दुसऱ्या अध्यायात श्लोक २० ते २३ मध्ये त्याच्या बलदंड सामर्थ्याचे, उदंड पराक्रमाचे आणि सम्राटपणाचे भव्य दर्शन आपणास घडते. या गजेंद्राच्या मदगंधाचा वास येताच वाघ, सिंह, इतर हत्ती, गेंडे इ. नाना श्वापदे भयभीत होऊन

पळून जातात.

**यद् गंधमात्राद्धरयो गजेंद्रा व्याघ्रादयो व्यालमृगाः स्वखड्गाः ।**

**महोरगाश्चपि भयाद् द्रवन्ति सगौरकृष्णाः शरभाश्चमर्यः ।।८ : २ : २१।।**

अर्था वाघ, सिंह, हरीण चमरी नामक वनगाई भीतीने गर्भगळित होतात तर त्याच्या कृपानुग्रहाने लांडगे, रानरेडे, अस्वले, माकडे इ. क्षुद्र प्राणी निर्भयपणे संचार करतात.

**अन्यच्च क्षुद्राः हरिणाः शशादयश्चरन्त्यभीता यदनुग्रहेण ।।८ : २ : २२।।**

म्हणजे गजेंद्राच्या सामर्थ्याचा धाक आणि त्याच्या कृपानुग्रहाचे अभयदान या दोन्ही गुणांचे दर्शन आपणास घडते.

शूराचा शृंगार शोभून दिसावा तद्वत हत्तीणींच्या कळपात असणाऱ्या मदधुंद झालेल्या शुभ्रदंती मदधुरंधराचे शृंगारमत्त क्षणचित्र भागवतकारांनी विलोभनीय असे रेखाटले आहे. असा बलदंड गजेंद्र ग्रीष्मातील सूर्यतापाने संतप्त होऊन सरोवरातील कमल परागाने गंधित झालेल्या वाऱ्याचा वास घेत, सभोवारचा आसमंत थरकापवीत, झाडे-झुडुपे मोडून टाकीत, एखाद्या संतप्त सम्राटासारखा त्या सरोवरापाशी येतो. त्या प्रचंड सरोवरात स्नान करून, श्रमपरिहारानंतर यथेच्छ पाणी पितो. एखाद्या कुटुंबवत्सल गृहस्थाप्रमाणे हत्तिणी - छावे यांनाही स्नान करवितो. अशा रीतीने संसाराच्या व्यामोहात गुंग झालेल्या त्या गजेंद्रास भावी संकटाची यत्किंचितही कल्पना नसते. अशा वेळी दैवयोगाने एकाएकी अतिबलाढ्य नक्र त्वेषाने आपल्या जबड्यात त्याचा पाय ओढू लागतो. त्या अचानक आलेल्या संकटातून सुटण्यासाठी तो सर्व सामर्थ्यानिशी धडपड करू लागतो. ते भीषण दृश्य पाहून भीतीने हत्तिणी किंचाळू लागतात. बरोबरीचे हत्ती त्यास सोडवू शकत नाहीत. अशा रीतीने त्यांचे आश्चर्यकारक युद्ध हजारो वर्षे चालते. कालांतराने गजेंद्र थकतो, इतर हत्ती व हत्तिणी त्यास सोडून जातात. गजेंद्र पार थकून मोडून जातो. अशा एकाकी, असहाय अवस्थेत त्याला पूर्वजन्मीचे स्मरण होते. त्यावेळचे विष्णूचे अभ्यासलेले स्तोत्र तो मन स्थिर करून म्हणू लागतो. आर्त भक्ताच्या पातळीवरील हे उद्गार भगवंताना प्रकट करतातच. तो म्हणतो,

**'जिजीविषे नाहमिहामुया किमंतर्वहिश्चावृत ये मयोन्या ।**

**इच्छामिकालेन न यस्य विप्लवस्तस्था त्म लोकावरणस्य मोक्षम् ।। ८.३.२५ ।।**

**सोऽहं विश्वसृजं विश्वमविश्वं विश्वदेदस्य ।**

**विश्वात्माजनमजं ब्रह्म प्रणतोऽस्मि परं पदम् ।। ८.३.२६ ।।'**

या त्याच्या धाव्याने गरुडारूढ श्रीहरी धावून येतात. भगवंताचे प्रत्यक्ष दर्शन घडताच तो सोंडेने कमल उपटून त्यांच्या चरणी वाहातो व भक्तिभावाने नमस्कार करतो. भगवंत त्यास पाण्याबाहेर काढतात. भगवंताच्या स्पर्शाबरोबर गजेंद्रास भगवंताचेच रूप प्राप्त होते. तो चतुर्भुज पीतांबरधारी होतो. हा गजेंद्र पूर्वजन्मीचा पांड्यवंशीय इंद्रद्युम्न राजा असून तो श्रेष्ठ ईश्वरोपासक होता. त्यास विरक्ती उत्पन्न होऊन तो राजत्याग करून मलयपर्वतावर ध्यानमग्न असताना, तेथे शिष्यासह अगस्ती मुनी येतात. पण राजा

ध्यानमग्न असल्याने स्वागतादि उपचार केले नाहीत. तेव्हां चिडून जाऊन तू हत्तीसारखा जड बुद्धीचा आहेस म्हणून तू हत्ती होशील असा शाप दिला होता. शेवटी गजेंद्रास शापमुक्त करून भगवंतानी त्यास आपला पार्षद बनवले व गजेंद्रमोक्ष घडून आला.

सारांश, संसारासक्त, सत्ता, धनसंपत्ती व शक्तीने मदोद्धत बनलेला एखादा बलशाली सम्राटदेखील 'मी आणि माझे' या मायाबद्धतेने निर्वाणक्षणी कसा एकाकी पडतो याचे भेदक दर्शन इथे घडते. शेवटी एका नारायणावाचून कोणीही त्राता नाही हे समजून येते. त्यामुळे भक्तीची रती आणि मुक्तीची होणारी परिणती सहज लक्षित होते.

**नक्र : मूळ भागवत**

त्रिकूट पर्वतावरील वरूणाच्या महासरोवरात वास्तव्य करून राहिलेला 'ग्राह' गजेंद्राचा पाय घट्ट पकडून एक हजार वर्षेपर्यंत झुंज देत असतो. कथेत तो खलनायकाप्रमाणे भासतो. मगरीच्या योनीतून आपली मुक्तता व्हावी म्हणून त्याच्याकडून कोणतीही भक्ती किंवा कृती घडत नाहीत. मात्र विरोधभक्तीच्या स्वरूपात तो गजेंद्राचा पाय घट्ट धरून ठेवतो. गजेंद्राच्या पुण्याईने त्याचाही उद्धार होतो. पूर्वजन्मी तो 'हू हू' नामक गंधर्व असून,'देवल' ऋषींच्या शापाने तो नक्र झाला आहे. श्रीहरीच्या चक्राने त्या नक्रास गती लाभते. तो गंधर्वलोकी जातो.

**'योऽसौ ग्राहसः वैसद्यः परमाश्चर्य रूपधृक् ।**
**मुक्तो देवलशापेन हूहूर्गन्धिर्वसत्तमः ॥८।४।३॥**
**सोऽनुकम्पित ईशेन परिक्रम्य प्रणम्य तम् ।**
**लोकस्य पश्यतो लोकं स्वमगान्मुक्तिकिल्बिषः ॥८।४।५॥'**

**नामदेव : नक्र – व्यक्तिचित्रण**

नामदेवांच्या कथेचे नावच 'नक्रोद्धार' असून,'नक्र' हेच एकमेव पात्र कथेत बोलत आहे. कथेचा प्रारंभ नक्राच्या बोलण्यानेच होतो. 'नक्र बोले हृषिकेशी ॥' – म्हणजे भगवंताना चार गोष्टी सुनावून आपल्या उद्धाराची कैफियत मांडण्याइतका तो धीट, चाणाक्ष, बोलका आणि जागरूक आहे. भगवंताना त्यांच्या 'दीनानाथ' या ब्रीदाचे स्मरण देऊन अहिल्या, अजामेळ यांची प्रमाणे प्रस्तुत करण्याची साक्षेपी बुद्धिमत्ताही त्याच्या ठिकाणी आहे. प्रत्यक्ष भगवंताचे दर्शन घडल्यावर – 'पापी कैसा मी सांग दीनानाथा ।' असा त्याचा रोकडा सवाल आहे. नामदेवांच्या या नक्रात स्वोद्धाराची तळमळ तीव्र असलेली दिसते. कारण 'दर्शनमात्रे मनकामना पुरती ।' असे भगवंतांचे ब्रीदच आहे. म्हणूनच दर्शन होऊनदेखील आपला उद्धार होत नाही, असे पाहून निकराने एकेरीवर येऊन तो भगवंताना डिवचून म्हणतो – 'कळले तुझे देवपण आता ।' अर्थात या उपरोधिक बोलण्यातून नक्राच्या विरोधभक्तीची सलगीच प्रकट होताना दिसते. त्यामुळे नामदेवांच्या लटक्या रागाइतकेच त्यांच्या नक्राचे हे एकेरीचे बोलणेही त्याला शोभून दिसते. याचे

खास कारण म्हणजे 'निंदा नोहे स्तवन माझे केले ।' अशी भगवंतानीच कबुली दिली आहे. इथे नक्राच्या या ठाम बोलण्यातून त्याच्या पूर्वजन्मीची भक्तीची पुण्याई त्याच्या स्मरणात आलेली दिसते.

एकंदरीत, मूळभागवतापेक्षाही नामदेवांचा नक्र तुमच्या आमच्यावतीने युक्तिवाद लढवून स्वोद्धाराचा 'परम स्वार्थ' साधू पाहाणारा परमार्थी दिसतो. हा नक्र चतुर आणि नामभक्तीचे वर्म जाणणारा आहे,असेच दिसते. कारण,शेवटी तो 'नाम-देवांचा' नक्र आहे. यात सर्व काही आले.

**'पतित पावन नाम ऐकुनी आलो मी द्वारा ।**

**पतित पावन न होसि म्हणुनी जातो माघारा ।।'**

जसे प्रत्यक्ष भगवंतांना तोंडावर सांगणाऱ्या मानी नामदेवांचा हा नक्र आहे याची ओळख पटते.

## २) एकनाथ - गजेंद्र व्यक्तिचित्रण ( कथा पहिली व दुसरी )

१. एकनाथांच्या दोन्ही कथांच्या संदर्भात गजेंद्राच्या व्यक्तिचित्रणाचा विचार करता पहिल्या कथेत बलाढ्य गजेंद्राच्या शब्दचित्रणावर विशेष लक्ष केंद्रित केले गेले असून,दुसऱ्या कथेत गजेंद्राचे पश्चात्तपदग्ध करूणाकलित दीन चित्र दिसून येते.

२. मूळ भागवती कथेपेक्षा नाथांचा गजेंद्र अधिक उठावदार, जिवंत आणि मानुषी पातळीवर चित्रित केलेला दिसतो. पूर्वजन्मीचा 'इंद्रद्युम्न' राजा, अगस्ती ऋषींच्या शापाने गजेंद्र झाला असून त्रिकूट पर्वतावरील घनदाट अरण्यात त्याचे वास्तव्य आहे.

नाथांच्या पहिल्या कथेत प्रारंभी गजेंद्राचे दर्शन घडते ते एखाद्या बलदंड, सामर्थ्यसंपन्न, अधिकारमत्त अशा गजराजाच्या स्वरूपात. कथेतील त्याचा प्रवेश उद्दाम आवेशाने झालेला दिसतो. आपल्या बळकट दातानी पर्वताचे कडे ढासळून पाडीत, मदगंधाच्या वासाने वनातील व्याघ्र सिंहानाही थरकापवून टाकीत, गंडकी नदीचे पाणी पिण्यासाठी तो जात आहे. नाथ लिहितात –

**हाणता दाताचे पैं झडे । पाडित पर्वताचे कडे ।**

**ज्याच्या मदगंधापुढे । पळती रोकडे वनसिंह ।। १.२४ ।।**

**करूनी पंचयोजन गमन । नित्य करी गंडकी पान ।। १.२५ ।।**

३. अर्थात हा गजेंद्र नदीवर जातो पण नक्राच्या भीतीने सरोवराकडे मात्र फिरकत नाही.

**'परी सरोवराचे जीवन । नक्राभेणे स्पर्शेना ।।'**

इथे या गजेंद्राला पूर्वजन्मीच्या शापाचे स्मरण असावे असे दिसते. त्यामुळेच तो सरोवराकडे जात नाही. तर काठावर उभे राहून सोंडेने पाणी पितो.

४. अर्थात अशी दक्षता घेत असूनही भार्येसह 'जलकेली' करण्याच्या अनिवार मोहाने तो सरोवरात उतरतो. 'काम एष क्रोध एष ।' असा कामाचा प्रभाव दुर्धर आहे.

अशा मोहाने जलक्रीडा सुरू करताच त्याच्या पायाला मगरमिठी पडते. तेव्हां गजबजलेला गजेंद्र आपली ताकत पणाला लावून सुटका करू पाहातो. नक्र आणि गजेंद्र यांचे द्वंद्वयुद्ध सुरू होते.·हे क्षणचित्र वेधक असेच असून, तो सहस्र वर्षेपर्यंत झुंज घेत असतो.

'सहस्रवर्षे रणकंदळी । जळकल्लोळी भिडीनले ॥ १.३० ॥

५. अशा निराहार अवस्थेत हा जीवघेणा संघर्ष सुरू असताना गजेंद्राच्या सोंडेची अणी नक्राने खुडून काढल्याचे नाथांनी नव्याने वर्णिले आहे. मूळ भागवती कथेत याचा उल्लेख नाही. अर्थात या नवनिर्देशाने गजेंद्राचे शब्दचित्र अधिक उठावदार बनते. कारण मगरीने पाय धरलेला असल्याने गजेंद्र सोंडेने प्रतिकार करीत आहे. आता सोंडेची नाजूक अणीच खुडली गेल्यावर,'आपले सर्व संपले ।' अशा हताश जाणिवेने कासावीस होऊन तो स्त्रीपुत्रादिकांना –

'ओढुनि पुंसि मज काढा ।' असे दीनपणे सांगतो तेव्हां त्या पर्वतप्राय हत्तीची करूणा येते. पुढे काकुळतीला येऊन तो विनवू लागतो तेव्हां तर त्याचे स्त्रीपुत्रादिक आणि ज्ञातिबांधव त्याला एकाकी सोडून निघून जातात. नाथ लिहितात –

**'ऐसा गजेंद्र क्षीणशक्ती । येतो स्त्रीपुत्रा काकूळती ।**
**सांडूनि गेली पति प्राणांती । कोणी अंती न ये कामा ।। १.३४ ।।'**

६. नाथांच्या दुसऱ्या कथेतील गजेंद्र मात्र आपल्या काममोहित जलक्रीडेसंबंधी पश्चात्ताप करीत असलेला दिसतो. तो म्हणतो –

**'धरिली होती विषयाची गोडी । तेणे गेलो अधःपाता ।। २.३ ।।'**

त्याहीपुढे सर्वजण सोडून गेल्यावर आपली देहअहंताही गेली पाहिजे असे त्यास वाटते.

**'भुललो होतो देहासी । तो देह कामा नये आम्हासी ।। २.९ ।।'**

शेवटी तर – 'कोणी अंती न ये कामा ॥ १.३६ ॥' हे कटुसत्य प्रत्ययास येऊन तो श्रीहरीची आळवणी करू लागतो. त्याच्या आर्त हाकेने चक्रसुदर्शनधारी धावून येतात. गजेंद्र भक्ताचा उद्धार होतो.

**एकनाथ – नक्र शब्दचित्रण ( कथा १ व २ )**

१. नाथांनी आपल्या दोन्ही कथांतून 'नक्राचे' शब्दचित्र मुळापेक्षा स्वतंत्र, ठसठशीत आणि नामदेवाप्रमाणे नव्याने असेच रेखाटले आहे. मूळ भागवतात नक्रासंबंधी अगदीच त्रोटक निर्देश आला असून, देवल ऋषींच्या शापाने 'हू हू' गंधर्वास नक्राचा जन्म झाला एवढेच सांगितले आहे, तर नाथांनी बुद्धिनिष्ठ, तर्कवादी, मानी भक्ताच्या पातळीवर एक बहारीचे शब्दचित्र उभे केले आहे.

२. नाथांचा नक्र हा विलक्षण धीट, बोलभांड असून, गजेंद्राचा पाय इतकी वर्षे धरून ठेवण्याची कामगिरी केलेला नक्र आपला उद्धार न होता, केवळ गजेंद्राचाच उद्धार होत आहे असे पाहून छद्मीपणाने खदखदा हसू लागतो. नाथ लिहितात –

**'जाता देखुनि भगवंत । नक्र खदखदा हासत ।। १.४७ ।।'**
भगवंतांनी त्यास 'हास्य किमर्थ तुज आले' म्हणून चमकून विचारताच तो म्हणतो –

**'उद्धरिले गजेंद्राते । मज कां उपेक्षिले येथे ।**
**याचि देखुनी विषमाते । अत्यद्‌भुत हासिलो ।। १.४८ ।।'**

३. दुसऱ्या कथेत मात्र तो भगवंतानाच एकदम – तुम्ही कोण ? कोठले ? तुमचे मातापिता कोण ?' इ. प्रश्नांचा भडिमार करतो. नाथ लिहितात –

**'नक्र म्हणे तुम्ही कवण । हे सांगावे मजलागुनी ।**
**कोण तुमचे राहते स्थान । .................. ।। २.२७ ।।**
**कोण तुमचा मातापिता । कोण तुमचा ठाव राहता ।। २.२१ ।।'**

४. अर्थात सर्वांठायी भरून असलेला नामरूपातीत अजन्मा भगवंत समोर उभा असूनही, 'तुमचे विश्वंभर हे नाव तुम्हास शोभत नाही.' असे तोंडावर सांगण्यासही तो कचरत नाही. याचे कारण विश्वंभराने आपली उपेक्षा कां करावी असा त्याचा सरळ सवाल आहे. अजामेळ, गणिका इ. दाखले देऊन मज पतिताचा उद्धार कराल तरच 'पतितपावन' हे नाव तुम्हास शोभेल असे तो म्हणतो.

**'मजसारिखा पतित उद्धरसी । तरीच होसी पतित पावन ।। २.३५ ।।**
त्याहीपुढे जाऊन भगवंताना आणखी डिवचून तो म्हणतो की – 'खरा पतितपावन मीच आहे. कारण सरोवरात पतित झालेल्या गजेंद्राचा उद्धार माझ्यामुळेच झाला आहे.' म्हणून –

**'पतिताचा तारक मीचि जाण । हे ब्रीद पै तुबा मज द्यावे ।। २.३६ ।।'**

५. नाथाच्या कथेतील नक्राच्या शब्दाचित्रातून प्रकटलेला आणखी एक विशेष म्हणजे त्याचा वकीली थाटाचा एक प्रश्न चिंत्य आणि मार्मिक ठरतो. तो भगवंतास प्रश्न करतो की,

**'उद्धरिले गजेंद्राते । मज कां उपेक्षिले ।। १.४२ ।।'**
त्यावर श्रीहरी म्हणतात –

' ।। गजेंद्रे केले नामस्मरण । पापपुण्य निर्दाळून । ...उद्धरण पावला ।। १.४९ ।।'
त्यावर नक्र म्हणतो, ज्या नामस्मरणाने तुझी प्राप्ती व्हावी त्या तुझे प्रत्यक्ष दर्शन घडल्यावरदेखील माझे पापशापमोचन होत नसेल, तर नामाऐवजी माझ्या पापानेच तुझे दर्शन झाले असे म्हणावे लागेल. मग नामस्मरण काय म्हणून करावे ? नाथ लिहितात –

**तुझे झालिया दर्शन । माझे पाप नव्हे गा क्षीण ।**
**पापबळे म्या आपण । श्रीभगवान जिंकिला ।। १.५० ।।**

अर्थात नक्राची ही मात्रा बरोबर लागू पडते. कारण नामस्मणभक्तीचे नेमके वर्मच पकडले जाते. त्याक्षणी श्रीहरी मनोमन प्रसन्न होतात. संतुष्ट होतात. नाथ सांगतात –

**'आणि वक्रोक्ति नक्र वचने । ऐकोनि तोषला भगवान ।। १.५१ ।।'**

मग ते स्वतःच 'दर्शनेच प्रशस्तिः ॥' या उक्तीप्रमाणे सांगतात की,

**'माझिये दर्शनाचिये प्राप्ती । तुज जाहली ज्ञानस्फूर्ती ॥ १.५२ ॥'**

सारांश नाथांच्या नक्राचे हे व्यक्तिचित्रण स्वतंत्र, नव्याने प्रकटले असून पैठणच्या ज्ञानी, पंडित भक्ताच्या लेखणीतून चित्रित झालेले हे अभिनव शब्दचित्र अविस्मरणीय ठरले आहे.

## ३) मुक्तेश्वर – गजेंद्र व नक्र शब्दचित्र

मुक्तेश्वराने थोडक्यात पण वेधकतेने गजेंद्राचे व्यक्तिचित्रण मांडले आहे. 'वसंतमासाचे अंती । उष्णकाळ रवितप्ती ॥' अशा प्रखर उन्हाच्या वेळी मुक्तेश्वराचा गजेंद्र सरोवराऐवजी गंडकी नदीपाशी येतो. मूळ भागवत आणि एकनाथांनी देखील सरोवराचा उल्लेख केला असून,मुक्तेश्वरांने गंडकी नदीचा निर्देश करावा हे योग्य वाटत नाही. कारण हजार वर्षे युद्ध चालण्यासाठी खोल पाणी असणारे सरोवरच योग्य वाटते. असो.

२. गजेंद्राने पाणी पिण्यासाठी सोंड पाण्यात घालताच नक्र त्याची सोंडच पकडतो.

**'नक्र येऊनि अकस्मात । शुंडा करकमळ घातला ॥२॥'**

अर्थात शेवटपर्यंत तो सोंड सोडत नाही. हा बदलही इथे लक्षणीय ठरतो. मुक्तेश्वर लिहितो –

**'येरीकडे गजेंद्र । शुंडासि झोंबला नक्र ।**
**तेणे करूनि जर्जर । शरीर झाले गजाचे ॥२६॥'**

पुढे गजेंद्राचा उद्धार होतो.

नक्र - मुक्तेश्वराच्या कथेतील नक्रदेखील नाथांच्या नक्राप्रमाणेच मोठ्या हिकमतीने भगवंतास पेचदार प्रश्न टाकतो. तो म्हणतो की

**'ज्याणे केले तुझे नामस्मरण । तो पावला दिव्य विमान ।**
**ज्यासी झाले तुझे दिव्य दर्शन । त्याणे बंधन पावावे ? ॥३०॥**
**सकळ दु:खाचे निर्दळण । करावया तुझे नामस्मरण ।**
**ते तुझे प्रत्यक्ष झालिया दर्शन । पावलो मरण तत्काळी ॥३१॥'**

शेवटी या ग्राह गजेंद्राना स्वरूपता प्राप्त होऊन ते वैकुंठलोकी द्वारपाल केले जातात.

**'देवोनि आपुली स्वरूपता । द्वारपाल केले उभयता ॥३५॥'**

## ४) वामन पंडित - गजेंद्र - शब्दचित्र

१. वामन पंडितांनी आपल्या स्तोत्रकथेत केवळ गजेंद्रावरच लक्ष केंद्रित केले असून, नक्राचे चित्रण नाममात्र केले आहे. पहिल्या श्लोकातच 'स्वमरणार्ती ।' गजेंद्राचे आपणास दर्शन घडते. कारण 'नक्रे तळ्यात धरिला प्रबळेचि हस्ती ॥२॥' यानंतर लगेच गजेंद्राचा धावाच सुरू होतो. हा वामनपंडितांचा गजेंद्र असल्याने स्वाभाविकच

त्याची आळवणीदेखील पंडिती थाटाचीच आहे.

२. या गजेंद्राचा पाय नक्र कुरतडत असून तो पार 'द्विरद पदमांसास्थि ।' पर्यंत म्हणजे पायाच्या हाडापर्यंत उकरला आहे. त्या प्राणांतिक वेदनेने 'करी प्राणत्यागा'- पर्यंत वेळ येते. पूर्वसुकृताने त्यास धावा करण्याची सद्बुद्धी होते. सोंडेने एक कमळ घेऊन तो प्रार्थना करून म्हणतो

**'नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी ।**
**जगाचा तूं ऐसा धनि कवण तूं पाव मज गा ।।५।।'**

३. वामन पंडिताचा हा गजेंद्र इतका निस्त्राण झाला आहे की, देवांनी नक्राला ठार मारले तरीदेखील त्यास पाय काढून घेता येत नाही. तेव्हा दयाळू श्रीहरी त्यास उचलून घेतात व स्वरूपमुक्ती देऊन विमानी बसवितात.

## ५) रघुनाथ पंडित - गजेंद्र - शब्दचित्र

रघुनाथ पंडिताने गजेंद्राचे चित्रण अत्यंत वास्तवपूर्ण रीतीने आणि जिवंत स्वरूपात उभे केले आहे. गजेंद्राच्या बारीकसारीक हालचालीचे तपशीलही त्याने स्वभावोक्तिपूर्ण रीतीने चित्रित केले आहेत. कुटुंब-कबिल्यासह वनविहार करणारा गजेंद्र वरूणोपवनात येतो तेव्हा त्याच्या सख्यासोबत्यांचे वर्णन करताना पंडित लिहितो-

**'येतो कुटुंबसमवेत तृषार्त झाला । मार्तंड चंण किरणी अति तप्त झाला ।**
**सखे मामे भाचे चुलत पुतणे आणि चुलते ।**
**सखेही सांगाते सळमिसळ झाले सकळ ते ।**
**स्त्रियाही जावाही तनुज निज सायाती दडती ।**
**सतीचे बोलावे कळतील गजेंद्रास पुढती ।।२१।।'**

असा हा तृप्त गृहस्थी गजेंद्र पाण्यात हलकेच उतरून यथेच्छ जलपान करून मग जलक्रीडेसाठी अधिक खोल पाण्यात उतरतो. 'क्रीडा करू उतरला गज निम्नदेशी ।।२५।।'

बायकापोरांना जलपान घडवून जलक्रीडेत मदधुंद झालेला गजेंद्र अकस्मात मगरीने पाय धरताच गडबडून जातो. प्रचंड मेघ गर्जनेप्रमाणे गर्जना करून झिंझाडून आपली सुटका करू पाहातो. रघुनाथ पंडित लिहितो-

**'गजबजोनि घन ध्वनिभैरवे । गरजला गजराज घनासे ।**
**निजबळेपद वोढुनि झाडितो । प्रबळ नक्र मिठिस न सोडितो ।।२८।।'**

पुढे निकराने प्रयत्न करणाऱ्या हत्तीचे क्षणचित्र नेमके असेच आहे.

**'सोंडेने सुसरीस वोढुनि जळा बाहेर काढू तटी ।**
**पाषाणावरी आपटू,रगडू पाहे धरी सेपूटी ।।'**

सर्वजण प्रयत्न करून थकतात. गजेंद्राची सुटका होतच नाही;उलट नक्र खोल खोल नेऊ लागतो.

**'दिले झोले नेला गजवर जळी जेवि न दिसे ।।३१।।'**

मग मात्र एकेकजण ज्ञातिबांधव निघून जातात. तेव्हां गजेंद्र रामकृष्णाचा धावा करतो. इथे गजेंद्र-धाव्यात तीन पदे आली आहेत. शेवटी-

**'गजवर निजरूपे धन्य केला मुकुंदे ।**

**स्ववसतिसहि नेला चित्सुखानंदकंदे ।।५७।।'**

### ६) रंगनाथ - गजेंद्र – दिग्‌जांनाही धाक असलेला बलशाली गज ।

रंगनाथाने गजेंद्राचे चित्रण भव्य स्वरूपात चित्रित केले असून,प्रस्तुत कथासंचातील सर्वच कवींच्या मानाने त्याच्या गजेंद्राचे थोरपण प्रारंभीच नजरेत भरते. हा गजराज सुखभोगाने मस्त असून, पराक्रमात त्याची काळाशीच तुलना करावी लागेल. दाही दिशांचे दिग्‌जदेखील त्याचे नाव निघताच पळून जातात. म्हणजे दशदिशात तो निर्भय आहे. इंद्रांचा ऐरावतही त्याला पाहून भयभीत होतो. तिथे धरातळीच्या हत्तींचा काय पाड ? असा हा बलशाली गजराज मेघाप्रमाणे गर्जना करतो. तेव्हां सकळ श्वापदे जीव घेऊन पळत सुटतात (६)

या गजेंद्राचे दर्शन बलशाली, उन्मत्त, कामवश; क्रोधयुक्त आणि दंभमत्सरादी विकारांनी युक्त असल्याचे प्रारंभी वर्णिले आहे. इतर कवींच्या तुलनेने हे गजेंद्रदर्शन अधिक विकारवश, अविचारी असे दिसते.

### ७) रघुनाथ - गजेंद्र

रघुनाथाने मुळाप्रमाणे गजेंद्राचे वर्णन दिले आहे. त्यात फारसे नाविन्य नाही.

### ८) अज्ञात कवी - गजेंद्र - (गृहस्थीरूप)

(अ) या कवीने हत्तीचे चित्रण एका पोक्त गृहस्थी रूपात बारकाव्याने केले आहे. उदा. तृषार्त हत्ती कबिल्यासह सरोवराकाठी आल्यावेळी कसे वागतो ते पाहा-

**'आधी पाजिले नीर बाळका, त्याजनंतरे सर्व सैनिका ।**

**धूतले तया स्नेह आदरे तोष पावला हर्ष आंतरे ।।२८।।'**

अर्थात लहान मुले, सेवक, सैनिक या सर्वांना संतुष्ट करून मग स्वतः जलपान करतो.

(ब) ग्राहगजेंद्र युद्धाचे क्षणचित्रही रेखीव आणि जिवंत वाटते. तो लिहितो –

**'बहू झुंजाले पर्वतातुल्य देही । गजे ओढिला चेपिला नक्र पाही ।**

**फिरे दात खाऊनी तो नक्रजेठी । धरी सोंड मारी पदी नक्र मीठी ।।३१।।'**

पण शेवटी – 'मीन गुंततो जे परी जळी ।।३३।।' या प्रमाणे अधिकाधिक खोल खोल बुडत राहातो. ही कथा अपूर्ण असल्याने एथवर झालेले गजेंद्रदर्शन पुढील चित्रणाची कल्पना देणारे असेच आहे. क्र. ११ व १२ मधील अज्ञात कवींच्या अपूर्ण असलेल्या आख्यानात गजेंद्राचे चित्रण फारसे उठावदार नाही.

### १३) गिरिदास- गजेंद्र श्रीहरी कृपापात्र भक्त

गिरिदासाने गजेंद्राचे व्यक्तिचित्रण वेधक असे केले आहे. आरंभी मदोन्मत्त हत्तीचे

क्षणचित्र उभे करताना तो लिहितो–

**'मदोन्मत्त महागज । उपडोनि टाकिती वृक्ष सहज ।**

**येकमेकासि घेति झुंज । मदोन्मत्त चालिले ।।२।।'**

असा गजराज 'उदकाभीतरीं' जलप्राशन करीत असता नक्राने त्यास धरला तेव्हा 'दंत हाणितले कठोरे ।।५।।' 'पुढे आपटोनि पाठीवरी । बळे काढी पाये करी ।।६।।' असे सुटकेचे तो प्रयत्न करतो. पण शेवटी 'बहुत दीनवृत्ति ।।१०।।' होतो, आणि शेवटी ध्यान लावून स्मरणभक्ती करू लागतो. गजेंद्राचे हे दर्शन एकदम वेगळेपणाने उठून दिसते. (११). तसेच त्याच्या ध्यान - भक्तीने इथे लक्ष्मीकांत मुरारी अर्धांगी लक्ष्मीसहित समोर प्रकट होतो. लक्ष्मी प्रकट होण्याचा कथाभागही नव्याने आलेला आहे. भगवंतांना पाहाताच तो चरणी लोळण घेतो. त्यावर भक्तवत्सल श्रीहरी त्याच्या मस्तकी अभयकर ठेवून कौतुकाने म्हणतात की,

**'म्हणे श्रमलासि रे बहुत । भक्तराया ।।३३।।'**

**'सुखी राहे तु निश्चींत ।।३६।।'**

सारांश, गिरिदासाचा गजेंद्र पूर्ण भक्ती करणारा असून, भगवंताची कृपा त्याने संपादन केली आहे.

## १४) गोविंद - गजेंद्र-धावा करणारा भावभक्त

गोविंद कवीने गजेंद्राच्या व्यक्तिचित्रणापेक्षा त्याचा धावा अधिक भावोत्कटतेने मांडला असून हे भावचित्रच अधिक प्रभावी बनले आहे. 'दीनवत्सला पाव गा हरी ।।' अशी साद घालून त्याने रामकृष्णहरी नरहरी शंकरा या सर्वानाच तो साद घालतो व त्यांच्या अवताराचे स्तवन मांडतो. त्याचा हा धावा द्रौपदीच्या धाव्याप्रमाणे भक्तिपूर्ण आहे.

## १५) सुरेंद्र - गजेंद्र-प्रारब्ध गतीस शरण गेलेला

सुरेंद्राचा गजेंद्र मूळ भागवताप्रमाणे ज्ञानी असून त्यास पूर्वजन्मीचे स्मरण आहे. त्यामुळे अटळ प्रारब्धगतीस तो शरण गेलेला दिसतो. विकारवशतेने विवेकभ्रष्ट होतो. सुरेंद्र लिहितो –

'मोहांधी पडला तनूसि दडला अहंकृती रूढला ।।' त्यामुळेच 'चित्सुखा नाडला ।।' अशी स्थिती होऊन प्राणसंकटात सापडतो. काकुळतीने सर्वांना मदतीची हाक देतो. तो म्हणतो

**'प्रिया पुत्र हो काय आता पहाता ।**

**जळी येऊनी द्या मला शीघ्र हाता ।।**

**मला ओढुनि सर्व बाहेर काढा ।**

**बळे पीडतो नक्र हा काळ दाढा ।।३८।।'**

शेवटी कोणीही पुढे येत नाही तेव्हां त्याच्या भक्तिप्रेमाने श्रीहरी येऊन उद्धार करतात.

**पं. सुरेंद्र - नक्र - शब्दचित्र**

पं. सुरेंद्राने नामदेव एकनाथांच्या प्रमाणे नक्रमुखाने चतुर युक्तिवाद मांडला आहे. श्रीहरींना 'पक्षपाती' असे संबोधून तो म्हणतो की, ज्या नामामुळे गजेंद्र मुक्त झाला त्याच नामाचे रूपदर्शन मला घडूनही, माझा उद्धार कां होत नाही ? अन्यथा नाम आणि रूप भिन्न मानावे लागेल. तो स्पष्टपणे विचारतो की,

**'जे चिंतिता नाम स्वरूप देसी ।**
**ते पाहता काय विरूप देसी ।।**
**हे वंचना कां हरि देवराया ।**
**हे कष्ट माझे हरि दे वरा या ।।५५।।'**

त्याच्या या ऋजु युक्तिवादाने नामरूपाचे अद्वैत सिद्ध होऊन त्यास स्वरूप मुक्ती लाभते.. इथे गजेंद्राने नाममहिमा दाखविला तर नक्राने रूपसिद्धी सिद्ध केली आहे.

**१६) माधव कवी - गजेंद्र व नक्र**

माधव कवीच्या कथेत पहिली ८ पदे उपलब्ध नसल्यामुळे, 'शेवटी कोण्ही नाही कोणाचे । मी एकलाची ।' असे पश्चातापाने म्हणणाऱ्या गजेंद्राचेच आपणास प्रथम दर्शन घडते. तो अंतर्मुख बनला असून, 'देहाची ममता त्यजूनि गज तो भावे स्मरे श्रीहरी ।।' असे त्याचे खरे व्यक्तिमत्त्व त्याच्या धाव्यातून प्रकट होते.

**नक्र** - माधव कवीच्या नक्राचे चित्रण मात्र चतुर व्यक्तीच्या पातळीवर प्रकटले आहे. भगवंत गजेंद्राला विमानी बैसवून निघतात तेव्हा नक्र मोठ्याने हसू लागतो. तेव्हां - 'काय गा हासतोसी ?' असे श्रीहरी त्यास विचारतात तेव्हां -'चक्राने माझा देह (वस्त्र) विदारिले म्हणून मला दुःख नाही, पण तुझे दर्शन घडूनही माझा उद्धार होत नाही याबद्दल हसू येते. तू आपला सरळ नीघ आता' असे तो स्पष्टपणे सांगतो.

**'नसे चाड कां पूससी माधवा रे ।**
**खुषी आमुची जाय तू येधवा रे ।।३६।।'**

पुढे खुलासा देऊन तो सांगतो की,

**'नामाच्या स्मरणेचि तू झडकरी पावोनि त्या तारिसी ।**
**दृष्टीने अवलोकिल्यावरि कसा माते बळे मारिसी ।।**
**चक्रे वस्त्र विदारिले अतिशये तें दुःख नाहीच की, ।**
**जाले दर्शन व्यर्थ जाय म्हणूनही आश्चर्य हृत्पंकजी ।।३७।।'**

त्याच्या युक्तिवादाने श्रीहरी त्याचाही उद्धार करतात.

१७।१८।१९ दास - अनाम कवी - विष्णुदास आणि शेष यांच्या गजेंद्र, नक्र दर्शनात फारसे नावीन्य किंवा विशेष असा नाही.

## २०) अनाम कवी – गजेंद्र-स्वरूप साक्षात्कार दर्शन. रूपक चित्र

'कैवल्य वैभव' ग्रंथात (पृ. ९९ श्लो. १०) आलेल्या या कथेत कैवल्याचे लेणे ल्यालेल्या गजेंद्राच्या रूपात आत्मसाक्षात्कार दर्शनाचे रूपचित्रच कवीने मांडले आहे. दिव्य प्रकाशानुभूती येण्यासाठी हृत्सरोवरात, हृदयस्थ श्रीहरीचे स्मरण करून त्यास हृतकमल अर्पण करण्याची प्रेरणा त्यास - 'हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ।।' या वचनाप्रमाणे सहजच होते.

अर्थात गजेंद्राच्या रूपचित्रातून देह भोगातून - विवेक - वैराग्य - नामस्मरण साधना आणि अखेरीस प्रत्यक्ष सायुज्यमुक्ती असे सिद्धावस्थेपर्यंतचे अध्यामसाधनदर्शन उलगडत गेलेले दिसते. गजेंद्राच्या या कथेत मांडलेली ही गजेंद्राची आध्यात्मिक सत्त्वधारा प्रत्येक साधक भक्ताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्यामुळेच शतकाशतकांतून हे गजेंद्र दर्शन आदर्श - मोक्षोद्धारक म्हणून चिरंजीवी बनले आहे.

## समारोप

१. गंजेंद्रमोक्षाची कथा आध्यात्मिक सत्त्वधारा घेऊन प्रकटली आहे. अंतरीच्या भावभक्तीने पशुयोनीतील अज्ञानी जीवांचादेखील उद्धार होतो असा नामभक्तीचा संस्कार घडविणारी ही कथा आहे.

२. पौराणिक काळापासून ही प्रातःस्मरणीय ठरलेली मोक्षप्रद कथा संत-पंत-तंत काळात पाठांतर सुलभ अशा नादमधुर स्तोत्राच्या पातळीवर प्रकट झाली आहे.

३. कवि सापेक्षतेने व कालसापेक्षतेने या कथा-रचनेत व कथारंगभरणीत नवनवीनता आलेली दिसते. कवीच्या व्यक्तिमत्त्वाचेही ठसे कथेवर उमटलेले आहेत.

४. कथाबांधणीचा संख्यात्मक दृष्टीने विचार केला असता एका अभंगापासून जास्तीत जास्त ७३ ओव्यांपर्यंत कथेचा आकार विस्तारलेला दिसतो. प्रस्तुत कथासंचात अभंगरचनेतील दोन कथा; ओवीबद्ध ६ कथा; आणि विविध वृत्तात्मक श्लोकबद्ध पंडिती रचना बारा-अशी संख्या असून, पंडित कवींनी कीर्तन माध्यमासाठी ही आख्यान कथा सजवून मांडलेली दिसते.

५. या कथेतून विवेक, वैराग्याबरोबरच 'नामस्मरण भक्तीचा' संदेश घरोघर गेला आहे.

६) या कथेची मांडणी अतिसंक्षिप्ततेपासून अतिविस्तृत रूपात अशा उभय विधपणे झालेली आहे. भावभक्तीतून बौद्धिक वकिली प्रश्नापर्यंत तिची रंजकता नटलेली आहे.

७) मूळ भागवती कथेची ९२ ही श्लोकसंख्या कोणाही कवीने ओलांडलेली नाही. याचा अर्थ संक्षेपाकडेच सर्वांचा कल असून सर्वसामान्यापर्यंत ही सत्वधारा जाऊन पोहोचावी यासाठी पाठांतर-सुलभ, स्तोत्रवजा, कथात्मक, लघुरूप त्यांनी स्वीकारलेली दिसते.

✿ ✿ ✿

## कथा साधन संदर्भ

१. **मूळ भागवत पुराण** - संस्कृत. स्कंध ८ अध्याय २, ३, ४. एकूण ९२ श्लोक आहेत.

२. **नामदेव - नक्रोद्धार** - सकल संतगाथा. खंड पहिला. प्रका. रमेश आवटे. आवृ. २ री. १९६७. संपा. का. अ. जोशी. पृ. ४०१. अभंग क्र. २३३३. एकाच अभंगात ६ कडवी आहेत.

३. **एकनाथ - गजेंद्रमोक्ष** - कथा पहिली संपा. डॉ. वा. के. लेले 'गजेंद्रमोक्ष' पृ. ३२ ते ३५. प्रथमावृत्ती १९८१ किं. २०/- एकूण ५३ ओव्या.

४. **एकनाथ - गजेंद्रमोक्ष** - उपरोक्त ग्रंथ - कथा दुसरी - 'गजेंद्राख्यान'. यात ४० ओव्या आहेत.

५. **तुकाराम** - सकल संत गाथा - खंड २ संपा. का. अ. जोशी. १९६७. अभंग क्र. ११३३, २३५०.

६. **मुक्तेश्वर** - 'मुक्तेश्वरकृत स्फुट काव्ये' संपा. डॉ. वा. के. लेले,अनमोल प्रकाशन पुणे - २.

७. **वामन पंडित** - 'वामन पंडितकृत कवितासंग्रह' भाग १ - संपा. बा. दा. ओक. एकूण १२ श्लोक

८. **रघुनाथ पंडित** - 'रघुनाथ पंडिताचे काव्यग्रंथ' - संपा. १. बापट हरी त्रिबंक. मनोहर प्रेस. १९०९ शनिवार पेठ, १५४ पुणे. किं. ३।।- आणे.

९. **रंगनाथ निगडीकर** - 'अनेक कविकृत कविता' भाग ४. जनार्दन बाबाजी मोडक. ज्ञानप्रकाश छापखाना इ. स. १८८९. श. १९११ पुणे. पृ. १ ते ४.

१०. **रघुनाथ** - 'गजेंद्रमोक्ष' संपा. डॉ. वा. के. लेले. प्रथमावृत्ति १९८१. किं. २० रु. पृ. २६ ते २८.

११. **अज्ञात कवी** - उपरोक्त ग्रंथ - पृ. २९ ते ३२.

१२. **अज्ञात कवी** - उपरोक्त ग्रंथ - ओव्य १ ते ११ उपलब्ध.

१३. **गिरीदास** - उपरोक्त ग्रंथ - १ ते ४० ओव्या.

१४. **गोविंद** - उपरोक्त ग्रंथ - एकूण २२ श्लोक.

१५. **प. सुरेंद्र** - उपरोक्त ग्रंथ - एकूण ६२ पद्ये.

१६. **माधव** - उपरोक्त ग्रंथ - विविध वृत्तातील ४३ कडवी उपलब्ध.

१७. **अनाम कवी (दास)** - उपरोक्त ग्रंथ - एकूण पद्यसंख्या ३९ आहे.

१८. **विष्णुदास** - उपरोक्त ग्रंथ - एकूण ७३ ओव्या.

१९. **शेष कवी** - उपरोक्त ग्रंथ - फक्त तीन पदे उपलब्ध.

२०. **अनाम साधक** - 'कैवल्य वैभव' - संपा. र. ह. कोटणीस. श. १८४३ सांगली. पृ. ९९ - १०० एकूण १० श्लोक आहेत.

✿ ✿ ✿

# प्रकरण पाचवे

## सुदाम चरित्र कथा

### १) सुदामकथेतील आध्यात्मिक सत्त्वधारा

सुदामकथा ही मराठी कवींना अनिवार मोहिनी घालणारी कथा असून, संत-पंतादी सर्वच कवींनी सुदामदेवाच्या सख्यभक्तीचा आदर्श समाजापुढे उभा केला आहे. आपल्या स्फुट कथेतून त्यांनी सुदाम्याच्या प्रेमळ पोह्यांची अवीट गोडी मुठी मुठीने वाटली आहे. या कथेत भक्त आणि भगवंत अशा दोघांचेही विलोभनीय प्रेम प्रकटले असून, आध्यात्मिक तत्त्वसूत्रही उभे असल्याने लोकमानसात सुदामकथा चिरंजीवी ठरली आहे.

सुदामकथा ही वरवर पाहाता जरी एका गरीब ब्राह्मणाची कथा दिसत असली, तरी त्यातील तत्त्वसूत्र जीवनलक्षी आहे. त्यातील दुष्काळ, दारिद्र्य, गरिबीचा संसार; मूठभर पोहे इ. सर्वांनाच लाक्षणिक संकेतार्थ असून, संतवाणीतून याचे स्पष्टीकरण प्रकटलेले दिसते. भागवत भक्तीचे कळस असलेले तुकाराम महाराज सांगतात -

१. **'सुदामा ब्राह्मण दरिद्रे पीडला । नाही विससला पांडुरंगा ।**
**तुका म्हणे तुझा न पडो विसर । दुःखाचे डोंगर झाले तरी ।।'**

अर्थात दुःख, दैन्य दारिद्र्यातही अन्यन्य भक्तीचा आदर्श तुकोबाराय उभा करतात.

२. **'देव भावाचा भुकेला । हाचि दुष्काळ तयाला ।।**
**पत्र पुष्प फळ तोय । भावे देता प्रिय होय ।।**
**भाव विहीन बहुत । देवा नाही आवडत ।।**
**सुदाम्याचे मूठ पोहे । गोविंद म्हणे धाये** ॥ १०५२ ॥ अमृतवाणी ॥

अर्थात भावाचा दुष्काळ हाच खरा दुष्काळ असून, अशा देवाच्या दुष्काळात भावभक्तीची श्रीमंती उधळीत सुदामा निघतो.

३. 'पोह्यांच्या' संदर्भात विचार करता पोहे पाखडून घ्यावे लागतात. तव्दत असार संसाराचे भूस टाकून सारभूत भाव पोहे अर्पण करावे लागतात. अमृतराय स्पष्टपणे सांगतात की, -

**'पोहे सत्कृत पोहे । चिद्रहस्य पोहे । सेविल जो हे । तो भव पोहे ।।११।।'**

कबीरांनी म्हटल्याप्रमाणे **'सार सार तो गहि रहे । थोथा देई उडाय ।'** अर्थात संसार चोथा टाकून भावपोह्यांनीच भगवंत प्रसन्न होते. अशा भक्ताला श्रीहरीचे 'हरिरुची' जेवण प्राप्त होते. आणि **'वेगि आचवला संसारासी ।'** अशी अवस्था प्राप्त होते.

४. आणखी एक गोष्ट म्हणजे भगवंत-भेटीचे शुभशकून अध्यात्मात सांगितले असून, प्रस्तुत सुदामदेवास होणारे शकुनदेखील लक्षणीय ठरणारे असेच आहेत.

श्रीहरी दर्शनापूर्वी साधकांची शंकित अवस्था सुदामदेवांच्या शंकेतून दिसून येते. श्रीमंती व गरिबी यांच्या खोल दरीतून शंकेचे, संदेहाचे दाट धुके उसळून वर येते. ही शंका इथे दिसते.

५. भावपोह्यांची ग्रंथी (गाठोडे) घेऊन श्रीहरीची वाट धरली की, चिद् अचिद् ग्रंथी उकलून साक्षात्कार समाधानाची वाट मोकळी होते. पूर्ण समाधान होऊन इहपर कल्याण होते.

**'भिद्यते हृदयग्रंथी छिद्यन्ते सर्वसंशयाः ।**

**क्षीयन्ते चास्यकर्माणि तस्मिन दृष्टे परावरे ।।'**

अशी तात्त्विक सत्त्वधारा घेऊन सुदामकथा उभी आहे. सुदामदेवाची सत्त्वसंपन्न मूर्ती आदर्श म्हणून अढळ ठरते. या दृष्टीने संत-पंत-तंत कवींच्या रचनांचा कथासंच प्रस्तुत प्रकरणात आपण आस्वादक पातळीवर पाहाणार आहोत.

## २) निर्वाचित कथासंच

| | | |
|---|---|---|
| १. मूळ भागवती कथा | - श्रीव्यास महर्षी | - संस्कृत कथा. श्लोकबद्ध. |
| २. नामदेव कृत | - सुदामचरित्र | - अभंगात्मक. |
| ३. एकनाथ कृत | - सुदामचरित्र | - अभंगात्मक. |
| ४. रंगनाथ निगडीकर | - सुदामचरित्र | - ओवीबद्ध. |
| ५. अनामकवी (अप्रकाशित) | - सुधामचेरित्र | - आर्यावृत्त. |
| ६. आनंदतनय (अप्रकाशित) | - सुधामचेरित्र | - विविधवृत्तात्मक. |
| ७. श्रीधर (अप्रकाशित) | - सुदामचरित्र | - ओवीबद्ध, संमिश्र. |
| ८. अमृतराय | - सुदामचरित्र | - कटाव छंद. |
| ९. अमृतराय | - सुदामचरित्र | - कटाव छंद. |
| १०. मोरोपंत | - सुदामचरित्र | - विविध वृत्तात्मक. |
| ११. मोरोपंत | - पृथुकोपाख्यान | - साकी वृत्त. |
| १२. प्रभाकर | - सुदामचरित्र | - संमिश्र. |

## ३) मूळ भागवती कथानक

मूळ भागवती कथा दशमस्कंधाच्या उत्तरार्धात ८०-८१ या दोन अध्यायात आली आहे.

१. पत्नीच्या प्रेरणेने सुदामा श्रीकृष्णाकडे जातो व तेथे त्याचा सत्कार होतो.

**'पत्नी प्रेरणया सुदाम्नो भगवत्समीपे गमनम् । भगवता तया सत्कारश्च ।'**

२. नंतर सुदामा व्दारकेहून परतल्यावर भगवंतानी दिलेले परमैश्वर्य पाहून भगवंताच्या अपार कृपावत्सलतेचे गुणगान करतो.

**'सुदाम्नः स्वपुरींप्रत्यागमनं तत्र भगवद्तमैश्वर्यमुपालभ्य भगवदवात्सल्यं गुणगानम् ।'**

कौरव पांडवांच्या युद्धानंतर श्रीकृष्ण द्वारकेस परत येतात. त्यावेळी श्रीकृष्णांचा बालमित्र सुदामा भेटीस येतो. या अनन्य भक्तास श्रीकृष्ण दर्शनाबरोबरच ऐहिक ऐश्वर्य प्राप्त होते. पण त्या उदंड ऐश्वर्यातही त्याची अनन्य भक्ती अढळच राहते. हे

तत्त्वसूत्र इथे मांडले आहे.

सुदामा हा ब्रह्मवेत्ता, ज्ञानी, विरक्त, जितेंद्रिय असून, यदृच्छालाभसंतुष्ट असा आहे-त्याच्या नामातच केवळ 'दाम' शब्द आहे, अन्यथा तो अठराविश्वे दारिद्र्यातच आहे. म्हणूनच क्षुधेने व्याकुळ झालेली त्याची पत्नी एकदा त्यास लक्ष्मीपती श्रीकृष्णांच्या भेटीस जाण्यास सांगते. तेव्हां श्रीकृष्णदर्शन घडणार या आनंदाने तो तयार होतो. निघताना उपायन म्हणून पत्नीने मागून आणलेले चार मुठी पोहे एका पुरचुंडीत बांधून घेऊन तो द्वारकेत येतो. तीन चौक्या, तीन छावण्या ओलांडून रुक्मिणीच्या महालात येतो. तेथे त्याचा अपूर्व सत्कार होतो. स्वतः भगवंत त्याचे पदप्रक्षाळण करून पादोदक मस्तकी धारण करतात. देवी रुक्मिणी चवरी ढाळते. भगवंत रुक्मिणीला विसरून त्यास वडीलबंधूप्रमाणे आलिंगन देतात. गुरुकुळांतील गप्पागोष्टी होतात. पुढे सर्वांतर्यामी श्रीकृष्ण त्याचे मनोगत जाणून उपायन म्हणून आणलेले पोहे ते स्वतःच काढून खाऊ लागतात. दुसरी मूठ खाणार, एवढ्यात रुक्मिणी हात धरून प्रसाद मागते. त्या रात्री सहभोजन होते. दुसऱ्या दिवशी तो निघतो. परत येऊन पाहातो तो इंद्राचे वैभव ! श्रीकृष्णांच्या गुप्त औदार्याने, त्याच्या वत्सल प्रेमाने त्याची भक्ती दुणावते, दृढ होते. शेवटी सुदामास श्रीहरीचे स्थान प्राप्त होते.

## ४) कथा प्रयोजन

### १) मूळ भागवतीकथा - प्रयोजन

मूळ भागवतीकथेचे प्रयोजन पुढीलप्रमाणे व्यक्त झालेले दिसते.

**'एतद् ब्रह्मण्यदेवस्य धृत्वा ब्रह्मण्यतां नरः ।**

**लब्धभावो भगवति कर्मबन्धाद् विमुच्यते ।।४१।।'**

अर्थात या सुदाम ब्राह्मणाच्या कथाश्रवणाने ब्रह्मभाव प्राप्त होऊन भगवंताच्या परमकृपेने कर्मबंधापासून सुटका होते. 'कर्मबंधात् विमुच्यते ।'

### २) नामदेव - प्रयोजन

मध्ययुगीन भक्तिकाळात नामदेवांनी नामसंकीर्तन भक्ती समोर ठेवून साधुसंताची चरित्रे श्रवण करावीत असेच ठोस प्रयोजन मांडले आहे. नामदेव सांगतात –

**'तयाचे चरित्र ऐका सावधान । तेणे जन्ममरण दूर होती ।। २२९८.२ ।।'**

**'नामा म्हणे होणे जाणे नाही तया । संचिता साराया लागोनिया ।।**

**२२९८.४ ।।'**

अर्थात मूळ भागवती प्रयोजनाचे सूत्रच नामदेवांनी मांडलेले दिसते.

### ३) एकनाथ - प्रयोजन

नाथांनी भगवंताच्या दीनवत्सलतेवर भर देऊन, भगवंताची करुणाकर वृत्ती दाखवून देण्याचे प्रयोजन ठेवलेले दिसतो. नाथ लिहितात –

**'भक्ताचे मनोरथ पुरवी वैकुंठपती । ऐंशी ज्याची कीर्ती त्रिभुवनी ।।**

**एका जनार्दनी देव तो तुष्टला । राज्याधीश केला अकिंचनासी ।। ३४७४ ।।**

अर्थात अकिंचनास राज्याधीश करणाऱ्या भगवंताचा महिमा दाखविणे हे नाथांच्या कथेचे प्रयोजन दिसत असून, प्रमाण म्हणून उपमन्यु, ध्रुव, प्रल्हाद यांचाही निर्देश त्यांनी केला आहे.

**४) रंगनाथ निगडीकर - प्रयोजन**

रंगनाथांनी महाभारती आख्यान समोर ठेवून पुढीलप्रमाणे प्रयोजन मांडले आहे.

**'दृढ धरावे हरि चरण जन्ममरण मोचक ।।२३।।'**

**'वर्णिता सुदामचरित्र । पावन होय वक्त्र ।**
**श्रवण करिता श्रोत्र । अतिपवित्र सर्वदा ।।**
**सुदामदेवाची कथा । आणिती जे वाक्पंथा ।**
**ते प्रिय होती कृष्णनाथा । सुदामदेवा सारिखे ।।१३४।।'**

**५) अनाम कवी - तंजावर - प्रयोजन**

तंजावरच्या एका अनाम कवीने १४ आर्यांच्या छोटेखानी कथेत -

**'भव कर्दमी पतीत सखा विप्रसुदामा असा समुत्धरिला' ।।४।।**

अशा शब्दात संसार-भवपंकातून समुद्धार आणि 'प्रभुचरणाचा दर्शन महिमा ॥१३॥ तो सांगतो.

**६) आनंदतनय - प्रयोजन**

'पावन पुण्यरासी'[१] कथा मांडून शुकसनकादिकांचा भक्तिमार्ग दाखविणे हे प्रयोजन सांगताना आनंदतनय म्हणतो की, - 'भक्त विरक्ताचे करूनी थाट' ॥ पद ८ म्हणजे भक्तीविरक्तीचा किंवा विरक्ताचा भक्ती थाट उभा करण्याच्या प्रयोजनाने त्याने कथेचा घाट घातलेला दिसतो. त्यातूनच 'अद्‌भुत देणे त्या येक जगदीशाचे' असें तो सांगतो.

**७) श्रीधर - प्रयोजन**

'बाळपणीचा मैत्र-भक्त ॥' अशा दुहेरी नात्याचे सूत्र धरून मित्रप्रेम व भक्तप्रेम दाखविणे हे प्रयोजन मांडले आहे. 'आपणा ऐंसे' करतात ही 'हरिलीला'देखील तो सांगतो.

**८) अमृतराय - प्रयोजन**

अमृतरायांनी शाहिरी थाटाच्या आपल्या दोन्ही कथांचे प्रयोजन मांडताना

**'सुदामजीला सोन्याची नगरी दिधली ।**
**स्वानुभूती हृदयामधली ।।धृ।।'** असे सांगून -

'श्रीभगवंते ब्राह्मणास ब्रह्मानंदमय संपत्ती, संतति शाश्वत अर्पियली ।।' असे दाखवून दिले आहे. दुसऱ्या कथेतही ते लिहितात-

**'अंध दरिद्र चिंता दर्शन दुरिताची वार्ता ।**
**नासुनिया निजमुक्ती पतितालागुनी देता ।।२।।'**

### ९) प्रभाकर - प्रयोजन

प्रभाकराने लावणी ढंगाच्या कथेत प्रयोजन मांडताना लिहिले आहे की,

**'असा निरत असावा हरिस्नेही ।।**
**संकटे सकल निरसुन देई सौख्य विसावा नरदेही ।।**
**महादेव गुणी राजाचा बोध ठसावा हृद्‌गेही ।।'**

## ५) कथाबांधणी 'स्व'रूप विचार

### १) नामदेव – स्वानुभूत भावजीवनाचे दर्शन

नामदेवांची कथाबांधणी संतकाळातील असून तत्कालीन रुढ व प्रचलित अशा 'अभंग' छंदातून कीर्तन निरूपणास उपयोगी ठरेल असे आटोपशीर कथानक त्यांनी नेटकेपणाने उभे केले आहे. भावपूर्ण अशा २८ अभंगांतून त्यांनी यथामूळ कथा सादर केली आहे. 'चित्री गोपाळ दृढ' धरलेल्या सुदामा भक्ताचे चरित्र ऐकल्याने -

'तेणे जन्ममरण दूर होती ।' असे आश्वासक प्रयोजन प्रारंभीच मांडून भावरम्य प्रतिमातून सुदामा, श्रीकृष्ण यांच्या अंतरंगातील भावसुगंधाचे ते दर्शन घडवितात.

(अ) सुदामा प्रारब्धाने दारिद्र्याचे देहभोग सोसत असल्याचे सांगून वृक्षाच्या सहज प्रतिमेतून त्याची जीवनसत्त्वधारा ते अवगत करताना लिहितात -

**'तो साधु जाणावा प्रसिद्धु । देहाचा संबंधु नेणे कांही ।।२**
**वारे वाजुनिया जाता वृक्ष डोले । मर्यादा वेगळे होत नाही ।।३**
**नामा म्हणे होणे जाणे नाही तया । संचिता साराया लागोनिया ।।४.२२९९।।**

'सदास्वरूप झाला अखंडित' असे सांगून त्याचे स्वस्वरूपानुसंधान ते स्पष्ट करतात.

(ब) सुदामाची पत्नी तर 'शांतीची बाहुली' असून, 'आणि जिभली नेणो कांही' अशी साध्वी पतिव्रता आहे. खाणे, पिणे, लेणे यासंबंधी ती कसलीही तक्रार करीत नाही. नामदेव सांगतात - 'सेवेसी सादर होवोनिया राहे । भूकचि ते खादे भुकेलिया ।।२३०।।' अर्थात ज्ञानेशांनी योग्याचे वर्णन करताना म्हटल्याप्रमाणे-

**'तहानेलिया तहानचि पियावी । भुकेलिया भूकचि खावी ।।अ. १२।।'**

अशी त्या साध्वीची शांतस्थिती असून, सुदामा भक्ताच्या तोडीस तोड असे हे निग्रही, तृप्त व्यक्तिमत्त्व नामदेवांच्या भावनिर्मितीतून मुळापेक्षाही नव्याने साकार झाले आहे. अंतकरणाला भिडणाऱ्या या उभयतांच्या भक्तिरम्य भावदर्शनात प्रत्यक्ष नामदेव पतिपत्नींचेच आपणास दर्शन घडते. हा जिव्हाळा अनोखा असाच आहे.

एकदा विटेवरील सावळया परब्रह्माचे दर्शन घडताच जी अवस्था होते तीच इथे दिसते. 'तेथे काही मागावे हे नकळे । निवती डोळे दर्शनाने' । या शब्दात प्रत्यक्ष नामदेवांची स्वानुभूतीच सुदामाच्या मुखातून प्रकटलेली दिसते. त्यामुळे हा सुदामा धनसंपत्तीपेक्षाही श्रीहरीच्या दर्शनालाच अधिक उत्सुक आणि अधीर झाला आहे. त्याही पुढे त्याची पत्नीदेखील त्याचे भक्तीचे मनोगत जाणून त्यास 'उपायन' म्हणून भक्तीचेच भातुके आणून देते. ती म्हणते –

**'आणिते मागून भक्तीचे भातुके । जेणे यदुनायक तोष पावे ।। २३०४ ।।३'**

असे हे भक्तिभावाने भगवंताशी तदाकार झालेले जोडपे खास नामदेवांच्या अंतररंगातूनच उमललेले दिसते. मुळात नसलेले हे भावसौंदर्य नामदेवांच्या कथाबांधणीत भावसौंदर्यासह नव्याने प्रकट होताना दिसते.

(क) सुदामाची पत्नी नुसतेच पोहे आणून देत नाही तर भावभक्तीने निरखून निवडून देते. नामदेव लिहितात –

**'अहं सोहं वृत्ती तेथे एक झाली । दृष्टीने देखिली पोह्याकडे ।। २३०५ ।। ३'**

अर्थात अहं, कोहं, सोहं ची दृष्टी जेथे त्रिपुटीचा लोप पावून एकाकार होते, अशा त्या अमृत दृष्टीने ते पोहे नुसते पोहे राहात नाहीत. चोखाबांच्या भक्तियुक्त दृष्टीने स्वर्गातील नासलेले अमृत मधुरशुद्ध व्हावे तद्वत शुद्ध भावभक्तीच त्या पोह्यांच्या रूपाने सिद्ध होते. नामदेव सांगतात की, - द्रौपदीच्या थाळीला चिकटलेले भाजीचे पान खाऊन श्रीहरीची काय भूक गेली ? पण भगवंत आपल्या भक्तीचे कोडकौतुकच करतात.

**'नामा म्हणे तो कोडकौतुक । थोडेही अधिक देव करी ।। २३०६ ।।४।।'**

कथेतील हे संसूचन मूठभर पोह्यांविषयी उत्कंठा वाढविते आणि पुढे सुवर्णाच्या सुदामनगरीच्या दर्शनाने ही उत्कंठा तृप्त होते.

(ड) सुदामाच्या अत्यंत दारिद्र्य-दर्शनातून कथेचा घडीव आकार पुढे सरकतो.

'बांधावया वस्त्र केवळ जर्जर । त्या माजी न थरे गुंडाळिता ॥' अशा दारिद्र्याचेच गाठोडे घेऊन सुदामा द्वारकेकडे निघतो. हा विरोधाभासही लक्षणीय ठरतो.

(इ) मार्गात होणारे शुभशकुन नामदेवांनी नव्याने आणि स्वतंत्रपणे मांडले आहेत.

**'उडती उजवे ते काग जोड्याने । भरल्या कुंभाने नारी देखे ।**
**तास भारद्वाज वामभागी जाती । मयूर नाचती उत्साहाने ।।'**

यातून पारंपरिक लोकश्रद्धेतील संकेतही नव्याने समजून येतात.

**(फ) दोन ध्रुवांचे दर्शन**

भगवान श्रीकृष्ण आता 'थोर कारभार' करणारे आणि आपण 'फकीर' ही सुदामदेवाची खंत नव्याने मांडली गेली असून, श्रीमंती - गरिबीतील खोल दरी त्याच्या मनात आ वासून उभी राहाते. एकीकडे सकलैश्वर्यसंपन्न सर्वसत्ताधीश आणि दुसरीकडे मूर्तिमंत दारिद्र्य असा हा दोन ध्रुवाइतका भेद आहे. वास्तविक, सुदामा हा ब्रह्मवेत्ता 'ज्ञानी' आहे. आणि परिपूर्ण ज्ञानाला शंका नसावी. पण नामदेवांनी इथे विलक्षण

भेदक वास्तवाचे दर्शन मांडले आहे. भयानक दारिद्र्याचा प्रभाव एवढा जबरदस्त असतो, की दारिद्र्याच्या झळीने भल्याभल्यांच्या मनातही श्रद्धा विरळ होऊन शंकेची पाल चुकचुकू लागते. सुदामाच्या शंकेतून नामदेव हे दाखवून देतात. साक्षात्कार दर्शनापूर्वी साधकाच्या मनात उठणारे काहूर इथे या आशंकेतून जाणवते.

(क) कथाबांधणीत नामदेवांनी द्वारकानगरीचे ऐश्वर्यसंपन्न वर्णन नव्याने उभे केले आहे.

**'हिरे चिरे रत्ने झगमग दिसती । घोस ते लोंबती मोतियांचे ।**

**नामा म्हणे ऋद्धिसिद्धीचे भांडार । देखिले नगर ब्राह्मणाने ।। २३११ ।।७।।'**

त्याशिवाय 'चौ वेदांचा डंका', 'अठरा मोकशी', गुढ्या पताका, वेत्रधारी लोकांचा मुजरा इ. वर्णन नव्याने व कालसापेक्षतेने उभे राहिलेले दिसते.

(ख) नामदेव हे नामाचेच देव असल्याचे त्यानी नाममहिमा स्वतंत्र एका अभंगातून मांडून, नामाचे तारकत्व व पापहारित्व त्यानी प्रकर्षाने सांगितले आहे. ते लिहितात –

**'नारायण नाम तारक सर्वांसी' ।।२३१४।।१।।**

**'कापुराची राशी अग्नीचा हो कण । तैसे नाम जाण पातकासी' ।।२३१४।।**

नामदेवांच्या कथाबांधणीत नामभक्तीचा हा ठसा अक्षुण्ण आहे.

(ग) नामदेवाच्या कथाबांधणीत खास नव्याने आलेले द्वारकेच्या राजसभेचे वर्णन खास दक्षिण द्वारावती पंढरीचेच दर्शन घडविणारे आहे. त्यात राही, रखुमाई, राधा यांचा निर्देश असून गरुडखांबाची शोभा प्रकटली आहे. त्याहीपुढे स्वतः नामदेव तेथे पादुका घेऊन उभे असल्याचे ते सांगतात. हा निर्देश विलक्षण बोलका असून, नामदेवांच्या अंतरंगाचे गहिरे रंग कथेत कसे प्रकटले आहेत हेच आपणास दिसून येते. मुळातूनच हा तपशील पाहाणे उद्बोधक ठरेल.

**'सभा ते साजिरी रत्नसिंहासनी । देव चूडामणी शोभतसे ।।**

**राही रखुमाई चामरे ढाळिती । राधा उभी हाती घेऊनी छत्र ।।**

**समारंभे पुढे गरुड तो उभा । शोभतसे शोभा दिव्य काही ।।**

**नामदेव तेथे उभा होता निका । घेऊनि पादुका दोन्ही हाती ।। २३१६ ।।'**

अशा सिंहसनावर नामदेवांना 'सर्वही सुखाचा ठेवा ॥ २३१८ ॥ दिसतो. अर्थात हा निर्देशही 'सर्व सुखाचे आगर बाप रखुमादेवीवर ॥ या ज्ञानेशोक्त पंढरीनाथ वर्णनाचा हुंकार आहे.

अशा रीतीने आत्मानुभूतीचे गहिरे रंग, स्वकालीन वास्तवाचे ठसे, भक्तिज्ञान वैराग्याचे युगसापेक्ष सूत्र पकडून, नामदेवांनी सुघड अशी अभंग कथा बांधणी साधली आहे.

**२) एकनाथ - गृहस्थी कथा**

(अ) एकनाथांनी २३ अभंगांतून कथा-बांधणी केली असून, एकदम कथेलाच

सुरूवात केली आहे. दुःख दैन्य दारिद्र्य आणि दुष्काळाचे भेसूर चित्र प्रारंभीच उभे करून त्या पार्श्वभूमीवर अनन्य निजनिष्ठेला उठाव आणला आहे. नाथ लिहितात -

**'पृथ्वी विवस्ता दुष्काळ पडला । न मिळे कोणाला धान्यकण ।।**
**कन्यापुत्रादिक मरती उपवासी । उपाव तयासी कांही न चले ।।**
**आणुनिया तृणबीज ते भक्षिती । निर्वाह यारीती चालविती' ।। ३४५४ ।।**

(ब) 'रिक्तहस्त नच जावे' म्हणून नाथांच्या सुदाम्याने 'तीन मुठी' पोहे घेतले आहेत. मुळात चार मुठींचा निर्देश असून, नामदेवांनीदेखील चार मुठीच सांगितल्या आहेत. इथे नाथांची बांधणी नव्याने प्रकटली आहे.

सुदाम्याच्या दारिद्र्यदर्शनाच्या वेळी नाथांनी 'शते एक ग्रंथी' असे नव्याने सांगितले आहे. तसेच द्वारकेतील द्वारपालांचा प्रश्न नव्याने आला असून, 'कृष्णाचा बंधू' म्हणून सांगताच ते हसतात. पुढे मंगलस्नान, विनोद, रुक्मिणी-सत्यभामा यांचा संवाद इत्यादींतून घरगुती बारकावे व नर्म विनोद गृहस्थी नाथांनी मोकळेपणाने मांडले आहेत.

(क) नाथांच्या कथाबांधणीत तीन मुठी पोह्यांची भक्ती नव्या विचाराने प्रकटली आहे. श्रीकृष्ण एकमुष्टी पोहे खातात व त्यास सोन्याची द्वारका देतात. दुसऱ्या मुठीने सायुज्य मुक्ती देतात आणि तिसरी मूठ तोंडात घालणार एवढ्यात रुक्मिणी तर्क करते की आता या भक्ती पोह्याने स्वारी स्वतःच अधीन होणार म्हणून ती 'प्रसाद' मागते. हा सर्व भाग नाथ नव्याने रचतांना दिसतात.

### ३) रंगनाथ निगडीकर — कालसापेक्ष रंगभरणी

(अ) रंगनाथ निगडीकरानी मूळ भागवती कथेप्रमाणे किंवा नामदेवांप्रमाणे सुदामाच्या दारिद्र्याचे प्रारंभी चित्रण केले असले, तरी मुळात दारिद्र्यातही सुदामाचे दिसणारे आत्मसमाधान इथे दिसत नाही. उलट संत्रस्त करणाऱ्या भयानक दारिद्र्यामुळे इथे सुदामास भक्ती आणि भगवंत यांचा त्यास विसर पडलेला दिसतो. म्हणूनच त्याची पत्नी त्याचे स्मरण देताना दिसते.

द्वारपाळ सुदामास दण्डप्रहार करतात. निगडीकर लिहितात -

**'द्वारपाळांच्या हारी । दण्डप्रहारी ताडिती ।।४१।।'**

इथे सुलतानी काळात भीतभीत मुजऱ्यास जाणाऱ्या सामान्य माणसाचे कालसापेक्ष चित्र दिसून येते. द्वारकेतदेखील हा सुदामा शांत, तृप्त असा दिसत नाही.

(ब) तीन मुठी पोह्यांचा खुलासा इथे अधिक नव्याने आला असून ते लिहितात—

१. **'प्रथम मुष्टीसाठी हरी । विश्वकर्म्यासी आज्ञा करी ।**
**सुवर्णाची सुदामनगरी । क्षणामाझारी करावी ।।६१।।'**

२. **'द्वितीय मुष्टी कारणे । सायोज्यमुक्ती नारायणे ।।६२।।'**

३. **'तृतीय मुष्टी जाणा । रूक्मिणी द्यावी ब्राह्मणा ।**
**ऐंसे कल्पिता यादवराणा । रुक्मिणी अंतःकरणा कळाले ।।६३।।'**

अर्थात तिसऱ्या मुठीच्या वेळी 'मनी घाबरी होऊनी ' ती भगवंताचा हात धरते. इथे शंकरांनी आपली पार्वती रावणास देऊ केल्याची कथा स्मरते आणि भक्तीने प्रसन्न होऊन आपली अर्धांगीदेखील भक्तांना अर्पण करण्याची सुखसंतुष्टी या दोघा हरिहरामध्ये समानच असावी हेदेखील हरिहर ऐक्याचेच द्योतक असावे.

(क) रंगनाथांच्या कथाबांधणीत श्रीकृष्णांनी सुदामदेवास दादो, दादा, दादोजी इ. संबोधने वापरली असून, त्यात कौटुंबिक वास्तवभाव दिसून येतो. तसेच रंगनाथांनी सुदामाचे चित्रण हरिदासी थाटात विनोदी पद्धतीने रेखाटलेले दिसते. त्या दृष्टीने तो काळा कुरूप, वेडावाकडा, शेंबूडवाला, दाढी वाढलेला, असा आहे. हे दारिद्र्याचेच दर्शन होय. सुलतानी काळातील दारिद्र्याची वखवख, ब्राह्मणांची दुर्दशा इथे पदोपदी जाणवते. द्वारकेतून परत निघालेला सुदामा अंगावरील पीतांबर विकला तरी आपली गरिबी जाईल,या टोकापर्यंत दारिद्रयाचाच विचार करताना दिसतो. रंगनाथ लिहितात-

**'संकल्प कल्पी काल्पनिक । म्हणे पीतांबर अमोलिक ।।८५।।'**

**'पीतांबराचा विक्रय । करुनिया अयनद्वय ।।**
**क्रमावे हा सुनिश्चय । अभिप्राय चित्ताचा ।।८७।।'**

घरी परतलेला सुदामा प्रारंभी भांबावलेला, भ्रमिष्ट असा झाला असून, रंगनाथांच्या कथा-बांधणीत सुदामनगरीचे वर्णन स्वतंत्रपणे (९४ ते १००) आलेले दिसते. या कथेतील सुदामा दैवी भक्तापेक्षाही लौकिक पातळीवरील मानवी स्वभावसुलभ असा वाटतो.

## ४) अनाम कवी – तंजावर

तंजावरच्या या अनाम कवीने आर्या वृत्तातून अत्यंत लघुकाय अशी नेमकी कथाबांधणी साधली असून, केवळ १४ आर्यातून 'प्रभु चेरणांचा दर्शन महिमा' दाखविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. त्याने विलक्षण चातुर्याने व गतिमानतेने 'नग सत्वाचा हरिचा सखा ।' सुदामा याची कथा तंजावरी प्रादेशिकतेसह प्रकट केली आहे. छोट्या आकारमानामुळे व गेय वृत्तामुळे ही कथा पाठांतरसुलभ बनली आहे. ही कथाबांधणी मोरोपंती थाटाची वाटते; पण या आर्यावृत्त बांधणीत विद्वज्जडतेपेक्षा भक्तीच्या भावुकतेची गहिरी छाप अधिक जाणवते. एकदंरीत तंजावरी थाट आहे.

## ५) आनंदतनय – पंडिती विदग्ध कथा बांधणी

(अ) आनंदतनयाच्या वृत्तबद्ध कथाबांधणीत ४२ श्लोक असून, त्याने मधून मधून भक्तिपदेही योजिली आहे. अशा भक्तिपदांची संख्या एकूण बांधणीत २५ असून, मुळात या पदांना क्रमांक नाहीत. तथापि, संदर्भ विवेचनासाठी इथे प्रस्तुत क्रमांक दिलेले आहेत.

दुसरी एक गोष्ट म्हणजे आनंदतनयाने मधूनच कथा-निवेदनासाठी ओवी छंदही

वापरलेला आहे. श्रीकृष्णांनी सुदामाचा केलेला आदरसत्काराचा प्रसंग कवीने १७ ओव्यांतून निरूपिला आहे.

मधूनच द्रुतगद्याची. लय पकडून 'चूर्णिका' वृत्तही वापरले आहे. अशा रीतीने गद्य-पद्यात्मक चम्पू काव्यरचनेतून ही भक्तिकथा उभी राहाते.

आनंदतनयाच्या या कथाबांधणीचे आणखी वैशिष्ट्य असे की त्याने मधून मधून संस्कृत श्लोकही वापरलेले आहेत. संस्कृतमधील ५ श्लोक या कथेत आले आहेत. एवंच, संस्कृत-प्राकृत-गद्य-पद्य-मिश्र विविध, वृत्तात्मक अशी ही कथाबांधणी आहे.

विविध देवदेवतांच्या महोत्सवप्रसंगी होणाऱ्या कीर्तन रंगभरणीसाठी ही कथा सिद्ध असलेली दिसते. रंजक रोचकता. प्रभावोत्पादकता, विदग्धता इ. सर्व दृष्टीने ही कथाबांधणी सफल दिसते.

(ब) कथेचा प्रारंभ भगवंताच्या अपार महितमा स्तवनाने होत असून प्रारंभी -

'आसे हे देवाची करणी ।।' पद १ ।। असे ध्रुपद आळविले असून, कथेच्या शेवटी 'आनंदनंदन' म्हणे हरिची क्रुपा हे ।।' ४२ ।। असा चरण येऊन या उपक्रमोसंहारातून भगवतांच्या अपार कृपेची कथा आद्यंती उलगडली जाते.

(क) कथाबांधणीत भक्तिरसयुक्त पदांची योजना करताना आनंदतनयाने स्वरचित पदाबारेबर प्रसंगोपात्त, गिरिधरस्वामी, त्रिंबक स्वामीकृत, ज्ञानदेव म्हणे, केशव म्हणे इत्यादींची देखील भक्तिपदरचना उपयोजिली आहे.

अशा रीतीने तीन मुष्टी पोह्यांनी तुष्टी पावणाऱ्या जगदीश्वराची ही कथा अनुदिनी रसना जपो हे ।।१।। अशा इच्छेने आनंदतनयाने मोठ्या भक्तिभावाने ही रसाळ कथा उभी केली आहे.

(ड) **साभिनय दृश्यरूप** - हरिदासी पोशाखात उत्सवादी प्रसंगी चिपळ्या, टाळ, वीणा, मृदुगांच्या साथीने, झांज वाजवीत हे कथानिवेदन जर घडत असेल तर या कथेच्या दृश्यरूप सौंदर्याची बहार श्रोत्यापुढे कशी वेधकतेने खुलत असेल याचे कल्पनाचित्र सहजी उभे राहाण्यासारखे आहे. आजही तंजावर येथे समर्थ रामदासी मठात भीमराज गोस्वामी हे (विद्यमान आठवे मठाधीश) रामनवमीच्या उत्सवात - पुढे हनुमानजयंतीपर्यंत अशी स्फुट आख्याने लावतात; लळिते साजरी करतात. त्यांचे कथा-निरूपण याच थाटाचे असते. तामिळ भाषेचे वळण घेऊन बखर गद्याची जातकुळी सांगत त्यांचे 'कथानिवेदन' घडत असते. आनंदतनयाची कथादेखील अशीच लोकसमूहापुढे सादर होत असावी असे दिसते.

(इ) **आनंदतनयाचे प्रतिमांकन** - आनंदतनयाने आपल्या कथाबांधणीत अल्पाक्षर रमणीय सार्थ सघन अशा प्रतिमा योजल्या असून, त्यातून आशयाची सघनता वाढली आहे. सुदामकथेतील अशा प्रतिमा विलक्षण बोलक्या ठरल्या आहेत. उदा.

**१) सुफुल्ल तुंबी**

सुदामाचे दारिद्र्य आणि त्या पोकळ संसारातील लटांबरासहित वाढता कुटुंबविस्तार

उभा करताना भोपळ्याच्या - तुंबी फळाची सार्थ प्रतिमा तो योजतो. तो लिहितो-

**'।। दरिद्री तो आणि माहाकुटुंबी । फुल्ले जसी फार सुफुल्ल तुंबी ।।३।।'**

**२) बृहद् कंदुक ।।९।।**

फाटून चिंध्या झालेल्या पंचात मूठभर पोहे बांधून, त्यांची गुंडाळी करून काखेत धरलेल्या सुदामाचे हे क्षणचित्र. इथे 'मुष्टियेक' पोहे आणि 'बृहद् कंदुक' हा विरोध खूपसे भाष्य करून जातो. इथे मूर्तिमंत बृहद दारिद्र्याचेच गाठोडे साकार होते.

**३) गुल फुटाणे ।।पद १५।।**

देव भावाचा भुकेला असतो. भगवंतानी सुदाम्याचे पोहे अधीरतेने कसे खाल्ले हे सांगताना आनंदतनय लिहितो- 'जेविं बालक संतोष देखुनी गुल फुटाणे' ।। पद१५ इथे साखर-फुटाणे-गुल फुटाण्यासाठी झेप घेण्याऱ्या बालकाप्रमाणे श्रीकृष्णाने पोहे खाल्ल्याचे सांगून कृष्णाची बाललीला व भक्तिप्रेम एकाच वेळी तो दाखवून देतो.

**४) अवसे चंद्रोदय**

रूक्मिणीदेवी सुदामाचे स्वागत करताना म्हणते की -

'अवसे चंद्रोदय झाला । आपूर्व वाटे आम्हांसी ।।' पद १३

उंबराच्या फुलाप्रमाणे अशक्यदर्शी गोष्ट शक्य झाल्याचा आनंद इथे ओसंडताना दिसतो.

**६) श्रीधर नाझरेकर**

श्रीधराने केवळ ३४ पदांत ही छोटेखानी कथाबांधणी साकारली आहे.

१) सुदामाच्या दारिद्र्यपूर्ण संसाराचे क्षणचित्र.

२) सुदामाचे द्वारकेतील आगतस्वागत.

३) मित्रभेट म्हणून मिळालेली सुदाम नगरी व दारिद्र्य-परिहार.

अशा तीन प्रसंगातून ही कथा नेटकेपणाने उभी केली आहे.

(अ) सुदामा 'पिडला दरिद्रे बहु । या प्रारंभापासून 'दासास दरिद्र नाही ।' या शब्दात कथा संपते. म्हणजे कथाबांधणीतील उपक्रमोपसंहार अत्यंत संतुलित झाला असून, भक्तिसूत्राने सुगठित असा आहे.

(ब) एकीकडे अत्यंत दरिद्री संसार आणि दुसरीकडे सोन्याच्या द्वारकेतील अष्टैश्वर्यसंपन्न श्रीकृष्णांचा गृहस्थाश्रम अशा दोन प्रचंड विरोधाभासातून श्रीधर एक सुंदर कथाशिल्प उभारतो. दोघातील ही दरी मित्रप्रेमाने भरून निघते.

(क) वातावरण-निर्मिती व रसपरिपोषाच्या दृष्टीने श्रीधर कथाबांधणीत यशस्वी ठरला आहे. दारिद्र्याचे क्षणचित्र उभे करताना तो लिहितो

**'आधीच दरिद्रे पीडला । त्यावरी दुष्काळ पडिला**
**परी स्वधर्म आपुला । सर्वथाहि न संडी ।।२।।**

'अन्नेवीण बाळे दीन । गेली पतिव्रता वाळोन ।

वस्त्रे जर्जर संपूर्ण । धड नाही कोठेही ।।३।।

'चिंध्या चहुकडे लोंबती । ठायी ठायी बांधे ग्रंथी ।।'

या वर्णनात दारिद्र्याबरोबरच कारूण्याचेही आपणास दर्शन घडते. या उलट रूक्मिणीच्या महालात 'डोल्हारा रत्नजडित ।' असल्याचे तो सांगतो. शांत-करूण, अद्भुत, भक्तिधुंद वातावरणात एका परम भक्ताची कथा आकार घेते.

## ७) अमृतराय कथा १ व कथा २

(अ) अमृतरायांनी 'कटाव' छंदातून मराठी भाषेत दोनदा सुदाम चरित्रकथा लिहिली असून, हिंदी भाषेतदेखील त्यांच्या सुदाम कथेवरील दोन स्फुट कथा उपलब्ध आहेत. म्हणजे एकाच विषयावर अनेकदा तीच कथा लिहिण्यात ती त्यांच्या आवडीचा विषय बनलेली दिसते. या कथाबांधणीत प्रसादगुण असून,त्यांच्या प्रतिभेचे रचनाचातुर्य दिसून येते. अमृतरायांची वाणी 'सुधा श्राविणी' कर्णमधूर असून,रसाळ आहे. त्यांनी संत, पंत कवितेचे विशेष अंगी मुरवून शाहिरी कवितेचे उन्मेष प्रकट केले आहेत. त्यांचे कीर्तन रसाळ असल्याचे मोरोपंतही सांगतात.

'कीर्तन सुखार्थ झाला अवतारचि अमृतराय जीवाचा ' अशा शब्दात मोरोपंतांना त्यांचा गौरव केला आहे.

(ब) औरंगाबाद या त्यांच्या जन्मगावातील यवनांची इष्कबाजी, शहरातील व्यापार,वैभव इ. गोष्टी त्यांच्या कथेत प्रतिबिंबित झाल्या असून,त्यांच्या दोन्ही मराठी कथा आकारमानाने सारख्याच आहेत. १७ चौक व १८ कडवी अशी त्यांची 'कटाव' छंदातील घडण आहे. या दोन्ही कथांचे ध्रुवपदही सारखेच आहे. ते लिहितात -

**'श्रीकृष्णे सुदामजीला सोन्याची नगरी दिधली ।**

**स्वानुभूती हृदयामधली ।। धृ.**

(क) शाहिरी थाटाची ही कथाबांधणी द्रुत गद्याच्या प्रासबद्ध लयीत सजीव बनली आहे. द्वारकेतील सुदामाच्या भोजन-वस्तूंची यादी हरिदासी कीर्तनातून मांडावी तशी ते देतात -

उदा. **घव घव घव घव ते तूप साखर । वक्र करंज्या, शुभ्र फेणिया ।**

**पंचखाद्य नैवेद्य मृदु दुग्ध दधि । इ. इ.**

एवंच,चौका चौकातून त्यांनी एक हमचौक अशी डौलदार कथा बांधलेली दिसते.

## ८) मोरोपंत - कथा पहिली व कथा दुसरी

(अ) सुदामकथा ही मोरोपतांची अत्यंत आवडती कथा आहे. (१) विविध वृत्तात्मक 'सुदाम् चरित्र' (२) साकीबद्ध 'पृथुकोपाख्यान' अशा दोन स्फुट कथा त्यांनी लिहिल्या आहेत. एकच कथा, आर्या व साकी छंदात वाचताना श्रुतिरम्य विविधतेने वेधक ठरली आहे. त्यातून पंताचे भाषाप्रभुत्व व वृत्तबांधणीतील कौशल्य दिसून येते.

पंतांची पहिली कथा ८५ श्लोकांची आहे तर दुसरी कथा ८८ साकींची आहे. आकृतिबंध बदलून प्रकटलेल्या या कथा नवी गोडी चाखावयास देतात.

(ब) दोन्ही कथांचे प्रयोजनही सारखेच दिसते. पंत लिहितात -

१) हो स्व वाचा पवित्र ॥१॥ आणि

२) वाणी पवित्र करायास्तव ॥ साकी ८७

'तारक मधुर' अशी संतचरित्रे गाण्याची भावतळमळ दोन्ही कथांतून प्रकटली आहे. या दोन्ही कथातून पंताच्या हृदयाची तार सुदामदेवाच्या हृदयाशी जुळलेली जाणवते.

(क) पंताची पहिली कथा ही १० प्रवेशातून शृखंलाबद्धरीतीने मांडली गेली असून, सुदामा द्वारकेहून घरी परत आल्यावर त्याची पत्नी त्यास द्वारकेतील सर्व हकीकत विचारते तेव्हा तेथील प्रसंग आठवून सुदामा स्वतःच स्मरणरूपाने सर्व सांगतो असा कथाबांधणीचा बाज पंतांनी मांडला आहे.

इति प्रश्न : म्हणजे पात्रमुखी कथनपद्धतीने कथाबांधणी घडली गेली आहे

'मुनिची वनिता पुसे वराते ॥२॥' असा प्रश्न सुदामपत्नी करते. पुढे ती विचारते -

**'काय तो वदला यदूत्तम ? काय हो ! कथिले मुखे ? ।**

**भेटला, बसला कसे ? अजि जेवला निजला सुखे ॥**

**अर्पिले जगदीश्वराप्रति ते उपायन जी कसे ? ।**

**हे मला कळवा समस्तही हर्ष निर्भर मानसे ॥७॥'**

अर्थात दारिद्र्याच्या वणव्यात होरपळून निघाल्यानंतर सोन्याच्या सुदामनगरीतील ऐश्वर्यसंपन्न राजमहालात तिने आपण दिलेल्या पोह्यांची स्मृती जागवून द्वारकेतील सर्व वृत्तांताविषयी उत्कंठतेने पृच्छा करावी हे अगदी सहज स्वाभाविक असून सुदामानेदेखील पूर्वक्लेश परिहारानंतर भरल्या अंतःकरणाने सकल वृत्तांत निवेदन करावा यातील रचना चातुर्य आगळे असून, मोठे गोड आहे. 'क्लेशः फलेनहि पुनर्नवतां विधते ।' या उक्तीप्रमाणे पंताच्या या कथाबांधणीला त्यामुळे प्रारंभीच ऐश्वर्यसंपन्न वातावरण लाभले आहे. सकल परिजनासमवेत पत्नीपुढे सुदामा पूर्ण तृप्तीने निजमुखाने आपल्या बंधुतल्य मित्राची औदार्यकथा सांगू लागतो. पंत लिहितात -

**'कथि श्रीदामा तो हरिश्चरित सारे निजमुखे ॥'**

इथे कथाबांधणीच्या दृष्टीने पाहाता द्वारकेतील सकल वृत्तान्त कवीने वर्णन करून सांगण्यापेक्षा प्रत्यक्ष ते प्रसंग अनुभवलेल्या सुदामानेच सांगण्यातील औचित्य आगळे असून, या औचित्यविवेकाच्या भक्कम बैठकीवरच कथा उभी आहे.

पंताची दुसरी कथा मात्र मूळ भागवती कथेप्रमाणे निवेदनाच्या पातळीवर प्रकटली आहे.

(ड) संपूर्ण कथेत पंताना त्या 'भाव पोह्याची' मातब्बरी वाटते, म्हणून त्यांनी आपल्या आख्यानकथेला 'पृथुकोपाख्यान' असे समर्पक शीर्षक दिले आहे.

९) प्रभाकर

(अ) लावणीकार प्रभाकराने शाहिरी ढंगात; पेशवाईतील संमिश्र अभिरूचीच्या लोकासमोर पेश केलेली सुदाम चरित्र कथा ही रूचिपालट म्हणून श्रोत्यांना खचितच आवडेल अशी झालेली आहे. पाच चौकातून या कथेची जडणघडण झाली आहे. प्रत्येक चौकात दोन चार कडव्यानंतर 'चाल बदल' अशी सूचना दिलेली आहे. श्रुतिरम्यतेचा असा वेध घेत फडातील समूहगानाचे परिमाण घेऊन ही बांधणी झाली आहे. अमृतरायांच्या कटावाची छाप या रचनेवर पडली असून,लावणी पोवाड्याच्या 'तोंडा' प्रमाणे इथे ध्रुवपद आहे.

(ब) अमृतरायांनी 'श्रीकृष्णे दिधली सोन्याची नगरी ।' असे तोंड दिले असून इथे प्रभाकराने 'माधव' शब्द योजून तोच आशय मांडला आहे. प्रभाकर लिहितो –

**'गांजिले सुदामा विप्र दरिद्रे भारी ।**
**दिल्हे कांचनमय 'माधवे' नगर द्वापारी ।।धृ.।।'**

यातील 'माधव' शब्द माधवराव पेशवे यांच्याकडे लक्षित करून,अर्थगर्भता वाढवलेली दिसते.

'प्रभाकराची जडणघडण ही सभेत गायाला ।' या त्याच्या प्रतिज्ञेप्रमाणेच या कथेची बांधणी असून संत-पंत कथेपेक्षाही हे स्फुरण वेगळा आकृतीबंध उभा करते.

(क) 'दुष्काळाची लावणी' घडलेल्या काळातच प्रभाकराने सुदामदेवाच्या काळातील दुष्काळाचे वर्णन मांडावे यात पुनःप्रत्ययाची अभिव्यक्तीच सहज जाणवते. म्हणजे वास्तववादी निरीक्षण कथाबांधणीत अवतरलेले दिसते.

(ड) आपल्या कथाबांधणीचे स्वरूप मोठ्या अभिमानाने सांगताना प्रभाकर लिहितो–

**'प्रभाकराचे कवन मधुर दिलदारी ।**
**भरी अर्थ यमक अतंऱ्यामधि रंग करारी ।।'**

## सुदाम कथा व्यक्तिदर्शन

### १) मूळ भागवत - सुदामा ब्रह्मविद् ज्ञानी ब्राह्मण

(अ) मूळ भागवती कथेतील नायक सुदामदेवाचे चित्रण .उदात्त पातळीवरून केलेले असून ज्ञानीभक्ताच्या रूपातील त्याचे दर्शन वेधक असे आहे. 'कृष्णसखा' व 'ब्रह्मविद्' ही त्याची विशेषणे असून तो जितेंद्रिय आहे. भागवतकार लिहितात–

**'कृष्णस्यासीद् सखा कश्चिद ब्राह्मणो ब्रह्मवित्तमः ।**
**विरक्त इंद्रियार्थेषु प्रशान्तात्मा जितेंद्रियः ।।१०.८०।।'**

श्रीकृष्णाकडे जाताना धनसंपत्तीपेक्षा प्रभूचे दर्शन घडणार म्हणूनच त्यास आनंद होतो.

**'अयं हि परमो लाभः उत्तमश्लोकदर्शनम् ।। ८.१२ ।।'**

(ब) चार मुठी पोहे घेऊन हा दरिद्री सुदामा द्वारकेत येतो तेव्हा प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण मंचकावरून धावून येतात.

**'पर्यंकस्थां श्रियं हित्वा परिष्वक्तोऽग्रजो यथा ।।' ८०.२६ ।।**

अर्थात रुक्मिणीलाही मागे टाकून बंधुतुल्य मित्रासाठी भगवान धावून येतात यात सुदामाचे भक्तिवैभव दिसून येते. श्रीकृष्ण त्याला भेटीदाखल काय आणले म्हणून विचारतात -

**'किमुवायनमानीतं ब्रह्मन् मे भगवता गृहात ।।' ८१.३ ।।**

श्रीकृष्णाच्या प्रेमकृपेने भारावलेला सुदामा म्हणतो -

**'क्वाहं दरिद्रः पापीयान् क्व कृष्णः श्रीनिकेतनः ।**

**ब्रह्मबंधुरिति स्माहं बाहुभ्यां परिरम्भित : ।। ८१.१६ ।।'**

अर्थात स्वतःचे क्षुद्रपण आणि श्रीकृष्णाचे औदार्य यामुळे संकोचून गेलेला सुदामा इथे दिसतो. प्रत्यक्ष देवी रूक्मिणी त्यास विंझणवारा घालते असा त्याचा मायना आहे. म्हणूनच जन्मोजन्मी श्रीकृष्णाचेच दास्य मिळावे असे तो म्हणतो.

**'तस्यैव मे सौहृदसख्यमैत्री दास्यं पुनर्जन्मनि जन्मनि स्यात् ।। ८१.३६ ।।'**

**२) नामदेव - सुदामा — शांति समाधानी सदा स्वरूपी अखंडित ।**

नामदेवांनी सुदामाचे व्यक्तिचित्र आत्मतृप्त, समाधानी ज्ञानी असे चित्रित केले आहे. या चित्रणात प्रत्यक्ष नामदेवांचेच प्रतिबिंब आपणास दिसते. 'पांच सात बाळे' भुकेने तळमळणाऱ्या; फाटक्या तुटक्या संसारात वावरणारी सुदामाची पत्नी म्हणजे 'शांतीची बाहुली' असे नामदेव सांगतात. त्यामुळेच ती सुदामास द्वारकेस जाण्याची आज्ञा करीत नाही, तर नम्रपणे विनवणी करते. 'भ्रतारा विनवी नम्रतेने' नामदेवांचा सुदामादेखील भगवंताकडे काही मागण्यापेक्षा 'निवतील डोळे दर्शनाने' अशा भक्तिप्रेमापोटीच द्वारकेस निघतो. द्वारकेच्या महाद्वारात हा राजयोगी आपल्याच रंगात रंगून उभा असतो. 'नामा म्हणे तुझे नित्य महाद्वारी । कीर्तन गजरी उभा असे' ही नामदेवांची स्वरूपस्थितीच सुदामाच्या रूपात इथे उभी असून ते आणखी, लिहितात

**'येकाकार करी चित्त आणि वृत्ती । पाहे लक्ष्मीपती दुरोनिया ।।'**

त्याच्या अशा भाव-तल्लीनतेमुळेच रत्नजडित सिंहासनावरून श्रीकृष्ण धावून येतात. त्याचे चरण प्रक्षाळण करून आपल्या शेल्याने सुदामाचे पाय पुसतात. सुदामाच्या या महाभाग्याचे वर्णन करताना ते लिहितात,

**'नामा म्हणे देवे चरण प्रक्षाळिले । आचंळी पुसिले आपुलिया ।।'**

नंतर मंगलस्नान होते. 'हरिरूची' च्या भोजनानंतर प्रत्यक्ष भगवंत त्यास विडा देतात.

**'नामा म्हणे त्यासी देवेदिला विडा । रंगला तो जोडा वैराग्याचा ।।'**

इथे भक्त आणि भगवंताचे योगेश्वराच्या वैराग्य स्वरूपात समरूप दिसून येते.

परत जाताना नेसत्या जुन्या वस्त्रानिशी बाहेर पडलेला सुदामा आपल्या दैवालाच दोष देतो आणि 'व्यर्थ का रूसावे देवावरी ।।' असे शांतिसमाधान प्रकट करताना दिसतो. एकंदरीत नामदेवांचा सुदामा हा पंढरीच्या महाद्वारात उभे राहून विटेवरी समचरण उभ्या असलेल्या राजस, सुकुमार मदनाच्या पुतळ्याचे; सावळ्या परब्रह्माचे दर्शन घेऊन पूर्ण तृप्त झालेला समाधानी भक्त आहे असेच दिसते.

### ३) एकनाथ - सुदामा – परिसा चरित्र भक्ताचे ।

नाथांनी एका समाधानी भक्ताचे चित्रच कथेतून उभे केले आहे. प्रचंड दुष्काळात दैन्यवाणा झालेला सुदामा इथे प्रारंभी दिसत असून, त्यास द्वारकेस जाण्याबद्दल पत्नी सांगते. कारण 'कृष्णजी कृपाळू बंधु तुम्हा मानी ।' हे तिला माहीत आहे. नामदेवांच्या सुदामापेक्षाही नाथांचा सुदामा हा अधिक दुष्काळग्रस्त असून, 'तृणबीज' गोळा करणारा, क्षुधाक्रांत, मृतप्राय् असा आहे याचे कारण नाथांचा काळ हा अधिक परतंत्र, यवनक्रांत व बिकट असा आहे. या बदलेल्या काळातही नाथांचा सुदामा समाधानी आहे. इथे त्याचे कष्ट भगवतांसही जाणवल्याचे नाथ लिहितात. 'अंतरी विचार करितो श्रीहरी । सुदाम्याचे घरी कष्ट फार ।।' नाथांचा सुदामाही नामदेवाप्रमाणे आपल्या 'प्रारब्धाचाच भोग' असे मानणारा आहे.

**'काय प्रारब्धासी करील कृष्ण ।।१।।**

**आम्हासी तो पूर्ण दरिद्र भोगणे । तेथे नारायणे काय कीजे '।।२।।**

शेवटी शांतिब्रह्म नाथांचे समाधान सुदामातही प्रकटले असून, दारिद्रयातही हा अकिंचन ब्राह्मण पूर्ण समाधानी दिसतो.

### ४) रंगनाथ निगडीकर - सुदामा – सुलतानी काळातील दारिद्र्यपीडित सुदामा

(अ) रंगानाथ निगडीकर हे समर्थकालीन 'अस्मानी सुलनाती'मध्ये सुदामा उभा करीत असून, कालसापेक्ष पडसाद या व्यक्तिचित्रणात उमटले आहेत. हा सुदामा प्रारंभापासून - 'अशन वसन रहित निर्धन अकिंचन' असून 'नसे आंथराया। नसे पांघराया । वृथा जन्मसंसार करिती रडाया ।।' अशा स्थितीत 'हरिविस्मरण' झालेला आहे. त्याची पत्नी त्यास स्मरण देऊन सांगते की -

**'तुम्ही विसरलेति जनार्दना । दारिद्र्य व्यसना भुलोनि ।।२१।।**

**ऐसे असोनि विस्मरण । दृढ धरावे हरिचरण ।।२३।।'**

अर्थात भयानक दारिद्र्याने हरिस्मरण विस्मरण व्हावे असाच तो काळ असल्याने त्याच काळात समर्थांनी 'मुख्य ते हरिकथा निरूपण ।' ही पहिली काळाची गरज बोलून दाखविली आहे. रामदासी पंचायतनातील रंगनाथस्वामीदेखील 'दृढ धरावे हरिचरण ।' असेच सांगत आहेत. नामदेव एकनाथपेक्षा सुदामाचे हे दर्शन वेगळे दिसते.

(ब) दारिद्रयाने लज्जित झालेला रंगनाथांचा सुदामा तीन मुठी पोहे नेणे हा

उद्धटपणा समजतो. मुळातील भक्तीचा आनंद, सहजसमाधान इथे त्यास वाटत नाही. तो म्हणतो –

**'त्यासि मी दुर्बल ब्राह्मण । तीन मुष्टी पोहेकण ।।**
**नेवोनि देऊ आपण । उद्धटपण हे माझे' ।।२९।।**

इथे सुदाम्यास भक्तीच्या मातब्बरीपेक्षा दारिद्र्याचीच लाज अधिक वाटत असलेली दिसते.

(क) रंगनाथांचा सुदामा द्वारकेत येतो तेव्हा त्यास द्वारपाळ दंडप्रहार करतात.

**'द्वारपालांचिया हारी । दंडप्रहारी ताडिती' ।।४१।।**

असा निर्देश अन्य कोणाही कवीने केलेला नाही. पण इथे मात्र सुलतानी वाड्यावर भीतभीत मुजऱ्यासाठी जाणाऱ्या कातर माणसासारखा सुदामा दिसतो. भक्तीचे आत्मिक सामर्थ्य असलेला बेधडक आतपर्यंत जाणारा सुदामा इथे साशंक, भयभीत, कातर दिसतो.

'साशंकित भयभीत । मागेपुढे पाहात ।।४२।।' रंगनाथांच्या या चित्रणात सुदाम्याच्या भक्तीतील उणेपणापेक्षाही तत्कालीन कालसापेक्षता अधिक डोकावते.

(ड) रंगनाथांचे सुदामचित्रण हे काहीसे हरिदासी पद्धतीने खसखस पिकविणारे दिसते.

**'वेडे वाकुडे करचरण । रोडके बोडके कृष्णवर्ण ।**
**कोठून आणला ब्राह्मण । नाही प्रावर्ण एकही ।।७५।।**
**दांतरे बोचिरे कुचदाढी । क्षणक्षणा शेंबुड ओढी ।।७६।।'**

सुदाम्याचे हे चित्रण सवंग विनोदी वाटले आणि ओंगळ वाटले तरी भेदक आहे. हाच सुदामा परत आल्यावर 'माझे कोपट कोणे नेले । कोठे गेली माझी मुले ।।११०।।' असे म्हणून हंबरडा फोडतो तेव्हा तत्कालीन सुलतानी लुटालुटीचे प्रसंग सहजी आठवतात. एवंच, रंगनाथांचा सुदामा हा ऐतिह्य काळातील दुःखदैन्याचे संचित घेऊन प्रकटलेला दिसतो.

**५) अनाम कवी (तंजावर)-सुदामा - प्रभुचरणाचा दर्शत महिमा ।।' नग सत्वाचा ।।**

तंजावरच्या या अनाम कवीने सत्त्वसंपन्न, कृष्णसखा, समाधानी सुदामा उभा केला आहे.

**'नग सत्वाचा हारीचा विप्रसुधामा सखा तया ।।१।।'**

मुलांबाळाकडे पाहून, पत्नीच्या सांगण्यावरून निघालेला सुदामा इथे वत्सल पिता जाणवतो. श्रीकृष्णाने धन दिले नाही म्हणून, तो 'धनदोषच' आठवून प्रभुस्मरण करणारा आहे.

**'नवल करी धन न दिले यास्तव, मग तो मनात धन दोष ।**
**आणोनि, ब्राह्मण त्या प्रभुला वर्णुनि पावला तोष ।।१२।।'**

शेवटी सुदामनगरी मिळाल्यावर समाधानाचे कृतज्ञतेने म्हणतो की,

**'हा त्या प्रभुचेरणाचा दर्शन महिमा ।।१३।।'**

**६) आनंदतनय – सुदामा**

आनंदतनयाने आपल्या नावाप्रमाणेच आनंदमग्नतेने सुदामा आणि श्रीकृष्ण या आनंद चित्रांचे चित्रण केले असून, दोघांचेही पिळदार मानीपण, जिवंतपणे साकारले आहे.

**(अ) माहाकुटुंबी सुदामा**

आनंदतनयाने सुदामाच्या घरी दारिद्र्य असल्याचे सांगून दारिद्र्याला वरदान असलेला 'पोरवडा' सांगून, तो 'माहाकुटुंबी' असल्याचे म्हटले आहे. मात्र सुदामा ज्ञानविभूषित असून, नामस्मरण भक्तीत दंग असतो. त्याचे चित्रण करताना तो लिहितो–

**'की यैंसा दुबळा तयासि अबळा मागे चिरे कांबळा ।**
**बाळाच्या कवळा निमीत्य दुबळा विस्तारूनी ये बळा ।।४।।**
**नुस्ता पोरवडा घरि न कवडा चिंती बरे निवडा ।**
**नाही भातवडा तया दहिवडा, कैंचा तगे जीवडा ।।५।।**
**चोळी ना बुगडी पळी न दमडी टोपी न ते आंगडी ।**
**चिंतेची सगडी जिवासि रगडी पापांबळे वेगडी ।।६।।'**

अशा सुदामास त्याची पत्नी द्वारकेस धाडते याचे सांगताना ती सांगते –

**'तो श्रीकृष्ण गडी तुम्हासि पगडी बांधी मला लुगडी ।।७।।'**

(ब) सुदाम हा 'सकळ शास्त्रविद' असल्याने राजा, देव, गुरु यांच्याकडे रिक्तहस्त जाऊ नये असे शास्त्रवचन तो जाणतो. इथे सुदामाची पत्नी आपल्याच घरातील गाडग्यामडक्यांच्या उतरंडीतून मूठभर पोहे आणून देते. जीर्णवस्त्राचे गाठोडे बांधून सुदामा निघतो. त्याचे हे चित्रण म्हणजे मूर्तिमंत दारिद्र्याचेच दर्शन होय. आनंदतनय लिहितो–

**'ज्या वस्त्रि ठीगळासी कोण गणती दंडासि कैची मिती ।**
**छिद्राचे तरि लेख कोण करिती गांठी म्हणाव्या किती ।।**
**तेणे गुंडुनि मुष्टि येक पृथुका काखे बृहद्‌कंदुका ।।**
**चाले चाल कुचेल घेऊनि निघे भेटी रमानायका ।।९।।'**

दारिद्र्याचा बृहद्‌कंदुक घेऊन रमानायकाची भेट घेणे हा विरोधाभास लक्षणीय आहे. मात्र द्वारकेच्या कोणत्याही द्वारात त्याला अटकाव होत नाही, हे मुद्दाम लक्षात घेण्यासारखे आहे. इथे त्याच्या 'ब्रह्मविद्' स्थितीवर प्रकाश पडतो. रंगनाथांच्या सुदाम्याप्रमाणे हा दंडुके खाणारा सुदामा नाही. हा भोळा असून त्याच्या हाती काठी, कानात तुळस आहे. त्याने टिळे–माळा धारण केल्या असून, त्याच्या बोटात दर्भाचे

पवित्रक आहे.

(क) धावत सामोरी आलेल्या श्रीकृष्णास पाहाताच त्या मनोहर सगुण साक्षात्कारी दर्शनाने त्यास देहाचा विसर पडतो. विदेहीपणात त्याचे अष्ट सात्त्विक भाव दाटून येतात.

**'तेव्हां दृष्टि चके, सुबुद्धि वचके, प्रज्ञा न थारू शके ।**
**वाग्व्यापार ठके, उगाची न टके कापे तनू घे धके ।।१७।।'**

श्रीकृष्ण त्यास हाताला धरून सिंहासनावर बसवितात तेव्हा रुक्मिणीसही सुदामाची श्रेष्ठता कळते.

**'दादा चला म्हणुनी हात धरूनि देवे ।**
**सिंहासनी बसविला मग वासुदेवे ।।**
**आज्ञापिले जेलधिजा द्विज वंदनाते ।**
**हांसोनि ते नमितसे समजोनि नाते ।।२०।।'**

(ड) बाळपणीच्या या मित्राबरोबर हास्यविनोद होऊन मागील स्मरणगाथा उघडली जाते. त्याचे भावपोहे स्वीकारून घरचे कुशल विचारले जाते तेव्हा तो सांगतो-

**'चंद्रसूर्य आमुचे घर । जेथे तसे आंधकार ।**
**अन्नाविणे उंदीर । थारा न धरती तिळभर ।।ओवी१४।।**
**सदाकाळ यकादसी । पत्नी आमुची सदा उपवासी ।**
**गणना नाही चांद्रायणेसी । करु अहर्णसि तुझे कीर्तन ।।ओवी १५।।'**

प्रल्हादाच्या कडेलोटाहूनही कठोर अशा मरणप्राय दारिद्र्यात नित्यमरण भोगणारा हा सुदामा 'अहर्णसी' नामसंकीर्तनात मग्न आंहे.

**(इ) सुदामाची श्रीमंती** - शेवटी काहीही न मागता, सुदामा निघतो. उलट या पुरुषोत्तमास हा भूदेव वैदिक मंत्रासह तोंडभर आशीर्वाद देतो. खरोखरीच हा सुदामा धन्य होय.

**'देता सिघ्र निरोप देव वरदे भूदेव देवोत्तमा ।**
**आसिर्वाद वदोनि वैदिक विधी चाले तया सत्तमा ।।३१।।'**

इथे 'परमार्थी तो राज्यधारी' असल्याचे जाणवते. त्याच्या समृद्ध भक्तीने इथे अमाप समृद्धीचा पराभवच केला आहे. सुदामाच्या या श्रीमंतीची गणतीच होऊ शकत नाही.

(फ) श्रीकृष्णाचा निरोप घेऊन सुदामा निघतो. देवापासूनचे अंतर वाढते. हे अंतर म्हणजेच माया. या मायेने त्याची विवंचना सुरू होते. 'घरी सांगावे काय उत्तर ?' असा त्याला आता प्रश्न पडतो. तरीपण 'श्रीकृष्ण तारक निजनिर्धार ।' असा त्याचा विश्वास आहे. त्यामुळे गावी येताच सारे चित्र पालटते. हे नव दर्शन लक्षणीय असेच आहे.

**'तो देखे द्विज आपणा तव दुजा श्रीकृष्ण झाला असे ।।४१।।**

**'माथां मंदिल दिव्य रत्न कटके हाते गळा हार ते ।**

**माजी पीत पट प्रभा झळकली यैंस्या स्वरूपाते ।।४१।।'**

एवंच, सुदामा 'दुजा श्रीकृष्ण' होतो. अपार कृतज्ञता दाटून येते. आनंदतनय लिहितो—

**'भेटी नेली पोहे मुष्टी । तेणे देवा झाली तुष्टी ।**

**आली सौभाग्याची पुष्टी । जाहले कल्याण दुर्बळाचे ।। पद २४.४ ।।'**

## ७) श्रीधर - सुदामा

श्रीधराने आपल्या कथेच्या प्रारंभीच सुदामाचा परिचय दिला आहे.

**'बाळपणीचा मैत्रभक्त । हरिचा आवडता अत्यंत ।।१।।'**

याखेरीज - 'अंतरि हरिचे ध्यान न विसरेचि रात्रंदिन ॥६९॥ ही त्याची अखंड धारणा आहे. दारिद्र्य ही त्याची कसोटी असून त्याचा कस लागलेलाही दिसतो. श्रीधर सांगतो—

**'आधीच दरिद्रे पीडला । त्यावरी दुष्काळ पडिला ।**

**परी स्वधर्म आपला । सर्वथा न संडि ।।२।।'**

असा सत्त्वशील सुदामा कर्मसिद्धांताप्रमाणे समाधानी आहे.

## ८) अमृतराय - सुदामा – ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण मोठा

अमृतरायांचा सुदामा हा एका अर्थी 'प्रपंचहीन करंटा' आहे. पण तो तपस्वी ब्रह्मनिष्ठ आहे. अमृतराय त्याचे चित्र उभे करताना लिहितात—

**'जाहले हातपाय त्या नळ्या । नाडी दिसती वरी वेगळ्या । सुकले मांस पडल्या वळ्या ।**

**नखीं वेष्टयल्या आंगोळ्या । उपोषणे चिरकाल झाली ।। सरकाळे अंगाची वाळुनी ।**

**देह तपे जाहलासे जर्जर । उभा अस्थिचा केवळ पंजर तो भूनिर्जर ।।... बोटी दर्भ पवित्र-**

**ब्रह्मसूत्रासित गळा, धर्म जोडला, अडका जवळी नाही । तथापि अडकाठी कोणी न करता ।**

**तीन देवड्या ओलांडुनिया । चौथे मुक्तद्वार हरीचे ।।५।।'** असा हा योगी साधक सुदामा.

## ९) मोरोपंत - सुदामा – सुदामनगरीचा राणा

मोरोपंतानी सुदामदेवाचे चित्रण एका वैभवसंपन्न नगरीत, श्रीमंती ऐश्वर्यात बसून पूर्वस्मरणाने गप्पागोष्टीत आपली कथा सांगत असलेला सुदामा-अशा रूपात केले आहे. अंगी उंची वस्त्रे, अलंकारमंडित रुप, शेजारी भाग्यशाली पत्नी महाराणी कुतूहलाने पूर्वकथा उत्कंठेने ऐकत बसली आहे– असे प्रसन्न चित्रण प्रारंभीच दाखविणारी ही एकमेव कथा आहे. भागवताधिष्ठित सुदामाचे हे दर्शन एकदम नवे असून, पंताच्या

प्रतिभेची श्रीमंती इथे प्रसन्नतेने प्रकटली आहे. पंतांच्या या कल्पक चित्रणाला महाराष्ट्र सारस्वतात तोडच नाही. इथे सुदामा पूर्वस्मरणाने कथा सांगत असल्याने भेदक दारिद्र्याचा ईर गेल्याप्रमाणे जाणवते. दुष्काळ, दैन्य, दुःख यांचे जळजळीत दाहकत्व इथे कमी जाणवते. तसेच हा सुदामा आपली कथा सांगत नाही तर - 'चरित्र श्रीशाचे तुज कथितसे आदरभरे ॥' असे सांगतो. तसेच 'अहो झाले धन्य त्रिभुवनहि मन्मित्र चरिते ॥२॥'

म्हणजे प्रत्यक्ष सुदामाच इथे श्रीकृष्णाच्या औदार्याची कथा सांगत आहे. तो मानी भक्त आहे. 'माते श्रीपतिने न वित्त दिधले,मीही न मागीतले ॥४॥' शेवटी त्याचे मागणे एवढेच आहे की,

**'मैत्री सौहृद सख्य, दास्य हरिचे जन्मातंरीही असो ।**

**कांते देहहि हा निरंतर सुखे त्वद्भक्तवृंदी वसो ।।'**

**'गावे नित्य मुकुंद कृष्ण भगवन् विष्णो मुरारे हरे ।।२।।'**

सुदामाच्या या चित्रणात पंतांची समरसता प्रकटली असून, त्यांचे भक्तिभावयुक्त अंतःकरणच सुदामाच्या रूपाने समूर्त झाले आहे.

त्यामानाने पंतांच्या दुसऱ्या कथेत विशेष रंगभरणी झालेली नाही. केवळ वृत्तबदल होऊन निवेदनाच्या पातळीवर कथा प्रकटली आहे.

## १०) प्रभाकर - सुदामा – सामाजिक राष्ट्रीय प्रतिनिधी

(अ) प्रभाकराने सुदाम्याचे व्यक्तिचित्रण राष्ट्रीय, सामाजिक कार्यकर्त्यांच्या रूपात साकारले आहे. हा सुदामा कालयवन राजाच्या 'कपिल' नगरीत राहाणारा असून श्रीकृष्णाने कालयवनास ठार मारलेले असल्याने, 'कपिल' नगरीचा कालयवनाचा सरदार कृष्णाविरूद्ध चिडलेला आहे. तो कृष्णभक्त सुदामाचा छळ मांडतो. त्यात दुष्काळ पडून 'अन्नावीण बाळे' मरू लागतात तेव्हां त्याची पत्नी मुलांना माहेरी धाठविण्याचा विचार करते. पण तिचे माहेरही बुडाल्याचे प्रभाकर सांगतो. एवंच, कालयवनाची ही अवशिष्ट राजवट, प्रजेची नागवण इ. मुळे सुदामा सामान्य प्रजेचा छळ थांबविण्यासाठी द्वारकाधीश श्रीकृष्णाकडे जातो. त्याच्या या जाण्यात एक सामाजिक राष्ट्रीय जाण असून, त्याच्या व्यक्तिमत्त्वास एक भव्य परिमाण इथे गवसते. व्यष्टीचा परीघ समष्टीपर्यंत विस्तारतो आणि त्याला मूळ अधिष्ठान परमेष्टीचे म्हणजे भगवंताचे आहेच.

(ब) सुदाम्याचे द्वारकेतील स्वागत हे पेशवाई थाटाचे वाटते. पडदणी, पाटाव, चौरंग, रांगोळी कनकमय ताटे, पीतांबर, पैठण्या, शालू इ. उल्लेख कालसापेक्षतेने लक्षणीय ठरतात. या सुदामाचा पाहुणचार महिनाभर सुरू असतो.

प्रभाकराच्या कथेत व्यक्तिचित्रणापेक्षा प्रसंग-चित्रणावर अधिक भर दिसतो.

## ७) समारोप

१. भागवत पुराणातून आलेली ही भक्त - भगवंत कथा मराठी - प्राकृत परिवेशातून अभंग, ओवी, विविध वृत्तांच्या छंदलयीतून आध्यात्मिक सत्वधारा परिपुष्ट करीत आली आहे.

२. या कथेतील चित्रण क्रमेण लौकिक पातळीवर झुकत आलेले जाणवते.

३. संख्यात्यक दृष्टीने या कथेचा विचार करता मूळ भागवती कथेपेक्षा ही स्फुट आख्यान कथा जवळजवळ १/३ इतक्या लघुकाय आकारात प्रकटली आहे. संतानी ओवी अभंग छंद स्वीकारला तर पंडित कवींनी विदग्ध वृत्तबांधणी केली. त्यातून अभिजनांची अभिरूची दिसून येते. तंजावरच्या आनंदतनयाची कथा खास कीर्तनोपयोगी दिसते.

४. मोरेपतांनी पूर्ववृत्त स्मरणरूपाने सांगण्याची शैली स्वीकारून, पात्रमुखी कथा सादर केल्याने आविष्कारदृष्ट्या त्यांची सुदाम-कथा वेगळेपणाने उठून दिसते.

५. आर्या हे वृत्त खास मोरोपंताचे असूनही, इथे त्यांनी वृत्तबद्ध रचना (कथा १) केलेली आहे आणि तंजावरकडील अनाम कवीने मात्र आर्या वृत्तातून 'सुधामचेरित्र' लिहिले आहे.

### कथा-साधन संदर्भ

| | |
|---|---|
| १. मूळभागवत - | स्कंध १० उत्तरार्ध अध्याय ८०-८१ ।। एकूण श्लोक १२१. |
| २. नामदेवकृत सुदाम कथा- | २८ अभंग सकलसंतगाथा खंड १ अभंग २२९८ ते २३२५. |
| ४. एकनाथकृत - | २३ अभंग सकलसंतगाथा - खंड २.३४५२ ते ३४७४. |
| ५. रंगनाथ निगडीकर - | ओवीबद्ध - १३६ ओव्या. महाराष्ट्र काव्यग्रंथ. मराठी ग्रंथ संग्रहालय रंगनाथस्वामी निगडीकरकृत कवितासंग्रह संपा. वि. ल. भावे श. १८२७ इंदुप्रकाश प्रेस, मुंबई. |
| ६.अनाम कवी तंजावर - | आर्याबद्ध सुधामचेरित्र. १५ आर्यांचा उल्लेख आहे.पण १४ उपलब्ध. सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर येथील अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथ सूची. एस (S) नं. ५७; दत्तसंप्रदायमठ देणगी- वही. हस्तलिखित नोंदणी वही. मूळ हस्तलिखित वही काळया शाईत लेखन २८ डिसेंबर १९७९ रोजी कथा नकलून घेतली आहे. |
| ७. आनंदतनय - तंजावर - | सुधाम चेरित्र. विविधवृत्तात्मक. श्लोक ४२. प्राकृत पदे २५. संस्कृत श्लोक ५ आहेत. सरस्वती महाल ग्रंथालय; तंजावर अनु. क्र. ७९. दत्तसंप्रदाय मठ देणगी. हस्तलिखित रजिस्टर. मूळ वही १०"× ८". वही पृ. क्र. १४३ ते १५२ वर ही कथा उपलब्ध आहे. |
| ८. श्रीधर - | 'सुदाम चरित्र' - ओवीबद्ध. श्रीक्षेत्रपंढरपूर. नाझरेकर मठ. कुंभारघाट हस्तलिखित वही. त्यात श्रीधराची समग्र स्फुट कविता संकलित आहे. वही १२" × ८". श्रीधराचे ७ व्या पिढीतील विद्यमान वंशज श्री तुकाराम-शास्त्री यांनी ही संहिता-वही दिली. नवसदंर्भ : 'श्रीधराची स्फुट आख्यान काव्ये' - संपा. डॉ. सौ. अनुराधा कुलकर्णी. प्रकाशिका - सौ. कालिंदी वि. सांगलीकर. अंबाकृपा १०६ मंगेशकर नगर, कोल्हापूर - १२, किंमत |

२० रु. पृ. ३९ ते ४४.

९. अमृतराय - कथा १ महाराष्ट्र कवी अमृतरायकृत 'कवितासंग्रह'. संपा. वामनदाजी ओक. १८९६. किं. १/- रु. निर्णयसागर छापखाना. मुंबई. काव्यसंग्रह २६. पृ. क्र. २९ ते ३६ वर ही कथा आली असून कटाव वृत्तात असून १७ चौक आहेत.

१०. अमृतराय - कथा २ - ग्रंथसंदर्भ उपरोक्त. पृ. क्र. ६३ ते ६६. १८ कडवी.

११. मोरोपंत - सुदाम चरित्र - कथा १. मोरोपंताचे समग्रग्रंथ स्फुट काव्ये संपा. अ. का. प्रियोळकर मराठी संशोधन मंडळ, मुंबई १४. १९६४. प्रथमावृत्ति. मूल्य ६० रु. पृ. २०३ ते २२१.

१२. मोरोपंत - कथा २. ग्रंथसंदर्भ - उपरोक्त. पृ. २२२ ते २२९. 'पृथुकोपाख्यान' नावाने ८८ 'साकी' वृत्तात ही कथा आहे.

१३) प्रभाकर - 'प्रभाकर वृत्त कविता' पदे, लावण्या व पोवाडे. प्रका. शं. न. जोशी. चित्रशाळा १०२६ सदाशिव पेठ पुणे. सन १९२०. किं. १/- रु. पृ. २६ ते ३० वर 'सुदाम चरित्र' या नावाने ५ चौकातून ही कथा आली आहे.

✿ ✿ ✿

# प्रकरण सहावे

## ध्रुवकथा

### प्रास्ताविक

**१) आध्यात्मिक सत्त्वधारा**

(अ) बालभक्त ध्रुवाची कथा ही प्रत्यक्ष वैवस्वत मनूच्या नातवाची कथा असून अढळ तप:सिद्धीचा महान आदर्श उभा करते. मूळ भागवती कथा भक्तीचा संदेश देत मध्ययुगीन काळातून प्रेरणा देत आली आहे. संतपंतानी ध्रुवकथा प्रेमाने सादर केली आहे.

पुराणकाळातील 'उत्तानपाद' नामक राजाच्या एका राजकुमाराची ही कथा केवळ राजवाड्यातील राजाराणीची कथा म्हणून समोर येत नसून, त्यामागे उभी असणारी आध्यात्मिक सत्त्वधाराही समर्थ आणि सत्त्वसंपन्न असलेली दिसते. जीवनात शाश्वत, अक्षर, अविनाशी, अढळ असे काय आहे ? त्या अढळ तत्त्वाचा शोध आणि साक्षात्कार ही सनातन धडपड असून त्या अढळपदाची प्राप्ती झाली तरच शाश्वत सुख लाभणार आहे. सर्व मायिक कल्पनांचा निरास झाला तरच ते अक्षय स्थिरपद प्राप्त होते.

(ब) संत मुक्ताबाई चांगदेवास उपदेश करताना सांगतात--

**'बोलता चालता देखता ऐकता । न ढळे सर्वथा तेचि साधी ।।**

**ऐके रे चांगया टाकी रे कल्पना । पावेल ते ठाया मुक्ताई म्हणे ।।'**

अर्थात मायिक कल्पना टाकून 'पदी बैसोनि पदवी घेइजे ।' या वचनाप्रमाणे अढळ पदप्राप्तीसाठी बालभक्त ध्रुवाने 'ॐ नमो भगवते वासुदेवाय ।' या द्वादशाक्षरी गुरूपदिष्ट मंत्राचा अखंड जप केला. ही सहजसमाधीची परम अवस्था असून, या अवस्थेत मानसीची स्थिरता ढळत नाही. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात की, -

**'देह तरी वरचिलियेकडे । आपुलिया परी हिंडे ।**
**परी बैसका न मोडे । मानसीची ।।'**
**'तूं मानसा नियम करी । निश्चळ होय अंतरी ।**
**मग कर्मेंद्रिये व्यापारी । वर्ततु सुखे ।।'**

एकनाथ महाराज भागवतातही हेच सांगतात की,

**'गृहाश्रमु न सांडिता । कर्म रेखा नोलांडिता ।**
**निज व्यापारी वर्तता । बोधु सर्वथा न मैळे ।।'**

(क) अर्थात अढळ नामधारणेतून 'अढळ वस्तूचे दर्शन' घडणे हीच अढळपद प्राप्ती होय. अशी अढळता प्राप्त होताच ध्रुव परत येतो आणि पुढे ३६ हजार वर्षे राज्यकारभारात; कर्मेंद्रिय व्यापारात सुखेनैव वर्तूनदेखील शेवटी अढळपदीच विराजमान होतो. या घटनेतील आध्यात्मिक तत्त्वसूत्र इथे उघड होण्यासारखे आहे. या दृष्टीने

सप्तर्षीमंडळातील ध्रुवाचे अढळस्थान हे नित्यदर्शनात येणारे प्रत्यक्ष प्रमाण असून, लौकक व्यवहारातदेखील लग्नानंतर पतिपत्नींना ध्रुवताऱ्याचे दर्शन घडविण्याचा विधी अढळ प्रेमाचेच तत्त्वसूत्र दाखवून देतो. आणखी एक गोष्ट म्हणजे ध्रुव ताऱ्याचे दर्शन घडले तर मृत्यु ६ महिने तरी येत नाही असे समजतात. याचा अर्थ अढळ, ध्येयतारा समोर असताना मृत्यूला अवकाश कोठून असणार ! ध्रुव तारा न दिसणे याचा अर्थ ध्येयशून्यता आणि अशा जीवनाचे असणे हे नसल्यातच जमा होणे आहे. अशा रीतीने ऐहिक आणि पारलौकिक जीवनसत्त्वधारा दिग्दर्शित करणारी ही ध्रुव कथा भारतीय जीवनात अढळस्थान प्राप्त करून राहिली आहे.

(ड) ध्रुवाच्या दोन मातांची नावेदेखील अन्वर्थक आणि तत्त्वसूचक अशीच आहेत. (१) सख्खी आई - 'सुनीती.' (२) सावत्र आई - 'सुरूची'. अर्थात इंद्रियविषयांचा ओढा असणारी रूची ही नेहमीच आवडती असून 'सुरूची' ही राजाची आवडती राणी आहे, हे मोठे सूचक आहे. त्या तुलनेत नीती-सुनीती ही सहजच अप्रिय ठरते. आणि इथे 'सुनीती' ही नावडती राणी आहे. मात्र अढळ भक्तिवान ध्रुवाची प्राप्ती ही सुनीतीच्या पोटीच प्राप्त होऊ शकते. ध्रुव हा सुनीतीचा पुत्र आहे हा इत्यर्थ विलक्षण सूचक व लक्षणीय असाच आहे.

सारांश इह-पर अढळ कल्याणाचा संदेश जागविणारी ही ध्रुव कथा संत-पंत-तंत काळातून अढळपणे संस्कार घडवीत आली आहे.

## २) निर्वाचित कथासंच

| | | |
|---|---|---|
| १. मूळभागवत | - संस्कृत. 'ध्रुवोपाख्यान' | - श्लोकबद्ध रचना. |
| २. नामदेव | - 'ध्रुवचरित्र' | - अभंगात्मक रचना. |
| ३. एकनाथ | - 'ध्रुवाख्यान' | - अभंगात्मक रचना. |
| ४. वामनपंडित शिष्य | - 'ध्रुवचरित्र' | - विविधवृतात्मक रचना. |
| ५. श्रीधर | - 'ध्रुवाख्यान' | - विविधवृत्तात्मक रचना. |
| ६. अमृतराय | - 'ध्रुवचरित्र' | - कटिबंधात्मक रचना. |
| ७. उद्धव चिदघन | - 'ध्रुवाख्यान' | - वृत्तबद्ध रचना. |
| ८. नरहरि तनय | - 'ध्रुवचरित्र' | - कटिबंधात्मक रचना. |

## ३) कथानक विचार

### १) मूळभागवती कथा

(अ) ध्रुवाख्यानाची मूळ भागवती कथा भागवत पुराणातील स्कंध ४ मध्ये अध्याय ८ ते १२ मध्ये सविस्तर आली आहे. एकूण श्लोकसंख्या २६६ आहे. चौदा मन्वंतरापैकी पहिल्याच 'स्वायंभुव' मन्वंतरातील मनुवंशाची कथा सांगताना स्वायंभुव मनूला 'प्रियव्रत' व 'उत्तानपाद' नावाचे दोन पुत्र असतात. पैकी प्रियव्रताची हकीकत, (तो ज्येष्ठपुत्र असूनही ) उत्तानपाद राजानंतर सांगितली आहे, याचे कारण उत्तानपाद राजास 'ध्रुव' हा भक्तिवैराग्य संपन्न पुत्र असून, त्याचे चरित्रही भक्तिवैराग्य उत्पन्न करून भगवद्

उपासनेस तात्काळ प्रवृत्त करणारे आहे. हे चरित्र अतिरमणीय आणि आश्चर्यकारक असल्याने ते अगोदर सांगितले आहे, असा खुलासा टीकाकार करतात. यात ध्रुव कथेचे श्रेष्ठ प्रयोजन स्पष्ट होते.

(ब) उत्तानपाद राजास 'सुनीती' व 'सुरुची' नामक दोन स्त्रिया असून, त्यांना अनुक्रमे 'ध्रुव' आणि 'उत्तमकुमार' नामक पुत्र होते. सुरुची ही राजाची आवडती पत्नी तर सुनीती नावडती होती. त्यामुळे सुरुची सवती-मत्सर करीत असे. एकदा ध्रुव राजाच्या मांडीवर बसण्यासाठी आला असता, सुरुची त्याचा अपमान करते. लागटपणे ती म्हणते -

**'तपसाऽराध्य पुरुषं तस्यैवानुग्रहेण मे ।**
**गर्भे त्वं साधयात्मानं यदिच्छसि नृपासनम् ।। ४-८-१२ ।।'**

अर्थात तेथे बसण्यासाठी तप करून तुला माझ्या पोटी जन्मावे लागेल, असे शब्द ऐकून रडत रडत तो मातेकडे येतो. मातेच्या शांत उपदेशाप्रमाणे मोठ्या निश्चयाने तो तपश्चर्येस निघतो. वाटेत त्यास देवर्षी नारदमुनींचा कृपानुग्रह लाभतो. ते त्यास यमुना तटीच्या मधुवनात जाण्यास सांगतात. भागवतकार लिहितात -

**'तत्तात गच्छ भद्रं ते यमुनायास्तटं शुचि ।**
**पुण्यं मधुवनं यत्र सान्निध्यं नित्यदा हरेः ।।४-८-४२।।'**

सदगुरु नारदमुनींनी दिलेल्या 'ॐ नमो भगवते वासुदेवाय ।' या गुरूमंत्राचा जप करीत ध्रुवाची तपश्चर्या सुरू होते.

(क) तपश्चर्येत प्रारंभी दर तीन दिवस उपोषण करून चौथ्या दिवशी कवठे, बोरे अशी फळे खाऊन पारणे करावे. असा त्याने एक महिना घालविला. दुसऱ्या महिन्यात दर सहाव्या दिवशी पाने-दूर्वा भक्षण केल्या. तिसऱ्या महिन्यात, दर नवव्या दिवशी फक्त जलपानच केले. पुढे तर तो केवळ वायू भक्षण करून, एका पायावर उभा राहून तप करू लागतो. व्याघ्रसिंहादिश्वापदे त्यास भेडसावू लागतात. पण ध्रुवाची अढळ तपश्चर्या सुरूच असते. ते पाहून भगवान प्रसन्न होतात. ध्रुवास आनंद होतो. भगवंतानी आपल्या हातातील वेदमय शंखाने त्याच्या गालास (कपोलास) स्पर्श करताच त्यास आत्मतत्त्वाचे पूर्ण ज्ञान होते. बालध्रुव भगवंताचे स्तवन करतो. ध्रुवकृत हे स्तवन म्हणजे भक्तीचे स्तोत्रच बनले आहे. पुढे त्यास मन्वंतरापेक्षाही चिरकाल टिकणारे अढळ पद प्राप्त होते.

तपश्चर्येनंतर ध्रुव परत येतो. त्याचे भव्य स्वागत होते. पुढे ३६ हजार वर्षे सकळ पृथ्वीचे राज्य उपभोगून तो अढळ ध्रुवपदी विराजमान होतो.

### ४) प्रयोजन विचार

**१. मूळ भागवती कथा-प्रयोजन ।। 'त्रिःश्रुत्वैतत्पुमान पुण्यं विधुनोत्यात्मनो मलम् ।।'**

राजा परीक्षितीपुढे शुकमहामुनी भागवत पुराण सांगत असून, ध्रुवाच्या अढळ अशा भक्तिभजनभाग्याचा सोहळा मांडून वैराग्य आणि भक्तीस तात्काळ प्रवृत्त करणारी कथा

असे प्रयोजन त्यांनी स्पष्ट केले आहे. मानवाने हे पुण्यकारक आख्यान तीन वेळा ऐकले असता श्रवण करणाऱ्या श्रोत्यांच्या मनातील पापवासना नष्ट होते. भागवतकार लिहितात –

**'त्रिःश्रुत्वैतत्पुमान पुण्यं विधुनोत्यात्मनो मलम् ।।४।८।५।।'**

या खेरीज प्रातःकाळी व सायंकाळी या कथेचे संकीर्तन केले असता धनप्राप्ती, यशवृद्धी, आयुर्वृद्धि, स्वर्गप्राप्ती व शेवटी मोक्षप्राप्ती होते असे प्रयोजन स्पष्ट केले आहे. (४.१२.४४-४८)

**२) नामदेव-प्रयोजन**

नामदेवांनी मूळ भागवताप्रमाणेच कथाश्रवणाचे प्रयोजन मांडले आहे. ते सांगतात –

**'ऐंसे झाले पूर्ण ध्रुवाचे आख्यान । ऐकती जर जन एका भावे ।।१।।**
**तयावरी कृपा देवाची होईल । केले ते लाभेल सर्व कामा ।।२।।**
**पुत्राभिष्ट पुत्र धनाभिष्ट धन । जैंसे ज्याचे मन तैंसे होय ।।३।।**
**नामा म्हणे तया कल्याण सर्वदा । चिंतिता गोविंदा काम पुरे ।।४।।'**

**३) एकनाथ-प्रयोजन**

एकनाथांनी नामदेवाप्रमाणे फलप्राप्तीचा पृथकशः निर्देश केला नसून, नामस्मरण भक्तीचे प्रयोजनच त्यांनी मांडले आहे. 'धावे सर्वेश्वर नामासाठी ।' असे सांगून 'आपुलेचि नाम आपण वाढवी । भक्तपण मिरवी आपणची ।।' अशा शब्दात भगवंताचे लीलाकौतुकच त्यांनी मांडले आहे.

**४) वामन पंडित शिष्य-प्रयोजन**

वामन पंडित शिष्याने कथेच्या प्रारंभीच महापापांचा नाश करणारी व मोक्ष प्राप्त करून देणारी कथा असे प्रयोजन मुळाप्रमाणेच सांगितले आहे. तो लिहितो –

**'महापापे नासी श्रवण करिता हो चरित हे ।।'**
**'दिसा सातामध्ये करित निज मोक्षासि सरिता ।।५।।'**

**५) श्रीधर-प्रयोजन – नामसंकीर्तन सेवा**

श्रीधराने नामसंकीर्तन सेवा हे प्रयोजन मांडले असून प्रत्यक्ष श्रीविष्णूंनी ध्रुवास 'वर माग', 'बोले हरी काय तुझी अपेक्षा ।।' असे विचारताच –

**'शिशु म्हणे दे तव दाश्य दीक्षा ।।'**
**'सदा सुखी कीर्तन नाम सेवा ।।'**

अर्थात पंढरीक्षेत्रातील श्रीधरांनी वरील शब्दात प्रयोजन सांगावे हे स्वाभाविकच होय.

**६) अमृतराय-प्रयोजन**

अमृतरायांनी वक्ता-श्रोता हा ध्रुवाप्रमाणे स्थिर होतो, जीवनाला स्थैर्य प्राप्त होते

असा लौकिक प्रयोजनविचार मांडला आहे. ते लिहितात -

**'हे ध्रुवचरित्र उदार । श्रवणपठण जो करी निरंतर ।**

**तो ध्रुवासमान होय नर । ऐंसे श्रीहरी बोले ।। ओवी १ ।।**

**७) उद्धवचिद्‌घन-प्रयोजन**

अमृतरायाप्रमाणेच ध्रुवपदी अक्षयवास घडेल असे उद्धवचिद्‌घन सांगतात.

**'ध्रुवाख्यान ऐकती गाती वाचे ।**

**ध्रुवलोकी अक्षयी वास त्यांचे ।।२९।।'**

**८) नरहरी तनय-प्रयोजन**

श्रीधराप्रमाणेच यानेही प्रयोजन मांडले असून तो लिहितो -

**'स्वामी तवपद भजनावीण मज नसे अपेक्षा ।।५।।'**

**'ऐंसी भगवत्कथा जे कथिती । ऐकति त्या ते संतति, संपत्ती, । देऊनि तारी संतत,**

**नरहरितनयत्राता गोविंदचरणी स्मरता ये शाश्वत निजपद होता । मग कैंची संसृति चिंता ।।५।।'**

**५) कथा-बांधणी,स्वरूप विचार**

**१) मूळ भागवती कथा ।। श्लोकबद्ध वंशानुचरित ।।**

मूळ संस्कृत भागवत पुराणात ध्रुव कथा ही चतुर्थ स्कंधात ८ ते १२ अशा ५ अध्यायात २६६ श्लोकातून, दीर्घकथेच्या परिवेशातून प्रकटली आहे. परीक्षितीसारख्या मुमुक्षू राजापुढे श्रीशुकाचार्य ही कथा सांगत असल्याने,भक्तिज्ञान वैराग्य आणि अंती मोक्ष असे प्रयोजन पुढे ठेवूनच कथाबांधणी झाली आहे. 'वंशोमन्वंतराणिच ।' असा पुराण काव्याचा हा घाट आहे. त्यात चार टप्पे दिसून येतात -

(अ) उत्तानपाद राजाचा कौटुंबिक परिचय.त्याच्या दोन राण्या व दोन पुत्र,राण्यांचा सवती मत्सर. ध्रुवाचा अपमान, इ.

(ब) ध्रुवाचा ध्रुवनिश्चय - घोर तपाचरण,भगवत्प्राप्ती इ.

(क) ध्रुवकृत भगवंत स्तवन.

(ड) ध्रुवाचा राज्याभिषेक - उत्तरायुष्य,अढळपदी प्रतिष्ठापना इ.

इथे सवतीमत्सराच्या रूपाने खल दुष्टतेच्या रूपात 'सुरुची' आणि तिच्या आहारी गेलेला उत्तानपाद राजा एका बाजूस असून दुसरीकडे शांत निर्मत्सरी सत्वसंपन्न 'सुनीती' व तिच्याच सत्संस्कारात वाढलेला ध्रुवबाळ, ही सुष्टता असून या दोहोंच्या संघर्षात कथाबीज फुलू लागते. ध्रुवाच्या अढळ तपश्चर्येने दुष्टतेवर मात होते. दुष्ट पक्षातील सुरुचीचा पुत्र उत्तम कुमार हा शिकारीस गेल्यावेळी मृत्युमुखी पडतो. त्याच्या शोधार्थ गेलेली सुरुची रानवणव्यात सापडते आणि उत्तानपाद राजा वानप्रस्थाश्रम

स्वीकारतो. ध्रुव सिंहासनाधीश्वर होतो. शेवटी अढळपदी विराजमान होतो. या कथाबांधणीत मानवी स्वभावाच्या संभाव्य छटा विचारात घेऊन त्यातील बारकावे नेटकेपणाने शब्दबद्ध केले आहेत. मत्सरग्रस्त सुरुची व उदात्त पातळीवरील सुनीती यांचे दर्शन सूक्ष्मतेने मांडले आहे.

ध्रुवकृत स्तवन हा या कथाबांधणीतील स्वतंत्र स्तोत्रवजा भाग भक्तिसाधनेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. १० व्या अध्यायातील श्लोक ६ ते १७ मधील ध्रुवकृत 'श्रीहरी स्तवन' सगुण निर्गुण रूपाचे रहस्य स्पष्ट करणारे आहे..

प्रस्तुत कथाबांधणीत ध्रुवाच्या अढळ भक्तीप्रमाणेच त्याचा क्षत्रियोचित पराक्रम त्याची प्रजावत्सलता; राज्यशासन-कुशलता आवर्जून मांडलेली आहे. स्वतःच्या भावाचा वध यक्षाने केल्याचे समजताच क्रुद्ध झालेला ध्रुव यक्षांचा संहारच करू लागतो. १० व्या अध्यायात आपणास याचे दर्शन घडते. शेवटी, बदरिकाश्रमात ध्रुव तपाचरण करून भगवत् पदारोहण करतो इ. कथा १२ व्या अध्यायात मांडली गेली आहे. एवंच, नामस्मरण भक्ती, तपश्चर्या, मोक्षेच्छा, साक्षात्कार दर्शन इ. गोष्टी समाविष्ट केलेली इहपर कल्याणकारी अशी सुघड कथा आपणास दिसून येते.

**२. नामदेव-कथाबांधणी - ।। कालोचित काव्यरम्य प्रबोधकथा ।।**

(अ) नामदेवांनी ३३ अभंगातून संकीर्तनाच्या स्वरूपात एक नेटकी कथा उभी केली आहे. संतयुगातील नामभक्तीचे स्फुरण घेऊन, मुळातील आशयलक्षी अशी ही संक्षेपाकार कथा आहे. या कथाबांधणीवर नामदेवांच्या वत्सलवाणीचा शिडकावा असून काव्यरम्य प्रतिमांच्या पाकळया उलगडीत कथा प्रकट होते. इथे प्राचीन पुराणकथेने प्रथमच कीर्तन निरूपणाचे रूप घेतले असून, वारकरी कीर्तन संप्रदायाचे संस्कार या कथाबांधणीत प्रकर्षाने दिसून येतात. मुळातील श्लोकबद्ध बांधणी इथे अभंगातून प्रकटली आहे.

(ब) नामदेवांनी स्वकालोचित भक्तिबोधाचे असे आगळे लेणे घडविले आहे. स्त्रीच्या आहारी गेलेल्या उत्तानपाद राजाबरोबरच परस्त्रीची अभिलाषा धरणारा रावण; मत्स्यगंधेमागे जाणारा पराशर; रंभेपाठी श्वानाप्रमाणे जाणारा विश्वामित्र हे सर्व उल्लेख लोकशिक्षक नामदेवांच्या निरूपणात ओघानेच येतात. ते सांगतात -

**'बाईल आधीन होती जे का नर । ते म्हणो पामर श्वानरूपे ।।'**

त्याहीपुढे जाऊन श्वानाबरोबरच, गारुड्याचे माकड; शेंबडातील माशी अशा क्षुद्र गोष्टींच्या निर्देशातून स्त्रीअधीन झालेल्यांचा अधिक्षेप ते करतात.

सुरुचीने ध्रुवास मांडीवरून ढकलून दिल्यावरही, राजा काहीच बोलत नाही. तेव्हां तो अमावास्येच्या चंद्राप्रमाणे काळाठिक्कर दिसतो. नामदेव लिहितात. -

**'आवसेचा शशी तैसा राजा झाला । येरू हा निघाला कळावंत ।।'**

इथे बाइलवेड्या राजासमोर ध्रुवबाळ कलेने वाढणाऱ्या चंद्राप्रमाणे दिसतो. ध्रुवाचे बालवय, त्याचे कलेकलेने वाढणारे तेज इथे सूचित होते.

नामदेवांच्या कथाबांधणीत स्वकालोचित भक्तीचा ज्ञानदीप प्रखर दीप्तीने तळपताना दिसतो. गुरूभक्ती या प्रेरणेभोवती ही कथाबांधणी आकार घेताना दिसते. त्यामुळे ध्रुवाच्या गोष्टीतून नामदेव सांगतात की, -

**'भावार्थाने सर्व इंद्रिये खुंटली ।।'**

**'योगयागतपे चित्तशुद्ध होय । गुरूवीण न ये मोक्ष हाता ।।**
**नामा म्हणे गुरूकृपेचिया बळे । मूर्खही तरेल भाक माझी ।।२२८७।।'**

(क) भगवंताचे सगुणरूप वर्णन करताना हा पंढरीचा प्रेमभांडारी विटेवरील सावळे परब्रम्ह समोर पाहातच भूवैकुंठीचे रूपचित्र उभे करतो व माथा टेकतो.

**'वैकुंठपीठीचे अधिष्ठान साचे । ते रूप तयाचे दृष्टी पडे ।।'**

**'नामया पाऊली माथा ठेवी ।।'**

एवंच, मध्ययुगीन काळात पंढरीच्या ज्ञानपीठातून मधुर वाणीने स्वकालीन भावच्छटा प्रकट करीत या कथेची जडणघडण झालेली दिसते.

**३) एकनाथ-कथाबांधणी - नामभक्तीची प्रमाणकथा**

(अ) नामदेवानंतर दोनअडीचशे वर्षांनी, भीषण पारतंत्र्याच्या काळात युगधर्माची प्रेरणा जागवीत नाथांची ध्रुवकथा केवळ १३ अभंगांतून नामभक्ती अधिष्ठानावर उभी राहाते. 'नामाचा छंदु मुखी सदा ।' या पायावर नाथकथा उभी असून - 'धावे सर्वेश्वर नामासाठी ॥' हा या कथाबांधणीचा कळस आहे. प्रत्यक्ष भगवंतच आपल्या नामाचा महिमा वाढविण्यासाठी अवतार घेतो. त्या अढळ नामभक्तीचीच कथा म्हणजे ध्रुव-कथा होय. नाथ स्पष्टपणे सांगतात की, -

**'आपुलेचि नाम आपण वाढवी । भक्तपणा मिरवी आपणची ।।३४४३।।**
**स्वये अवतार आपणचि घेत । एका जनार्दनी मात ऐका त्याची ।।'**

इथे नाथांची कथाबांधणी भक्तभगवंताचे 'एकाजनार्दनी' ऐक्य घेऊनच प्रकटते.

(ब) रामराज्याचे स्वप्न पाहाणाऱ्या नाथांची ध्रुव-कथा मुळापेक्षाही अधिक राजगौरव प्रकट करते. नाथांच्या अंतरीचे धावेच या कथाबांधणीत प्रकट होताना दिसतात.

**'भूतांचा मत्सर नाही ते द्वेष । चारी धर्म निर्दोष चालताती ।।**
**प्रजेचे समाधान अपत्याचे परी । ऐंसा राज्यकरी न्यायनीती ।।'**

(क) नाथांच्या कथेत नामदेवाइतकी भावरम्य काव्यात्मकता किंवा सहजरम्य प्रतिमांची पेरणी नसली तरी 'नामाचा छंद' आणि नामासरशी तात्काळ देव धावून येतो ही सद्यःप्रचीती उत्कटेतेने मांडली आहे.

**३) वामन पंडित शिष्य-कथाबांधणी - श्लोकबद्ध कल्पक कथा**

(अ) या शिवकालीन कवीने १४६ विविध वृत्तातून ध्रुवचरित्र कथेची बांधणी केली आहे. संतकालीन संस्कार घेऊन या पंडितकवीने विदग्ध संस्कृत काव्याच्या तंत्रानुसार हे

आख्यान उभारले आहे. मूळ भागवतीकथेचा आशय त्याने कौशल्याने आपल्या संक्षेपात सामावला आहे. 'तयातील संक्षेपही लेश वाचे ॥४॥' असे तो सांगतो. तसेच 'चतुर्थस्कंधीची सुरस रचना भागवत हे ॥५॥' असा संदर्भ देऊन, 'सुरस रचना' असल्याची जाणीव तो स्पष्ट करतो.

(ब) कथेच्या प्रारंभी त्याने मांगलिक नमन मांडले आहे. नामदेव-एकनाथांच्या कथेपेक्षा वेगळा घाट घेऊन तो कथाघडणी करीत असलेला दिसतो. ध्रुव ताऱ्याच्या रूपात अद्यापही ध्रुव 'अढळपदी' दिसतो असे तो सांगतो. 'अद्यापिही दिसतसे गगनी जनासी ॥३॥'

(क) वामनशिष्याने आपल्या कथाबांधणीत पौराणिक कथेचा धागा वर्तमान जनरूढी व आचाराशी जोडून नवीनता आणली आहे. ध्रुवाचे जातक वर्तविण्याचा कथाभाग तो सांगतो. नामदेव, एकनाथ किंवा मूळ कथेतही नसलेला हा नवा कथाभाग मांडताना तो लिहितो -

**'तपाते साधोनी प्रकट हरि देखेल नयनी ।।८।।**

**'देवांहुनी अचलपद ते यासि लाभे ।**

**सामुद्रिकी सकल लक्षण युक्त शोभे ।।९।।'**

जातक शास्त्राप्रमाणेच पुढे सर्व अघटित कथाभाग घडून येतो.

(ड) ध्रुवाच्या अढळ तपश्चर्येने इंद्रपद जाण्याच्या भीतीने इंद्र भयभीत झाल्याचा एक प्रसंग पंडितांनी नव्यानेच निर्माण केला आहे. तो लिहितो -

**'शचिपति भय मानी सर्व देवा समेते ।।९१।।'**

ध्रुवाच्या तपोभंगासाठी इंद्र लगेच उर्वशीला पाचारण करतो. पण ती म्हणते -

**'तधी ते वदे लेकरुं ते सुरेशा ।**

**नव्हे कार्यसिद्धी वृथा सोडि आशा ।।९२।।'**

अर्थात ध्रुव हे लहान लेकरु असल्याचे उर्वशीने इंद्रास सांगावे यातील खोच कामुक इंद्रास खचितच झोंबली असणार. म्हणूनच मग तो स्वतःच क्रोधाने त्याचा तपोभंग करण्याचे ठरवितो. त्यासाठी तक्षकादी अजगर सोडणे; ऐरावत हत्ती सोडणे, मुसळधार पर्जन्यवृष्टी करणे इ. गोष्टी करतो. तरीही त्याची अढळता पाहून शेवटी माता सुनीतीचे स्त्रीरूप घेऊन मायेच्या पाशाने ध्रुवास तो विचलित करू पाहातो.

**'वना आला वेगे युवतिसम होऊनि सुनिती ।।९७।।'**

शेवटी मातृप्रेमाचा हा मोहपाशही विफल ठरतो. कथाबांधणीच्या दृष्टीने ही सर्व प्रसंगशृंखला विलक्षण वेधक, रंजक अशीच असून, ध्रुवाच्या संघर्षमय तपश्चर्येला अधिक ठोसपणा आणणारी ठरली आहे.

(इ) वामनशिष्याच्या या कथाबांधणीवर त्याच्या गुरूच्या म्हणजे वामन पंडिताच्या शैलीची विलक्षण छाप दिसून येते. एवढेच नव्हे तर वामन पंडिताच्या -

**'गोविंद दामोदर माधवेति ।।१०५।।**

**'हरी जो तापाते उचलुनि कृपासिंधुलहरी ।।४६।।'**

इ. ओळीदेखील गुरूप्रसाद म्हणून या सच्छिष्याने वापरलेल्या दिसतात. पंडिताची एकंदरीत कथारचना वात्सल्यरसपूर्ण असून, पंडिती कोशातून घडलेली दिसते.

**४) श्रीधर-कथाबांधणी ।। सुबोध प्रासादिक श्लोकबद्ध कथा ।।**

(अ) श्रीधराने आपल्या कथाबांधणीत, प्रारंभी सदगुरूचे मांगलिक नमन मांडले आहे. तो लिहितो -

**'हरी हरा दुर्लभ पाय ज्याचे । म्यां वंदिला तो गुरूराज साचे ।।२।।'**

नंतर श्रीधराने वैकुंठपतीचे गुणवर्णन केले आहे. तो म्हणतो -

**'वैकुंठिचा जो सुकुमार त्याचे । मी वर्णितो ते गुणमाधवाचे ।।२।।'**

(ब) श्रीधराने ४० श्लोकांतून ही कथाबांधणी केली आहे. 'कृतायुगीची' ही एका राजघराण्यातील कथा असली तरी, सवतीमत्सर, बाईलवेडेपणा राज्य सत्ता, श्रीमंतीचा लोभ इ. सनातन भावच त्यात आहेत. पण या सर्वांची तीव्र प्रतिक्रिया एका अजाण, निष्पाप, निरागस बालकाकडून आत्मक्लेश साधनेच्या रूपात घडल्याने भव्योदात्त परिणामाची तीव्रता अधिक धारदार, आदर्श आणि अक्षुण्ण बनली आहे. तसेच ही प्रतिक्रिया कडवट किंवा विषारी नसून, मधुवनातील मधुर, उत्कट, अढळ, भक्तीचे प्रात्यक्षिक दाखविणारी आहे. त्यामुळे कथेचे दैवी अधिष्ठान शुद्ध सात्त्विक बनले आहे.

(क) या कथेची बांधणी ठळक तीन टप्प्यांतून झालेली दिसते.

१. ध्रुवबाळाचा सावत्र आईकडून झालेला अपमान.

२. ध्रुवाची अढळ तपश्चर्या व त्याचा आर्त धावा.

३. भगवंताचे वरदान, ध्रुवकृत स्तवन-अढळपद प्राप्ती.

पहिल्या प्रसंगातच संघर्षाचे क्षणचित्र उभे राहाते आणि ध्रुवाच्या दृष्टीने एक क्रांतिक्षण उभा ठाकतो. सावत्र मातेने लाथ मारल्यावर कोसळणाऱ्या, रडणाऱ्या बालध्रुवाचे दर्शन पाझर फोडणारे आहे. इथून कथेची उंची वाढू लागते. अशा त्या क्षणी ध्रुवास इतर कोणापेक्षाही भगवंताचेच स्मरण होते. 'पडत तो तळीबाळक रूदना । करीत आठवीले मधुसूदना ।।९।।'

दुसऱ्या प्रसंगात ध्रुवाची खडतर साधना दिसून येत. गिरीदरी; वाघसिंह अजस्र सर्प इ. अघोरी वातावरणात 'धावे म्हणे लौकरी चक्रपाणी ।।' असा बालवाणीने तो आक्रोश करू लागतो. श्लोक १५ ते २३ पर्यंत ९ श्लोकात श्रीधराने हा ठाव घेणारा प्रसंग वर्णिला असून, त्याच्या या अनन्य निर्धाराने त्यास सदगुरू नारदमुनी भेटतात. त्यास ते 'सबीजमंत्र' देतात.

तिसऱ्या आणि अखेरच्या भागात 'सखा श्रीहरी भक्तवछास गाये ।।२५।।' अर्थात वासरासाठी धावून येणाऱ्या गायीप्रमाणे भगवंत धावून येतात. श्रीधर लिहितो -

**'जसी वासुरालागी ते गाय धावे ।**
**सखा श्रीहरी सत्वरा तेवि पावे ।।२७।।'**

श्रीधराने उपक्रमोपसंहार भक्तीच्या सूत्राने बांधला आहे.

(ड) वातावरण निर्मितीच्या दृष्टीने श्रीधराने भक्तीचे प्रभावी वातावरण निर्माण केले असून शांतरस आळविलेला दिसतो. भयानक अशा, रौद्रभीषण घोर अरण्यात -हिंडे वनी चिंतित माधवासी ।' अशी ती बाळमूर्ती पाहिली की, भयानकाचे माथी पाय रोवून शांतरस उभा ठाकलेला दिसतो. शेवटी भगवंत प्रसन्न झाल्यावर 'दे तव दास्य दीक्ष ।। सदा मुखी कीर्तन नाम शेवा ।।' असे मागणे मागतो तेव्हां शांतीचे अंतर्बाह्य स्वरूप स्पष्ट होऊन जाते. शांताद्‌भुताबरोबर करुण, वत्सल रसदेखील वेधक असेच आहेत.

(इ) श्रीधराची शैली चित्रदर्शी असली तरी कल्पनारम्य काव्यात्मकतेची चमक फारशी दिसून येत नाही. कथामांडणी सोपी सरळ असून पुराण निरुपणाची गती आहे. कथा रचना श्लोकबद्ध असली तरी वामन पंडिताचा घोटीव सफाईदारपणा इथे फारसा जाणवत नाही. श्रीधराची ती प्रकृतीच नव्हे. त्याच्या इतर ग्रंथांप्रमाणेच इथेही सुबोधता आहे.

**५) अमृतराय-कथाबांधणी ।। गद्य पद्य संमिश्र चंपू रचना ।।**

अमृतरायांनी कडाका छंदातून ध्रुवचरित्र उभे केले असून, त्यांनी एकूण १८ चौक बांधले आहेत. मधूनच त्यांनी वेधक गद्य चूर्णिका वापरली असून, पोवड्यासारख्या दृक्‌श्राव्य घाटातील ही कथाबांधणी प्रस्तुत कथासंचात एकदम उठून दिसणारी ठरली आहे. पंडिती वृत्तबद्धरचनेतून पुढे आलेली बदलती लोकाभिरुची इथे दिसून येते कडाका, चूर्णिका, श्लोक, ओव्या अशा संमिश्र रचनेतून अमृतरायांनी चंपूकाव्यच सादर केले आहे. त्या सर्वातून कथाबांधणीचे एक आगळे रूप उभे राहिले आहे.

**६) उद्धवचिद्‌घन-कथाबांधणी - ।। संवादकथा ।।**

उद्धवचिद्‌घनाने दिंडी वृत्तातून ध्रुवाख्यानाची बांधणी केली असून त्यात एकूण २९ कडवी आहेत. १ ते १३ मध्ये ध्रुव बाळ आणि माता सुनीती यांचा गोड संवाद असून 'तात कोठे तो सांग मज वेगी ।।३।।' असा त्याचा प्रश्न असून त्यातून नावडती सुनीती वेगळया महालात रहात असावीसे दिसते. पुढे १४ ते २० मध्ये ध्रुव आणि पिता उत्तानपाद राजा यांचा संवाद आला आहे. त्यापुढे २१, २२, २३ मध्ये ध्रुव-नारद संवाद आला असून पुढील ६ ओव्यांत ध्रुवाची तपश्चर्या, भगवंताचे दर्शन, अढळपदप्राप्ती इ. कथाभाग थोडक्यात मांडला गेला आहे.

एकंदरीत उद्धवचिद्‌घनाची कथाबांधणी ही नाट्यपूर्ण संवादाच्या आकृतिबंधात प्रकटली असून, त्यामुळे कथानिवेदनाचा पसरटपणा इथे फारसा आलेला नाही. म्हणजे रचना बांधणीच्या दृष्टीने 'संवादकथा' असे या कथेचे वैशिष्ट्य असून ध्रुव-सुनीती ध्रुव-उत्तानपाद, ध्रुव-नारद इत्यादींचे दिंडी वृत्तातील खटकेबाज संवाद हे या कथेचे खास आकर्षण ठरले आहे. या संवादातील नाट्यात्मकताही वेधक आहे. उदा. ध्रुव-उत्तानपाद संवादात राजा त्यास वनात न जाण्याबद्दल परोपरीने सांगत असून 'बाळा ऐक बा एक गोष्टी ।' असे विनवितो तेव्हाचे हे संवादनाट्य पाहा.-

**'नको जाऊ देईन एक गाव' । ध्रुव बोले 'देईल देवराव' ।।**

**'पांच गांव दीधले फीरे आता' । ध्रुव बोले 'मागेन जगन्नाथा' ।।१७।।**

**राय बोले 'देईन एक देश' । ध्रुव बोले 'देईल जगदीश' ।**

**'अर्ध राज्य दीधले आण तूझी' । ध्रुव बोले 'देवासि लाज माझी' ।।१८।।**

**'सर्व राज्य दीधले फीर मागे' । ध्रुव बोले 'देइजे रमा रंगे' ।**

**'स्नेह कां रे सांडिला ध्रुवा आजि । काळतोंडा जाहलो जगामाजी ।।१९।।'**

अशा रीतीने पद्यातूनच प्रकटलेल्या संवाद वाक्यांमुळे अन्य निवेदनाचा सर्व तपशील आपोआपच कमी होऊन एक नेटकी सुघड अशी संवादकथा समोर येते.

**७) नरहरितनय-कथाबांधणी ।। चौकबद्ध शाहिरी भक्तिकथा ।।**

नरहरितनयाने संतकाळातील भक्तिप्रयोजन पुढे ठेवून, पंडिती थाटात, शाहिरी घाटाची कथा उभी केली आहे. पोवाडा किंवा कटाव छंदाप्रमाणे तरल गद्याची लय पकडून पाच चौकातून ही स्फुट कथाबांधणी सिद्ध केली आहे. त्याच्या धावत्या निवेदनास अभिनयशैलीचे परिमाणही गवसलेले दिसते. त्यामुळे या कथेला दृश्यमूल्यही प्राप्त झाले आहे.

पाच चौकांत पाच प्रसंगाचे पंचप्राण भरून त्याने ही ध्रुवकथा जिवंतपणे साकार केली आहे. १) राजवाडयात ध्रुवाचा अपमान. २) माता सुनीतीचा शोक. ३) नारदांची कृपा व गुरुपदेश. ४) 'जाला ध्रुव पूर्ण ज्ञानी.' ५) सगुण निर्गुण परमात्मरूपवर्णन. अशा रूपात भक्तिनिवेदनावर लक्ष केंद्रित करून कथेची घडण झाली आहे.

## ६) ध्रुव कथा-व्यक्तिचित्रण

**१) नामदेव – ।। पंढरीचा आनंदविभोर भावभोळा भक्त ।।**

नामदेवांनी ध्रुव कथेत ध्रुवाच्या व्यक्तिचित्रणापेक्षाही भक्तिपोषक भावदर्शनावरच अधिक भर दिलेला दिसतो. त्यामुळे कामक्रोधादि, विकाररहित होऊन भक्तिविभोरतेने भगवंताच्या सगुण, निर्गुण दर्शनाने धन्य होणाऱ्या पंढरीच्या भावभोळया भक्ताच्या रूपात ध्रुवाचे व्यक्तिचित्रण इथे साकार झालेले दिसते. पांडुरंगाला घास भरविणारे नामदेवच इथे बालभक्त ध्रुवाच्या रूपाने प्रकटलेले जाणवतात.

नामदेवांचा ध्रुव 'मुलासंगे खेळत' राजवाड्यात येऊन राजाच्या मांडीवर बसतो तेव्हा कोंदणातील हिऱ्याप्रमाणे शोभून दिसतो. नामदेव लिहितात –

**'अंकी बैसविता कैसा तो शोभला । कोंदण रत्नाला जयापरी ।।'**

हा राजपुत्र ध्रुव - 'गोजिरा गोमटा शाहाणा चपळ । नेत्र ते विशाळ पुंजाळले ।।' असा देखणा आहे. 'चंद्रा ऐंसे मुख, पंकज लोचन' असलेला ध्रुव 'धैर्यासी मंडण' आहे. तो ज्ञानी आहे. नामदेव सांगतात की, 'वीर्य धैर्यभाव पायिक जयाचा । नामा म्हणे वाचा वर्णवेना ।।' त्यामुळेच त्याला पाहाता क्षणी पित्याला प्रेमाचे भरते येते. 'समुद्रा ये भरते तैसे झाले ।।'

राजवाड्यात अपमानित झालेला ध्रुव रडत निघालेला पाहून अवघ्या पौरजनांस दुःख होते. माता सुनीतीने त्यास - 'देवाहून कोण सखे आम्हा ।।' असे सांगताच त्याक्षणी भगवत्प्राप्तीचा त्याचा निश्चय स्थिर होतो. 'चित्तात निश्चय एक झाला ।।' या कृतनिश्चयानेच त्यास नारदमुनी भेटतात. तो पूर्ण शांत असून 'वासना हे सरली कल्पना निमाली' अशा शांत स्थिर अवस्थेत भगवंत प्रसन्न होतात आणि 'वरं ब्रूहि' - वर माग असे म्हणताच -

**'सरेना सरे ना कोण उठवीना । ऐंसा ठाव जाणा बोलितसे ।।२२९१।।'**

अर्थात तो अढळपद मागतो तेव्हां भगवंत 'तथास्तु' म्हणतात. 'दुजे वैकुंठपीठच' बहाल करतात. असे हे भक्तराज ध्रुवाचे दर्शन. जणू भूवैकुंठी राहाणाऱ्या नामदेवांचेच भावदर्शन ।

**२) एकनाथ-ध्रुव व्यक्तिचित्रण – नाममहिमा व गुरूगौरव दाखविणारा ध्रुव**

नाथांचा ध्रुव हा नामदेवांच्या ध्रुवाप्रमाणेच भक्तीचा आदर्श उभा करण्यासाठीच प्रकटला आहे. नाथांनी ध्रुवदर्शनातून नामभक्तीचा आदर्श उभा केला आहे. हा ध्रुव उपजत ज्ञानीअसून, पांच वर्षांचा ध्रुव सवंगड्याशी विटिदांडू खेळतांनादेखील अखंड नामजपातही मग्न असतो. नाथांची ही सहजसमाधी अवस्था असून, त्यांचेच प्रतिबिंब या ध्रुवचित्रणात सहजी जाणवते. नाथ लिहितात -

**'संवगड्यात खेळे विटिदांडू चेंडू । नामाचा छंदू मुखामाजी ।।'**

देव हा 'सबाह्य अभ्यंतरी' असल्याचा त्याचा निर्धार असून, वैष्णवांचा रावो असलेल्या नारदमुनीकडून त्यास गुरूमंत्र मिळतो. 'मंत्र द्वादशाक्षरी सांगतसे ।।३४३८।।'

नामभक्तीचा महिमा आणि गुरूगौरव दाखविण्यासाठीच नाथांचा ध्रुव प्रकटला आहे. त्यामुळे 'भक्तीचा प्रसार' करणाऱ्या नामदेवांच्या 'प्रचारक' ध्रुवापेक्षा नाथांचा ध्रुव वेगळेपणाने जाणवतो. भगवंत प्रसन्न होऊन 'म्हणे बाळा काय इच्छा पोटी आहे ?।।' असे विचारताच 'नुठवी दुजी आई । ऐंसे काही दे मजलागी ।।३४४०।।' असे मागणे तो मागतो. त्याप्रमाणे त्याची कामना पूर्ण होते. 'अढळ ते पदी स्थापियेला ।।' असे नाथ लिहितात.

**३) वामन पंडित शिष्य-ध्रुवचित्रण – रंजक पांडित्यातून वेधक चित्रण**

वामनशिष्य पंडितानी रंजकता, वेधकता आणि पांडित्यपूर्णता या सर्वातून ध्रुवाचे व्यक्तिचित्र आगळ्या पातळीवर सजीवतेने उभे केले आहे.

ध्रुव हा उत्तानपाद राजाचा ज्येष्ठ पुत्र असून, त्याला आपण राजपुत्र, युवराज आहोत याची जाणीव आहे. म्हणूनच तो पित्याच्या मांडीवर निःशंकपणे जाऊन बसतो. पण त्याच क्षणी सुरूची त्यास खाली ढकलून देऊन, त्याचा अपमान करते. इथे ध्रुवाचे हुबेहूब चित्रण करताना पंडित लिहितात -

**'गळा दाटे बाष्प नयनि जलधारा वरूषती ।**
**मुखी श्वासोच्छावासे अधर बहु कंपीत दिसती ।।२०।।'**

**'वाटे दुःख मनी वदे न वचनी पाणी भरे लोचनी ।**

**भूपाते त्यजुनी सुनीतिसदनी आला दिनी आननी ।।२२।।'**

असा दुःखित झालेला ध्रुव, मातेच्या उपदेशाने तपश्चर्येस वनात निघतो तेव्हां नगरलोक राजाचा धिक्कार करतात. ते म्हणतात - 'ध्रुवा ऐसे बाळ सगुण दुसरे आन न दिसे ।।४४।।' इथे ध्रुवाची लोकप्रियता व पौरजनांचे त्याच्यावरील अलोट प्रेमही दिसून येते.

पुढे दऱ्याखोऱ्यात 'दुर्गम घोर काननात' देखिल हरिचिंतनामुळे त्यास किंचितही भय वाटत नाही. गुरूकृपेने पूर्ण विदेहीच झाल्याने इंद्रकृत विघ्नांचेही त्यास भय वाटत नाही. पंडित सांगतात - 'समाधिसिद्धीत निमग्न झाला । देहस्थिती भाव नसे तयाला ।।१००।।' त्याहीपुढे त्याची बालतपोमूर्ती उभी करताना तो लिहितो –

**'उभी असे एक पदावरी तो । दुजा पदा जानुवरी धरी तो ।।१०१।।'**

अशा उग्र तपाचरणाने त्यांच्या अंतकरणातील ध्यानमूर्तीच सगुण रूपात पुढे प्रकट होते. 'ध्रुव हृदय निवासी तोचि प्रत्यक्ष झाला ।' त्यास अढळपदाचे वरदान लाभते. एवंच, मूळ भागवती व्यक्तिचित्राचे प्रतिबिंब इथे साकारलेले दिसते.

**४) श्रीधर-ध्रुवाचे चित्रण - सदामुखी कीर्तन नामशेवा ।।**

श्रीधराचा ध्रुव हा निरागस, निष्पाप, निष्कपटवृत्तीचा असून, तो सावत्र मातेसही वंदन करतो. 'प्रणिपात केला नृपराणियेते ।।६।।' पण तीच जेव्हा त्याचा अपमान करते तेव्हा तो पित्याकडे पाहू लागतो आणि पित्यानेही नजर फिरविताच तो कावराबावरा होतो. माता-पित्याचे पाश तुटून पडतात. श्रीहरीच्या दर्शनासाठी तो बाहेरच पडतो. नारदमुनी त्यास बीजमंत्र देतात.

**'हरी सीघ्र भेटे असे बीज तेव्हां । गुरू नारदे दीधला ब्रह्मठेवा ।।२४।।'**

गुरूप्राप्तीनंतर त्याची अनिवार प्रेमभक्ती ओसंडू लागते. त्याच्या स्तवनाने भगवंत प्रसन्न होऊन त्यास कडकडून आलिंगन देतात. वर माग म्हणताच तो सेवाभक्तीच मागतो.

'।। शिशु म्हणे दे तप दास्य दीक्षा ।।३८।।'

'।। सदा मुखी कीर्तन नाम शेवा ।।३९।।'

**५) अमृतराय-ध्रुवचित्रण ।। मराठमोळा बालध्रुव ।।**

अमृतरायांनी कडाका छंदातून एका गतिमान प्रासबद्धतेतून बालध्रुवाचे शब्दचित्र उभे केले आहे. अपमानति ध्रुवाला माता सुनीती सांगते -

**'सावध सावध हरिपदी होय विनीत । भक्ति दुर्लभ अवनीत हेचि नवनीत ।।'**

मातेच्या उपदेशाने तपासाठी वनात गेलेल्या बालध्रुवाचे दर्शन विलक्षण वेधक असे आहे. अमृतराय लिहितात -

'ऐकुनि मातेचे बोल, दिला वनाकडे डोल, पुढे दऱ्या खोल खोल, खोल खोल पर्वतांचे गोल, गोटे मोठे मोठे वाटेंमध्ये काटे; तेथे फाटे पाय, वाटे दुःख महा, जाती उपवासे झोल, बळे सांभिळितो तोल, वदन कोमाइले, अधरसहित सुकले, कपोल काकपक्षही

अलोल ।।५।।' इ. इ. इथे 'काकपक्षही अलोल' असलेला म्हणजे टाळूवर झुलपे असलेला हा बाल ध्रुव मराठमोळा वाटतो.

**६) उद्धव चिद्घन-ध्रुवचित्रण – ।। मज भक्ति सदा देई ।।**

उद्धवचिद्घनांच्या संवाद कथेतील संवादातूनच ध्रुवाचे व्यक्तिचित्र उलगडत गेले आहे. 'तात कोठे सांग मज वेगी ।।' असा मातेजवळ आग्रह धरणारा ध्रुव पित्यापुढेच अपमानित होतो तेव्हां पित्याचा त्याग करून वनात निघतो. अशा वेळी पिता त्यास राज्यप्रलोभन दाखवितो-पण त्याचा निर्धार अढळ राहातो. पुढे भगवंताचे दर्शन होऊन वर मागताना 'मज भक्ति सदा देई । पद दीजे नुठवी दुजी आई ।।२७।।' असेच मागणे तो मागतो. शेवटी, सप्तर्षि तारामंडळ ज्यास फेरा घालतात, त्या ध्रुवाची धन्य होय असे त्यांनी म्हटले आहे.

**७) नरहरीतनय-ध्रुवचित्रण**

नरहरीतनयाने 'कटाव' छंदातून शाहिरी लयबद्धतेतून भक्तीच्या अंगाने कोमल ठरणारे असे ध्रुवाचे शब्दचित्र वेधकतेने उभे केले आहे. पंडिती निवेदनात्मक पातळीवर हे चरित्र प्रकटले असून, शब्दांच्या प्रासबद्ध मांडणीत उत्कट रसमयता मात्र अभावाने जाणवते. :कीर्तनभजनातून साभिनय चित्र उभे करणारे असे हे शब्दचित्र प्रेक्षणीय व श्रवणीय असे बनले आहे.

सारांश, वरीलप्रमाणे ध्रुव कथासंच विविध अंगाने पाहाता पुढील कांही गोष्टी लक्षवेधी ठरतात.

१) मराठी कवींनी मूळ भागवती कथा जवळ जवळ सरासरीने १/६ इतक्या संक्षेपाकारात प्रकट केली असून, नाथांची कथा ही सर्वात लहान, म्हणजे १३ अभंगांची आहे. सर्वात मोठी वामन पंडित शिष्याची १४६ श्लोकांची आहे. नामभक्तीच्या प्रयोजनासाठी ही संक्षेपाकार दृष्टांतकथा प्रकटलेली दिसतो.

दुसरी गोष्ट म्हणजे मूळ भागवती कथेतील ८ व ९ अध्यायात आलेला कथाभागच म्हणजे - अ) ध्रुवाचा अपमान, २) ध्रुवाची धोर तपश्चर्या, ३) अढळपद प्राप्ती या तीनच गोष्टी मराठी कवीनीं प्रायः विचारात घेतलेल्या दिसतात. त्यामुळे कथाभाग आपोआपच आटोपशीर बनला आहे.

२) आध्यात्मिक सत्त्वसाधनेच्या दृष्टीने व संस्कार-प्रभावाच्या दृष्टीने कृतयुगातील ही कथा कलियुगात पूरक, पोषक मूल्यांचे जागरण घडविताना दिसते. उदा. कृतायुगी घोर तपश्चर्येचा आदर्श दाखविणारी ही ध्रुवकथा नामदेवांच्या काळापर्यंत कृत, त्रेता, द्वापार अशी तीन युगे मागे टाकून प्रकटते तेव्हा भक्तीचे सूत्र पकडून, विकार विजयाचा संदेश देत असलेली दिसते.

नामदेवांच्या नंतर दोन अडीचशे वर्षांनंतर नाथांनी भक्तीसूत्रच प्रमाण मानून ध्रुवकथेतून भक्तीचा बारकावा नामस्मरणाच्या रूपाने मांडला आहे. पुढे पंडिती काळात रंजकतेच्या व पांडित्याच्या अवगुंठनातून, विदग्ध साहित्यिकता मांडलेली दिसते. त्यात

भक्तीचे सूत्र काहीसे क्षीण असून, केवळ बौद्धिक पातळीवर शब्दफुलोरा फुलविलेला दिसतो. मूळ श्लोकबद्ध कथा अभंग, विविध वृत्ते, कटावछंद, इ. विविध रूपात प्रकटली आहे.

३) रसनिर्मितीच्या दृष्टीने वामनशिष्य, उद्धव चिद्‌घन आणि श्रीधर यांच्या कथा सरस असून त्यांनी करूण, वत्सल व भक्तिरस उठावदारपणे मांडला आहे. नरहरीतनयाची कथा शुष्क वाटते. नामदेवांची कथा करूण, कोमल वात्सल्यपूर्ण आहे. नाथांनी भक्तीचाच पुरस्कार मांडला आहे.

४) इहपर कल्याणाचे प्रयोजन जागवीत, युगधर्माचे भान ठेवून, भक्तिज्ञान वैराग्याचे संस्कार घडविणारी ही ध्रुव-कथा शतकाशतकातून लोकमानसात अढळस्थान प्राप्त करून बसली आहे हे स्पष्टपणे दिसून येते.

## कथा-साधन संदर्भ

| | |
|---|---|
| १. मूळ भागवत पुराण – | संस्कृत स्कंध ४ अध्याय ८ ते १२. |
| २. नामदेवकृत 'ध्रुवचरित्र' – | एकूण ३३ अभंग. सकल संत गाथा खंड १. आवटे प्रका. आवृ. २.१९६७. अभंग क्र. २२६४ ते २२९६ (पृ. ३९१ ते ३९५) |
| ३. एकनाथ – | संदर्भ ग्रंथ उपरोक्त. खंड २. अभंग क्र. ३४४१ ते ३४४३ पृ. ३७७-७८. |
| ४. वामन पंडित शिष्य-'ध्रुवचरित्र' – | अनेक कविकृत कविता. भाग ३ रा. सांगली जिल्हानगर वाचनालय, सांगली. ८/५७ (दुर्मीळ) पृ. १३७ ते १४९. पूर्ण कथा १४६ विविधवृत्तातून आहे. |
| ५. उद्धवचिद्‌घन – | 'ध्रुवाख्यान', 'नवनीत', परशुराम बल्लाळ गोडबोले. आवृ. १८ वी.१९५७ मुंबई राज्य शिक्षण खाते, मुंबई, किं. ३ रु. पृ. २५१ ते २५४. दिण्डी वृत्तातील एकूण २९ श्लोक. |
| ६. श्रीधर - 'ध्रुवाख्यान' – | 'श्रीधराची स्फुट आख्यान काव्ये' संपा. प्रा. डॉ. सौ. अनुराधा दा. कुलकर्णी. १२.३.८५ प्रका. सौ. कालिंदी सांगलीकर. ७७२ गावभाग सांगली. मूल्य २० रु. गुरूलिंग प्रकाशन, सांगली. |
| ७. नरहरी तनय-'ध्रुवचरित्र' – | मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. महाराष्ट्र काव्यग्रंथ ९ स्फुटसंग्रह. भाग पहिला. वि. ल. भावे यांनी 'महाराष्ट्रकवी' या मासिकात छापून प्रसिद्ध केला. १८२७. संदर्भ : विलिंग्डन कॉलेज ग्रंथालय. ८५.१.४६१/ एस. पी. ४ |
| ८. अमृतराय-'ध्रुवचरित्र' – | 'महाराष्ट्रकवी अमृतरायकृत कवितासंग्रह' संपा. वामन दाजी ओक. निर्णयसागर छापखाना. १८९२. किं. १।. रु. पृ. ३ ते १४. |

✿ ✿ ✿

# प्रकरण सातवे

## शुक रंभा चरित्र कथा

### प्रास्ताविक

'शुक-रंभा' कथेचे मूळ महाभारताच्या शांतिपर्वातील अ. २३१ ते २३५ मध्ये 'व्यासशुकसंवाद' या स्वरूपात असून त्यात रंभेचा उल्लेख नाही. भागवत, हरिवंश, देवीभागवत, स्कंद, पद्म, मत्स्य, वायु, ब्रह्मांड किंवा नारदपुराणातही या कथेचा उल्लेख नाही. डॉ. वा. के. लेले यांनी 'मुक्तेश्वराची स्फुट काव्ये' या ग्रंथात पृ. ३१ वर मुक्तेश्वराची 'शुकरंभासंवाद' ही कथा काल्पनिक असून त्या कल्पनेचे श्रेय मुक्तेश्वरी प्रतिभेला आहे असे कल्पिले आहे. पण ती केवळ कल्पनाच आहे असे म्हणावे लागेल. कारण, मुक्तेश्वरापूर्वीचे विष्णुदासनामा याचे 'शुकरंभाख्यान' उपलब्ध आहे. अर्थात मुक्तेश्वरापुढे हे आख्यान असावे. डॉ. र. बा. मंचरकर यांनी शिवाजी विद्यापीठास सादर केलेल्या प्रबंधात असेच म्हटले असून, त्यात विष्णुदासनाम्याचे कथानक मराठीत कालदृष्टीने प्रथम पुढे येते असे सांगितले आहे.

प्रस्तुत कथा संचात विष्णुदासनामा व मुक्तेश्वर या दोघांच्याही कथा वास्तविक स्फुटकाव्यापेक्षाही खंडकाव्यात समाविष्ट व्हाव्यात, इतक्या दीर्घ आकाराच्या असूनही मराठीतील 'शुकरंभा' कथेचे मूळ, वाचकांच्या नजरेसमोर यावे व त्या संदर्भात इतर कथांचे आस्वादन मांडावे या हेतूने त्यांचाही इथे समावेश केला आहे. एकूण ९ कथांचा हा संच प्रस्तुत प्रकरणात समाविष्ट केला आहे.

### २) शुकरंभा कथेची सत्त्वधारा

शुकरंभा कथेतून मराठी कवींनी 'प्रवृत्ती निवृत्ती', 'भोग-त्याग', 'रती-विरक्ती' यांचा सनातन संघर्ष प्रत्यक्ष मानवी प्रतीक रूपात समूर्त करून, प्रखर वैराग्याची; विवेकी संयमाची, जितेंद्रियात्वाची महती प्रतिष्ठित केली आहे. देह हा केवळ भोगदेह नसून तो, आत्मसाक्षात्कार शांतीच्या पूर्ण समाधानासाठी साधनरूप आहे; त्या दैवी वैराग्याचा बोध या कथेतून दाखविला आहे. गीतेत भगवंतानी अर्जुनाला उपदेश करतांना स्पष्टपणे सांगितले आहे की -

**'जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ।'**

अर्थात या अवघड दुरासद कामप्रभावाने प्रत्यक्ष इंद्र, ब्रह्मा, शिवादिकांनाही पार बेजार केल्याच्या कथा पुराणातून येतात. अर्थात अशा कामप्रभावाचाही पराभव दाखवून शुकमुनींच्या महावैराग्याचा प्रचंड विजय दाखविण्याचे प्रयोजन स्पष्ट होते. काम मोहाच्या अनिवार तृष्णेला आवर घालण्यासाठी भोगासक्तीचे उघड रूप रंभेच्या रूपात मांडून जितेंद्रिय शुकाचार्यांच्या रूपात वैराग्याचे उदात्त दर्शन घडविले आहे. मूर्तिमंत वैराग्य म्हणजे शुकाचार्य इतके हे अभिन्न रूप आहे. म्हणूनच समर्थ रामदास स्वामींच्या वैराग्याचा गौरव मांडताना –

'शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्यांचे ।' अशा शब्दात शुकाचार्यांचेच प्रमाण दिले आहे. वैराग्याची ही सत्त्वधारा समाजजीवनात आदर्श म्हणून प्रतिष्ठित करण्याच्या दृष्टीने मराठी कवींनी मूळ महाभारतातील शुकजन्माची अद्भुतरम्यता न रंगविता, शुकरंभेचाच प्रसंग कथानकाच्या रूपाने अधिक उठावदारपणे मांडलेला आहे. प्रखर वैराग्य ही महाराष्ट्र भूमीची आदर्श सत्त्वधारा असून संत, पंत, कवींनी आपल्या आचार संपन्न वाणीतून ही सत्त्वधारा शुकरंभा कथेतून शब्दबद्ध केली आहे.

## ३) निर्वाचित कथासंच

| | | |
|---|---|---|
| १. | मूळमहाभारत | – संस्कृत शांतिपर्व अ – २३१ ते २३५ मोक्षधर्म. |
| २. | विष्णुदास नामा | – 'शुकाख्यान'-ओवीबद्ध – ४६१ ओव्या. |
| ३. | मुक्तेश्वर | – 'शुकरंभा संवाद' – ४६७ ओव्या. |
| ४. | वामन पंडित | – 'शुकरंभा संवाद'-श्लोकबद्ध – ११ श्लोक. |
| ५. | रंगनाथस्वामी निगडीकर | – 'शुकरंभासंवाद' – ओव्या ८४. |
| ६. | श्रीधर (अप्रकाशित) | – 'शुकरंभा चरित्र', विविधवृत्तात्मक – ५ श्लोक. |
| ७. | अमृतराय | – 'शुकचरित्र' कटिबंध – १६ चौक. |
| ८. | विठ्ठल केरीकर | – 'शुकरंभासंवाद' आर्याबद्ध – ४९ आर्या. |
| ९. | उद्धवचिद्घन | – 'शुकरंभासंवाद'-दिंडीवृत्त – ३२ श्लोक. |

## ४) प्रयोजन विचार

**१) विष्णुदास नामा-प्रयोजन – कथाश्रवणे ते मुक्त पदाते पावती ।।**

विष्णुदासांनी कथाश्रवणाने 'मोक्षप्राप्ती' हे प्रयोजन सांगितले आहे. गुरूकृपेने सत्रावीचे सुख भोगणे हीच मोक्ष सायुज्यता असून दुस्तर भवसागर तरून जाण्यासाठी 'लोका तरावया' ही शुकाख्यान कथा वर्णिल्याचे त्यांनी सांगितले आहे. पुढे विष्णुदास नामा सांगतात की, -

**'जे पढती नित्यनेमी । ते होवी मुक्तज्ञानी ।**
**श्रोते जे ऐकती । तया होय फलप्राप्ती ।**
**हरिहर चरित्र क्षिती । पुण्य पावन ।।४६।।'**

अर्थात विष्णुदासांनी मूळ महाभारतातील शांतिपर्वांतर्गत मांडलेल्या मोक्षधर्माचा विचारच इथे प्रयोजनाच्या रूपाने मांडला आहे.

**२) मुक्तेश्वर-प्रयोजन - ऐकती त्या निजमोक्ष**

मुक्तेश्वराने विष्णुदासनाम्याप्रमाणेच पारलौकिक प्रयोजन समोर ठेवून, आपली कथा सजवून मांडली आहे. इहलोकीच्या देहेंद्रियांच्या वासना विकारादी भोगातून मोक्षप्राप्ती होत नसून, सकळ वासना त्यागातूनच परम शांती प्राप्त होते असा वैराग्यमहिमा दाखविण्याचे प्रयोजन मुक्तेश्वरापुढे आहे. त्यामुळे वैराग्यसंपन्न शुकमुनींचा महिमा त्याने परोपरीने मांडला आहे.

दुसरीकडे श्रोत्यांचा विचार करून 'ऐकती त्या निजमोक्ष ॥' असेही श्रवणाचे प्रयोजन त्याने आवर्जून मांडले आहे.

**३) वामन पंडित-प्रयोजन – सौख्यसि नाही मिती**

वामन पंडितांनी शुकरंभा संवाद कथेतून रतीपेक्षा विरक्ती श्रेष्ठ असल्याचे सांगितले आहे. त्यांच्या दृष्टीने कथेचे हेच प्रयोजन असून त्याग-विरक्तीच्या सुखास मिती नाही असे त्यांचे सांगणे आहे. रंभेच्या तोंडून ते सांगतात की,तेथे येऊनिया सुखे पहुडणे । सौख्यासि नाही मिती ॥' पण शुकमुनींच्या दृष्टीने ही केवळ वल्गना मात्र आहे. वैराग्यातच खरे सुख आहे आणि अशा वैराग्यमूर्तीचे दर्शन घडविणे हेच पंडितांच्या कथेचे प्रयोजन आहे. ते लिहितात -

**'धरतिल हृदयी हा प्रेमसंवाद साधु ।**
**म्हणवुनि अभिधानी ग्रंथ हा हेचि साधु ॥११॥'**

**४) रंगनाथस्वामी-प्रयोजन ॥ भक्ति विरक्ती आणि प्रबोध ॥**

समर्थ रामदासी पंचायतनातील रंगनाथस्वामींनी शुकरंभा संवाद कथेचे प्रयोजन 'भक्ति, विरक्ती आणि प्रबोधन' अशा शब्दात सांगतिले आहे. शुकमुनींसारख्या संताच्या दर्शनाने पूर्वकर्म शुद्धी होते असे रंभेच्या तोंडून ते मांडतात. दुर्मीळ संतदर्शनाबद्दल ते म्हणतात – 'पूर्व कर्म शुद्ध होते तरीच देखिले चरणाते ॥
ब्रह्मज्ञानी मुनिश्रेष्ठ शुकाचार्यांच्या संदर्भात ते सांगतात -

**'भक्ती विरक्ती आणि प्रबोध । शुकाचे ठायी शुद्ध ।**
**न कळे महिमा अगाध । त्यासी बाध कवण लावी ॥८२॥'**

अर्थात भक्ति-विरक्ती बरोबरच,संतमुनींचा अगाध महिमा दाखविण्याचे प्रयोजनही इथे स्पष्ट होते.

**५) श्रीधर-प्रयोजन ॥ घरा येती दादुन दया क्षमा शांती ॥**

श्रीधरांनी कथेच्या प्रारंभीच प्रयोजन सांगितले असून,विरक्तांनी ही कथा ऐकल्याने त्यांना आत्मसुख प्राप्त होईल असे म्हटले आहे. ते लिहितात -

**'कथा ऐका ते मोक्षदायक । श्रवणे विरक्ता होय निजसुख ॥२॥'**
**'कथा ऐकावी सावधान संती । घरा येती दादून क्षमा शांती ॥'**

कथेच्या शेवटी देखील हेच प्रयोजन त्यांनी अधिक खुलाशाने मांडले आहे. ते लिहितात,

**'ब्रह्मानंद संचरला सर्व ठायि । नरनारी मिथ्याच भास पाही ॥'**

**६) अमृतराय-कथा प्रयोजन – ॥ स्त्रीमोह विरक्ती - न घडे जन्म साकडे ॥**

अमृतरायांनी ऐहिक व पारलौकिक अशा दुहेरी दृष्टीने प्रयोजन मांडले आहे. त्यात -

**'हृदयिं धरित कलिं पल्लवग्रंथी । प्रेमभरित हुक्के पंक्ती ।**
**छेदित ऐंसे जेणे, न घडे । जन्मसाकडे ॥'**

अर्थात विवेकाने जन्मसाकडे फेडण्याचे प्रयोजन ते स्पष्ट करतात. ऐहिक लाभ सांगताना ते लिहितात :

**'चरित असे शुक विराग ज्ञाने । पराग सेवन करिता करिता ।**
**पावन होतो श्रोता वक्ता । उपजेना तो, अभय हरीचे ।**
**पुष्कळ पैका प्राप्त गायका । भव्य भूषणे दिव्य बायका । .....**
**ऋद्धीसिद्धी रमानायका । इंदिरावर प्रिय होऊनिया । इंदिरेसम मंदिर सुंदर ।**
**मंदरधर हरि । ..... भवखुंटिते । सोडुनि वैकुंठी नेइल हे । सत्यवचन अमृतराय भक्तासि वदला ।।'**

**७) विठ्ठल-कथाप्रयोजन -- ।। श्रवणे चित्तात शांतिसुखे थारा ।।**

विठ्ठलाने कथेच्या प्रारंभी गुरूवंदनातून 'कामासि तोचि जिंकिल ।' असे वैराग्य-प्रयोजन मांडले आहे. तसेच या कथाश्रवणाने शांतिसुख स्थिर होईल असे तो सांगतो.

**'शुकरंभा संवाद श्रवणे चित्तात शांतिसुख थारे ।।२।।'**

या प्रयोजनाचे प्रमाण म्हणून शुककथा प्रत्यक्ष असल्याचे तो दाखवून देतो. तो म्हणतो -

**'मुनि सहज समाधिसुखी स्थिर झाला दमुनि दुष्ट मदनासी ।।४७।।'**

अर्थात इंद्रियदमन, दुष्ट मदन दमन व त्यातून शांतिसुखाचा लाभ असे प्रयोजन विठ्ठल मांडताना दिसतो.

**८) उद्धव चिद्घन-कथा प्रयोजन – ।। वनिता संग घातक ।।**

उद्धव चिद्घनाने वनिता संग घातक असून, त्यात रमणारास मूर्ख म्हणून प्रयोजन स्पष्ट केले आहे. तो सांगतो की,

**'अपवित्र हा संग सदा दारा । तिथे रमतो तो मूर्ख असे सारा ।।२८।।'**

वनितासंग घातक असल्याचे सांगण्यासाठी विधि (ब्रह्मा), पराशर, सुंदोपसुंद, रावण, गाधिसुत (विश्वामित्र) आणि इंद्र इत्यादींची उदाहरणे प्रमाण म्हणून दिली आहेत. तसेच गुरुकृपेने सर्व विघ्ने टळतात असेही तो सांगतो.

**'गुरू अभयकर जया माथां । येत अपाय टळे मागुता ।।'**

## ५) कथा बांधणी - स्वरूप विचार

### १) विष्णुदासनामा-कथाबांधणी

(अ) विष्णुदास नामा यांनी 'शुकाख्यान' नावाचे ४६१ ओव्यांचे दीर्घ काव्य लिहिले आहे. त्यात एकूण कथेचे दोन चौकात दोन विभाग केले आहेत. कथाबांधणीच्या दृष्टीने पूर्वार्धात त्यांनी शुक-जन्माची कथा सांगितली असून, उत्तरार्धात शुकमहामुनींच्या कडकडीत वैराग्याच्या दोन कथा वर्णिल्या आहेत. त्याच्या कथेत ९० + ३७१ ओव्या असे दोन विभाग असून त्याची ओवी रचना कधी ३चरणी तर कधी ४ चरणी अशी अनियमित आहे.

(ब) स्त्रीसंग नको म्हणून उपजत ज्ञानी शुक वनात निघून जातात व त्यांच्यामागे व्यास 'पुत्रा' - 'पुत्रा' अशी हाक मारीत धावत असतात. अशा विदेही वृत्तीत शुक एका गुहेत येतात. इथून पुढे खरी कथा सुरू होते.

**'तये गुंफे भीतरी । तेजो रूप अवघ्या नारी ।**

**एकीहून एक सुंदरी । परी विकल्प अंतरी येऊं न दे ।।१५८।।'**

इकडे पुत्रवियोगाने सचिंत झालेले महर्षीव्यास त्याला माघारी वळविण्यासाठी इंद्रास प्रार्थना करतात. आणि मग इंद्र शुकांच्या तपोभंगाचे उपाय रचतो असा नवा कथाभाग विष्णुदासनाम्याने वर्णिला आहे.

(क) आपल्या कथाबांधणीत त्याने पुंडलीक कथा, श्रावणाची कथा; रुक्मांगद कथा दृष्टांतादाखल मांडली असून, त्यामुळे मुख्य शुकाख्यान प्रदीर्घ बनले आहे.

विष्णुदासाने शुकांच्या अनेक पूर्वजन्मातील दुःखाचे, आधीव्याधींचे वर्णन नव्याने आणि स्वतंत्रपणे मांडले आहे. प्रस्तुत कथासंचात कोणाही कवीत हा तपशील आलेला नाही. तसेच विष्णुदासाने कथाबांधणी करताना पारंपरिक पद्धतीने मांगलिक नमनही मांडले आहे. ही धर्मकथा मांडतांना श्रीरामकृष्ण यांना वंदन करून श्रीगुरू, देवता, वाग्देवता यांना नमन करून साधुसंतानादेखील त्याने वंदन केले आहे. मग पुढे कथा प्रारंभ करून सांगतो की,

**'आता शुकदेव आख्यान । श्रीगुरू कृपेने करी कथन ।।१२।।'**

या प्रस्तावानंतर कथेची घडण सुरू होते. शेवटी - 'शुकदेवांनी जन्मा सार्थक केले ।।' अशा शब्दात कथेचा शेवट साधला आहे.

(ड) विष्णुदासाने आपल्या कथालेखनाचा तिथीवारासह निर्देश केला आहे. प्रस्तुत कथासंचात हा असा निर्देश एकमेव असाच असून, वेगळेपणाने उठून दिसणारा आहे. तो लिहितो -

**'मन्मथ संवत्सर पौष्यमासी । सोमवार अमावास्येच्या दिवशी ।**

**पूर्णता आली ग्रंथासी ।......... ।।४६१।।'**

सारांश एक सुरेख आख्यानकथा आपण श्रोत्यांपुढे मांडतो आहोत या जाणिवेने कथा प्रस्ताव - प्रयोजन - मांगलिक नमन - कथामध्य आणि परिणामकारी शेवट अशा सुघड पद्धतीने कथा उलगडत जाते. शुक आणि रंभा या दोन प्रमुख पात्राभोवती कथेची गुंफण करून रती आसक्तीपेक्षा विरक्ती-भक्तीचा ठसा प्रभावीपणे उमटविला आहे. त्याग-भोगाची ही संघर्ष कथा भडक नसून मुक्तेश्वराच्या तुलनेत खूपच संयमाने मांडली गेली आहे. विष्णुदासाच्या कथेत मुक्तेश्वराच्या मानाने संतत्वाचे वलय अधिक प्रकाशमान असलेले जाणवते.

## २) मुक्तेश्वर-कथाबांधणी

(अ) **प्रारंभ** – मुक्तेश्वराने आपल्या कथेची सुरुवात इंद्ररंभेच्या नाट्यपूर्ण संवादानेच केली आहे. दूतीप्रेषणाने प्रस्ताव मांडून शृंगार विरुद्ध वैराग्य, भोग विरुद्ध

त्याग असे एक संघर्षचित्र उभे केले आहे. कथेचा प्रारंभ शृंगार-कामिनी रंभेच्या गौरवाने तोही प्रत्यक्ष इंद्राकडून करून शृंगारसैन्याची एक आघाडी त्याने वाचकांसमोर कलात्मकतेने मांडली आहे. अशा या प्रारंभात 'भोगी इंद्र' विरुद्ध 'विरागी शुकमुनी' असा संघर्ष स्पष्ट होतो. त्यामुळे रंभा हे पात्र केवळ साधनमात्र ठरते आणि खरा संघर्ष भोगवादी स्वर्ग विरुद्ध विरागी मृत्युलोक; देवेंद्र विरुद्ध योगींद्र असाच असल्याचे भव्य रूपात दिसून येते.

कथेच्या प्रारंभी इंद्राने रंभेचा गौरव करताना 'सुरतासनाची ड़ाक' 'त्रैलोक्यवेधके', 'त्रैलोक्यक्षोभकारके' इ. विशेषणे वापरून तिचा आत्मविश्वास वाढविला आहे. 'रंभा गौरवी वज्रपाणी ।' या ओळीतून कठोर वज्रधारण करणारा देवेंद्र चारुगात्री रंभेची स्तुती करीत आहे ही गोष्ट कथेतील 'नाजुक' कामागिरी सूचित करते. इंद्रवचनानी संतुष्ट झालेली रंभा 'आज्ञा देई सुरनाथा ।' असे म्हणून नमन करते आणि आपल्या आजवरच्या अजिंक्यतेच्या दर्पात ती लगेच विचारते की, - 'कवणा विघ्न करू आता ? ।' स्वर्गी येणाऱ्या कोणा योग्याच्या मार्गात अर्गळा होऊन राहू ? नेमिष्टावर धाड घालू ? योगियांच्या मुरकुंडी पाडू ? कां त्यांच्या तपश्चर्येची पोतडी हिरावून आणू ? अशा एकापेक्षाही एक अवघड कामातदेखील आपण विजयी होऊ अशा गर्वाने, आपल्या सौंदर्याचा अभिमान बाळगून इंद्रास ती खात्रीपूर्वक आश्वासन देते.

अर्थात अशा रीतीने भोग-शृंगार सामर्थ्याचा धाक उत्पन्न करीतच कथाबीज फुलू लागते. अर्थात या शृंगाराच्या माथी पाय रोवून शांतरसाचाच विजय होणार असल्याने कथेच्या प्रारंभी शृंगाराचा हा उथळ खळखळाट मांडण्यात मुक्तेश्वराने कथाबांधणीच्या दृष्टीने मोठे औचित्य साधले आहे.

**(ब) रसनिर्मिती**

'शुक-रंभा संवाद' या आख्यानाच्या नावातूनच 'शांत' आणि 'शृंगार' या दोन प्रमुख रसांचा निर्देश स्पष्ट होतो. या दोन रसांची संघर्षात्मक झटापट रंगविताना मुक्तेश्वराने वीररसाला आवाहन केले आहे.

. **शृंगाररस** – मुक्तेश्वराने कथेच्या प्रारंभीच श्रृंगारपुतळी असलेल्या रंभेच्या व तिच्या समवेत असल्येल्या कामकटकांच्या गजबजाटातून मदोन्मत्तपणे हेलावणाऱ्या शृंगाराचा खळखळाट चित्रित केला आंहे. रंभा म्हणजे - 'कामना जाणीव' उत्पन्न करणारी; अविकारी विकार उत्पन्न करणारी शृंगारवल्ली असून तिच्या समवेत बाला, प्रौढा, मुग्धा, हस्तिनी, चित्रिणी, शंखिनी, पद्मिनी इ. प्रकारच्या स्त्रिया आहेत. या स्त्रिया म्हणजे शृंगाराच्या विविध प्रकारच्या विलोल छटाच आहेत. त्यांच्या नखशिख वर्णनातून शृंगारविभ्रमाच्या लाटा हेलावत आहेत. अशा शृंगाराला वसंतऋतुमुळे उधाण भरती आली असून या आवेगाने वनदेवता, प्राणी, पशूपक्षी इ. सर्वांचीच शृंगारचेष्टिते सुरू झाली आहेत. तशात 'एकीचे हाती चित्रीव पट । चौऱ्यांशी आसनाचे प्रगट ॥३६॥' असून त्यानुसार 'सुरतासनांची घडामोडी ।' कडोविकडीने सुरू होते. मदनसेनेच्या शृंगारसंचाराला पोषक

आणि पूरक अशी तालमृदंगांची संगीत लयकारी सुरू असून, त्या बेहोशीत हास्यविनोद गीतगायन इ. सुरू होताच वातावरण धुंद बनते.

अशा शृंगारमत्त वातावरणात 'कामुकांचे नवस पुरविणारी ।' मोहमाहेरीची देवताच असलेली रंभा स्वतः रत्नालंकारांनी नटूनथटून, सर्वत्र कामुकदृष्टीने पाहात, आपले अक्षय तारुण्य हेलकावत; मन्मथोत्सवासाठी सुमनकंदुक क्रीडा करीत प्रवेश करते. तेव्हां तर शृंगाराचा महापूर लोटतो आणि त्या महापुरात दाही दिशा बुडून जाणार असेच वाटू लागते. हे अमोघ शृंगारसामर्थ्य सांगताना मुक्तेश्वर लिहितो -

**'जिच्या कटाक्षाच्या घायीं । बहुत घायाळ झाले हृदयी ।**

**त्यातें उपाय विसरा नाही । दुःखशमनार्थ तिजविना ।।५३।।'**

तिचे अधरामृतपान म्हणजे प्रत्यक्ष रसराज (अमृत) सेवन आहे. अशी ही रंभा म्हणजे नंदनवन वाटिकेतील 'कंदर्पकर्पूरगर्भा' असून साक्षात 'शृंगारकेळीचा कंद' आहे. तिचे शुकांच्या पुण्यारण्यात आगमन होईपर्यंतचा सर्व कथाभाग हा शृंगाररसयुक्तच आहे.

मुक्तेश्वराने रंभेचे आगमन आणि तिचे संभाषण यांतून शृंगाररसाचे दर्शन विविधांगानी आणि विविध परिमाणांनी घडविले आहे. गीत, संगीत, नृत्य, अष्टभोग, आसन, शयन, नाना वस्त्रालंकार, नाना विभ्रम, नाना कामचेष्टिते आणि या सर्वांना पोषक अशी अनुरूप पार्श्वभूमी अशा सर्व आलंबन उद्दीपन भावविभावातून मुक्तेश्वराने मूर्तिमंत शृंगाररस साकार केला आहे.

अशा रीतीने मुक्तेश्वराने शृंगाराची लयलूट मांडली असली तरी शृंगाररस निर्मिती म्हणजे कामशास्त्राची स्पष्टीकरणे नव्हेत. प्रच्छन्न, मुग्ध शृंगाराचे माधुर्य उघड प्रकटपणात कधीच येऊन शकत नाही. त्यामुळेच मुक्तेश्वरी शृंगाराची लक्ष्मणरेषा भडक उत्तानतेकडे झुकलेली दिसते. त्यातून त्याचा शृंगार बीभत्स व ओंगळवाणाही वाटतो.

**शांतरस**

मुक्तेश्वराने शांतरसाच्या निर्मितीसाठी पुढीलप्रमाणे नेमके क्षण टिपले आहेत -

१. श्रीशुकमुनींच्या पुण्यारण्याचे वर्णन.

२. श्रीशुकासारख्या वैराग्यसंपन्न शांतिब्रह्माचे वेधक शब्दचित्र.

३. श्रीशुकमुनींच्या मुखाने शाश्वत शांतीचे निरूपण.

४. देहेंद्रियांचे व विषयोपभोगांचे क्षणिकत्व; नश्वरत्व व त्याचे जुगुप्साकारी वर्णन.

५. श्रीशुकांचा वैराग्यशील वज्रनिर्धार व पराभूत रंभेकडून श्रीशुकस्तवन.

वरील ५ प्रसंगातून मुक्तेश्वरांने शांतरसाची प्रतिष्ठापना केली. श्रीशुकांची अक्षोभ्यवाणी, शुभ अमृतनिर्झरणी असून, 'ऐक जननी' म्हणून त्यांनी रंभेला संबोधणे या सर्वातून कथाव्यापी शांतरसाचे भव्योदात्त दर्शन आपणास घडते. शेवटी तर चित्तशुद्ध झालेली, निष्कामबुद्धीची रंभा विरागी शुकांची स्तुती करून म्हणते की, -

**'म्हणे आश्चर्य त्रिभुवनी । एवढा अक्षोभ्य महामुनी ।**

**नानापरी मोहिता मनी । विकार नेघे तिळतुल्य ।।४५३।।'**

त्याहीपुढे श्रीशुकांना परमईश , परमहंस, विप्रेंद्रा, ऋषिवर्या, मुनिराया इ. विशेषणांनी गौरविते. शेवटी तर ती आपला उजवा हात उंचावून सांगते की, – एकवेळ मेरु पर्वत आपले ठिकाण सोडील; नक्षत्रगण भूमीवर अवतरेल; ध्रुव अध्रुव होईल; हिमगिरीला आग लागेल, स्वर्गगंगेचे पाणी आटेल; पूर्वेचा सूर्य वळेल; पण श्रीशुकांचा 'अचळ नेम' कल्पांतीदेखील चंचल होणार नाही. प्रत्यक्ष रंभेच्या या धन्योद्गारात शांतरसाची परिपूर्ण पावती मिळते. अशा रीतीने मुक्तेश्वराने शृंगाराच्या माथीं पाय रोवून शांतरसाची स्थापना केलेली दिसते.

**(क) खटकेबाज संवाद आणि नाट्यमयता**

मुक्तेश्वराची कथाबांधणी मोठी नाट्यमय असून, स्वर्गीय देवांगना रंभा आणि वैराग्यमूर्ती श्रीशुक यांच्या संभाषणातून प्रकटलेले जिवंत नाट्य त्याने चित्तवेधकतेने खुलविले आहे. दोघांच्याही बिनतोड युक्तिवादास तोड नाही. दोघांच्याही शब्दाशब्दांतून एकीकडे शृंगाररस उसळतो, तर दुसरीकडे धगधगीत वैराग्य प्रकाशित होताना दिसून येते.

**(ड) काव्यरम्य वर्णन**

मुक्तेश्वराने विदग्ध संस्कृत साहित्याच्या परिशीलनातून परिपुष्ट झालेल्या साहित्याभिरुचीप्रमाणे या स्फुट आख्यानातदेखील रम्योज्ज्वल काव्यकल्पनांचा साज चढविला आहे.

उदा. १) **'शक्र वाक्येंदुरश्मिस्पर्शे । रंभा कुमुदवदन विकासे ।**
**हस्त जोडणीयाचेनि मिसे । संकोचली करपद्मे ।।५।।'**

मुक्तेश्वराच्या या ओवीत त्याच्या प्रतिभेची चमक प्रकट झाली आहे. इंद्राची आज्ञा ऐकून रंभेने त्यास नमस्कार केला. एवढ्या क्रियेवर मुक्तेश्वरी प्रतिभेने एकाच वेळी सूर्यास्त व चंद्रोदय आणि त्यांच्या पृथक् पृथक् परिणामांचे एक सूक्ष्म निसर्गचित्र एकाच वेळी इथे उभे केले आहे. इंद्राच्या वाक्यरूपी चंद्रकिरण स्पर्शाने रंभेचे वदनरूपी कुमुद विकसित झाले असून, इथे सूर्यास्त झाला आहे हे उघड होते आणि सूर्यास्ताचा परिणाम म्हणून कमळे आपोआपच मिटतात; संकोच पावतात. त्याप्रमाणे इथेदेखील 'हस्त जोडणीयाचेनि मिसे । संकोचली कर पदमे ।।' असे सांगून कमळाप्रमाणे गुलाबी तळवे असलेले दोन्ही हात रंभेने नमस्कारासाठी जोडल्याने 'करपद्मे संकोचली' हे अत्यंत काव्यमय वास्तववर्णन आल्हाददायक ठरले आहे. दिवस आणि रात्र या अवस्थांतराचे दर्शन घडवून रंभेच्या रात्रीच्या कामाचे - 'कौमुदी कार्याचे' रूपच इथे प्रकट होताना दिसते.

**२) रंभेचे दिव्य विमान**

मुक्तेश्वराने रंभेच्या दिव्य विमानाचे एक काव्यमय क्षणचित्रच उभे केले आहे. बारा आदित्यांचे तेजही फिके पडावे अशा विमानात ती बसली असून, त्यात रत्नमाला सोडलेल्या आहेत. घंटांचा निनाद होत आहे. चामरे ढाळली जात आहेत. या दिव्य विमानापुढे

पुष्पकही फिके पडत असून, या विमानांची शिखरे, गोपुरे ध्वजंस्तंभानी युक्त आहेत. त्यावर झळकणाऱ्या पताकांच्या प्रभेपुढे विद्युल्लतादेखील लज्जित झाल्या आहेत. इ.

**३) अप्सरा दल**

इंद्राशी 'पैजा बोलोनि' निघालेल्या रंभेबरोबर सुरतासनी कुशल कला जाणत्या अशा कामिनींची दळे असून त्या अप्सरांची वर्णने मोठी काव्यरम्य अशीच आहेत. उदा. त्यांची नखे तरवारीसारखी असून; नेत्रकटाक्ष बाणसारखे आहेत. मुक्तेश्वर लिहितो -

**'रक्तरंगाची कराग्रे । तीच मिरवती खड्गाकारे ।**
**नयन कटाक्षांचेनि शरे । नेमे विंधिती नेमिया ।।२३।।'**

या स्त्रियांच्या उदरत्रिवळी कट्यारीसारख्या आहेत. फडफडणारे पदर हे ढालीप्रमाणे शोभतात. कुचाग्रे भाल्यासारखी आहेत. त्यांनी अंगी लावलेली चंदनाचो उटी वज्र कवचाप्रमाणे आहे. भाळीचे कस्तुरी टिळे टोपासारखे आहेत. इ. इथे मुक्तेश्वरी काव्यकल्पना तत्कालीन युद्धशस्त्राच्या वास्तवातील असून शृंगार वीरांचे दर्शन त्यातून तो नेमके घडवितो. रंभेला तर कामुकांचे नवस पुरविणारी 'मोह माहेराची देवी' असे म्हटले आहे.

**पुण्यारण्यातील शक्तिपीठ**

शृगांराच्या पार्श्वभूमीवर योगींद्र शुकांच्या पुण्यारण्याचे वर्णन एक 'शक्तिपीठ' म्हणून त्याने केले असून ते सर्व वर्णन उदात्त आणि पवित्र असेच आहे (श्लोक ४० ते ४२)

**सार्थ उपमा - प्रतिमांकित शब्दकळा**

मुक्तेश्वराने आपल्या कथा-घडणीत सुंदर उपमा, प्रतिमा वापरल्या असून, त्यातून वाक्यार्थास सौंदर्य प्राप्त झाले आहे. उदा.

१) रंभेला - 'सुरतासनाची डाक' म्हणून तिची धुंद बेहोशी व वेधकता तो प्रकट करतो.

२) रंभेने - 'सुरांच्या श्रेणी नागवून' - 'हरितली मनोलक्षण नाणी' ।। आणि त्या मनोनाण्याच्या संभाराने तिला जडत्व आले असे लिहून तिच्यावर कित्येकांची मने जडल्याचे तो सांगतो. त्याबरोबरच रंभेची मदालसताही तो साकार करतो

३) रंभा शुकांना म्हणते -

**'तुझ्या वाक्यसुमनापाठी । सिद्धी फळाची होय तोटी ।।११९।।'**

इथे 'फूल' आणि 'फळ' हा निसर्गक्रमही मुक्तेश्वराचे निरीक्षण दर्शवितो.

४) पृथ्वीच्या ताटातून वाण ।

रंभा श्रीशुकांना अनेक प्रलोभने दाखवीत असताना म्हणते -

**'तरी पृथ्वे ताटीचे वाण घेई । कीर्तिदीप सोज्वळ ।।१३५।।'**

इथे पृथ्वीवर कीर्तिप्रकाश पाडणारी पृथ्वीताटातून वाण देण्याची भव्य कल्पना खरोखरीच वेधक आणि अभिनव अशीच आहे.

५) श्रीशुकांनी - **'चर्चिली निष्ठेची विभूती । तेणे सर्वांग शोभले ।।'**

इथे वैराग्यनिष्ठेची विभूती ही कल्पना खचितच रमणीय आहे.

**सूक्ष्म निरीक्षण व समाजदर्शन**

मुक्तेश्वराचे समाजनिरीक्षणही सूक्ष्म असून, आपल्या काळातील प्रचलित असे लोकसंकेत, आचारविचार, रूढी इ. मधून उपमादृष्टांत योजले आहेत. त्यामुळेच त्याची कविता ही काळाची प्रातिनिधिक कविता ठरते. उदा.

१) श्री शुकांच्या पुण्यारण्याकडे निघालेल्या कामकटकांची शस्त्रास्त्रे, रणवाद्ये इ. शुद्ध मराठमोळी असून, मुक्तेश्वरकालीन दिसतात. ढाल, तलवार, भाले, कट्यारी, टोप, वज्रकवच (चिलखत) इ. तसेच रणतुरे, दुंदुभी, ताल मृदुंग (२२ ते २५) इ. वाद्ये.

२) **'भोजनेवीण आंचवणे । कीं कर्दळी न फळता खांडणे ।**
**शुष्क नदीचे पोहणे । वाळुवंटी पै जैसें ।।७९।।**
**न पेरिता जाण शेती । शिमग्यावीण शंखावती ।**
**प्रसूती समयाची आर्ती । कुमारीतें ज्यापरी ।।८०।।**

वरील दृष्टांतातून लोकजीवनातील वास्तवता दिसून येते.

३) इंद्रिये बंड करून उठतात हे सांगताना मुक्तेश्वर लिहितो -

**तुंबा बुडविला त्वरित । उसळोनि ये वरता ।।११३।।**

याखेरीज खेळ करणारा बहुरूपी, हाती हिरा पडूनही त्याचा गोफणगुंडा करणारा अविचारी, कापुरुषाचे वर्णन करताना 'तृणाचा कृत्रिम पुरुष ।' (बुजगावणे). वृथा बोलण्याबद्दल 'वृथा सांवरीचे दांग' किंवा विजयादशमीचे सोने (खोटे) (२४०, ४१) इ. नित्य परिचयाचे दृष्टांत आपणांस सहजी दिसून येतात. एवंच 'ओवी' छंदातील मुक्तेश्वरी कथेची बांधणी संत-पंत-तंत असे तीन्ही ओघ सामावून घेतलेली दिसून येते.

**३)वामन पंडित - कथाबांधणी**

वामन पंडिताची कथाबांधणी श्लोकबद्ध असून, केवळ ९ श्लोकात संक्षेपाचा दिमाख मिरवीत ही कथा नेटकेपणाने प्रकटली आहे. या कथेत एकून ११ श्लोक दिले असून, पहिले २ श्लोक संदर्भविरहित असल्याचे तळटीपेतच सांगितले आहे.

वामन पंडिताच्या कथेचा प्रारंभ रंभेच्या रतिकांक्षेने होत असून पहिल्या चार श्लोकात रंभेच्या तोंडून भोगमहिमा वर्णिला आहे. त्यात -

**'माना हे विनती, मनात न धरा संदेह, द्यावीरती ।।'** असे पालुपद आहे. त्यानंतर दोन श्लोकात शुकमुनींचे उत्तर असून '।। रंभे जाई उगीच गे लवकरी कां मांडिली वल्गना ।।' असे ध्रुपद येते. मग पुनश्च रंभेचा एक श्लोक आणि शुकांचा एक श्लोक येऊन ही संवादरूप कथा ८ श्लोकात भोग-त्यागाची रूपे स्पष्ट करते. शेवटच्या ९ व्या श्लोकात फलश्रुती येऊन ही स्फुट कथा विरामते.

श्लोकबद्ध संवादनाट्यरूप कथा, लघु आकारातही किती प्रभावी ठरू शकते याचे हे मूर्तिमंत प्रात्यक्षिक होय. वैराग्यापुढे रंभाभोगाची शरणागती दाखविताना वामन पंडित

लिहितात की - 'मी दासी म्हणवोनि दीन वदने पादांबुजी लागली ॥८॥' या रूपात प्रत्यक्ष वैराग्याच्या पायी भोगवाद लोळण घेतो. या चरमबिंदूशी कथा विरामते.

### ४) रंगनाथ निगडीकर - कथाबांधणी

रामदासी पंचायतनातील साधुपुरूष रंगनाथस्वामी निगडीकर हे संत-परंपरेचे वारस असून,'शुकरंभासंवाद' ही स्फुट कथा मांडताना प्रारंभी त्यानी १ ते ६ ओव्यात प्रास्ताविक मंगलाचरण केले आहे. त्यात गणेश, शारदा, संत,विद्वज्जन, सद्गुरु यांना वंदन करून त्यांचा कृपाशीर्वाद मिळविला आहे.

मंगलाचरणानंतर कथेच्या आरंभी इंद्रसभेत नारदांचा प्रवेश होतो. इथेच नारदाची कळ फिरते आणि इंद्र-नारद संवाद सुरू होतो. त्रैलोक्यसंचारी नारदांना इंद्र विचारतो की,

**'इंद्र पुसे मुनिवर्या । कांही सांगावे आश्चर्या ।**
**कोण करतो तपश्चर्या । अपर सूर्यासारखा ॥८॥'**

त्यावर सिद्धवनात जगदोद्धारासाठी शुकयोगींद्र तप करीत असून, तो 'दैवी संपत्तीचा गोसावी', 'साक्षात कैवल्याचा पुतळा' असल्याचे नारद सांगतात. तसेच त्याही पुढे जाऊन 'तुझिया पदासी अनर्थ । जाणे यथार्थ ओढवला ॥' अशी कळी लावून देतात. येथपर्यंत पूर्वप्रस्ताव मांडून मुख्य कथाबांधणी सुरू होते. रंगनाथ स्वामी लिहितात -

**'तेचि रसाळ कथा गहन । श्रोती होऊनि सावधान ।**
**सर्वांगाचे श्रवण । द्यावे अवधान ग्रंथासी ॥१५॥'**

एकंदरीत कथेची रचना बांधणी संत परंपरेनुसार असून भक्तिरसाळ अशी आहे.

### ५) श्रीधर - कथाबांधणी

श्रीधराने प्रारंभी जगद्गुरू व ब्रह्मानंदगुरू यांना वंदन करून ही संवाद कथा सुरू केली आहे. सिद्धवनातील शुकमुनींच्या तपाने इंद्र भयभीत होतो. तो नारदांना प्रश्न करतो की,

**'घोर तप आचरे कोण क्षिती ?॥'** त्यावर नारद उत्तरतात,

**'धरातळि दुसरा दिवाकर । व्यासपुत्र तो जाण निर्विकार ॥७॥'**

आणि त्याच क्षणी - 'करू तपासी क्षय ।' असा इंद्राच्या मनात विचार येऊन 'दिव्य तरूणीविलासिनी' रंभेला तो पाचारण करतो. इथे कथागत संघर्ष सुरू होतो.

शुकमहामुनींचे तपोतेज, रंभेसारखी दिव्य देवांगना, इंद्राची भीती-अशा मेळाव्यात 'कामबाणे भुलले थोर थोर । तसा नवहे तो शुक मुनेश्वर ॥ असे नारदमुनी फाडकन सांगून संघर्षाची जणु ठिणगीच टाकतात. त्यामुळे सरळ कथानिवेदन हीच त्याची कथा बांधणी ठरते.

श्रीधर थेट पुराणिक कवी आहे. त्यामुळे सरळ कथानिवेदन हीच त्याची कथा बांधणी. काव्यमय कल्पनांची आतषबाजी त्याच्या काव्यात इथे किंचितही दिसून येत नाही. उलट गद्यप्राय निवेदनच दिसून येते. मात्र निरूपण-चातुर्य प्रासादिक असलेले दिसते. श्रीशुकांची

तपःपूत तेजोमूर्ती साकार करताना 'धरातळि दुसरा दिवाकर ।' असे सहजी तो लिहून जातो. पण हा अपवादच. श्रीधराने गद्याची गत घेऊन प्रासादिक पद्यातून मांडलेली स्फुट कथा असे त्याच्या रचनेसंबंधी म्हणता येईल.

### ६) अमृतराय - कथाबांधणी

(अ) मध्वमुनींचे पट्टशिष्य असलेल्या अमृतरायांनी नादमधुर, गेय अशा समूहगीताच्या स्वरूपात प्रभावी अशी कथाबांधणी केलेली दिसते. 'कीर्तनसुस्वार्थ झाला अवतारचि अमृतराय जीवाचा ॥' या त्याच्या गौरव-प्रशस्तीप्रमाणेच प्रस्तुत कथादेखील 'कीर्तन सुस्वार्थ' बांधलेली दिसते. त्यांची ही शुकचरित्र कथा कटिबंधात्मक आहे. शाहिरी कवितेचे दृश्यमूल्य या मांडणीत प्रकटले आहे. संपूर्ण कथासूत्र त्यांनी पोवाड्याच्या ध्रुपदाप्रमाणे आळविले आहे. कथेचा प्रारंभ करताना – '॥ श्रीशुक योगींद्राने रंभेचा गर्व हरिला ॥' अशा शब्दात आशयसूत्र प्रकट केले आहे. मुख्य कथा सुरू होण्यापूर्वी त्यांनी १) श्रीशुकांची जन्मकथा, २) शुकव्यास संवाद मांडला आहे. प्रस्तुत कथासंचात विष्णुदासाप्रमाणे केवळ अमृतरायांच्या कथेतच हा कथाभाग अधिक सांगितला गेला आहे. त्यामुळे - 'गर्भी असता ज्ञान झाले । श्रीशुकानें जीवीं तें धरिले ॥' अशी सुरुवात करून जन्मजात ज्ञानी शुकांचे चरित्र ते मांडतात.

(ब) समाज-प्रबोधनाच्या दृष्टीने लोकशिक्षकाची भूमिका घेऊन अमृतरायांनी तिसऱ्या कटावात शिक्षणाचा पाठच मांडलेला दिसतो. हा भाग स्वतंत्रपणे नव्यानेच आला आहे. देहसंबद्ध गृह, सुत, धन, दारा इत्यादींत गुरफटलेला जीव - 'माया मोहे मामा, मामी, काका, काकी, ताई, माई, आई बाई, बहिणी, वहिनी, विहिणी, मेहुणी, इत्यादि हे कर्मकहाणी ॥३॥' यातच रमून, रुतून, रतून बसतो असे सांगितले आहे.

चौथ्या कटावबांधणीत कोणत्या पापाचे काय फळ भोगावे लागते हे सविस्तरपणे सांगितले आहे. त्यात सामाजिक-प्रबोधन स्पष्ट दिसते. 'सहा वधोनि सावध व्हावे ॥' असा इशाराही ते देतात त्यातूनच षडरिपु जिंकलेल्या वैराग्यसंपन्न शुकांची कथा पुढे येते.

(क) श्रुतिरम्य प्रासबद्ध शब्दांच्या बंदिशीतून 'मदन दृष्टवी' म्हणजे मदनालाही दृष्ट लावणारी सुष्टपुष्ट रंभा मिष्ट, मिष्टशा गोष्टी बोलत एकांती येऊन श्रीशुकांना प्रश्न करते,

**'कांता येथे न दिसे तुमची । कांति अशी कां अंकातविली ?'**

**'समर्थ तप हे किमर्थ करता ? व्यर्थ देह कां दंडुनि मरता ?'**

**'या, या मागे, मागे सरता ? ॥'**

रंभेने असे म्हणताच झुरळ झटकावा त्याप्रमाणे रंभेला तृणवत् मानून, तात्काळ श्रीशुक म्हणतात,

**'गच्छ गच्छ, तू गच्छ गच्छ, तृण पुच्छ अम्हांते ॥'**

यावर मग उभयतांचा प्रदीर्घ संवाद १४ व्या कटावापर्यंत खटकेबाजपणे चालत राहातो. त्यावर इंद्रदूती लोचट रंभा अंगलटीला येऊ बघते तेव्हा 'सर सर परती दूर हो मागे ॥' अशा स्पष्ट शब्दात तिचे निवारण केले जाते. तरीदेखील आपण सामान्य स्त्री नसून, आपले दैवी

स्वर्गीय सौंदर्य प्रकट करण्यासाठी रंभा आपल्या नखाग्रांनी उदर विदारून कर्पूर-कस्तुरीचा सुगंध प्रकट करते. त्यावर श्रीशुक 'माते रक्षी' म्हणून संबोधतात.

**'आज्ञा माते । पुत्र स्नेहे रक्षी माते । कृपा कटाक्षे लक्षी ।।'**

असे म्हणताच अचंबा वाटलेली सांबाहुनी आगळी (दुजी पार्वती) असणारी रंभा 'अंबा' शुकमुनीच्या संतसहवासाने अष्टसात्त्विक भावाने फुलारून येते. तिचे हे भावदर्शन अमृतरायांनी नव्याने व स्वतंत्रपणे मांडले आहे. इथे वैराग्य प्रभावाने निरीच्छ झालेली रंभाच भक्तिमुक्तीचे तथ्य ओळखून वैराग्याच्या गोष्टी बोलू लागते.

(ड) श्रीशुकांच्या विजयाने सुरवर सारे त्यांचा जयजयकार करू लागतात. याप्रसंगी -

**'अंबरातुनी पीतांबराचे रुमाल उडविती ।।'**

असे अमृतराय लिहितात. अर्थात रुमाल, फेटे उडवून आनंद प्रकट करण्याचे खास शाहिरी फडातील मराठमोळे वैशिष्ट्य अमृतरायांनी अत्यंत वास्तवपूर्ण रीतीने प्रकट करून, शुकरंभा कथेची बांधणी अस्सल मराठमोळी असल्याचे शिक्कामोर्तब केले आहे.

### ७) विठ्ठल कथाबांधणी

पंडिती काळातील विठ्ठल केरीकर याने गीतिवृत्तातून 'शुकरंभासंवाद' कथेची बांधणी केली आहे. कविवर्य मोरोपंताच्या सफाईने त्याने इथे गीतिवृत्त हाताळलेले दिसते. कथारंभी आराध्यदैवत 'नरहरिपादपद्मी' नमन करून 'कामासि तोचि जिंकील' या पंक्तीतून पुढील कथेचे बीज पेरले आहे. कथाश्रवणाने शांतीसुखाचे प्रयोजन सांगून, प्रस्तुत कथेत शांतरस प्रधान असल्याचे सूचित केले आहे. एकूण ४९ आर्यातून त्याने सुघड अशी कथाबांधणी साधली आहे.

कथेच्या प्रारंभी प्रास्ताविक मंगलाचरणानंतर श्रीशुकांच्या तपःसामर्थ्याने इंद्राचे आसन डळमळीत झाल्याचे सांगून इंद्राचा धीर सुटल्याचे म्हटले आहे. नारद त्यास शुकमहिमा सांगतात. चिंताग्रस्त इंद्राला एक प्रभाव युक्ती सुचते. 'स्त्रीयोगे बहु थकले ज्ञानीही तपात पावले चलना ।।' अशी खूणगाठ बांधून रंभेसारख्या देवांगनेची तो नियुक्तीदेखील करून टाकतो. एकदंरीत, पंडिती थाटाने या लघुकाय कथेचा घाट देखणा असाच बनला आहे.

### ८) उद्धव चिद्घन - कथाबांधणी

पेशवेकालीन आख्यान कवीत संतचरित्रकार आणि पदरचनाकार म्हणून गाजलेल्या उद्धवचिद्घनाने दिंडी वृत्तातून 'शुकरंभासंवाद' हे स्फुट आख्यान मांडले आहे. यांत एकूण ३२ श्लोक असून, प्रारंभी श्रोतृविनंती करून ग्रंथसिद्धीसाठी आशीर्वादही मागितला आहे. कवीने वृत्तबांधणीत ऱ्हस्वदीर्घाची बरीच ओढताण केली आहे. बाकी विशेष फारसा नाही.

## ६) व्यक्तिदर्शन

### १) मूळ भारती कथा - श्रीशुकमुनी

मूळ महाभारतात केवळ व्यास-शुक-संवादच आला असून, त्यातून शुकमुनींच्या श्रेष्ठत्वाचे आपणास दर्शन घडू शकते. अर्थात इथे रंभेचा निर्देशही नाही. प्रारंभी पिता आणि गुरू अशा उभयविध नात्यांनी व्यासमुनी शुकांना ज्ञान सांगताना दिसतात. त्यातच 'तपश्चर्या' हेच परम कल्याणाचे मुख्य साधन असल्याचे ते सांगतात.

**'तपो निःश्रेयसं जन्तोस्तस्य मूलं शमो दमः ।**

**तेन सर्वान वाप्नोति यान् कामान्मनसेच्छति** ॥ शांतिपर्व २३२-२२ ॥'

अर्थात तप हाच यज्ञ असून 'तपो यज्ञा व्दिजातयः ॥३१॥' असा तपोमहिमा असून, तप हाच शुकांचा स्थायीभाव आहे. व्यासमुखाने श्रीशुकांना सृष्टी, काल, क्रिया, वेद, कर्ता, कार्य, फल या सर्वांचे ज्ञान प्राप्त झाले आहे.

पुढील अध्यायात श्रीशुकांना महाप्रलयाचे स्वरूप सांगितले असून, २३४ व्या अध्यायात दानाचे महत्त्व सांगताना 'सत्यसंघ' 'रन्तिदेव', प्रतर्दन, देवावृध इ. राजांचे दाखले दिले आहेत 'महात्मानो गताः स्वर्गं शिष्टात्मानो जितेन्द्रियाः ॥३७॥' अशा शब्दात जितेंद्रियाचे महिमान वर्णिले आहे. कामरूपी मगरीने ग्रासले तर ज्ञाननौकादेखील उपयोगी पडत नाही म्हणून अखंड जागृत असले पाहिजे.

**'कामग्राह गृहीतस्य ज्ञानमप्यस्य न प्लवः** ॥२३५.२१॥'

अर्थात यज्ञ, दान, तप, जितेन्द्रियत्व इ. दैवी गुणसंपदेचे संस्कार दृढ झालेल्या मुनिश्रेष्ठ शुकाचार्यांचे आपणास दर्शन घडते.

### २) विष्णुदासनामा-श्रीशुकरंभा व्यक्तिदर्शन

(अ) विष्णुदासांनी आपल्या कथेत व्यास आणि त्यांची साध्वी पत्नी 'सुळजा' यांचा पुत्र शुक असल्याचे सांगितले असून, संसार मायेच्या भीतीने शुक १२ वर्षेपर्यंत मातेच्या गर्भातच लपून राहातो. तेव्हाँ भगवान श्रीकृष्ण त्यास उपदेश करून सांगतात की,

**'बाळा आता रिघे बाहेरी । माता शिणली भारी ।**

**सुखे असे संसारी । क्रीडा करी तू ।।४४।।'**

इथे भगवंत स्वतःच्या बाळक्रीडेतील आनंदही त्यास वर्णन करून सांगतात. त्यावर गर्भातूनच शुक सांगतात की,

**'मागे जन्मजन्मांतरी । कष्ट भोगिले शरीरी ।**

**ते दुःख मुरारी । काय सांगो ।।५८।।'**

त्यावर भगवान त्यास मनोरथ सिद्धीचे आश्वासन देऊन बाहेर येण्यास सांगतात.

'आता निघे बाहेरी । योगिया ॥२.६३॥' इथे योगेश्वर श्रीकृष्णांनी शुकांना 'योगिया' असे संबोधावे यात त्यांचे श्रेष्ठत्व दिसून येते. पुढे ते आश्वासन देतात की,

**'तुज उपदेशितो ज्ञान । अंनत चरणी होय लीन ।**
**पुढती जन्ममरण । तुज नाही ॥२.६५॥'**
**'आप आपणाते पाही । सोहं संन्यासी होई ।**
**अजपा मंत्र घेई । बीजाक्षरे ॥२.७१॥'**

(ब) मग देवे 'स्वयंभ कौपीन' दिल्यावर 'श्रवणद्वारी' (२.७८) शुक योगिराज बाहेर येतात आणि त्याक्षणी स्तनपानदेखील न करता, तपतीर्थासाठी निघून जातात. त्यांच्या पाठोपाठ व्यासदेखील त्यांना हाक मारीत धावत जातात. त्या वेळी चराचराशी एकरूप झालेल्या शुकाऐवजी वृक्षवेली श्वापदे 'ओ' देऊ लागतात. विष्णुदास लिहितात -

**'पुत्रा पुत्रा हे वदती । साद देती श्वापदे ॥२.१५३॥'**

(क) पुढे रानावनातून स्वेच्छा भटकत शुकाचार्य एका आश्रम-गुहेत येतात. तेथे तेजोरूप अशा दिव्यांगना असतात; पण त्याचा किंचितही प्रभाव त्यांच्या मनावर उमटत नाही. इथे त्यांचे प्रखर वैराग्य आपणास दिसून येते. 'परी विकल्प अंतरी । येऊ न दे ॥ २.१५८ ॥'

(ड) शुक घरी परत यावा म्हणून इथे व्यासच इंद्राची प्रार्थना करतात आणि व्यासांच्या विनंतीवरून मग इंद्रदूती होऊन रंभा त्या ठिकाणी येते. रंभा आपले मोहजाल पसरू पाहाते. रंभेच्या भुलभुलावणीनंतर 'तुज ऐंसी माता ।' अशा शब्दात शुक तिच्याबद्दल पूज्यभाव प्रकट करतात आणि 'तपा न ढळे शुक देव ॥ अशी सुरवरांची खात्री होते. विष्णुदास लिहितात-

**'तप सुरवरासि मानले । शुकदेव अलक्ष्य जाहले ।**
**तेजी तेज निमाले । निवडेचिना ॥२.३६३॥'**

## (ब) रंभा - व्यक्तिदर्शन

१) विष्णुदासांनी रंभेची व्यक्तिरेखाही स्वर्गीय सुरांगनेच्या रूपात मांडली असून इंद्राकडून पैजेच्या विडा घेऊन, नानापरीचा शृंगार करून ती निघते. तिचे लावण्यरूप वर्णन करताना विष्णुदास लिहितात -

**'अंग तियेचे पातळ । गौरवर्ण विशाळ भाळ ।**
**नेत्र जैंसे अंबुज दळ । चंपकवर्ण तियेचा ॥२.१७४॥'**

तिने केशरचनेत 'वीरगुंठी' बांधली असून तिची बरवी वेणी सळसळत आहे. रंभेची कटी मुष्टीत मावेल अशी बारीक आहे. तिच्या अंगी कस्तुरीची उटी असून तिने मोत्यांच्या माळा परिधान केल्या आहेत. रत्नजडित करकंकणे, नवरत्नांची आभूषणे घालून व्यंकट दृष्टीने पाहात ती निघते. तिच्या मुखी 'तांबूल तेरा गुणांचा ।' रंगला असून सुगंधी फुलांचा साज लेवून निघालेली रंभा म्हणजे साक्षात् 'महाखेचरी' होय. अशी रंभा शुकांच्या 'वनस्थळी' येते.

२) विष्णुदासांच्या कथेतील रंभा मुक्तेश्वरी रंभेपेक्षा खूपच सात्विक, शांत असून

गानविशारद आहे. शुकांनी नेत्र उघडावे म्हणून ती 'केदार' राग आळविते. त्या सुस्वर नादब्रह्माने शुकांची ध्यानमुद्रा पुरी होऊन ते नेत्र उघडतात. रंभेचा हा पहिला विजय होय. मग ती लगेच हात जोडून नमस्कार करते. मंद स्मित करून व्यंकट दृष्टीने सानुराग पाहाते. तेव्हां तिला शुकदेव 'हरिचरित्र गाइजे ।' असे एकदम सांगतात. तेव्हा ती आपले मनोगत बोलून दाखविते.

**'तप सांडी अमंगल । दोघे असो कुशल** ॥२.२२०॥'

त्यानंतर प्रापंचिक सुखाचे ती सविस्तर वर्णन करते. त्यात भोजन पदार्थांचे तिने केलेले वर्णन कीर्तनकारांच्या तोंडी हमखास येणारे असेच आहे. खाणे - पिणे - झोपणे इ. देहसंबद्ध गोष्टींचे प्रलोभन ती नानापरीने मांडते. पण शुकांचे मन विचलित होत नाही. शेवटी 'तू माझी जननी ।' असे शब्द ऐकताच लज्जित होऊन ती इंद्रकडे परत जाते आणि शुकदेवांचे वैराग्य फार श्रेष्ठ असल्याचे सांगते.

सारांश,रंभेचे हे दर्शन शांत,संयत असून ही रंभा उठवळ, बोलभांड किंवा उत्तान वाटत नाही. स्वर्गीय देवांगनेच्या तालेवारपणाने तिचे दर्शन घडते.

### ३) मुक्तेश्वर - रंभा - शुक व्यक्तिदर्शन

#### (अ) मुक्तेश्वरी रंभा

१) ऐतिह्य प्रतिभेचे वरदान लाभलेल्या मुक्तेश्वराची वाणी शृंगार अणि वीररसात रमणारी आहे. त्याने रंभा आणि शुक यांची शब्दचित्रे विलक्षण वेधकतेने चित्रित केली आहेत. रंभा ही देवांगना असून तिला स्त्रीसौंदर्याचे स्वर्गीय देणे लाभलेले आहे. सुरराज इंद्रदेखील तिलाच आपल्या कामगिरीचा हुकुमी एक्का मानतो. तिच्या अमोघ सौंदर्यासंबंधी इंद्र वाखाणतो की -

**'मदनांगनेसम सुंदरे । मदनमेखले मनोहरे ।।'**

२) पैजेचा विडा उचलून शुकांकडे निघालेल्या रंभेला शरीरसौंदर्याचाच पूर्ण अभिमान असून त्या सौंदर्यबळावर आपण - 'नेमिष्टावर धाड घालू ।' 'योगियांच्या मुरकुंडी वळू ।' 'तपश्चर्येची पोतडी हिरावुन आणू ।' असा तिला आत्मविश्वास आहे. स्वर्गात येणाऱ्यांच्या मार्गात 'अर्गळा' (अडथळा - आडणा) होऊन राहाण्याचे सामर्थ्य तिच्या सौंदर्यात आहे. म्हणूनच ती इंद्राला मोठ्या अहंकाराने आश्वासन देते की, -

**'माझ्या देहाचे वोढण । आड असता तुम्हां विघ्न ।**
**स्वप्नीही परी नाही जाण । दुश्चित मन कां करिसी ।।९।।'**

इंद्राच्या आज्ञेने शुकांचा तपोभंग करण्यासाठी युद्धपातळीवर सर्व हालचाली सुरू होतात. जणू शृंगार आणि वैराग्य यांच्यातील युद्ध-संघर्षाची नांदीच सुरू होते.

शृंगारमूर्ती रंभेचे जिवंत चित्र साकार करताना मुक्तेश्वराने काव्यरम्य कल्पनांची खैरात केली आहे. मुक्तेश्वर लिहितो -

**'कीं मोह माहेरीची देवी । कामुकांचे नवस पुरवी ।**
**अलंकार ल्याली तेणे रवी । झाकोळला अंबरी ।।४६।।'**

अशा शृंगार तेजाने झळाळणाऱ्या रंभेने कंचुकीचे बिरडे घट्ट बाधले असून, आपले तारूण्य हेलावीत मदोन्मत्तपणे ती शुकांच्या पुण्यारण्यात प्रवेश करते. मुक्तेश्वर लिहितो -

**'मन्मथोत्सवे मदोन्मत्त । अक्षय तारुण्य हेलावत ।**

**कामदृष्टी अवलोकित । चेंडू झेलीत सुमनांचे ।।४९।।'**

इक्षुदणडाचे कामकोदण्ड घेऊन अवघ्या ब्रह्माण्डाला घायाळ करणारी रंभा मोठ्या आत्मविश्वासाने शुकयोगींद्रापुढे येते. तिला आपल्या विजयाची खात्री असल्याने ती म्हणते-

**'ऐंसाही जरी जाला । तपोवैराग्ये थोरावला ।**

**तरी मी जिंकीन जया बोला । आन नाही सर्वथा ।।६७।।'**

अशी रंभा बोलण्यात मोठी चतुर असून, ती आपल्या मायावी बोलण्याने शुकांना तपापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करते. 'वय तरी नव्हे वैराग्याचे । दिसे कर्तव्य अविचाराचे ।।' असा तर्क मांडून तपश्चर्या व्यर्थ असल्याचे ती सांगते.

पण श्रीशुकांचे प्रखर वैराग्य आणि त्यांचे तपःसामर्थ्य पाहून आपला पराभव मान्य करते. प्रत्यक्ष रंभेने श्रीशुकांची थोरवी मान्य करावी यात सर्व काही आले. उजवा हात उंचावून ती शुकांच्या वैराग्याची ग्वाही देते. एका अर्थी हा प्रत्यक्ष इंद्राचाच पराभव आहे. तरीदेखील मोठ्या भक्तीने व दिलदारपणे ती सांगते–

**'परी शुकाचा नेम अचळ । कल्पांती नोहे चंचळ ।**

**हे त्रिसत्य वाक्य निर्मळ । ऐकती त्या निजमोक्ष ।।४६४।।'**

रंभेने हात उंचावून वर्णिलेला हा शुक महिमा इतर कोणत्याही शुकस्तुतीपेक्षा खचितच प्रभावी आणि महत्त्वाचा आहे.

अशा रीतीने रतीचे आणि भक्तीचे आव्हान मोठ्या तालेवारपणे तोलून धरणारी रंभेची ही दोन्ही रूपे प्राचीन मराठीत अपूर्व अशीच आहेत.

## मुक्तेश्वर - श्रीशुक व्यक्तिदर्शन

मुक्तेश्वराने योगींद्र शुकाचार्याचे व्यक्तिचित्रण अतिशय तोलामोलाने मांडले असून, त्यांचे शांत, निश्चळ आणि प्रखर वैराग्यसंपन्न चित्रण अत्यंत प्रभावीपणे केले आहे. भूलोकीचा हा महामानव चित्रित करताना मुक्तेश्वर लिहितो–

**'ब्रह्मरसे ओतिले । तैंसे तेज मुखासि आले ।**

**निश्चय कमंडली भरले । ज्ञानोदक सर्वदा ।।५७।।'**

अशी तेजःपुंज ब्रह्ममूर्ती पद्मासनी निश्चळ बसला असून, शांभवी मुद्रेतील हे दर्शन लक्षणीय आहे.

**'कृष्णोऽहमस्मि बोध सतत । तेचि कृष्णाजिन उपवीत ।**

**मेखळा गाढ दृढ व्रत । मुद्रा मिरवी शांभवी ।।६०।।'**

श्रीशुकांचे है देवी सामर्थ्य पाहून रंभेलादेखील धाक वाटतो. आश्चर्याने मनोमनी ती

कबूल करते कीं

**'अनुपम्य लीला लक्षोनि नयनी । रंभा परमाश्चर्य मानी ।**

**वये धाकटा परी हा महामुनी । तपोज्ञाने अतिवृद्ध ।।६४।।'**

इथेच रंभेचा पराभव आपणास जाणवून जातो. श्रीशुकांना हाक मारताना रंभा म्हणते कीं,

**'अहो सकळ मुनींच्या नाथा । ज्ञानवैराग्य ऐश्वर्यवंता ।।'**

श्रीशुकांची ही संबोधने त्यांचे श्रेष्ठत्व दर्शवून देतात.

आपल्या सभोवार रंभादि देवांगनांचा मेळावा पाहून 'म्हणे आजि भ्रांतीची । विपरीत कांही दिसताहे ।।' या शुकांच्या वचनातून क्षणिक भ्रांतीची जाणीव असलेल्या ज्ञानी शुकांचे विवेक-वैराग्य दिसून येते. आपल्या तपास विघ्न आणण्यासाठी आलेल्या रंभेच्या स्वर्गीय सौंदर्याचा अवमान न करता तिला आदराने गौरवून विचारतात कीं,

**'ऐंशा क्लेशरूप ठाया । तू आलीस कवण कार्या ।**

**कल्याण आहे कीं, सुरालया । सुरासहित इंद्राचे ।।८८।।'**

इथे प्रत्यक्ष देवादिकांसह इंद्राचे क्षेम श्रीशुकांनी विचारावे यातच त्यांचे मोठेपण स्पष्ट होते. आणि लगेच - 'तुवा सांडोनि स्वर्गवास । किमर्थ येथे आलीस ।।८९।।' असे विचारण्यातून रंभेच्या येण्याचे वैय्यर्थही तात्काळ स्पष्ट होते. वैराग्यरूपी चंपक वृक्षापुढे कामनाभ्रमरीची मात्रा चालणार नाही असे शुक तिला सांगतात. तरीदेखील मेघाप्रमाणे समदृष्टीचे उदार शुक तिलाही परमार्थ बोध करतात-

**'उदारपणे मेघनाथ । स्थळास्थळ न विचारीत ।**

**तैंसा रंभेप्रति परमार्थ । समदर्शी शुक वदे ।।२३५।।'**

श्रीशुकांच्या तपःसामर्थ्यापुढे 'बोलावया न वळे जिव्हा ।।' अशी रंभेची स्थिती होते आणि त्यामुळे 'तेणे निरूत्तर जाला वाद ।।' अशी निर्णायक गोष्ट घडून येते. प्रत्यक्ष रंभाच स्तुती करून म्हणते की,

**'म्हणे आश्चर्य त्रिभुवनी । एवढा अक्षोभ्य महामुनी ।**

**नाना परी मोहिता मनी । विकार ने घे तिळतुल्य ।।४६३।।**

एवढेच नव्हे तर रंभा आणखी सांगते की, - एकवेळ मेरूपर्वत आपले स्थान सोडील, नक्षत्रलोक भूमी गिळून टाकील, अढळ ध्रुव - अध्रुव होऊन ढळेल; मंदराचळ पर्वत पृथ्वी प्रदक्षिणेस निघेल, हिमगिरीच्या आगीत स्वर्गंगा आटून जाईल, पूर्वेचा सूर्य चळेल, किंवा घटात वारा कोंडला जाईल, पण –

**'परी शुकाचा नेम अचळ । कल्पांती नोहे चंचळ ।**

**हे त्रिसत्य वाक्य निर्मळ । ऐकती त्या निजमोक्ष ।।४६४।।'**

रंभेच्या या त्रिवार सत्य उद्‌घोषातून श्रीशुकांचे अंतर्बाह्य विशुद्ध व्यक्तिमत्त्व संपूर्णपणे साकार होते.

### ४) वामन पंडित - रंभा व्यक्तिदर्शन

वामन पंडितांच्या लघुत्तम संवाद - कथेत व्यक्तिचित्रणाला फारसा अवसर नसला तरी रंभेची भोगलालसा त्याने मोजक्या शब्दातून मांडली आहे. 'माना हे विनंती मनात न धरा संदेह द्यावी रती ॥' हे पालुपद तिच्या बुद्धितर्काचे सार आहे. वामन पंडिताने रूपसौंदर्याचे वर्णन मांडलेले नाही; पण ती वाक्चतुर आहे. आपल्या वाग्विलासवचनात आपलाच हेतू पटवून देताना ती म्हणते की,

**'संसाराविण या जगत्रयिन से आणीक जी सद्गती ।।'**

मात्र रंभेच्या वाग्जल्पनात उत्कट आवाहन जाणवत नाही, किंवा शुकांना भुरळ पाडू पाहाणारी तिची किमयाही दिसत नाही. केवळ शाब्दिक पातळीवर तिचे शुष्क निवेदन दिसते. त्यामुळे या व्यक्तिचित्रणात जिवंत रसरशीतपणा जाणवत नाही. कथाबीजातील नेमकेपणा मात्र तिच्या प्रेमसंवादातून वाचकांना समजून येतो.

### वामन पंडित - शुकाचार्य व्यक्तिदर्शन

वामन पंडिताचे शुकाचार्यांचे शब्दचित्रदेखील रंभेचा बुद्धिनिष्ठ तर्क, समूळ खोडून काढणारे असेच आहे. रंभेचे आकर्षण ते सहजतेने दूर सारतात. शुक म्हणतात,

'रंभे । जाई उगीच गे लवकरी, कां मांडिली वल्गना ॥'

जेव्हाँ रंभा आपले उदर विदारून, आपण विमल दिव्यांगना असल्याचे सांगते तेव्हां आपणास हे पूर्वीच ज्ञात असते तर - 'येतो तुझ्या ऊदरा ।' अशा शब्दात तिला माता म्हणून संबोधतो. तेव्हाँ मात्र रंभा दासी म्हणून शरण येते. इथे शुकांचे दर्शन उंचावलेले दिसते.

### ५) रंगनाथस्वामी निगडीकर - रंभा व्यक्तिदर्शन

रंगनाथानी रंभेचे अमोघ सौंदर्यसामर्थ्य प्रारंभी दोनच ओव्यात मांडून तिचे शब्दचित्र उभे केले आहे.

**'अति सुंदर लावण्य गुणे । दिव्य अलंकार भूषणे ।<br>सुगंध द्रव्ये वस्त्राभरणे बाळ सूर्या सदृश ।।२१।।<br>नेत्रकटाक्ष बाणे । हृदय भेदी जीवे प्राणे ।<br>पंच विषयांचे धावणे । निघे दर्शनि जियेच्या ।।२२।।'**

या वर्णनात रंभेचे प्रौढ, भारदस्त दर्शन घडते. अशी रंभा 'योगेश्वर छळावया ॥' निघते. मनोवेगाने निघालेली ही रंभा विजेप्रमाणे तळपताना दिसते. रंगनाथस्वामी लिहितात -

**'मग मनोवेगे चालली । जैंसी विद्युत्प्रभा झळकली । ।<br>विडा पैजेचा उचलोनि गेली । आज्ञापिली ते समयी ।।२४।।'**

शुकांपुढे येऊन ती आपल्या कामकला दाखवू लागते -

**'कलाकौशल्य गीत नृत्य । संगीत गायने रमवी चित्त ।<br>हास्य विनोदे रंजवीत । ........ ।।३७।।'**

इथे रंभेचे दर्शन आपणास शृंगारशास्त्रनिपुण मोहिनीच्या स्वरूपात घडते. ती 'इंदुवदनी सुलोचना ।' असून विनयसंपन्न, सुसंस्कृत आणि शालीन दिसते. त्यामुळेच ही रंभा केवळ शरीराचे उत्तान प्रदर्शन करून शुकांना जिंकण्याच्या भरीस न पडता, ती श्रीशुकांचे षोडेशोपचारे पूजन करते. इथे समोरील व्यक्तिमत्त्व पाहून तदनुरूप वागण्याचे रंभेचे अभिजात चातुर्य आणि उचित पवित्रा घेण्याची तत्परता दिसून येते. हे तिचे दर्शन विनयवतीचे वाटले तरी पुढे 'रंभा दावी काममुद्रा ।' म्हणजे ती आपले मायाजाळ पसरू लागते. पण श्रीशुकांच्या उपदेशाने तिचा आक्रस्ताळेपणा शांत होतो. इथे शृंगाराचा आवेश ओसरलेल्या सात्त्विक रंभेचे आपणास दर्शन घडते. पश्चात्तापदग्ध, शुकचरणी लागलेली रंभा संतमाहात्म्य सांगू लागते.

**'स्वामी सेवेचेनि निमित्ते । पूर्वकर्म शुद्ध होते ।**

**तरीच देखिले चरणाते । पूर्ण चित्ती निवाले ।।'**

ही रंभा परत इंद्रापुढे जाऊन 'त्यासी बाध कवण लावी ?' अशा शब्दात शुकमहिमा सांगते-

सारांश, इंद्रापुढे निघालेली व शुकांच्या पुण्यारण्यातून परत गेलेली रंभा या दोन्ही अवस्थेतील रंभेचे गत्यात्मक, परिवर्तनशील व्यक्तिदर्शन रंगनाथांनी प्रभावीपणे केले आहे., त्यात जिवंतपणा आहे. प्रस्तुत कथा-संचातील रंभेच्या इतर व्यक्तिचित्रणापेक्षाही रंगनाथस्वामींनी रेखाटलेले हे शब्दशिल्प रेखीव, मोहक, सोज्वळ आणि आकर्षक असेच आहे.

**रंगनाथ - श्रीशुक - व्यक्तिदर्शन**

रंगनाथांच्या कथेत प्रारंभी इंद्र नारदांना प्रश्न विचारतो, त्यातूनच शुकांचे माहात्म्य दिसून येते. इंद्र विचारतो की,

**'कोण करतो तपश्चर्या । अपर सूर्यासारखा ।।८।।'**

**'मृत्युलोकी तपोनिधी । कवण आहे सांगा सुधी ।।'**

त्यावर नारद सांगतात कीं, - सिद्धवनात जगदोद्धारासाठी 'शुकयोगींद्र' तपश्चर्या करीत आहेत. पुढे नारदांच्याच निवेदनातून -

'अमानित्वादि दैवी संपत्तीचा गोसावी । मुक्त मौक्तिक अनुभवी । चिदार्णवी जन्मला ॥' अशा शब्दात अंतर्बाह्य शब्दचित्र आपणासमोर येते. भयभीत झालेला इंद्र रंभेला शुकांचा तपोभंग करण्यास पाठवितो. रंभा येते तेव्हाँ ध्यानमूर्ती शुकांचे दर्शन लक्षणीय असेच आहे.

**'अखंड स्वरूपाकार दृष्टी । ब्रह्मरूप देखे सृष्टी ।**
**पाहता परमामृत वृष्टी । होय पुष्टी जीवासी ।।३४।।**
**सच्चिदानंद तनु । जैसा दिसे बाळभानु ।**
**निजतेजे शोभायमानु । मनमोहन साधका ।।३५।।**

**निर्विकार मनोवृत्ती । देही विदेही आत्मस्थिती ।**

**अभंग भंगेना कल्पांती । ऐंसी मूर्ती देखुनी ।।३६।।'**

एवंच,सुरगुरू बृहस्पती, इंद्र, नारद, रंभा या सर्वांच्याच धन्यतेस पात्र ठरलेले शुकमहामुनींचे व्यक्तिचित्रण विलक्षण उदात्त पातळीवरून इथे केलेले दिसते.

### ६) श्रीधर - शुकयोगी

श्रीधरांनी कथेच्या प्रारंभीच शुकमुनींचे परिपूर्ण दर्शन घडविले आहे. श्रीधर लिहितात -

**'सिद्धवनी असता शुकयोगी । शांति दया क्षमा पूर्ण आंगि ।**

**सदा सच्चिदानंद सुख भोगी जी । मनोजये संपुर्ण वितरागि ।।३।।'**

अर्थात कामक्रोधांच्या उर्मी ज्यांच्या ठिकाणी उठत नाहीत,असे निर्विकार महामती शुक आहेत.

'धरातळि दुसरा दिवाकर । व्यासपुत्र तो जाण निर्विकार ।।७।।' असे ते दिप्तिमान आहेत. आपल्या तपोतेजानी त्यांनी त्रिभुवन व्यापल्याचे इंद्र रंभेला सांगतो. 'तपो तेजे व्यापिले त्रिभुवन ।।९।।' रंभादेखील आपल्या परीने शुकांना मोहविण्याचा प्रयत्न करते,पण 'परी शुक विकारवंत नोहे ।।२६।।' अशा वस्तुस्थितीने हतगर्व झालेली रंभा श्रीशुकांना साष्टांग नमस्कार करते. इथे कथा संपते. 'शुक ब्रह्मानंदसुख भोगी ।।३७।।' असे शांतिसुखानंदमग्न शुकयोगींद्राचे दर्शन घडते.

श्रीधरांच्या शुकचित्रणात मुक्तेश्वरी तपशील नाही. पण श्रीधराचे शब्दचित्र दयाक्षमाशांतीचे एक उदात्त मानसचित्र उभे करते. पंढरीतील भक्तिधुंदशांती इथे जाणवते.

### श्रीधर - दिव्य तरुणी रंभा

श्रीधरांनी रंभेचे शब्दचित्र मात्र शुकांच्या मानाने अधिक विस्तृत आणि रेखीवपणे रेखाटले आहे. 'दिव्य तरुणी रंभा विलासिनी ।।' असे तिचे रूपदर्शन असून, तिला आपल्या मोहक वेधकतेचा अभिमान आहे. 'वनिता सकळासि मूळ अनर्था ।।' हा तिचा अभिप्राय आहे. विश्वामित्र, ब्रह्मा, पराशर, मोहिनीपाठी जाणारे उमाकांत, इ. उदाहरणे सांगून शृंगीऋषीना आम्हीच भुलविल्याचे ती सांगते. तेथे शुकांचा काय पाड असे ती पूर्वानुभवाने ठामपणे सांगते व त्या निश्चयानेच सिद्धवनात येते.

सिद्धवनातील मोहक रंभेचे चित्रण श्रीधरानी विलक्षण वेधक असेच मांडले आहे. वीणामृदुंगादी वाद्यतालांच्या संगीत ध्वनीसह धुंद झालेली ही प्रमदा हंसगतीने डुलत डुलत येते. तिने भांगात सिंदूर भरला असून,तिच्या दिव्यकर्णालंकारांची प्रभा पसरली आहे. तिच्या मस्तकी मोत्यांची जाळी असून,तिने 'सीसफूल' घातले आहे. श्रीधराने 'कुरळकेश गुंफुनि गंगावनी ।' असाही सूक्ष्म निर्देश केला आहे. रत्नजडित मुदी, बुगड्या, बिंदी, बिजवर, कंठभूषणे, बाजुबंद, कमरपट्टा, कनककंकणे, पायी नेपुरे इ. अलंकार तिने धारण केले असून,ती दिव्य वस्त्र नेसली आहे. तिने पीत कंचुकी घातली असून,नेत्री अंजन

रेखिले आहे. यात श्रीधरकालीन रंभेचे दर्शन असून या थाटमाटातही संयम आहे.

नुपूरांच्या झणत्कारासह कामचेष्टा करीत, नेत्रकटाक्षाने घायाळ करीत ती शुकांपाशी येते. आणि - 'भोगांतरं यः पुरुषो न सेव्यते । वृथांतरं तस्य नरस्य जीवितम् ॥२॥' असे परोपरीने विनविते. पण शेवटी हतगर्व होऊन, श्रीशुकांना साष्टांग दण्डवत घालून परत जाते.

**एक तुलनात्मक विचार**

मुक्तेश्वरी रंभेपेक्षा श्रीधरांची रंभा ही खूपच शांत, संयमी, समंजस आणि सात्त्विक वाटते. ती उठवळ, वाचाळ किंवा आक्रस्ताळी नाही. मुक्तेश्वराइतका रंभाचित्रणास श्रीधरास अवकाशही लाभलेला नाही. मुक्तेश्वराची कथा ४६४ ओव्यांची आहे तर श्रीधराचे काव्य अवघ्या ३८ ओव्यांचे आहे. या अत्यंत लघु अवकाशात श्रीधरास मुक्तेश्वरी रंगभरणी करता आलेली नाही हे खरे असले, तरी पंढरीची, त्यातही एका पुराणिकाची महाराष्ट्रीय नायिका रंभा श्रीधरांनी सौम्या नायिकेच्या रूपात चित्रित केल्याचे जाणवते.

## ७) अमृतराय - रंभा व्यक्तिदर्शन

अमृतरायांनी लिहिलेल्या कटिबंधात्मक शुकचरित्रातील रंभा ही धीट, वाचाळ असून, मेनका, तिलोत्तमा इ. स्वर्गांगनेपेक्षाही ती चतुर आणि शहाणी असल्याचे अमृतराय लिहितात.

'रंभा वहिनी, चतुर शहाणी, अवनी भुवनी, वनी शुकाच्या परामृशाते जावे म्हणुनी, अति हर्षनि, शतयज्ञाची आज्ञा वंदुनी, करी प्रतिज्ञा – '

इंद्राने तिला कामगिरी सांगताना 'पुण्यामृत शुकाचे हरुनी दोहन करणे मोहन रूपे ॥' असे सांगितले आहे. त्यावर स्वतःची मर्दुमकी इंद्राच्या तोंडावर ती बेदरकरपणे सांगताना म्हणते की,

**'आसन तुमचे थरारले मग आम्हां प्रेरिले ।।'**

आपण विश्वमित्रानाही लोळवल्याचे सांगून मी शुकास सहज वेडा करीन; मलाच पैजेचा विडा द्या असे धृष्टतेने सांगते. अर्थात शाहिरी काव्यातील लावणीच्या नायिकेचा धिटावा इथे जाणवतो.

ही रंभा आपण 'अम्भोदधिजा' म्हणजे समुद्रमंथनातून निघालेल्या चौदा रत्नापैकी एक आहे - याची जाणीव इंद्राला देते, यात तिचा अहंकार दिसून येतो. ही रंभा आपण होऊन 'द्या द्या विडा ।' असे उतावीळपणे म्हणताना दिसते. त्याहीपुढे - 'करीन वेडा शुक कीडा ।' अशा ग्राम्यतेने बोलते. त्यात तिचा उद्दाम उठवळपणा दिसतो. अमृतरायांनी अशा उथळ चंचल रंभेचे शब्दचित्र रेखाटताना - गोड बोलणारी; बडबड करणारी; होडविडा उचलून हस्त मस्तकी धरणारी, उच्छृंखल रंभा तिच्या हालचालीसह नेमकेपणाने उभी केली आहे.

**'समर्थ तप हे किमर्थ करिता ? व्यर्थ देह कां दंडुनि मरता ?**

असे फट्कन विचारणारी रंभा आक्रमक असून शुकांना पूर्ववयी हे अपूर्व तप करणे म्हणजे

**'हे जेविल्याविणे अंचविणे, हे सेविल्याविणे स्वाद सांगणे ।'**

असे सडेतोडपणे सांगते. मराठमोळ्या लावणीची ही नायिका रंभा सोळा वर्षांची आहे. ती सांगते—

**'सावळी मी षोडशवर्षा, कवळी तनु हे, उतावळि मनि अता वाटते. ऐंशा रानी.**
**माझी शिराणी; आलिंगिन मी उभय करांनी; तुमची राणी, मुख्य घराणी,**
**विकल्प न धरावाचि वरांनी; नेमनिष्ठ मी अनुच्छिष्ट; हे शिष्ट वराया कोरे पात्र,**
**नाही स्पर्शिले तिळमात्र; पवित्र पीयूषाचे हे गात्र, सेवी सखया ।।१४।।'**

अशीही अस्सल लावणीतील रंभा शेवटी हतगर्व होऊन साष्टांग दण्डवत घालून म्हणते -

**'मी पातळी घातकी दुर्गुणी । तुज निर्गुणाते छळुनि पाहिले ।**
**क्षमा क्षितीशा । बहुत साहिले । मुनि चिद्‌द्रुमा । कृपा असो दे ।।१५।।'**

शुक मुनींच्या सत्संगाने ती शुद्ध,निर्मळ होते आणि हात जोडून म्हणते की,

**'हे सूज्ञा तुज अज्ञानाने मी अशुद्ध वचने निषिद्ध केले ।।'**

मग शुकांना वंदन करून ती गुप्त होते व स्वर्गात येऊन इंद्रास 'न रुसा आम्हांसी ।' असे सांगते. इथे तिचे लज्जित व्यक्तिदर्शन आपणास दिसून येते. प्रस्तुत कथासंचातील ही अमृतरायांची रंभा अधिक मानवी पातळीवरून प्रकटलेली दिसते.

**अमृतराय - श्रीशुक - व्यक्तिदर्शन**

१) अमृतरायांनी शुकाचार्यांचे व्यक्तिदर्शन घडविताना कथेच्या प्रारंभी त्यांची जन्मकथा सांगितली आहे. बारा वर्षे गर्भजाचणी सोसून,श्वास रोधून -

'सोहे सोहं हा निजध्यास । वैराग्याचा जिवि हव्यास ।।' धरुन राहिलेल्या शुकांना भगवान श्रीकृष्ण ज्ञान देऊन बाहेर येण्यास सांगतात. त्यांच्या 'शुक' नावासंबंधी ते लिहितात-

**'श्रीहरि बोले त्या गर्भाला । शुकपरी पढविता झाला ।**
**म्हणवुनि शुक हे नाम तयाला ।।'**

असे जन्मजात तपस्वी शुक बाहेर येताच तपश्चर्येलाच निघून जातात.

२) दुसऱ्या प्रसंगात चराचराशी समरस झालेल्या शुकांचे आपणांस दर्शन घडते.

३) तिसऱ्या प्रसंगात तपःसाधनामग्न शुकांचे तेजस्वी स्वरूप दिसून येते. 'वसनविहीन' 'तहानभूक इंद्रियवृत्ती जिंकून', ' योगासन घालून', 'तत्वमसि या महावाक्याशी लय लावून', 'स्वानंदामृत प्राशन करून ' तृप्तीची ढेकर देत असलेल्या श्रीशुकांचे हे दर्शन विलोभनीय असेच आहे.

४) चौथ्या प्रसंगात रंभेच्या मोहजाळातून झळाळून निघालेले तपःपूत योगेश्वर शुक आपणास दिसून येतात. रंभेचे आगमन होताच वनांतरीचे शुकपक्षी त्या अरिष्टाची सूचना शुक मुनींना देतात. अमृतराय लिहितात -

**'शुक शुकाते स्पष्ट बोलती । अरिष्ट तुज हे आले म्हणती । धारिष्टाने हरूं पाहती ।'** पण श्रीशुक हे पूर्ण दक्ष आहेत.

'दक्ष मुनी तो अक्ष कपाटे अक्षय देऊनि ।

क्षेत्ररूपे सुक्षित जेणे शमदम समाधि । सादर हृदयी भरिला ।।१०।।'

अशा वेळी शुकाचार्य ध्यानमुद्रेत असून,प्रत्यक्ष रंभेला ते 'वैराग्य दुर्गाधिपती इंद्रच' आहेत असे वाटते. जवळ येणाऱ्या स्वर्गीय रंभेला ते तृणवत दूर सारताना म्हणतात -

'छी छी मूर्खे गच्छ गच्छ तू । गच्छ गच्छ तृण तुच्छ अम्हाते ।।'

असे सांगून 'निरीच्छ माझी स्वच्छ वासना ।।' असे स्पष्ट सांगतात.

शेवटी तर प्रत्यक्ष देवेंद्र स्वतः स्वर्गातून मृत्यूलोकी येऊन, शुकांच्या भाळी अक्षता लावून त्यांचे स्तवन मांडतो. तेव्हाँ या महामानवाचे भव्योदात्त असे दर्शन आपणास घडते.

## ८) विठ्ठल केरीकर - रंभा व्यक्तिदर्शन

विठ्ठलाने रंभा म्हणजे तपोनिधींचे तप हरण करणारी एक अमोघ शक्ती या स्वरूपात तिचे दर्शन घडविले आहे. ही रंभा म्हणजे – 'तप नाशालागी कल्पिलेली ललना ।' असून इंद्राज्ञेने निघालेली रंभा अहंकारी, अभिमानी व अवास्तव आत्मविश्वास बाळगणारी दिसते. ती 'सुकुचा' पुष्ट सौंदर्य घेऊन 'मृत्युभुवनी सत्तपाचा नाश करण्यासाठी ।' निघाली आहे. विठ्ठल लिहितो–

'चंद्रमुखी चपलाक्षी चूर्णकथा चारुचित्र चीरधरा ।

लिकुचकुचा चामीकर रुचिरुचिरा पाहते शुकोच्यधरा ।।१५।।

सीमंत मध्यदेशी सिंदूरारक्त रेखिते रेखा ।

वेणीफणी सुकुंकुम कज्जल धरिताचि काय शुकलेखा ।।१६।।'

विठ्ठलाने चित्रित केलेली रंभा ही अमोघ सुंदर असूनही तो म्हणतो की, या वर्णनापेक्षाही - 'तत् शतगुण सुरांगना नटली ।।' त्यामुळे इंद्रालाही तिच्याबद्दल खात्री वाटते. शुकांना विचलित करण्याचा ती प्रयत्न करते,पण सर्व शृंगार परिवार चेष्टा व्यर्थ झाल्याचे पाहून आपल्या हाताने ती शुकाचार्यांना बळेच हालविण्याचे धाडसही करते.

'ती ब्रह्मनिष्ठिताते, स्पर्शून करे बळेंच हालविते ।।'

तिच्या दुःसाहसाने समाधीतून शुक जागे होतात. तेव्हाँ ती आपला हेतू स्पष्टपणे सांगते -

'शृंगारमूर्ती रंभा सुरलोकी मान्य देवरायाते ।

आले स्वामीस्तव मी आज्ञा मज आजि दे वरायाते ।।३८।।

पण श्रीशुकांनी 'माते' म्हणून संबोधताच ती शरण येते; क्षमा मागते. स्वतःस पापिणी म्हणविते.

'हे वाक्य ऐकताक्षणि रंभा लागे शुकाचिया चरणी ।

स्वामी क्षमा करावी प्रवर्तले व्यर्थ कीं, दुराचरणी ।।४६।।'

अशी खिन्न रंभा इंद्राजवळ येऊन शुक हे मदनजित असल्याचे सांगते.

**विठ्ठल केरीकर - श्रीशुक व्यक्तिदर्शन**

विठ्ठलाने श्रीशुकांचे व्यक्तिचित्रण गीतेत वर्णिलेल्या ब्रह्मनिष्ठ, स्थितप्रज्ञ योग्याच्या वर्णनाप्रमाणे केले आहे. 'या निशा सर्व भूतांना,तस्यां जागर्ति संयमी ।।' या वचनाप्रमाणे तो सांगतो -

**'जे रजनी विश्वाची तेथे तो योगिराज जागतसे ।**
**त्या द्रष्ट्याची रजनी तेथे हे भूतजात वागतसे ।।२९।।**
**ब्रह्मानंद समुद्री निमग्न तो जाहला दिवारजनी ।**
**त्या लाभाहुनि त्याला बोले बोलाल काय सार जनी ।।३०।।'**

रंभा त्याना हस्तस्पर्श करते तेव्हाँ विठ्ठल सांगतो की,

**'स्पर्श करिल हरिमाया यास्तव उदरात जननिच्या बारा ।**
**वत्सर वसे तपस्वी रंभेचा त्यास काय परिवारा ।।३३।।'**

अर्थात प्रत्यक्ष मायादेखील त्यांना स्पर्शू शकली नाही,तिथे रंभेचा काय पाड ? एकंदरीत, विठ्ठलाने शुकांचे व्यक्तिचित्रण विलक्षण उदात्त पातळीवरून केले आहे असे दिसते. पण रंभेच्या तुलनेने ते प्रभावी किंवा परिणामकारी वाटत नाही.

**९) उद्धवचिद्घन - श्रीशुकरंभा व्यक्तिदर्शन**

या कथेत प्रारंभीच शुकांचे दर्शन तपस्तेजमंडित असेच घडते. या तपश्चर्येमुळे इंद्रालाही भय वाटत असून तो रंभामोहिनीला पाठवितो. पण तिला पाहाताच शुक म्हणतात -

**'सर सर परती । बोलत योगिराज । संग दोषे तपासि भंग माझ्या ।।२२।।'**

स्त्रीचे शारीरसौंदर्य त्यांना भुरळ घालू शकत नाही. शुकांचे मन किंचितही विचलित होत नाही. उलट ते 'माते गे' म्हणून संबोधतात आणि रंभा पूर्णतः हतगर्व होते.

एकंदरीत केवळ ३२ कडव्यात रचलेल्या या कथेत शुक-रंभा संवादाखेरीज अधिक बारकाव्याने व्यक्तिदर्शनाची विशेष सखोलता दिसत नाही.

**७) समारोप**

शुकरंभा-कथेत दोन पात्रांच्या संवादांतून एक संघर्षकथा सनातन मानवी नीतिमूल्य संस्काराच्या दृष्टीने उभी करण्याचे श्रेय मराठी कवीना खचितच प्राप्त होते. त्यात विष्णुदास नामा आणि मुक्तेश्वर यांच्या प्रतिभेचा सिंहाचा वाटा आहे.

प्रस्तुत कथासंचात तीन कथा ओवीबद्ध असूत उर्वरित पाच कथा या विविध वृत्तातून घडविलेल्या आहेत. आणि ही घडण करणारे कवी पंडित कवी आहेत. त्यातही अमृतरायांनी 'कटाव' बंधातून शाहिर वळण स्पष्ट केले आहे.

त्याग आणि भोग यांच्यातील संघर्ष रंगविताना शृंगाररस व शांतभक्तिरस निर्माण करून सर्वानीच वैराग्यमहती प्रतिष्ठित केली आहे. श्रीधरांने प्राकृत कथेत मधूनच

संस्कृत श्लोकांचीदेखील पेरणी केली आहे. ही रचना कीर्तन सुखार्थ झाली असून हरिदासी रंगभरणी कथाबांधणीत दिसून येते.

विष्णुदासांचा फक्त अपवाद सोडून, प्रस्तुत कथासंचात सर्वच कवींनी इंद्रानेच रंभा पाठविल्याचे म्हटले आहे. त्यात इंद्रपद जाईल ही इंद्राची भीती आहे. पण विष्णुदासांच्या कथेत स्वतः व्यासच इंद्राकडे जाऊन शुकास तपापासून परावृत्त करण्यासाठी इंद्राची आळवणी करतात. नव्याने आलेल्या या कथाभागामुळे इंद्रस्पर्धेपेक्षा व्यासांचे पुत्रवात्सल्य अधिक हळवेपणाने जाणवते.

## ८) कथा साधन संदर्भ

| | |
|---|---|
| १. **मूळ महाभारत –** | शांतिपर्व अ. २३१ ते २३५. मोक्षधर्म. संस्कृत. |
| २. **विष्णुदासनामा –** | 'शुकाख्यान' – सकलसंत गाथा खंड १. आवृ. २, १९६७. ओव्या ४६१. |
| ३. **मुक्तेश्वर –** | 'शुकरंभासंवाद' – ४६७ ओव्या. 'मुक्तेश्वराची स्फुट काव्ये.' संपा. डॉ. लेले वा. के. अनमोल प्रकाशन पुणे २. १९७५. मू. २० रु. पृ. ९२ ते १२७. |
| ४. **वामन पंडित –** | 'शुकरंभासंवाद'— ११ श्लोक. 'वामन पंडितकृत स्फुट काव्ये.' संपा. वा. दा. ओक. सांगली जिल्हा नगरवाचनालय. क्र. १३२ पृ. १६९ ते ७१. |
| ५. **रंगनाथस्वामी निगडीकर –** | 'शुकरंभासंवाद' – ओव्या ८४. महाराष्ट्र कवी, महाराष्ट्र काव्य ग्रंथ. मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. |
| ६. **विठ्ठल केरीकर –** | 'शुकरंभासंवाद' – आर्या ४९ 'महाराष्ट्र कवि विठ्ठलकृत कविता संग्रह वा. दा. ओक. आवृ. २ री. निर्णयसागर छापखाना. १९२४. किं. २॥ रु. पृ. १० ते १४. |
| ७. **उद्धव चिद्घन –** | **'शुकरंभा संवाद'** – 'उद्धव चिद्घनकृत कविता संग्रह.' महाराष्ट्र कवि **संपा. वि. ल. भावे.** वामन दा. ओक. पृ. १ ते ३ दिंडीवृत ३२ कडवी. |
| ८. **अमृतराय –** | 'शुकचरित्र' – कटिबंध १६ चौक. 'महाराष्ट्र कवि अमृतरायकृत कविता संग्रह.' संपा. वा. दा. ओक, मोडक निर्णयसागर छापखाना. १८९२. किं. १। रु. पृ. १४ ते २९. |
| ९. **श्रीधर –** | 'शुकरंभा चरित्र' – 'श्रीधराची स्फुट आख्यान काव्ये' गुरुलिंग प्रकाशन, संपा. डॉ. सौ. अनुराधा दामोदर कुलकर्णी. १९८५. मूल्य. २० रु. प्र. १ ते ६. ७७२ गावभाग सांगली. |

✿ ✿ ✿

# प्रकरण आठवे

## आनंदतनयाची संकीर्ण स्फुट आख्याने

### प्रास्ताविक

प्रस्तुत शोध-प्रबंधाच्या अभ्यासानिमित्त, तंजावर येथे गेल्यावेळी तेथील ग्रंथालयात आनंदतनयाची काही संकीर्ण स्फुट आख्याने जुन्या हस्तलिखित बाडींतून नव्याने उपलब्ध झाली आहेत. प्रस्तुत प्रकरणात त्यापैकी १) मार्कंडेय चरित्र. २) शीबीचेक्रवृतीची कथा. ३) त्रीणावर्तदमन कथा ४) कृष्णाची कहाणी-अशा चार आख्यानांचा अभ्यास मांडला आहे. तसेच आनंदतनयाचे - १) प्रल्हाद चरित्र. २) सुदाम चरित्र हे त्या त्या प्रकारणात विवेचून मांडलेलेच आहे.

उपरोक्त आख्याने ही कीर्तनोपयोगी, स्वयंपूर्ण, श्रुतिमनोहर असलेली दिसतात. आनंदतनयाची आख्याने म्हणजे - 'हरिदासांची अन्नदात्री कामधेनूच होय' असे वि. ल. भावे महाराष्ट्र सारस्वतात म्हणतात,त्याची खात्री पटते. त्याची ही आख्याने वृत्तबद्ध श्लोक, पदे, अभंग,चूर्णिका इ. संमिश्र बांधणीतून घडविलेली दिसतात. त्यात यमकांची लयलूट असून रंजकतेची आकर्षकता आहे. पंडिती थाटाची ही स्फुट आख्याने भारदस्त, विदग्ध आणि प्रौढ असूनही,प्रसादगुण विशेषत्वाने दिसून येतो. भक्तिप्रवण भावनिकता त्यात सतत जाणवते. प्रस्तुत प्रकरणातील नवोपलब्ध कथांचा साधन-संदर्भ, प्रकरणाच्या शेवटी दिला आहे.

### आनंदतनय कविवृत्त

आनंदतनयाच्या चरित्राविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. वि. का. राजवाडे आणि काव्यसंग्रहकर्ते जोग यांनी त्याच्याविषयी जे थोडेबहुत लिहून ठेवले आहे ते असे: 'शहाजीच्या व व्यंकोजीच्या काळात कांही देशस्थ ब्राह्मण घराणी तंजाऊरच्या बाजूला स्थायिक झाली. त्यापैकी एका घराण्यात आनंदतनयाचा जन्म झाला. याचे मूळ नाव भास्कर असून त्याच्या वडिलांचे नाव आनंद व आडनाव वेदोभास्कर असे होते. परंतु याने आपल्या काव्यात आनंदतनय, आनंदसुत, आनंदात्मज या नावाने स्वतःचा उल्लेख केला आहे. मुरार परब्रह्म या साधूचा हा शिष्य व शहाजीचा गुरू होय. कर्नाटकातील 'अरणी' परगण्याची मामलत यांच्याकडे होती. याचे वास्तव्यही अरणीलाच होते. असे सांगतात कीं, याने स्वतःला अरणीचा शिपाई म्हणवून घेतले आहे. यावरून तो योद्धाही असावा असे वाटते.

**'कंगाल ते ब्राह्मण अरणीचे । परंतु ते शूर रणांगणीचे ।।'**

हा त्याचा श्लोकार्ध दक्षिणेतील महाराष्ट्रीयांना मुखोद्गत आहे.

रघुनाथ पंडित व आनंदतनय हे समकालीन असून, ते एकमेकांचे व्याही होते अशी समजूत आहे.

आनंदतनयाने भारत, भागवत, रामायण, मार्कंडेय पुराण यांच्या आधारे रचलेली

वीस काव्ये आजवर उपलब्ध झाली अहेत. त्याने अनेक पदे रचली असून त्यापैकी १५६ पदे 'काव्यसंग्रह' मासिकात प्रसिद्ध करण्यात आली आहेत. याची भाषा प्रौढ, सरस व प्रसंगाविशेषी अलंकारयुक्त आहे. याची वर्णनशैली चित्तवेधक असून, चित्रकाव्याकडे त्याचा विशेष कल आहे. याची रचना महाराष्ट्रातील हरिदासांच्या मुखी आहे.

हा रामोपासक होता. त्याचे नित्यपूजेचे रामपंचायत अद्यापि तंजाऊर येथील त्याच्या वंशजाकडे आहे. मोरोपंत सन्मणिमालेत त्याच्या यमकांची स्तुती करताना म्हणतात -

**'आनंदतनय अरणीकर शोभति कवन फार यमकांही ।**

**तत्पूजित पाठ ज्याला तयाचे पाहे न भवन यम कांही ।।'**

..... त्याच्या रचनेवर रघुनाथ पंडिताची छाप जाणते.' (संदर्भ. भा. सं. कोश. खंड १. पृ. ४४२).

## आनंदतनय – मार्कंडेय चेरित्र

### १) कथा स्वरूप व आस्वादक विवेचन

महाभारताच्या वनपर्वात मार्कंडेयऋषींची माहिती आली असून, मार्कंडेय पुराण, शिवपुराण इत्यादींत ही कथा आहे. आनंदतनयाच्या स्फुट आख्यानात पुढील 'कथाभाग' आला आहे.

पूर्वी 'मृकंडू' नामक एक अत्यंत धार्मिक ऋषी होते. पण त्याना पोटी पुत्रसंतान नव्हते. पत्नी पुत्रप्राप्तीसाठी 'स्तवा पशुपती मांगा कुलोद्धारसा ।।२।।' असा आग्रह धरल्यावरून त्यांनी 'ॐ नमःशिवाय ।' या मंत्राची पुरश्चरणे केली. त्यांच्या तपश्चर्येने पिनाकपाणी शिवशंकर प्रसन्न झाले-मात्र त्यांनी वर देताना एक अट घातली की, - १) ज्ञानी पण अल्पायुष्यी २) मूढ कुरूप पण शतायुषी पुत्र यापैकी एक भाग. त्यावर त्यांनी पत्नीच्या संमतीने वंशाला ललामभूत ठरणारा अल्पायु पण ज्ञानी पुत्र मागितला. आनंदतनय लिहितो–

**'दे देवा मज पुत्र सुंदर भला ज्ञाता सुवेत्ता पाहा ।**

**गौरीनाथतथास्तु बोलुनी निजस्थानासि गेला पाहा ।।१४।।'**

शिव वरदानाने त्यांना पुत्र होतो. त्याचे नाव 'मार्कंडेय' ठेवले जाते. पाचव्या वर्षी त्यास गुरुगृही पाठविले जाते. तेथे तो - 'तर्क व्याकरणादी नाटक कलालंकार शास्त्रांतरी ।।१८।। ' पारंगत होतो. पण मातापित्यांच्या अंतरात त्याच्या अल्पायुष्याची झुरणी लागलेली असते. अशी पंधरा वर्षे लोटतात. शेवटी एकच वर्ष उरते. 'वर्ष गेली पंधरा आजि आला । एक्या वर्षी केविं देखो तयाला ।।२२।।' अशा चिंतेने ते व्याकुळ होतात. तेव्हां ज्ञानी मार्कंडेय स्वतःच त्यांना धीर देतो. तो मृत्युंजय शंकराची भक्ती करू लागतो. त्याची अखंड अनन्य शिवाराधना सुरू होते. तो शिवध्यानात असतानाच यमदूत येतात. पण त्यांना परतून जावे लागते. ते यमाकडे तक्रार करतात. तेव्हां यमराज क्रुद्ध होऊन स्वतः येतात व यमपाश टाकतात. पण मार्कंडेय शिवपिंडीला मिठी मारून बसतो तेव्हां त्या शिवपिंडीतून शिवशंकर प्रकट होतात आणि यमाचा प्रतिकार करून मार्कंडेयास 'चिरंजीवी हो ।' असा

आशीर्वाद देतात. ब्रह्मादिक सुरवर महादेवाचे स्तवन करतात. शेवटी –

**'शिवभजन करिती जे जगीं येक रीती ।**
**विषय विषय भीता त्या नव्हे काळभीती ।।५१।।'**

अशा शिवभक्तीच्या प्रेरणासंदेशाने कथाभागा संपतो.

## २) कथाबांधणी स्वरूप विचार – भक्ति प्रबोधन कथा

आनंदतनयाची ही भक्तचरित्र कथा कीर्तनरंगाच्या ढंगाने बांधली गेलेली दिसते. मार्कंडेयाच्या अनन्य शिवभक्तीचा आदर्श दाखण्याच्या प्रयोजनाने भक्तिप्रेरक असा घाट इथे दिसतो. भक्तिबोधाचा ठसा उमटेल अशी वात्सल्य, कारुण्यरस मिश्र भक्तिकथा त्याने थोडक्यात पद्यबद्ध केली आहे. कळिकाळासही जिंकणाऱ्या मृत्युंजयभक्तीचे महिमान या कथेत मांडले आहे.

### तंत्रबांधणी विचार

आनंदतनयाने ही कथा विविध वृत्तातून बांधली असून; ५२ कडव्यात ही कथा आटोपशीरपणे उभी आहे. तसेच मधूनमधून प्रसंगोपात्त चूर्णिका छंद, पदे यांची ही त्याने पेरणी केली आहे. त्यामुळे वृत्त छंदाचे रुचिवैचित्र्य येऊन, गेय चालीतील बदल श्रुतिरम्यता उत्पन्न करतो.

पात्रसृष्टीचा विचार करता या कथेत 'मुनिमार्कंडेय' हे एकच मुख्य पात्र असून त्याच्या शिवभक्तीने अकालमृत्यू नाहीसा होतो, हे दिसून येते. मार्कंडेयाची मातापितरे ही आनुषंगिक दोन पात्रे असून त्यांच्यामुळे वत्सल व करुण रसनिर्मिती घडून येते.

आनंदतनय ज्या तंजावर प्रदेशात राहातो तेथे बृहदीश्वराचे प्रचंड शिवमंदीर असून तेथील शिवापिंडीच दीडदोन पुरुष उंचीची बृहदाकाराची आहे. समोरील नंदीदेखील हत्तीच्या आकाराचा आहे. तंजावरच्या आसपास 'कुंभकोणम्' 'श्रीशैल्यमल्लिकार्जुन' 'शिवकांची' दक्षिणेस 'रामेश्वर' इ. प्राचीन पुराणप्रसिद्ध प्रचंड शिवमंदिरे व शिवपीठे आहेत. अशा जागृत शिवस्थानांच्या प्रदेशात शिवभक्त मार्कंडेयाची कथा लोकमानसात खोलवर रुजलेली आहे. त्यामुळेच या कथेची कीर्तनातून होणारी मांडणी ही भक्तिप्रबोधनाची व लोकाराधनेची खास गोष्ट आहे.

## ३) रसविचार – सरस हे कथा

आनंदतनयाने ही कथा 'सरस' असल्याचे म्हटले आहे. या कथेच्या आद्यन्ती शिवभक्तीचे व शिववरदानाचे शिवमहिमान भरून राहिले आहे. त्यामुळे 'भक्ती' हा रस कथाव्यापी बनला आहे.

(१) कथारंभी 'मृकंडू' ऋषींचे पुत्रप्राप्तीसाठी चाललेले तपाचरण आपले लक्ष वेधून घेते.

**'तो आदरी गिरी दरीत माहा तपाते ।**
**सोसूनिया कठीण वातही माहा तपाते ।।३।।'**

या तपाने शंकर प्रसन्न होतात. त्यास वरदान देतात.

(२) दुसऱ्या प्रसंगात पुत्रमार्कंडेय तप करताना दिसतो. मृत्युंजय शंकराचे नामस्मरण करीत तो तीर्थयात्रा करू लागतो. (३२) पंधरावर्षाच्या मार्कंडेयाची ही शिवभक्तिसाधना भक्तिरसाचे दर्शन घडविते. या एकाग्र नाम-जपात 'सामर्थ्य लेश न चले यमकिंकराचे ॥३८॥' असे सामर्थ्य असून प्रत्यक्ष **यमराजाचीदेखील तेथे** मात्रा चालत नाही. भोलेनाथ शिवशंकर भक्तप्रतिपालक असल्याचे प्रत्यक्ष पाहून परिपूर्ण भक्तिरस दाटून येतो.

(३) वात्सल्य आणि कारुण्य रसाचे दर्शन मृकंडूमुनी व त्यांच्या पत्नीच्या पुत्रप्रेमातून दिसून येते. घोर तपश्चर्येतून त्यांना पुत्रप्राप्ती होते, पण पुत्र अल्पायू आहे म्हणून त्या मातापित्यांचे मूक आक्रंदन पीळ पाडणारे वाटते. त्यातील कारुण्य त्यांच्या अश्रूवाटे ओघळत असते. मार्कंडेयाला जेव्हां ते गुप्त रहस्य समजते तेव्हां त्यांच्या दुःखाला पारावार उरत नाही. हे कारुण्यच मार्कंडेयाच्या दृढनिर्धाराचे वज्रकवच बनते व तो अनन्यभक्ती करू लागतो. अशा रीतीने आनंदतनयाने म्हटल्याप्रमाणे 'सरस हे कथा' याचे प्रत्यंतर येते. वात्सल्य - कारुण्य आणि भक्ती अशा रसत्रिवेणीवर हे कथाशिल्प उभे असलेले दिसते.

### ४) वर्णन शैली – स्वभावोक्तीपूर्ण चित्रण

आनंदतनयाची वर्णनशैली स्वभावोक्तीपूर्ण असून शब्दचित्रे, नेमकी क्षणचित्रे तो मूर्तिमंतपणे उभी करताना दिसतो. या दृष्टीने प्रस्तुत कथेतील श्लोक क्र. ३२,३५,३६ हे मुद्दाम बघण्यासारखे आहेत.

(१) **तो करी तीर्थयात्रा ।। श्लो. ३२ ।।**

शिवध्यान करीत तीर्थयात्रा करणाऱ्या मार्कंडेयाचे नेमकेदर्शन तो असे रेखाटतो -

**'जपत जपत यैंसा तो करी तीर्थयात्रा ।**
**धवळशुभ्र विभूती लावुनी शुभ्र गात्रा ।।**
**स्पटिक मणिगणांनी रम्यें रुद्राक्षमाळा ।**
**करी शीर भुज कंठी नित्य घाली सुमाळा ।।३२।।'**

(२) **पद्मपाणी भासला ।। श्लोक ३५ ।।**

कुमार मार्कंडेय तपस्वी बनून शिवध्यानास बसतो त्या वेळचे क्षणचित्रही असेच वास्तवपूर्ण, चित्रदर्शी आहे. आनंदतनय लिहितो -

**'हृत्पद्मी शिवपादपद्म धरूनी पद्मासनी बैसला ।**
**जैंसा पद्मपाणी पद्मयुगुळे पार्थी तदा भासला ।।३५।।'**

(३) **वोढा धरारे धरां ।। श्लोक ३६ ।।**

अल्पायु मार्कंडेयास नेण्यासाठी सरसावून येणाऱ्या यमदूतांचा आवेश चित्रदर्शी

करताना अनेक बारकाव्यानिशी आनंदतनय अत्यंत तंतोतंत वर्णन करतो -

**'आले गर्जत खड्ग खेटक गदा पाणी दणाणी धरा ।**
**हाते झेलित वाघुरा निगदीती वोढा धरारे धरा ।।**
**धावा घेती उफाळिती द्विजवरा ते लक्षीती लोचनी ।**
**तो भ्याला शीवमूर्ती देखुनी करी ध्यानी जगन्मोहिनी ।।३६।।'**

।। पद ।। २ ।। पुढे दूतांचे संभाषण पाहा -

**'धरा बांधा वोढुनि तळी पाडा ।**
**लोह काटवण्यामाजी तनु पाडा ।।**
**दूत म्हणती कर्वती याशी तोडा ।**
**जो जो करीशी तो दंडा याशी तोडा ।।२।।'**

सारांश, प्रासबद्ध पंडिती-शैलीतून वास्तवपूर्ण क्षणचित्रे रेखाटण्यात आनंदतनय सिद्धहस्त असल्याचे या आटोपशीर कथाबांधणीतून सहजी दिसून येते. दक्षिण भारतातील तंजावरकडील उंचउंच गोपुरांच्या प्रदेशांत मार्कंडेय चरित्रकथेचे हे शब्दशिल्प शिवभक्तीमुळे बृहदीश्वराची शोभा वाढवीत आहे.

आनंदतनयाच्या कथाबांधणीत यत्र तत्र ऱ्हस्वदीर्घादी दोष दिसून येत असले, तरी अमराठी प्रातांतील तामिळ, कन्नड, भाषेच्या लकबीचे वळण मराठीच्या उच्चारात मिसळून असे शब्दलेखन घडले असणे शक्य आहे.

### ५) नवोपलब्ध - मार्कंडेय चेरित्र - कथासाधन संदर्भ

तंजावर येथील सरस्वतीमहाल ग्रंथालय. दत्तसंप्रदाय देणगी मठ क्र. ७९ हस्तलिखित रजिस्टर मूळ हस्तलिखित काळ्या शाईत,गोल अक्षरात लेखन. १०'' × ८'' वही. पृ. १३३ ते १३९. दि. ३०-१२-१९७९ रोजी कथा नकलून घेतली. एकूण ५३ कडवी. ६ चूर्णिका व एक पद आहे. चूर्णिका क्र. ३ मध्ये पोवाड्या प्रमाणे 'जी,जी' असे ध्रुपद लिहिलेली दोन कडवी आहेत. कडवे ४६ व ४९ मध्ये तिसरी ओळ नाही. कथेच्या शेवटी ५२ व्या कडव्यात 'आनंदसुत' अशी नाममुद्रा असून,चूर्णिका क्र. ६ मध्ये 'आनंदनंदन' अशी मुद्रा आहे.

## (२) आनंदतनय – शीबी चेक्रवर्तीची कथा

### १) कथा स्वरूप व आस्वादक विवेचन

**कथामूळ**

मूळ महाभारतातील वनपर्वात शिबीराजाची कथा दोन ठिकाणी आली आहे.

(१) 'लोमश ऋषी' युधिष्ठिरास 'उशीनर' (शिबी) राजाची कथा सांगतात.

(२) तीच कथा मार्कंडेय ऋषी युधिष्ठिरात पुनश्च सांगतात.

दोन्ही कथांतून धर्मात्मा शिबी राजाची सत्त्वसंपन्नता दाखवून दिली आहे. आनंदतनयाने कीर्तन रंगभरणीने ती कथा वेधकतेने सादर केली आहे.

## २) उदात्त प्रयोजन

राजा शिबी चक्रवर्ती हा करुणानिधी असून सत्यवादी आहे. ब्रह्मदेवासह सर्व देव त्यास 'भला रे भला ।' म्हणून गौरवितात. त्याच्या कथाश्रवणाने भयभीती,मायामोह नाहीसे होतात, अशी कथा इथे प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण सांगत आहेत, असे उदात्त प्रयोजन दिसून येते. घोर सत्त्वपरीक्षेच्या काळात अविचल मनोधैर्य उत्पन्न करणारी ही कथा भारतीय जनमानसात खोलवर रुजलेली आहे.

## ३) आटोपशीर,रेखीव बांधणी

आनंदतनयाची ही ४७ श्लोकबंधातील स्फुट कथा देखणी असून, कथानायक शिबीराजाचा सत्त्वगुण महिमा सांगितला आहे. धर्मशील धर्मराजापुढे धर्मधुरीण धर्मात्मा श्रीकृष्ण ही धर्मकथा सांगत आहे. प्रयोजन सांगून लगेच शिबीराजाच्या यज्ञशाळेत घडलेला प्रसंग चित्रित केला जातो. शेवटी शिबीराजास दिव्य देह प्राप्त होतो. त्याच्या सत्त्वशीलतेचा डंका वाजत राहतो आणि मोक्षपदप्राप्ती सांगून कथा विरामते. त्यापुढे चार श्लोकात फलश्रुती प्रकट होते. आनंदतनय सांगतो की, या कथा-श्रवणाने यज्ञाचे फळ मिळते. प्रत्यक्ष भगवान सांगतात -

> **'सायुज्यमुक्ति सकळ अर्पिल त्याशी माळा ।**
> **कामादि मोह्र रीपूचा नीरसे उमाळा ।।४६।।'**

कथेचा हा शेवट आणि 'देहादि मोह भय सर्वही वोसराया ।।२।।' हा प्रारंभ आहे. उपक्रमोपसंहाराची अचूक गाठ पडून एका सत्त्वपरीक्षेची वीरकथा आदर्शरूपाने साकार होते.

### संघर्षनाट्य

आनंदतनयाने एका लघुकाय धर्मकथेतून एक अटीतटीचे संघर्षनाट्य मांडले आहे. शरणागताला अभयदान दिल्यानंतर त्या सत्त्वसंपन्न शब्दाचे पूर्ण परिपालन करण्यासाठी 'शेवटी प्राणतोही अर्पावा ।'' या टोकाला जाऊन शिबीराजा समर्पणाचा चरणोत्कर्ष गाठतो. यज्ञशाळेत घडलेले हे संघर्षनाट्य 'यज्ञ=त्याग' हे समीकरण तेथल्या तेथेच स्पष्ट करून जाते. हे संघर्षनाट्य (१) शरणागतास अभयदान (२) अतिथीसत्कार (३) दिलेला शब्द निर्धाराने पाळण्याची सत्त्वसंपन्ननिष्ठा अशा त्रिविध पातळीवर आदर्श उत्पन्न करते.

### व्यक्तिचित्रण

प्रस्तुत कथेत शिबिराजा हा सत्यवचनी, धीरोदात्त नायक असून तो दीनजन-परित्राण करणारा आहे. त्यामुळे त्याची सत्कीर्ती दिगूदिगंत पसरल्याचे पहिल्या कडव्यातच आपणास दिसून येते. तो धर्मनिष्ठ असून यज्ञ करणारा दानशूर पुण्यात्मा आहे. तो सत्त्वशील असल्याने त्याची परीक्षाच बघण्यासाठी इंद्र व अग्नी अनुक्रमे ससाणा व कपोतांच्या रूपाने त्याच्या यज्ञशाळेतच येतात. कपोत ससाण्याच्या भीतीने थरथरा कापत राजाच्या खांद्यावर येऊन बसतो आणि - 'तू रक्ष रक्षी मला ।।६।।' अशी दीन याचना करतो. तेव्हाँ 'भीऊ नको दीन

कींकरा । तव रिपु विभेदीन पांखरा ।।१०।।' अशा शब्दात राजा त्यास अभयदान देतो. आपण एकदा अभय दिल्यावर ब्रह्मा, शंकर किंवा यमाचेही भय नाही असे सांगतो. तेव्हा त्याच्या अतुलनीय पराक्रमाचे प्रचंड स्वरूप समजून येते. (१३) शरणागताला त्रिभुवनात भय नाही ।।४८।। असे त्याचे सामर्थ्य आहे. त्यामुळेच कपोतपक्षी निर्भय होतो आणि खांद्यावरून त्याच्या हातावर येऊन बसतो.

इकडे संतप्त ससाणा, क्षुधापीडिताचा घास काढून घेणे धर्मशील राजाला शोभत नाही असे म्हणत धर्मसंकट उभे करतो. आपण उपाशी मेलो तर कुटुंबघातास कारण होऊन तुझी कीर्ती बुडेल असा कांगावा करतो. पण त्याच्या निंदाव्यंजक वाग्बाणानी विद्ध न होता, राजा ठामपणे सांगतो की, 'नंदी कदापि चरणा शरणागताला ।।२१।।' उलट त्याच्या बदल्यात 'सरस अणीक मांस ।' देण्यास तयार होतो. पण ससाणा त्याच्या शरीराचे मांस मागतो.

**'दे आपुली तनु तहीं पतगाप्रमाणे ।**

**याही वीना अशन सर्वही अप्रमाणे ।।२६।।'**

त्यावरही 'नृपाची अचळ स्थिती' अभंग राहाते. तो स्वदेहाचे लचके तोडून तराजूत घालू लागतो.

**'देहाते तृणतुल्य मानुनी करे खंडूनी खड्गाननी ।।३२।।'**

तरीपण कपोताचे पारडे जडच राहाते. होता होता शेवटी राजा स्वतःच पारड्यात बसतो. तेव्हा त्यांची धर्मशील सत्त्वनिष्ठा पाहून, देवलोकी जयध्वनी उठतो. देव त्याच्यावर पुष्पवृष्टी करतात. इंद्र, अग्नी त्याचें धैर्य पाहून प्रसन्न होतात. 'तोषूनिया म्हणती धन्ये भला भरा रे ।।२६।।' असा हा मूर्तिमंत धैर्यशील, सत्त्वसंपन्न औदार्याचा पुतळा शिबीराजा आहे.

**नवोपलब्ध हस्तलिखित साधन-संदर्भ –**

१) तंजावर सरस्वती महाल ग्रंथालय. हस्तलिखित वही. कॅटलॉग नोंदणी ८० जे. नं. ७९. दत्तसंप्रदाय देणगी मठ. हे रजिस्टरही हस्तलिखितच आहे. छापलेले नाही. १०''×८'' वही पृ. क्र.. १२९ ते १३३.

२) २८/१२/७९ रोजी ही प्रत मुळाबरहुकूम नकलून घेतली.

३) संपूर्ण कथा उपलब्ध असून, विविध वृत्तातील ४७ श्लोक त्यात आहेत. शेवटी ४७ व्या श्लोकात 'आनंदनंदन कवी' अशी कविनाममुद्रा आली आहे.

४) कथेच्या शेवटी 'ईतिश्रीशीबी चेक्रवर्ती कथा संपूर्ण ।।'अशी कथामर्यादा दिली आहे.

## (३) आनंदतनय – त्रीणावर्त दमन-कथा

### १) कथा स्वरूप – आस्वादक विवेचन

**नानारशी हे हरिची प्रशंसा**

मूळ भागवत दशम स्कंधातील सातव्या अध्यायात (श्लो १८ ते ३३) मध्ये १६ श्लोकांत ही कथा आली असून आनंदतनयाने मुळापेक्षा दुप्पट श्लोकात (३६) रसाळपणे रंगविली

आहे. 'नानारशी हे हरिची प्रशंसा ॥२॥' असे तो सांगतो. अर्थात भक्ती, वीर, भयानक, करुण, वात्सल्य, अद्‌भुत, शांत इ. रसांनी नटलेली ही छोटेखानी कथा नेटकेपणाने घडविली आहे. प्रत्यक्ष शुकमुनी राजा परीक्षिताला ही कथा मोठ्या संतोषाने सांगत असून, ती 'सुरसौख्यकारी' ॥३६॥ अशीच आहे.

कथाबांधणीच्या दृष्टीने विचार करता पहिल्या दोन कडव्यात प्रास्ताविक आणि श्रीकृष्ण महिमा मांडला असून, कथेच्या शेवटी समारोपात्मक एक श्लोक आला आहे. म्हणजे उर्वरित श्लोकात ही सारगर्भकथा आटोपशीरपणे उभी केली आहे.

कृष्णवधासाठी कंसाने पाठविलेल्या तृणासुराचे गोकुळातील आगमन. त्या वावटळीने उडालेला हाहाकार, गोकुळातील चिंतातुर शोकमग्नता. श्रीकृष्णाचे अद्‌भुत सामर्थ्य, तृणासुराचा वध आणि सर्वत्र पसरलेला आनंद, असा कथाभाग घडीव स्वरूपात वृत्तबद्धतेतून इथे घडविला गेला आहे.

कथेच्या प्रारंभी वेदासी कानडा, योगनिधान पूर्णपरब्रह्म श्रीकृष्णमहिमा सांगितला असून, कथेच्या शेवटी 'तो नंदनंदन सनातन निर्विकारी ॥३६॥ असे सांगून उपक्रमोपसंहार अचूक साधला आहे. वात्स्यल्य रसाने सुरू झालेली ही कथा अन्य रसासह वात्स्यल्यातच विरामते. कथेतील ही रसचित्रे वेधक आणि लक्षणीय अशीच आहेत.

**१) वात्सल्यरस दर्शन**

श्रीकृष्णाला मांडीवर पदराआड घेऊन स्तनपान करविणाऱ्या माता यशोदेच्या रूपाने मूर्तिमंत वात्सल्यरस अवतरलेला दिसतो. 'अंकी पंकजलोचनासी जननी दे स्तन्य धन्या जनी ॥' बालश्रीकृष्णाच्या हनुवटीला स्पर्श करून ती त्यास खेळवीत आहे. श्रीकृष्ण परमात्माही मंदस्मित करून परमानंद वाढवीत आहे. त्याला झोप लागावी म्हणून गोड गाणे गाऊन मैया यशोदा श्रीकृष्णाला थोपटीत आहे. त्यातून ती स्वतःच सुखावत आहे. अशा वात्सल्य-दर्शनाचे रूपांतर क्षणार्धात गोकुळीच्या गदारोळात होऊन रौद्रभीषणता उत्पन्न होते.

**२) अद्‌भुतरस दर्शन**

मायावी तृणावर्त धुळीचे लोट उधळीत गोकुळात येतो. त्याचा धिंगाणा कोणाच्याही लक्षात येत नाही; पण मायानियंता श्रीकृष्ण ते संकट जाणून आपले शरीर वज्राशिखराप्रमाणे जडशीळ बनवितो. इथे अद्‌भुत लीलानाट्यास सुरुवात होते. मांडी अवघडल्यासारखे यशोदा त्याला खाली ठेवते. आनंदतनय लिहितो -

**'लीळा अद्‌भुतशि विलोकुनि बळा बाळासि बाळा करी ।**
**ठेवी भूमितळीवरीस चकिता आश्चर्य गाळा करी ॥८॥'**

अशा रीतीने मांडीवरील बाळ इतका जड कसा झाला ? या अद्‌भुतातच वीररसाला आमंत्रण दिले जाते. मायावी असुराशी युद्ध होण्याची ही तयारी असते.

३) वीररस दर्शन

मायावी तृणावर्त वावटळीच्या रूपाने घो, घो घोष करीत गोकुळात वेगाने घुसतो. सर्वत्र भीतीने थरकाप उडतो. वृक्षवेली उन्मळून पाडीत तृणावर्ताचा धिंगाणा सुरू होतो. गोऱ्हे, वासरे रस्त्यात उधळतात. गायी हंबरडा फोडू लागतात. मुले रडून ओरडून आकांत मांडतात. माड्या गोपुरे धडाधड कोसळू लागतात. कोणास काहीच समजेनासे झाले, अशा अद्भुत गदारोळात बालश्रीकृष्णास तृणासुराने उंच गगनात उचलून नेले. पण -

**'श्रीकृष्ण दनुजेश्वरी हृदंतराकंठी मिठी मारीली ।।१९।।'**

या असुरमर्दनातून वीररस उत्पन्न होण्यापूर्वी खाली गोकुळात श्रीकृष्ण नाहीसा झाल्याचे पाहून एकच हलकल्लोळ माजतो.

४) करुणरस दर्शन

माता यशोदेच्या शोकास पारावार राहात नाही. ती श्रीकृष्णास हुडकू लागते. वासरासाठी गायीने हंबरडा फोडावा तसा ती आक्रोश मांडते. क्षणार्धात अद्भुत वावटळ शोकावेगात बुडून जाते. या वेळी मूर्तिमंत करुणरसाचे अवतरण घडते. कवी लिहितो -

**'आले का ये अहा म्हणे करकटा स्नेहातुरा माऊली ।**
**आक्रंदे मग फुंदफुंदुनी उठे वत्सा जशी गाऊली ।।२०।।'**

अवघ्या गोकुळात शोककळा पसरते. सकल गोपगोपी 'स्थावर जंगमी' श्रीकृष्णाचा शोध घेऊ लागतात. तेव्हां तर कारुण्याचा कडेलोट होतो. मात्र - तिकडे -

५) वीररस दर्शन

उंच आकाशी श्रीकृष्ण जगजेठी आणि तृणासुर दैत्य यांचे हवाई मल्लयुद्ध सुरू होते. बाल श्रीकृष्ण तृणासुराच्या कंठालाच घट्ट मिठी मारतो आणि पर्वतप्राय जडशीळ होऊन त्याच्यावर प्रचंड भार घालतो. हा मल्लयुद्धाचा प्रसंग वीररसयुक्त असून, अवकाशातच तृणासुराचे नरडे दाबून, त्याच्या झिंज्या उपटून 'भूदरडीवरी आपटतो ।' नंदराजाच्या अंगणात प्रचंड शिळेवर ते राक्षसी धूड कोसळते. श्रीकृष्णा त्याच्या कंठाला बिलगलेलाच असतो. ते पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटते.

६) शांतरस दर्शन

वत्सल, करुण, वीराद्भुत रसानंतर श्रीकृष्ण सापडताच आनंदीआनंद ओसंडतो. सुकून चाललेली 'यशोदा' वेल कृष्णामृताने प्रफुल्लित होते. 'उल्हासली, हासली' झटकन पुढे जाऊन श्रीकृष्णास उचलून घेतले जाते आणि शांताला वात्सल्य रसाचे भरते येते. ते राक्षसी धूड पाहून कृष्णाला भीती वाटू नये, म्हणून त्याचे डोळे झाकले जातात. आनंदतनय लिहितो -

**'शौरी देखुनिया सळेल म्हणुनी डोळे करे झाकिती ।।२१।।'**

श्रीकृष्णाला दृष्ट लागू नये म्हणून गायीचे शेपूट त्याच्या मुखावरून ओवाळतात; गोमूत्र प्रोक्षण करतात; दृष्ट काढतात. मंतरलेला अंगारा, विभूती लावतात. त्याच्या गळयात ताईत

बांधतात. हा सर्व प्रकार वात्सल्यप्रेमाने सर्वजण करतात. लोकरुढी, जनश्रद्धांचेही इथे सहज दर्शन घडते.

**'गोपुच्छ भोवंडिती कृष्ण मुखावरुनि ।**
**गोमुत्र सिंपिती सती अति आदरूनी ।।**
**कीं स्वस्तिवाद करिती द्विजराज राजी ।**
**सन्मंत्र यंत्रही वीभूति परात्परा जी ।।३३।।'**

असे हे श्रीकृष्णाचे लीला-कौतुक 'नानारशी प्रशंसेतून आपणापुढे साकार होते.

## काव्यरम्य प्रतिमा

आनंदतनयाने हे नानारसांनी युक्त झालेले कथानक उभारताना काव्यरम्य प्रतिमा वापरून काव्याशय अधिक संपन्न केलेला दिसतो. या प्रतिमा चित्रदर्शी असून, विलक्षण प्रभावी ठरल्या आहेत. उदा.

१) **भासे पर्वतसी हरितनू ।। श्लोक ८ ।।**

'तृणावर्तद्मन' कथेत यशोदेच्या मांडीवरील श्रीकृष्ण आपले वजन वाढवून जड होतो. मांडीला रॅग लागल्याने यशोदा त्यास खाली ठेवते. मग श्रीकृष्ण वाऱ्याच्या रूपात आलेल्या दैत्याच्या विरोधात पर्वत होऊन उभा ठाकतो. वायव्यास्त्राविरुद्ध पर्वतास्त्र अभिमंत्रावे तसाच हा प्रकार घडतो.

२) तृणासुराच्या घोंघावणाऱ्या विनाशकारी महाध्वनीचे स्वरूप वर्णन करताना 'काळाचा की, नगार ध्वनी ।।श्लो ११।।' अशी सुंदर, सार्थ प्रतिमा तो उभी करतो. तसेच चक्राकार भोवंडत, घनगर्जना करीत, रोरावत घुसलेल्या तृणावर्ताचे वर्णन करताना 'प्रळयानळी प्रकटला घोरारवे भैरवे ।।श्लो. १२।।' असे तो सहज लिहून जातो. तसेच 'महद्भुतभूतवारे ।।१७।।' अशा शब्दातही त्या वावटळीचे नेमके मायावी रूप तो उभे करतो.

३) **वत्सा जशी गाऊली ।।२०।।'**

तृणासुराने श्रीकृष्णाला उचलून उंच आभाळात नेल्यावर इकडे गोकुळात हंबरडा फोडून आकांत मांडलेल्या यशोदेचे दर्शन घडविताना आनंदतनय नेमकी प्रतिभा उभी करतो -

**'आक्रंदे मग फुंद फुंदुनि उठे वत्सा जशी गाऊली ।।२०।।'**

४) **'जैसा शैल भला पडे जड तसा ।।२२।।'**

तृणासुराच्या कंठाला भिडलेला बालश्रीकृष्ण एवढा वजनदार बनतो, की त्याला आपल्या अंगावर पर्वतच पडल्यासारखे वाटते. तृणासुराला ते एक मोठेच संकट वाटते.

**'जैसा शैलभला पडे जड तसा झाला तदा सांकडे ।।२२।।'**

श्रीकृष्णाची अद्भुत 'महिमा' योगशक्ती इथे दिसून येते.

आनंदतनयाने सुंदर प्रतिमा चित्रणाप्रमाणे प्रत्ययकारी नादचित्रेही उभी केली आहेत.

१. गाजे घोषहि घोष घों करी ।।१०।।

२. वाऱ्याचा तो घुमा घुमघमित ।।११।।

३. घोरा रवे भैरवे ।।१२।। इ.

**स्वभावोक्तीपूर्ण वास्तव क्षणचित्रे**

आनंदतनयाच्या लेखनशैलीचा हा खास विशेष असून, चारदोन ओळींच्या अल्पावकाशात त्याने अशी सुंदर शब्दशिल्पे साकार केली आहेत. वत्समूर्ती यशोदा, तृणावर्ताचा गोकुळातील हाहाकार, गोपाळांची भयचकित संभ्रमावस्था, श्रीकृष्णाचे मल्लयुद्ध, श्रीकृष्णाची दृष्ट काढणे इ. ठिकाणी त्याच्या लेखनशैलीचे कसब आपणास दिसून येते.

(१) यशोदेचे तृप्त,प्रसन्न क्षणचित्र उभे करताना तो लिहितो -

**'तो येके समयी ग्रहांगण तटी बैसोनि दिव्यासनी ।**
**अंकी पंकज लोचनासी जननी दे स्तन्य धन्या जनी ।।**
**लोभे खेळवी बालका हनुवटी स्पर्शोनिया आंगुळे ।**
**हासे मंद जगन्निवास परमानंदे तदा निस्तुले ।।४।।'**

(२) गोकुळीच्या भयकंपित हाहाकाराचे चित्र मांडताना तो लिहितो -

**'धैर्याचे सळीता बळीहि सळती भ्याडा तळी लोळती ।**
**कीतेक चळती मनी वीचळती तापत्रयी पोळती ।।**
**धुळीत मिळती लता उमळती झाडे महांदोळती ।**
**गोऱ्हे गोंधळती बिदी उधळती प्राणी असे चाळती ।।१३।।'**

(३) शौरी थोर हटी - २४।।'

स्तनपान करणाऱ्या बाल श्रीकृष्णाचे प्रचंड सामर्थ्य त्याचे मल्लयुद्ध आणि धुणे थोपटावे तसे तृणासुराला झिझ्या उपटून, जबडा फाडून, शिळेवर आपटून ठार मारल्याचा रोमहर्षक प्रसंग नेमका उभा करता आनंदतनय पंडिती प्रासबद्धतेने लिहितो की, -

**'शौरी थोर हटी म्हणोनि निहटी मालचिया राहटी ।**
**वाटे हो कपटी म्हणोनि उपटी नेटे सीळे आपटी ।।**
**डोयीसी कवटी नखेचि नीवटी झिंझाऊनी सेवटी ।**
**अंगाचे उतटी सीळे हलतटी पाडी वरेचे तटी ।।२४।।'**

## नवोपलब्ध त्रीणावर्तदमन कथा

**हस्तलिखित – साधन-संदर्भ**

(१) तंजावर येथील सरस्वती महालग्रंथालय, क्र. ७९,दत्तसंप्रदाय मठ देणगी.

हस्तलिखित रजिस्टर. मूळ हस्तलिखित वही काळया शाईत,गोल अक्षरात लेखन. वहीचा आकार १०'' × ८'' पृ. क्र. १२९ ते १४२.

(२) २९/१२/१९७९ रोजी ही कथा मुळाबरहुकूम नकलून घेतली.

(३) हे आख्यान पूर्ण उपलब्ध असून विविध वृत्तातील एकूण ३६ कडवी आहेत. १८ व्या कडव्यात तिसरी ओळ नाही.

(४) कथेच्या शेवटी ३६ व्या कडव्यात 'आनंदनंदन' अशी कविनाममुद्रा आहे.

(५) कथेच्या शेवटी - 'ईतीश्री तृणावर्त दमन कथा संपुर्णमस्तु ।' अशी कथामर्यादा दिली आहे.

## (४) कृष्णाची कहाणी – आनंदतनय

### १) कथा 'स्व'रूप – आस्वादक विवेचन

#### (अ) कुशल तंत्र-लाघव

मूळ भागवत दशम स्कंधातील पूर्वाधात आलेली 'कृष्णाची कहाणी' ही बाललीला ही आनंदतनयाची सर्वात छोटेखानी कथा आहे. यात केवळ अकरा कडवी असून या लघुअवकाशात त्याने राम आणि कृष्ण हे एकच असल्याचे अद्वैत दर्शन वेधकतेने मांडले आहे.

गौरीच्या गोष्टीप्रमाणे कृष्णलीलेची ही कथा म्हणजे 'यादवेंद चेरितामृत मेवा ॥१॥' आहे. ही कथा म्हणजे वात्सल्यरसाचा अमृतकुंभच बनली आहे. खोडकर, अवखळ, लडिवाळ अशा सोनुल्याला पाळण्यात झोपवू पाहाणारी वत्सलमूर्ती यशोदा, अंगाईगीतातून श्रीरामाची गोष्ट सांगते. पाळण्यातून श्रीकृष्ण 'हुंकारा' देत असतो. हा प्रसंग अत्यंत साधा आणि घरोघरी दिसून येणारा असा सर्वसामान्य आहे. पण रामकथेत रावणाने सीताहरण केल्याचा उल्लेख येताच श्रीकृष्ण पाळण्यातच ताडकन उठून बसतो आणि 'लक्ष्मणा धनुष्य आण असे भान हरपून ओरडतो.

**'दे दे बाण धनु धनुस्य अनुजा बोले उठे तत्वता ॥११॥'**

या आकस्मिक निवेदनाने संपूर्ण कथेलाच कलाटणी मिळते. आतापर्यंतचा वात्सल्यरस एकदम वीररसात परावर्तित होतो आणि 'श्रीराम तोच श्रीकृष्ण' अशी परमाद्वैताची अवतार प्रचिती येऊन 'रामकृष्ण' लीलेचा ठसा खोलवर उमटतो. अनपेक्षित प्रभाव पाडण्याचे प्रभावी तंत्रकौशल्य इथे खचितच लक्षणीय ठरते.

#### (ब) प्रसन्न वात्सल्यरस दर्शन

पहिल्या दोन कडव्यात आनंदतनयाने श्रीकृष्ण-महिमा वर्णिला असून, मायलेकरांच्या वात्सल्याचे वास्तवपूर्ण असे सुरेख चित्रण केले आहे. त्यातून त्याचे सूक्ष्म निरीक्षणही दिसून येते. बालसुलभ क्रिया आणि मातृसुलभ वात्सल्यभाव यांचे हृदयंगम दर्शन आपणांस इथे घडते. श्रीकृष्णाचे दिवसाभरातील नाना छंद विशेषतः - आईच्या मागे लागण्याचा छंद जिव्हाळयाने मांडला आहे. माता यशोदेचा पदर धरून मागे मागे घोटाळणाऱ्या कृष्णाचे विलोभनीय लाघव घरोघरीच्या 'बालमूर्तींच्या' रूपात दिसून येणारे असेच आहे. (श्लो. २ व ३ )

(क) उगाच एकांती बैसावे

श्रीकृष्णाच्या या बाललीलेतून रंजनाबरोबर अध्यात्म-प्रबोधन महत्त्वाचे ठरते. इथे श्रीकृष्णाचा यशोदेकडे हट्ट आहे की, 'मला हृदयाशी घेऊन निवांत बसून राहा.' म्हणजेच पूर्णब्रह्म श्रीकृष्ण-चिंतनात दंग हो. पण गोपी म्हणजे सकल इंद्रियवृत्ती या यशोदेप्रमाणेच घरचा पसारा आणि - 'सकल काम हे मी करूं कदा ।' अशा बाह्य कर्मातच दंग असतात. पण अशा स्थिरपणात ध्यान लागले तरच श्रीहरी 'स्वस्थ' बसू देणार. अन्यथा कर्मभार वाढणारच !

**'मन्मना भवमद्‌भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैश्यसि युक्तत्वं मात्मानं मत्परायण: ।।'**

असा गीतेचा संदेश या सहजलीलेतून दृश्यरूप केला आहे.

(ड) श्रीकृष्ण झोपावा (नीजो) म्हणून माता यशोदा अंगाई गाते. आनंदतनयाने तिच्या तोंडी श्रुतिरम्य, रसाळ,प्रास्तादिक आणि भावपूर्ण असे 'पाळणा गीत' घातले आहे. आनंदतनयाची ही कथा अप्रकाशित असल्याने त्याचा हा 'पाळणा' इथे मुद्दाम देत आहोत -

**'नीज रे नीज बाळा । गोपाळा जो जो रे वेल्हाळा ।**
**नीद्रा करि का रे । नानाविध अवतार कृपाळा ।।धृ.।।**
**घेता तुज श्रम जाला । नीज रे नीज बाळा ।।१।।**
**रचिता दीर्घ चराचर माळा । भागलासी कणवाळा ।।२।।**
**आनंदसुत वीभूच्या गुणबाळा । सेजे लागवी डोळा ।।३।।'**

या पर्यंकगीताने आपला गुणी बाळ झोपला असेल म्हणून यशोदा हलकेच पाळण्यात डोकावून पाहाते.तो टक्क डोळे उघडे ठेऊन कृष्ण जागाच ! तेव्हा ती पाळणा हालवीत

**'कसी ये ना नीद्रा तुज गुणसमुद्रा यदुपती ।।९।।'**

असे चिंतेने गाऊ लागते. मग पूर्व अवतारांचा निर्देश करीत,श्रीरामाची कथा सांगू लागते.

(इ) कथेतील कथा

श्रीकृष्णलीला कथेत यशोदा श्रीरामकथा सांगू लागते. कथेतील ही उपकथा केवळ एकाच पदात आली असून,प्रत्येक ओळीत शेवटी श्रीकृष्णाचा 'हुंकार' आहे. उदा.

।।पद।। **'सांगे येशोदा काहाणी । यदुराज यैकें ।।धृ.।।**
**पुर्वी येक पुरी साता हं । तीचा दशरथ ताता हं ।।**
**त्यासी तीघजणी वर वनीता हं । कैकई वचन जनक अज्ञेने हं ।**
**नीघती रघुपती सीता हं ।।१।।'**

सहा कडव्यांचे हे पद 'कथेतील कथा' असून,माता यशोदा-मैय्या कथा सांगत आहे. तिचाही कथा-हुंकार त्यात मिसळला असून,आनंदतनयाचा हा नंदलाल मातेचा आनंदमेळाच आहे.

### (ई) कथा फलश्रुती

कृष्णास झोप लागावी म्हणून यशोदामैय्या गोष्ट सांगते पण दुष्ट रावणाचे नाव ऐकताच कृष्णाची झोप उडते आणि - 'दे दे बाण धनुर्धनुस्य अनुजा बोले उठे तत्वता ।।११।।' या क्षणी श्रीकृष्ण श्रीरामच झाला असून, 'मी नंद नंद शीषु व्रजभूमीवासी ।।१२।।' याचा त्यास विसर पडतो. श्रीकृष्णाचे 'निजरूप' इथे प्रकट होऊन - 'कीं मीच राघव असी गती दाखवीतो ।।१२।।' रामकृष्णांच्या अद्वैतदर्शनातच कथा विरामते आणि 'परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।। हे भगवंताच्या अवतारांचे प्रयोजन स्पष्ट होते.

उमा-शंकर ज्या रामाचे अखंड चिंतन करतात तो रामच कृष्ण आहे. 'तो श्रीकृष्ण वीभु ।।२।।' हे अद्वैती प्रमेय एका लघुत्तम-कथेत पंडिती काव्यात अंगठीतील खड्याप्रमाणे चमकदार ठरले आहे.

### नवोपलब्ध हस्तलिखित : साधन-संदर्भ

(१) तंजावर, सरस्वती महाल ग्रंथालय. क्र. ७९ दत्तसंप्रदाय मठ देणगी. हस्तलिखित रजिस्टर. मूळ हस्तलिखित वही. काळ्या शाईत गोल अक्षरात लेखन. वही १०'' ×८'' अंदाजे.

(२) ३०.१२.७९ रोजी मुळाबरहुकूम नकलप्रत तयार केली.

(३) विविधवृत्तातील १२ श्लोक क्रमाने असून तीन पदे आहेत. पहिल्या पदाच्या डोकीवर 'शंकराभरणराग' असे दिले असून,दुसरे पद 'पाळणा' आहे. तिसरे पद 'रामचरित कहाणी' आहे. कथेच्या शेवटी १२ व्या कडव्यात 'आनंदनंदन' अशी कविनाममुद्रा आलेली आहे. पद क्र. २ आणि ३ मध्ये 'आनंदसुत' अशी नाममुद्रा असल्याने ही पदे स्वतः आनंदतनयाचीच आहेत. कथेच्या शेवटी 'ईती श्रीबालचरित्र कहाणी कथा संपुर्ण ।।' अशी कथामर्यादा स्पष्टपणे सांगितली आहे.

### समारोप

(१) प्रस्तुत प्रकरणात आनंदतनयाच्या नवोपलब्ध अशा चार कथांचे आस्वादक विवेचन आपण पाहिले. राम कृष्ण, शिव या दैवतांच्या भक्तीत रंगून त्याने दैवतकथा आणि भक्तकथा रंगविल्या आहेत.

(२) मूळ महाभारत आणि भागवतातील या कथा कीर्तन-सुखार्थ मांडताना पंडिती रचनेत त्याने रागदारी - गेय पदांचीदेखील पेरणी केली असून,त्यातून रसनिर्मिती अधिक गहिरी केली आहे. या पदावर दक्षिणी संगीताचा प्रभाव असून अभिजनासमोर प्रकटणाऱ्या या कथांतून नागर प्रतिभेचे आपणास दर्शन घडते.

(३) रसदर्शनाप्रमाणे काव्यरम्य प्रतिमांकन आणि जिवंत व्यक्तिचित्रण यांचेही आपणास इथे प्रसन्न दर्शन घडते. नादचित्रे, रसचित्रे आणि शब्दचित्रे अशा त्रिविध परिमाणातून प्रभावी,स्फुट आख्याने उभी राहिलेली दिसतात.

✿ ✿ ✿

# प्रकरण नववे

## तंजावरकडील काही अन्य स्फुट आख्याने

### १) प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात तंजावरकडील अप्रकाशित हस्तलिखितांतून तीन कवींची तीन स्फुट आख्याने नव्याने प्रकाशात आणली जात आहेत ती अशी--

१. **गुरुदासकृत** - 'चेतुभुर्ज सावजकथा' - यात ४३ कडवी व ६ पदे आहेत.

२. **प्रतामरामकृत** - 'चेंद्रहास निरोपण'

३. **श्रीउटके गोविंदकृत** - 'श्रीउमारमा संवाद'

वरील नवोपलब्ध स्फुट आख्यानांच्या आशयाभिव्यक्तीचा आस्वादक विचार पाहू.

### २) कविवृत्त

**गुरूदास**

तंजावरकडील गुरुदास कवीची माहिती फारशी उपलब्ध नाही. वि. ल. भावे यांच्या 'महाराष्ट्र सारस्वता'च्या पुरवणी सूचीतही गुरूदासाचा उल्लेख नाही. त्यामुळे मराठी रसिकांपुढे प्रस्तुत कवी आणि त्याचे 'चेतुर्भुज सावज कथा' हे काव्य प्रथमच पुढे येत आहे. या ग्रंथातील तिसऱ्या प्रकरणात गुरूदासाची 'प्रल्हाद कथा' हे आख्यानही नव्यानेच पुढे आले असून तंजावरकडील एक अलक्षित गुणी कवी प्रकाशात येत आहे. त्याने प्रल्हादकथा 'कडाका' छंदात व 'चेतुर्भुज सावज' कथा विविध वृत्तातून सजविली आहे. त्यावरून हा पंडित कवी आनंदतनयाचा समकालीन अगर नंतरचाही असावा. स्वकालीन दरबारी वातावरणाचे चित्र त्याच्या काव्यात दिसून येते. त्याने चेतुर्भुज कथेत वामन पंडिताच्या व्याधाख्यानातील ८/१० श्लोक जसेच्या तसे घेऊन कथा सजविलेली दिसते. त्यावरून हा वामन पंडिताचा समकालीन असावा. तसेच त्याच्या 'गुरुदास' या मुद्रेवरून तो रामदास शिष्य असावा असे अनुमान करावेसे वाटते.

### चेतुर्भुज सावज कथा

**कथाभाग**

मूळ महाभारतातील ही कथा, वामन पंडित, श्रीधरांनीदेखील मराठीत लिहिली आहे. वामन पंडिताची ही 'व्याधाख्यान' कथा समोर ठेऊनच गुरुदासाने आपली 'चेतुर्भज सावज' कथा सजविलेली आहे. कारण व्याधाख्यानातील ८/१० कडवी या कथेत आली आहेत. या कथेत एकूण ४३ कडवी असून,६ पदे आली आहेत. प्रायः कीर्तनोपयासाठीच गुरुदासाने ही कथाबांधणी केलेली आहे.

या कथेत गुरुदासाने एका भोळया अंतःकरणाच्या भिल्लाची भोळी भावभक्ती डौलदारपणे उभी केली आहे. जंगलात राहून, पशुपक्ष्यांची शिकार करून, एक अनाम भिल्ल आपल्या कुटुंबाचे भरणपोषण करीत असतो. एकदा भिल्लपत्नीला मृगमांसाचे डोहळे

लागतात, तेव्हा तो भिल्ल धनुष्यबाण घेऊन जंगलात जातो. खूप भटकंती करूनही, त्यास काही एक मिळत नाही. शेवटी एकदमच त्याला हरिणासारखे काहीतरी दिसून येते, तेव्हां नेम धरून तो बाण मारणार, एवढ्यात त्याला ती आकृती माणसाची असल्याचे दिसून येते. म्हणून जवळ जाऊन पाहातो तो एक तेजःपुंज ऋषी ध्यानस्थ बसलेले असतात. भिल्लाला एकदम धसका बसतो. ऋषिहत्येच्या पातकाच्या भीतीने तो थरथरा कापू लागतो. ऋषींना दण्डवत घालून तो अपराधी भावनेने विचारतो की, - 'आपण या घोर अरण्यात कां वस्ती केली आहे ? राज्य, धन, वैभव इ. पैकी आपणास मी हवे ते आणून देतो. त्यावर ऋषी म्हणतात-

**'अभीष्ट मनीचे पुरवीषी जरी तूं मागन रे तुजला ।**
**चेतुर्भुज सावज सत्वरि आणुनि दे मजला ।।धृ.।।'**

अर्थात हे चतुर्भुज सावज म्हणजे ऋषींच्या दृष्टीने शंख, चक्र, गदा, पद्मधारी विष्णू असून ऋषी त्यास आणखी खाणाखुणा सांगताना म्हणतो -

**'चहूंही हातांचे मृग बहुत श्यामळ असे ।**
**गळा माळा काशे कसुनि पीवळे वस्त्र विलसे ।।**
**बहुस्थाने ज्यांची मजही न कळे लोक जेपती ।**
**त्वरे जाई आता उषीर न लवी गा वृजपती ।।२६।।'**

ऋजु अंतकरणाच्या भिल्लाला ते खरोखरीच सावज असावे असे वाटून भोळेपणाने तो परत विचारतो की,

**'खाते फळ कीं, फळ भक्षीताहे । झाडावरी कीं, विवरात राहे ।**
**सांगा असा नेम ठावा तयाचा । धरूनि आणिन ही सत्य वाचा ।।१७।।'**

त्यावर ऋषी त्याला 'त्या' सावजाच्या म्हणजे भगवंताच्या खाणाखुणा सांगतात.

**'सजल जलद श्याम तनु दिव्य कुरळ केशी ।**
**स्मेर वदन कंज नयन सकळ भुवनीवासी ।। पद २.१ ।।**
**अभय वरद शेंख चक्र धरी पाणीदेसी ।**
**कौस्तुभमणी वैजयंती गळा पीतवासी ।। पद २.२ ।।'**
**'सनकादिक परिवारी राहे फणीतल्प चिन्ह भुवनवरी ।**
**वैकुंठ नाम नगरी शेषशाई पयोब्धीचे तीरी ।।१९।।'**

अर्थात संभाव्य ऋषीहत्येच्या पापभयाने भयकंपित झालेला भोळा भिल्ल सारे वर्णन ध्यानात ठेवून, 'सावज' शोधण्यासाठी निघतो, रात्र होते. तरी त्याच्या अंतरी त्या विष्णुरूपाचेच अखंड ध्यान सुरू असते. त्या भावावस्थेत सारी अरण्ये गिरिदरी पालथी घालतो. पण सावज सापडत नाही तेव्हा स्वतःस धिक्कारून तो म्हणतो – 'वेर्थ कीं, प्रसवली मज माता ।।२९।।' चिंतेने अत्यंत व्याकूळ होऊन तो धावा करून म्हणतो –

**'असाधे देखोनी पडे वीचारी । मनी म्हणे काय करू मुरारी ।।२९।।'**

एका ऋषींना दिलेला शब्द पूर्ण करता येत नाही तर आपल्या जगण्याला तरी काय अर्थ ? असे म्हणून तो धारदार शस्त्र कंठावर आदळू लागतो आणि त्या निर्वाण क्षणी भगवान विष्णू त्याच्यासमोर प्रकट होतात. समोर ते दिव्य सावज पाहाताच त्याच्या गळयाला वस्त्र बांधून तो त्याला ओढत घेऊन निघतो. परमात्मादेखील त्याच्यामागून मुकाट निघतात. ऋषीजवळ येताच मोठ्याने हाका मारून तो सांगतो – 'बोले दीर्घस्वरे म्हणे मुनिवरा घे सावजा आपुल्या ।।४०।।'

खरोखरीच ते दिव्य सावज पाहून ऋषींना आश्चर्य वाटते. ब्रह्मादिदेवानाही जे असाध्य, श्रुतीनाही 'नेति नेति' ठरलेले ते प्रत्यक्ष रूप पाहून भगवंताचे कृपाळू, भक्तवात्सल्य दिसून येते. ऋषीसमवेत भिल्लासही वैकुंठस्थान प्राप्त होते. इथे कथाभाग संपतो.

**कथा-प्रयोजन**

गुरूदासाने भोळया भक्तीची अनन्य पराकाष्ठा एका वेगळया पातळीवर इथे उभी केली आहे. ध्रुव, प्रल्हाद, शिबी, सुदामा इ. भक्तकथेपेक्षा या कथेचा पोत वेगळा आहे. या कथेचा नायक अज्ञानी भिल्ल आहे. पण शब्दाला जागण्याचे ब्रीद त्याच्यात आहे. अशा नैतिक सदाचारातून भगवंतप्राप्ती होते, हे दाखवून देण्याचे प्रयोजन इथे स्पष्ट होते. अनन्य निष्ठेने सर्वस्व समर्पणाची सिद्धता झाल्याक्षणी भगवंत प्रसन्न होतो. त्यासाठी 'योगयाग विधी येणे नाही सिद्धी ।' हे इथे दिसून येते.

**'ज्याचा शुद्ध भोळा भाव । त्याचा अंकित होतो देव ।।'**

हे अंतिम प्रयोजन कथेच्या शेवटी प्रभावीपणे सिद्ध होते.

## २) कथाबांधणी – स्वरूप विचार

**वृत्तबद्ध रचना**

अनन्यभक्त अनाम भिल्लाची कथा गुरूदासाने पंडिती रचनेप्रमाणे विविध वृत्तांतून मांडणी केली आहे. यात एकूण ४३ वृत्तबद्ध कडवी असून त्यात शार्दूलविक्रीडित, भुजंगप्रयात, वसंततिलका, अभंग, आर्या, सवाई छंद इ. वृत्तपेरणी केली आहे. मधूनच रसभाव उत्पन्न करणारी ६ पदेही त्याने घातली आहेत. त्यामुळे विविध वृत्तांच्या श्रवणसुभग गेयतेबरोबर श्रुतिमधुर रागदारीची सुरावटही कथाबांधणीला प्राप्त झाली आहे.

**तीन प्रसंगांची त्रिवेणी**

गुरूदासाने ही कथाबांधणी तीन प्रमुख क्षणचित्रातून उभी केली आहे.

१. जंगलातील एका भिल्ल कुटुंबाचे दर्शन. भिल्ल पत्नीला मृगमांसाचे डोहळे लागल्याने तो शिकारीसाठी बाहेर पडतो.

२. सावज म्हणून एका ऋषींची हत्या घडणे चुकते. पण त्याचे प्रायश्चित म्हणून 'चेतुर्भुजसावज' आणून देण्यासाठी तो बाहेर पडतो.

३. शेवटी आत्मार्पणास सिद्ध होताच, 'सावज' प्रकट होते. तो ते ऋषींना आणून देतो. भिल्ल व ऋषी दोघांनाही वैकुंठप्राप्ती होते.



ग्रंथ. सा. क्र. ३८६५ २६६२३ ८।७।८२

**व्यक्तिचित्रण**

**कथानायक भिल्ल**

'कोण्ही एक किरात' अशा अनाम भिल्लाच्या अनन्य निष्ठेची, भोळया भक्तीची ही कथा असून, या व्याधाचे शब्दचित्र ठसठशीतपणे वाचकांच्या मनावर उमटून राहाते. त्याच्या अनन्यनिष्ठेतून 'चेतुर्भुज सावज' प्राप्त होते. एका अर्थी भगवंताचे अपार वात्सल्य, त्याचा दयाळूपणा व्याधाला प्राप्त होतो.त्यामुळे त्या 'विचित्र सावजाचे' नाव या कथेस दिले गेले असले तरी भोळया भिल्लाचीच ही कथा ठरते.

कथेच्या प्रारंभी आपल्या पत्नीसमवेत कुटुंबात राहाणारा गरीब भिल्ल आपणास दिसून येतो. 'वनी भिल्ल कुटुंबसहित । वास करीत दिवस बहुत ।।१।।'

तो शिकार करून उदरनिर्वाह करीत असे. पुढे – 'तया कामिणीसी गर्भ फळा आले ।।२।।' त्याच्या पत्नीला मृगमांस खाण्याचे डोहळे लागतात. तिचे लाड पुरविण्यासाठी धनुष्यबाण घेऊन तो बाहेर पडतो. खूप वणवण करूनही सावज सापडत नाही, म्हणून तो खिन्न होतो. 'बहू खेद मानी । जाऊनी काय करू म्हणुनी ।।३।।' असा उदासपणे एका दरीत लपून बसतो.इतक्यात दूरवर त्याला काही तरी दिसते. आता बाण मारणार, इतक्यात त्याला ती 'नराकृती' माणूस असल्याचे दिसते. त्यासरशी 'हां म्हणवुनी ।' तो बाण मागे घेतो. यावरून शिकार करतानादेखील तो किती दक्ष आणि जागरूक आहे याचे प्रत्यंतर येते. तो भिल्ल त्या 'नराकृती' जवळ जातो, तो एक तेजःपुंज ऋषी ! एका तपोधन ऋषींची हत्त्या घडली असती या भीतीने तो त्यांना दण्डवत घालून क्षेम विचारतो. आपणास भूक लागली असेल तर 'सावजे' आणून देतो; चोरांनी लुबाडले असल्यास धन आणून देतो. इ. इथे सामान्य संसारी भिल्ल आणि परमार्थ साधक यांचा संवाद म्हणजे प्रपंच परमार्थाचे संघर्षनाट्यच होय. भिल्लाला समजेल अशा भाषेत ऋषी त्याला 'चेतुर्भुज सावज' आणून दे' म्हणून सांगतात.

ऋषींच्या सहवासाने आता एका सामान्य व्याधाच्या मृगयेची दिशा दिव्य अशा 'चेतुर्भुज सावजावर रोखली जाते. इथे कथेचा ओघ एका दैवी दिशेने वाहू लागतो. सत्संगाने वाल्याचा वाल्मिकी व्हावा तसे या भिल्लाचे प्रगमनशील व्यक्तिमत्त्व त्या दिशेने वाटचाल करू लागते. पुराणांतरीच्या खाणाखुणा समजावून घेऊन, ठावठिकाणा माहीत नसलेल्या सावजाच्या शोधात हा बाहेर पडतो. मात्र त्याची प्रतिज्ञा असते की, –

**'अस्त रवी जंवर जाईना हो । धरूनि आणिन ही सत्य पहा हो ।**

**सांगा असा नेमका ठाव ज्याचा । धरूनि आणीन ही सत्य वाचा ।।२३।।'**

सत्यवचनाप्रमाणे रानोमाळ, गिरीकंदरी, कांतारी 'उपवन वन दुर्गी रम्य नाना प्रदेसी ।।१७।।' शोध घेत तो हिंडतो.पण 'सावज' मिळत नाही तेव्हा – 'वेर्थ कीं प्रसवली मज माता ।।२८।।' अशा शब्दात तो आपला धिक्कार करतो.

इकडे सूर्यास्त होऊ लागताच त्यांची चिंता वाढते. 'मनी म्हणे काय करूं मुरारी ।।२९।।' प्राण कंठाशी आल्याप्रमाणे तो कासावीस होतो. शेवटी आत्मार्पणासही उद्युक्त होतो तो म्हणतो

**'वाचूनीया यावरी लाभ काय । येथेचि मी वर्जिन आत्म काय ।।३१।।'**

**'सांगो काय तपस्विया म्हणुनिया बैसोनिया त्या तळी ।**

**मूर्ती चिंतुनि शस्त्र काढुनि करे कंठस्थळी आदळी ।।३२।।'**

त्याच्या त्या निर्वाण निष्ठेच्या क्षणी गरूडालाही मागे टाकून, चतुर्भुज श्रीविष्णू धावून येतात.

**'तो धावला पंकजनाभ वेगे । सांडोनिया पक्षी कुलेश मागे ।।२७।।'**

श्रीविष्णूंनी त्याचा हात धरताच त्याला समोर ते 'चतुर्भुज सावज' पाहून भिल्लास आनंद होतो आणि चटकन आपल्याजवळ असलेलया बायकोच्या फडक्याने 'भाजाच्या पटबंधने ।।' बांधून त्याला ओढत घेऊन येतो व ऋषींना अर्पण करतो.

**'बोले दीर्घस्वरे म्हणे मुनिवरा घे सावजा आपुल्या ।।४०।।'**

इथे कर्तव्यपूर्तीने कृतकृत्य झालेल्या भिल्लाचे दर्शन घडते. एका अर्थी भिल्लाची तपश्चर्याच सफळ होते. भिल्लाचे दैव उघडते. त्यास वैकुंठप्राप्ती होते.

### हरिदासी मंचावरील दृश्यरूप कथा

गुरूदासाची ही कथा कीर्तनानुकूल अशा गेय स्वरूपाची असून, यातील पदे भक्तिभावसंपन्न अशीच आहेत. पहिल्या पदात भगवंतदर्शनाची आर्त तळमळ प्रकटली आहे. दुसऱ्या पदात चतुर्भुज श्रीविष्णूंचे सगुणरूप वर्णन आले आहे. हे दर्शन घडावे म्हणून एका भोळया भिल्लाने केलेली आर्त आळवणी अंतःकरणाचा ठाव घेणारी आहे.

**'द्रीष्टी देखीले की मृग ऐंसा परी हो ।**

**दावा गे तुमचे पाय धरी हो ।। धृ. ४ ।।'**

इथे भक्तिरसाचे मूर्तिमंत दर्शन घडते. पुढे पाचव्या पदात तुकाराम महाराजांचीच उत्कट आळवणी असून 'आता न करी उदास ।' हे निर्वाणीचे मागणे हृदय पिळवटून टाकते. अशी सर्व पदे टाळ-मृदुंग, चिपळयांच्या तालावर तन्मयतेने आळविताना भक्तीरसातूनच 'चेतुर्भुज सावज' समोर उभे राहाते. वाचक श्रोत्यांनाही त्या दर्शनानंदाचे समाधान प्राप्त होते आणि अनन्य भक्तीचे निजवर्म अंतरी घर करून राहाते. गुरूदास सांगतो –

**ऐंसा हरी संकटी आठवीता । धाऊनी येतो नीखीलार्थ दाता ।**

**तन्नाम संकीर्तन येक भावे । करीतसे दास गुरूप्रभावे ।।**

### नवोपलब्ध हस्तलिखित – कथा साधन संदर्भ

१. तंजावर, सरस्वती महाल ग्रंथालय, क्र. ५७, दत्तात्रेय मठ देणगी.

२. हस्तलिखित नक्कल वही क्र. २४८. मूळ हस्तलिखित पाहाणेस मिळाले नाही. ३०.१२.१९७९ रोजी नक्कलवहीवरून प्रस्तुत कथा लिहून घेतली.

३. ही स्फुट कथा संपूर्ण उपलब्ध असून विविध वृत्तातून कथाबांधणी केलेली आहे. या कथेत ६ पदे आली असून त्यांना क्रमांक दिलेले नाहीत.

४. या पदात अनुक्रमे (१) श्रीमद्सद्गुरूदास (पद १), 'दास' (पद २), गुरूदास (पद ४) सद्गुरूदास (पद ६) अशा गुरूदासाच्या कविनाममुद्रा आलेल्या आहेत. त्यावरून

ही पदे त्यानेच केलेली आहेत हे दिसते.

५. पद क्र. ५ हा तुकाराम महाराजांचा अभंगच आहे.

६. कथेच्या शेवटी ४३ व्या कडव्यात 'दासगुरू' अशी नाममुद्रा आहे.

७. एकूण ४३ कडवी व ६ पदांची ही कथा आहे.

८. अप्रकाशित ग्रंथसूचीत क्र. ६ राजाराम देणगी विभागात गुरूदासाचे 'पांडुरंग चरित्र' उपलब्ध असल्याची नोंद आहे.

क्र. १३ राजाराम राजासाहेब देणगी विभाग ग्रंथ २ मध्ये गुरूदासाचे प्रल्हाद चरित्र उपलब्ध आहे.

९. कथेच्या शेवटी 'संपूर्ण' अशी कथामर्यादा आहे.

## २) प्रतापरामकृत – चेंद्रहास निरोपण कथा

### १) कविवृत्त – प्रतापराम

प्रतापसिंह कवी हा प्रत्यक्ष राजघराण्यातील पुरूष असून, तो सुविद्य रसिक आणि काव्यमर्मज्ञ असलेला दिसतो. ओव्या, पद, अभंग अशा सोप्या छंदातून, ओघवती भाषेतून 'चेंद्रहास कथा' मांडली आहे. त्यात त्याची भावुकता दिसून येते. त्याचा काळ इ. स. १७३६ ते १७४१ असल्याचे तंजावरच्या भीमराज गोस्वामी यांनी सांगितले. त्याचा राजवंश असा दिला आहे –

शहाजी भाऊ सर्फोजी

↓

तुळजा एकोजी बाबासाहेब

↓

प्रतापसिंह (प्रतापराम कवी)
(इ. स. १७३६ ते १७४१)

हा 'प्रतापसिंह' म्हणजेच प्रस्तुत 'प्रतापराम' कवी असून त्याने 'प्रतापराम केसरी' असाही स्वोल्लेख केला आहे. तंजावर येथे समर्थ रामदासांनी स्थापन केलेल्या मठ संप्रदायाशी व रामोपासनेशी त्याचा संबंध असावा. त्याचे दुसरे एक 'दामाजी पंताचे चरित्र' उपलब्ध आहे.

### २) कथा मूळ

मूळ चंद्रहास आख्यान महाभारतात आले असून, स्वतः प्रतापरामानेच कथासंदर्भ देऊन म्हटले आहे की,

**'जैमिनी भारतीची कथा । वैशंपायन सांगे भारता ।**
**पूर्वी नारदे पांडुसुता । जे तत्वतां कथिली होती ।।२।।'**

अर्थात पांडव वनवासात असताना त्यांना पूर्वीच्या अनेक सत्वकथा सांगण्यात येत होत्या. त्यापैकीच ही एक भक्तकथा इथे सादर केली गेली आहे.

३) कथा-प्रयोजन

कथाकीर्तनातून लोकसमूहापुढे येत राहिलेल्या या कथेचे भक्तिप्रयोजन उघड आहे. प्रतापराम आपल्या कथेचे प्रयोजन स्पष्ट करताना म्हणतो –

**'लाग रे भजनमार्गी सादरी । घडेल बरे तेणे तुमचे ।।७।।'**

**भवसिंधूमाजी नौका । रामनाम हेचि देखा ।**

**श्रीमत्प्रतापराम राम प्रीती । वेगे स्मरा यथामती ।। पद २ ।।'**

अर्थात भवपार होण्यासाठी भक्तीभजनातून चित्तशुद्धी होईल आणि स्वानंदाचे पीक हाती येईल.'पीकेल धन स्वानंद सस्ये ।।४८।।' असे प्रयोजन स्पष्ट होते.

४) मूळ कथाभाग

द्वापार युगातील, केरळदेशीय 'मेधावी' राजाचा एकुलता एक पुत्र म्हणजे 'चंद्रहास' होय. चंद्रहासाच्या बाळपणीच परचक्र येऊन राजा मारला गेला. राणी सती गेली. एका दासीने गुपचुपपणे चंद्रहासाला नगराबाहेर नेले. पुढे ती दासीपण मरण पावते. अनाथ, पोरक्या चंद्रहासाला एके दिवशी नारदांची गाठ पडते. त्यांचा गुरूकृपानुग्रह लाभून राममंत्राची दीक्षा मिळते. नारदमुनी त्याला एक शाळिग्रामही देतात.

इकडे कुंतलपूरच्या राजास चम्पकमालिनी नावाची मुलगी असते. राजा देवभक्त असून, त्याचा सर्व कारभार 'धृष्टबुद्धी' नामक मंत्री पाहात असतो. या मंत्र्याला 'मदन' आणि 'अमल' नामक दोन पुत्र व 'विषया' नावाची एक मुलगी असते. अशा राजमंडळात एके दिवशी ऋषीमंडळी हरिचर्चा करीत बसली असताना तेथे चंद्रहास येतो. त्याच्या शुभ लक्षणावरून हा राजकुमार असला पाहिजे व हा राजा होण्यास योग्य आहे, असे ऋषिजन म्हणतात. तेव्हा लोभी धृष्टबुद्धी, चंद्रहासाच्या घाताचा प्रयत्न सुरू करतो. पण मारेकरी त्यास दूर जंगलात नेऊन सोडून देतात. दैववशात चंदनपूरचा राजा कुलिंद तेथे येतो. तो पुत्रहीन असतो. तो चंद्रहासाची विचारपूस करतो तेव्हां तो सांगतो की,- 'मम माता पिता कृष्णस्तेनाहं परिपालितः ।।' अर्थात श्रीकृष्णच माझे मातापिता सर्व काही आहे. कुलिंद राजा त्याला दत्तक घेतो.

पुढे कुंतलपुरात दशसहस्त्र सुवर्णमुद्रांची खंडणी भरण्यासाठी चंद्रहासची पाठवणी होते. पण वाटेतच मंत्री धृष्टबुद्धीची भेट होते. तो चंद्रहासाला ओळखतो पण वर वर हसून आपल्या पुत्रास एक 'कपटपत्र' देण्यास सांगतो. त्या पत्रात त्वरित 'विष' द्यावे असे लिहिलेले असते.

पत्र घेऊन चंद्रहास निघतो. शेवटी राजोद्यानात विश्रांतीसाठी आडवा होतो. तेथेच त्यास झोप लागते. एवढ्यात त्या मंत्र्याची मुलगी 'विषया' तेथे येते. ती त्या पत्रावरील पित्याचे हस्ताक्षर ओळखून पत्र पाहाते व त्यात 'विष' ऐवजी 'त्वरित 'विषया' द्यावी' असा मजकूर सुधारते. परिणामतः मंत्री येण्यापूर्वीच थाटाने विवाह पार पडतो. पुढे मंत्री आल्यावर हा विपरीत प्रकार पाहून क्रोधाने पुनश्च मारेकरी घालतो. पण इथेही त्याचाच मुलगा 'मदन'चुकून

मारला जातो व चंद्रहास वाचतो. राजाला हे वृत्त समजतं तेव्हा तो आपली कन्या चंपकमालिनी चंद्रहासला देतो व त्याला राज्याभिषेक करतो. हे पाहून मंत्री आत्महत्या करतो. मात्र चंद्रहासाला त्याची दया येते आणि देवी भगवतीची प्रार्थना करून त्या पितापुत्राना जिवंत करतो. शेवट गोड होतो.

ही मूळ कथा प्रतापरामानेदेखील मांडली असून राजकारण, सत्तालोभ, मत्सर, द्वेष आणि संघर्षाने भरलेली ही घटनाप्रधान कथा त्याने भक्तिप्रधान बनविली आहे.

### ५) कथा-बांधणी,स्वरूप-विचार

मूळ महाभारतीय कथा कीर्तनोपयोगी स्वरूपात भक्तिरंजकतेने लोकसमूहापुढे ठेवताना ओवी, अभंग, पदे, विविध वृत्ते या सर्वातून त्याने कथाबांधणी केली आहे. कथानिवेदनात त्यांनी धावते ओवी वृत्त वापरले आहे.

या कथाबांधणीत पारंपरिक पद्धतीप्रमाणे प्रारंभी गणेश, शारदा, सद्गुरु, यांना नमन केले आहे.

**'करूनी द्विरदाननासि नमन । सरस्वतीचे वंदुनि चरण ।**
**सद्गुरुपद माथा धरून । चंद्रहास कथन कथिजेले ।।१।।'**

या कथाबांधणीत ३॥ चरणी व ४॥ चरणी अशा ओव्यांची बांधणी असून स्वरचित अभंगांची पेरणीही त्याने केली आहे.

तंजावरकडील राजघराण्यातील एका राजपुरुषाने चंद्रहासाची कथा मांडावी यातील औचित्य काही आगळेच आहे. दक्षिणी संगीताची अभिरुची त्यातील अभंग पदातून उतरली आहे. तो म्हणतो - 'नाम घेता राघोबाचे । काय वेचते तुमचे ॥' यातील 'राघोबाचे' शब्द रामदासी पठडीतील शोभतो. या कथाबांधणीत अजामेळ, ध्रुव, शबरी, सुग्रीव, बिभीषण, गजेंद्र इत्यादिकांच्या उद्धाराचे दाखले मांडून,त्याने भक्तीच्या मुख्य आशयास उठाव आणला आहे.

इथे मराठेशाहीच्या उतरत्या, पडत्या काळात राजघराण्यातील हा पुरुष भक्तिसंदेश मांडत असला तरी काळाची वास्तव भेदकता जाणविल्याशिवाय राहात नाही.

### ६) व्यक्तिचित्रण – चंद्रहास

प्रतापरामाने चंद्रहासाचे व्यक्तिचित्रण विलक्षण जिव्हाळयाने मांडले आहे. त्याच्या दृष्टीने 'चेंद्रहास कुमर । भक्ताग्रेसर हरिचा जो ॥२॥' असेच असून,हेच सूत्र धरून त्याने चंद्रहासाचे शब्दचित्र रेखाटले आहे.

चंद्रहास हा राजकुमार असून बालपणीच परचक्राने आलेल्या धाडीत मातापित्यापासून तो पोरका बनला. एका दासीच्या घरी त्याला जीवन कंठावे लागले. पण अंतरी अखंड भक्ती होती. इतर बाल-सवंगड्यानाही तो भक्तीचाच उपदेश करताना दिसतो.

मुनी विप्रांच्या आशीर्वचनांनी तो राजा होणार असल्याचे भाकित वर्तविले जाते. पण दुष्ट मंत्री त्याच्या घातास उद्युक्त होतो. श्रीहरीकृपेने प्रत्येक प्राणघातक संकटातून तो पार पडतो. शेवटी त्यास राज्याभिषेक होतो.

सारांश, या चंद्रहास कथेत स्वतः प्रतारामाचा कुठेतरी धागा जुळलेला असावा. वारंवार प्रकट केलेल्या भक्तीच्या आळवणीत त्याचे अंतःकरणच प्रकटलेले जाणवते. राज्यापहृत राजकुमाराचे अंतरंग जाणून प्रतापरामाने चंद्रहासाच्या रूपात श्रीहरीची भक्ती वास्तवपूर्ण रीतीने प्रकट केलेली दिसते.

### नवोपलब्ध हस्तलिखित कथा-साधन संदर्भ

१. तंजावर सरस्वतीमहाल ग्रंथालय क्रं. ६० हस्तलिखित बुक साइझ वही ८' × ५' अंदाजे काळ्या शाईतील मोठी गोल अक्षरे.

२. संपूर्ण कथा उपलब्ध असून कथेच्या शेवटी 'इतिश्री चंद्रहास चरित्र समाप्त ।।' अशी कथामर्यादा दिली आहे.

३. अभंग पदातून श्रीमत्प्रतापराम, प्रतापराघव इ. नाममुद्रा आल्या आहेत.

## ३) श्री उटके गोविंदकवि कृत श्रीउमारमा संवाद

### १) कविवृत्त

उटके गोविंदा हाच तंजावर येथील 'शरभभूप' राजाचा आश्रित कवी असल्याचे त्याच्या प्रस्तुत काव्यावरून दिसून येते. शरभ भूप म्हणजे सर्फोजीराजे असतील तर त्याचा काळ इ. स. १७०० च्या आधीचा ठरतो. स्वतःसंबंधी हा पंडितकवी लिहितो की,

**'श्रीमत्तंजानगरी न्याये जो शरभ भूप राज्य करी ।**
**त्याचा आश्रित उटके गोविंदाभिद अशे करी चुटके ।।२९।।'**

'उटके' शब्दाचा संबंध तत्कालीन कांही घटनेशी किंवा ग्रामनामाशी असावा

हा दरबारी कवी शिवभक्त दिसतो. तंजावर येथे प्रचंड बृहदाकाराचे एक शिवमंदिर असून, 'बृहदीश्वर' या नावाला सर्वार्थाने सार्थ ठरावे असा त्याचा आकार प्राकार आहे. सभोवार खंदक असून, गोपुरांकित दोन तटबंदीच्या आत हे विशाल उत्तुंग मंदीर असून दोन पुरूष उंचीची शिवपिंडी आहे. समोर हत्तीच्या आकाराचा महानंदी आहे. तंजावर हे राजधानीचे ठिकाण असून, तेथील शिवभक्त राजाचा हा शिवभक्त कवी आहे. प्रस्तुत कथेत त्याने 'गोविंदाचा विभू शिव ।।अभंग १३।।' गोविंद विभू महादेव ।।३३।।' 'गोविंद विभू शंकराला ।।अभंग ४४।।' इ. ठिकाणी आपल्या दैवताचा स्पष्ट निर्देश केला आहे.

आपल्या कथेत त्याने उटके गोविंद; गोविंद कवी; गोविंद अशी कवि-नाम-मुद्रा दिली असून त्यावरून 'गोविंद' हेच त्याचे नाव दिसते.

### २) कथा स्वरूप – आस्वादक विवेचन

उटके गोविंदकृत 'उमा-रमा-संवाद कथा' २९ आर्यांची असून या आर्यावृत्तातील कथेत मधूनच दोन पदे व पाच अभंगांची पेरणी केलेली आहे. अशा प्रकारच्या कथा बांधणीवरून या स्फुट आख्यानाची रचना कीर्तनोपयोगी असावी असे दिसते. संतकाळातील भक्तिप्रधान कथा पंडिती काळात रंजकतेचे वळण घेत असलेली प्रस्तुत कथेवरून दिसून येते. शाहीर प्रभाकरानेदेखील 'लक्ष्मीपार्वती विनोद' या नावाची अशीच एक कथा शाहिरी थाटात मांडली

आहे. अर्थात रंजनाचे परिमाण इथेही या स्फुटकथेला लाभले आहे.

**रंजक आशय**

या स्फुट आख्यानातील आशय गंभीर नसून, अत्यंत हलकाफुलका असाच आहे. हरिहर ऐक्याचे दर्शन लक्ष्मी पार्वतीच्या संवादातून रंजकतेने मांडले आहे. लौकिक व्यवहारी जगातील दोन बायकांची आपापल्या नवऱ्याचा मोठेपणा सांगण्यात चाललेली चढाओढ सहजी समोर यावी इतक्या सहज रंजकतेने हा 'उमारमा संवाद' चालला असून, एकमेकींची उणीदुणी काढून चढविलेले हल्ले-प्रतिहल्ले हरिहरांच्या अवतार कार्याचे स्मरण करून देतात. या कथाश्रवणातून हरिहर ऐक्याचा आध्यात्मिक संदेश जसा अंतरी ठसतो, तसाच उमा तीच रमा आणि रमा तीच उमा-हे अद्वैत शक्तितत्त्वही समोर येते. रंजनाच्या पातळीवरील हा रंजनकथेचा आविष्कार मनोरम आणि वेधक असाच आहे.

**कथा रचनातंत्र**

या कथेचा रचनातंत्राच्यादृष्टीने विचार करता प्रारंभी कवीनें गणेशवंदन करून – 'प्रार्थुनी विनायकाते ।' हरिहरांना वंदन केले आहे. पुढे कथा-प्रस्ताव येतो-'कथितो मी श्रीउमारमावादाते ॥१॥' पुढे मग कथा सुरू होतो. प्रारंभ हरिहर ऐक्याने होतो व कथेचा शेवटही या ऐक्यदर्शनानेच होतो.

वास्तविक पाहाता, उटके गोविंद हा संस्कृत पंडित असून राजाश्रित दरबारी कवी आहे. तरीदेखील प्राकृत लोकांसाठी, 'प्राकृतमतीने' त्याने हे प्राकृतात काव्य रचले आहे. त्याने स्पष्टपणे तसा खुलासाही केला आहे. तो सांगतो-

**'रचिली नूतनभंगी प्राकृत मतिने आम्हीच यालागी ।।२।।'**

**'परिचयही सुरवाणीचा असता भाषेत रिघवितो वाणी ।।२।।'**

अर्थात 'सुरवाणीचा' म्हणजे संस्कृतचा व्यासंग असूनही, त्याने मुद्दाम प्राकृत भाषेत 'वाणी रिघविली' आहे. जाणत्यानेणत्यासाठी त्याने ही प्राकृत-रचना केली आहे.

**कथाभाग**

उमा म्हणजे पार्वती आणि रमा म्हणजे लक्ष्मी यांच्या संवादाचे रूपांतर वादविवादात होऊन 'निजपतीभक्ती' प्रकट करण्याची स्पर्धाच लागते. त्यांच्या प्रश्नोत्तरांचा प्रसंग अद्भुतरसपूर्ण असून हरिहरांचे अवतारकार्य मांडून, अद्वैत दाखविणे असा कथाभाग संवादरूपाने प्रकटला आहे. कवी लिहितो –

**'आधी उमा वदे ते अनुगुण उत्तर रमाहि मग देते ।**

**अद्भुतरस हा ऐसा त्याते मजवरि कृपा करूनि परिसा** ॥आर्या ६॥'

मग पुढे ही संवाद-कथा खटकेबाज संवादातून सुरू होते ती अशी-

१. उमा : प्रत्यक्ष लक्ष्मीच पत्नी असताना बळीराजापुढे बटू वामनरूपाने याचना कां करावी ?

२. रमा : याचक असलेल्या शिवाचा सहवास घडला म्हणून. (विष्णू शिवाचे ध्यान

करतो. म्हणून अखंड सहवास. यावर रोख)

१. उमा : माझ्या पतीने काळकूट विष प्राशन करून देवांचे रक्षण केले.

२. रमा : यात काय मोठेसे ! बालपणीच पूतनास्तन प्राशून प्रभूंनी विषपानाची आपली महान शक्ती दाखविली आहे.

१. उमा : एकदा तुझा पती घाबरून पळत सुटला (कालयवन प्रसंगी)

२. रमा : त्यानेच अनेक मायावी असुरांचा वध केला आहे. (भस्मासुर प्रसंगी शंकर पळत सुटले होते इकडे रोख.)

१. उमा : ज्याने तृतीयनेत्राने त्रिपुरासुराला जिंकले.

२. रमा : साठ सहस्र सगरपुत्रांना एका निःश्वासात जिंकले तिथे तीनच काय ? (कपिलमुनींनी सगरपुत्रांना जाळून टाकले व 'सिद्धानां कपिलो मुनिः ।' असे श्रीकृष्ण स्वतःची विभूती सांगतात इकडे रोख.)

१. उमा : शिवाने त्याच्या (श्रीकृष्णाच्या) सज्जवीर अशा पुत्राला (मदनाला) जिंकले.

२. रमा : खोटे कां बोलावे ? प्रत्येकाच्या देहातच मदन आहे. तुला देखील तो कां घाबरतो ? शिवाने तुलादेखील देहीच धारण केले आहे. (अर्धनारी नटेश्वराकडे रोख.)

१. उमा : तुझा पती माझ्या पतीपुढे वनिता झाला (मोहिनी रूपात)

२. रमा : तो जर वनिता झाला नसता तर तुझा पती तुला परता मिळाला नसता इ.

१. उमा : उपमन्यूला क्षीरसागर दिला.

२. रमा : ध्रुवाला समस्त भुवनांचे अढळपद दिले.

१. उमा : रावण राक्षस असूनही त्याने तप केले म्हणून वर दिला.

२. रमा : भक्ताला कोणीही वर देईल; पण तोच राक्षस शत्रू असूनदेखील त्याच्या भावास (बिभीषणास) लंकेचे राज्य दिले.

उभयतांचा हा 'संवाद' आणखी असाच पुढे चालतो. उखाळ्या पाखाळ्यांना ऊत येतो. आणि साध्या साध्या गोष्टीचेही निर्देश सुरू होतात. ते ख़ास लक्षणीय आहेत.

१. उमा : एका पीतांबराशिवाय दुसरे वस्त्र नाही, कशाला मोठेपणा सांगतेस ?

२. रमा : होय बाई ! दिगंबर असण्यापेक्षा एक पीतांबर पुरवला.

१. उमा : परदारा भोगणाऱ्याचा कशाला कैवार घेऊन बोलतेस ?

२. रमा : माझ्या पतीने दुसरी बायको करून (गंगा) डोक्यावर तर बसविली नाही ना ?

१. उमा : शिवमहिमा थोर असून तो कंठात सर्पमाला घालतो.

२. रमा : म्हणूनच तो सदैव जागृत राहातो. पण माझा पती त्याच सर्पावर निद्रा करतो.

१. उमा : बायको तरी कशी बाई ! (लक्ष्मी) वेड्या मुक्यालाही वाचाळ बनविते.

२. रमा : त्याची बायको तरी काय ? जाईल तेथे हरण केली जाते. (लंकेची पार्वती. रावणानेच पार्वती पळविली इकडे रोख.) इ. इ.

अशा रीतीने हा नाट्यपूर्ण संवाद आकर्षक रूपात उभा राहातो. दोन्ही स्त्रीपात्रेच असल्याने स्त्रीमुखातील वादाची एक घरगुती धार या संवादास लाभली आहे. पद्यबांधणीतूनच हा सर्व संवाद अखेरपर्यंत पेलून धरण्यात लेखनशैलीचे सामर्थ्यही दिसून येते.

**प्रासादिक वेधक संवाद**

१. या संवाद तंत्रबांधणीत कवीने प्रारंभीच एकदा 'आधी उमा वदे' असा संवादक्रम रेखून घेतला असल्याने, पुढे कुठेही पद्यबांधणीत 'उमा' 'रमा' असा पात्रनिर्देश करावा लागलेला नाही आणि आश्चर्य म्हणजे नामोल्लेख नसतानाही संवादवाक्याची तिरकस खोच लक्षात घेता कोणी कोणास उद्देशून वाद केला आहे याचा सहजी उलगडा होत जातो. ही प्रासादिक सहजता विशेष लक्षणीय ठरते.

२. मात्र या वादातील सर्वच वाद प्रश्न समजण्यासाठी श्रोत्यांचीदेखील कांही एक बहुश्रुतता अपेक्षित आहे. किंबहुना, हे पंडिती काव्यच असल्याने सर्वसामान्य नेणत्या श्रोत्यांनाही किमान जाणतेपण असणे अगत्याचे आहे; अन्यथा त्यातील संवादातील संदर्भकथांची खोच पुरतेपणी लक्षात येणार नाही.

३. शेवटी उमा, रमा या एकाच परमात्माच्या अंगभूत शक्ती असल्याचे दोघीनांही समजून येते. उटके गोविंद लिहितो –

**'मानी उमा शिवाते भासे लक्ष्मीसी तोचि निजकांत ।।'**

अशा रीतीने अद्वैत बोधाने गोड समारोप घडून येतो.

**नवोपलब्धकथा – साधन संदर्भ**

१. तंजावर, सरस्वती महाल ग्रंथालय, मराठी विभाग क्र. १९२ अमानत सेक्शन.

२. तंजावरस्थ शरभभूप राजाचा आश्रित उटके गोविंद कवीने आर्या वृत्तात ही कथा लिहिली आहे.

३. या कथेत एकूण २९ आर्या, ५ अभंग आणि २ पदे असून संपूर्ण कथा उपलब्ध आहे. यातील केवळ ९ आर्या व्यवस्थित असून, उर्वरित अनियमित रचना दिसते. म्हणजे दुसऱ्या ओळीत दुसराच अनुप्रास आहे.

**समारोप**

एकंदरीत या तंजावरस्थ कवित्रयांचा प्रस्तुत प्रकरणात विचार करता पंडिती काळातील या कथा रंजनाकडे अधिक झुकलेल्या दिसतात. भक्तीचे सूत्र पकडून लोकप्रबोधनार्थ ही रंजक कथाबांधणी घडलेली दिसते. या रचनेत केवळ वृत्तबद्धता नसून ओवी, अभंग, पदे, विविधवृत्ते इ. सर्वांची सरमिसळ झालेली आकर्षक संमिश्र रचना दिसते. त्यातून त्यांनी रसनिर्मिती; घटना प्रसंगाची उभारणी आणि जिवंत व्यक्तिचित्रण करून प्रभावी कथा उभी केली आहे.

एकपात्री प्रयोगाप्रमाणे कीर्तन माध्यमातून; एका लघु अवकाशात या पंडित कवींनी 'दृक्श्राव्य' मूल्य असलेली देखणी स्फुटकथा साकार केली आहे. दाक्षिणात्य संगीताभिरूची जोपासून मृदुंग, टाळ, वीणा, चिपळयांच्या घोषात उभ्या राहिलेल्या या कथा लोकाभिराम ठरल्या आहेत.

## परिशिष्ट १

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयात मिळालेल्या हस्तलिखितातून नकलून घेतलेल्या अप्रकाशित अशा नवोपलब्ध स्फुट आख्यान काव्यांच्या कांही यथामूळ संहिता रसिक अभ्यासकांसाठी येथे देत आहोत. सदरची आख्यानकाव्ये प्रथमच प्रकाशित होत आहेत. ती अशी -

१. **आनंदतनय कृत** – प्रल्हाद चरित्र.
२. **आनंदतनय कृत** – सुधाम चेरित्र.
३. **आनंदतनय कृत** – मार्कंडेय चेरित्र.
४. **गुरुदास कृत** – प्रल्हाद चरित्र (कडाका छंद)
५. **चिंतामणिसुत रामनाथ कृत** – प्रल्हाद चरित्र.
६. **प्रतापराम कृत** – चेंद्रहास निरूपण.
७. **अनाम कवी** – दामाजीपंताचे चरित्र.

तंजावर येथील कवींच्या काव्य रचनेचे व भाषेचे स्वरूप ध्यानी यावे आणि तंजावरी प्रतिभेचे दर्शन घडावे म्हणून ही मूळ संहिता सादर केली आहे.

✿ ✿ ✿

श्री गुरुभ्योनमः

## प्रंल्हाद चेरित्रं प्रारंभः

राया ऐक परिक्षीती क्षितिपति पुर्वी कथा वर्तिली ।
यैकें तु करणत्रये कडुनिया जे वंद्य पुण्यार्चिली ।।
हे जें यैकति आदरे नृपवरा गाथा दया वारिदा ।
त्याच्या होतील आंखील्या निशीदिनी गौरीरमा शारदा ।।१।।

पुर्वी एक हिंरण्यकश्यप जगी दैत्येश मोठा बळी ।
होता वीर पराक्रमी नृपवरा प्रख्यात भुमंडळीं ।।
ज्याने आणुनी घातली स्वसदनी बंदी सुराची थळीं ।
ज्याते वंदीती मस्तके कडुनियां पाईचा भुपावळीं ।।२।।

ज्याची यैकुनी दुंदुभी फणीपती गेला चकोनी तळीं ।
ज्याला देखुनी कांपते थरथरा धाके धरा मंडळी ।।
त्याची आत्मवधु पयोज वदना नामें कयाधु सती ।
मोटी सजेन चांगली अनुदिनी धर्मी जयेची मती ।।३।।

यैसी दानव योषिता स्वसदनी अस्ता सुराची धणी ।
आला सत्वरें घेउनी मग तिला नेले स्वलोका झणीं ।।
जैंसी त्या पतगेस्वरें सुरधा स्वर्गीहुनी आणीली ।
तैसी नेउनि वासवे अरिवधुं भूपालई ठेवीलीं ।।४।।

होती सगर्भ सदनी बहु गौरवाने ।
शोभे तीची तनु नृपा अति गौरवाने ।।
ते गा वीयोग पतिहीन दनु न साहे ।
कधि लोटी घडी पतिविना मनिं युग साहे ।।५।।

यैसी सुनीळ कबरी दनुजेंद्र दारा ।
साधू सलक्षणा मुखी चतुरा उदारा ।।
अत्यंत चारु नयना तने पीतवर्णा ।
पतिव्रता तर शुची जनी ते अपर्णा ।।६।।

बंदी नेउनी घातली सुरवरे अस्ता कयाधु बळें ।
तेथे जाउनी नारदें अनुग्रहो केला कृपा आगळें ।।
ज्ञानी सुंदर शाहणा सुत भला तेजे रवी सारिखा ।
यैसा होईल तुजला चिरंजीवी मोठा हरीचा सखा ।।७।।

देता असां वर तिला मुनि नारदानें ।
वंदी तया पदयुगीं अति सौहृदानें ।।
येईल कीं सुत असा म्हणऊनी पोटा ।
ते पावला मनी नृपावधु हर्ष मोठा ।।८।।

गेला नारद देउनी वर तिला वेंगीं वीधीच्या पुरा ।
गाथा सर्व निवेदीली मुनीवरें धात्या पुढे भूवरा ।।
तो तेथें दनुजेस सेवक झणी रायाप्रती सांगती ।
स्वामीणी आमुची पुरेहुतें नेली कयाधु सती ।।९।।

वार्ता वार्तिक सांगतां प्रभुप्रती ऐकेनी रागे मनी ।
हाती घेऊनी खड्ग बाण धनुतें चाले धरा लंघुनी ।।
डंका दुंदुभि वाजवीत करणे भेरी विणे काहळे ।
× × × × × ।।१०।।

संगे घेउनी चालिला दनुज तो वीरा (ग्र) चुडामणी ।
स्वर्गी स्वर्गपतीस जिंतुनि पुन्हा ते आणीली कामीनी ।।
होती दौहृत दानवाधिपवधु तो गा प्रसुती तदा ।
जाली पुत्रवति कयावधु सती तेव्हां स्मरे नारदा ।।११।।

जाऊनीयां झडकरीं अजि भार्गवाने ।
जी जाहला सुत तुम्हा अजि भाग्यवाने ।।
सांगें आसा कुलगुरू दनुजेस्वराला ।
जाला मनीं बहुत हर्ष नृपा तयाला ।।१२।।

जाहलें दिन दहा द्वय बा रे ।
बारसे मग करी प्रभु बा रे ।
मानसी बहुत सभ्रंम मानी ।
जाणता प्रमुख तो वरमानीं ।।१३।।

देउनीया नाम तया सुताला ।
प्रल्हाद ऐसें म्हणुनीच त्याला ।।
तो आवडे फार सदा पिताला ।
जो जाहला वंद्य जगीं बुधाला ।।१४।।

जी जाहला वत्सर पांच त्याला ।
घाली पढुं तो नृप नंदनाला ।।
पाचारूनी सीघ्र पुरोहिताला ।
याला सुविद्या सिकवा हिताला ।।१५।।

बोलें तदां कुळगुरु दनुजाधिपाला ।
पाहोनीया अजि मुहूर्त बरे कृपाळा ।
योगादी कर्ण अवघे आणुनी मनाला ।
अभ्यास मी करिन वर्ण तुझ्या सुताला ।।१६।।

तेव्हां येक मुहुर्त पाहुनि बरें आला कवी मंदीरी ।
सांगे पाहुनी दानवा प्रती झणी आहे अजि भुवरी ।।
विद्यारंभ करावया तव सुता पाचारि गा सत्वरीं ।
विद्यारंभ यशस्करी झडकरी होईल यैकें सरी ।।१७।।

बोलता कुलगुरु दनुज्याने ।
बाहीला तनय सत्वर त्याने ।।
घातलें पढुं तया गुरुपाशी ।
शीकवा म्हणतसें आजपाशी ।।१८।।

सांगोनी ययापरि तो कवीला ।
गेला त्वरें दानव जी सभेला ।।
तदां घालुनी ते मुलाला ।
सार्वर्ण सांगे गुरू तो तयाला ।।१९।।

ॐकार आदी करुनि अजि वर्ण साहा ।
सांगे गुरू बसुनि मंत्र बरा असा हा ।।
प्रल्हादजी म्हणतसे गुरूला अवोजी ।
आला मला तव कृपें कडुनीच वोजी ।।२०।।

प्रल्हादास म्हणे गुरु झडकरीं वाची मुला ना पुढें ।
तो तेव्हां गुरुला म्हणे नमुनीया नाना पुढे ना पुढे ।।

ॐकारावरी वर्ण आणीक दुजा नाहीं जगीं पाहता ।
शास्त्रें वेद पुराण जाणुनी पुन्हां का बा असे बोलता ।।२१।।

ॐकार माझ्या रुचला मना जी ।
स्वामी कदापी न म्हणे न ना जी ।।
याहुनीया वर्ण दुजा कथा जी ।
नाहीत लोकत्रयी सर्वथा जी ।।२२।।

असे वचन मुलाचे ऐकुनी कोप मानी ।
कुलगुरू दनुजाचा थोर दीर्घाभिमानी ।।
मग म्हणे कवि रागे दानवाच्या सुताते ।
करिन तुजचि सीक्षा सांगुनी त्वत्पित्याते ।।२३।।

ऐंसे बोलुनि घेतला मग करि मारावया फोक जी ।
प्रल्हादास दुजा करीं धरूनीयां हाणी बळे झोक जी ।।
आता तु जरि जो बरि न म्हणसी नामासी घें सत्वरीं ।
सीक्षीतों तुज निश्चयें समज गा मूढा बरे अंतरी ।।२४।।

पाटी घालुनी बैसवी पुनरपी ल्याहावयाला तदां ।
तो प्रल्हाद म्हणे गुरूते नमुनी मी ना म्हणे ना कदां ।।
ॐकारा उदरीच जी निपजली पन्नास वर्णावलीं ।
जैंसी ते भुवनत्रयें हरिचिया पोटीच सामावली ।।२५।।

ऐंसे ऐकुनि कोपला उषन तो काळाग्नि रुद्रापरीं ।
कोणे हे तुजला मुला सीकविलें सांगे मला लौकरी ।
स्वामी मी जठरींच त्या जननीच्या अस्ता मुनी नारदें ।
केला निर्जर भूवनी अनुग्रहो मातें दया वारि दे ।।२६।।

जाला देशीक घाबिरा दनुवराचारे तदां ऐकुनी ।
गेला सत्वर दानवा जवळि तों सांगावया धाउनी ।
हाती दंड कमंडला धरुनीया येता कवी पाहुनी ।
जाता सन्मुख जाहला दनुज तो वेगें सभा सोडुनी ।।२७।।

पुसे जोडुनी पाणी पद्म युगुळें राजा कवी तें तदां ।
आज्ञा काय असेल ते मजप्रती स्वामी त्वरेंने वदा ।।

राया त्वत्सुत सर्वथा न म्हणता ॐकार वर्णावीना ।
याचा यत्न असेल तो तुम्ही पाहा माझ्या करें होईना ।।२८।।

ऐसां भाव सांगतां असुर तो ऐकोनीयां कोपला ।
जैसा पावक पर्वति तृण लता जाळी तसा भासला ।।
पाचारूनी झणीच सेवकगणी आज्ञा करीं तत्क्षणी ।
आणा त्या सुत वोढुनी धरूनीया वेगें सभारंगणी ।।२९।।

परिसुनी नृपवाणी यापरी सेवकांनीं ।
पदयुगुळ तयाचे वंदुनि मस्तकानी ।।
त्वरीत गती निघाले दूत ते दानवाचें ।
करी धरुनी मुलाला बोलती क्रूर वाचे ।।३०।।

प्रल्हाद तेव्हां म्हणे चाकराला ।
कां रें तुम्ही झोंबतसा कराला ।।
पाचारीलें आजी नृपें तुम्हाला ।
जाऊं चला सत्वर जी सभेला ।।३१।।

आले शेवक घेउनी धरुनीया दैत्यात्मजाला सभे ।
राया सन्निध टाकुनी निगदिता मागे सुताच्या उभे ।।
तो तें बाळक मस्तके कडुनिया वंदुनी पादांबुजे ।
बैसे जाऊनी त्या पित्या जवळी तो जोडुनी हस्तांबुजे ।।३२।।

नृप पुसे तनयाला हात वेगे धरूनी ।
सीकवीली तुज विद्या काय ते गा गुरूनी ।।
झडकरीं मजपासी वाचुनी दाखवी रे ।
श्रवण युगुळ माझे तुंब रे नाववो रे ।।३३।।

ॐकारा प्रणवावरी जगी नसे विद्या नृपा शोधीता ।
शास्त्रे धुंडुनी पाहता हरीवीना नाही भय त्रासीता ।।
दाता दीन दयाकृपाळ म्हणुनी वैकुंठ कंठीरवा ।
ध्यातो मी मनी मानसी निशीदीनी राया तराया भवा ।।३४।।

ज्याच्या आज्ञे रवीशशी फीरती स्थीर राहे पयोधी ।
वायु चाले भीती हरति जग नृपा औषधी सर्व व्याधी ।।

माथां वाहे सदा तो धरणिधर धरा साक्षी हेचि उदारा ।
श्रृष्टी नियमवधीत्ता सजल जलद ते वर्षती अंबुधारा ।।३५।।

ऐसें ऐकुनी कोपला दनुज तो कीं दक्षहंता परी ।
किंवा सद्यगामी क्षुदांत उसले कोपोनि मर्त्यावरी ।।
किंवा पन्नग देखुनी पतग ती मारी जसा झेंपजी ।
'तैसा सत्वर धाऊनी सुतशिरी हाणीतली लात जी ।। ३६ ।।'

पाचारी दनुजेश शेवक झणीं आज्ञा करी तत्क्षणीं ।
शत्रुचा बडवार पार वदतो याची करा वोढणी ।।
न्या रे सत्वर वारधींत बुडवा पाईं जळी तुडवा ।
घाला कर्वति पर्वता वरूनीया वेगे तुम्ही लोटवा ।।३७।।

पाशाणीं बडवा दरीत खडवा व्याघ्रामुखी जुडवा ।
धोरे या बडवा नळामुखि झणी व्याळा करे डंखवा ।।
ऐंसे ऐंकुनी उठिलें भले भले जे दूत नामाथिले ।
प्रल्हादासी करें धरोनी निकरें नेते त्वरे जाहले ।।३८।।

जलधीहि बुडवीना बूडवील्यां तयासी ।
अनंळही अतळेना सर्वथाही नखासी ।।
विषधरहि डसेना कांही केल्या तनूला ।
नुचली वरि मुखाते जीत रक्षी कृपाळा ।।३९।।

रायापासी सांगती दूत वार्ता ।
जी जी आज्ञा ऐक तू क्ष्मा विभर्ता ।।
आज्ञा जैंसी त्या परी त्वत्सुताला ।
केल्या कष्टी ना ढळे तो कश्याला ।।४०।।

नेला पर्वति लोटीला हुतवही नेऊनिया घातला ।
अब्धी बूडवीला पदे तुडवीला द्वीपामुखी दाटीला ।।
व्याळे दंसविला सीळीं बडविला शस्त्रे करें तोडीला ।
हा भीनाच कस्यासही पुनरपी राया पुरा पातला ।।४१।।

जेंव्हां नेऊनि पर्वतावरुनीयां जी लोटिता सत्वरी ।
तेव्हां तोचि स्मरे हरी हरी नारायेणा श्रीहरी ।।

जैसे पुष्प पडे झडोनि अवनी राया तरूपासुनी ।
तैसा त्वत्सुत पर्वती ढकलिता आला अजि मेदिनी ।।४२।।

पुसे गुरूला नमुनी कराने ।
रागे दनु बैसुनी नीकराने ।।
हा जी मरेना सहसा कशाने ।
सांगा दुजा येत्न बरा त्वरेने ।।४३।।

विष करिं जननीच्या देउनी घालवावो ।
सहज गुणाचि ते गा दाखवी वीखभावो ।।
न चुकल मग त्याला जाण पंचत्व राया ।
परिसुनि गुरूवाणी बाहीली आत्मजाया ।।४४।।

पाचारूनी दनुवरे सदसीत कांता ।
तो जाहला विष करी तिचियाची देतां ।।
देई त्वरें तव सुता विष हेचि सांगे ।
तो वाचुनी शयनी नीज न ये मला गे ।।४५।।

नमुनी पद पतीचे कामिनी लेकरासी ।
धरुनी करिच नेला वोढुनिय्या घरासी ।।
बसउनि मग ताटी पाट मांडोनि बाळा ।
मिसळुनि विष अन्नी वाढिले जी तयाला ।।४६।।

जेऊनिया बाळक त्रुप्त जालें ।
दूतीं पुन्हां त्या सदरेसि नेलें ।।
पुत्राकडे पाहुनिया गुरुला ।
पुसे कसा वाचुनी आजी आला ।।४७।।

झोंबना नृपवरा विष याला ।
झोंबेना म्हणुनि हा विषयाला ।।
रक्षितां निजजना हरी तो रे ।
जो जगीं भवभया हरीतो रे ।।४८।।

कोपे पुसे दानव तो सुताला ।
आहे तुझा वारीस कोण त्याला ।।

दावी मला वंश हुताशना रे ।
दृष्टीं तया पाहीन येकदा रे ।।४९।।

पार्थी पावकी मेदीनींत पवनी कीं तो दिशी अंबरी ।
मार्तांडी शशी मंडळी महीतळी भावी अभावीं दरी ।।
जी जीवींच अचेतनीच विभवे आहेचि अंतर्बही ।
तूझ्याहिं मजमाजीही हरिसवे आब्रम्ह लोकासही ।।५०।।

रागे लेंका बाहुनीं त्या पुसे रे ।
आहे आतां सांग कोठे हरी रे ।।
सांगू राया मात राहो कीती हे ।
आहे स्तंभीं सत्य जाणा गिरा हे ।।५१।।

ऐंसे ऐकुनी दानवेश उठिला कोपोनि हस्ती परी ।
हाणी लात बळी बळेंची कडुनी धावोनी खांबावरी ।।
तो तो स्तंभ तडाडिला प्रति रवें ईंदु रवी थोकले ।
पाताळी फणीराज ही दचकला दंती दडो राहिले ।।५२।।

तारा सर्व झडाडिल्या नभिहुनि झाला सडा मेदिनी ।
चिंती ते ग्रह धाकले दचकले दिक्पाळ सारे मनी ।।
अब्धी अंतरी सप्तही डहुळले कांळादिही कापलें ।
स्तंभी संभवता हरी अमरही नाना फुले वर्षले ।।५३।।

स्तंभापासुनि बाहेरी उसळला वैकुंठीचा केसरी ।
जैंसे कोटी रवीनभी उगवलें पूर्वेस येकेसरी ।।
कींवा कोटी तडिल्लता चमकल्या त्या मेघमाळांतरी ।
तैंसा तो नरकेसरी प्रगटला वेगेंची भूमीवरी ।।५४।।

जंभा देत उकावला नरहरीं गोळा जसा यंत्रिचा ।
तैंसा जाउनि झोंबला दनुगळा तो ईश वैकुंठीचा ।।
केले कुस्त अरी समस्त हरीनें संध्यामुखी तांतडीं ।
काढी पोट चिरोनिया चरचरा बाहेरी तो आतडी ।।५५।।

देवे दानव मारिला धरुनीया मांडीवरी चीरिला ।
हो रे बाप चिरंजीवी म्हणुनीया प्रल्हाद संबोखला ।।

ऐंसा तो वर देउनी मग तया जी भेटला श्रीपती ।
पुष्पें अंबरीं वर्षले सुरमनी जाई जुई शेवंती ।।५६।।

ब्रम्हा ईंद्र महेश्वरादि करुनी सारा सुराचा फरा ।
गातो सुंदर शंदनी नभी तटी बैसोनि पद्मावरा ।।
देवा दानव भंजना मुरहरा कारुण्य रत्नाकरा ।
कृष्णा अंबुज लोचना नरहरी दामोदरा सुंदरा ।।५७।।

कृपाळा भूपाळा नवविकच कल्हार नयना ।
मुकुंदा मंदारा सकळगुण सांद्राब्धि शयना ।।
करी तो गोपाळा नमन तव साष्टांग चेरणा ।
दया दृष्टी माते कडुनि निरखी पाप हरणा ।।५८।।

ऐसी कथा शुक मुखेंचि परिक्षीती ते ।
सांगे सुखे बैसुनीयां क्षितीते ।।
ऐके तदा नृपति तो सहज स्वभावे ।
आनंद नंदन कथी गुरुच्या प्रभावे ।।५९।।

।।इती श्री प्रल्हाद चेरित्र सम्पुर्ण ।।

संदर्भ : दत्तप्रसाद मठ वही
वही अंदाजे १०" × ८"
पान नं. १८६ ते १९०

श्री वेदव्यासाय नमः

## सुधाम चेरीत्र

।।पद १।।

आसे हे देवाची करणी ।।धृ.।।
पाण्यावरी न विरेल लवलेशहिं । पाउसमय धरणी ।।१।।
आकासी नीसीवासर फीरती । तारा शसी तरणी ।।२।।
अकस्मित गगनि घन जडती । पडती जग भरणी ।।३।।
शेषें हे धरीलें महीमंडले । येक्या फणी सरणी ।।४।।
आनंदात्मजे जाणुनि नमीतो । श्रीहरीच्या चेरणी ।।५।।

।।श्लोक।।

देखुनी तुष्टि मनी मुष्टी भरीचे पोहे ।
ज्याची कथा अनुदिनी रसना जपो हे ।।
ब्राह्मण्य देव द्वीज पावन पुण्यरासी ।
माझे सदा नमन त्या जगदीश्वरासी ।।१।।

कोण्ही येक कुचेल नामक मुनी ज्याला रती सज्जेनी ।
सत्कर्मि यजेनि स्वधर्म भजेनि संध्या जपि मज्जनि ।।
यारिती द्विजेनीट दिस रजनी लोटी जगद्रंज्जेनि ।
धीनेविश्वजेनी आसे परिजनि ज्ञाता भवद्भंज्जनी ।।२।।

दारिद्रा तो आणी माहा कुटुंबि ।
फुल्ले जसी फार सुफुल्ल तुंबी ।।
कांता म्हणे रोषुनीया श्वकांता ।
प्रयेत्न कां जी न कराची आता ।।३।।

।। पद २।।

तो स्वामी ध्यात्याला नाहि विविधा ज्याला ।।धृ.।।
मानी समानचि दृष्ट भल्याला । ज्ञान विभूषण ल्याला ।।१।।
घेउनी बोध मनोहर प्याला । रामरसायन प्याला ।।२।।
आनंद तनये म्हणे तोची जाला । आद्वैत मानी दुजाला ।।३।।

।।श्लोक।।

किं यैसा दुबळा तयासी अबळा मागे चिरे कांबळा ।
बाळाच्या कवळा निमीत्य दुबळा विस्तारुनी ये बळा ।।
ते बोले प्रबळा गति चळबळा चर्चा करी पांबळा ।
का जानांत बळानुज्याप्रती बलारातीस जो देवळा ।।४।।

नुस्ता पोरवडा घरि न कवडा चिंतीं बरे निवडा ।
नाही भातवडा तया दहीवडा कैंचा तगे जीवडा ।।
दारिद्रें चिवडाचि सर्व दवडा थोरी वडा पावडा ।
मागा त्या ये दुरावडा गयवडा नासिला त्या आवडा ।।५।।

चोळी ना बुगडी पळी न दगडी टोपी ने तें आंगडी ।
चिंतेंचि सगडि जीवासि रगडी पापांवळे वेगडी ।।
जा जा पैलगडी मधे गडगडी क्लेशाधीची सागडी ।
तो श्रीकृष्ण गडी तुम्हासि पगडी बांधी मला लुगडी ।।६।।

।।गीरवाणी श्लोक।।

यत्धात्रं निज भालपट्ट लिखितं स्तोकं महंद्वाधनें ।
त त्प्राप्नोति मरुस्थळे पिनतरो मेरू तना तो धिकं ।।
तत्धिरो भववित वत्स्कृपणा बुधि वृंथा माक्कधा ।
कुपे पश्य पयोनिधिलपि घडो गृण्हन्ति तुल्यं जलं ।।१।।

।।पद ३।।

होणारा प्रालब्धासि काय येत्न चाले ।।धृ.।।
जेथें जेथें जे जे काळी ... जे कां लिहीले आसेल भाळी ।
ते ते न चुको वो वेल्हाळी कोण टाळी होणार ।।१।।

येत्नची सर्व साधीती संत साधु ।।धृ.।।
येत्न जाती कर्म सीत्धि - येत्न होति चित शुत्धी ।
रित्धी सित्धी यागें हा ।। यत्न ।।१।।

पुर्वि कि जे जे कर्म । तो तों भोगावा हा धर्म ।
म्हणती वेदाचे हे मर्म । कैंचा शर्म कर्तव्या ।।२।।
प्रालब्धा ।। मिति सोळाची वरुषाची।।
मार्कंडिया होति साची । परि तो येत्न काळा ज्याचि ।

स्थिती ज्याचि चिरकाळें ।।३।। येत्न ।।धृ.।।
पियुषचि खाणी देहिं । देव वैद्य ज्याचे गेहि ।।
औषधीचा राजा पाही । चेंद्र पाही क्षय रोगी ।।४।।
दैन्य दुःख नाना रोग । येत्न निरसे याचा भोग ।
दान धर्मा शोधी चांग । होता आंग निर्दोशं ।।५।। येत्नचि।।
कोठे मांडू यातायात । कोणा बोलुं बंधुतात ।
सांगु कोणा माझी मात । कोणा हात वोडऊ ।।६।।
प्रालब्धासी ।।
जाणा द्वाराकेचा राजा । पुरवी भावें मनोकाजा ।
जाहली सुदाम्याची भाजा । स्तविली आनंदसुते ।।७।।
।।येत्नचि ।।धृ.।।

।।श्लोक।।

नाना प्रयत्न पुरुषें स्वकरे करावा ।
येत्न फळेल हरीषब्द मनी धरावा ।।
भूपाळ देवगुरु याप्रति रिक्त हातें ।
जाऊ नये सदनी काय आसों पाहातें ।।७।।

गीरवाण श्लोक।।

शिशु पशुं ग्रह क्षेत्रे । आग्नीहोत्रं तथैवच ।
रिक्त हस्ते न नोपायातु राज्यानां दैवतं गुरुं ।।१।।

।।पद ४।।

हरी पदी लागा मागा धन धान्ये चिरें सुख दार दाई काई ।।
न पवें आचिरे ।।धृ.।।
मार मनोरथे उदार दयनिधी द्वारवतीचा राजा ।
द्विज देव भला येईल तुमच्या काजा ।
कळले मजला सौंशय न म्हणा जा जा सुमुहुर्त चला ।।१।।

बाळपणी जगपाळक तुम्ही गडी होउनी लीहीतां सांळे ।
बहु खेळतसा ते खुण बोलावळे बाळे ।।
प्रभु तो सहसा का धरुनि जपमाळे ।। उगलेची बसता ।।२।।

आनंदात्मजे आदि गुरु हरी आदर करीता कांही ।
मग काय उणे हा धरिता पथ पांही ।।

लौकीक गुणे वाद नको भय नाही ।। सुख होय दुणे ।।३।।

।।श्लोक।।

ते धुंडीता उतरडी मुठी येक पोहे ।
आणुनि दे द्विज म्हणे हारी योग्य नोहे ।।
हां जी जगी वदति लोक हरिस जो तो ।
पुष्पे फळे जळ दळें बहु तुष्ट होतो ।।८।।

।।गीर्वाण श्लोक।।

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्ती संयुक्तोमश्नामि प्रयतात्मनः ।।१।।
आरण्य संती पत्राणि नद्याश्वादोदकानच्या ।
संती हास्तौचा पादोच्या कथं नाराध्यते हरी ।।२।।

।।पद ५।।

देवो भावाचा भुकेला । नाही कोणाचा आंखिला ।।धृ.।।
त्यागुनी दुर्योधन सदनासी । गेला वीदुर ग्रहासी ।।१।।
शबरीची ते बदरी फळे । भक्षितसे सुख मेळे ।।२।।

।।श्लोक।।

ज्या वस्त्रि ठीगळासी कोण गणति दंडासि कैचि मीती ।
छिद्राचे तरि लेख कोण करिती गांठी म्हणाव्या कीती ।।
तेणे गुंडुनी मुष्टी येक पृथका काखे बृहद कंदुका ।
चाले चाल कुचेल घेउनी नीघे भेटि रमानायका ।।९।।

आदि मध्यंत रहितं दशाहिनं पुरातनं ।
अद्यैत महं वंदे मद्वस्य सदरशं हरी ।।१।।

।।पद ६।।

चालीला द्विजराज तो कृष्ण भेटी ।।धृ.।।
चिंध्या गुंडाळा काखेस ।
निघत झाल द्वारकेस । विष्णु वामन हृषीकेश ।
वाचे नामाचा छेंदु ।।१।।

उत्तम होताती शोकुन । किष्णृ दरुषणा हे खुण ।
मुर्ति सावळि सगुण । ऱ्हुदई बिंबलि मोदें ।।२।।

गिरिधर म्हणे हा कुचेल । येक्या हरीलागी रुचेल ।
येरा मानसि रुचेल । हस्य वीनोदे कंठाळा ।।३।।

।।श्लोक।।

विचारीत विलंघिला पथ पवीत्र तो मागिला ।
पुढें नवल देखीला कनक कोट नामाथीला ।।
नभी ध्वजे उभारिले कटक तिटकें लावीलें ।
द्वीजे नयने देखीले गज रथाश्व श्रृंगारिले ।।१०।।

।।पद ७।।

ऐंसी देखिली द्वारका जनोतधारका ।।धृ.।।
विविध उपवन मलयजे पवन डोलती फल दल कुसुम भरें ।।
कुसुम ति बकुळीं निर्बडी अळी कुळी -
रुणझुण जे आनुदिनी नीकुरें ।।
हौंस कोक बक शुक सिकि पिक मुख उचलुनी -
नीगदती मधुर स्वरें ।।
परिमल मग मग पसरितसे मग जग नग सुखे
आनुभववीती बरें ।।१।।
भोवंति उप पुरे गुड्या गोपुरे निबिड जया हे नभ आपुरें ।।
ठक पटचिरें तळपति रुचीरे झळकती गगनि जवे आचिरें ।।
सौधें सिखरें शिविति नभ करें दीसतीं घरे मणिमय मखरें ।
शातकुंभ घनकुंभ विराजित भरति दिशा दशद्युति पसरें ।।२।।
कनक तोरणी कलित धोरणी लसति बहुखणी त्या उपऱ्या ।
लखलखिती वरीन सज्यास सरि हेमविती निर्मित बुरुज चऱ्या ।।
सघनें आ चाटें वज्रकपाटें पुरेंदरवाजे मेरू दऱ्या ।
आनंदतनय म्हणे प्रति मंदीरी नवनीधी नांदती बहुत बऱ्या ।।३।।

।।चुर्णिका।।

बकुळ चेंपक फणस बदरी दाडीम फलित कमरख खर्जुर कवठि केली ।।
जांबळी पोफळी सजल सिताफळें नाग पुन्नाग बहु नारिकेळी ।।
आक्रोड शोप प्रभु आंब्र आंजिर घनतुते नारिंग तरू तुप केळी ।
विविध जें बीर ते विलसती आनार से फांकती बादाम फलभारमेळी ।।
ईतर तरुतति करिति तांडवातें । निबिड जाई जुई चेंपक पारीजातें ।

गगनि मग मगित शेपति मलयवाते । मधुप मनुजे मृग खग नर नमिती
माधवाते ।।१।।

।।श्लोक।।

सिंधु यैंसा त्या घोष पट्टणाचा ।
जेथे पंथा संघ संघट्टनाचा ।
आला द्वारे द्वारकेच्या द्विजाति ।
नाना जाती ज्या पथे यत जाती ।।११।।

।।पद ८।।

याचि मार्गे गेले संत साधु भले भले ।।धृ.।।
सनकादीक सारे योगी । जनकादीक ख्यानी भोगी ।।१।।
शुक कीर्तन नेमुनी । गात नाचत नारदमुनी ।।२।।
रुषि राजा तेजो रासी । परब्रम्हिचे मीरासी ।।३।।
भक्त विरक्ताचे करुनि थाट । ज्ञानिया चैत संघाट ।।४।।
भावे करुनि वंदुन । म्हणे आनंदनंदन ।।४।। धृ ।।

।।श्लोक।।

द्वारि द्वारें लंघिता ब्राम्हणा या ।
कोण्ही येना कोण तु ब्राम्हणा या ।
जेथे प्राणी सांधीले ब्रंध नाही ।
ज्याचे गेहि ब्रह्म निर्बंध नाही ।।१२।।

।।पद।।

दिन दरिद्र वेशधारी । उभा कुचेल राजद्वारि ।।
द्वारपाळतें हाकारी । माझी विनंति अवधारा ।।१।।
जा रे सांग निरोप वासुदेवा ।। सज्जन हो ।।धृ.।।
द्विजा म्हणती द्वारपाल । हारी हा गोब्राह्मण प्रतीपाळ ।
दाता दिनाचा कणवाळ । ब्रह्मावृंदाते पुजी ।।२।।
जा जा स्वामी तुम्हासी आडकाठि नाहिच ।।धृ.।।
बाल मैत्रिकिंची सोय। त्यहिवरि बंधु होय।
माझा या भाग्याचा उदय । भेटि व्हावि कृष्णाची ।।३।। जारे।।धृ.
हृदईं ब्राह्मणाची लात । बंधन मिरवी जगतात ।
शास्त्र पुराणे प्रख्यात । साम गाते गोडीने ।।४।। जा जा ।।
आम्हां वैदीकाची स्थीती । आपाप जाता वाटे भिती ।

आणीक आहे ऐंसी नीती । जावे राजाज्ञा वरुनी ।।५।। जा जा ।।
ऐकुनि गोष्टीचा पाल्हाळ । करिती हस्याचा कोल्हाळ ।
गीरिधर स्वामी तो वेल्हाळ । त्यासी बंधु हा कैंसा ।।६।। जा जा ।।

× × ×

।।श्लोक।।

पुढे नवल देखिलें नभमणि द्युति रेखिलें ।
नृपाळ गृह रेखिलें तवं हळु हळु रोखीलें ।।
सभा भवविमोचनि लउनि लक्षीली लोचेनी ।
पडे ऱ्हुदई वाचेनि मग उभाचि आलोचेनी ।।१३।।

।।पद।।

मानस हौंसा महाराज । मायबापा मुनिराज ।।
द्वारी देखिला द्विजराज । नेणो त्याचें कांही काज ।
नाही सामानाही साज । मानि लाज दे धापा ।।१।।.
हाति काठी काखेबोळा । रूप दृष्टी दिसे भोळा ।
कानि तुळसि टिळे माळा । वाया चाळा निश्पापा ।।२।।
म्हणवि कृष्णाचा मि मीत्र । वाटे ऐकुनि आम्हा चित्र ।
वाहे दर्भाचें पवित्र । ऐंसा मित्र कैंचा बा ।।३।।
जाता चालताती झोके । लोका देखुनिया थोके ।
सभे येता घेतो धाके । नेघे केवि संताप ।।४।।
वार्ता बदती द्वारपाळ । वेगी धाउनि गोपाळ ।
नाचे आनंदाचा बाळ । प्रभुपाळ सुक्लापा ।।५।।

× × ×

।।श्लोक।।

पुढे धाउनी सांगता सेवकांनी ।
उठे तत्क्षेणी यैकता देवकानी
पुढे यादव प्रौढ छेपन्न कोटी ।
चेमत्कारीती टेंकुनि च्याप कोटी।।१४।।

गति ज्यासि चेतुर्मुखें प्रमुख ते ध्याती मुनि संय्यमी ।
ज्याती वेद वंदु जया मग उणे ठाती कथुं काय मी ।
तो राजेश्वर पुर्ण चिन्मय पुढे थोरामुखें धांवीला ।
कैंसान प्रिय विप्र त्यासी सकळी होरा भला रे भला ।।१५।।

पाई पैंजण रंम्य वाजति कटि पितांबराची प्रभा ।
माजि सन्मणी दामी कींकण तति व्यापे सभे क्षीप्रभा ।।
कंठी मौक्तिक हार भव्य पदके भाळिं टिळा रेखीला।
माथा रत्न किरिट तो द्विजवरें राजा दिठिं देखीला ।।१६।।

।।पद ११।।

किरीट कुंडल कंठी हार माजी अंबर शोभे फार ।
पेट्या सुंदर बाहुदंडी राजे । दिठी शौरी साजे ।।धृ०।।
रत्नजडीत सिंव्हासन । रत्नखचित पींपळवान ।
आंदु नुपुर त्याचे पाई वाजे ।।१।।

आनंद नंदन कविचा राजा । आंगि ल्याला कांचन काजा ।
तेजा देखुनि दिनकर त्याचे लाजे ।।२।।

× × ×

।।श्लोक।।

तेव्हां दृष्टी चके सुबुत्धी वचके प्रज्ञान थारू सके ।
वाग्व्यापार ठके उगाची न टके कापे तनु घे धके ।।
कृष्णाभा चमके म्हणे नि अमके हे लोक निर्धार के ।
येति ना द्विज केवळान्वये झके कृष्णापुढे द्वारकें ।।१७।।

तो नावेक तटस्थ होउनि सभा प्रांती उभा राहीला ।
श्रिकृष्ण कमलेक्षण प्रियसखा प्रेमादरे पाहीला ।।
आधी पाये नमुनि तो मग भुजीं आळिंगला प्रेमळें ।
श्नेहे पुर्ण सुदाम यो निगदीली वाक्ये माहा कोमळें ।।१८।।

।।पद १२।।

कनकचेल हरि कुचेल पाउलें पुजी ।।धृ०।।
कनकचेल महाराज कनक समान धिर जनक । नृपाराध्ये जगज्जनक ।
तनु करूनि खुजी ।।१।।
ब्रह्मगीरी सेवी नुतपरब्रह्म । चिदानंद महद्ब्रह्म । खेळवितां करि ब्रह्म ।
भजन विपुल भुजीं ।।२।।
नंद यशोदादिन्हदानंद । शंखचक्रगदानंदकादि धरहरी
आनंदतनय कवी वीभुजीं ।।३।।

× × ×

।।श्लोक।।

मत्पुण्य ते पुण्य फळासी आले ।
बारें तुझे दर्शन आजी झालें ।।
स्मरोनी मातें मज भेटलासी ।
सुधानिधी सन्निभ वाटलासी ।।१९।।

दादा चला म्हणुनी हात धरुनि देवे ।
सिंव्हासनी बसवीला मग वासुदेवें ।।
आज्ञापिलें जेलधिजा द्विज वंदनातें ।
हांसोंनी ते नमितसे समजोनी नाते ।।२०।।

× × ×

।।पद।।

वडील कृष्णाचि राणी आली मंदस्मित वदना ।
सुदामार्याच्या श्री चेरणा । वंदूनि उभि मृग नयना ।।१।।
रुक्मीणी म्हणते भावोजि - निर्मल तुमचा भावोजी ।।धृ.।।
बहुत दिवसा हे येणे आमुचिया निज धामासी ।
अंवसे चंद्रोदय झाला । आपूर्व वाटे आम्हासी ।।२।।
सुमित्रं दरूषण लाभाचा । आनंद मोठा येजमाना ।
गिरिधर सादर सेवेसी उभया आणुनिया ध्याना ।।३।।

× × ×

।।श्लोक।।

वामांगी डवरे रमा उजवियें भागी सुधामा सखा ।
मध्ये आपण कृष्ण लेश न तुके ब्रह्मांड ज्याच्या नखा ।।
शोभे भीम आमुप यादव सभा उद्दाम दोंहीकडें ।
तेजःपुंज विराजती दशदिशा आभा नभी सांकडे ।।२१।।

त्यानंतरे देव तया सुदामया ।
वार्ता विचारी विवीधा सुधामयां ।।
आहे बरि कीं वहिनि पतिवृता ।
बाळे सुखी कीं मज सांग तीव्रता ।।२२।।

कांहीं आठवतें सख्या मिशुपणी साळेमध्ये खेळणें ।
नाना हस्य विनोद वाद झगडा कुस्ती करूं हेळणें ।।
मि तुं हा मज तुंज भेद न जगीं ते मुळ मैत्री भली ।
येते कीं स्मरणासी तुज सखया पुण्य बहु लाधली ।।२३।।

।।पद १४।। ।।दंडी।।

जगन्माता रूक्मीणी जवळी उभी ।
विप्रवर्यासि म्हणे पद्मनांभी ।।१।।
आजी दादा हा सोनीयाचा दिन ।
काय अम्हा धाडीले वोहीनीनें ।।धृ०।।

।।श्लोक।।

आम्ही भेटीला धाडीला काय मेवा ।
तो भुदेवा देंई सर्वस्व ठेवा ।।
जो जो देखें देव काखेस बोळा ।
तो तो त्याचा होतसे जिव गोळा ।।२४।।

।।पद।।

खुणे जाणे सर्वज्ञें विश्वताता ।
स्वयें घाली चिंधीयामाजी हाता ।।२।।

× × ×

।।श्लोक।।

मग हरी वसनासी त्याचीया हात घाली ।
उकलुनि जवें पाहे मुष्टी पोहे निघाली।।
व्दिजवर दुबळा हा फार संकोच मानी ।
हरी तव बहु वानी पूर्ण भक्ताभिमानी ।।२५।।

× × ×

।।पद।। ।।दंडी।।

भक्ती भावाचा फार भुकेलासे ।
गिरिधर स्वामीचे चिव्दिलासे ।।३।। आजी दादा ।।

।।श्लोक।।

मजवरी सखया तां स्नेहसंभार केला।
श्रमवरी चिरकाळे येउनी व्दारकेला ।।

शुभ दिन दसरा हा आजी वाटे दिवाळी ।
न मज गमत पाहे दिधल्या वैभवाळी ।।२६।।
पाहे घेउनि दिव्य पाणी कमलें व्दारावतीचा धणी ।
तो हेमाद्री सुधाब्धी मानुनी मुखी घाली सुखाचा धणी ।।
जाली त्रुप्ती म्हणोनी ढेकर हरी देतांची लोकावली ।
घाली यादव भुप सर्वीहि सभे उद्‌गार देति बळी ।।२७।।

।।पद १५।।

सुदामा देवाची मुष्टी येक पाहा कोरडे पोहेचे दाणे ।
तें देवें घेतलें निज भक्ती जिवन जिव्हाळा आंतरी बाणे ।।
तेधीच वशे जेविं बालक संतोश देखुनी गुल फुटाणें ।
न म्हणे खडे येवढा भक्तीचा भुकेला गोडी त्याचा तोचि जाणे ।।
अैसा गोविंदु रे बाप गोविंदु रे ।।धृ०।।

।।श्लोक।।

आश्चीर्य आनंद विनोद लिळा ।
वाटे सभेमाजी नृपावळीला ।
देवासी हे वेड महाव्दिजाचें ।
वाहे उरि चिन्ह पदांबुजाचे ।।२८।।

× × ×

।।ओव्या।।

वेगी करविलें स्नान । पडदणी लागी दिधले वसन ।
श्रीकृष्ण ब्राम्हणालागुन । आपुलेनि करे नाहणोनी ।।१।।
कृष्ण पितांबर दे सुवर्णी । येरू नीज वस्त्र टाकी फेडोनी ।
जेवि कलियुगि सांडीजे ब्राम्हणी । सदाचार पत्धती ।।२।।
रत्नखचीत मांडीला पाट । त्यापुढे सुवर्ण ताट ।
श्रीकृष्ण आपण निकट । सुदाम देवो बसविला ।।३।।
प्रथम वाढील्या शाका । त्याच्या न करवे लेखा ।
सुदामा मनी करी शंका । हे काय आहे म्हणोनी ।।४।।
त्यावरी वाढील्या क्षिरी । घृत शर्करा रायपुरी ।
सुदामादेवो वीस्मयो करी । कोण भाग्ये आमुचे ।।५।।
वडे पापडे सांडीया । मांडे लाडु फेणीया ।
वाट्या दहिं दुधाचिया । परिपुर्ण घृत वाढीले ।।६।।

जेवितां नये सुदामयासी । गोपीका सीकविति तयासी ।
कढी जेवीजे भातेसी । क्षीरसी घृत शर्करा ।।७।।
तोंडी लाऊनी शाकें । भोजन करा निशंकें ।
वडा भात करूनि येके । रूचिन तुम्ही जेवावें ।।८।।
लाडु खातांचि सगळा । तो अडके माजी या गला ।
म्हणोनि ठेविता झाला निराळा । गोपिबाळा हांसती ।।९।।
फोडुनी भक्षावा लाडु । येरू म्हणे अणा दगडु ।
कैसा भक्षावा पापडु । म्हणोनि पात्री पाहतसे ।।१०।।
यैंसीयापरी करोनी भोजनें । सभे बसले येदुनंदन ।
म्हणे करारे आंथरूण । आम्हापासी द्विजासी ।।११।।
ब्राम्हण आणि मुरारी । दोघे बसले मंचकीवरी ।
तो सुदामयासी म्हणे तुमचे घरीं ।कांही अन्न आसेल कीं ।।१२।।
येरू म्हणे जगदीश्वरू । यैका आमुचा समाचारू ।
आम्हांवरी करुणाकरू । सर्व भावे प्रसन्न तु ।।१३।।
चंद्र सूर्य आमुचे घर । जेथे नसे आंधकार ।
अन्नाविणे उंदिर । थारा न धरती तिळभरी ।।१४।।
सदा काळ यकादसी । पत्नी आमुची सदा उपवासी ।
गणना नाहिं चांद्रायेणासी । करू अहिर्णसी तुझे किर्तन ।।१५।।
यैंसे वदोनी या उपरी । सुदामा आंतरी विचार करीं ।
कांहि नेदिच श्रीहरी । तंव राहुनि येथें काय किजे ।।१६।।
कृष्णांसि म्हणे करूं प्रयाण । बालके पिडती अन्नाविण ।
आम्ही जाउनि तया लागुन । समाधान करणे लागे ।।१७।।

।।श्लोक।।

सुधामा ज्या कामा जगदधीपधामा विनटला ।
न बोले ते झोले नसति विन डोलेचि उगला ।।
प्रभु तो कीं भुतोभ्यकर आभ्रतोपम बरा ।
स्ववाणी वाखाणी स्थिती गति पुराणी द्वीजवरा ।।२९।।

कीं अपणा फार उशीर झाला ।
बसाल की काय म्हणे द्विजाला ।।

आज्ञा प्रभुची म्हणता तयाने ।
केला नमस्कार चिदात्मयाने ।।३०।।

देतां सिघ्रं निरोप देव वरदें भुदेव देवोत्तमा ।
आसिर्वाद वदोनि वैदिक विधि चाले तया सत्तमा ।।
जाति बोलत बोळवित नगरद्वारा नमस्कारीती ।
श्रीगोविंदा गदादी यादव थवे तत्प्रिती विस्तारीती ।।३१।।

।।पद १६।।

पुन्हा भेटिचा लाभ मजला द्यावा रे ।
येदुवर नंदनां करुणानिलया देवारे ।।धृ०।।
वीयोगं सहावे महानुभावा ।
खंति फारचि वाटेते जीवारे ।।१।।
उकलुनि माझा हे भाव गोवा ।
क्रुपा द्रीष्टी हा भक्त गोवा रे ।।२।।
तुं तरि आमुचा तारक ठेवा ।
तो गिरिधर गोड नाम मेवा रे ।।३।।

।।श्लोक।।

सर्वासी थोरूनि पथी द्विजराज चाले ।
श्रीकृष्ण यादव समस्त सभेसि आले ।
मार्गि म्हणे मुनी मनी मग काय केले ।
देतां हरि चिर मला तरि काय गेले ।।३२।।

।।पद।।

मार्गी सुधामयासी विचार । आम्ही चालीलें हलवित कर ।
घरि सांगावें काय उत्तर । कृषणभेटीचा हाचि लाभ थोर ।।१।।
वाटते आश्चीर्य हे काय झालें ।
माझे प्रालब्ध भाग्ये वोडवलं रे ।।धृ०।।
मजवरी कृष्णाची यवढी प्रीती । सर्व जाणती रुक्मीणीसती ।
ते जरि येक स्वयेपांक देती । घरि पोटभरे बाळे जेविती रे ।।२।।

।।श्लोक।।

नारी म्हणे मज घरी हरीलागी याचा ।
याचा असा वदती भाव निरामयाचा ।।

या चालतां पथी भला श्रम फार जाला ।
जा लोभ हाचि हरि भेटि दिगांबु ज्याला ।।३३।।

।।पद।।

येई सर्वस्व देवासी भार ।
श्रीकृष्ण तारक निज निर्धार ।।
चित्त चैतन्य चींतन करा ।
तंवे देखियेलें हेम नगर रे ।।३।।

।।श्लोक।।

हळु हळु पथ यैसा लंघितां गांव खेडे ।
निरखुनि जवें पाहे होतसें चित्त वेंडे ।।
पुरूष सु देखे आणी योषा सुकेषी ।
पुनरपि आजि आलो काय मी व्दारकेसी ।।३४।।
पाहे खुण तरू तटाक डगरी त्या आपुल्या वाटती ।
कैंची येथ सुवर्ण सौध सीखरे तेजे दिशा पाहती ।।
पाहु कां पुरे ते म्हणोनि नगरी येती प्रतीती बळे ।
दारि दुंदुभी वाजवितीचि महो नादे तुरे तुंबळे ।।३५।।

।।पद।।

माझें तन घर या चढाई खुण ।
येथे रचियले नगर कोण ।
कर्ता गिरिधरप्रभु हा नेणे ।
भांबावला सुदाम देव्र म्हणे ।।१।।

।।श्लोक।।

मानी मंदीरा इंदिरालय दुजा शाला विशाला घरें ।
व्दारे रत्न मयुख मंडित तरे भोगागरे नागरें ।।
जाले काय अहा घडि घडि माझे अहो झोंपडें ।
कोठे आजि आसुं बसुं म्हणतसें मानी मनीं सांकडें ।।३६।।

।।पद।।

माझे त्रृण झोंपडें काय झालें ।
येथे महाल हें कोण केले ।।ध्रृ०।।

सज्ज विशाल उंच माडीया दिसती ।
गगनि कळस फार उंच नेले ।।१।।
येका वरि येक पांच सात नउ खण ।
नाना विचित्र चित्र युक्त बगले ।।२।।
रत्नखचित खांब कांच बंद भुमिका ।
भिंतिस सोनियाचे पाणी ढाकियेले ।।३।।
त्रिंबक स्वामी कृत नेण सुदामा ।
कांता तयासी फार गोड बोले ।।४।।

।।श्लोक।।

व्दारांतुनि निरखिताचि कुचेलु कांता।
कांतासी बाहत उठे कुटिलालकांता ।।
कांतार हे तव नव्हे भुललेत कां जी ।
कां जीवनामृत उपेक्षुनि प्याल कांजी ।।३७।।

।।पद।।

येथे माहल हे तेणे केलें ।
तुमचे त्रुण झोंपडें तेणे नेले ।।धृ०।।
इंद्राचा गर्व फार जेण विदारिला ।
गोकुळ बुडतां रक्षिलें ।।१।।
जेणे बहुसंकटी द्रौपदीस रक्षिले ।
पांडवासी जाण जेण तारियेले ।।२।।
सोळा सहस्र शेत आठजणी पर्णील्या ।
कौंसादि दैत्य जेण मारियेलें ।।३।।
दावानळ जाळीता गोपाळ धेनुषा ।
वणव्यास जाण जेणं ग्रासीयेले ।।४।।
त्रिंबकस्वामी कृत्ये जाण सुदामा।
प्रेमार्णवात फारचि डोले ।।५।।

।। श्लोक ।।

हे कोण पैं नृप बंधु सम दिव्य देहा ।
देहांत का मज करा म्हणुनि वदे हा ।।

देहांचि रात्री करूनी न पडेची राणी ।
राणी म्हणे पुरविली हारीने सीराणी ।।३८।।

।।पद।।

भल्या हा मोह भल्या भुलवी ।।धृ०।।
गाधेयाख्ये आगाध तपोनिधी ।
उर्वसी त्या झुलवी ।।१।।
धिवर थोर पराशेर त्यांते ।
धीवरजा खुलवी ।।२।।

।।श्लोक।।

कैंच तुला वसन भुषण रत्नराजी ।
राजिवनेत्र रिझला प्रभु का तु राजी ।।
राजी जया हरि तया न उणेचि कांहीं ।
कां हीर कंकण न ले जाती बायकांही ।।३९।।

।।पद।।

देव करी तरी काय येक नव्हे ।
दगडाची नाव तारिजेल ।।१।।
निघतिल पायें चालतिल भिंती ।
मश्यक मेरू येती सम तुला ।।२।।
सूर्या किरणावरी मुंगिचिया हारी ।
आग्नीचे पाठारी पिक होय ।।३।।
ज्ञानदेव म्हणे अघटित घडे ।
परब्रह्म जोडे गुरू कृपे ।।४।।

।।श्लोक।।

देखुनि देव न घरा खुण माणसाचि ।
त्याचीच हे स्थिती घडे पथहि तसाची ।।
साची घडे रण मनादीक इंद्रयाची ।
याची न ते विषय वृत्ति बुडे जयाची ।।४०।।

माते पाहुनि चित्र काय करिता कां पा तुम्ही ही आसे ।
तो देखे द्वीज आपणा तव दुजा श्रीकृष्ण झाला आसे ।।

* (श्लोकपूर्तीच्या पुढील दोन ओळी पदानंतर आल्या आहेत).

।।पद।।

जाय वेगिं उठोनी द्विजे राणी ।
पाद प्रक्षालणार्थ निर आणी ।।धृ०।।
विप्र भासे दुसरा न्हुशिकेश ।
पालटले पुर्विल दैन्य वेश ।।१।।
शिरी मंदिल तुरा मोतियाचा ।
झळाळी तो प्रकाश कुंडलाचा ।।२।।
करूं युक्त गळा चेंद्रहार ।
वर्चैश्वी तो श्रीमंत मनोहार ।।३।।
माजी कडदोरा जडित मुद्याहाती ।
वसना प्रावर्णी ते जगदिशा धाती ।।४।।
म्हणे दासी आपणाकडे पाहा ।
जसि मिहि तशेच तुम्ही आंहा ।।५।।
सर्वाभरणी भुषित तुम्ही दिस्तां ।
तुला कैच म्हणोनी मज पुस्ता ।।६।।
सुदामा तो पाहे नि विस्मयाने ।
राहे तटस्थ नसे देहभाने ।।७।।
आस्ट भावे दाटला द्विजावर ।
म्हणे केवढा जाहला चेमत्कार ।।८।।
मुस्टी पौहेन तुष्टी होय तेणे ।
आमर केले दिधले कोटी गुणें ।।९।।
सुखिं ईंद्रा समान वैभवेसी ।
गिरीधर स्वामीचि कृपा यैंसी ।।१०।।

।।श्लोक।।

* माथा मंदिल दिव्य रत्न कटके हाते गळा हार ते ।
माजि पित पट प्रभा झळकली यैंस्या स्वरूपाते ।।४१।।

।।पद।।

ओद्‌भुत देणें त्या येक जगदिशाचे ।। यैका ही ।।धृ०।।
नेणे पुजा नेणो पुजा नेणो शेवा ।
आलो शेरणांगति मि देवा ।।

म्हणतां येउनि या सेवा ।
दिधले सौंस्थान सोन्याचे ।।१।।

उंचि बसायाच्या काजा ।
निघता विपना गाजावाजा ।
केला आढळ पदिचा राजा ।
निरखि आद्यापि जग साचे ।।२।।

केवळ मुग्धाचिया घाटी ।
घेता आळी दुधासाठी ।।
दिधली क्षीराब्धीची वाटी ।
बालकें धाले विप्राचे ।।३।।

भेटि नेली पोहे मुष्टी ।
तेणे देवा झाली तुष्टी ।।
आली सौभाग्याची पुष्टी ।
जाहले कल्याण दुर्बळाचे ।।४।।

म्हणे आनंदाचा बाळ ।
होता मुंकयाचे वाच्याळ ।।
पांगुळ लंघी पर्वत माळ ।
होईल पियुष पाण्याचे ।।५।।

।।गीर्वाण श्लोक।।

मूकं करोती वाच्यालं पंगुं लंघेयेते गिरीं ।
येत्कृपांतमहं वंदे परमानंद माधवं ।।१।।
आंभोधि स्वलता स्थले जेलधितो धूली लव शेलतां ।
मेरूम कृषणा तां त्रृणे कुशेलतां वज्र त्रृण प्रायतां ।।
बन्ही सितलतांही मंदहनंतां मायाति योस्य क्षेया ।
लिला दुल्ललितांदभुत व्येसनीने देवाय तस्मीनमः ।।२।।
आनंदला हरी कुचेल सुचेल झाला ।
आला भला निज घरासी आपार धाला ।।
आखंडला सम सदा बहु भाग्ये लाहे ।
आनंद नंदन म्हणे हरिची क्रुपा हे ।।४२।।

।।पद।।

वेडीयाच्या गावा गेले ।
आम्ही वेडची होउनी आलो ।।१।।
आता बोलु नका कांही ।
आम्हां माणुसपण नाही ।।धृ०।।
कर्म वासना सोडुनि साचे ।
अंगी उघडे होउनि नाचे ।।२।।
केशव म्हणे जवळी याल ।
तूम्ही वेडची होऊनी जाल ।।३।।

।। इती श्री सुदाम चेरीत्र निरोपण श्रीक्रिष्णार्पणमस्तु ।।

---

**संदर्भ :** एस्. एन्. ७९ ।। दत्त संप्रदाय देणगी ।।
मूळ वही अंदाजे ८"X १०" पान नं. १४३ ते १५२

आनंदतनय

## मार्कंडेय चेरीत्र

शीव हर मृड शंभो छंद जे लागला हो ।
सुरवर नर लाहो सर्व सौभाग्य लाहो ।।
जसी सरस कथा हे बोलीलीसे पुराणी ।
अजी तुम्ही परीसावी पुर्ण होती सीराणी ।।१।।

पुर्वी येक मृकंडु नामक मुनी सत्कर्म धर्मार्थीला ।
कांतेने नीज कांत जो प्रीयपणे पुत्रार्थ जी प्रार्थीला ।।
संतानेवीण हे जीणे जड जगी संसार नी:सारसा ।
भासे यास्तव हा स्तवा पशुपती मागा कुलोत्धारसा ।।२।।

जाणोनी हृद्गत तीचे मुनीराज राजे ।
हे मी सुखी करीन फार सुतातुरा जे ।।
तो आदरी गीरी दरीत माहा तपाते ।
सोसूनीया कठीण वात माहा तपाते ।।३।।

ज्ञानी वसें मुनी उदार सदा सीवाचे ।
पंचाक्षरी प्रमुख मंत्र जेपुनी वाचे ।।
ऐंसे पुरश्चरण संचीत फार केले ।
सेखी तया परम गुण ये फलासी आलें ।।४।।

जाला प्रसन्न मुनीमान पीनाकपाणी ।
बारे अभीष्ट वर माग म्हणे स्ववाणी ।।
मी तो वीरक्त वीभवादी नको परंतु ।
संतान येक मज दे कुळ हेतु तंतु ।।५।।

त्या नंतरे सीव सनातन कर्म साक्षी ।
बोले सखोल तनु अर्थ जया मृगाक्षी ।।
देयीन दान वरी येक वीधान भासे ।
ते ऐक माग मजलाग वीवेक कासे ।।६।।

साधु सुंदर षाहणा सुत तया सोवळची वर्ष मीती ।
जो का मुढ कुरूप तो शतवरी वर्ष असे स्वनस्तीती ।।

या दोहीत कसा मनासी रूचला तो म्यां तुतें दीधला ।
जाला थोर तटस्था ऐकुनी मुनी दोनीकडे वेधला ।।७।।

मग म्हणे मुनीराज क्रुपानीधी ।
घरी वीचारूनी येयीन हा वीधी ।।
नीजे वधुसी कसा सुत मानला ।
पुसुन येइन सांब शीवा भला ।। ८ ।।

त्वरीत गती नीघाला सीघ्र सदनासी आला ।
प्रीय वधुसी वराला सांगता सर्व झाला ।।
मग सती पद माथा वंदुनी प्राणनाथा ।
कथीत सरस गाथा मूर्ख संसार चोथा ।।९।।

मोहारूढ विमूढ रूप हरी प्राणी जीणी वाहती ।
ते पाषाण धरेशी जाण जडती कल्पांतरी पाहती ।।
लोकी ठाकती घूक काक बक ती दीर्घायुषे सांग ते ।
तैसा पुत्र नको नको प्रीयतमा पायासी मी लागते ।।१०।

मुर्खाचे वय दुखदायक जगी माता पीताची दुखे ।
या लोकी उजळे कदापी नव्हती चीतासी कैची सुखे ।।
तो भूभार वीकार कारण कथा सांगावया भागते ।
ऐंसा पुत्र नको नको प्रीयतमा पायाशी मी लागते ।।११।।

सारासार विचार पंडीत माहीचातुर्य चींतामणी ।
वीद्या भेद वीनोद वाद बुधता वेदांत वेत्ता धणी ।।
रूपें सुंदर दीव्ये देह धरीता थोड्या वयाचा जरी ।
वंशाते सअभंग मंगळनीधी कल्याणकारी तरी ।।१२।।

धीमंत तो करी कर्म सुकर्म नीजे स्वभावे ।
कर्म स्वधर्म उजळेल गुण अभावे ।।
धर्मची मर्म समजेल तदाभवारी ।
तुष्टेल दूष्टाद सदाशीव कष्टवारी ।।१३।।

आकर्णूनी सुपर्णसा पुनरपी पुर्वसाळा पातला ।
साष्टांग प्रणीपाद त्या मुनीवरां पादांबुजी घातला ।।

दे देवा मज पुत्र सुंदर भला ज्ञाता सुवेत्ता पाहा ।
गौरीनाथ तथास्तु बोलुनी नीज स्तानासी गेला पाहा ।।१४।।

अश्रमी मग मुनी प्रमदेशी ।
नांदता गीरी गुहांतरी देशी ।।
गर्भची चीन्मय धूरीले पाहे ।
तो म्हणे मुनी महेशशुक्त पाहे ।।१५।।

यापरी नवमास पुर्ण भरतां सत्पुत्र जाला भला ।
तोषावेश वीशेष त्या ऋषीवरा संसारसा षोभला ।।
पाहे पुत्र मुखासी अंतर मुखे बोले सं माय ते ।
ब्रह्मांडि न समाय पुत्र वीभवे बोलुं कथा काय ते ।।१६।।

मार्कंडेय अशी मृकंडू मुनीने नामाभीदा ठेवीला ।
वाढे बाळके बोबडे जव वदे ते वाक्सुधा सेवीला ।।
जाले वत्सर पांच योग्य म्हणुनी केली व्दीजाती भला ।
जाला धर्मनीधान तो गुरूकुळी वीद्या भली लाभली ।।१७।।

तर्क व्याकरणादी नाटक कळालंकार शास्त्रांतरी ।
ज्याचे खेळ अशी वीशाळ झळके प्रज्ञा प्रभा अंतरी ।
लीला प्राय समस्त लौकीक कथा वेदांत सीत्धांत तें ।
हाती आमलका समान डुलती बोलु कथा कया ते ।।१८।।

यापरी पुरवीता शीशु डोहळे ।
भोगीत सरस ते सुत सोहळे ।।
लोटता पळ घडी दीन काळजी ।
लागली उभयतासही काळजी ।।१९।।

वर्षावरी सुसुख वर्षत वर्ष जातां ।
चींताची चींतीत उठे बहु हर्ष जातां ।।
माता पीता उभयेता भयेतां प्रसंगे ।
सत्प्रवृत्त रूदती बहुता प्रसंगे ।।२०।।

हा संकठा कटकठा वीकठा कपाळा ।
कां दीधला सुत मला सुरलोक पाळा ।

होतो सुखी न गणीताची अशा भयातें ।
देवा फुटे हृदई आठवीता वयाते ।।२१।।

मार्कंडिया कारण मायबापें ।
जाली दीने शोषती दीन तापें ।।
वर्ष गेली पंधरा आजी आला ।
एक्या वर्षी केवी देखो तयाला ।।२२।।

धरील धाक मनी वदता तया ।
बहुत मानील हा रूदता भया ।।
म्हणुनी मा रुदती वदती भीती ।
उभयता सहीज स्थीती दावीती ।।२३।।

परंतु ते दु:ख मनी न झाकें ।
सर्वेंद्रयी शोक समुद्र फाकें ।।
येती बळें लोचनी बाष्प धारा ।
हे यींगीते जाणवला कुमारा ।।२४।।

।।सवाई।।

जोडुनी हात, वदे मृदु मात कशाशी पासुनी -
पाय नमी वीनवी पीतरा ।
कंठ सद्‌गद बोलता ती तैसा
कंठहर दीधलीसी वरा ।।२५।।

का उगले नवसोनी घरी न वसोनी रसे वाक सुता देही म्हणु ।
पुण्ये तपेची वरण्ये वीभूवरपणे वदे गती काय जणु ।।
षोडष वार्षीक पंडीत की शतवार्षीक मुर्ख मनासी रूचें ।
तो दीधला म्हणे तां बुधभुषणे मागीतलाची आसाची सुचे ।।२६।।

।।छंद।।

शीव दयाळु जो दे सु संतती ।
भजीती त्याची या रक्षीतांती ।।
अजी तया उणी काय संपदा ।
विनटता पदा वारी आपदा ।।२७।।

वदुनी यापरी माउली पीता ।
रूदती होय त्या प्रती नीरोपिता ।।
शीव शीवा असा खेद कासया ।
करीतसा तुम्ही नास कासया ।।२८।।

भय नको नको शोक नायका ।
शरण जातसे लोक नायका ।।
अभय दान तो देची साधका ।
म्हणुनी यातना काय साधका ।।२९।।

निशीदीन भजा अंबीका पती ।
भजती या कळीकाळ कापती ।।
उभयेतां वीचारूनी मूल तो ।
अभय तां भजे आदीमूल तो ।।३०।।

।।श्लोक।।

पूजानुरक्त बहुभक्त वीरक्त झाला ।
चीत्ती जपे सतत सांब पदांबुजाला ।।
मृत्युंजेयावीण जगी भये कोण नासी ।
नीर्धार हा समजोनी वीनवी मनाशी ।।३१।।

।।चुर्णिका।।

श्रीशंकर पद पंकजे भजे नामांकिता भजे माजीय अग्रेश्वरे ।
मृकुंडा तपोधनाचीय कुमरें ।
देह गेह मोह तेजोनी येकेसरें ।
सकळ वीषई वीषासमान मानी लावी रागावसरें ।।

श्रीचंद्रचूडनळ न ध्यानावीना नाठवे दुसरें ।
प्रज्ञेचोनी प्रसरे ।दंड धर प्रचंड भय मानुनी षोडषवर्षी तो ।
गंड समजुनी अखंड तांडवधीश्वराची -
अखंडा-साधना अरंभीली ।।

।।श्लोक।।

जपत जपत यैंसा तो करी तीर्थ यात्रा ।
धवळ शुभ्र वीभुती लाउनी शुभ्र गात्रा ।।

स्फटीक मणीगणानी रम्ये रूद्राक्ष माळा ।
करी शीर भुज कंठी नित्ये घाली सुमाळा ।।३२।।

आठउनी वीपद शीव पुजी ।
अर्पुनी शीव पदा शीव पुजी ।।
आदरी परमा जी यमाते ।
जे मनात पर मानी यमाते ।।३३।।

।।सवाई।।

पंडीत थोर मृकंड कुमार अखंड शीवार्चन मंडीत जाला ।
हींडत हिंडत चेंडु महेश्वर वीर सुता तटीनी प्रति आला ।।
त्याच दिनी यमगंड मुनी समजोनी मुनी प्रभु पार्थीव पाणी ।
पुंजीतसे तीळ तांदुळे बेल फुले शीव शंकर गर्जत वाणी ।।३४।।

।।चुर्णिका।।२।।

मंदाकीनी जल तीळ तांदुळ बील्वदळी ।
चंदन केशर कर्पूर कस्तुरीकादी परीमळी ।
भक्तामाजी परम बळी । पूजी शांभव लींग ।
मानस योजी दीर अभंग ।
गर्जत नावे नीट नीसंगे । शेंभो देव सदाशिव मंगळप्रद आसो ।।२।।

।।श्लोक।।

हृत्पद्मी शीवपादपद्म धरूनी पद्मासनी बैसला ।
जैंसा पद्मपाणी पद्मयुगुळे पार्थी तदा भासला ।।
त्या काळी वीकराळ शेवक या काळ मुनींद्रावरी ।
काळे पाठवीले बळी क्षीतीतळी त्या कोण पा आवरी ।।३५।।

।।चुर्णिका।।३।।

ऐंसीये अवसरी । चीन्मयध्यानी तन्मय होउनी बैसता -
मुनीराज भवभवे केसरी ।
तव जाणुनी आयुषाव भान वारी ।
जैंसे गीरीवरोनी उतर माला प्रवाह वारी ।।१।।
तैंसे हांकीत टाकीत गर्जत तर्जत आले दूत आचार ।
दुर्धर जैसे घोर पीसाट ।।

पाहती पुजा पुर्वीची वाट ।
तो मुनी जाला शंकर भाट ।।

यमे धाडीयेले दुत तयासाटी ।
घोर रूपे ते क्रुरशे तया साटी ।।
कोल्हा ऐंसी फोडीत हाक मोटी । जी जी जी ।
व्दिज भ्याला देखोनी तयापोटी ।।

।।श्लोक।।

आले गर्जती खड्ग खेटक गदा पाणी दणाणी धरा ।
हाते झेलीती वाघुरा नीगदीती वोढा धरारे धरा ।।
धावा घेती उफळीती व्दीजवरा ते लक्षीती लोचनी ।
तो भ्याला शीवमूर्तीं देखुनी करी ध्यानी जगन्मोहीनी ।।३६।।

।।पद।।

धरा बांधा वोढुनी तळी पाडा ।
लोह कांटवण्यामाजी तनु ताडा ।।
दुत म्हणती कर्वती याशी तोडा । जी जी जी ।।
जो जो करीशी तो दंडा याशी तोडा ।।२।।

।।श्लोक।।

दचकती चमकती धृती सांडीती ।
प्रबळ ते बळ तेथ न मांडीती ।।
रयमदा यमदास वीराजती ।
मग मुनी गमनी धरीती माती ।।३७।।

भ्याले असे समजुनी शीव पुजनाते ।
लेखीच ना मुनी मनांतरी पुजनाते ।।
वाचेशी नामजपती शुभ शंकराचे ।
सामर्थे लेश न चले येम कींकराचे ।।३८।।

पूजा सेमाप्ती समई दृढ दीर्घ पाशी ।
वोढु म्हणुनी यम हेर उभेची पाशी ।।
हे धर्म मर्म जव जाणवले व्दिजाला ।
तो तो सदाशीव पदांबुजी सज्ज झाला ।।३९।।

।।चुर्णिका।।४।।

वर्णीत हा नीज जनका जी मानस ।
ध्याजी मी मी भय वाजी येउनी प्रार्थीतो तों हर हरा ।
नीज नीटील कुटील नयन नीर्जीत ज्वाळा ज्वाळा भस्मीरुत स्मरा ।।

गौरीवरा ।। प्रणतात्पीडहरा । तापत्रय उटवी भ्रम जेठा सारा ।
शशांक शेखरा । प्रणतात्पीड हरा ।।
पाही मां पाही मां शंभो । ऐसा झाला देखुनी दक्क ।
ते दुत गेले होउनी थक्क । सांगत राहीले चक्क पक्क ।।

।।सवाई।।

देखुनी दंग मुनेंद्र अभंग ही जाती रही गमतसे यमधामा ।
चार समस्त वीचारूनी वदंती फार हटेची जपेसी नामा ।।
प्रार्थी प्रचंड करीच अखंड भजे कळभंड नुस्तीर व्हावी ।
ते बोलुनी या परी ते नमीती ते न मीती करी यावरी चाकरी काय करावी ।।४०।।

ऐकतांची यम कृध्द जाहला ।
सेवकाप्रती म्हणेस जाहला ।।
आजी साध करण व्ही जाहला ।
हे प्रयोजनावीना न जाहला ।।४१।।

।।सवाई।।

जाला सकोप पर जाला मुटका करूनी भुज्यालानी आपठी करे ।
धावला व्दीजावरीच घालावया मग नीघाला सवेग नीकरें ।
पाळा समर्पीत कृपाळा म्हणे तवची पाल्हाळुनी पृथुहला ।
आला मुनी जवळी आलापी त्या जवळी आला बुल्वसा उसळला ।।४२।।

।।चुर्णिका।।

ऐकुनी त्याते तो यमुधीक ।
करूनी आला आपण दंड । होउनी मैषारूढ वीतंड ।
वर्तुळ डोळे भोंवडी चेंड । वर्जीत होडीन आता दंड ।
ताडीन सडका घालुनी थडका । देइन पडका ।
रे ऊठ भडका दावीन ।।१।।

तव तो मार्कंडिय जेगजेठी । सदाशीव ।
ते अवलोकीनी दीठी ।
तश्चेणांबुजी घालुनी मीठी ।
म्हणे जगाय धुर्जठी । शरणागतांते नुपेक्षी नुपेक्षी म्हणे ।।२।।

।।श्लोक।।

क्रोधे काळ उफाळुनी भुजेबळे जाळें झुगारी गळा ।
तो झोकोनी दीली शीवाप्रती मीठी मारी मुनी आगळा ।।
देवाही समवेत पाश पडता हाकारींले ब्राह्मणे ।
शंभो शंकर धुर्जटी मुरहरा आता नुपेक्षी म्हणे ।। ४३।।

।।चुर्णिका।।

ऐकोनी अशी भक्ता दीनवाणी । श्रीमत्पिनाकपाणी ।
लींगापासूनी धींग । भीकर शंकर दुष्कर पींगट्टाक्ष -
उठावे कोटी पतंग ।।१।।
सोज्वळ आंगी तुंग भुजंग । माथा रंगती गांग तरंग ।
हस्तकी नाचती दीण्य कुरंग । तेणे देखोनीया ।
येम लेखोनीया । तृणशेखी पदोधृत रेखोनीया ।
मग वक्षस्थळी ताडीला । वसुंधरातळी पाडीला ।
तव मार्कंडिय मुखी जय जय शब्द उदेला ।।२।।
अहली दोनी नृसींह देव प्रल्हादावरी देव हृदयी अळंगीला ।
चीरंजीव चीरंजीव म्हणोनी शंभोकीला ।।
आनंद नंदन म्हणोनीअत्यानंदभरेबार बार
सदारत मुनीवर शीव पदापंकजे वंदीला ।।३।।

।।श्लोक।।

भूताधीश्वर भक्त वराती भवानी पती ।
भोळा शंकर सांब तो प्रकटला दी:काळ त्या कापती ।
लींगा पासुनी नीरूधीग पींगट जेटा प्रोत्तुंग बाहुपरी ।
ढंका शूल कपाल सायक धरी हांसी नीरोषत्करी ।। ४४।।

नीरखोनी येम डोळा मारीले लात देवे ।
पळे न लगत भूमी पाडीले वामदेवें ।
सुरवर सुमनाचे वर्षीती भार भारी ।

मुनी नमुनी उभा तो धीर जैंसा ईभारा ।। ४५।।

त्वरीत गती पळाले दूत दाही दिशाला ।
म्हणेती गण अशाची वेर्थ सेवा कशाला ।।
× × × × ×
मग नगपती कन्या मान्य धन्या प्रभुते ।।४६ ।।

मृकुंडाच्या बाळा धरी हृदयी काळांतक करे ।
म्हणे बारे वत्सा भव जलधी मस्छान वीकरे ।।
जनामध्ये कांही भय लय कदाही तुज नसो ।
चीरंजीवी हो रे हृदय वीषयी कांही न वसो ।। ४७।।

चिरंजीवी केला स्वशरण मुनी काळास दमुनी ।
तदा आले ब्रह्मादीक सुर उभे पाय नमुनी ।।
मुखे नाना रीती स्तउनी करीती ते वीनवणी ।
महादेवा तुते वीहितच दीजे सांग कवणी ।।४८।।

मुला मार्कंडिया तव नीयम सोवळाची वरूषे ।
यथा काळें काळें म्हणुनी उभीले पाश परीसे ।।
× × × × ×
नसे त्याचा कांही अणुभरीही अन्याय जगती ।।४९।।

प्रभू तूझे आज्ञें वीरहीत तसा दंड धरीला ।
तशातेहि ऐसे प्रहरूनी अशे मान हरीला ।।
क्षमा कीजे देवा करील पदशेवा वीधी वदे ।
यमाते सौरक्षी स्वकरुण रक्षी अभय दे ।।५०।।

परीसुनी सुरवाणी तुष्टला शूलपणी ।
वदत मधुरवाणी नीत्य आनंदवाणी ।।
शीव भजन करिती जे जगी येकरीती ।
वीषय वीषय भीता त्या नव्हे काळ भीती ।।५१।।

वर्ष षोडश हाची नीश्चेये खरा मीथ्या नव्हे मद्गीरा ।
गेली कल्पशतके मुनीवरा ऐंशीच काया स्तीरा ।।
राहो नीत्यपणे म्हणे तव मुनी वंदी सुराचा फरा ।
तो आनंदसुत स्वये हर हरा अर्जूनी गर्जे बरा ।।५२।।
।। इती श्री मार्कंडेय चरित्र नीरोपण संपुर्णमस्तु ।।

गुरुदासकृत

## प्रल्हाद चरित्र कडका

**संदर्भ :** ८'' × ४'' पोथी. १२ पाने आहेत. सुंदर वळणदार अक्षर प्रत्येक अक्षर सुटे. अक्षरे कोनेदार. प्रत्येक पानावर आडव्या सात ओळी. मुखपृष्ठावर एक इंचाच्या चौकटीत हिरव्या, लाल पानाफुलांची रंगीत नक्षी. या सुंदर वेलबुट्टीच्या मधोमध - ।। गुरुदासकृत ।। प्रल्हाद चरित्र ।। कडका ।। असे लिहिले असून पाने ।।१२।। असा मजकूर आहे.

परियसा परम पवित्रा प्रल्हादजीची लिला ।
परिहरते पापा कलिला ।।प्र. ध्रु.।।
हिरण्यनयनाचा जो बंधू । हिरण्यकश्यप विक्रम सिंधू ।
हिरण्यगर्भवरें प्रमदांधु । हिरण्य चेलासीस विरोधु ।
तो दनुजंद्र महाबळजी खळ, तत्सुत ।
भागवतोत्तम पंक न लिंपित पंकज त्यापरि निर्मळ ।
निर्मम चिन्मय सित्धहिं साधक माधव पाद युगी रमला ।।
प्रल्हाद भवीं न कहिं भ्रमला । दिविजेश्वर नेणुनि संभ्रमला ।
सुत त्या अपुलेच परीं गमला । बरवा पढऊं चतुरी रुढऊं
स्वमति स्थिरऊं यश ते मिरऊं ।।
मग चिध्दनासि दनुजेश तोपि गोपिता ।
होय काव्यगुरू हरित वोपिता ।।
भक्तराज लिहि विश्वगोपिता । कृष्ण विष्णु गोविंद -
इंदिराधीश केशवा हेचि वाचिता जाला ।।
हरि हरि हेंचि वाचिता जाला ।।१।।

तो तां (त्वा) कथिजे गुज निगमासी ।
धोका सोडुनि घ्या सुगमासी ।
घोंकावें कां नामा मासी । घोका हरिच्या वोंनामासी।
सर्वीहि नैस्वर तो जगदीश्वर । अक्षर येक परात्पर ।

तत्पर व्हा विमलांतर । दुर्लभ हा नरदेह महत्तर । दुस्तर हा
भवसिंधुतरा । तनु चित्त धना हरितें वितरा ।।
न धरा मनि रागरूपी कुतरा । मद टाकुनि सत्वगुणा उतरा ।
मग साधुरीतीसी मुले धरिती ।। अघ संव्हरिती ।
म्हणती हरि ती । तीसह मित्र नाम पढतां कयाधवें ।।
प्रेमयुक्त मनि दीन बांधवें । मांडिलें सरस नृत्य माधवें ।
जे पराशर निवेदी उत्धवें । साधकासी करी बोधे ।
तोचि इतिहास । त्यासह व्यास रूप शुक वदला ।
जे काव्यरूप शुक वदला ।।२।।

यापरी असता प्रहलादेसी । भुप पुसे जे जे सिकलासी ।
रूपकरी वद तें ज्या रिझसी । हे परिसोनि वदे तो सुरसी
अैक बरें हित गैन करी किती वैभव हे नृप कैं जाहले-
भव माइक रे तनु नाशक रे । कवडीहीं नुरे । वयसा न फिरे ।
मति घेरि रती स्मरता हरि तें दुरिते हरिती ।।
साहसि रिपु तुंद सहा विरती । जड मुढ भवांबुधि तें तरती ।
विपदा परती । सरती करिती अरती अरतीं अणिमादि दुनी ।
तरि तुं हि त्यासी भज नीट राजया ।।
धातयादि भजति सदा जया । शेष वेद पढताति तज्जया ।
जाणिवेन रिघ भक्ति कां जया । जो नव्हेंच बहुसाधनी धनिकला ।
कलापसि कला न कांहि हरि आळवोनि गज तरला ।।
पहा पहा आळवोनि गज तरला ।।३।।

चक्रायुध नुति ऐकुनि युक्ता । वक्रादि ठिकरिता वीरक्ता ।
सक्रोधे नृपजाळा भकता । शुक्रा नासियला आर्भकता ।।
काय नसे भय होय मेत भ्रमें कीं कपटागम देव सहायक -
बोधिसि कां मज नेणत दुर्मति या तव कर्मफळा तुजलागुनि देउं सके-
तरि सांग खरें ।। मग बोलियलें कविने प्रखरें ।
मति याचिच वाटतसें विखरें । हरि भक्तिसि हा चढवी शिखरें ।
गत कल्प कथा हरिच्या बहुता कथितों पहतां । मुळ भागवतां
मज काय चाड सिकवीन हें मुला ।
अैकुनि प्रभु सुतासि बोलिला । शत्रुपक्ष त्यजि रे नव्हें भला ।

तो म्हणे रिपु सखाहिं शोभला ।
ज्यासि भाव जैसा । तयासि तैसाच साच संतानरूप हरि फळला ।।
संतानरूप हरि फळला ।।४।।

हे कानीं परिसत आवेसीं । हे कां घे दनुजेंद्र विशेषी ।
हाकारूनि म्हणे शुरासि । हा कापा सुत नोहे द्वेषी ।।
ऐकुनि शासन भूपतिचें असुराळि कयाधुसुतासि ।
वधुकर चालविती चमके तरवार नव्हे परवार ।।
सुदर्शन धार करी तुकडे । दळितां दळती जिकडे तिकडें ।
जखमी जाहले भरले छकडे । उरले फिरले हरले कुकडे ।
हरि गात मुखी प्रहलाद सुखी । मणिराज शिखी ।
फणि घोर विखी । अणि दंशवी प्रभुनसाधु वावरे ।
ये म्हणे गरूडयान पावरे ।। तो भरे खगपती जमावरे ।
पांगुळासि घडला अपावरे । पक्षी चंचुपुटी शीक्षिले ।
शरण रक्षवी सुमनी जी । क्षमा म्हणत लक्षिता न निज चुकिला ।
जी जी क्षमा म्हणत निज चुकिला ।।५।।

भःकरि कोपानळ मनि धडके । धिःकरि तप म्हणे फणि रडके ।
दिःकरी धाडि विराजित सडके । लःकरि मेरू समुहचि भडके ।
तेविं उभारुनीं पुछ धजा रद भल्ल पुढारूनिया
प्रहलाद उरावरि ते हणिती थडके ।।
तरिही निरूपद्रवतो कडके । हरि ये म्हणोनि तव -
सिंह महोग्र तयासि दिसे । पळती गज ते अरडोनि दिसे ।
प्रभु का वरूनि तवका धरूनीं असुरा करूनीं ।
शिखरी वरूनीं सुत लोटवि परिन तो विरामला ।
हे धराधर धरी म्हणे मला । तन्मनापरीच देव ने मला ।
घे कडेवरि तसा अरामला ।।
भुतटस्थ भव संकटासि हरि सत्कटाक्ष करि –
वेंकटाद्रि विभु गमला ।
उतरें वेकटाद्रि विभु गमला ।।६।।

तोक या पुसति नृप देवें । हावें बोधिलि ते ऐकावें ।
ठावें प्रहालादासि न व्हावें । द्यावे भोजन गरळ उपावें ।
आहे चाड चेवपणाची तरि करि म्हणता अहह कशास असें बोलावें ।।

करिन तसें निज हितसें । म्हणवुनि करूनि पदार्थ विषान्वित
शंकित साधुवराप्रति वाढीतसे । कर मागिलियां पथि वोढतसे ।।
नृप शासन गुढहिं रूढतसे तनु कांपतसे ।। अति दीन दिसे ।
प्रहलाद पुसे । भय काय असे । कथि माय तुज धणि देववी गरा ।
नेंदवे मज अशा भयागरा । ठाव देव गुण रत्न सागरा ।।
तो नभी, म्हणुनि जेवि वोगरा ।।
अव्यया अनळ हव्य घे अमर शेव्य जी म्हणत
दिव्य कंठ हर निभला ।।
जी जी दिव्य कंठ हर निभला ।।७।।
रागेजुनि पुनरपि हीं राजा । सांगे असुराप्रति निजकाजा ।।
जागे जलचर संव्हति खाजा । लागे ना तल वेगे जा ।।
वेगुनि जाहजा सिंधुह्रदांतरि । नेउनि बांधुनि हा बरवा ।
बुडवा रिचवा गिरियावरि किं नुफळेचि तयवरि या उपरि
इकडे परता, म्हणता, धरूनि अतितत्परता असुरावलि तेविंच संचरता ।
गमला उदधी उदधी वरता रूजु चाकरी ते । जाहले करिती
मग जाति रिते । प्रहलाद रिते । वद मत्सरूप धरिताचि अंतरीं ।
।। पद्मपत्र न भिजे जळांतरी । तेवि होय हरि नाम ज्या अंतरी ।।
सिंधु आर्चे विनवी सदुत्तरी ।। उत्तरी अणुनि कांठिसी असुर दाटिसी ।
पुढती आठउनी हरि नाटकाळीं परिपढला ।।
हरिच्या नाटकाळीं परि पढला ।।८।।

दुष्टाने कथियलें इष्टां । कष्ट परि आणारे काष्टा ।
स्रष्ट हों द्या व्या हे निष्टा । भ्रष्टाची तरी काय प्रतिष्टा ।।
।। प्रज्वाळुनींया अग्नीमध्यें घाला याला म्हणुनी नगरी डांगोरा पिटियला ।
तैं बहु भीतीने सेनेसह दळपती इंधन भारे थोरचि माथा घेउनि
तत्पर ते जमती हो ।। अनिवृत्ध कुतार युव श्रमति ।।
भरल्या गरव्हर वधु दमती । म्हणति कधि जाइल मंदमती ।
म्हणु बैल किती । खुळगेह किती गजहीं थकिती । चुकतां बुकिती ।
शिखि पेटउनी मग सूत्र साधुनीं ।
साधु नीटची झुगारिला धुनीं ।
ज्यापदे सुखिं पवित्रला धुनीं ।
तेचि संतत वसे अराधुनी ।। अग्नि‌ताप परिहारले ।।
असुर हारलेच सुखि पूर्ण चंद्र घवघवीला ।।

दिवसा पूर्ण चंद्र घवघविला ।।९।।

उपाधि नोहे तोबुनि येणें । उपाय मानुनि करिसी टोणें ।
अपाय हे तो कथिले कोणे ।
निपात करिन मीं जासि प्राणें । नको नको नको वद सत्य नृपा
न म्हणता तेणे ।
कथियलें मीं काहिच नेणे ।शरण रिघालो हरिचरणासी ।
जाणतसे घडलें हरितो ।
वदला नृप सांग कशा परि तो । तनु गौरचि काय निराळी धरितो ।
लपुनि तुज साह्य भयें करितो
न दिसे पहतां । न लगेचि हता । मिळवीन हातासि न साहे अतां ।।
मम हुंकृतिने करि देव धाकले । धाकले प्रभुमुखें तेहि फांकले ।
येक येक मज शेऊं ठाकले । ना कळे कपटि विष्णु तो कळे ।
खुण त्यासि कसी कोणती वसति ठाण माण वद जाणतोसि धणि आपुला ।।
अरे तुं मानितोसि धणि अपुला ।।१०।।

उत्तर साधु वदे बापाला ।। दत्त मनें परिसे महिपाळा ।।
विसरवी जग जाची लीळा । उत्तम तो निराळा ।
उपजवी शिखाचला ।। कुंभपरी धरणी जल वन्हीं समीर नभि ।
स्थिती कीं असती असल्याहिं उपाधित यासहिं कारणें तो म्हणसो लपता
रवि काय घनास्तव हारपता । महकाळ जया स्वरूपी खपता ।
न मरे नभिं हि प्रळयो विपता । नफुटे न अटे न विजे न तटेच -
न कोस (?) घटे ।। न कदापि विटे । गुणि वर्ण निलसित पीत जे तसे ।।
स्वर्णचेल कर चक्र घेतसे । पूर्ण नाम रूप तोचि कीं असे ।।
निर्णय त्रिपुटि पाहता दिसे । जीववी सकळ जीव तत्स्वरूपी लावि चित्त ।
निज भावि ईश भज वहिला ।।
अरे तुं भावि ईश भज वहिला ।।११।।

दिति जे स्वर तो प्रगटे स्वमती । स्थिति हें ऐकुनि वेडे भ्रमती ।
किती रे दायादाची किमती । पति मी भुतांसि न तां (त्वा) हिमती ।
हे धरणी तरि मंधरणीच परी फळते ।
वरूणालय ही शरणागतसा । रवि चंद्र हुताश कृतांजली वंदित
घेवे जनाश्रय मंदगती ।।
न भजे न भीजेल कसे निरूती ।।

मम कीर्ति विशाल विलासवती ।।
म्हणवोनि रितीच धरि अकृती । सुर हीं नमिती ।।
असुरास मिती न मनुष्य किती ।। फळहीं लभती ।
वद माग काय तुजलागि पाहिजे ।।
कामितार्थ पुरवीन पाहिजे ।।
अद्य शत्रुपर भक्ति टाकिजे ।।
ना तरी मज पुढांतया कीजे ।।
फार काय वदुं चुर मी करिन
येरू त्यासि म्हणे दुर काय जग भरला
तुज मज माजी तोचि जग भरला ।।१२।।
सावरूनि असि खळबळ राशी ।
दाऊनि सदरेच्या खांबाशी ।
राव पुसे हे प्रह्लादासी ।।
देव असे की यांत तयासी ।
होय म्हणे तो राय हणी पद ।।
खांब कडाडि गडाडित तो रव भैरव
ये हरि वक्र वक्त्रनरोत्तमगात्र तडि ज्जई वस्त्र
सुतीक्षण नखांकुश राजित -
शंख चक्र कर धगधगले ।।
तव खग शशि भगणहि लगबगले ।
मग खग मृग डगडिग तगबगले ।।
नग पन्नग दिग्पति डगमगले ।।
बहुत उबगले । खळ दगदगले ।
धरि हरि बगले । पिळि रगत गळे ।
मुख जोतयात बळियाउ मातला ।।
मांडियेवरि चिरोनि घेतला ।।
शोधत ज्जठर मेद धुतला ।
तत्पराक्रम दिनेश पातला ।।
अस्तु तैंच सुरवर स्तुते स्तविति
मस्त शत्रु हत होय हर्ष भय सकला ।
पाहतां होय हर्ष भय सकळा ।।१३।।

अग्रहांत सदनुग्रहि भोळा ।
उग्र रूप तो पाहतां डोळा ।।
व्यग्र चित्त सुर जाहले गोळा ।
अग्रदेव भजु प्रहलादाला ।।
पाठविती तो नाठवी भीतिस । नीट निघे हृत्पीठ निवासी भेदुनि -
सुखमय दाटत अश्रु चाटित तनु प्रेम ।।
प्रेम रसें जसि गाय शिशुवरी वोरसली ।
हरिमूर्ति हि सौम्य तसी दिसली ।
कमलापति अंकि तदा वसली ।।
सुर मंडलि निर्भय उल्लसली ।
पितृराज्यपदीं प्रहलाद निधी । वसवोनि सुधी । अभिषेक विधी ।
विधी आदिदेव हरीचेनि संमती ।
दुंदुभि पिटिति कीर्ति कीर्तिती ।।
मंत्रपुष्प ऋषिराज वर्षती ।
माग रे वर ह्मणे रमापती ।।
आस हेच तव दास्य देह गुरूदास बोलिला ।
वासुदेव म्हणे वर दिधला ।।
वर तुं भक्तराज मज पहिला ।।१४।।

इतिश्री प्रल्हाद चरित्र कड. सं. मस्तु ।।

श्री चिन्तामणीसुत रामनाथकृत

श्री रामकर्ता

## प्रल्हाद चरित्र

आर्या

नरहरि पदाब्ज नमुनी निजरसना हे पवित्र हो म्हणोनी ।
प्राकृत भाषाजातें रचितो प्रल्हाद सच्चरित्रा तें ।।१।।

श्लोक

कदाचित्कंजाक्षा स्मरुनी हृदयी तत्पद युगा ।
विलोकाया आले सनकमुख योंगींद्र सुभगा ।
जगद्रक्षू जागा धरि शयनमुद्राब्धि सदनी ।
वसे जो शेषोद्यत्फण मणिद्धासि वंदनी ।।२।।

पद

पाहूं पाहूं त्या श्रीहरितें पाहूं वो ।
स्वसुख पाहू सौंदर्य नयनी लाहूं वो ।।धृ।।
नेंत्रें ज्याची विकचांबुज शोभा धारी वो ।
बाहू ज्याचे करि शुंडा सन्निभ भारी वो ।
सायक ज्याचे खलदानव भर्जनकारी वो ।
ज्याचे भजनी वाचा हे उद्यातसारी वो ।।१।।
ज्याचे वदनी चंद्रायुत कांति विराजे वो ।
ज्याचे निटिलीं मृगनाभि विशेषक साजे वो ।
लोपुनि ठाती रवि पावक ज्याच्या तेजें वो ।
त्याचे स्तवनी हो मति हे उद्यत वोजे वो ।।२।।
ज्याची करुणा पतितासि पाववि मुक्ती वो ।
ज्याचा महिमा ब्रह्मांडा न धरूं शक्ति वो ।
ज्याचे भजनें न तगेचि विषयासक्ति वो
ज्याते ध्यातो चिंतामणिसुत सद्भक्ति वो ।।३।।

श्लोक

निजविभु हृदया ते नेणुनी निर्भयेसीं
सनकमुखमुनींद्रां रोधितां द्वारदेशीं ।

सुकुपित ऋषिशापा देति ते द्वारपाळा
जयविजय म्हणोनी मुख्य जे दासमेळां ।।४।।
जा तुम्ही चपल भूमितलासी
सिंव्हासुरारि निऋती नरदोषी ।
या तपोनि रिपुभाव तपातें
या स्थलासि परतोनि सुशांते ।।५।।

प्रतिहार निजार्जित पापवशें
पृथिवीतळि येउनि गर्भमिसें ।
दितिकुक्षि समुद्भव होउनि ते
दिजगज्जठरीं जाहले फिरते ।।६।।

देव ब्राह्मण धर्म यज्ञ विधितें छेदावया निर्मिले
किं नेणो कलिनें स्वयें अति तपो वीर्यें असे मातले ।
ते दैत्येंद्र हिरण्यपूर्ण कशिपू तत्पूर्व नेत्राभिधा
पाउनी भुवनत्रयीं विहरले की काळ झाला द्विधा ।।७।।

हिरण्याक्षकें बाहु वीर्ये महीतें
पाहा वेष्ठितां देवरायें तयातें ।
बळें मारिता बंधु त्याचा सुरारी
तदारभ्य त्यासी करी वैरभारी ।।८।।

बहुत तप करोनी सत्यलोकेश्वरातें
अभिमत वर तेणें प्रार्थितां तेहि त्याते ।
जलज सदन देता जाहला त्यावरी तो
दितिजकरि अनर्था ऐकतां ताप होतो ।।९।।

यक्ष किन्नर सुरासुर भ्याले । तदभये गिरिगुहेतं दडालें ।
तत्पदीं प्रतिनिधी दनुजेंद्रें । स्थापिले असुर विक्रमसांद्रे ।।१०।।

पदच्युत सुरौघ ते ऋषिसमेत शैलांतरीं
कळत्र सुत बांधवासहित कण्ठती अंतरीं।
सदैव वदती मुखीं त्वरित रक्षि तूं श्रीहरीं
अतर्कित गिरातदां उमटली नभाभ्यांतरीं ।।११।।

चिंताव्यजा विबुध हो तुम्ही अंतरंगीं
श्रीकांत पावल तुम्हा अति लागवेगीं ।
प्रल्हादनाम सुत होईल दैत्यराया
तन्मूल तद्वध घडेल सुखे असाया ।।१२।।

झाले सुरेंद्र बहु तुष्ट स्वभारतीनें
येरीकडील सुकथा वदतों मतीनें ।
दैत्योत्तमासि जाहले शुभपुत्र चौघें
झालाचि आद्य हरिभक्त तया ना तीघे ।।१३।।

प्रल्हाद ल्हाद सल्हादानुल्हाद म्हणुनी तदां ।
दनुजेंद्रे सुतालागि नाम ठेवियले मुदा ।।१४।।

षंडामर्क म्हणोनि शुक्र सुत जे धीमंत विद्यानिधी ।
पाचारोनि तयासि दानव वदे जी जी कृपावारिधी ।।
प्रल्हादासि समस्त शास्त्र शिकवा हा शिष्य हो तूमचा ।
षट्तंत्रांतर तत्वबोध तूम्ही स्वधर्मा रचा ।।१५।।

भूपति वचनावळिते आणुनि कर्णावतंस लीले तें ।
प्रल्हादासह घेउनि आले साळेसि सभेहूनि ते ।।१६।।

रजतपीठावरी मणिवाळुका ।
पसरुनी गुरुपुत्र सकौतुकां ।।
करि करोनि हरिन्मणि लेखणी ।
लिहविती शिशुतें विकसन्मनी ।।१७।।

सकळ लौकिक विस्मरणीं पडे ।
हरिविना दुसरें मनि नावडे ।।
शिशुस बाणलि उन्मनता दशा ।
दिसति त्या हरिरुप दहा दिशा ।।१८।।

आनंद तुंदिल मनें निजनंदनातें ।
पालाणुनी मग वदे दनुजेंद्र त्यातें ।।
बापां तुला शिकविल्यांत मुखस्थ जे कां ।
तें बोलिजे बहुत कौतुक मंत्रिलोकां ।।१९।।

बोले बाल पित्यासि तूं परिसगा मद्वाक्य हे चांगले ।
जें जें काव्यसुतिं मला शिकविलें ते त्यांसि म्यां बोपिलें ।।
तत्सारांश समर्थ ज्यासि म्हणती ब्रह्मादि योगी भले ।
तो, चित्तीं धरिला मुकुंद-सहसा पाप्यासि जो नाडळे ।।२०।।

सवाई

संसारसार हरिकंसारि देववर हंसासनादिनुत जो,
ताराधिराजमुख मारा कृतीस जलधाराधरा भरुचि जो,
वाराशिदर्पहर धीराग्रपूजित सुवीराग्रणी प्रथित हा,
त्राता अम्हासि मधुजेता असे दुरित कांतार दाव रिपु हा ।।२१।।

विद्या तदीय नुति पाठ तदीय सेवा ।
उद्योग त्यासि फल मोक्ष महानुभावा ।।
अैसें मनीं दृढ धरोनि सुरारि देवा ।
मीं राहिलों वदनिं गर्जत वासुदेवा ।।२२।।

पद ।।२।।

सोयरा नृसिंह त्याचे चरणिं लीन व्हावें ।
घोर जन्म मरण दुःख सर्वहिं त्यजावें ।।धृ.।।
शंख चक्रधर उदार गुण गणांबु राशी ।
भक्त सखा परम पुरुष सर्वभय विनाशी ।।१।।
ताक्ष्र्य गमन चंद्रसहित चंदनानुलेपी ।
पीत वसन दीप्त नयन पातका विलोपी ।।२।।
सकळ संत शरण सहज कृपा पांगशाली ।
चिंतामणि तनय हृदय सदन सार्वकाळी ।।३।।

श्लोक

प्रल्हाद सुंदर मुखांबुज निर्गता जे ।
दिव्या सुमंगलमयाक्षर पंक्ति साजे ।।
अैकोनि तो मग वदे खल संगतीने ।
हा बोलतो हरिपदांकित पध्दतीनें ।।२३।।

नको बापा अैसे करि ह्मणुनि तो बाहु युगुळी ।
सुता अलिंगूनी वदत भृगुपुत्राप्रति बळी ।।

तुम्ही कां हो याते कुमति शिकवीतां रिपुमती ।
प्रवेशूनीं शिक्षा करिन उभयातें खलमती ।।२४।।

ते भीतभीत वदती भृगुपुत्र राया ।
तूझा सुता सहज भोंवलि कृष्णमाया ।।
नासोनि आपण मुलांस बलावितो या ।
श्रीराम केशव मुकुंद म्हणोनि गाया ।।२५।।

बोले हिरण्यकशिपू स्वसुतासि रोषें ।
तू जाहलासि मजला रिपु पुत्र वेषे ।।
जन्मोनि दानवकुळीं हरिभक्त होशी ।
झाली कशी तुज अधोगतिची असोसि ।।२६।।

दूतातें कथितो हिरण्यकशिपू न्यारे वना मद्रिपू ।
छिन्नभिन्न करुनिया झडकरी शस्त्रें तयाची वपू ।।
दूती तेविच हाणिता असिवरीं काळीं तदां श्रीधरें ।
पाणी दिव्य कृपाणयुक्तचि नभीं केले उभे सादरें ।।२७।।

पुन्हा वांचलासें कळे तो सकोपें ।
स्वपुत्रावरी सोडिले कृष्णसर्पें ।।
गरुत्मंत होवोनिया श्रीहरीनें ।
भुजंगासि नेलें नभी ऊंचलोन ।।२८।।

त्यांतें देखुनि सेवका प्रति वदे काष्ठायलाग्नी बरा ।
तैलागें करुनी प्रदीप्त ढकला मत्पुत्र तो सत्वरा ।
आज्ञा मानुनि लोटितां शिखि शरच्चंदापरीं जाहला ।
अत्युष्णालज पाहुनी तव पिता अत्यंत पैं कोपला ।।२९।।

टाका मद्रिपु हा समुद्र जठरीं दूतांसि आज्ञापितां ।
येती मध्यजलीं झुगारुनि तदां तो अब्ज योनी पिता ।।
नौका होउनि शीघ्र आणुनि तदां सिंधूतटीं सोडिला ।
प्रल्हाद स्वमुखें हरी वदत तो आला सभे चांगला ।।३०।।

प्रल्हादाप्रति देखुनी खवळला रोषें पिता सेवका ।
आज्ञापी गिरिमस्तकावरुनिया लोटा तुम्ही तो निका ।।

देता लोटुनि भूवरी अतिमृदू पर्यक झाला हरी ।
पंचास्यापरि नामगर्जत मुखे आला सभे सत्वरी ।।३१।।

पिता सुता देत विषा तदा तें ।
पीयूष होतांचि दृढांघ्रिघातें ।।
सुता वधाया गज पाठवीले ।
सिंहापरी' देखुनी त्या पळाले ।।३२।।

क्रोधाग्नि पिंगळ करुनि विशाल डोळे ।
प्रल्हाद वक्र निरखूनि सुरारि बोले ।।
कोठे हरी कवण तो वद रे विपक्षा ।
त्याला तुला उभयतास करीन शिक्षा ।।३३।।

हरिस्वयें पूर्ण जगत्रयीं हि ।
आहे म्हणे बालक सर्वठांई ।।
तवांतरी पूर्ण मदंतरी तो ।
आहे असें जाणत सत्य मी तो ।।३४।।

स्तंभांतरीं काय असे विचारी ।
तो बोलिला सत्य असे मुरारी ।
स्तंभांतरीं कां न दिसे म्हणोनि ।
स्वखड्ग मुष्टी दनुजेंद्र हाणी ।।३५।।

स्तंभ प्रोत्तुंग तेव्हां तडकुनि सहसा शब्द गंभीर झाला ।
आब्रह्मस्तंब मूर्च्छापरवश जाहले तूटल्या सर्ग माळा ।।
चिंत्तीं दैत्येंद्र तेव्हां भयविकल म्हणे हा महानर्थ आला ।
कैंसे नेणो प्रचंड प्रकटले सुमहद्‌भुत मद्‌भंजनाला ।।३६।।

कड कड कड शब्द स्तंभ भागीं उदेला ।
उळमळ तवं चौदा जाहल्या लोकमाला ।
प्रतिनिनद गडाडी जेंवि कल्पांत वेळा ।
नृहरि कडकडाटे स्तंभ भेदे निघाला ।।३७।।

थर थरथर भूमी कंप झाला विशेषें
फड फड फड शीर्षें झाडिलीं आदि शेषें ।।

धग धग धग ज्यांची राजती रुक्ष नेत्रें ।
लग बग तव झाली घाबरी प्राणीमात्रे ।।३८।।

जगत्क्षोभारंभी जलनिधी जसा डंभ धरितो ।
तसा रौद्रावेशें घड घड घडाडी नृहरि तो ।
हठोर्ज्जंभज्ज्वाला जटिल मुख मुख्या सुरकुळां ।
न्यहाळीतां त्याते चळ चळचळा कांप सुटला ।।३९।।

सुटे वारा चंड ग्रहण तुटे भूमि उचटे ।
पळाले दिक्कंभी सभय तव विध्यंड हि फुटे ।।
ध्रुव स्वस्थानाते त्यजि उडति शैलेंद्र शिखरे ।
उठे कल्पांताग्नी धडकत दृढा टोप सुभरे ।।४०।।

महत्खङ्ग जें शत्रुकंठा भुकेलें ।
नृकंठी रवें दक्ष मुष्टिस्थ केलें।।
तया हाणिले मस्तकीं दैत्यराजा ।
जया देखतां भीतसे प्रेतराजा ।।४१।।

दोघांसि तैं बहुतकाळ सुयुद्ध झालें ।
दैत्याधमासि हरिनें हतवीर्य केलें ।
बाहार्गळीं धरुनि दैत्य करोनि अंकीं ।
कंठास्त्रपान करि रोषभरें तदांकी ।।४२।।

निशित नरवर टंकी दैत्यवक्ष:शिले तें ।
शकलित करूनीया आंत्रमाळा स्वहांते ।।
काहडुनि निजकंठी अर्पितां देवराणा ।
प्रळय विशिख तैसा लोचनीं पाहवेना ।।४३।।

लक्षम्यादि जाउं सकती न जेथें ।
रिघेल तो कोण सुधीर तेथें ।।
तैं देवसारे रचुनी सुयुक्ती ।
दैत्येंद्र बाळास पुढे करीती ।।४४।।

पद ।।३।।

सुदिन भासला दिवस हाचि चांगला ।
श्रीनृसिंहसिंहराज आजि भेटला ।।धृ.।।

पूर्वसंचितें सफळ दोन्हि लोचनें ।
श्रीहरी शरीरकांति अमृत सेचनें ।।१।।
जाहलो सुखी सदैव विश्वपूरणें ।
कर्णसूत अहित तात भय निवारणे ।।२।।
विबुधपाल भक्त चिंतामणिसुता ।
पावला विरिंचि गोळ सर्व राखिता ।।३।।

श्लोक

प्रसन्नता पाहुनि त्या सुरोत्तमा ।
समीप आली रमणीय मणीरमा ।।
तैं वाम उत्संगावरी हरीने ।
ते स्थापिली विश्वधुरंधरानें ।।४६।।

रत्न सिंहासनी देव बैसवी दनुजात्मजा ।
म्हणे आचंद्रतरणी हो धणी दितिज प्रजा ।।४७।।

लक्ष्मीसमेत शतपत्र विशालनेत्रा ।
वंदावया विबुध येति गुणैक पात्रा ।
स्तोत्रे अनेकविध मंजुळ गायनें हीं ।
भावें तदां रचिलि तुंबरू नारदेहीं ।।४८।।

पद ।।४।।

अैसा नरहरिराव हो । अद्‌भुत महानुभाव हो ।। धृ. ।।
स्तंभांतर जंव भेदुनिगर्जत । केसरिमुख अवतरला ।
कोटि रविप्रभ तैं सर्वांसीं । कल्पांतस्फुट गमला ।।१।।
ब्रह्मादिक सुस्तंभित होउनी । ठेले सनकादिकहीं ।
क्षीराब्धी तनया बहु चकित । जाहली कीं तत्समयीं ।।२।।
वज्रोपम नखाग्रीं भेदुनि । दनुजोदर घन घोषें ।
आंत्र मालिका सुमन । माल्यावत कंठी अर्पित रोषें ।।३।।
गंधर्वामर पाहुनी अद्‌भुत । वर्षति कल्पक सुमनें ।
स्वामी सुशांत होइ म्हणउनि । करिती सर्वहीं नमनें ।
भक्तिभाव दृढ पाहुनि निर्मल । रक्षियलें प्रल्हादा ।
चिंतामणिसुत निजदासासी । देता परमानंदा ।।५।।

श्लोक

तंजापुरीत तुलजेंद्र नृपादरानें ।
हें शार्वरी प्रथितवत्सरिं सन्मतीनें ।
चिंतामणि प्रथमनंदन रामनाथें ।
प्रल्हाद सच्चरित पैं रचिले शुभार्थे ।।४९।।

।। इति श्री प्रल्हादचरित्र निरुपण संपूर्ण ।।

।। श्रीलक्ष्मीनरसिंहार्पणमस्तु ।।

## प्रतापरामकृत

### चेंद्रहास निरोपण

### चंद्र १

करुनि द्विरदाननासि नमन । सरस्वतीचे वंदुनि चरण ।
सद्गुरुपद माथा धरून । चंद्रहास कथन कथिजेलें ।।१।।

जैमिनी भारतीची कथा । वैशंपायन सांगे भारता ।।
पूर्वी नारदे पांडुसुता । जे तत्वतां कथिली होती ।।२।।

पुर्वी काळाधिपती नृपवर । होता प्रतापाचा सागर ।
त्याचा चेंद्रहास कुमर । भक्ताग्रेसर हरीचा जो ।।३।।

तया काळाधिबा रणांगणी । विपक्षी जिंकूनीया बाणीं ।।
अटोपिली त्याची राजधानी । चालिली राणी पतिसवे ।।४।।

मग त्या लेकरा घेऊनि करी । धात्री प्रवेशली अन्य नगरी ।।
तेही पावली अंतकपुरी । लोटले त्यावरी केतेक दिन ।।५।।

तो बाळ खेळता गुणग्राम । सापडला वो शालिग्राम ।
त्यासि पूजी यथा नेम । अति सप्रेम बोले वाणी ।।६।।

पद १.

देखिली श्रीमूर्ती । लोकागळी भूवरी कीर्ती ।।धृ।।
बहुता जन्माची सुकृते । फळा आली आजि माते ।।१।।
दीनबंधु पुरुषोत्तमा । देखीलासी आत्मारामा ।।२।।
श्रीमत्प्रताप राघवा । केली करुणा सीताधवा ।।३।।

ओव्या

मग संवगड्यासि पाहुनि त्वरे । बोधीन यासी हितोत्तरे ।
लागारेभजन मार्गी सादरे । घडेल बरे तेणे तुमचे ।।७।।

पद २

नाम घेता राघोबाचे । काय वेचते तुमचे ।।धृ।।
पाठी लागलासे काळ । व्यर्थ लोटिता कां काळ ।।१।।
भवसिंधुमाजी नौका । रामनाम हेची देखा ।।२।।
श्रीमत्प्रताप रामप्रीती । वेगे स्मरा यथामती ।।३।।

।।ओव्या।।

ऐंसे खेळत खेळत येके दिनी । निघाला दृष्ट प्रधानाचे सदनी ।
तेव्हां तेणे व्दिज अवतुनी । इच्छा भोजनी तृप्त केले ।।८।।

विप्र बोलती आशीर्वचनी । हा बाळभक्त शीरोमणी ।
तुजहुनी आधीक गुणी । भोगील अवनी समस्ताहीं ।।९।।

ऐंसी ऐकोनी विप्रवचनें । येरे ताम्र केलें लोचन ।
ब्राम्हण ते विसर्जुन । वदत दुर्जन दुताप्रति ।।१०।।

दुत हो काय पाहता दीठी । नेउनि यासि वनी संकटी ।
शिर छेदुनी शस्त्री तिखटी । पाहुनि भूतळवटी परता मग ।।११।।

ऐंसे बोलता तो दुष्ट मंत्री । बाळासी घालुनि पुढती ।
दुत चालले वात गती । नेउनि त्या स्थानाप्रति उभे केले ।।१२।।

।। पद-३ ।।

लागले पोट पाठीसी । हींडवीले देशोदेशी ।।धृ।।
बहु संसारी गांजीलो । तुज शरण पै आलो ।।१।।
यावरी जी गुणग्रामा । नुपेक्षीजें प्रतापरामा ।।२।।

ओव्या

तो कळवळुनि शस्त्रपाणी । वदती बाळकासी वाणी ।
तुझे ईष्ट दैवत चिंतामनी । ऐक श्रवणी आमुची मात ।।१३।।

अैंसे परिसोनि चेंद्रहास । आळवी जगदीश्वरास ।
तोचि संदर्भ सरस । येंकाग्र मानसे अवधारा ।।१४।।

चेंद्रहास बोले वचनी । मज समान पातकी अवनी ।
धुंडिता न मिळे तुजला मुनी । वदसी मत्तुल्येजनी वसती फार ।।१५।।

तरि हो गोष्टी न घडे देवराया । जरि पडेल पातकी माझी छाया ।
तेचि समान भावी सदया । अनाथ बंधु ।।१६।।

पद-४

शुध्द जे केवळ । व्योम सर्व काळ । जाहले तेही काळे । माझ्या पापे ।।१।।
माझ्या सहवासें स्वच्छंदे श्रीहरी । घडलासि निर्धारी घनशाम ।।२।।

शंभुचीया गळा घालीता म्यां मीठी । काळीमा ते कंठी जडली असे ।।३।।
पातकासी माझ्या नाहीच पै सीमा । श्रीमत्प्रताप रामा जाण मनी ।।४।।

ओव्या

पुर्वी तारिले पापी बहुत । म्हणुनि असल मानी हेत ।
तरी माझ्या पापासी निश्चित । न तुळती ते ।।१७।।

म्हणसी तूझे पाप ते किती । मी वारीन क्षणा अतौंती ।
परि ते नव्हे तुझ्या हाती । सदृढ चित्ती जाणावे ।।१८।।

पद ५

बांधुनिया बळे कास टिके करुनी हास ।।ध्रृ।।
माझ्या पातकाच्या राशी येती जुंझाया तुजसी ।।१।।
शंख चक्र पद्म गदा । वरी सावरी गोविंदा ।।२।।
श्रीमत्प्रतापेंद्र रामा । नको माघारू सुखधामा ।।३।।

वोव्या

माझि मज नसे चिंता देवा । या जिवाचा सरावया पापठेवा ।
करे निर्मिता माधवा । कष्टसी फार ।।१९।।

पुनः पुन्हां गर्भवासी । आम्हा घालि गा कृपारासि ।
काय प्राप्त तुम्हासी । सांगिजे बा रे ।।२०।।

पद-६

आम्हा जन्म देता फळ काये तुज सांगिजे ते मज श्री राघवा ।
परदु:खसीतल होण नव्हे युक्त कीजे बंधमुक्त प्रतापरामा ।।

ओव्या

असो मी पापाचा ठेवा । तुज कीर्ती घ्यावया देवा ।
शरण आलो श्रीराघवा । उपकार मनी ।।२१।।

म्हणसी अजामेळ पापागळा । म्यां काय नाही उत्धरिला ।
तरि तो पुत्रामिसे नाम स्मरला । तारणे त्याला चोज काय ।।२२।।

गणिकेची जरी उपमा देसी । तरि ते शुकमिसे अहिर्णिसी ।
जपत होती तुझ्या नामासी । म्हणोनी तरली ।।२३।।

पद-७

उपमन्यु केवळ बाळ । तुज ध्याता उतावेळ ।
दिधला त्यासी क्षीरसिंधु । देव देवा दीनबंधू ।।१।।
ध्रुवे प्रार्थीतां सदया । ध्रुवपदी स्थापिले तया ।।२।।
श्रीमत्प्रताप राघवा । भक्त पाळका माधवा ।।३।।

वोव्या

पूर्वी शबरीचा उत्धार । केला काय न म्हणसि साचार ।
तरि तपाल प्रदानें पार । पावली भवसिंधुचा ।।२४।।

तुझे निज चेक्रपाणी । न जपेचि माझी वाणी ।
क्षणमात्रही श्रीचरणी । न लोगे चींता ।।२५।।

पद-८

ना रमत तुझे भजनी । नाम न येची वदनी ।।धृ।।
संत साधुची संगती । नावडेची मजप्रती ।।
अैशा माते प्रतापरामा । कैसा तारीसी गुणधामा ।।

ओव्या

असो मी महापापी दुर्मती । वारंवार सांगो कीती ।
तुवा अव्हेरल्या श्रीपती । दुसरी गती नाहींच ।।२६।।

म्हणसी पुर्व दत्ताधीण कांही । मी कोणांसी देत नाही ।
तरी जेन्मांतरी किष्किंदा राज्यमही । समर्पिली सुग्रीवें कवणां ।।२७।।

तेवीच बिभीषणे अकळंका । कोण्हासी दीधली लंका ।
येवं हाही पक्ष निका । नव्हेची स्वामी ।।२८।।

पद-९

वणव्यात मृगी गर्भीणी सापडत । सोडविलें ताता दयासागरा ।।१।।
काय तुज तीने दीधले सांग पा । रघुकुल दीपा प्रतापरामा ।।२।।

ओव्या

गजेंद्रे तुते काय दीधले । म्हणोनि संकटी रक्षिलें ।
मंडुक बाळक वहीले । आराधन केले तुझे काये ।।२९।।

म्हणसी हे गोष्टी राहो सारी । तु प्रवेशसी मानत्याचे दारी ।
तरी ब्रीदे टाकी मुरारी । न घे निर्धारी तुझे नाम ।।३०।।

दीनवत्सल पतीत पावन । हे नाम देई सोडुन ।
पुन्हां म्या केल्या तुझे स्तवन । शिक्षा दारुण की जे स्वामी ।।३१।।

बाळके हाणीतल्या लाता । काय कोपा पात्र घडे माता ।
तेवी तुज नवी ओंथ (?) नाथा । साहीना आता अपराधासी ।।३२।।

जेथे वेगळे असती जननी जनक । तव दोघात कोपत्या एक ।
अन्यत्र पाळी निष्टंक । तुचि देख मायबापही ।।३३।।

पद-१०

तुचि निर्दय झाहाल्या हरी । कोण अमुते अरी ।। ।।
अकृपा आल्या हीमकरा । कोण पाळी त्या चकोरा ।।१।।
नभी वोळलीया घन । अर्पी चातका जल कोण ।।२।।
तुजवीण प्रतापरामा । कोण्ही आपंगीना आम्हां ।।३।।

श्रीमंता तुचि कोपल्या श्रीहरी । कोण आम्ही दीनाते आदरी ।
गिरी कोमळलिया सीरी । कवणे रक्षावे ।।३४।।

मी बोलिलो उण्या उत्तरी । ते सहसा मनी न धरी ।
दयाळु बा क्षेमा करी । जोडल्यां करी प्राथींतसे ।।३५।।

छंद

कमळलोचना श्रीरमावरा । क्षमी दयार्णवा नीच उत्तरा ।।१।।
नमीतसे तुते जोडल्या करी । द्युमणि वंशज्या वीर केसरी ।।२।।

अंभग

दावी चरण प्रताभिरामा । भाविकांचीया विश्रामा ।।धृ।।
यावरि तुज लाविता वेळ । पूर्ण कृपेचेनी बोले ।।१।।
अंत न पाहीजे आतां । धांवे पावे कृपावंता ।।२।।
माझ्या सलगीच्या उत्तरा । प्रतापरामा क्षमा करा ।।३।।

ओव्या

यावरीन न लाविता वेळ । दावी श्री चरण कमळ ।
दर्शना चित्त उतावेळ । वारी तळमळ वियोगाची ।।३६।।

ऐंसे विनविता चेंद्रहास । प्रत्यक्ष जाला जगदीश ।
वारिले सकळहीं क्लेश । जाहले उल्हास चित्तासी ।।३७।।

अंभग

सूर्य चेंद्र ज्याचि कळा । तो हा स्वानंद पुतळा ।।१।।
रुप सावळे सुकुमार । जाले नेत्रासी गोचर ।।२।।
पडली येकपणे मिठी । घडली सायोज्याची लूटी ।।३।।
श्रीमत्प्रतापेंद्र रामा । योगी मानस विश्रामा ।।४।।

ओव्या

निलोत्पल तनु शाम घन । वर्णिजेल तुझे हास्यवदन ।
पंकजाकार विशाळ नयन । सुरेख समान भोवया ।।३८।।

अधर प्रवाळ तळी हनुवटी । परमसुंदर नासापुटी ।
सुरंग दशन टीळा लल्लाटी । माथा किरीट तेजागळा ।।३९।।

ज्याचि कळा फाकती गगनी । ऐंसी मकर कुंडलें श्रवणी ।
विराजती जैसा दिनमणी । कौस्तुभ मणी झळके गळा ।।४०।।

कीर्ती मुख आणि बाहुवटी । दीव्य सुगंधाची आंग उटी ।
मुक्तमाळा अनेक कंठी । रक्षी तेज दाटी पदकाची ।।४१।।

अवघ्ये मुद्रिकाचे लेणे । हस्त कंठी आणि बीरकंकणे ।
कास विराजे पीत वसने । तेजे ............ ।।४२।।

मेखळा क्षुद्र घंटा मनोहर । चरणी अंदु वाकी तोडर ।
आणीक बिरुदेही अपार । गर्जती फार अभय शब्द ।।४३।।

रत्नखचित तूणीर पृष्ठी । दिव्य कोदंड वाम पृष्टी ।
शर येकचि तर्जनी अंगुष्टी । जे रुप दृष्टी ध्यानस्था ।।४४।।

पद-१३

देखोनिया दीठीं सावळे रुपडे । मन झाले वेडे तत्काळ पै ।।१।।
नेत्र चकोरासी लागली होती भूक । पाहातां श्रीमुख चेंद्र धालो ।।२।।
दुजीयापणाची मनी हारपली । येकत्वा स्थीरली नीराकारी ।।३।।
श्रीमत्प्रतापरामा माउली भेटली । प्रारब्धाची तुटली दोरी आता ।।४।।

ओव्या

ते हे आजि दृष्टीगोचर झाले । मम भाग्य फळा आले ।
परमानंदे मानस धाले । न बोलवे बोले सर्वथा हे ।।४५।।

प्रार्थिता ऐंसे चंद्रहास । वदे त्यासि जगन्निवास ।
देतो भक्तराया सरस । वस्तुजात ।।४६।।

तुवा न मागता जाण । मी अर्पितो वरदान ।
भोगी साम्राज्य सिंहासन । त्रैलोक्य शासन मानील तुझे ।।४७।।

ऐंसे बोलुनि वचन । बोलला प्रतापराम कृपाघन ।
चंद्रहास चित्तभूमिके जाण । पीकले धन स्वानंदसस्यें ।।४८।।

इति श्री चंद्रहास चेरीत्र समाप्तं ।।

प्रतापराम = प्रतापसिंह राजा
प्रतापराम = प्रतापराज केसरी = प्रतापसिंह =
शहाजीचा भाऊ सर्फोजी.
↓
तुळजा - येकोजी बाबासाहेब
↓
प्रतापसिंह

(1736 to 1741 AD)

संदर्भ : एस् एन् ६० बुकसाईज वही ८" × ५"
अंदाजे, मोठी काळया शाईतील अक्षरे
।। पदे, अभंग, निरूपण ।।

# दामाजीपंताचे चरित्र

ऐका सादर भक्त चरित्रे परम पवित्र जे कां ।
अघनाशक अति सुखदायक नुरविति या भवशोका ।।
सद्‌भावे श्रवणातें करितां नाही त्या भव धोका ।
परम प्रीति गाती अति सादर पावति उत्तम लोका ।।१।।

नाही पुनरावृत्ती हो । सायोज्यातव मुक्ती हो ।।धृ।।

दामाजीपंताची रसद नेली पंढरिनाथें ।
पूर्व कथा परिसावी तेणे पुरतिल सकळहि स्वार्थे ।
बेदरिच्या राज्याची सेवा जाणा करित येथार्थ ।
काळ पडे तव तो अवचीता अन्नविणे आनाथे ।

मेली उरली पंता हो । म्हणती वांचवि आता हो ।।२।।

क्षेत्रीचे ते आले ब्राह्मण सर्वीहि मंगळवेढा ।
अशीर्वाद दामाजीपंता म्हणती सुक्रूत जोडा ।।
विषमकाळ पंढरीस रक्षी होईल थोर पवाडा ।
विठ्ठल भक्त तुं अनन्यभावे म्हणती उदार निधडा ।।

ऐंसी ऐकिली कीर्ती हो । अन्न करिसी तृप्ती हो ।।३।।

राज्यांबर कोगरें भरली धान्याची जे होती ।
काय पहातां ब्राह्मण हो तुम्हि समग्र कीजे रीती ।।
भरल्या गोण्या मग गाठोड्या तयासि नाही मीती ।
येक मासवरि घेउनि जाती जाहली अद्‌भुत कीर्ती ।।

परिते आणिले प्राणा हो । रक्षिल पंढरि राणा हो ।।४।।

मुजुमदार येक ब्राह्मण होता फिर्याद त्यानें लिहिली ।
राज्यांबर कोगरें साहेब समग्र रीती केली ।।
काय पहाता धरुनि आणा हुजुराती पाठविली ।
पंढरिनाथे त्या काळी हो माव अघटित रचिली ।।

पांडे होउनि त्वरितो हो । बेदर नगरा जातो हो ।।५।।

करुनिया धान्याची गणना सवाई द्रव्य केले ।
दामाजीपंताचे अक्षर पत्रीं बरवे लिहिलें ।।
निरखबरा ही खलिती देउनि मज आता धाडियेले ।
पावलियाचा जाब देइजे वहिला हाती धरिलें ।।

मि तो सेवक त्याचा हो । खानाजाद घरिचा हो ।।६।।

विठो नामक मी लेकउळा दामाजीपंता घरचा ।
आर्जदस्त हे दिधली साहेब बरिव्यापरी वाचा ।।
आजिच जाब द्यावा जी मज मुद्दत दिवस पांचा ।
करुनि धाडिला मज महाराजा फार राब आहे घरचा ।।

मि तो सेवक त्याचा हो । खाना जाद घरिचा हो ।।७।।

मेहरबानिचा कागद दिधला तो तो प्राण अमुचा ।
तसरिफ नाम दिवानी संनदकुल येत्ख्यारी साचा ।।
मुजुमदार तो बंदि घालिजे हक बुडवावा त्याचा ।
विठो नाक ऐंसें सांगावे तुं इतबारी घरचा ।।

बहुत लिहिण काय रे । ऐंसे सांग जाय रे ।।८।।

उमर्द राजधणियाची ऱ्हावी तेथुनि निघता जाला ।
लज्या रक्षुनि भक्ताची विठो पंढरपुरासि गेला ।।
येरिकडे दामाजीपंता घरिचा कोंड केला ।
आणिला तो पुढे घालुनि सामोरा धणि आला ।।

बहुत केला मान हो । वस्त्रे सिबिका माने हो ।।९।।

विठो नामक लेकवळा कालि घरचा आला होता ।
द्रव्य खलीती देउनि त्यानें कागद नेला निरुता ।।
येरु म्हणे मी कांहिंच नेणे अवघी विठ्ठल सत्ता ।
काय करिन कर्ता तो विठल निरोप द्यावा आता ।

तेथुनि निघता जाला हो । पंढरपुरासि आला हो ।।१०।।

दउतें लेखणी विठल पाईं ठेवियेली सद्भावें ।
लेकवळा धरिचा म्हणुनिया दिनानाथ मज पावे ।।

विठो नाक हे नाम ठेविलें तुजला कवणे बरवें ।
भक्तासाठी घेउनि काठी अनाथ बंधू धांवे ।

पूर्ण करिसी कामा हो । मी बाळक तुं रामा हो ।।११।।

× × ×

REFBK-0026623

## ।। साधन-ग्रंथ-सूची ।।


१) अवधानी रा. वा. - 'श्रीमद्भागवत भाषांतर.' विशाखा प्रकाशन. शनवारपेठ पुणे ३० प्रथमावृत्ती आक्टो. १९८२ खंड १ व २.

२) आजगांवकर जगन्नाथ रघुनाथ ले. प्राचीन मराठी संतकवी, खंड दुसरा. संपा-आजगांवकर गुं. फ., मूल्य २० रु. प्रकाशन १९७७.

३) आजगांवकर ज. र. - कवी चरित्रमाला ,भाग-१ ला, प्रकाशक - दामोदर सावळाराम आणि मंडळी आवृत्ती १९२९, मूल्य १ रुपाया.

४) आवटे रमेश शंकर-प्रका.- सकलसंतगाथा, खंड १ व २, श्रीसंतवाङ्.मय प्रकाशन मंदीर, १००६ सदाशिवपेठ, पुणे-२. आवृत्ती २ री, १९६७, संपा. जोशी काशिनाथ अनंत. दोन्ही खंडाची मिळून किंमत ६० रु.

५) आवळीकर डॉ.पंडित - जुने वाङ्मय, नवे संशोधन सप्टें. १९६४, मूल्य १०रु.

६) ओक वामन दाजी - वामन पंडितकृत कवितासंग्रह २, सांगली नगरवाचनालय, कविता क्र. १३२.

७) ओक वा.दा.- 'महाराष्ट्रकवि अमृतराय', निर्णयसागर प्रेस, तुकाराम जावजी प्रकाशन, १८९७. किंमत सव्वा रुपाया काव्यसंग्रह २६.

८) कुलकर्णी गो.म.(संपादक)- 'महाराष्ट्राची सत्वधारा', डॉ. रा. चिं. ढेरे अभिनंदन ग्रंथ, दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे, शके १९०३, सन १९८१, मूल्य ५० रुपये.

९) कुलकर्णी व. दि. - 'लीळाचरित्र एक अध्ययन', व्हीनस प्रकाशन पुणे-४ आवृ. पहिली, १९६७.

१०) कुलकर्णी दा. वि. - 'मराठी कथा-स्वरुप आणि आस्वाद', प्रकाशक, डॉ. वि. प. महाजन, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे ५६७, सदाशिव पेठ पुणे ३०, मूल्य २५ रु. प्रथमावृत्ती जून १९६६.

११) कुलकर्णी अनुराधा दामोदर 'श्रीधराची स्फुट आख्यानकाव्ये' गुरुलिंग प्रकाशन, मूल्य २० रु, प्रथमावृत्ती १२-३-१९८५ प्रका. सौ. कालिंदी वि. सांगलीकर १०६ अंबाकृपा, मंगेशकरनगर, सुभाषरोड, कोल्हापूर १२.

१२) कोटणीस र.ह.- 'कैवल्यवैभव' शके १८४२, सांगली. सांगली जिल्हा नगरवाचनालय, कविता क्र. ३१,१०६८.

१३) कोलते वि.भि- 'उध्दवगीता', १९२५, द्वितीय आवृत्ती १९६२, मूल्य ६ रु.

१४) ग्रामोपाध्ये गं.ब.(ले.) – 'मराठी आख्यान कविता', एक अभ्यास, प्रथमावृत्ती जाने. १९७०, मूल्य – २ रुपये.

१५) गोडबोले परशुराम बल्लाळ – 'नवनीत', संपा. अ. क. प्रियोळकर, १९५७, शके १८७९, मूल्य ३ रुपये.

१६) जोशी चिं.नी. – 'श्रीधरचरित्र आणि काव्यविवेचन', प्रथमावृत्ती १९५१, मूल्य १० रु. प्रका. जोशी मेघश्याम चिंतामणी.

१७) जोशी वसंत सखाराम – 'संशोधनसाधना', प्रथमावृत्ती - फेब्रु. १९७६. मूल्य १२ रूपये. प्रकाशक-प्राज्ञ पाठशाळा, वाई, जि. सातारा.

१८) जोशी वसंत सखाराम – 'एकनाथकृत भावार्थ रामायणाचा विवेचक अभ्यास' शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, टंकलिखित शोधप्रबंध १९६८.

१९) जोशी प्र. न. - 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', प्राचीन खंड, आवृ.१ ली १९७२, मूल्य ३२.५०, नितीन प्रकाशन पुणे-२.

२०) जोग रा. श्री.- 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड ३रा, मूल्य ३०रु, म.सा.प पुणे-३०, सन १९७३.

२१) जोशी महादेवशास्त्री- 'भारतीय संस्कृती कोश' प्रथमखंड, सन १९६६, ४१३ शनिवार पेठ, पुणे-२, मूल्य ३०रु, शके १८८४

२२) टी.आर. भीमस्वामी (संपादक)-'तज्जपुरी माहात्म्य' (श्रीशेषकविकृत) (मराठी पंडित सरस्वती महाल ग्रंथालय तंजावर ), प्रका.बडिवलेन, चिटणीस, सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर. इ. स.१९७९, मूल्य ८-५० रु.

२३) ठकार नि. श.- ' मराठी कविता स्वरूप आणि विवेचन', स्वाध्याय प्रकाशन, पुणे, सन १९७९. प्रका. डॉ. वि. प. महाजन, मूल्य २५ रु.

२४) ढेरे रा.चिं. (संपादक)- 'संतांच्या चरित्रकथा', मूल्य ५ रु., पुष्पक प्रकाशन, पुणे, ४१३ब, शनवार पेठ, पुणे–२, प्रका. आवृ. १२ ऑक्टोबर १९६९.

२५) ढेरे रा.चिं – ' विविधा', नीलकंठ प्रकाशन, प्रथमावृत्ती १९६७, मूल्य १२रु.

२६) तुळपुळे शं .गो.– 'पाच संतकवी', आवृ.२री, किं.१५रु., व्हीनस प्रकाशन, पुणे, जानेवारी १९६२.

२७) तोडमल ह. कि.– 'अर्वाचीन मराठीतील खंडकाव्ये', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे, २ प्र. आ. १९६३ मूल्य १५ रु.

२८) देशपांडे अ.ना.– 'प्राचीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास ' भाग ४था, व्हीनस प्रकाशन पुणे, १ ली आवृ. जाने. १९७७.

२९) देशमुख उषा माधव– ' साहित्यरंग ,' विजयप्रकाशन, सीताबर्डी, नागपूर १२, प्र.आ. ऑ. १९५६ मौज प्रकाशन, मुंबई. मूल्य ६ रु.

३०) धनपलवार माणिक (संपादक) 'कवी श्यामराजकृत - राजगोपाल विलास', आ. १ली, १९७४, मूल्य १२ रु.

३१) नांदुरकर मो.द. (संपा.)– ' संत जनाबाई चरित्र व काव्य,' अनमोल प्रकाशन, ६८३, बुधवार पेठ, पुणे प्र. आवृ. १९७६, संपा. चिटणीस व कार्यकारिणी, श्रीसंतजनाबाई शि. संस्था गंगाखेड, जि.परभणी.

३२) पांगारकर ल. रा.– ' मराठी वाङ्मयाचा इतिहास ', खंड २रा, आवृ. २री - १९७२, प्रका.- विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे-२, मूल्य ३७-५० रु.

३३) पंगू द.सी.– 'प्राचीन मराठी कवीपंचक', प्र. आवृ. १९४५, प्रका.- दा. ना. मोघे, किं २-५० रु. स्कूल ॲन्ड कॉलेज बुक स्टॉल, पुणे.

३४) परांजपे भा.श्री (ले) – ' वामनपंडिताची सुधाकाव्ये ', प्रका. रचना प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. प्र. आवृ. १९७०, मूल्ये ५रु.

३५) पेंडसे शं. दा.– 'पौराणिक भागवतधर्म', व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृ. १ ली १९६७ मूल्य २० रु.

३६) प्रियोळकर अ. का.– ' मोरोपंतांचे समग्रग्रंथ स्फुटकाव्ये ' भाग-३,प्रथमावृत्ती - १९६४, मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, नायगाव, मुंबई १४.

३७) बापट प्र. ब.(संपा.)– ' प्राचीन मराठी आख्यान कविता ' प्रका. केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ सदन, गिरगाव, मुंबई,१९४१. मूल्य १-२५.

३८) बापट हरी त्रिंबक– ' रघुनाथपंडिताचे काव्य ग्रंथ ', मनोहर प्रेस, सन १९०९, मूल्य साडे तीन आणे ( हरि त्रिंबक बापट, शनिवार पेठ १५४ पुणे )

३९) भागवत दुर्गा – ' लोकसाहित्याची रुपरेषा,' वरदा बुक्स प्रकाशन, सेनापती बापट मार्ग ३९७, १, पुणे. २री आवृ. १९७७, मूल्य ५० रु.

४०) **भावे वि.ल. –** ' महाराष्ट्र सारस्वत ', आवृ.५वी, शके १८८५, इ.स. १९६३ प्रका. ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी, ताडदेव रोड, मुंबई ३४, मूल्य ३०रु.

४१) **माळी गजमल(संपा.) –** ' प्राचीन अख्यानक कविता', व्हीनस प्रकाशन, पुणे. आवृ. १ ली, प्रका. स. कृ. पाध्ये, ३८१, शनवार पेठ, पुणे. मूल्य ३ रु.

४२) **मंचरकर र. बा. –** ' कविवर्य मुक्तेश्वर वाङ्मयीन अभ्यास,' शोधप्रबंध, टंकलिखित प्रत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७९.

४३) **लेले बा. के.–** 'मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्ये', अनमोल प्रकाशन, पुणे, ६८३, बुधवार पेठ, प्रथमावृत्ती, शके १८९६, सन १९७५, मूल्य २० रु.

४४) **लेले बा. के. –** 'गजेंद्रमोक्ष', प्रथमावृत्ती,१९८१, मूल्य ३० रु. प्रका. सौ. मालती वामन लेले, घ.नं. वी. २७, ६२– डी, दुर्गाकुंड रोड, वाराणसी.

४५) **वाटवे के.ना.–** 'पंडीत कवी' (१ली आवृत्ती ) नोंव्हेंबर १९५२, मूल्य – १४ आणे,प्रका. म. शं. कुलकर्णी, ७७ शनवारपेठ पुणे–२.

४६) **वाटवे के. ना. –** 'पंडितीकाव्य'(१ ली आवृत्ती),१९६८. प्रका. अ. अं. कुलकर्णी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २, मूल्य २–५० रु.

४७) **वाटवे के. ना.** 'प्राचीन मराठी पंडिती काव्य', मूल्य १० रु. आवृ. १ ली. प्रका. जोशी लोखंडे प्रकाशन - टिळक रस्ता, पुणे.

४८) **शाळीग्राम शंकर तुकाराम -** 'होनाजीबाळाकृत लावण्या', मूल्य ८ रु. संपा. आवृ. ५ वी, १९७२, चित्रशाळा प्रकाशन, ५६२ पुणे.

४९) **शेवडे इंदुमती -** 'मराठी कथा उद्गम आणि विकास', मूल्य ४० रु. सोमय्या प्रकाशन, १९७३.

५०) **सहस्त्रबुद्धे म.ना. -** 'मराठी शाहिरी वाङ्मय', ठोकळ प्रका. पुणे-२, मूल्य ६ रु.

५१) **'श्री नामदेव गाथा'–** संचालक शासकीय मुद्रण व लेखन सामग्री,मुंबई ४,प्रकाशन शके १८९२, सन १९७०, मूल्य १० रु.

५२) **मुरळकर धनाजी हरिभाऊ –** संक्षिप्त संपूर्ण श्रीमहाभारत श्री गुरुदेव प्रकाशन पुणे-२, २ री आवृत्ती, १९६९ मूल्य १० रु.

## ।। संस्कृत ग्रंथ ।।

१) श्रीमद्भागवत महापुराण (मूलमात्र), गाताप्रेस,गोरखपूर, संवत २०२१ अष्टम संस्करण मूल्य ४ रु.

२) श्रीमद्भागवत श्रीधरी संस्कृत टीका, शिळा प्रेस छपाई, मुंबईत रामवाडीच्या नाक्यावर ज्ञानसागर छापखान्यात श्रीमद्भागवत शिलायंत्रावर छापले. शके १७७९, पिंगलनाम संवत्सरे, मार्गशीर्ष वद्य ३ शुक्रवार, मूल्य ३रु.

३) श्रीमद् भगवद्गीता. गीता प्रेस, गोरखपूर.

४) महाभारत, गीता प्रेस, गोरखपूर.

●●●

"प्राचीन भारतीय आध्यात्मिक सत्त्वधारेतून प्रस्फुरित झालेल्या जीवनमूल्यांच्या पुरस्कारासाठी आणि संस्कार प्रबोधनासाठी परंपरेने स्फुट आख्यान काव्यांचा रंजक अविष्कार होत आला आहे. नितीबोध, समाजशिक्षण आणि लोकरंजनाच्या प्रयोजन सापेक्षतेने संत-पंत-तंत काळातील स्फुट आख्यान काव्यांचे इथे अभ्यासपूर्ण आस्वादक विवेचन मांडले आहे. तसेच एकाच विषयावरील अनेक कवींच्या कथांचे संच एकत्र मांडून त्यांचे तौलनिक विवेचन मराठीत प्रथमच मांडले जात आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.